# २००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक
**डॉ. मारोती कसाब**
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

सहसंपादक
**डॉ. अनिल मुंढे**
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.**

**ISBN No. 978-81-953976-4-8**

**२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन**

**संपादक**
**डॉ. मारोती कसाब**
**सहसंपादक**
**डॉ. अनिल मुंढे**

**प्रकाशक**
सिद्धी पब्लिकेशन हाऊस
६२४, बेलानगर, भावसार चौक,
तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.
मो. ९६२३९७९०६७

**मुद्रक**
अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.
मो. ९१७५३२४४३७

**प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०२१**

**सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर**

**मुखपृष्ठ : संतोष धोंगडे**

**अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर**

**मूल्य : ३००/-**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय मनोगत | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०६ |
| ०२. | प्रस्तावना | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | ०८ |
| ०३. | '२००० नंतरची मराठी कविता' | प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव | १७ |
| ०४. | "प्रकाशपर्वाचा साक्षीदार असलेली उजेडाची कविता" | डॉ. युवराज मानकर | २६ |
| ०५. | कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ' | डॉ. शत्रुघ्न जाधव | ४० |
| ०६. | 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहातील कवितांमधून येणाऱ्या सामाजिकतेचा अभ्यास | प्रा.उन्मेष शेकडे | ५० |
| ०७. | स्त्री साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी आणि २००० नंतरच्या कवयित्रीच्या कवितेतींल आत्मभान | प्रा. गौतम गायकवाड | ५७ |
| ०८. | गावगाड्याचा बदलता अवकाश शब्दबद्ध करणारा काव्यसंग्रह: 'बोलावे ते आम्ही' | डॉ.सुरेश शिंदे | ७३ |
| ०९. | सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा काव्यसंग्रह : आरंभबिंदू | डॉ. पंजाब शेरे | ८० |
| १०. | विषमतेविरूद्ध बंड पुकारणारी कविता: 'आता क्रांती दूर नाही' | डॉ. संतोष चंपती हंकारे | ८८ |
| ११. | जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा | प्रा. गोरोबा शेषराव रोडगे | ९७ |
| १२. | २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न | डॉ. राजेश धनजकर | १०२ |
| १३. | २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण | डॉ. रामकिशन दहिफळे | ११० |
| १४. | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप | डॉ. संजय खाडप | ११९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | **कृषी कृषक जीवन वेदना- “भोग सरू दे उन्हाचा”** | **डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे** | १२२ |
| १६. | **२००० नंतरच्या शेतक-यांचे जीवन चित्रण : विशेष संदर्भ ‘कुणब्याच्या पोरा’** | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १३० |
| १७. | **‘बोलावें ते आम्ही’: ग्रामीण जीवनाची गाथा** | **डॉ. मारोती बालासाहेब भोसले** | १४० |
| १८. | 'शिंपल्यातील मोती' : प्रबोधनाचा जागर घालणारी कविता | **डॉ. मारोती कसाब** | १४९ |
| १९. | **जागतिकीकरण आणि २००० नंतरची दलित कविता** | डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गिते | १५५ |
| २०. | २००० नंतरच्या कवितेतील वास्तव दर्शन | डॉ. श्रीराम मारोतराव क-हाळे | १६४ |
| २१. | नातीगोती सांभाळत सुगीचे दान देणारी कविता : “सुगीभरल्या शेतातून” | शरद ठाकर<br>डॉ. अशोक पाठक | १६८ |
| २२. | **उपेक्षितांच्या वेदनेचा आशावादी हुंकार - मारोती कसाबांची कविता** | **डॉ. प्रल्हाद भोपे** | १७४ |
| २३. | २००० नंतरच्या कवितेतील प्रतिमा विशेष संदर्भ श्रीकांत देशमुख यांची कविता | डॉ. शिवसांब कापसे | १८२ |
| २४. | **कविता महाजनांच्या ‘मृगजळातील मासा’ या काव्यसंग्रहातील प्रतिमा** | **वीणा गुलदेवकर** | १८७ |
| २५. | मराठवाड्यातील मराठी ग्रामीण कवितेतील अभिव्यक्ती | साईप्रसाद मधुकर पंडीत | १९३ |
| २६. | **२००० नंतरच्या आदिवासी कवितेतील एकलव्य** | **ज्ञानेश्वर नगाजी भडंगे** | १९९ |
| २७. | **२००० नंतरचे साहित्य : कलाकृतीच्या अनुषंगाने** | **प्रा. बालाजी जी. गायकवाड** | २०५ |
| २८. | **वसंत बहाराची अपेक्षा असलेला काव्यसंग्रह : बिकॉज वसंत इज कमिंग सून** | **डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड** | २११ |
| २९. | **२००० नंतरच्या काव्यातील मिथक संकल्पना** | **आश्लेषा सचिन कुंभार** | २१९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | दोन हजार नंतरच्या सामाजिक कवितेचे स्वरूप | संतोष मारोती चमकुरे | २२८ |
| ३१. | २००० नंतरच्या कष्टप्रद शेतकरी समूह जीवनाचा वेध घेणारी कविता: हिसाळा | बाळासाहेब निवृत्ती कराड | २३२ |
| ३२. | २००० नंतरची मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेच्या संदर्भात | डॉ. गजानन अनंता देवकर | २३९ |
| ३३. | मेलं नाही अजून आभाळ : शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देणारी प्रेरक कविता | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | २४७ |
| ३४. | इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो' काव्य संग्रहातील शेतकऱ्यांचे आक्रंदन | डॉ. दादाराव गुंडरे | २५४ |
| ३५. | २००० नंतरची आदिवासी कविता | शोभा विठ्ठल सरकुंडे | २६४ |
| ३६. | शिवारातलं पाणी काव्यसंग्रहातील शेतकऱ्यांचे जीवन चित्रण करणाऱ्या कविता | अशोक हणमंतराव पाटील आडलूरकर | २७० |
| ३७. | शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश पेरणारा : कुळवाडी अभंग | प्रा. प्रमोद भ. इंगोले | २७८ |
| ३८. | २००० नंतरच्या विद्रोही कवितेतील सामाजिक जाणिवा (विशेष संदर्भ : मारोती कसाब यांची कविता) | भरत शिवाजीराव गायकवाड | २८५ |
| ३९. | समकालीन अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेणारी कविता: 'माझ्या वर्तमानाची नोंद' | प्रा. बालाजी गणपतराव भंडारे | २९२ |
| ४०. | माणसाला अंतर्मुख करणारी कविता: कोरा कागद निळी शाई | प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड | ३०१ |
| ४१. | २००० नंतरच्या आंबेडकरवादी कवितेची वाटचाल | धनंजय पांडुरंग सोनकांबळे | ३१० |
| ४२. | २००० नंतरच्या मराठी कवितेतील दलित जाणिवा | प्रा. डॉ. अनिल मुंढे | ३१४ |

# संपादकीय मनोगत

'२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन' हा महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आमच्या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयांवर ऑनलाईन चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषदा घेण्यात आल्या. त्यापैकीच मराठी विभागाच्या वतीने '२००० नंतरचे साहित्यप्रवाह: स्वरूप आणि आकलन' या विषयावरची एक दिवसीय राष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळा दि.२६ नोव्हेंबर २०२१ रोजी भारतीय 'संविधान गौरव दिना' चे औचित्य साधून घेण्यात आली. या कार्यशाळेला महाराष्ट्रातून आणि देशाच्या इतर भागातूनही मोठा प्रतिसाद मिळाला. सदरील कार्यशाळेच्या निमित्ताने संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्याचे जाहीर करुन, त्या अनुषंगाने उपविषय सूचवून शोधनिबंध पाठविण्याचे आम्ही आवाहन केले होते. आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन नामांकित आणि नवोदित अशा विविध स्तरांतील अभ्यासकांनी अभ्यासपूर्ण शोधनिबंध पाठविले. वेळेची मर्यादा देऊनही आम्हाला अल्पवेळेमध्ये जो प्रचंड प्रतिसाद दिला त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत. ज्या ज्या शोधनिबंध लेखकांनी आम्हाला आवर्जून, वेळेतला वेळ काढून, शोधनिबंध पाठवून या महत्त्वाच्या सांस्कृतिक, वाङ्मयीन उपक्रमात आपला कृतिशील सहभाग नोंदविला; त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आमच्या किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष, सचिव आणि सर्व पदाधिकारी विविध उपक्रम राबविण्यासाठी आम्हाला नेहमीच प्रोत्साहन देत असतात; त्यांचेही मनःपूर्वक आभार.

यानिमित्ताने २००० नंतरच्या मराठी कवितेच्या निर्मिती, स्वरुप आणि भवितव्यासंबंधी अत्यंत मूलगामी अशा स्वरूपाची प्रदीर्घ प्रस्तावना लिहून आणि या ग्रंथाचे संदर्भमूल्य अधोरेखित करुन आमचे मनोबल वाढविले याबद्दल आमचे मार्गदर्शक आणि महाविद्यालयाचे

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे आणि या ग्रंथाची पाठराखण करणाऱ्या प्रा. डॉ. प्रतिभा जाधव तसेच नॅक समन्वयक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. नागराज मुळे, कार्यालयीन अधीक्षक प्रशांत डोंगळीकर यांचेही मनःपूर्वक आभार. सदरील संदर्भग्रंथासाठी लेखन करणाऱ्या सर्व लेखकांचेही मनःपूर्वक आभार.

या ग्रंथाचे आशयानुरुप असे सुंदर मुखपृष्ठ चितारणारे आमचे मित्र, नव्या पिढीतील महत्त्वाचे चित्रकार संतोष धोंगडे यांचे आणि हा ग्रंथ आकर्षक, सुंदर, डौलदार स्वरूपात प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशक मित्र राजेश उंबरकर यांचेही विशेष आभार. सदरील ग्रंथासाठी ज्यांनी ज्यांनी आम्हाला मदत केली, आम्हाला प्रोत्साहित केले, त्या सर्वांचे हार्दिक आभार मानून हा ग्रंथ वाचकांच्या हवाली करत आहोत. धन्यवाद.

**डॉ. मारोती कसाब**
**डॉ. अनिल मुंढे**

# प्रस्तावना

## मराठी कवितेला कालोचित नवे वळण देणारी कविता

'२००० नंतरच्या प्रवाहातील मराठी कविता : स्वरूप आणि आकलन' मधील कवितांचे झालेले संशोधन हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. यातील लेखांतून ही कविता कशी बदलत गेली व बदलत आहे, हे सांगतांना तिची असंख्य मर्मस्थळं संशोधकांनी उलगडून दाखवलेली आहेत. ही कविता तिच्या नामारूपाने, अर्थबोधाने, आणि अर्थपूर्णतेने अगोदरच्या काव्य परंपरेशी संभवणा-या नात्यागोत्यातून आलेली, कधी संयत विद्रोहाच्या रूपाने, ग्रामीण- दलित- आदिवासी- संविधानवादी- भटक्या विमुक्त समाजातील कवितेच्या रूपाने, महानगरीय संवेदनांच्या अंगाने कविता, तर कधी वाचकांच्या मनात उतरावी म्हणून सवंग लोकप्रियतेसाठी लिहिलेली वर्तमानपत्रीय कविता आहे.

तसेच ही कविता दैनंदिन जीवनात उद्भवलेल्या ताणतणावातून जीवनाकडे सकारात्मक; पण तेवढ्याच गांभीर्याने पाहणारी कविता आहे. म्हणून तर ती विविध प्रकारच्या जीवन जाणिवेची अनुभूती देणारी कविता ठरली आहे. स्त्री विश्वाच्या परिवर्तनीय भावविश्वाची आणि तिच्या भावानुभूतीची आदरयुक्त कविता आहे. तसेच ही कविता असामान्यांपासून ते तळागाळातील विखुरल्या गेलेल्यांची कविता आणि प्रासंगिक घटनांना प्राधान्य देणारी कविता आहे. सवंग राजकीय जीवनाला कवेत घेणारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्यक्रम देत देत इतर विविध पैलूंना सामोरे आणणारी ही कविता तेवढ्याच ताकदीची आणि वास्तववादी चेहरा घेऊन आलेली आहे, हे यातील संशोधनात्मक लेखांतून दिसून येते.

**नव्या चेह-याची कविता :**

या प्रवाहातली कविता ही नवीन आहे. तिच्या अनुभूतीची धार धारदार आहे. विषय तेच तेच असले तरी अनुभूती वेगळी आहे. अनुकरण

नाही. भाषा वेगळी आहे. मांडणीचे तंत्र सहज आहे. काव्याचे काव्यत्व या सगळ्याच कवितेतून अभावितपणे राखले जाईल असा आटोकाट प्रयत्न कवींनी केलाय, म्हणजेच या २००० नंतरच्या प्रवाहातील मराठी कविता काव्याला अबाधित राखूनच काव्याचा नवा चेहरा असलेली ही आपल्या साठोत्तरी कवितेला डावलून नव्हे, तर त्यांना स्वतःत सामावून घेऊन वाटचाल केलेली आहे. म्हणून पूर्वकालीन परंपरेशी काहीशी सादृश बाळगणारी आणि नवीनता निर्माण करणारी ही कविता आहे.

या कालखंडातील मराठी कवितेतील आशयाची विविधता, तिची निर्मिती क्षमता आणि तिच्यावर झालेल्या समीक्षेचा दृष्टिकोनही लक्षात घेणे गरजेचे आहे. या दोन दृष्टीने विचार करताना आज उद्याचे जे कवी आहेत, त्यांना २००० नंतरच्या कवितेत नेमके काय घडते आहे व घडत आहे हे समजणे त्यांच्या निर्मितीच्या दृष्टीने उद्बोधक आहे. कविता वाचून वा समजून कवी होता येत नाही. पण ज्या वाचकांसाठी कविता लिहिली जाते, तो वाचक मात्र कविता वाचून समजूनच कवितेचा वाचक झालेला असतो. वाचकाला पुढे घेऊन जाणारी वा नेणारी कविता हवी असते. आणि कवी हा एक वाचक म्हणूनही असू शकतो.आणि नेमकी हीच बाब २००० नंतरच्या कवितेच्या बाजूने अनुकूल आहे. तिच्या निर्मितीप्रक्रियेवर भर देऊन निर्मितीक्षम मनांच्या व अभिरूचिसंपन्न रसिकतेच्या दृष्टिने केलेली समीक्षाही आहे. तिच्याबद्दलची समीक्षा, काही तुरळक अपवाद वगळता उपलब्ध झालेली आहे.

**सामाजिक जाणिवेच्या आत्मभानाची कविता:**

२००० नंतरच्या आगेमागे रूपास येऊ लागलेल्या असंख्य मराठी कवींच्या कवितेच्या जडणघडणीत तत्कालीन सामाजिक जीवनाचे आणि सांस्कृतिक क्षेत्राचे महत्त्वाचे योगदान आहे. या काळातील कवितचे नैसर्गिक आणि स्वतःच्या कलात्मक, सामाजिक जाणिवेच्या आत्मभानातून आविष्करण झालेले आहे. या कवींच्या मनातील द्वंद्वात्मक नात्यांचा

त्यांच्या अभिव्यक्तीवर प्रभाव पडणे स्वाभाविकच आहे आणि तो पडलेला आहे. कवींच्या सामाजिक जीवनातील अस्तित्ववादी तापमान बरेच वर चढल्याचे या कालखंडात दिसून येते. म्हणून त्यांच्यातील जीवनाची वास्तवता ठाई ठाई दिसून येते. वर्तमान काळात जाणवत असलेली किंवा तशी जाणीव करून देणारी ही कविता आहे.

या कवितेला भविष्याची आच नाही; असे नाही. त्यामुळे स्वानुभवाचे अर्थ करण्याचे, स्वतःचे मनोविश्व ठाम बनविण्याचे प्रयत्नही या काळातील कवितेतून कवींनी केलेला आहे. या प्रयत्नात परात्मतेचा झगडा कवीला झोंबणे अगदी स्वाभाविक होते. ते त्याने पचवलेले आहे. १९६० नंतरच्या कवितेतला विद्रोहाचा अंत:स्वर तीव्र होता त्या तुलनेत २००० नंतरच्या मराठी कवितेतला विद्रोहाचा अंत:स्वर हा काहीसा क्षीण झालेला दिसून येतो. या कवितेतील सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रातला सूर मात्र वेगळा आहे, हे आपल्याला जाणवते.

**विद्रोहाचा संयत सूर:**

साठोत्तरीच्या कवितेतील विद्रोहाचा सूर आणि २००० च्या नंतरच्या मराठी कवितेतल्या विद्रोहाचा सूर एका पातळीवरचा नाही. इथे ही विद्रोह आहे ; पण त्याचे बदलते स्वरूप या ग्रंथातून दिसतेय. हा सूर अनेक वैविध्यपूर्ण जाणिवेतूनही कवींच्या सोयीप्रमाणे विभागला गेलाय. म्हणूनच तो बदललाय. म्हणून विद्रोहाचे स्वरूपही बदलले.हा बदल काळानुरूप आहे.

२००० नंतरच्या काळातील विद्रोही वृत्तीला कवितेत विद्रोही सामग्री फारशी सापडलेली दिसत नाही. म्हणून तो संयत आहे. तसेच या कवितेला सामाजिकतेचे धागेदोरे आत्मसात करणे फारसे कठीण गेलेले दिसत नाही. म्हणून कवीच्या स्वतःच्या भावानुभवातला सामाजिक आणि सांस्कृतिक तथा वर्गीय वारसा भुंडा व म्हणून विद्रोहाकडे अधिक खेचून नेणारा ठरला नाही. तशा आत्मभानाचे प्रकटीकरण २००० नंतरच्या या ग्रंथातील

कवींच्या काव्यसंग्रहावर जो काही संशोधनात्मक अभ्यास झालेला आहे त्यातून दिसतो.

**कवितेचे वेगळेपण:**

एकंदरीत व्यक्तिगत अस्तित्वाच्या व बाहेरच्या चराचराचे संवेदन नकळतपणे आणि काल स्वराशी स्वतःचा सूर जुळणारे कसे ठरतील हे या कालखंडातील मराठी कवींच्या कवितेचे वेगळेपण आहे. हा कालस्वर एका प्रेरणेचा आवाज ठरलेला आहे. मानवी व नैसर्गिक सृष्टीच्या प्राकृतिक आणि एकात्मतेचा व सांस्कृतिक भ्रमनिरासाचा तर कधी सांस्कृतिक उच्च स्तराचा हा स्वर मेळ आहे असे वाटते. सामाजिक जीवनाशी व इतर घटकांशी एक नाते जोडून एका नव्या काळाशी संवाद साधण्याची आकांक्षा बाळगणारी ही या कालखंडातील मराठी कविता होय.

**नाना प्रकारच्या भाव संवेदना:**

२००० नंतरच्या प्रवाहातील मराठी कवितेतून अवतीभवतीच्या जन जीवनातील नाना प्रकारचे ताणतणाव, नाना प्रकारच्या व्यथा - वेदना, नाना प्रकारच्या भाव संवेदना अटीतटीने आणि आवेगाने प्रकट झालेल्या आहेत. जगण्याच्या अगदी प्राकृतिक पातळीवर असलेल्या नात्यांची गुंफण या कवितांमधून दिसून येते. देह व दैहिक जाणिवा आणि माणसांच्या आत्मिक उर्मींचा एक सतत चाललेला कलह ही कविता साकार करताना दिसते. तसेच हा कलह जगण्याचाच एक भाग बनलेला आहे. म्हणून इथल्या प्रत्येक जिवाच्या अस्तित्वाचा झगडा, त्याची नैसर्गिक निवड, जिवंत राहण्याची जिगीषा आदींसह विविध संघर्षांचे व अंतिम निष्कर्ष सांगणारी २००० नंतरची ही कविता आहे.

**लोकजीवनातील काव्यात्म प्रवृत्ती:**

२००० नंतरच्या मराठी कवितेत लोकजीवनातील काव्यात्म प्रवृत्तीसंबधी नवे भानही दिसते आहे. गाणे गुणगुणने ही माणसाची नैसर्गिक व सार्वत्रिक प्रवृत्ती आहे. म्हणून ज्या ज्या चालींनी, तालींनी,

शब्दांनी व शब्दबंधांनी ते गावे - गुणगुणावे वाटते, ते ते सर्व त्या त्या तालासुरात व्यक्त करण्यात या प्रवाहातील कवी यशस्वी झाले आहेत. अशा लोकजीवनातील कवितेला व रसिकतेला जाणीवपूर्वक सामोरे जाण्याची दृष्टी २००० नंतरच्या कवितेतून प्रकट झाल्याचे दिसते.

या प्रवाहात कार्यक्षेत्रातीलच नव्हे तर, एकूणच साहित्यक्षेत्रातील मक्तेदारी हळूहळू संपुष्टात आलेली दिसते. म्हणजे समाजातल्या सर्व स्तरातून सर्जनाच्या प्रवृत्ती बळावत गेल्या. मध्यमवर्गीय संवेदनशीलतेला महानगरीय वास्तवाने सर्जनाच्या नव्या वाटा दाखवल्या. ग्रामीण व दलित जीवनाची संवेदनशीलता महानगरीय नव्या जाणिवेतून जाऊ लागली हे दिसते.तसेच स्त्रियांचे भावविश्व स्त्रियांप्रमाणेच पुरूषांनीही ठसठसीतपणे उलगडून दाखवले आहेत.त्यातून त्यांचा मूल्यभाव व अढळ निष्ठा स्पष्टपणे जाणवते. यातून स्त्रिवादी कवितेला एक जीवनमूल्ये लाभले.

**भाषिक कळेतल्या आपलेपणाचे प्रतिबिंब:**

२००० नंतरची कविता ही सर्जनशील आत्मभानातून आणि प्रचंड कल्पनाशक्तीतून आविष्कृत झालेली आहे. कविता नि प्रतिमा कशी साकारते, वास्तवाचे तपशील कसे शोधले जातात, गोठवले जातात आणि शेवटी एक विलक्षण अस्वस्वस्थकारक अंतर्मुख भान कसे निर्माण होते याची जाणीव या कविता करून देतात.

विशिष्ट संघर्षशील निर्मितीमध्ये शब्द, भाषा, कल्पना यांचे द्वंद्व चालू असते. मूळ अनुभव यथार्थपणे पाहण्यासाठी ही साधने आहेत. साध्याला महत्त्व देत साधनांचे मुक्त स्वातंत्र्य घेतले जाते. या साध्य-साधन विवेकामुळे २००० नंतरच्या कवितेतील भाषिक कळेतही प्रचंड आपलेपणाचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

**व्यापक मंच लाभलेली कविता:**

२००० नंतरचा वाङ्मयीन प्रवाहाचा काळ हा तसा सामाजिक माध्यमांतून व वर्तमान पत्रातून झटपट प्रसिद्धीचा काळ आहे. कवीला

काव्य लिहून झाले की त्याची लागलीच प्रसिद्धी हवी आहे. आता गावपातळीपासून ते तालुका आणि जिल्हा पातळीवर साहित्य संमेलन भरवली जात आहेत. त्यात अनेक जुन्या नव्या कवींना स्थान मिळते आहे. त्यामुळे नवोदित कवींचा उत्साह वाढतोय. त्यातून कवितेचे दालन समृद्ध होत आहे. त्यामुळे अनेकविध जाणिवांची कविता लिहिली जातेय. ती प्रामाणिक आहे. तशी ती काहीशी हौसीही आहे. पण ती कविता आहे, हेही तेवढेच खरे.

अशा कवितेचा प्रकाशकांकडून काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी चढा-ओढ लागली आहे. आणि प्रकाशकांचीही संख्या वाढली आहे. आता पूर्वीसारखे प्रकाशकांना खेटे घालावे लागत नाही. तसेच दोन्ही बाजूंनी प्रत्येकजण आप आपल्या परीने काही तरी चांगलं काव्य लेखन आणि प्रकाशन करून वाचकांच्या हाती देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. एकंदरीत या कवितेला व्यापक असा मंच लाभलेला दिसतोय.

**या प्रवाहातील कवितेची वैशिष्ट्ये:**

२००० नंतरची कविता ही प्रगतशील कविता आहे. साठोत्तरी व नव्वदी नंतरच्या कवितेतीलही विषयांना कवेत घेऊन सुखदुःखाची विलक्षण भावपूर्णता, मानव्याची आत्मकथा अक्षर करणारी उद्याची प्रगल्भ संवेदन कविता आहे. या कवितेची काही वैशिष्ट्ये नोंदवता येतील. ती अशी-

१) ही कविता सर्व प्रकारच्या शोषणाला सर्वस्वी नकार देते.
२) जीवनवादी दृष्टीकोनातून कविता लिहिण्यावर सर्वाधिक भर
३) साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण करणारा प्रत्येकजण 'कवी' आहे.
४) कोणत्याही 'फॉर्म' चा अंगिकार न करता मुक्तछंदातून अभिव्यक्त होणारी ही कविता आहे.
५) महानगरीय जाणिवेतून लिहिलेली कविता.
६) कोणत्याही गटातटात न बसणारी कविता आहे.
७) जात- वर्ग- भांडवलशाहीला नाकारून मानवतावादाचा स्वीकार करणारी कविता आहे.

८) समाज माध्यमातून समाजाला जे जे हवं ते ते देणारी कविता.
९) संयत विद्रोहाचा नवा आविष्कार करणारी कविता आहे.
१०)संवैधानिक मूल्यांचा पुरस्कार करणारी कविता.
११)परंपरेला मूठमाती देणारी कविता आहे.
१२)देव-दैव वादाला तिलांजली देणारी कविता आहे.
१३)ग्रामीण- दलित- आदिवासी आणि स्त्रीवादी साहित्य अशा सीमारेषा पुसट करणारी ही कविता आहे.
१४)मानवता हाच या कवितेचा केंद्रबिंदू आहे.
१५)झटपट प्रसिद्धीची वर्तमानपत्रीय कवितांचा बहुतांश आहे.
१६)या काळात प्रकाशकांचे उंबरठे झिजवणारे कवी नाहीत.
१७)प्रस्थापितांच्या मान्यतेची वाट न पाहता 'स्वतंत्र चलो रे' किंवा 'एकला चलो रे' च्या भूमिकेतली ही कविता आहे.
१८)शासनासह विविध पुरस्कार, साहित्य संमेलने, असंख्य कविसंमेलनाच्या आयोजनामुळे कवींना प्रोत्साहनपर वातावरण तयार आहे.
१९)कवितेची शैली सहज, साधी व सरळ आहे.
२०)विविध समाज घटक लिहिते झाल्यामुळे नवीन नवीन शब्दकळा आणि प्रतिमा विश्व टिपण्यात आले आहे.

अशी काही मोजकी २००० नंतरच्या कवितेची वैशिष्ट्ये या संपादित ग्रंथाच्या आधारे सांगता येतील.

**मराठी कवितेला कालोचित नवे वळण देणारी कविता:**

२००० नंतरच्या विविध काव्यसंग्रहाची या ग्रंथातून जी वाङ्मयीन चिकित्सा करण्यात आलेली आहे, ते अत्यंत उल्लेखनीय कार्य आहे. यात काही जुनेपण काव्यांश घेऊन त्याची नव्याने मांडणी अधोरेखित करून व काही नव्या आशयाचे आणि जिव्हाळयाचे विषय घेऊन आलेले कवी आहेत. मग त्यांचे आशय शेतकऱ्यांचे असोत, की शासकीय अनुदान वा सवलतींचे असोत की राजकीय हस्तक्षेप, बेकारी, भ्रष्टाचार, आर्थिक अडचणी, इ. इ. विषयांची नवी मांडणी या कवितेत कशी आली आहे हे स्पष्ट करताना

संशोधकांनी या कवितेने मराठी कवितेला कालोचित नवे वळण देण्याचे काम निर्विवादपणे केले आहे, हेच नोंदवले आहे.

या तिच्या कार्याची सर्वांगीण समज आपल्या वाड्.मयीन संस्कृतीत कितपत दृढ होईल ते काळच ठरवेल. ही कविता आपलं मोठेपण, अस्तित्व आणि वर्चस्व टिकवण्यासाठी नाही. तर ती आपली अनुभूती प्रामाणिकपणे व्यक्त करण्यासाठी उत्कटतेने लिहिलेली कविता आहे. सर्व काही मिळतेय पण मनाच्या जखमा भरून निघत आहेत, पण वळ कायम राहणार नाहीत ना याचं शल्य अनेक कवींना आहे. म्हणून या कवितेला सामाजिक अभिसरण अभिप्रेतआहे. कुचंबणा झाली तर हरकत नाही पण उपेक्षा तरी नको असे म्हणणारी ही कविता आहे.

२००० नंतरच्या मराठी काव्यप्रवहातली ही कविता एक परिवर्तनवादी, बहुजनवादी, मानवतावादी, तसेच संविधानाचा पुरस्कार करणारी आणि भांडवलशाही विरोधी, मानुषतावादी, समाजाभिमुख असलेली व कालोचित नवे वळण देणारी ही कविता आहे म्हणून तिच्याकडे २१व्या शतकातील मुख्य प्रवाह म्हणूनच आपण पाहिले पाहिजे, असे वाटते. हे माझे स्पष्टीकरण झाले पण समर्थन नव्हे.

'२००० नंतरची मराठी कविता: स्वरूप आणि आकलन' हा संशोधनात्मक ग्रंथ मराठीतील या प्रवाहाची सांगोपांग चर्चा करणारा ग्रंथ आहे. यासाठी सुप्रसिद्ध कवी, समीक्षक, साक्षेपी संपादक डॉ. मारोती कसाब आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक व निरूपणकार प्रो. डॉ. अनिल महाराज मुंढे यांनी घेतलेले अथक परिश्रमही एक वाङ्मयीन नोंद ठरावी असेच आहेत. या निमित्ताने दोघांचेही मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा...!

**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**

महात्मा फुले महाविद्यालय,

अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर

# ISSN: 2454-7905

# SJIF Impact Factor: 6.91

SIDDHI

Siddhi Prakashan

Nanded.

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal**

**Website: www.wiidrj.com**



**Miss. Pallavi L. Shete**

C/o. R.G. Umbarkar, H.No. 624, Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)

**Email :** umbarkar.rajesh@yahoo.com

shrishprakashan2009@gmail.com

**Mob : +91-9623979067**

# ‘२००० नंतरची मराठी कविता’


## डॉ. प्रतिभा सुरेश जाधव

मराठी विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगाव, ता. निफाड जि. नाशिक ४२२३०६


साठोत्तरी, नव्वदोत्तरी साहित्याची मोठया प्रमाणात समीक्षा झालेली आहे. विविध अंगाने त्यावर विचारवंतांनी, भाषाभ्यासकांनी साधकबाधक अशी चर्चा केलेली आहे व ती विविध ग्रंथ व संदर्भसाहित्य रुपात मुद्रितही झालेली आहे. जी पुढच्यांसाठी खरोखरच उपयुक्त, दिशादर्शक अशी आहे. परंतु अलिकडच्या साहित्यावर म्हणजे सन २००० नंतरच्या साहित्यावर फार काही चर्चा व समीक्षा झालेली दिसत नाही वा ते त्यावर प्रक्रिया सुरु आहे असे आपणास म्हणता येईल. कारण विशिष्ट दशकातील वा काळातील साहित्यावर समीक्षा रुपात लिहिण्यासाठी विशिष्ट अशा निष्कर्षाप्रत पोहचण्यासाठी ते साहित्य समजावून घेऊन त्यावर विचार होण्यासाठी, ऊहापोह  करण्यासाठी त्या साहित्याची नेमकेपणाने दिशा व दशा कळण्यासाठी ठराविक काळ जाऊ दयावा लागतो तेव्हा त्याचा तौलनिकदृष्टया साधकबाधक असा अभ्यास करता येतो. संत पंत तंत परंपरा मराठी कवितेस लाभली आहे. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात कविता बदलत गेली, प्रगत होत गेली. आधुनिक कवितेला केशवसुतांच्या काव्यापासून अनेक रंगीपण प्राप्त झाले यातूनच ध्येयवादी, सौंदर्यवादी, वास्तववादी, अतिवास्तववादी, अस्तित्ववादी अशी अनेक नावे धारण करुन कविता विस्तारत गेल्याचे दिसते.

सन २००० नंतर माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रभावाने संपूर्ण जगच झपाटयाने बदलले. अर्थातच कला आणि साहित्यावरही त्याचा प्रभाव पडणे अपरिहार्य होतेच. तसेही जेव्हा तुमच्यासमोरील समस्यांचे स्वरुप बदलते, जगण्याचे प्रश्न बदलतात, सामाजिक परिस्थितीनुसार नितीमूल्ये बदलतात जातात तेव्हा त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडणे अपेक्षित असतेच मग तो काळ कोणताही असो आणि हयाच न्यायानुसार २००० नंतरची कविताही खूप बदलली व बदलत आहे.

कवितेबाबत विचार केला तर ती मोठया प्रमाणात लिहिली जातेय, ती विविधरंगी आहे. प्रयोगशील आहे. तिला विविध पैलू आहेत. भूमिका घेऊन लिहिली जाणारी महानगरीय संवेदनेची जीवनवादी कविता गेल्या दशक–दीड दशकात मोठया संख्येने लिहिली गेली तशीच वास्तववादी व तळागाळातील सर्वसामान्य माणसाची व्यथा, वेदना सांगणारी कविता हल्ली अधिक प्रमाणात लिहिली जाऊ लागलेली दिसते. आवर्जुन सांगावी अशी गोष्ट म्हणजे आज जगभरात ‘माणसाची’ कविता मोठया प्रमाणात लिहिली जातेय. कवितेची जीवनवादी आस्था वाढत आहे. नव्या वाटांच्या शोधसफरीवर हे सर्जक आहेत. ज्येष्ठ भाषाभ्यासक म्हणतात त्याप्रमाणे

खरेखुरे सर्जन हे जगणे आणि वाढणे या मुलभूत प्रेरणेशी निगडीत आहे. त्यासाठी माणसाला स्वेतर विश्वाबरोबर संबंध जोडावा लागतो. वास्तवाला भिडणारा साहित्यिक हा समकालीन इतिहासाचा एक साक्षीदार असतो. सभोवतालचे वास्तव त्याच्यासमोर अनेक प्रश्न उपस्थित करत असते. त्यांचा वेध घेत त्या वास्तवाला आकार व आशय देण्याचा तो प्रयत्न करत असतो. साहित्य वा कलेतून तो हे करत असतो. मूल्यपरिवर्तनातून समाजपरिवर्तन घडत असते व यातूनच समाजाला आणि संस्कृतीला संजीवन मिळत असते. सामाजिक बांधिलकीच्या सखोल जाणिवेतून निर्माण होणारे साहित्य हे समाजाला प्रबोधनाच्या प्रक्रियेत गुंतवून ठेवू शकते. समाजप्रबोधनाची प्रक्रिया अव्याहतपणे चालू ठेवायची असेल तर सामाजिक बांधिलकी आवश्यक ठरते. साहित्यातून, कलेतून ती मोठया प्रमाणात होत असते. साहित्य नेहमीच काळानुरुप जुनी कात टाकून नवतेजाने तळपत असते. उदात्त जीवनमूल्यांना चिरंतनत्व प्राप्त होते. म्हणूनच आजही बाबुराव बागुलांची 'वेदांआधी तू होतास...' ही कविता चिरस्मरणात राहते. कुसूमाग्रजांची 'कणा' ही कविता आजही वाचकास, युवकांना भुरळ घालते किंवा विंदांची 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे....' ही कविता वाचली जाते. किंवा ग्रेस यांच्या

**'पाऊस कधीचा पडतो**
**झाडाची हलती पाने**
**हलकेच जाग मज आली**
**दु:खाच्या मंद सुराने'**

या ओळी विसरायच्या म्हटल्या तरी विसरता येत नाहीत.

२००० नंतरची कविता अधिक वास्तववादी, प्रगल्भ झालेली दिसते. जीवनवादी कविता अधिक प्रमाणात लिहिली गेलेली दिसते. मराठी साहित्याच्या अभ्यासक डॉ. शीला गाडे असे म्हणतात की, 'चिरंतन मूल्य असलेली कविता कोणत्याही काळात टवटवीत राहते व वाचकास भुरळ घालते.' एकीकडे आपण म्हणून शकतो तसेच नवं तंत्रज्ञान आणि त्यासोबत आलेली मुद्रणसुलभता त्यामुळे अधिक आकर्षक पण आशयाच्या अंगाने अत्यंत ढिसाळ असणारी पुस्तकं मोठया प्रमाणात प्रकाशित होत आहेत. त्यात विशेषत: २००० नंतर मोठया प्रमाणात कवी व त्यांच्या कवितांचं पिक येऊ लागलेलं दिसतं. जागतिकीकरण व अत्याधुनिक समाजमाध्यमे यांच्यामुळे मोठया प्रमाणात नवकवी जन्माला आलेले दिसतात. आजची कविता वास्तवसन्मुख अधिक झालेली आढळते आणि महत्वाचे म्हणजे ती अनुभवसन्मुखतेपेक्षा श्रोतृसन्मुख पध्दतीने अनेक तरुण कवी लिहिण्याचा प्रयत्न करताना दिसतात

नव्या दमाच्या प्रयोगशील कवयित्री डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे आपल्या 'ती कविता आणि चळवळ' या कवितासग्रहातील 'माणूस' नावाच्या कवितेत म्हणतात की,

**'जमेल तशी गिरवित आहे मी ही नवी बाराखडी**
**तू ही वाचत राहा ना नवसाक्षरासारखा**
**विसर जरा तू बाईपण माझे**
**वाग ना माझ्याशी तू फक्त माणसासारखा'**
**किंवा**
**'येऊ नकोस तू आता वृक्षासारखा आधार होऊन**
**मीही लपेटणार नाही तुला वेलीसारखी सहारा घेऊन**
**यायचेच असेल तर ये सोबती, सांगाती, सहप्रवासी म्हणून**
**आता मी शिकले आहे सावरायला आणि जुनी प्रतिमा विसरायला**
**निघाले आहे एकटयानेच समर्थपणे रोवत पाय**
**तेव्हा उगीचच कुबडी देऊन दुबळी करायला येऊ नकोसच आता....'**

अशा कवितांतून त्या नवा, स्वावलंबी, आत्मविश्वासू व रथाची दोन चाकं ही परंपरावादी संकल्पना मोडीत काढत स्त्री एक व्यक्ती आहे व तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे हे मांडतात.

या कवितेत ज्याप्रमाणे डॉ. वानखेडे एक स्त्री म्हणून व्यक्त होतात त्याप्रमाणे स्त्रियांच्या समस्या व जगणं समजावून घेऊन त्यांच्या मानसिकतेतून पुरुष साहित्यिकही लिहू लागलेले दिसतात विशेषत: तशी कविता हे २००० नंतरच्या कवितेचं एक वैशिष्टय मी मानते. उदाहरणादाखल किरण येले यांचा 'बाईची कविता' किंवा कैलास चावडे यांचा 'जखमी पावलांचे ठसे' हा कवितासंग्रह होय. यातून ते केवळ स्त्रियांच्या भूमिकाच मांडत नाहीत तर पुरुषांना त्यांच्या नकळत केलेल्या गुन्हयाची जाणीव करुन देत इशाराही देतात व विषमतावादी वातावरणावरही बोट ठेवतात. 'विनाश' या आपल्या कवितेत कवी कैलास चावडे म्हणतात,

**'प्रत्येक पुरुषाला बाई होता आलं पाहिजे**
**असं म्हटलेत सानेगुरुजी,**
**मी हसलो वाचून , वेडा गुरुजी काही पण लिहितो,**
**नेभळट विचार**
**मानवी पूर्णत्वाला ती आवश्यक अट आहे, अटळ**
**हे आज उमगतंय मला गुरुजी**

आपण स्त्रित्वाच्या कोमल, नाजूक
भावनांना बाईल ठरवून इतके हिंस्त्र झालोत
त्याचेच हे आविष्कार, जेहाद असो की जातपंचायत
सामूहिक बलात्कार आणि तत्सम सारे
आता या आविष्काराच्या
राष्ट्रीय व्हर्जनदेखील निघाल्यात
अंतिम विनाश दूर नाही.'

महिला वर्ग मोठया प्रमाणात लिहू लागलेला आपल्याला दिसतो. इंदिरा संत, शांता शेळके, संजीवनी, पदमा गोळे यांच्या कवितेत भावनांचे आवेग बघायला मिळायचे आजच्या कवितेत मात्र चिंतनपरता अधिक स्पष्टपणे दिसते. स्त्रीला आपल्या मर्यादांची जाणीव अधिक होऊ लागली आहे. नव्या व्यवस्थेने केलेली आपली कोंडी, वाटयाला येणारी घुसमट ती कवितेतून व्यक्त करु लागलीय. आणि हे वास्तवाचे भान व्यक्त करण्यासाठी या कवयित्रींनी गेय व छंदोलय नकोशी वाटू लागलीय. ती स्वत:च्या स्व स्वरुपाचा शोध सध्याच्या काळात अधिक घेऊ लागलेली दिसते. मी—तू विसंवाद, स्वत:च्या जीवनातील अंतर्विरोध, पुरुषप्रधान व्यवस्थेत होणारी स्त्रीची कोंडी, तिच्या वाटयाला येणारा एकाकीपणा, तुटलेपणा, तिचे वस्तुरुप हे तिला प्रकर्षाने जाणवू लागलेले दिसतात. सिसिलिया कार्व्हालो यांच्या 'माणूस उकरुन काढावा लागतोय' या काव्यसंग्रहातील 'वादळे' या कवितेत त्या म्हणतात की,

'तो दरवाजा
ती दारात त्याच्या प्रतिक्षेत सदैव म्हणून ती 'दारा'
युगायुगांपासून ती उघडते दारं—खिडक्या
बंद करते उघडते
पुन्हा पुन्हा पुन्हा
दारं खिडक्या उघडता मिटता
ती किती वादळं घरात ठेवते
अन किती घराबाहेर हे तिचं तिलाच माहित
घरात वावरताना
घराबाहेर पडताना सारीच वादळं सोबत घेऊन फिरत असते ती
सारा समुद्र पार करीत राहते
वादळं भोवऱ्यासहितचे....
पाऊसपाणी पोटात साठवून दारं खिडक्या फुगत राहतात
गंजतात खिडक्यांचे गज बंद करता उघडताना

**जोर लावते कधी**
**कधी तशीच उघडी टाकते धडपी....**

हाच धागा आपल्या ग्रामीण कवितेतून पुढे घेऊन जाणाऱ्या कल्पना दुधाळ आपल्या 'सिझर कर म्हणतेय माती....' या काव्यसंग्रहात लिहितात की,

**'सये गं सये...**
**खुरपता खुरपता सांगावंसं वाटलं**
**खाली वर झाली माती**
**आणि बाईचं काळीज भेटलं**
**सये गं...**
**सृष्टीच्या उदयापासून**
**बाईपण इथंच तळ ठोकून**
**तरीही पाऊलखुणा बुजवतच जायचं का** गं
पाठीला काटाडया बांधून?'

साहित्याचा, लेखनाचा कुठलाच, कसलाच वारसा आणि वातावरण नसणारे लोक या काळात लिहिते झालेले दिसतात. हल्ली हे नवकवी टिंगल आणि खिल्लीचा विषयही झालेले दिसतात. परंतु नवी पिढी या अत्याधुनिक माध्यमांमुळे लिहिती झाली याकडे मी सकारात्मकपणे बघते. मोठया प्रमाणात नवकवी लिहू लागले आणि कवितेतील काव्य हरवत चाललंय अशी ओरड एका वर्गाकडून येऊ लागली. या शीर्षकाचा परिसंवादही नाशिक जिल्हयातील एका राज्यसाहित्य संमेलनात रंगला होता. त्या परिसंवादात भूमिका मांडण्यासाठी मीसुदधा निमंत्रित होते. माझी भूमिका मांडताना मी म्हणाले होते की, ते साहित्य त्या विशिष्ट काळाचं प्रतिबिंब असतं तेव्हा कवितेतील काव्य हरवलं असं आपण न म्हणता कविता बदलतेय असं म्हणणं अधिक अचूक व नेमकेपणाचं होईल. कारण काव्याशिवाय कविता कसली? म्हणून कविता असली की काव्य असतेच असते, काव्य हरवले म्हणजे कविताही हरवली पाहिजे पण कविता आहे म्हणजे काव्यही आहेच. काळ बदललाय, सभोवताल बदललाय, अनुभव बदललेय, वाचक बदललाय, रसिक बदललाय, रुची–अभिरुची, अभिवृत्ती बदललीय आणि हे म्हणजे समाज असेल तर लिहिणारा साहित्यिक, लेखक हा सुद्धा समाजाचाच एक भाग आहे तर तोही बदलणं ओघाने आलंच. काळाप्रमाणे कवितेतही स्थित्यंतर, परिवर्तन, बदल झाला आहे आणि तो झालाच पाहिजे तो अनिवार्य आहे असे मला वाटते. कारण प्रवाहीत्व आणि बदल हे जिवंतपणाचं लक्षण आहे. मराठी भाषा बदलतेय म्हणून फार चिंतातूर झालेला एक वर्ग या जागतिकीरणाच्या काळात गळे काढू लागला होता किंवा त्रिकोणी चेहरे करुन अनेक परिसंवाद, परिषदा, साहित्यसंमेलनं, चर्चासत्रातून मराठी

भाषेचे अनेक अभ्यासक मराठी भाषा अस्तित्वात राहते की नाही? अशा अविर्भावात काळजीयुक्त बोलत होते. पण आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, अगदी मराठी भाषेचा प्रारंभकाळ, ७व्या, ८व्या दशकातीलही उदयोतनसुरीची 'कुवलयमाला' व त्यातील भाषाही जाऊ दया, अगदी अठराशे दाहोत्तरी मधली 'ज्ञानेश्वरी'तील भाषा बघितली व ती कुठलाही बदल न करता आज तशीच व्यवहारात वापरायचे ठरवले तर ते किती व्यवहार्य व सुलभ ठरेल या बाबीचाही विचार आपण केला पाहिजे. प्रत्येक काळाचा एक संस्कार भाषेवर झालेला दिसून येतो तसाच तो साहित्यावरही झालेला दिसून येतो.

१९८० साली डॉ. भालचंद्र फडके यांनी 'मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन' या ग्रंथात कवितेची गुणवत्ता पारखणारे काही परिक्षाप्रश्न उपस्थित करतात ते पुढीलप्रमाणे—

१. कवीची कविता मूळ प्रवाहापासून दूर आहे का?
२. ती आत्ममग्न, आत्मतुष्ट आहे काय?
३. भयाण वास्तवता ती पेलू शकते काय?
४. समाजातील समस्या व दुःखे ती पेलू शकते का?
५. ती कविता पूर्णपणे खाजगी, व्यक्तिगत आहे काय?
६. या कवितेने वेगळया विश्वाचा शोध घेतला आहे काय?
७. तिने नवे भाषिक संकेत रुढ केले का?
८. स्त्रीच्या अंतर्बाहय ताणांचे दर्शन तिच्यातून घडते काय?
९. ही कविता वाचून जाणिवेच्या कक्षा रुंदावतात काय? या प्रश्नांच्या उत्तरातून समजते की, आजची कविता ही काव्यविषयक भूमिकांची अनेकता स्वीकारणारी आहे. कवितेची एकच एक व्याख्या वा वर्णन निवडणारी नाही ती अंतर्मनाचा वेध घेणारी आहे आणि बाहय वास्तवाचा मागोवा घेणारीही आहे. तशीच प्रतिमांच्या सीमा जाणणारीही आहे. निसर्ग, समाज, संस्कृती, कालाचे चैतन्य आणि वर्तमानाची भाषा या सर्वांचे उत्कट संवेदन तिच्यात आहे. जिवंत जाणिवांचा अनुभव देणारी आजची कविता आहे.

मध्यमवर्गीयांची कहाणी सांगणारं, सदाशिवपेठी वाड.मय एकेकाळी होतं; परंतु सर्वसामान्य माणसाला अक्षरओळख झाली आणि तो आपलं जगणं मांडू लागला. फुलं, पानं, चंद्र, सुर्य, तारे हा कल्पनाविलास आजच्या कवितेत दिसत नाही तर आजची कविता अधिक वास्तववादी, प्रगल्भ व बंडखोर होताना दिसते. प्रत्येक लिहिता हात या जागतिकीकरणाच्या काळात आपली व्यथा, वेदना, समस्या मांडू

लागलेला दिसतो त्या त्याच्या समकालीन समूहाच्या प्रातिनिधिक भावना, भूमिका म्हणून आपण त्याकडे बघायला हवं. प्रत्येकवेळी कवितेला मीटरमध्ये बसविण्याचा अट्टाहास नको वा प्रत्येक वेळी आकृतिबंधाचा निकष किती प्रमाणात पाळलाय हे बघून त्या कवितेचा दर्जा वा अस्सलता ठरवून चालणार नाही. हल्लीची कविता मुक्तछंदात अधिक प्रमाणात येऊ लागलीय, ती संवादी होतेय. तिला वृत्त, अलंकार वा छंदाची बंधनं नको वाटायला लागलीय. आजच्या काळातील युवाकवींची कविता तर इथल्या व्यवस्थेला थेट रोखठोक प्रश्न विचारणारी बंडखोर व वास्तव आणि निवेदनात्मक कविता आहे. राजकीय भान या नवकवींना आलेले आहे. साठोत्तरी कविता ही बांधिलकीबाबत बोलत होती तर आजच्या कवितेची विशिष्ट विचारसरणीशी बांधिलकी नाही त्यामुळे ती अधिक व्यापक झाली आहे. साठोत्तरी कविता ही चळवळी व विचारसरणीचा प्रभाव असलेली कविता होती. आज मात्र म. सु. पाटील म्हणतात तसे, 'आंधळया बांधिलकीच्या मर्यादांतून आताचे कवी मुक्त झालेले आहेत.'

फार प्रासादीक, अलंकारीक, संदिग्ध, बोजड शब्दांचे ओझे वाहून नेत व्यक्त होणं तिला ते शक्य नाही. सांगायच आहे ते विचारांचे झटके व प्रश्नांची आवेगी मांडणी या माध्यमातून समोर येते. प्रासंगिक कविता अधिक लिहिली जातेय. उदा. शेतकऱ्याची आत्महत्या, महिला अत्याचार, स्त्रीभ्रुणहत्या, राजकीय घडामोडी इ. मंचीय किंवा सादरीकरणाची कविता हल्ली जाणीवपूर्वक लिहिण्याचा कल दिसतो. साठोत्तरी कवितेचे उक्तीविशेष होते त्यामुळे ती डोळयात भरणारी कविता होती. त्यानंतरची अगदी आजपर्यंतची कविता ही श्रोतृसन्मुख अधिक आढळते. श्रोता केंद्रस्थानी ठेवून कविता लिहिली जाऊ लागल्याने वक्तृत्वगुणांना महत्त्व येऊन कवित्व दुय्यम बनू लागते. मंचीय कवितेचे बाजारमूल्य किंवा मार्केट व्हॅल्यु बघून, मागणी, चलती बघून कविता काही प्रमाणात लिहिली जाऊ लागलेली दिसते. संस्कारक्षम किंवा घडण्याच्या काळात अशा मंचीय कविता ऐकल्यामुळे आज खेडयापाडयात बहुसंख्य लिहिणारी मुले त्याच आदर्श मानीत तशा मंचीय कविता लिहिण्याचा प्रयत्न करु लागलेले दिसतात. आज २००० नंतर कसदार आणि विचारप्रवृत्त करणारी कविता जी लिहिली जातेय त्यात संतोष पदमाकर पवार हे महत्त्वाचं नाव आहे. अलिकडे 'बहादूर थापा आणि इतर कविता' हा काव्यसंग्रह वेगळेपणामुळे चर्चेत आहे. त्यात व्यक्तिचित्रे आहेत, स्वभावचित्रे आहेत तशी झगडाचित्र व हताशचित्रेदेखील आहेत असे अनिल अवचट म्हणतात. निरागस, सहजपणे आलेली तरीही दाहक आणि अस्वस्थ करणारी अशी त्यांची कविता आहे.

आज वृत्तबध्द कविता लिहिली जात नाही अशी ओरड होत असली तरी गझल लिहिणाऱ्यांची वाढती संख्या बघता हया आरोपातही फारसे तथ्य नाही असे

कवयित्री डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे म्हणतात. नादमय कवितेची जागा रॅप –रिदम ॲन्ड पोएट्रीच्या स्वरुपात घेतली आहे. राहिला प्रश्न गुणवत्तेचा किंवा कसदारपणाचा तर काळाच्या कसोटीवर जे दर्जेदार आहे ते आपोआपच टिकते. आज लिहिणाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे. अगदी हौशे–नवशे–गवशेही लिहित आहेत. म्हणून काही ते सर्वच लिखाण टिकेल किंवा त्याने कवितेचा दर्जा घसरतो असे म्हणणेही चुकीचे ठरेल. याउलटपक्षी सामान्यातला सामान्य माणूस लिहिता झाल्यामुळे त्याचे वेगळे भावविश्व, वेगळे शब्द, लय, ढब, भाषा हयांचे आकलन प्रतिभावंतांना झाल्यामुळे सकस काव्यनिर्मितीला ते पूरकच ठरते असे  वाटते. साठोत्तरी कालखंडात ज्याप्रमाणे प्रस्थापित साहित्याचा चेहरामोहरा बदलविण्याचे धाडस दलित साहित्याने केले. दलित साहित्याची वाटचाल आता दलितत्वातून बाहेर पडून आंबेडकरी साहित्याकडे म्हणजेच मानवतावादाकडे होत आहे म्हणून त्याची धार किंवा विद्रोह कमी झाला असे नाही तर परिस्थितीनुसार विद्रोहाची मांडणी आणि भाषा बदलली आहे. परिघ विस्तारला आहे. केवळ गावकुसाबाहेरीलच नव्हे तर जागतिक पातळीवरचे प्रश्न आंबेडकरी साहित्य हाताळत आहे. आदिवासी कविता, बळीराजाची कविता, स्त्रीवादी कविता, महानगरीय कविता, ग्रामीण कविता तसेच विविध बोलीभाषेतील कविता हया सर्व अंगाने कविता विस्तारत चालली आहे. सर्व स्तरातील माणसांचे उत्स्फूर्तपणे व्यक्त होणे हे महत्त्वाचे आहे तो किती सुंदर स्वरुपात व्यक्त झाला हे दुय्यम आहे.

'सेनं सायी वेस' या युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त संग्रहाचा कवी विरा राठोड सर्वांचं कल्याण कर ही भावना आपल्या कवितेतून मांडतो. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे वेगवेगळे स्तर जागृत झाले. यामध्ये भटके विमुक्त, आदिवासी हेही होते. हयांचा इतिहास हा इतिहासजमा होत असताना ही कविता इतिहासाचं पुनर्वाचन करते यातून काळानुरुप समाजव्यवस्थेचे प्रारुप या कवितेतून उजागर होते समाजाचे माणसांचे स्त्रियांचे दु:ख हेच कवी वीरा राठोड यांच्या सृजनाचे मूळ असल्याचे स्पष्ट होते. आपल्या एका कवितेत ते म्हणतात की,

'मी काळजातली एक एक सल बाहेर काढून ठेवतोय
अन तूम्ही 'वाह' म्हणताय
मी जळतोय आतल्या आत
कापसाच्या गंजीसारखं काय आश्चर्य
'जिओ' काय म्हणता
दु:खाला सुंदर उपमा काय देता

'आपल्यात कुणीही युदधखोर नव्हते' म्हणणारा युवाकवी सुदाम राठोड 'योनीमिमांसा' या आपल्या कवितेतून भारतीय सत्ताशास्त्राचे गुपित उघड करुन पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या कानाखाली सणसणीत चपराक लगावतो.

'चेहऱ्यावर फेकलेले ॲसिड फक्त ॲसिड नसते

तो भयंकर दु:स्वास असतो, योनीविरुध्द साचलेला

कवितेतील अलिकडचं आणखी एक आश्वासक नाव म्हणजे सत्यपालसिंह राजपूत ('काळया जादूचे अवशेष' हा काव्यसंग्रह.) प्रज्ञा दया पवार, प्रशांत असनारे, वैभव सोनारकर, सुशीलकुमार शिंदे, योगिनी राऊळ, अस्मिता गुरव, अजित अभंग, पी.विठ्ठल, योजना यादव हे कवी ताकदीचं लिहू लागलेले दिसतात. एकंदरीत सन २००० नंतरची कविता ही भूमिका घेऊन लिहिली जाणारी महानगरीय संवेदनेची, जीवनवादी कविता मोठया प्रमाणात आहे. तशीच वास्तववादी व तळागाळातील सर्वसामान्य माणसाची व्यथा, वेदना सांगणारी कविता आहे. कवितेची जीवनवादी आस्था वाढत आहे. नव्या वाटांच्या शोधसफरीवर हे सर्जक आहेत. साहित्याचा, लेखनाचा कुठलाच, कसलाच वारसा आणि वातावरण नसणारे या काळात लिहिते झालेले दिसतात. मुक्तछंदातील वर्तमान डोळसपणे मांडणारी त्याचप्रमाणे भविष्याचा शोध व वेध घेणारी प्रयोगशील कविता सन २००० नंतर मोठया प्रमाणात लिहीली गेलेली दिसते. विशिष्ट प्रस्थापितांनी घालून दिलेला पारंपरिक साचा व चौकट आजच्या कवितेने झुगारुन दिलेली दिसते. आजची कविता ही काळानुरुप आव्हान पेलणारी व झेलणारी आहे. आपल्या वेगळया शैलीने ती उल्लेखनीय आहे व तेजस्वी भविष्य असणारी आहे.

**संदर्भ सूची–**


१. फडके भालचंद्र, मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन, श्री विदया प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८०

२. राठोड विरा, सेनं सायी वेस, शब्द प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०१५

३. वानखेडे विजयालक्ष्मी, ती कविता आणि चळवळ, परिवर्तन प्रकाशन, बुलडाणा, प्र. आ. ऑक्टो. २०१६

४. सुदाम राठोड , आपल्यात कुणीही युदधखोर नव्हते, शब्द प्रकाशन मुंबई,प्र.आ २०१८

५. चावडे कैलास, जखमी पावलांचे ठसे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. फेब्रुवारी २०१७

६. कार्व्हालो सिसिलिया, माणूस उकरुन काढावा लागतोय, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. फेब्रुवारी२०१५


***

# "प्रकाशपर्वाचा साक्षीदार असलेली उजेडाची कविता"

## डॉ. युवराज मानकर

मराठी विभाग, शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव, यवतमाळ

आंबेडकरवादी कवितेच्या हस्तक्षेपाने मराठी कवितेचे दालन केवळ समृद्धच झाले नाही तर त्याला वैश्विक सन्मान प्राप्त झाला आहे. माणूस असो की त्याची कविता असो त्याला सन्मानाची एक नैसर्गिक भूक असते. हीसन्मानाची नैसर्गिक भूक आंबेडकरवाद वगळून आजवर कोणत्याही साहित्याला किंवा कलाकृतीला मिळत नाही. कारण ज्या साहित्याचे मन आणि मस्तिष्क आंबेडकरवाद झाले, ज्या कवितेच्या संवेदना, भावना आणि विचाराच्या नसा नसातून आंबेडकरवाद संचार करीत आला ती कविता लोक डोक्यावर आणि डोक्यातही घेतात आणि तिला वैश्विक उंचीसह सन्मानाने श्रीमंतही करतात. खरे तर ही सर्व भेदांच्या अतीत आणि सर्वोपकारक असलेल्या आंबेडकरवादाची पावतीच आहे. आंबेडकरवादी साहित्य हे सर्व परिघातल्या आणि परिघाबाहेरच्या साहित्याचे प्रेरणास्थान आहे. ही प्रेरणा स्वीकारून निर्माण झालेल्या कोणत्याही साहित्याला आपला माथा सन्नुमत्त सन्मानाने मिरवता येतो त्याचे कारण आंबेडकरवाद हेच आहे.

विदर्भातील एक महत्त्वाचे आंबेडकरवादी काव्यपरंपरेच्या सूर्यकुळातील कवी म्हणून ज्यांचा सन्मानाने उल्लेख केला जातो ते म्हणजे अरूण विघ्ने हे आहेत. त्यांच्या अरूण या नावातच 'सूर्य' अनुस्यूत आहे आणि त्यांच्या आडनांवात विघ्ने अंतर्भुत आहे. या सूर्याच्या उजेडाला अडथळे आणणाऱ्या विघ्नांना हा अरूण नवा उजेड देणारा आहे. खरे तर विघ्ने असल्याशिवाय अरूण होता येत नाही आणि अरूण असल्याशिवाय विघ्नेला अर्थ नाही ते विघ्ने आहेत म्हणून अरूणला अर्थ आहे. विघ्नेच्या पायावर अरूणची इमारत उभी आहे. अंधाराचे विघ्न असल्याशिवाय सूर्याच्या उजेडाचे महत्त्व उरत नाही. अशी अरूण आणि विघ्ने यांची सेंद्रिय

बंदिश आहे. या अर्थाने त्यांचे नाव वैशिष्ट्येपूर्ण आहे. अंधाराच्या पायावर उजेड उभा करणाऱ्या या कवीचे नाव अन्वर्थक असेच आहे.

कवी अरूण विघ्ने यांचा वाङ्मयीन परिचय तसा विस्तृत आहे .मागील तीस वर्षापासून त्यांनी स्वतःला कवितेशी जोडून घेतले आहे. त्यांचा 'पक्षी' हा २००० साली प्रकाशित झालेला पहिला कवितासंग्रह आहे. 'वादळातील दीपस्तंभ' हा २०१९ साली प्रसिद्ध झालेला दुसरा कवितासंग्रह आहे. 'जागल' हा २०२० साली प्रसिद्ध झालेला तिसरा कवितासंग्रह आहे आणि 'मी उजेडाच्या दिशेने निघालो' हा त्यांचा चौथा कवितासंग्रह २०२१साली प्रसिद्ध झालेला आहे. त्यांचे एकूणच वाङ्मयीन कार्यकर्तृत्व उल्लेखनीय आणि वैशिष्टयेपूर्ण आहे. त्यांनी आजवर अनेकविध पुस्तकांवर पंच्चावन समीक्षणात्मक लेख लिहिले आहे. त्यांनी विविध विषयांवर स्फुट तसेच व्यक्तिविशेषपर लेखन केले आहे. त्यांनी शिक्षकीय व्यवसाय निष्ठेने सांभाळून दीर्घकाळ पत्रकारिता सुद्धा केली आहे.त्यांचा एकूणच वाङ्मयीन परिचय हा त्यांचा आवाका आणि मर्यादा स्पष्ट करणारा आहे.त्यांनी स्वतःच्या आयुष्याला कवी, समीक्षक, शिक्षक, पत्रकार, आणि चळवळीतला कार्यकर्ता अशा विविध भूमिका वठवून एक अर्थ दिला आहे. आजच्या काळात शिक्षक आणि पत्रकार होणे हे फार कठीण आहे कारण हा संशयाचा आणि भयाचा काळ आहे. संशय हा स्वस्थ जीवनाला नासून टाकते आणि भय सत्य मांडू देत नाही. ते निर्भय बनू देत नाही. ते नव्या पिढीसमोर नवा उजेड मांडू देत नाही. ते विज्ञाननिष्ठ होऊ देत नाही. ते शिक्षकांचे ध्येर्य, धाडस खुंटीला टांगून धर्मसत्तेच्या भयाचे भोई बनायला सांगते, ते निर्धाराला संपवून टाकते, ते चौकसबुद्धीचे सरण लावते,
नफ्या-तोट्याचा विचार न करणाऱ्या अचूक, ताजी, संपूर्ण सत्य माहिती देणाऱ्या पत्रकाराच्या अभिव्यक्तीचा गळा घोटते.

लोकशाहीच्या संवर्धनाचे ध्येय गोठवून टाकते. हेच खरे तर शिक्षक आणि पत्रकार असण्याच्या पूर्वअटी आहेत. अशाही काळात कवी उजेडाच्या दिशेने निर्भयता, धाडस आणि पक्का निर्धार घेऊन निघाले आहेत. या दोन्हीही रचनात्मक भूमिका कवीने निष्ठापूर्वक जोपासल्या

आहेत. त्यामुळे त्यांना उजेडाच्या दिशेने निघण्यासाठी या कौशल्यात्मक श्रीमंतीचा उपयोग झाला आहे .

त्यांनी मला 'मी उजेडाच्या दिशेने निघालो 'हा कवितासंग्रह समीक्षणार्थ पाठविला असून त्यावर समीक्षा लिहिण्याचा आग्रह केला त्यांच्या आग्रहास्तव हा लेखन प्रपंचारंभ आहे. या कवितासंग्रहाचे शीर्षकच अतिशय मौलिक आणि विचार करायला लावणारे आहे. 'मी उजेडाच्या दिशेने निघालो' याचा अर्थ ते यापूर्वी उजेडाच्या दिशेने का निघाले नव्हते. त्यांना या पूर्वी उजेडाचा महामार्ग सापडला नव्हता का? विशेषत: ते आताच का निघाले आहे? त्यांची ही उजेडाच्या दिशेने जाण्याची प्रक्रिया त्यांनी आताच का सुरू केली? त्यांचा हा उजेडाच्या दिशेचा चाललेला प्रवास का संपलेला नाही ते निरंतर विशेषतःएकटेच का प्रवास करीत आहेत. त्यांच्या समोर असलेली उजेडाची दिशा नेमकी कोणती आहे आणि आजवर त्यांना या उजेडाच्या दिशेला जाण्यापासून कोणी रोखून धरले होते. उजेडाच्या दिशेचे शत्रू कोण आणि मित्र कोण आहे. यासारखे प्रश्न या कविता संग्रहाच्या शब्दबंधातून निर्माण होतात. हे प्रश्नच कवीच्या मनातील तळघराचा शोध घ्यायला बाध्य करतात. कोणी या उजेडाच्या दिशेने येवो अथवा न येवो पण 'मी' मात्र निघालो आहे. मी उजेडाच्या दिशेने निघण्याची सुरूवात केली की एकाएकाने माझ्या मागे लोक येऊ लागतील असा आशावादी निश्चय कवीने या कवितासंग्रहाच्या शीर्षकातून व्यक्त केला आहे. हा त्यांच्या मनाचा निर्भय निर्धार त्यांच्या कवितेच्या अंर्तमनाचाचा आवाज म्हणून शीर्षकावर उमटलेला आहे. त्यामुळे त्यांचा हा आवाजच उजेडाच्या दिशेची उकल करायला सांगतो आहे.

उजेड हा सर्वव्यापी असतो.त्याने दुनियेत आपली प्लॉटींग केली आहे. तसेच अवकाशातही त्याने जागा संपादन केली आहे. उजेडाला कोणतीही भूमी वर्ज्य नाही. पण काही देशात उजेडाला जागा दिली जाते तर काही देशात उजेडाला जागा नाकारली जाते. उजेड कशात नसतो? तर तो सर्वत्र असतो. तो माणसात असतो तो प्राण्यात असतो पुस्तकात असतो कवितेत असतो. त्याचे अस्तित्त्व सर्वत्र असते.पण त्यासाठी जागा द्यावी लागते. प्रत्येकच माणूस आपल्या मनात, मेंदूत उजेडाला जागा देईलच असे सांगता

येत नाही जो आपल्या मनात उजेडाला जागा देतो, त्याच्या संवेदना, भावना आणि विचारही उजेडाने श्रीमंत होतात. अरूण विघ्ने यांनी आपल्या मनात उजेडाला जागा दिली. त्यामुळे त्यांच्या कवितेतही उजेडाला जागा आहे. कवितेत उजेडाला जागा मिळाली की त्याच्या नफ्या तोट्याची चर्चा केली जाते. मुळात सर्वच कवी कवितेतून आपणाला उजेडच पाहायला शिकवतात असे नाही. पण काही अपवादात्मक कवी आणि त्यांची कविता उजेड पाहायला शिकवत असते.

खरे तर कविता ही लोकांच्या दिव्य स्वप्नाच्या मुर्खत्वाची जडणघडणच करत असते. त्यासाठी कवी लोकांनी उजेडाच्या दिशेने जावे म्हणून तो स्वतःची कल्पना शक्ती झिजवत असतो. तो लोकांना उजेडाकडे भान हारपून पाहिले पाहिजे असे शिक्षण देत असतो आणि अंधारावर मात करण्याची युक्तीही सांगत असतो. अरूण विघ्ने यांची कविता लोकांना उजेड शिकवणारी आणि अंधार यात्रिक बनण्यापासून वाचवणारी कविता आहे. कवी अरूण विघ्ने 'बाबासाहेब' या कवितेत लिहितात .

**'बाबासाहेब!**
**तुम्हीच आमच्या अस्तित्वाचं मूळ**
**तुम्हीच आमच्या जाणिवांचे सूर्यकुळ**
**तुम्हीच आमच्या मेंदूतली प्रज्ञा**
**तुम्हीच आमच्या जगण्याची करूणा**
**तुम्हीच आमच्या लढण्याची प्रेरणा**

(बाबासाहेब, पृ.६३)

कवीने आपल्या अस्तित्त्वाचं मूळ, जाणिवांचे सूर्यकुळ, त्यांच्या मेंदूतील प्रज्ञा, त्यांच्या जगण्यातली करूणा आणि लढण्याची प्रेरणा फक्त आणि फक्त बाबासाहेब आहेत हे मान्य केले आहे. त्यांनी आपल्या डोक्यात, मनात, जाणीवेत,

जगण्यात, जीवन जगण्यातील संघर्षात आणि एकूणच त्यांच्या अस्तित्त्वात भीम ठासून भरला आहे. त्यांच्या संवेदना, भावना,

मन आणि विचार हे भीममय झाले आहे.भीममय होणे म्हणजे आंबेडकरवादी होणे होय आणि आंबेडकरवादी होण्यासाठी डिकास्ट आणि डि-रिलेजन व्हावे लागते, मनाच्या आणि मेंदूच्या पाटीवरील सर्व

शोषणाची आणि विषमतेची माहेरघरे उद्धवस्त करण्यासाठी विवेकाचा,बुद्धिवादी प्रज्ञानाचा, परिवर्तनाचा, वैज्ञानिकतेचा आणि मानवतावादी जीवनदृष्टीचा मन आणि मेंदूवर पहारा ठेऊन ही घाण याद्वारे साफ करावी लागते. या पाटीवर कवीने बुद्ध, कबीर, म.फुले, सावित्रीमाई फुले, छ.शाहू महाराज, गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा मानून मनात आणि मेंदूत गोंदवून घेतले आहे. त्यामुळे त्यांनी समाजातील अंधार आणि उजेड यात फारकत करून ते उजेडाच्या दिशेने निघाले आहे.

अरूण विघ्ने यांनी आपल्या कवितेची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही मानली आहे. प्रेरणा ही उजेडाकडे जाण्याची उत्तेजना देते म्हणून प्रेरणा ही कोणत्याही नव निर्मितीचा मुलाधार असते. ती जीवनदृष्टीची नियंत्रक असून उजेडाच्या दिशेची आणि कलाकृतीच्या चालीची दिशादर्शक असते. या दृष्टीने प्रेरणेचे महत्त्व कोणत्याही नवनिर्मितीसाठी अत्यंत मुलभूत आणि मोलाचे मानले जाते. कोणत्याही कला कृतीचे जन्मध्येय हे मानवीजीवनाच्या ध्येयाची मूल्याधिष्ठीत पुनर्रचना करण्यासाठीच असते. कवितेचे जन्मध्येय हेमानवाचा समजूतदारपणा अधिक विकसित करणे, त्याच्यात योग्य सर्वोपकारक भाव जागवणे, परस्परातील संबंध दृढ करणे, त्याला सुखी आणि समृद्ध करणे, त्याला निर्भय करणे आणि त्याचे सहअस्तित्व कायम राखणे हेच असते. प्रेरणा ह्या प्रयोजनाला जन्माला घालतात 'कवीची आंबेडकरवादी प्रेरणा ही त्यांच्या कवितेच्या प्रयोजनाची जन्मभू आहे आणि तिच त्यांच्या समोरील वास्तवालोकन करण्याची नियंत्रक जीवनदृष्टी आणि उजेडाच्या स्वप्नांची दीक्षाभूमी देखील आहे. ते 'मी जन्मल्यापासून' या कवितेत लिहितात .

**'मी तुझी खूप विनवणी केली रे**
**पण तुला कसला घाम फुटतो काळयाकुट्ट दगडासारखा अचल गाडून**
**बसलास, माझ्या अंतरी प्रकाशाची वाट अडवून**
**मी लाख प्रयत्न करायचो प्रकाशाने तुला भेदण्याचे**
**पण तू तर निर्दयी, शेवटी काळोखच ना'**

(मी जन्मल्यापासून-पृ .५०)

कवी व्यवस्थेच्या अंतर्मनात काळयाकुट्ट दगडासारख्या अचल आणि गाडून बसलेल्या काळोखाला अनेकदा प्रकाशाने हद्दपार करण्याचा प्रयत्न करतात पण या काळोखाने तो प्रकाशच हजारो वर्षापासून अडवून ठेवला आहे. या निर्दयी असलेल्या काळोखाला ते अंतर्मनातून जाण्याची विनवणी करतात परंतु त्यांची ही स्वाभाविक भावना काळोख ऐकत नाही. उलट हा काळोख मानवी मनाला जातीपातीच्या पिंजऱ्यात बंदिस्त करून माणसा-माणसांची दगडधोंड्यांनी डोकी फोडण्याचे, धारदार शास्त्राने गळे चिरण्याचे काम रिकाम्या हाताला आणि धर्मांध डोक्याला लावत आहे आणि वाणीतील शब्दांने नेम धरून कपटाने, द्वैषाने, क्रूरतेने, विषमतेने शिरच्छेद करीत आहे. उजेडातही काळोख दाटला आहे. या काळोखाने खऱ्या उजेडाच्या वाटाच अवरुद्ध केल्या आहेत. काळोखालाच उजेड समजून जगण्याची सक्ती काळोख करित आहे. या वास्तवात आपल्या बुबळावर भेदभावाच्या पापण्या लावल्या आहेत, भुकेसाठी आकांडतांडव करू नये म्हणून भ्रमाच्या गोळया दिल्या जात आहे, देशभक्तीच्या लसीने भूकेला थोपविले जात आहे, कोरोनाच्या भितीने गर्दी पांगून घरातच टाळेबंदी केली जात आहे, या काळात शेतकऱ्यांचे बळी घेणारे कायदे निर्माण केले जात आहे, विषमतेच्या अंगावर समतेची सुज भासवली जात आहे आणि यालाच विकासाचे गांजर संबोधले जात आहे, लोकशाहीचे रक्षकच भक्षक बनले आहे, सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराला ऊत आला आहे, भांडवलदारांचे सुगीचे दिवस आले आहे आणि सर्वसामान्यांचा लिलाव होत आहे. राष्ट्रीयकरणा ऐवजी खाजगीकरणाला विशेष महत्त्व आले आहे,

खाजगीकरणाच्या गोंडस नावाखाली सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्याची खुलेआम विक्री केली जात आहे. भारतीय संविधान बदलविण्याचे मनसूबे आखले जात आहे.असे अनंत प्रश्न या वास्तवाने उभे केले आहेत म्हणूनच कवी आपल्या 'मनातलं'या मनोगतात लिहितात. 'त्या वळवणाऱ्या रातकिड्याच्या भूतकालीन काळया रात्री भेदून आम्ही आता आर्थिक, वैचारिक उजेड वाटांचे सहप्रवासी झालो पाहिजे मित्रहो! आता आम्हाला गरज भासू नये मिणमिणत्या दिखावू काजव्यांच्या उजेडांची. आम्ही त्या शाश्वत उजेडाच्या दिशेनंच निघालो पाहिजे कायम! 'हेच तर

कवीच्या कवितेचे उजेडाच्या दिशेने निघण्याचे खरे प्रयोजन आहे या माणसाला माणसापासून वियुक्त करणाऱ्या भावभावना आणि कृतीकार्य हे कुठे तरी थांबले पाहिजे असे कवीला मनोमन वाटते. हे थांबण्यासाठी आणि परिवर्तन करण्यासाठी प्रकाशाच्या दिशेने निघण्याची आत्यंतिक गरज कवीला वाटते आहे. कवी अरूण विघ्ने 'डोक्यातबुद्ध आहे'या कवितेत लिहितात.

**'आमचा दृष्टिकोण अजूनही शुद्ध आहे.**
**कारण आमच्या मनात नि डोक्यात अजूनही बुद्धच आहे'**

(डोक्यातबुद्ध आहे,पृ.७३)

या प्रकाशाच्या दिशेने निघण्यासाठी आपला दृष्टीकोन आणि मनात व डोक्यात बुद्ध असल्याशिवाय हे शक्य नाही. माझ्या या प्रकाशवाटेवर कितीही असा भूतकालीन शिळा काळोख ताजा होऊन आडवा येत असला तरीही बुद्धाचा उजेड स्थापण्याचे प्रयत्न शेवटच्या श्वासापर्यंत सोडणार नाही. मी चालत राहणार!असा कवी पक्का निर्धार करतात.त्यांच्या या कवितेच्या प्रयोजनातच त्यांच्या उजेडाकडे निघण्याचे कारण दडलेले आहे हे त्यांच्या कवितासंग्रहातील कवितेतून अधिक स्पष्ट होते.

त्यांची कविता ही वास्तवाच्या वस्तुस्थितीच्या संज्ञानशील भावनेवर उभी असलेली कविता आहे. ती अतार्किक भावनेवर उभी नाही. त्यांची कविता ही त्यांच्या आतल्या संज्ञानशील भावनेचाच आवाज आहे. त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या भावना हया त्यांच्या नवनिर्मितकृतीचा अर्थ सांगत आहे. त्यांच्या कवितेचे मुलद्रव्य हे त्यांना जीवन वास्तवाच्या आकलनातून आणि जीवनानुभवातून मिळाले आहे.कवी 'मनातलं' या मनोगतात लिहितात, 'जे भोगलं, जगलो, अनुभवलं ,

बघितलं,आजूबाजूच्या निरीक्षणातून मला जे जाणवलं ते सामाजिक जाणिवेतून समस्त रचनांमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ते 'मुके शब्द' या कवितेत लिहितात,

**'मी सध्या निरीक्षण,चिंतन,मनन करतोय डोळस होऊन**
**आतलं, बाहेरचं युद्ध शमविण्याची योजना आखतोय मनातल्या मनात.'**

(मुके शब्द,पृ.८२)

कवीच्या भावना वस्तुस्थितीतील चांगले आणि वाईट काय आहे? आपला शत्रू कोण आणि मित्र कोण? सत्य कोणते आणि असत्य कोणते? अंधार कोणता आणि उजेड कोणता? हे ठरवित आहे.कवीच्या मनात भावनेचा संघर्ष सुरू आहे. कवीने आपल्या मनातल्या परस्पर विरुद्ध भावनेच्या संघर्षाच्या कोलाहलातून विशिष्ट निर्णायक विधायक, सर्वोपकारक भावनेचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या मनातील भावनेने मी उजेडाच्या दिशेने निघालो आहे. असा निर्णय घेतला आहे. ही निर्णायक भावनाच त्याच्या अंतर्मनाचा आवाजही झाली आणि त्यांच्या कवितेचा उजेडही झाली आहे. कवीची ही निर्णायक भावनाच त्यांच्या व त्यांनी निर्माण केलेल्या कवितेतील उजेडावर अधिकार गाजवत आहे. त्याच्या ह्या निर्णायक भावनेवरच त्यांचा विश्वास आहे. त्याची ही निर्णायक भावना ही त्याच्या अनुभवातून आणि संवेदनशीलतेतून तयार झाली आहे. त्याचा अनुभव हा वैयक्तिक जरी असला तरी तो अनुभव, संवेदना, भावना आणि विचारांवर आधारलेला आहे.

कवीला जे जाणवले ते, त्यातून निर्माण झालेली त्याची भावना आणि त्याच्या मनात त्यासंबंधी घोंघावणारा विचार यातून त्यांनी त्यांच्या अनुभवाचा इत्यर्थ तयार केला आहे. यासाठी त्यांनी स्वतःची संवेदना जागृत आणि सक्षम ठेवली आहे. कवीला जे ज्ञान झाले ते वास्तवातील घटना, प्रसंगातून झाले, त्यासाठी त्यांनी स्वतःचे पाचही इंद्रिये पाहरेकरी म्हणून ठेवले आहे. या इंद्रियाकरवी त्यांना प्राथमिक स्वरूपाची माहिती मिळाली आणि त्यांनी स्वतःच्या या पाच इंद्रियावर सत्ता गाजवणाऱ्या मन या सहाव्या इंद्रियांचा अधिकार कायम ठेवून त्यांच्या मनाने इंद्रिया करवी प्राप्त झालेल्या अर्थ विरहीत वेदनाना अर्थ दिला आहे. त्यामुळे त्यांचे मन आणि मेंदू त्यांच्या भावनेची निर्णायक जीवनदृष्टी बनली आहे .त्यांचे मन आणि मेंदू हे त्यांच्या अर्थ निर्णायकतेचे घर आहे. ते या जीवनदृष्टीने संवेदनशील झाले आहे. कवीने कवितेची निर्मिती संवेदनशीलतेच्या पायावरच उभी केली आहे. त्यासाठी कवीने आपली संवेदनशीलता सक्षम करण्यासाठी आपल्या इंद्रियाना बंदिस्त केले नाही. उलट त्यांनी आपल्या इंद्रियाना आणि मनाला बंधमुक्त केले कारण त्याशिवाय संवेदनशीलता

सक्षम होत नाही याची उत्तम जाणीव कवीला आहे. कवीच्या संवेदनशीलतेने कवीच्या अनुभवाची साथ संगत कधी सोडली नाही कारण संवेदनशीलतेशिवाय कवीला अनुभव घेता येत नाही आणि अनुभवच घेतला नाही तर त्यांची संवेदनशीलता सक्षमपणे डेव्हल्प होत नाही याची पक्की जाण कवीला आहे. कवीने वास्तव जाणले याचा अर्थ त्याच्या जाणण्यातून त्याची जाणीव तयार झाली. या जाणीवेसंबंधी त्यांनी दिलेल्या क्रिया प्रतिक्रियेतून त्यांनी त्यांच्या भावनेची निर्मिती केली. कवीचा संवेदनशील स्वभाव, भावविचार आणि अनुभव यातून त्यांचे ज्ञान आकाराला आले आणि या घटकांवरच त्यांनी आपल्या कवितेची इमारत उभी केली. 'या ज्ञानाने कवी प्रभावित झाले आणि त्यांनी या ज्ञानरूपी उजेडाला आपल्या कवितेचा आधारवड करून कविता लिहिली. या ज्ञानामुळे कवीच्या आयुष्याला एक नवा अर्थ प्राप्त झाला. त्यांच्या या निर्णायक भावविचारांने कवीच्या केवळ वैयक्तिक जीवनाला अर्थ मिळाला नाही तर त्यामुळे समाजाच्या,देशाच्या जीवनालाही अर्थ मिळायाला हवा असे कवीला वाटले आणि त्यांनी या भावविचाराने कवितेला आणि तिच्यातील उजेडाला जन्माला घातले आहे. खरे तर प्रयोजन हे कवितेच्या इमारतीसाठी लागणारे विषय आणि त्यातील आशय ठरविण्याचे कार्य करतात. या विषयांवर आणि त्यातील समृद्ध व जीवन संबंद्ध आशयावर कवितेची जीवनसौंदर्यसर्जक देखणी इमारत उभी राहत असते. कवी आपल्या 'माझ्या मातीची उद्विग्नता' या कवितेत लिहितात,

**'आजही रोज सुधारित गुलामीचे जोखड मानेवर वागवीत**
**श्वासघेतात असंख्य सपूत**
**पाण्यासह घोट घोट रक्त पितात**
**पाण्यातही आजकाल मरण दिसतेय**
**काळजात क्षणोक्षणी दहशत घुसते**
**कोण आपला,कोण परका**
**कोणतं मीटर लावून तपासावं**
**सडके मेंदू सुधारणेचं कातडं पांघरून बोलू लागतात आणि**
**नित्य मनूच्या व्यवस्थेचे गीत गाऊ लागतात**
**आम्ही तुमचेच आणि तुम्ही आमचेच**

**छाती फुगवून सांगू लागतात**
**वागताना मात्र फटकून वागतात**
**काय लेकांची जिंदगी? रोज जगण्यात मरण दिसतं'**

(माझ्या मातीची उद्विग्नता, पृ .७६-७७)

माती ही सर्जनशील आहे. तीने आजवर अनेकांना जन्माला घातले पण कधीही त्यात आपपर भाव केला नाही. तिचा मूळ स्वभाव प्रकाशाचाच आहे. तिने तिच्या पोटी प्रकाशच जन्माला घातला असतांना इथे काळोख कसा दाटला आहे. प्रकाशाचे मरण, त्याचे बेगडीवर्तन आणि अंतर्विरोधग्रस्तता पाहून ही माती उद्विग्न झाली आहे म्हणून कवी या मातीतून जन्मलेल्या एका एका प्रकाश किरणाच्या कार्यकर्तृत्वाची नोंद करतात. कवी अरूण विघ्ने 'संत गाडगेबाबा' कवितेत म्हणतात

**'गाडगेबाबा, तुम्ही थोर आहात**
**शिक्षकांचेही शिक्षक आहात**
**समाजसेवकांचेही समाजसेवक**
**आणि अनेक डॉक्टरांचे मार्गदर्शक झालात**
**तुमच्या या महाकार्यास आम्ही जोपासलं पाहिजे.'** (संत गाडगेबाबा,पृ.४५)

अडाणी असलेल्या गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून समाजाचे परिवर्तन करण्यासाठी प्रबोधन केले. खुळचट रूढी परंपरेतून बाहेर पडण्यासाठी विद्येचे महत्त्व, दससूत्री सांगून त्याद्वारेच जीवनोद्धार होतो हे सांगितले. त्यांचे मौलिक मार्गदर्शन हे सर्वासाठीच उपयोगाचे आहे. समाज क्रांतिकारक म. फुले, क्रांति जोती सावित्रीबाई फुले या दांपत्यांचे कार्यही इतिहासाला विसरता येणे शक्य नाही. यांनी व्यवस्थेला प्रकाश देण्याचेच कार्य केले आहे .

**बाबासाहेब !**
**तुम्हीच आमच्यात माणूस पेरला**
**तुम्हीच आमच्यातला निखारा हेरला**
**तुम्हीच दिला बुद्ध आणि धम्म**
**तुम्हीच झालात अंधारातल्या प्रकाशवाटा**
**तुम्हीच दिलीत लेखणी आमच्या हातात**
**तुम्हीच शिकवलंत उडायला आकाशात**
**बाबासाहेब !**

**तुमच्या क्रांतीनेच आमच्या जीवनाची सदाफुले झाली**
**तुम्ही लावलेलं उजेडाचं झाड अखिल मानवासाठी भाकर झाली'**

(बाबासाहेब, पृ.६३)

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यकर्तृत्व हे अखिल मानवासाठी दैदिप्यमान असा प्रकाश आहे.

त्यांच्यामुळेच माणसाला माणूस होता आले, त्यांच्यामुळेच बुद्ध आणि त्यांचा धम्म, प्रकाशाच्या वाटा, लेखन, शिक्षण आणि भाकर सुद्धा मिळाली आहे. डॉ. आंबेडकरांचे अखिल मानवजातीवर असलेले ऋण कवी व्यक्त करतात. कवी अरूण विघ्ने 'दयन दयलं भीमाईनं' या कवितेत लिहितात.

**'जातिभेदाले मायनं**
**जवा जात्यात दयलं**
**गानं संविधान गात**
**साखयदंडाले तोडलं'** (दयन दयलं भीमाईनं,पृ.३०)

पारंपरिक वऱ्हाडी लोकगीताची धाटणी आणि त्यातून पारंपरिक दळला जाणारा आशय कवीने बदलून टाकला आणि त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या मन आणि मेंदूतील आवाज बाबासाहेब यांच्या कार्यकर्तृत्त्वाला कसा उजागर करीत आहे याचे दर्शन घडविले आहे. संविधान हा मानवमुक्तीचा जाहिरनामा आहे. याची महत्ता कवी येथे सांगतात. कवी अरूण विघ्ने यांनी शेतकऱ्यांचे दुःख अनेक कवितेतून मांडले आहे. ते' शेतातल्या मातीस मी' या कवितेत लिहितात.

**'जातो बळी फासावरी राजा असेना जाणता**
**लोकास देणारा असा का दाळ दाणा मागतो?**

(शेतातल्या मातीस मी,पृ.१३४)

मानवमुक्तीचा जाहिरनामा अमंलात आल्यावर देखील जगाच्या पोशिंद्यांची वर्तमानात होत असलेली दयनीय हेळसांड आणि तो गळयाला लावत असलेला मृत्युचा फास याचे विदारक चित्र कवी उभे करतात मृत्यूचे असे धाड सत्र हे मानवनिर्मित असून कधी ते जिवंत माणसाला बहिष्कृत करून त्याचा मृत्यू घडवून आणणारे आहे. 'कोरोना आणि अस्पृश्यता'या कवितेत कवी लिहितात.

**'खूप दिवसांपूर्वी जातिभेदाचा एक जंतू सुखानं नांदला होता या देशात**

**अनेकांना लागण होऊन माणसापासून माणसास दूर ठेवलं होतं या देशात**
**मानव निर्मित या कोरोनानं'** (कोरोना आणि अस्पृश्यता,पृ.८५)

या देशाला कोरोना हा रोग आजच जडला असे नाही तर कोरोना आजाराचे जंतू हे जातिभेदाच्या रूपाने कालही या देशात वावरत होते.माणसाला माणसापासून दूर ठेवत होते. कवी वर्तमानातील कोरोनाचे संबंध भूतकाळीन जातीभेदाच्या अस्पृश्यतेच्या रोगाशी जोडतात आणि त्याची भयावहता अधोरेखित करतात. कवी विघ्ने 'संदेश महामानवाचा' या कवितेत लिहितात.

**'जाता जाता**
**समता, स्वातंत्र्य, बंधुता,**
**न्यायाचे अंबर पांघरून घ्या**
**शिका- संघटित व्हा- संघर्ष करा**
**संदेश महामानवाचा घेऊन जा'** (संदेश महामानवाचा,पृ .५२)

समाजजीवनाची भलाई ही उपरोक्त जीवनमूल्यात समाविष्ठ आहे. यामुळेच मानवीजीवन सुखी आणि समृद्ध होणार आहे. या मूल्यांची चळवळ देशभरात अस्तित्वात आहे. तिचे अस्तित्त्व चिरंतन ठेवणे आज आवश्यक आहे. पण ह्या चळवळीच्या नौकेला खिंडार पाडणाऱ्याचा कवी खरपूस समाचार घेतात. कवी 'सत्कार' या कवितेत चळवळीशी गद्दारी करणाऱ्यांना भर चौकात बँडवाजवून सत्कार करावा असे म्हणतात.

**'जो करेल गद्दारी चळवळीशी या मातीत**
**बँडबाजा वाजवा रे त्यांचा भरचौकात'** (सत्कार, पृ .११८)

नुसत्या गर्दीला चेहरा नसतो. चळवळ गर्दीला चेहरा देते पण तुकड्यावर समाधान मानणारे चळवळीशी बेईमानी करतात आणि चळवळीला खिंडार पाडतात. असा निष्ठावंताचा अभाव आणि स्वतःला या गर्दीत विकणाऱ्याचा सत्कार केला पाहिजे असे सांगतात. ही दुभंगलेली मानसिकता एकसंध करण्यासाठी कवी एक धागा नात्याचा ही कविता लिहितात. यातून माणूसकीच्या, एकतेच्या, स्मृतीच्या, प्रेमाच्या आणि समतेच्या धाग्यांनी दुभंगलेल्या माणसाला या मूल्यांच्या धाग्यानी ओवून समाजसमूह बनविण्याचा, नि:स्वार्थपणे जोडण्याचा कवितेतून प्रयत्न करतात. तर 'करूणाकराच्या पाऊलखुणा' या कवितेत मित्राला आस्तिक

विचार सोडून बुद्धाच्या वाटेवर येण्याचे आव्हानही करतात. कवी अरूण विघ्ने 'मी उजेडाच्या दिशेने निघालो' या कवितेत लिहितात .

**'जखमांना तुझ्या करूणेचा ओलावा उभारी देईल या अपेक्षेने**
**अंतर्बाह्य शुद्ध होण्याच्या निर्व्याज हेतूने**
**भरकटलेली पावलं**
**तुझ्याकडेच येत आहेत शांतीदुता**
**मी उजेडाच्या दिशेने निघालो आहे'**

(मी उजेडाच्या दिशेने निघालो, पृ, ३६)

या विस्कटलेल्या, दुभंगलेल्या, दुरावलेल्या, भरकटलेल्या जगत अरण्यातील सर्व मानवसमूहाला बुद्धाच्या प्रकाशमार्गा शिवाय गत्यंत्तर नाही.बुद्ध हे विश्वविख्यात मानसशास्त्रज्ञ, समाज शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञानी, वैज्ञानिक, शांतीचे दूत आणि करुणेचे महासागर आहेत.ते उजेडाचेही उजेड आहेत. कवी आपल्या 'प्रकाशपर्वाचा साक्षीदार'या कवितेत लिहितात,

**'सैन्याला तारणाऱ्या जहाजाचा एक प्रवासी झालो आहे**
**आता नकोत मला त्या जातीधर्माच्या बेड्या**
**कारण मी आता जातीधर्मविरहीत मानव झालो आहे**
**बाबा! मी माझ्या जन्मानंतर बुद्धिस्ट झालो आहे.'**

(प्रकाशपर्वाचा साक्षीदार, पृ.५८)

कवी बुद्धाच्या प्रकाशपर्वाचे साक्षीदार झाले आहेत. याचा अर्थ त्यांचा जन्म झाल्यानंतर त्यांनी कोणत्याही जाती-धर्माचे कपडे अंगावर चढवले नाहीत. अन्यथा प्रकाशपर्वा अभावी सर्वत्र जाती, धर्मासहित माणूस बनण्याची निरंतर प्रक्रिया चाललेली असते परंतु कवी जन्मानंतर बुद्धिष्ट झाले म्हणजे सर्व अतिताच्या बाहेर पडून निखळ आणि निखळ माणूस बनले आहेत. बुद्ध आणि आंबेडकर हे माणूस बनविण्याच्या प्रकाशाची प्रयोगशील अशी महान वैश्विक प्रकाशशाळा आहे.

कवीने उजेडाच्या दिशेने निघण्यासाठी कवितेत विविध विषयाची बांधणी केली. त्यांच्या कवितेच्या नुसत्या शीर्षकावरून जरी नजर टाकली तरी त्यांच्या कवितेतील विषयांचा चौफेर आवाका लक्षात आल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या कवितासंग्रहात जोतिबा, गर्दी अशी पांगायला नको होती,असाच असतो बाप, दिव्यांनीच ठरवावं, उर्जादायी दीक्षाभूमी, दयन

दयलं भिमाईनं, उजेड हरवला तेव्हा, बोधीवृक्षाखाली, मानवमुक्तीचा जाहिरनामा, संत गाडगेबाबा, सावित्रीमाई, संदेश महामानवाचा, लेखनी बोलते तेव्हा, बाबासाहेब, डोक्यात बुद्ध आहे, कोरोना आणि अस्पृश्यता, माय सुखाची सावली, माझा गाव, गावकुसाबाहेरची वेदना, गणित बळीच्या आयुष्यातलं, ठसे कामगारांच्या पावलांचे, प्रकाशपर्वाचा साक्षीदार अशा विविध विषयावरच्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या कवितेचे विषय वर्तमान वास्तवावर भविष्याच्या उजेडाच्या दिशेची खरेदी करणारे आहेत.त्यासाठी कवीने अत्यंत शिताफीने कवितेतील मुक्तछंद, अष्टाक्षरी, बाराक्षरी, अभंग, गझल रचना आणि गीत असे विविध प्रकार हाताळले आहेत. यात त्यांनी काही रचनांमध्ये वऱ्हाडी बोली भाषेचा यथोचित ठस्साही उमटविलेला आहे. तसेच आंबेडकरवादी गझलचे आरंभबिंदू महाकवी वामनदादा कर्डक हे आहेत आणि या आंबेडकरवादी गझल परंपरेचा धागा धरून अरुण विघ्ने यांनी या संग्रहात विस गझला लिहिल्या आहेत त्यांच्या एकूणच कविता जीवनस्पर्शी आणि प्रकाशपर्वाच्या साक्षीदार आहेत. अत्यंत साध्या सोप्या शब्दांचा ते कवितेत वापर करतात.त्यांच्या काही कवितांमध्ये नाविण्यपूर्ण अशी प्रतिमा रूपे साकार झालेली आहेत. त्यांची कविता प्रकाशाच्या भावबंधाला आणि विचारबंधाला टाळून व्यक्त होणारी नाही. ती अस्सल प्रामाणिक निष्ठेने व्यक्त होणारी आहे. त्यांच्या आंबेडकरवादी निष्ठेने त्यांच्या कवितेची दिशा सुनिश्चित झाली आहे. उजेडाच्या दिशेमुळे त्यांची कविता श्रीमंतही झाली आहे आणि ही श्रीमंती ती आपल्या उदरातून वैश्विकांच्या सन्मानार्थ प्रकाशपर्व ठरणारी आहे.

१. कवी अरुण विघ्ने, मी उजेडाच्या दिशेने निघालो, मध्यमा प्रकाशन, नागपूर, प्र.आ.२७ जाने.२०२१, किंमत-२२०

***

# कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ'

**डॉ. शत्रुघ्न जाधव**

प्राध्यापक व संशोधक मागदर्शक, मराठी विभाग, आदर्श महाविद्यालय, हिंगोली.

कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ' हा कविता संग्रह जयतु प्रकाशन, कोल्हापूर येथून मार्च 2012 ला प्रकाशित झाला आहे. या संग्रहाच्या शीर्षकाप्रमाणेच त्यांची कविता आहे. आणि त्यांचे स्वत:चे व्यक्तिमत्व सुध्दा शेतकरी, दलित, आदिवासी लोकांच्या हक्कासाठी लढणारे व त्याचबरोबर सत्ताधाऱ्यांच्या व पोलीस यंत्रणेच्या विरुध्द निळा प्रक्षोभ उभा करणारे आहे. भाऊ भोजने पिडित, वंचितांच्या प्रश्नांसाठी झुंजार पत्रकारिता करणारे आंबेडकरी समाजातील एक निर्भय व स्वाभिमानी पत्रकार आहेत. बुध्द, कबीर, रविदास, फुले, शाहू, आंबेडकर, गाडगेबाबा व काशिराम यांच्या विचार व कार्याची पताका आपल्या खांद्यावर घेऊन पळपळ करणारे आणि वाचन-लेखन करणारे बुध्दिजीवी परंतु हाडाचे सक्रीय कार्यकर्ते आहेत. फुले-आंबेडकरांच्या विचारांवर भाषण करण्यापेक्षा त्या विचारांच्या प्रेरणेतील प्रत्यक्ष क्रीयाशील आंदोलनावर भाऊ भोजने यांचा विश्वास आहे. इतके सारे असूनही ते एक अत्यंत संवेदनशील तथा बंडखोर व विद्रोही कवी आहेत. अन्याय, अत्याचार, शोषण व सामाजिक विषमतेची त्यांना भयंकर चिड आहे. समाजातील समकालीन वास्तव डोळसपणे पाहण्याची सूक्ष्म दृष्टी त्यांच्याकडे आहे. त्या समाजवास्तवातील सगळे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व वाड्.मयीन संदर्भ तपशिलातून समजून घेण्याची जाण त्यांच्याकडे आहे. आणि फुले-आंबेडकरी विचारांचा पाया त्यांच्या वैयक्तिक जडणघडणीच्या प्रारंभापासूनच असल्याने समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रत्यक्ष आंदोलन उभे करण्याची त्यांची नेहमीच तयारी असते. हा भाऊ भोजने यांच्या फुले-आंबेडकरी कृतिशील जगण्यातील पैलू त्यांच्या 'निळा प्रक्षोभ' मधील कवितेतून स्पष्टपणे प्रत्ययास येतो. पत्रकारितेचा व वृत्तलेखनाचा ध्यास

घेतलेली त्यांची प्रारंभिक लेखणी नंतर कथा कवितेकडे वळली आणि त्याचा परिपाक म्हणजे 'निळा प्रक्षोभ' हा त्यांचा कविता संग्रह होय.

प्रक्षोभ हा शब्द सर्वांना प्रक्षोभक वक्तव्य, प्रक्षोभक भाषण किंवा प्रक्षोभक लिखाण या अर्थाने माहित आहे. वरील तिन्ही प्रकारच्या प्रक्षोभक कृतींनी सामाजिक तेढ, जातीय हिंसाचार, धार्मिक हिंसाचार, सामाजिक ताणतणाव, दंगेधोपे इ. समाजात नेहमी घडत असतात. विशेषत: धार्मिक कट्टरपंथी, मूलतत्ववादी, प्रादेशिक अस्मितावादी, सिमावादी, जातीय अंहकारवादी, धार्मिक दहशतवादी आदींची प्रक्षोभक कृत्ये समाजात वातावरण खराब करत असतात. याचा अनुभव समाजाला वारंवार होत असतो. राजकारणी व धार्मिक कट्टरपंथी अशा प्रकाराने समाजाला वेठीस धरुन आपल्या पोळया लाटत असतात. म्हणून प्रभोभ हा शब्द त्या अर्थाने बदनाम झाला आहे. परंतु भाऊ भोजने यांच्या कवितेतील प्रक्षोभ हा तसा वरील अर्थाचा नाही. कारण हा प्रक्षोभ निळा आहे. या प्रक्षोभात एक विचार आहे. वरीलप्रमाणे अविचार किंवा कुविचार नाही. हा विचार बुध्दाचा प्रज्ञा, शील, करुणेचा आहे. धार्मिक अवडंबरतेवर हल्ला करणाऱ्या कबीराचा खऱ्या मानवी धर्माचा आहे. संत रविदासांच्या सामाजिक समतेचा आहे. फुल्यांच्या सामाजिक-धार्मिक क्रांतीचा आहे. राजर्षी शाहूंच्या सामाजिक समतेचा आहे. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सम्यक युग प्रमवर्तनाचा विचार आहे.

हजारो वर्षपासून सामाजिक विषमतेची, रुढी, धर्म-वर्ण-जात, देव-दैव, स्वर्ग-नर्क यांच्या भ्रामक कल्पनेवरील धर्म व त्या धर्माच्या शास्त्राची हुकूमशाही या देशात चालू होती. तिला मूठमाती देण्याचे युगप्रवर्तक कार्य डॉ. बाबासाहेबांनी सविंधानाव्दारे केलेले आहे. तरीही इथली मनुवादी व्यवस्था, इथली प्रस्थापित शासन यंत्रणा दलितांवर अन्याय, अत्याचार करत आहे. त्याविषयीचा कवीचा हा प्रक्षोभ आहे. परंतु हा प्रक्षोभ निळा असल्याने त्याची एक विशिष्ट प्रकारची ओळख आहे. अर्थात हा प्रक्षोभ आंबेडकरी विचार संस्कृतीचा मूल्यविचार देणारा प्रक्षोभ आहे. म्हणूनच हा प्रक्षोभ इतरांची भांडणे लावून आपण सुरक्षित राहण्यासाठी नाही. तर

इतरांची भांडणे मिटवून स्वत: शिक्षा भोगण्यासाठीचा आहे. 'लढाई' या कवितेत कवीचे या संदर्भातील अनुभवात्मक मनोगत असे आहे-

**मी मामुली माणूस कोणत्या फंदात येऊन पडलो**
**निकामी दुसऱ्याचं ओझं डोक्यावर घेऊन फसलो**
**दुसऱ्याच्या खाद्यांवर बंदूक ठेवून निशांना साधावा**
**हा शॉर्टकट सोडून मी कितीदा रस्ता चुकलो**
**कायदे कानूनवाले सत्ता संपत्तीकडे झुकतात**
**मी ताठर राहून कैकदा अंतरबाह्य शेकलो.**

प्रस्थापित सत्ताधारी व सरकारी वर्दीधारी यांच्याशी संघर्ष करण्याची कवीवर अनेकवेळा पाळी आली. अशांचे आर्थिक हितसंबंध अशा कार्यकर्त्यांमुळे धोक्यात आले की ही मंडळी कुठल्याही अनैतिक व राक्षसी पातळीवर जातात. साधासुधा कार्यकर्ता तर ही मंडळी कायम नेस्तनाबूत करु शकते. परंतु भाऊ भोजने सारखा जबर व निडर कार्यकर्ता त्यांच्या नाकी नऊ आणू शकला-

**तो खाकीधारी उच्चाधिकारी**
**मला त्याच्या अंधार कोठडीतून बाहेर काढून...**
**पुढे म्हणाला तुमच्यामुळे समाजातल्या लोकांना**
**शांततेत जगत येत नाही**
**मी म्हणालो सर,**
**आपल्या पवार फौजदारावर वाघ जमादारानं**
**सरकारी रायफलीतून गोळी झाडली अन निशाना चुकताच**
**स्वत:वर गोळी घालून आत्मघात केला**
**माझं तसं नाही, माझा साधलेला निशाना कधी चुकत नाही**

चळवळीतल्या प्रामाणिक कार्यकर्त्याला प्रस्थापिताविरुध्द संघर्ष करतांना यातना सहन कराव्या लागतात. पैसा व खाण्यापिण्याच्या अमिषावर जगणारे कार्यकर्ते अशा प्रसंगी अधिकाऱ्यांच्या दावणीला बांधल्या जातात. पण भाऊसारखा कार्यकर्ता उलटा अशा अधिकाऱ्यांशी पिटाई करतो. याला खूप हिंमत लागते. अशा कार्यकर्त्याचे संघर्षमय जगणेच एक महाकाव्य असते. कवीने स्वत:च्या संघर्षमय जगण्यालाच

कवितेचा विषय केले. अशा जगण्याचा एक वचक निर्माण करणेच विद्रोही कार्यकर्त्यांसाठी महत्वाचे असते. हा कवीचा जीवन संदर्भ लक्षात घेण्यासारखा व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी विद्रोहाची प्रेरणा देणार आहे-

**मी बुलंद ध्येयाने पेटून त्याच्यावर चालून गेलो,**
**त्याने नेहमीप्रमाणे संपत्तीचा घेतला सहारा**
**मी बंदीशाळेत बंदीस्त**
**अन् आता तो शोधतोय स्वत:चे अस्तित्व**
**मी बंदिस्त झाल्यावर तो चारचौघात विजयोत्सव साजरे करतो**
**पण झोपेत मात्र दचकून उठतो, भाडखाऊ खाकी वर्दीधारी**

बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातल्या वरवट बकाल नावाच छोट्याशा खेडयातराहून त्या परिसरात चळवळीचा लढाऊ कार्यकर्ता म्हणून कवी भाऊ भोजने यांची स्वतंत्र ओळख आहे. त्यांच्या प्रत्यक्ष संघर्षमय जगण्यातील अनुभवांनी त्यांची कविता जिवंत झाली आहे.

आंबेडकरी चळवळीतला कार्यकर्ता तो आंदोलनातील असो, साहित्यातील असो वा अन्य कुठल्याही प्रकारच्या संघर्ष यात्रेतील असो, त्याला या देशाचा खराखुरा इतिहास माहित असतो. पारंपरिक व प्रस्थापित लेखकांच्या इतिहासात त्याला आपल्या समाजाचे चित्रण दुषित व चुकीचे दिसते. अशा प्रकारे इतिहासाची नवी मांडणी व इतिहासाचे पूनर्लेखन कार्यकर्त्यांसाठी ही दृष्टी व प्रेरणा निर्माण करुन दिलेली आहे. असा कार्यकर्ता जेव्हा कवितेतून अभिव्यक्त होतो तेव्हा प्रस्थापितांसमोर तो आव्हान निर्माण करतो-

**या देशाच्या गद्दार इतिहासकारांनो,**
**बाजी तुमच्या हाती होती, तुमच्या हाती कलम होती,**
**आता कलम माझ्या हाती आहे, बाजी पलटलेली आहे**

हा कार्यकर्ता देशाच्या प्राचीन इतिहासाला वेगळयाप्रकारे वर्तमानातील मनुवाद्यांच्या वर्तनावरुन प्राचीन इतिहास व संस्कृतीचे आपले आकलन मग उत्स्फूर्तपणे कवितेतून मांडतो-

**गुप्त खलबत करणारा तो**

**काल चक्क चोथऱ्यावरुन बोलला**
**‘अरे हे विद्यापीठाच्या प्रवेशव्दारावरुनच**
**फलक लावून परतणार आहेत’**
**महिनो-महिने नालंदा विश्वविद्यापीठ जळते आहे.**

अशी इतिहासात झालेली आपल्याशी सामाजिक गद्दारी व सांस्कृतिक नासधूस पाहून कवी अस्वस्थ होतो. या संतापासून कवी विद्रोहाची भाषा बोलतो. कारण तो स्वत:ला आंबेडकर नावाच्या सूर्यकुळाचा वारसदार समझतो. ‘माझ्यात मी पेरलीत उजेडाची फुले, मी मुक्कामाला निघालो म्हणजे माझा रस्ता सदैव उजाडलेला असतो’ असे तो अभिमानाने सांगतो. म्हणूनच तो सुरुंगाच्या वाती पेटवण्याचा संदर्भ देतो. आंबेडकरी चळवळीतला कवी केवळ शब्दांचा खेळ खेळत नाही. सामाजिक उत्तरदायित्वासाठी तो बांधलेला असतो. त्याला समाजावरील संकटाची चाहूल लागल की तो जागल्याची भूमिका अदा करतो-

**आता प्रत्येकाने डोळयाला तेल घालून**
**जागल करायलाच हवी...**
**बारुद ठसा ठसा भरायलाच हवी**
**ते जेव्हा सराईतपणे लचका घेण्यासाठी हुंगतील**
**तसा स्फोट होऊ द्या!**

आंबेडकरी प्रतिभेचे डोळे ज्या ज्या कवी, लेखक व कार्यकर्त्यांना लाभलेले असतात, ते ते सर्व आपल्या समाजाकडे सुक्ष्म नजरेने पाहत असतात. आपल्या समाजाच्या प्रगतीसोबतच समाजाच्या अधोगतीकडेही त्यांची नजर जात असते. आपल्या सामाजिक चळवळीची दिशाहिनता कवीला अस्वस्थ करते. समाजाला बाबासाहेबांच्या महापरिर्वाणानंतर सक्षम नेतृत्व मिळाले नाही. जी काही नेत्यांची झुंड तयार होत आहे, ती स्वत:च्या स्वार्थाने बरबटलेली निघत आहे. या अशा विदारक स्थितीकडे पाहून कवी म्हणतो की-

**कोणी तसा लाल दिसत नाीह आता**
**नजरेत माझ्या बसत नाही आता**
**भटकलो मी दिशा दिशा अनवाणी**

**कुठे जातो हा पथ कळत नाही आता**
**झोपले शिकारी फासे मांडून निवांत**
**कुठे सावजही पळत नाही आता**
**चतलीच्या दावणीला बांधले हे रेडे**
**त्यावरी पैंथर ओरडत नाही आता**

असे गझलेच्या रचना प्रकारातून कवीने आंबेडकरी चळवळीच्या स्थितीवर निराश होऊन भाष्य केलेले आहे. जयभीम म्हणणाऱ्या, बुध्द धम्माचे अनुयायी असलेल्या बाबासाहेबांच्या लेकरांची चळवळीतील, राजकारणातील परिस्थिती विदारक आहे. कवीने बाबासाहेबांशी थेट संवाद साधतांना आपल्या भावना मोकळया करण्याचा प्रयत्न केला आहे. कवी म्हणतो-

**बाबासाहेब!**
**एकीचं बळ, शिस्त अन् त्याग**
**आपण आम्हास सांगत गेले**
**आणि हे पाहा,**
**त्यांच्या पदरात काही पडलं नाही म्हणून**
**आपापल्या तंबूत पांगत गेले**

या देशातील सवर्ण समाजाच्या मानगुटीवर जातियतेचे इतके पक्के भूत बसलेले आहे की, सगळया समाजाची मानसिकताच जातीय व्देशावर आधारित पक्की झालेली आहे. प्रेम, वात्सल्य, मैत्री, बंधुभाव, मानवता अशी मूल्ये परंपरेच्या कचाट्यात सापडलेली माणसे समजू शकत नाही. हा जातीय व्देश इतका खोलवर गेलेला आहे की, प्रेमभावनेच्या निरपेक्षतेवरही तो हावी होतो. कवीने या संदर्भातील सखीच्या संदर्भात लिहिलेल्या कविता यावर प्रकाश टाकतात. आंबेडकरी चळवळीतला तरुण कार्यकर्ता इथल्या व्यवस्थेवर आपल्या भाषणातून घणाघाती प्रहार करतांना त्याच्या आवेशावर व व्यक्तिमत्वावर खूश होणारी संपूर्ण तरुणी त्याला मनापासून दाद देते व जोरजोराने टाळया वाजवते. कारण ती त्या प्रसंगी एका तरुणावर व त्याच्या वैचारिक भूमिकेवरही फिदा झालेली असते. परंतु आपल्याला प्रभावित करणारा तरुण आंबेडकरी समाजाचा

आहे, हे समजल्यावर तिच्या सवर्ण सनातनी मानसिकतेत प्रेमाऐवजी सूड जागा होतो.

प्रत्येक आंबेडकरी प्रामाणिक कार्यकर्त्यांमध्ये एक कवी वा लेखक दडलेला असतो. आणि तो कवी विद्रोही व्यक्तिमत्वाचा असतो. समाजाकडे, समकालीन घडामोडींकडे, चळवळीकडे इथपासून तर आपल्या चळवळीतील यशाबरोबरच अपयशाकडेही तो सम्यक दृष्टीने पाहणारा असतो. म्हणूनच तो व्यवस्थेच्या व परंपरेच्या सामाजिक अन्यायाने अस्वस्थ होतो. तसाच आपल्याच समाजातील व चळवळीतील अंतर्विरोधानेही तेवढाच चिंताक्रांत होतो. बाबासाहेबांनी ज्या समाजात आपला जन्म झाला, त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात अपयश आले तर स्वत:ल गोळी घालून ठार करण्याचा गंभीर इरादा केला होता. म्हणून त्यांनी हजारो वर्षाच्या अंध:कारातून या समाजाला तात्काळ बाहेर काढण्यासाठी बुध्दाचा महान धम्म दिला. या धम्माचा सर्वांगिण लाभ धम्मग्रंथापेक्षा, धम्म भाषणापेक्षा प्रत्यक्ष धम्म आचरणाने होतो. मात्र तथागत बुध्दाला आपला समाज आत्मसात करु शकला नाही, पेलू शकला नाही ही कवीची खंत कवीने अशाप्रकारे व्यक्त केली आहे-

**बुध्दा, तु उभारलास जगात सजिवांसाठी डोलारा**
**आणि आम्ही करुन टाकला तुझा गुळगुळीत निर्जीव पुतळा**
**बुध्दा, तसा तू उभी हयातभर चरख भिक्खवे.... म्हणालास**
**आणि आम्ही करुन टाकले तुला बंदिस्त बुध्दालयात**
**बुध्दा खरच का तुझे करुणामय डोळे**
**विनाशाशिवाय उघडणार नाहीत आता?**
**आणि तुझं धम्मचक्र जगावर फिरणार नाही आता?**

बुध्दाच्या धम्माबरोबरच आपल्या समाजाच्या रिपब्लिकन राजकारणाची व बाबासाहेबांच्या अस्तित्वाची राखरांगोळी आपल्याच लोकांनी केलेली आहे. म्हणून कवीने आरपीआयच्या त्याच त्या नेतृत्वाचा समाचार घेताना त्याच त्या नेतृत्वाने आता दुसऱ्या, तिसऱ्या फळीतील नेतृत्वाला पक्ष सोपवून देण्याचा सल्ला दिला आहे व रिपब्लिकीन पक्षाच्या दांभिकपणावर जोर दिला आहे.

**बाबासाहेब!**
**जो तो येतो तो आपले दांभिकपण लपविण्यासाठी**
**तुमचे चित्र थोबाडावर चिपकून येतो**
**आणि तुम्ही दिलेल्या आमच्या फाटक्यातलं**
**दान घेऊन पसार होतो**

चळवळीत स्वतंत्रपणे, निर्भयपणे व प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला जसा मनुवादी, प्रस्थापित व्यवस्थेतील लोकांचा त्रास होतो, तसाच स्वयंप्रज्ञेने काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आपल्याच चळवळीतील स्वकीयांकडूनही त्रास होतो. याची अनेक उदाहरणे कवी भोजने यांच्या जीवनात घडलेली आहेत. कधी कधी चळवळीतील लोक वैचारिक भूमिकेऐवजी केवळ भावनांची बळी ठरतात, तेव्हा डोळस कार्यकर्त्याला त्रास होतो आणि हा अनुभव कवी असलेल्या कार्यकर्त्याचाच नाही तर इतरही प्रामाणिक लोकांचा असतो. रिपब्लिक राजकीय चळवळ सध्या विचारांपेक्षा भावनेवर जगत आहे आणि या भावनिकतेच्या पाठीमागे त्या प्रवाहातील नेत्यापासून कार्यकर्त्यांपर्यंत व्यक्तिगत स्वार्थच असतो व समाजाची हानी असते. याची वैचारिक झळ व भावनिक ठेच भाऊसारख्या कार्यकर्त्यां कवीला सहन करावी लागते आण कवितेतून मग त्याची प्रतिक्रिया अशी उमटते-

**बाबासाहेब**
**ह्यांच्या कळयातून प्रज्ञासूर्याच्या शोधात**
**एखादा बाहेर पडला की तो गद्दार**
**अंधाऱ्या कळयांच्या शिलेदाराचे हे कृतघ्न दावेदार!**

चळवळीतील विद्रोही कार्यकर्त्याला व्यवस्था परिवर्तनासाठी सतत संघर्षंत रहावे लागते. असा विद्रोही कार्यकर्ता कवी म्हणून आपली सामाजिक जबाबदारी शब्दांच शस्त्रासह पार पाडत असतो. आरपार काचेसारख्यया पारदर्शक असलेल्या कवीला जेव्हा बाह्य शत्रुकडून व आपल्यातीतही अंतर्गत शत्रुकडून अडथळे येत असतांना 'मला तोडण्याचे वेडसर कृत्य करु नका, मी धारदार शस्त्र होईल' असे तो म्हणतो. कवीची भाषा ही अशी धारदार शस्त्रासारखी असली तरी कवी विध्वसंक किंवा

हिसंक नाही. कवीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडून सनदशीर क्रांतीची, न्याय्य लढ्याची व सम्यक विद्रोहाची प्रेरणा मिळाली. तसेच तथात बुध्दाच्या महाकारुणिकतेमधील अहिंसाही मिळाली आहे. म्हणून समकालीन व गतकालीन सामाजिक विषमतेमुळे अन्याय, अत्याचार, जोर, जुलूम पाहून अस्वस्थ होणारा कवी बुध्दाच्या करुणामय डोळयांसाठी व धम्मचक्रासाठी अधीर झालेला आहे, याचीही प्रचिती कवितेतून येते-

**बुध्दा! खरंच का**
**तुझे करणामय डोळे**
**विनाशाशिवाय उघडणार नाहीत आता?**
**आणि तुझं धम्म चक्र जगावर फिरणार नाही आता?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिगत चरित्राची, त्यांच्या विराट बहुविध चळवळीची, त्यांच्या लेखन भाषणातील विचारक्रांतीची आणि त्यांच्या धर्मांतराची प्रेरणा चळवळीतील कार्यकर्त्यांला ज्वालामुखीचे बळ पुरवित असते. मेलेल्या जीवांमध्ये जगण्याची ओढ निर्माण करत असते. त्याचबरोबर विद्रोही कार्यकर्त्यांच्या मन आणि मेंदूमध्ये क्रांतीलढ्याचा वणवा पेटवत असते. त्याच्या अंगात निळया वादळाचे थैमान तर त्यांच्या डोक्यात निळया विचारांचे काहूर निर्माण करत असते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच या युगातील एका वादळाचे नाव आहे.

कवी भाऊ भोजने यांनी या संग्रहाची अर्पण पत्रिका प्रा. आनंद उत्तमराव भोजने या सध्या कोल्हापूर स्थित असलेल्या त्यांच्या चुलत भावाच्या नावे लिहली आहे. यालाही एक अर्थपूर्ण महत्व आहे. आपल्या कमाईचा काही भाग समाजासाठी दान करावा ही डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी आपल्या अनुयायांकडून अपेक्षा व्यक्त केलेली आहे, या अपेक्षेला अनुरुप जे वागतात त्यापैकीच एक प्रा. आनंद भोजने होत. भाऊ भोजने सारख्या जीवावर उदार होऊन चळवळ करणाऱ्या नि:स्पृह कार्यकर्त्याकडे पैसा कुठून येणार या कफल्लक कार्यकर्त्या कवीची कविता या व्यवहारी जगात प्रसिध्द होऊच शकणारी नाही. हे आर्थिक बळ प्रा. आदंन भोजने यांचे आहे.

'निळा प्रक्षोभ' हे या संग्रहाचे शीर्षक कवितेतील आशयाशी मिळते-जुळते आहे. राजेंद्र कदम यांचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ, कवितांच्या अर्थाचे आकलन देणारी आतील अर्जुन नागे यांची रेखाटने, मलपृष्ठावरील कवीचा निळा प्रक्षोभ व संवेदनशीलतेचा परिचय करुन देणार चेहरा अशा सर्व अंगाने एक चांगला कवितासंग्रह घेऊन आपल्या निळया प्रक्षोभांची अभिव्यक्ती कवी भाऊ भोजने यांनी काव्यप्रांतात दाखल केलेली आहे.

खूप सारी वैशिष्ट्ये असलेल्या या कवितेत दोष नाही असे नाही. मुद्रणदोषांनी अनेक कवितांना बाधित केलेले आहे. काही कवितांच्या रचनात्मक बांधणीत सैलपणा आला आहे. काही दोन तीन कवितांची पुनरावृत्ती झालेली आहे. हे दोष कवीचे नाहीत तर प्रकाशन प्रक्रीयेतील आहेत परंतु हे दोष किरकोळ आहेत. रचनात्मक बांधणीपेक्षा त्यातील प्रत्यक्ष जगण्याचा आश्य महत्वाचा असतो. ही कविता वाङ्.मयाच्या व्यावसायिक प्राध्यापकाची नाही, तर रस्त्यावरच्या चळवळीत जीवन समर्पित करणाऱ्या अशिक्षित कार्यकर्त्या कवीची आहे, हेच या कवितेचे फार मोठे सामर्थ्य आहे. फुले-आंबेडकरी कवितेला अशाच कृतिपूर्ण सामर्थ्य जाणिवांची गरज आहे.

- निळा प्रक्षोभ (कवितासंग्रह)
- प्रकाशक – जयश्री गुरव, जयतु प्रकाशन, जनाई दत्त नगर, कोल्हापूर-7
- आवृत्ती – 1 ली – 20 मार्च 2021
- पृष्ठे 105, मूल्स – 100 रुपये

***

# 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहातील कवितामधून येणाऱ्या सामाजिकतेचा अभ्यास

**प्रा. उन्मेष शेकडे**
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,शिरुर ताजबंद

'संदर्भ शोधताना' हा प्रदीप पाटील यांचा पहिला कवितासंग्रह १० नोव्हेंबर २००२ मध्ये प्रकाशित झाला. कवी आपल्या जीवनाचा शोध घेण्याबरोबरच सामाजिक जीवनातील वाढत जाणारी अपप्रवृत्ती वास्तवाच्या पातळीवरुन मांडतात. स्वतःच्या जीवनाचा शोध घेतानाच कवीला स्वतःच्या जीवन प्रवासात कशी समाजातील समूहमनाची सामाजिक दांभिक प्रवृत्ती आडवी येते, याची वास्तवता कवी मांडताना आढळतात.

मानवी जीवनात जीवनाचे संदर्भ शोधताना आजचे जीवनच कसे हतबल होत आहे, याची वास्तव मांडणी कवीने केलेली आहे. समाजात सगळीकडे आज वाढलेली स्वार्थी व लाचार प्रवृत्ती हीच मानवी आदर्श मुल्याचा गळा घोटत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. माणूसकीचे आर्दशच आज यामुळे संपुष्टात येत चाललेले आहेत.

कवीचे मन मानवी जीवनातील आदर्श मुल्य नष्ट होताना व्याकूळ होताना आढळते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वाचा स्वीकार करणारे कवी मन उदासून जाते. सर्वत्र आज अराजक वाढत आहे. आदर्श मानवी मुल्य नष्ट होत आहे. या परिस्थितीतसुध्दा कवीचा आदर्श मुल्यावरच विश्वास कायम असल्याने त्यांचा परिवर्तनावरचा विश्वास व्यक्त होताना आढळतो.

'संदर्भ शोधताना' या कवितासंग्रहातील कवितामधून कवीने मांडलेल्या सामाजिक अपप्रवृत्तीचा शोध घेवून यापूढे संपन्न व आदर्श समाजरचनेसाठी कशाप्रकारे आदर्श मुल्यांची आवश्यकता आहे, याचा विचार कवितांच्या आधारे लक्षात घेणे आवश्यक आहे. जीवन जगताना येणाऱ्या संघर्षाशी सामना करता करता जीवनच कसे संपून जाते...याची वास्तविकता कवीने 'संदर्भ शोधताना' या कवितेतून मांडलेली आहे. स्वतःचे जीवन घडवताना पावलो पावली पत्कारलेली हार कशी वेदनेला अधिकच गडद करते याची जाणीव ही वास्तवाच्या पातळीवरुन आढळून येते. यानुशंगाने प्रदीप पाटील यांनी 'संदर्भ शोधताना' या कवितेतून मांडलेला विचार लक्षात घ्यावा लागतो. तो असा-

**"आणि**
**त्या अंधारात हरवूण जातो**
**माझ्यासारखा वेडा**
**त्याला माहीत नसताना जगण्याचे संदर्भ**
**पावलो पावली हर वळणावर बदल्याणे संदर्भ**

**त्याला माहीत असतो फक्त कवितेचा संदर्भ**
**जीवनभर असाच ठेचाळता, रक्ताळतो...**
**वेडापीसा होतो...**
**कवीता करतो**
**जगण्याचे संदर्भ शोधतच**
**बघता...बघता आयुष्य संपून जाते."** १

समाजात आज मानवी मूल्य नष्ट होत असतानाच खोटेपणाची अपप्रवृत्ती वाढत जाताना आढळत आहे. सर्वत्र एक प्रकारचा स्वार्थ वाढत आहे. यामुळेच जीवनात हतबलता वाढत आहे. जो इतरांना उदात्त भावनेने मदत करतो आहे, त्यांच्यावरच अन्याय केला जातो आहे. अशा भयावह स्थितीत जगणेच अवघड होत आहे. स्वार्थ् एवढा वाढला आहे की, निस्वार्थीपणाने जगणाऱ्यालाच जगणे अवघड होत आहे. कवी प्रदीप पाटील यांनी 'स्वार्थ' या कवितेतून मांडलेला विचार याचदृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

**"या मतलबी जगात**
**कोण कुणाचे आहे**
**प्रत्येकाचा स्वार्थ**
**धमण्या-धमण्यातून वाहे**
**आसुड ओढले जातात**
**सज्जनेच्या पाठीवरती**
**लबाड आऩ चुगलखोर**
**आपला डाव साधून घेती."** २

'संदर्भ शोधताना' या कविता संग्रहातील कवितामधून येणाऱ्या सामाजिकतेची वास्तवता शोधताना असे लक्षात येते की, आज जिवंतपणी मृतप्रायपणाचा अनुभव वाटयास येत आहे. हे जीवन यामुळे जगणे असहाय होत आहे. याचाच अर्थ असा की, जीवनातला एकूण जिवंतपणाच संपत आहे. याची जाणीव प्रदीप पाटील यांच्या 'छळत गेले' कवितेतील विचारातून होताना आढळते. ती अशी-

**"काल मी जिवंत होतो तर**
**हेच लोक मला छळत होते**
**मी आज मेलो तर माझ्या प्रेतावर**
**खोटेच आश्रू ढाळत होते**
**खोटेच का होइना रडत रडत**
**माझ्या प्रेताला खांदे दिले**
**माझ्याकडे बघत बघत**
**माझ्या इसव्यातले पैसे नेले."** ३

श्रम करणारे श्रमच करत आहेत. त्यांना आयुष्य जगताना दोन वेळसचे अन्न मिळणे कठीण होते. कपडा घेण्यासारख्या गरजा पूर्ण करणे अवघड होवून

बसते. अशावेळी जे स्वार्थ् साधून भांडवलदार झाले आहेत ? त्यांचे जीवन आज वैभवसंपन्न होताना आढळून येत आहे. याचाच अर्थ असा श्रम करणारे लोक गरीब होत आहेत. श्रम नाही करता बुध्दी कौशल्याचा वापर हा स्वार्थीपणे करणारे लोकच संपन्नतेचे् जीवन जगताना आढळत आहेत. 'हा कुठला न्याय आहे?' या कवितेतील कवी प्रदीप पाटील यांचा विचार यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

**"स्वतंत्र भारताला पोखरणाऱ्या किडयांनो,**
**मेलेल्या मढयावरचे लोणी**
**मिटक्या मारीत चाटणाऱ्यांनो**
**तुमच्या पै-पैचा हिशोब मला हवा आहे.**
**रात्रीचा दिवस करून**
**राब-राब राबणाऱ्या माझ्या आईला**
**अब्रु झाकण्या कपडा भेटू नये."**

४

जीवन जगताना वेदनाच अधिक वाटयास कशा येतात याचे वास्तववादी जीवन मांडताना कवीने जीवनाची हतबलताच कशी मांडलेली आहे याची जाणीव होते. आयुष्यभर जीवन जगताना वाटयाला येणारे कर्जबाजारीपण कसे जीवनास जर्जर करते याची जाणीव होते. जीवन जगताना कधी अनंद भरलेल्या पीकामुळे मनात येतो. त्याचवेळी सावकाराचे द्यावयाचे कर्ज आठवून आनंद संपुष्टात येतो...याची जाणीव 'वीज कोसळली' या कवितेतील विचारातून होते. यामुळेच प्रदीप पाटील यांचा विचार लक्षात घेताना त्यांची 'वीज कोसळली' ही कविता यादृष्टीने लक्षात घ्यावी लागते. यातील पुढील ओळी याअनुशंगाने विचारात घ्याव्या लागतात. त्या अशा-

**"आबाच्या मनात आनंदाच्या असंख्य लाटा**
**उसळत होत्या**
**किनाऱ्याला येऊन धडकत होत्या**
**इतक्यात**
**सावकाराच्या देण्याची एकदम**
**आठवण झाली**
**अन**
**आबांच्या आनंदावर अचानक**
**प्रलयकारी**
**वीज कोसळली."** ५

जीवन जगताना आज आमचे जीवन कसे उध्वस्त होत आहे. जिवंतपणी मृतप्राय जीवन कसे आम्ही जगत आहोत...याची मांडणी करताना आमचे जीवनच कसे आज नेस्तनाबूद होत आहे. याची मांडणी कवी प्रदीप पाटील करताना आढळतात. जीवनातील माणुसकीही कसी संपत आली आहे.

यादृष्टीने प्रदीप पाटील यांनी 'शिरच्छेद' या कवितेतून मांडलेला विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. तो असा-

**"दोस्तोहो**
**आमच्या धडधडणाऱ्या चित्तेत**
**आम्ही**
**आमच्या प्रेताबरोबर**
**आमचा आदर्श जाळला**
**सत्य,शिव आणि जीवनाच्या सौंदर्याची**
**धुळधाण केली**
**भाकरीसाठी आम्ही शहाण्यांनी**
**उरलेली माणुसकीही विकली."**

६

आजच्या सामाजिक जीवनातील महत्वाचा प्रश्न असा की, आपल्या सोबत असणारेच आपणास ओळख विचारतात. आपले म्हणून आपले सोबत असणारेच आपली ओळख विसरतात. आज एकूणच भावनाशून्यतेचे एकूणच संदर्भ आपणास जागोजाग दिसून येतात. जीवन जगतानाचे आजचे हे वास्तव किती भयानक होत आहे, याची जाणीव होतानां आढळते. कवी प्रदीप पाटील यांनी याविषयीचा 'अनोळखी' या कवितेतून मांडलेला विचार यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

**"जीवनात**
**कधी कधी ओळखीचेसुध्दा**
**अचानक**
**दिवस उजडल्या उजडल्या**
**अनोळखी होतात**
**अन**
**तीच माणसं आपली ओळख विचारतात**
**आपण कोण,"** ७

स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षाचा काळ ओलांडून गेला तरी आज गरीब माणसांच जगण हे वेदनामयच आहे. मोकळे श्वास घेवून त्याला जगता येत नाही. दिसेंनदिवस वाढणारे कर्ज हेच जीवनाचा बोझ होवून बसते. सर्व बाजूने अंधारेपण येते. जीवनाचे आनंदी क्षण लुप्त पावतात. यामुळे श्रमाने जगणारे माणसं अधीकच दुबळे होत जातात. 'जिणं' नावाच्या कवितेतून प्रदीप पाटील यांनी मांडलेला विचार यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

**"उगवू नये म्हणताही**
**सूर्य रोज उगवायचा**
**बा च्या कर्जाचा डोंगर**
**रोज रोज फुगायचा**

**दरसाल काळयामायचं**
**हात आखडून देणं**
**रोजचच झालं माझ्या बा चं**
**वरवटयाखालचं जिणं."** ८

आजच्या वास्तव जीवनात जे लोक ज्यांचेकडे सत्ता आहे...त्यांचे पुढे पुढे करतात त्यांनाच वैभव प्राप्त होते. त्यांचेच विकासाचे चक्र चालू असते.असीच लोक स्वार्थीवृत्तीने आपला विकास करून घेतात. यादृष्टीने प्रदीप पाटील यांनी 'उपहासिका' या कवितेतून मांडलेला विचार लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

**"ताटाखालचं मांजर होऊन**
**ज्याला पाय चाटता येतात**
**त्यालाच साऱ्या सुखसोयी**
**फुकट लाटता येतात.**
**-----------------------**
**समतेची लाघवी धडे देत**
**ज्याला माणसं फोडता येतात**
**त्यालाच सरकारी योजना**
**मनसोक्त झोडता येतात."** ९

मानवी जीवन जगताना जी मानवी मूल्यं आदर्शाच्या पातळीवरुन स्वीकारावी लागतात तीच आज नष्ट होताना आढळत आहेत. सामाजिक जीवनातील अपप्रवृत्ती नष्ट होवून आदर्श समाजाची जडणघडण व्हावी अशी कवी प्रदीप पाटील यांची असलेली भूमिका मानवी आदर्श मूल्यांच्या दृष्टीने उपयुक्त अशी आहे.

कवी प्रदीप पाटील यांनी आपल्या 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहामधून सामाजिक वास्तवाची केलेली मांडणी महत्वपूर्ण काळानुसार समाजजीवनात बदल होत असतो. काळ हाच युगाचा भाग असतो. प्रत्येक काळात याचाच अर्थ प्रत्येक युगात काही उणीवा समाज जीवनात असतात. त्यात अनीतीचा सहभाग असतो. त्या त्या वेळी कलावंत साहित्य निर्मितीतून आदर्श मूल्यांचा स्वीकार करतांना आढळतात. 'कविता आणि प्रतिभा' या आपल्या ग्रंथातून सुधीर रसाळ यांनी मांडलेला विचार लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

"अशा कलाकृतीची समाजाला गरज असते. कारण समाजाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाला त्या निर्दोष पूर्णता मिळवून देतात. प्रत्येक युगात मानवी जीवनात काही त्रुटी असतात, त्याचे काही समज-गैरसमज असतात, त्याचा तोल गेलेला असतो. त्यामुळे प्रत्येक युगातील मानवी जीवनाला काही मानसिक उपाययोजनांची गरज असते."१०

कवी प्रदीप पाटील यांनी जीवन जगताना जीवनात जे भयावह सामाजिक जीवनाचे स्वरुप अनुभवले त्याचे वास्तव हे त्यांनी निर्भिडपणे मांडलेले

आढळते. जीवन जगताना स्वतःचे जीवन उभे करताना येणारे अडथळे, स्वतःच्याच जवळच्या वाटणाऱ्या माणसांनी उभे केलेले अडथळे...याविषयी वास्तव मांडणी ही प्रदीप पाटील यांनी जी केलेली आहे, ती महत्वाची आहे. त्यात सामाजिक परिवर्तनाची आशा आहे. निर्भिडपणाने समाजवास्तव जे मांडू शकतात, तेच परिवर्तनाचा विचार मांडताना नवी दिशा दाखवू शकतात. 'साहित्याचा अन्वयार्थ' नावाच्या आपल्या ग्रंथात नागनाथ कोत्तापल्ले यांनी समाजवास्तवाच्या दृष्टीने मांडलेला विचार यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. तो असा-

"समाजात जे जे वाईट आहे त्याला वाईट म्हणण्याची ताकद आपण ठेवली पाहिजे. वैयक्तिक जीवनातही अन्यायाविरूध्द लढण्याचा वकूब आपण बाळगला पाहिजे आणि यातूनच आपल्या 'माणूसपणां' ची उंची वाढत असताना जगण्यामध्ये आणि लेखनामध्ये विसंगती तर उरणार नाहीच पण आपले अनुभव विश्व, लेखन आणि जगणेही समृध्द होऊन जाईल !"११

समाजाला मानवी मूल्यांची जाणीव असणे हे गरजेचे आहे. समाजाचा घटक व्यक्ती असल्याने व्यक्तिगत पातळीवर मानवी मूल्यांची जोपासना करणे आवश्यक आहे. याच प्रक्रियेतून आदर्श समाज निर्मितीची निर्मिती करणे शक्य असते.

सन २००० नंतर साहित्य क्षेत्रात समाजजीवनाची वेगवेगळी वळणे घेवून अनेक कलावंताच्या कलाकृती आल्या. त्यात त्यांनी आपल्या अनुभवातून एकूणच मराठी साहित्यात अनुभव संपन्नतेची भर टाकली. त्यामुळे मराठी साहित्याची संपन्नता वाढण्याच्या दृष्टीने कणाकणाची का होईना समृध्दी लाभली.

कलावंताची कलाकृती ही अनुभव सिध्दपणाने मांडते. आपले अंतःकरण मोकळे करताना कलावंत कोणाचेही द्वेष नाही करता मांडणी करतो. द्वेष येतो नकारात्मक प्रवृत्तीचा, आदर्श मानवी मूल्यं नष्ट करणाऱ्या प्रवृत्तीचा. याच ठिकाणी कलावंताचे मानवी मुल्य जोपासण्याचे मन गहिवरुन येते. यामुळेच कलावंत मांगल्याचे मानवी मुल्य कलाकृतीतून मांडीत असतो. एकूणच समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता रुजवून राष्ट्राच्या विकासात आदर्श मानव्याची मूल्यं रुजविण्याचे पवित्र कार्यच कलावंत आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून करीत असतो.

'गुराखी'- उन्मेष शेकडे, 'हिरव्या रानातील कविता'- उन्मेष शेकडे, 'बापाच्या कविता' - बाळासाहेब गर्कळ, 'निळाईच्या सावलीत'- रजनी ताजने, 'आभाळी झोका टांगला'- सुनंदा सरदार, या कविता संग्रहातून सामाजिक जीवनातील सन २००० नंतरची बदलत जाणारी सामाजिक जीवनातील वास्तवता आलेली आहे.

मानवी मनाला अंतर्मुख करण्यास प्रवृत्त करणारी वरील कविता संग्रहातील अनुभव मांडणी जीवनाची नवी आशावादी दिशा शोधताना आढळत आहे.

सन २००० नंतरची जी समाज वास्तवाची सूक्ष्म वळणे वरील कवितासंग्रहातून शब्दबध्द झालेली आहेत. यामुळे यावरील कविता संग्रहातील अनुभव मांडणी सन २००० नंतरच्या भारतीय समाज वास्तवाचा अभ्यास करण्यास उपयुक्त अशी आहे.

आदर्श समाज ही राष्ट्राची शक्ती असते ! राष्ट्राच्या विकास प्रक्रियेत आदर्श समाजाचे योगदान मोलाचे असते. त्यामुळे ज्या ज्या वेळी समाजातील आदर्श मूल्यं संपुष्टात येवू लागतात. त्या त्या वेळी साहित्यिक कलावंतानी आदर्श मानवी मूल्यांची जोपासना कलाकृतीतून करुन समाजाची सामाजिक पातळीवरची उदात्ततेची उंची वाढविणे हेच जागृतीच्या दृष्टीने मोलाचे आहे.

**संदर्भ :**


१. 'संदर्भ शोधताना' : प्रदीप पाटील, प्रकाशन- संगत प्रकाशन, प्रथमावृत्ती १० सप्टेंबर २००२, पृष्ठ क्रमांक-५
२. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- ०९
३. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- १५
४. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- २२
५. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- २८
६. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- ३३
७. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- ५०
८. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- ५९
९. 'संदर्भ शोधताना' - पृष्ठ क्रमांक- ६४
१०. 'कविता आणि प्रतिमा' : सुधीर रसाळ, प्रकाशक- श्री.पु.भागवत, प्रकाशन- मौज प्रकाशन गृह मुंबई, पहिली आवृत्ती-१९८२, पृष्ठ क्रमांक- ५३
११. 'साहित्याचा अन्वायार्थ' : नागनाथ कोत्तापल्ले, प्रकाशिका-सौ. उषा मुलाटे, प्रकाशन- स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती- सप्टेंबर-१९९६


***

# स्त्री साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी आणि २००० नंतरच्या कवयित्रीच्या कवितेतील आत्मभान

**प्रा. गौतम गायकवाड**

अंबाजोगाई

जगात माणूस सर्वश्रेष्ठ आहे. मानव हा धरतीचा निर्माता आहे. हे जग माणसांसाठी आहे आणि मानसात स्त्री सर्वश्रेष्ठ आहे. स्त्री आणि पुरूष दोघेही समान आहेत. किंबहुना स्त्री पुरूषापेक्षा श्रेष्ठ आहे. असे महत्मा फुले यांनी म्हटले आहे. स्त्री या विश्वाची जननी, जगाची निर्माती, सर्जक आहे. भारतात मातृसत्ता पद्धती होती. बुद्धकाळात स्त्रियांची स्थिती उच्च दर्जाची होती. स्त्रियांच्या विविध कार्यकर्तृत्वाचा, प्रगतीचा, शौर्याचा, विकासाचा, समृद्धीचा इतिहास गौरवशाली आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंच्या इतिहासात तिने आपल्या कर्तबगारीचा ठसा उमठवलेला आहे. अध्यात्मापासून ते विचारवंतापर्यं, कौंटुंबिक जीवनापासून ते रणागणांपर्यंत, समान्यापासून ते राज्यसत्तेपर्यंत कर्तृत्वत गाजवले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आणि देशाच्या सर्व क्षेत्रात, जडण-घडणीत तिचे योगदान मोलाचे आहे. स्त्रिया भक्तीच्या क्षेत्रात उन्नती करून घेतल्या, सेवाभावी संस्थेत कार्यरत राहिल्या. स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्यारणरागिणी होत्या, संगीत, नृत्य, साहित्य कला आदी क्षेत्रात प्रगतीपथावर पोहोचलेल्या होत्या. त्यांच्या सेवेचा, त्यागाचा, समर्पणाचा, सर्वशक्तीचा, गुणांचा, सर्वस्व गौरवाचे दर्शन कालसुसंगत रूपाने घडत आले आहे. स्त्रिया राज्यकर्त्या, क्रांतीकारक, सन्यासनी, पराकृमी, विचारवंत, उत्तम साहित्यिक, प्रशासक होत्या. त्या कोणत्याही काळात, क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कार्यरत राहिल्यात. त्यांच्या कार्याकर्तृत्वाचा आलेख विविध क्षेत्रात विस्तारित गेलेला आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यांनी गुणवत्ता सिद्ध केलेल्या आहेत. या स्त्रियांच्या कर्तृत्वाचा उल्लेख 'गाथा सप्तर्षी, सुक्तीमुक्तावली, आश्वालायन ग्रह्यसूत्र, यज्ञसंगोय, पाणिनी, स्तुतिपाठक, मन्नारूद्रास विलासम, उषापरिणय, भारत सारणम' आदी ग्रंथातून भारतीय थोर स्त्रिया आलेल्या आहेत.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत संस्कृती संवर्धनात आणि संस्कृति रक्षणात स्त्रियांचे योगदान मौलिक आहे. काळाच्या विशाल पटलावर कार्यकर्तृत्वाची क्षितीजे विस्तारित आलेल्या आहेत. त्यामध्ये मातृत्व सर्वश्रेष्ठ आहे. उपनिषेधात, धर्मसुत्रात, महाभारतात, शांतीपर्वत ऋषींनी मातेचा सर्वश्रेष्ठ म्हणून गौरव केला आहे. देवत्वाची प्रथम कल्पना स्त्रियांमध्ये पाहिली गेली आहे. अनेक रूपांत, नामांत आदी रूपाने स्त्रियां पुजलेल्या आहेत. वेदकाळात मातृत्वदेवता, विश्वजननी म्हणून आद्यशक्ती स्त्रिया आहेत. स्त्री ही विशाल हृदयाची, अथांग, सर्वज्ञ आहे. ज्या देशात, संस्कृतीत स्त्रियांचा मान, सनमान, प्रतिष्ठा ठेवली जाते, आदर केला जातो. तिथे देवता रमतात, नांदतात असं म्हटले जाते. एकंदरीत स्त्रियांना सर्वोच्च असे स्थान देण्यात आले आहे.

पुढे कालोघात मातृसत्ताक पद्धती मागे पडून पितृसत्ताक पद्धती आली आणि पुरूषांनी आपल्या बलाच्या जोरावर आदीशक्ती गाजवून स्त्रियांना आपल्या अंकीत ठेवले. तसे नियम तयार केले. त्या नियमात बसवले, जगातील सर्व नियम, धर्मग्रंथ, ग्रंथ परूषांनी बहुसंख्य लिहिले. प्रत्येक्ष क्षेत्रात तिला दुय्यम स्थान दिले. तिला तिच्या अस्तित्वाची, गुणांची, विद्ववत्तेची, शौर्याची विविध क्षेत्रातील कर्तृत्वाची जाणीव होऊ दिली नाही. स्त्रियांचे अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शोषण झाले. या स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान देऊन तिचे स्वतंत्र माणूस म्हणून अस्तित्वच उभे राहू दिले नाही. स्त्रियांना विविध बंधनात, जोखंडात बांधून टाकले. स्त्री ही माणूस आहे म्हणून विचारच केला नाही. तुम्ही माणूस आहात उलट पुरूषांपेक्षा सर्वश्रेष्ठ आहात हे महात्मा फुले यांनी सांगितले. बुद्धाने सर्वश्रेष्ठ स्थान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांच्या हक्काचा जाहिरनामा 'हिंदू कोडबीला'तून मांडला. पुरूषांप्रमाणे स्त्रियांना स्वातंत्र्य दिले. स्त्रिया आणि अस्पृश्यांना गुलाम म्हणून वागवले. याची जाणीव फुले-शाहू-आंबेडकर यांनी करून दिली. मानवाच्या दु:खाचे कारण अज्ञान हे बुद्धाने सांगितले. अविद्या हे कारण महात्मा फुले यांनी सांगितले. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका म्हटले. शिकले, तेव्हा सर्व क्षेत्रात शोषीत अस्पृश्य व स्त्रिया आपले स्थान शोधू लागल्या. अस्पृश्य वर्ग आणि स्त्रिया मोठ्या प्रमाणात शिक्षण घेऊ लागल्या आणि आपले स्वतंत्र अस्तित्व, स्थान प्रत्येक्ष क्षेत्रात शोधू लागले. 'भारतीय संविधाना'ने स्त्रियांना स्वातंत्र दिले. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा, मुक्तीचा, अधिकाराचा,

त्यांच्या हक्काचा, न्यायाचा विचार फुले-शाहू-आंबेडकर यांनी केला. तसे वराहमिहीर, महात्मा बसवेश्वर, चार्वाक यांनीही केला. या महापुरूषांच्या विचारप्रेरणेतून स्त्रियांही मुक्या होत्या त्या बोलू लागल्या. शिकू लागल्या, लिहू लागल्या. अज्ञानापोटी जे दु:खी जीवन वाट्याला आले त्याचा त्या शोध घेऊ लागल्या. या स्त्रियां जीवन जगतांना जीवनात येणाऱ्या प्रसंगांना तोंड देत अनुभव घेत समजून घेत, मार्ग काढत, निरीक्षण करीत आत्मशोध घेऊ लागल्या. आणि त्याही अर्हंत पदापर्यंत जाऊन पोहचलेल्या आहेत. दु:खी जीवनावर विजय मिळवलेल्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेल्या स्त्रिया आहेत.

स्त्रियांच्या वाट्याला आलेले दु:ख हे निसर्ग निर्मित नसून मानवनिर्मित आहे. ते वासना, इच्छा, अपेक्षा आदी तृष्णेतून निर्माण होते, त्यावर विजय मिळवता येतो. आर्य अष्टांगीक मार्गाने मानवी जीवनात परिवर्तन घडवून अणले. मानवी जीवनाला योग्य वळन लावून माणूस सुखी होऊ शकतो. मानवी मनातील विचारांच्या धारणा बदलून टाकण्याचे सामर्थ हे बुद्धतत्वज्ञानात आणि शिक्षणात आहे. विचारात आहे, साहित्यात आहे.

इंग्रज भारतात आल्यानंतर सर्वक्षेत्रात सुधारणा सुरू झाल्या आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधूता, सामाजिक न्याय, वैज्ञानिक दृष्टीकोन, लोकशाही, विवेकवाद या मूल्यांचा प्रभाव भारती व महाराष्ट्रीय समाजजीवनावर पडून अमुलाग्र बदल झाला. तसाच बदल साहित्यातही झाला. एकूण सर्वच क्षेत्राचा चेहरा मोहरा बदलण्यास सुरूवात झाली. मानवी जीवनात परिवर्तन सुरू झाले. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी स्त्रियांचे प्रबोधन केले. स्त्रिया व अस्पृश्य ही जागृत झाले. सर्वांसाठी शिक्षण खुले झाले. सर्वच क्षेत्रातील, विविध स्तरातील स्त्री-पुरूष शिक्षण घेऊन सर्वजन उन्नतीसाठी संघर्ष करू लागले. ज्ञानाचा उपयोग अन्यायमुक्त होण्यासाठी करू लागले तसेच लढण्याची उर्मी आली. शिक्षणामुळे स्त्री-पुरूष जागृत झाले. समानतेचा विचार करू लागले. फुले-आंबेडकरांनी अस्पृश्य आणि स्त्रियांमध्ये स्वाभीमान जागृत केला. विद्यासंपन्न केले. माणूस म्हणून वागवले पाहिजे, माणसाला माणूसपण मिळवून देण्यासाठी संघर्ष करू लागले.

फुले-आंबेडकरी चळवळीने, विचाराने, तत्वज्ञानाने अस्पृश्य समाज व स्त्रियां जागृत झाला, शिकले, बोलू-लिहू लागले. त्यातून फुले-आंबेडकरी साहित्य जन्माला आले. प्रबोधनाचे, परिवर्तनाचे साधनम्हणून साहित्याकडे पाहिले गेले. तसेच स्त्रियां ही परिवर्तनाचे साधन म्हणून साहित्याकडे पाहू लागल्या. लेखण करू लागल्या. आम्हीही माणूस आहोत. माणूस म्हणून आम्हालाही सुखाने जगायचे आहे. सुखासाठी लागणाऱ्या मुलभूत साधनाचे वितरण झाले पाहिजे. स्वातंत्र्याचा अर्थ कळू लागला. लोककल्याणाकारी सत्ता हवी. नवसमाज हवा, तिथे कुणीही कुणाचे शोषण करणार नाही. सर्वांना सुखाने जगता, राहता येणारी एक नवी शोषणरहित समाजव्यवस्था भारतीय संविधानाच्या आधारे लोकशाहीत निर्माण करण्यासाठी स्त्रियां आघाडीवर राहिलेल्या आहेत. आपल्याला माणूसपण मिळावे म्हणून हक्कांसाठी, अधिकारांसाठी घटनात्मक मार्गाने संघर्ष करू लागल्या. सर्व क्षेत्रात माणूसपण अबादित राहिले पाहिजे, अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी साहित्यलेखनाचा वापर करू लागल्या. स्त्रियांमध्ये आत्मभान आले. त्यांना त्यांच्या अस्त्विाची जाणीव झाली. गुलामीविरूद्ध लढण्याला सज्ज झाल्या. साहित्य हे माध्यम, साधन म्हणून उपयोग करू लागल्या. माणूसकीच्या विरोधी असणाऱ्या विरूद्ध लढा देण्याची मानसिकता बनली. राज्यघटनेतील स्त्री-पुरूष समानता, स्वातंत्र्य, सामाजिक-आर्थिक समता, राजकीय, न्याय, प्रतिष्ठा, हक्कासाठी साहित्य साधनाच्या आधारे विचार मांडून अधिकार पदरात पाडून घेत माणूस म्हणून जगण्यासाठी साहित्य लेखन केलेल्या आहेत. साहित्य हे समाज जीवन बदलण्याचे साधन मानले. साहित्य हे सर्वश्रेष्ठ प्रगतीचे साधन, मानले. परिवर्तनाचे शास्त्र मानले आहे. विचारांची देवाण-घेवाण करू लागल्या.

स्त्रियांच्या विचारमंथनातून स्त्री साहित्य जन्माले आहे.

स्त्रीवाद हे स्त्रीमुक्तीचे वाट दाखवते. स्त्रियांचे दु:ख, पोत, वीण, वास्तवता, त्यांचे प्रश्न, दु:ख मांडू लागले. तिला सर्वक्षेत्रात सहभाग मिळावा, माणूस म्हणून वागणारी नवी व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी लेखण केले आहे. साहित्य हे समाजप्रबाधेनाचे, परिवर्तनाचे, विचारमंथनाचे साधन मानले आहे. स्त्री सृजनाचे अंकूर कापण्याचे काम शतकानुशतके केले. त्यास महामानवांनी बदलून टाकले. त्यांनी स्त्रियांना तुम्हीही माणूस आहे. तुम्हाला पुरूषांच्या

बरोबरीने अधिकार मिळाले पाहिजे. सुखाने जगता आले पाहिजे. त्यांच्यात चेतना, जागृत केली. सर्व क्षेत्रात सहभाग अधिकार हवे आहेत. सर्व संघटीतपणे विचार मांडू लागल्या. साहित्याच्या माध्यमातून सर्वांगीण परिवत्रन, बदल घडवून आणणेसाठी साहित्याचे कार्य मानले आहे. स्त्रियांचे साहित्य हे समाजव्यवस्थेची पुनर्मांडणी करण्यासाठी जन्माला आले. साहित्य हे प्रस्थापित व्यवस्थेची पुनर्मांडणी करण्यासाठी लेखनाचा वापर शस्त्रासारखा करू लागल्या. साहित्य हा वैयक्तिक आणि सामाजिक भावभावनच्या, समाजमनाच्या अविष्कार आहे. समाजाच्या गरजेतून वाङ्मय जन्माला येते. स्त्री-पुरूषांच्या मनाची मशागत करण्यासाठी, व्यवस्थेची पुनर्मांडणी करण्यासाठी स्त्री साहित्याचा जन्म झालेला आहे.

भारतातील वरच्या जातीच्या माणसांनी खालच्या शोषित जाती वगाच्या आणि स्त्रीवर्गाच्या माणसांवर राज्य करून त्यांच्या कष्टावर जगत आलेला इतिहास आहे. जागतिकरणाचे परिणाम संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या परिणाम असमान झाले. भारतात चालत आलेलया कालच्या मूलभूत साधनांचे वितरण आसमान पातळीवर केले व तेच पुढे चालू ठेवले. त्यांच्या वितरणाचे निकष वर्ण-जात-लिंग हेच राहिले. तर जागतिक व्यवस्थेत असे सर्व प्रस्थापित निकष रद्दबातल ठरवून माणसांच्या विकासाठी लागणाज्या संसाधनांच्या वितरणाचा प्रश्न त्यांच्या क्षमतांच्या बाजारमूल्यांशी लावला. अर्थात प्रस्थापित पारंपरिक समाजव्यव्थेनी माणसात क्षमता निर्माणसाठीचे मार्गच बंद केले तर क्षमतजांचेच बाजारीकरण घडवून आणले. लोकशाहीवादी भारताच्या उदारमतवादी व्यवस्थनी म्हणजेच जागतीकीरणाने भारताच्या उदारमतवादी राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्वांची अमलबजावणी राष्ट्रीय ससाधनांच्यावितरणात करण्याची हमी दिल्यामुळे या देशातल्या वंचितांच्या पदारात अट्टी फळे पडतात न पडतात तेच जागातिकीरणाने त्यावर डल्ला मारून त्यांच्या शोषणाचा मार्ग सुकर केला. म्हणजे स्वातंत्र्याचा अर्थ कळतो न कळतो तोच पुन्हा पारतंत्र्यात जात असल्याचे अनुभव येत आहेत. मात्र प्राप्त परिस्थितीमुळे पारतंत्र्या वसाहतवादाच्या पारतंत्र्यासारखीच नाही तर त्याचा प्रसासच उपराटा आहे. आधीचे पारतंत्र राजकीय मार्गाने आलेले होते परंतु आताचे पारतंत्र्य आर्थिक मार्गाने आलेले आहे. त्यामुळे आपल्याला राजकीय हक्क अबादित असल्याचा भास होतो. पण तसे तर आले राजकीय हकक केव्हाच

आपल्याहातून निघून ते परकीय आर्थिक शक्तीच्या हातात जात असल्याचे जाणवले त्यातून भारतीयांची शोषणाची जी प्रक्रिया सुरू झाली आहे ती भारताला कडेलोट करणारी आहे. पणभांडवलशाही राष्ट्रांना जास्त मदत करणार आहे." यामध्ये वंचित आणि स्त्रियाही भरडल्या जाणार आहेत.

एकविसाव्या शतकात स्त्रियांचेही शोषण चालूच आहे. थोडसे दोर सैल होत नव्याने आवळले जात आहे. फुले-आंबेडकरी साहित्याच्या प्ररेणेतून स्त्री साहित्यिक अधिक धीट होऊन अभिव्यक्ती करताहेत. शोषण करणारी पारंपारिक मूल्ये नाकारते आहे. आणि भारतीय संविधान निर्मित मूल्ये स्वीकारतेआहे. भारतीय पुरूषांनी तिला निर्धारीत करून शोषण प्रक्रियेत ठेवूनच शोषण करीत राहिले. स्त्रियांकडे पाहण्याचा म्हणावा तसा दृष्टीकोन बदललेला नाही. याचा अनुभव प्रत्येक क्षेत्रात येतो आहे. या काळात स्त्रियां इथली समाजव्यवस्था, पुरूषप्रधान व्यवस्था भारतीय संविधान, निसर्ग नियम, बाईपणाचे अवशेषा स्त्रियांचे प्रत्येक क्षेत्रात बाजारीकरण होणारा व्यापार, तिला मिळणारी प्रतिष्ठा, तिची होणारी घुसमट, घालमेल तिचे करिअर, लैंगिक शोषण, जगात होणारीउलथापालथ, यांसंबंधी होणारी कुचंबना, पेचप्रसंग, बाजारीकरणाचे भान तिला येत जाणारी वैचारिक परिपक्व जमज, बहुसंख्य करून आत्मचरित्रात्मक कविताच अधिक आहेत. या बहुसंख्य कवयित्रीच्या कविता मुक्तछंदाततील आहेत. तसेच फुले-शाहू-आंबेडकरी विचारांशी बांधिलकी ठेवली आहे. स्त्रियांच्या शोषणाची जाणीव तिला घेताहेत. परिवर्तन व व्यवस्था बदलण्याचा निर्धार करणाऱ्या कवयित्री आहेत.

२००० नंतरच्या पन्नास एक कवयित्री या काळात निर्माण झाल्या असतील. त्यामध्ये परिर्वनाची, समतेची, मानवतेची, मानव मुक्तीची भाषा, बोलीभाषा बोलणाऱ्या कवयित्रीच्या कविताचे प्रमाण अल्प आहे. त्यामध्ये प्रामुख्याने प्रभा गणोरकर, मलिता अमर शेख, अनुराधा पाटील, आसावरी काकडे, सिलिवलीया काव्र्हाळे, माया पंडित, नलिता गुंडी, वृषाली किनळका, निरजा, प्रज्ञा पवार, ज्योती लाजेवार, माया पंडित, वैदिका कुमार स्वामी, अनुजा जोशी, मनोज यादव, पद्मरेखा धनकर, मिनाक्षी पाटील, अंजली कुलकर्णी, कल्पना दुधाळ, सुजाता महाजन, वंदना महाजन, संजीवनी तडेगावकर, आश्लेषा महाजन, योगिनी सातारकर, संध्या रंगारी, सारिका उबाळे, रामवली पावसकर, योगीनी यावळ, बालिका ज्ञानदेव, संघमित्रा

खंडाटे, सुचिता खल्लाळ, अर्चना डावकर, स्वाती शिंदे, प्रिया जामकर, सुर्पिया आवाटे, विशाखा, शर्मिला रानडे, शरयू असोरकर, शोभा टोकटे, शामल गरूड, सावित्री जगदाळे, अशा डांगे, मनिषा अतुळ, सुनिता झाडे, माधवी छाया कोरेगावकर, संगीता अटबुने, चैताली अहिरे, रंजन कंधारकर, नीलिमा कुलकर्णी, प्रिया धारूरकर, आयना प्रज्ञा भोसले, माया सबणीस, उषाकिरण आत्राम, यशोधरा गायकवाड, सरिता जांभुळे, पुष्पा कांबळे, ज्योती लांजेवार, अशा थोरात, शांता पवार, प्रभा निकुंभे, लता राजस, प्रतिमा अहिरे, कविता मोरवणकर, उषा हिंगणेकर, कुसूम आलम, विमल गाडेकर, स्मिता नगरकर, उषा अंभोरे, धम्मज्योती शेगोकार, छाया चक्रनारायण, झिंगुबाई बोलके, सुरेखा भगत आदी नावे सांगता येतील. कवयित्रीच्या संख्या वाढतेय परंतु गुणात्मक संख्या कमी आहे. यात प्रभा गणोकर, अणुराधा पाटी, मनिका अमरशेख, माया पंडित, पद्मरेखा धनकर, वेदिका कुमार स्वामी, संध्या रंगारी, प्रज्ञा लोखंडे, हिरा बनसोडे, उषा अंभोरे, उषा किरण अत्राम आदी कवयित्रीचा ठसा उमठलेला आहे. रजनी परळेकर, वासती मुजुमकर, नीरजा, आसावरी काकडे आदी कवयित्रीच्या काव्याच्या ठसा अधिक उमठलेला आहे.

या बहुसंख्य कवयित्रीच्या कवितेतून प्रेमाचे अनुभव, आधुनिक स्त्रियांची घुसमट, पारतंत्री व गुलामीचे अनेकांचे घाव झेलणाऱ्या, मनात खोलवर दबलेली, कठोर, कणखर भाषा स्त्री स्वातंत्र्या, स्त्रीत्वाचे आत्मभान, स्त्रियांच्या करूण कहाण्या, भावकविता, स्त्रियांच्या जाणीवा, एकलेपणाची जाणीव, हिंसक विद्रोह, वेश्यांचे जीवनानुभव, स्त्रीमुक्तीच्या नव्या वाटा शोधणारी स्त्रीमुक्तीची वाट तुडवणारी, स्त्रीमुक्तीची नवी संस्कृती निर्माण करणारी, बाजारी वास्तु, भावनाप्रधानता नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे दु:ख, जन्म-मृत्यूचा शोध, न्याय मागणारी, अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या जातीचे चटके, मनातील तगमग, हालचाल, घालमेल, पुरूषी अरेरावीची शिकार झालेल्या स्त्रिया मानवमुक्तीच्या वाटेवर पाऊले टाकत जाणाऱ्या स्वतंत्र विचार करणाऱ्या स्त्रियांचे अनुभवविश्व विसतरलेले आहे. स्त्रियांच्या साहित्यातून वेदना, विद्रोह, नकार, स्वीकार, आत्मशोध, आत्मभान, आत्मजाणीवा, अभिव्यक्ती अविष्कार, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, अधिकार, हक्क मी बाई नव्हे माणूस आहे, नैसर्गिक व मानवनिर्मित अधिकार, भाषा, प्रतिमा, लैंगिक शोषण, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, साहित्य, जाहिरात, चित्रपट

आदी क्षेत्रात तिचा होणारा वापर, तिच्या अब्रूची काढले जाणारे धिंडवडे, स्त्री-पुरूष समानता आदी अनेक मूल्यांसह त्या प्रकट होताहेत. स्त्रीसाहित्याचा जन्मच शोषणाविरोधी आहे. माणूस म्हणून जगण्यासाठी त्यांनी हाती लेखणी घेतली आहे. लोक हो, या कवितेत हिरा बनसोडे म्हणते,

**लोक हो,**
**मी तुमच्या न्यायालयात**
**फियार्द नोंदवली आहे**
**आता तरी तुम्ही मला न्याय द्याल का?**

हा प्रश्न हिरा बनसोडे यांनी विचारलेला आहे. अजूनही स्त्रियांना माणूस म्हणून वागवले जात नाही. थोडेसे दोर ढिले, सैल होताहेत परंतु अजूनही इथली पुरूषी समाजव्यवस्था तिला माणूस म्हणून नैसर्गिक व मानवनिर्मित अधिकार उपभोगू देत नाही. तिचे शारिरीक, मानसिक, आर्थिक, लैंगिक आदी क्षेत्रात शोषण केले जाते. त्याविरूद्ध आवाज उठवण्यासाठी साहित्य हे समाज प्रबोधनाचे, विचार मांडण्याचे, आणि शोषणमुक्तीचे शस्त्र म्हणून साहित्याकडे पाहिले जाते. नव्हे साहित्य साधनाचा वापर केला जातो. तिचा हा लढा पुरूषी वर्चस्वाविरूद्ध, माणूस म्हणून जगण्यासाठी आहे. स्त्रीमुक्तीची ही चळवळ साहित्याकडे त्यांच्या प्रश्नांचा, समस्यांचा विचार मांडण्याचे साधन म्हणून पाहिले जाते.

प्रभा गणोरकर या कवयित्रीने व्यतीत,विवर्त याकाव्यसंग्रहातून अनेक अंगाने आधुनिक स्त्रियांचे पेच, एकटेपणा, परकेपणा, असुरक्षिता आणिकडेलोटक्षण व्यक्त करते. स्त्रियांच्या अस्वस्थ मानसिकतेचे चित्रण येते, कठोर, कणखर, निर्भिडपणे व्यक्त होते.

आनुराधा पाटीलच्या शुद्धाभावकविता आहेत. वाळूच्या पात्रात मांडलेला खेड २००५ मध्ये प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह एक अभागी स्त्री, अगतिक मनुष्य, जन्म-मृत्यूचा जीवघेणा प्रवास, आणि विविध प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त होणारी अभिव्यक्ती. स्त्रियांचे दु:ख मांडत त्यातून मुक्त होण्याकडे वाटचाल आहे. सिसिलिया कर्व्हालो यांच्या सूर्य किरणांत आला आणि पंख, दारातील रांगोळीचे रंग या काव्यसंग्रहातून स्त्रीवादी संवेदना येतात. आधुनिक संस्कृतीत माणूस दगड झाला. माणुसकीचा गहिवर हरवून बसला, मानवीजीवनाचा व्यवहार हा विनाश, ऱ्हासाकडे जातो. हे मांडले. स्त्रियांच्या

वेदना, कैफियती, आयुष्य वेदनामय प्रवास, अत्याचारवादी पुरूष, हिंसक विद्रोह येतो.

नोरजा कवियित्री स्त्रीगणेशा आणि निरर्थकाचे पक्षी हे दोन काव्यसंग्रह आधुनिकतेच्या वळणार जाणारे आहेत. प्रेमखंड निसर्गवाद व्यक्त होते. प्रेमाचे तत्वज्ञान मांडते. तसेच यातनाच्या महापुरात सापडलेली, अनेक अग्निपरिक्षेतून सामोरी जाणारी, सक्तीने शय्यासोबत करणारी, किचन ते बेडरूमपर्यंत तिची अत्यंयात्रा निघते. हे नाकारून नव्या वाटा शोधणारी, स्त्रीमुक्तीच्या वाटेवर पाऊले टाकणारी कवयित्री आहे.

आसावरी काकडे राहटाला पुन्हा गती दिली मी, स्त्री असण्याचा अर्थ आणि उत्तरार्ध हे कवितासंग्रह आधुनिक वळणाने जाणारे आहेत. स्त्रियांची बदलती मानसिकता, स्त्रीवादी जाणीवात तिचे अनेक रूपे, सोशिकता, नवे स्वाभिमानाचे भान, बाईपण, नाकारणारी, स्त्रीवाद हा विवेकशील आहे, मानवी जीवन अंतहीन प्रवास आहे. जन्म-मृत्यू जीवघेणा आहे. त्यांच्या अंतर्बाह्य विश्वातून स्त्रीमुक्तीचा गाभा अभिव्यक्त होतो.

कविता महाजन तत्पुरष, धुळीचा आवाज, मगजळांचा मासा आदी काव्यसंग्रहातून स्त्रियांवर होणाऱ्या शरिरीक व मानसिक अत्याचाराचे चित्रण येते. पारंपारिक बंधने झुगारणारी आहे. नव्या वाहाहतीला सामोरी जात कोसळत नव्याने उभारत राहते. तसेच मृगजळाच्या प्रवासमध्ये प्रेमाचे तत्वज्ञान मांडते. विविध जाचातून मुक्तीकडे जाते.

ज्योती लांजेवार यांनी 'अजून वारळ उठलेली नाही' या काव्यसंग्रहातून दलित स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरूद्ध अक्रमक होणारी कवयित्री आहे. त्या मनूवादी तत्वज्ञान जाळणारी विद्राही भाषा वापरते. संवर्ण आणि दलित स्त्रियांवर होणारे आत्याचार, बलत्काविरूद्ध लढणारी लढवय्या स्त्री येते. तसेच आधुनिक स्त्रियांचाही बोन्साय होतो. तेही सांगत या शोणमुक्तीच्या वाटेवर पाऊले टाकते. प्रज्ञा पवार ही 'उत्कट जीवघेण्या धगीवर', मी भिडवू पाहतेय सामग्रीशी डोळा, आरपार लयीत प्राणांतिक, दृष्यांचा ढोबळ समुद्र आदी काव्यसंग्रहातून दलितांवर होणारे अन्याय-अत्याचार, आंदोलने, आंबेडकरवाद, सवर्ण व दलित स्त्री केंद्रस्थानी ठेवून मनातील घालमेल, तगमग व्यक्त करते. अन्याय-अत्याचाराविरूद्ध पेटून उठणारी कविता आहे. सर्वांत अर्थाच्या अत्याचाराला बळी पडलेलया अनार्य स्त्रियांचे प्रतिमा वेगळेपणाने येतात.

तसेच भटक्या स्त्रियांचे, मुरळ्या, देवदासी, तमाशातील स्त्रियांचे दु:ख व्यक्त होते. वेदना अभिव्यक्त होतात. अनुजा जोशी उन्हाचे घुमट खांद्यावर काव्यसंग्रहात व्यापक अनुभवविश्व प्रकट करते. समूह संवेदना व्यक्त करते.

पद्मजा धनकर फक्त सैल झाला दोर काव्यसंग्रहात स्त्रियांच्या आत्मशोधाचा विस्तृत पट येतो. स्त्री मानसिकता, भावनिक स्पंदने, प्रस्थापितांची पुरूषी व्यवहार शोषण करतो. तर योजना यादव यांनी मरीमरी जाय सरीर मध्ये देहभुचित्वासंदर्भात रूढ संकेत बदलून जीवनाचे भडक दर्शन घडवले. पुरूषी प्रतिमांचा नवा अविष्कार व्यक्त होतो. स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घोणाऱ्या स्त्रियाच्या कविता आहेत.

अलीकडे सशक्त कविता लिहिणाऱ्या कल्पना दुधाळ, वेदिका कुमारस्वामी, माया पंडित, संध्या रंगारी, प्रिया सासरकर, शामल गरूड, पदृमजा धनकर, वृषाली किन्हाळकर या कवयित्रीच्या कवितेत स्त्रियांचे अनुभवविश्व, पुरूषी व्यवस्था, स्त्री स्वातंत्र्याचे त्यांचे भावविश्व, वैचारिक परिपक्वता, पुरूषप्रधान संस्कृतीची चिकित्सा करणाऱ्या कवयित्री आहेत.

मी पद्मजा धनकर, संध्या रंगारी, मनिषा अमर शेख, प्रज्ञा लोखंडे यांच्या कविताचे संदर्भ अधिक घेऊन विचार मांडलेला आहे.

या स्त्रि कवयित्री या पुरूषप्रधान संस्कृतीतून बाहेर पडून जिथे माणूस म्हणून वागवले जाणाऱ्या नव्या संस्कृतीकडे निर्देश करीत वाटचाल करताहेत. त्यांना आत्मभान आले आहे. त्यांनी इथल्या शोषण करणाऱ्या विचारतत्वज्ञानाचा अभ्यास केला आहे. आपले सामर्थ्य- मर्यादा दाखवून त्यांचा अवकाश शोधताहेत. एक नवे जग निर्मितीकडे जाताहेत. नव्या ज्ञानपर्वाला समोरे जाताहेत. मानवमुक्तीचे तत्वज्ञान नाकारणारी व्यवस्था नाकारतात. पुरूषी सत्ता नाकारतात. मी स्त्री नव्हे माणूस आहे. असे अधोरेखीत करतात. कोणताच संकोच न ठेवता धीटपणाने अभिव्यक्त होताहेत. स्त्रियांच्या विविध भावजीवनाचे चित्र रेखाटतात. व्यापक, प्रगल्भ जीवनानुभव व्यक्त होतो. बाई ते माणूस पर्यंतची अभिव्यक्तीचा प्रवास विविध जाच-बंधनातून मुक्तीकडे जातो आहे. हे स्त्रियांना विष पाजून बळी घेणारे कोणतेही तत्वज्ञान, विचार असो ते नाकारतात आणि जिथे शोषण होणार नाही तिकडे प्रवास करताहेत. कुणाची वाट न पहता त्या निर्भिडपणे मांडत, एक नवीन व्यवस्था निर्मिकडे जात आहेत. विविध शोषणाच्या तऱ्हांमधून

मुक्तीकडे प्रवाह जातो आहे. या भांडवलशाहीत, जागतिकीकरणात नव्याने स्त्रियांचे स्वातंत्र्य गहाण ठेवून शोषणाच्या वाटेवरच्या प्रवास थांबवा लागेल. भारतीय संविधान निर्मित हिंदू कोडबील तिला हवे आहे. माणूस म्हणून जगण्याकडे ही चाललेली वाटचाल, धडपड आहे. आज-उद्या-पुढे-मागे पुन्हा एकदा मातृसत्ताक पद्धती येईल. स्त्रियांचं हे शोषणाचे युग थांबवतील आणि सर्वांना सुखाने जगता-राहता येणारी एक नवी व्यवस्था निर्माण करतील असा अशावाद त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त होतो आहे. बहुसंख्य कवयित्रींना स्वत:चे आत्मभान आले आहे. स्वत: कोण? कोठून आले? कुठे चालले? मला काय करायचे आहे? मला पुरूषाप्रमाणे माणूस म्हणून का मिळत नाही. हे नियम, धर्मग्रथात, साहित्यात कुठे आहे मी? मला चहुकडूनच साखळदंडांनी बाधले गेले आता कुठे फुले-शाहू-आंबेडकर-बसवेश्वर-चार्वाक यांच्यामुळे बोलत आहे. माझ्या पायातील साखदंड तुटताहेत, दोर सैल झाला आहे. मी कोण? माझं अस्तित्व काय? अशी स्वत:ची ओळख शोधू लागली. कुठेच स्वत:चा चेहरा सापडत नाही. कित्येक शतके... पुरूषांच्यासाठीच माझे जीवनसमर्पित करण्यात जीवनाची सार्थकता मानली नव्हे तसेच संस्कार करून माझे शोषण केले. याची तिला जाणीव झाली. तिला महामानवाच्या विचारांमुळे आत्मभान आले. ती सजग झाली. विचार करू लागली. त्यातूनच तिचे अस्तित्व शोधत जाऊ लागली. तिला आत्मभान आहे. आत्मशोध घेते. ती बोलू, लिहू लागली. वाचू लागली. त्यातून तिला आत्मभानआले. त्या सजग, जागृत झालेल्या आहेत. स्त्रीसूक्त मध्ये अश्विनी धोंगडे म्हणतात,

**"मी आहे ब्रम्हांडाची अधीश्वरी**
**जीवंना कर्माचे फळ भोगविणारी,**
**मी सर्व तंत्र स्वतंत्र आहे**
**माझ्यावर कोणाचेही प्रभूत्व नाही.**
**हे अखिल विश्वही माझीच विभूती आहे."**

मी विश्वाची निर्माती असून स्वतंत्र आहे. मी स्वतंत्र आहे. याची जाणीव प्रकट होते. स्त्रियां अस्त्विाचे भान व्यक्त झाले. आता ती डोळयांवर पट्टी बांधून राहणार नाही. तिला दृष्टी आल्याने तिला आत्मभानाचे घुमारे फुटलयाने नवे भान आल्याचे पद्माजा धनकर सांगते. तिच्या मनाची तयारी झाली आहे. यापुढे तू माणूस म्हणून जगावे, रहावे वाटते. कित्येक पिढ्यांपासून चालत

आलेला वेदनेचा खजिना कुठंवर सांभळून याचा काय उपयोग (मलिकाअमर शेख) मी आता माझा,

**"मी माझा अवकाश शोधतेय,**
**मी बांधतेय नवा कोश**
**विनते नव्हे स्वप्न**
**एक नवं जग"** (मलिका अमर शेख)

असे एक जग निर्माण करू इच्छिते की, तिथे स्त्रियांचे कोणतेही शोषण होणार नाही. तिथे पिंजरे नलसतील, भेसूर पासठलाग करणारे चेहरे नसतील, तिथे मला सर्वार्थाने पुन:पुन्हा जगावसं वाटेल. अशी एक नवी व्यवस्था निर्माण करू इच्छिते. एक नवीन वाट निर्माण करते. मला आता सर्वच व्हावे वाटते. याची जाणीव तिला होते आहे. या संस्कृतीच्या कोणत्याही पानावर माझा चेहरा मला सापडत नाही (प्रज्ञा लोखंडे) मी माझे अस्तित्व शोधतेय.

**"बाई शोधतेय तिचा हरवलेला चेहरा**
**बाई शोधतेय तिचं हरवलेलं शरीर**
**बाई शोधतेय तिची फक्त तिची सावली**
**आंतर्बाह्या रिकामी होत**
**बाई शतकानुशत**
**चौकोनी गुन्हेच माप ओलांडते."** (प्रज्ञा लोखंडे)

शतकानुशतके चालत आलेले बाईपण नाकारते. माणूसपणाकडे जाते. सर्व गुन्हे नाकारते. ते मला मान्यच नाही, ते लादलेले आहेत म्हणून नाकारते आहे. तिने इतिहासात स्वत:चे स्थान शोधले. तिथे तिचे अस्तित्व दिसले नसल्याने नाकारण्याचे भान तिला आले आले. कविता मोरवणकर म्हणते...

**"किती दिवस फेडू देयाची देहावरची वस्त्र**
**किती दिवस जळत राहायचं ज्योतीसारखं आतल्या आत**
**आता ही आग बाहेर यायलाच हवी."**

स्त्रीत्वाचा कोंडवाडा तोडून बाहेर पडते. कोंडलेल्या वाटा मोकळया करते. किती दिवस भोगायच्या खाईत जळायचे? याविरूद्ध स्त्री-पुरुषप्रधान व्यवस्थेशी दोन हात संघर्ष करण्यासाठी तयार होते. पुरूषी सत्ताच उलथून देण्याची भाषा करते. मी एक स्त्री नव्हे मी माणूस आहे. असे अधोरेखित करते. कवयित्रीना आत्मभान आले ते तीव्रपणे मांडताहेत.

संध्या रंगारी  यांनी संबंध भारतीय स्त्रियांचे वास्तव मांडताना म्हणते,

**"बाई**
**पहिली प्रायॉरिटी**
**घराला देते**
**घर शाबूत राहतं**
**बाई उद्धवस्त होते."**

दलितत्वाच्या पलिकडे जाऊन संपूर्ण भारतीय स्त्रियांचे दु:ख मांडते...

**"मी सतत**
**कोणाचीतरी कोणीतरी असते मी**
**मी माझी कधीच नसते.** (संध्या रंगारी)

ती स्वत:चे माणूसपण शोधते. स्वत:चे अधिकार, हक्क नाही, याची तिला जाणीव होते.

**"मला स्वतंत्र व्हायचयं**
**अन् स्वायत्तही**
**हे सगळं खरं आहे**
**पण मला पुरूष व्हायचं नाही." (प्रज्ञा लोखंडे)**

स्वतंत्र होयाचे आहे. शोषण करणारा पुरूष होयाचं नाही. याही पुढे जाऊन संध्या रंगारी म्हणते...

**"आता कुठे सुरू झाली आहे अस्मितेची लढाई**
**कळू लागल्यात इथल्या पोकळ संस्कृतीच्या खाणाखुणा**
**समजू लागलेत**
**इथल्या सडक्या मेंदूचे डावपेच"**

ती वेदनाचे वादळ होऊन स्वत:चे अस्तितव शोधते आहे. "कधी तो लाडता येऊन विचारतो, प्रिये तू कोणाची? ती ठामपणे उत्तर देते मी स्वत:चीच." आणि हे स्वत:चे स्वपण, अस्तित्व सांगते. मी माझीच आहे. याची जाणीव झाली आहे. आजपर्यंत पुरूषांची दासी, परक्या घरचे धन हे नाकारले आहे. स्वत:च स्वत:चा उद्धार करून घेण्यासाठी,शोषणमुक्त होण्यासाठी हे शतकानुशतकांचे विष उलथून देते. थोडसं बोलायला लागते.

**"आता आपणच**
**हाती फाळ धराला पाहिजे**

**फिरवला पाहिजे नांगर**
**आपलीच भुई आपण**
**केली पाहिजे सुपीक**
**पेरले पाहिजे देशीय वाण**
**आणि ठेवली पाहिजे तयारी**
**घामाच्या धारावर**
**बारामाही पीक घेण्याची."**
**"या विषवृक्षाच्या मूळया**
**करायच्या समूळ नष्ट**
**करायचे कालिया मर्दन**
**कोण्या अवताराची वाट नको."** (पद्मजा धनकर-फक्त सैल झालय दोर)

शोषण करणाऱ्या विषवृक्षांच्या मूळया पसरत चालल्यात. यातून बाहेर पडणारे मन आहे. करकचून बांधलेले दोर इथे सैल होताहेत. कोंडवाड्यात बाधून, जखडून टाकलेला दोर सैल करते म्हणते,

**"काढायचं मोडून मला**
**शोषणाचं रिंगण**
**स्त्रीत्वाचं शरीर लंणं घेतलय**
**अंभर लपेटून**
**आता मी झाली आहे उभी**
**माझे माणूसपण शोधण्यासाठी." (पद्मजा धनकर)**
**"मला बदलायचं आहे**
**संपूर्ण अभ्यासक्रम**
**चंद्रहाराचं लेणं फेकून**
**पेटायच्याआहेत**
**जागोजागी सूर्य प्रतिमा**
**स्वयंतेजी, स्वयंप्रकाशी." (पद्मजा धनकर)**

संपूर्ण शोषणाचे अवर्तन थांबवायचे आहे. त्यासाठी स्वयंप्रकाशी होते.

**"मला व्हायचं आहे प्रकृती**

**मलाही होयाचं आहे सुजाता**
**पट्टाचारा, उत्पलवर्णा, संघमित्रा**
**मलाही लिहायची आहे थेरीगाथा**
**इसवीसन दोन हजार सहा...** (प्रज्ञा पवार)

स्त्री गाथेतील स्त्रिया जागे झालेल्या आहेत. महाप्रजापतीने स्त्रियांना जागे केले. स्त्रियाही विद्वान आहेत. विलक्षणा आहेत, नव्या ज्ञान पर्वाला आरंभ झाला आहे. अस्मितेची ज्योत चेतवली आहे. ज्ञानसत्ता हस्तगत केल्याशिवाय पर्याय नाही. थेरीगाथेतील स्त्री स्वतंत्र्याचा पहिला उद्गार असल्याने स्त्रिया अर्हंत पदाला जाऊन पोहचलेल्या आहेत. बुद्धकाळात स्त्रियांना सन्मानित केले. स्त्रियांना आत्म उन्नतीचे दारे खुले झाली. त्यामुळे अनेक स्त्रिया निर्वाणपद प्राप्त केलेल्या आहेत. थेरीगाथेतील जगातील पहिले काव्य स्त्रियांनी लिहिले. दु:खातून मुक्त होण्यासाठी, जीवनाची सार्थकता अनुभवातून व्यक्त केली. त्या तटस्थपणे आत्मपरिक्षण केल्या. निरिक्षण केले. स्वयंज्ञानी झाल्या. मानवी जीवनातील दु:खावर विजय मिळविणे अंतिमध्येय आहे. त्याकडे जाण्यासाठी,

**"मी दारात**
**एक नवा सूर्य आणीन**
**जो ज्योतिबांच्या पगडीतून**
**सावित्रीच्या पदराआडून**
**अन् बाबासाहेबांच्या ओठांवरून**
**उगवलेला असेल."**

तिला स्वयंप्रकाशाची वाट दिसलेली, गवलेली आहे. स्त्रियां अनेक तटबंदीतून मुक्त होताहेत. त्यांच्याकडे माणूस म्हणून बघितले जात आहे. स्त्रियांच्या भावजीनाचे चित्र रेखाटले गेले. स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रातील माहिती करून घेतली. अभ्यास केला. हा शोषणाचा अभ्यासक्रम बदलण्याची जाणीव, भाषाच आत्मभान देणारीच आहे. व्यापक प्रगल्भ जीवनानुभवातून आलेल्या कविता हाजारे ग्रंथाना मागे सारकणाऱ्या आहेत. या कवयित्री कोणताच संकोच न ठेवता निर्भिडपणे, स्पष्टपणे बोलातात. त्यांच्या जाणीवांचा पट

विस्तारीत जातो आहे. त्या कवयित्री पारंपरिक आयुष्य नाकरून नवे स्वतंत्र आयुष्य जगण्याची भूमी तयार करायला निघालेल्या आहेत.

कवयित्रीच्या अभिव्यक्तीमुळे त्यांच्या पायातील साखळदंड सैल होताहेत, दोर मोकळे होत आहेत. एका दृष्टीने या जाणीवा वैयक्तिक आत्मचरित्रात्मक असल्या तरी त्या समूह मनाच्या वेदना व्यक्त करणाऱ्या आहेत. सर्व पारंपरिक मापदंड झुगारून देताहेत. बाई नव्हेच माणूस आहोत, हेच मापदंड लावले पाहिजे. बाई ते माणूसपण प्रवास कवितेतून अभिव्यक्त होते.

स्त्रियांचे शोषण करणारे प्रत्येक क्षेत्रातील सत्ता उलथून देण्यासाठी सज्ज झालेल्या आहेत. अलिकडे संध्यारंगारी, पद्मजा धनकर, माया पंडित, कल्पना दुधाळ, प्रिया धारूरकर, योगिणी राऊळ, योगिणी सातारकर आदी अनेक कवयित्रींना आत्मभान आलेले आहे. अत्यंत सजग, प्रगल्भ, विवेकी होऊन लेखन करताहेत. शोषणरहीत नवीन संस्कृती निर्माण करण्यासाठी हाती घेतलेल्या लेखणीला जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत या शोषणाविरोधी लढाई चालूच राहणार आहेत. याची साक्ष या कवित्रीच्या कविता सांगतात.

**संदर्भ :**


१. मातृकथा - उ.कृ.देशपांडे
२. पाली साहित्य का इतिहास - डॉ.भरतसिंह उपाध्याय
३. स्त्रियांचा महान उद्धारक बुद्ध - दिनेश मोरे
४. दलित कवितेली अर्धशकत- महेंद्र भवरे
५. समकालिन मराठी कविता : एक निरीक्षण - प्रका देशपांडे केजकर
६. दलित कवयित्रीची कविता - डॉ. जया विश्वनाथ पाटील
७. महाराष्ट्रातील परिवर्तवादी चळवळ : स्थिती आणि गती - राजीव आरके
८. समकालिन मराठी कविता - पी.विठ्ठल
९. फक्त सैल झालाय दोर - पद्मजा धनकर
१०. माणूसपणाचे भिंग बदलल्यावर - मलिका अमर शेख
११. उत्कंठ जीवघेण्या धगीवर - प्रज्ञा लोखंडे


***

# गावगाड्याचा बदलता अवकाश शब्दबद्ध करणारा काव्यसंग्रह: 'बोलावे ते आम्ही'


## डॉ. सुरेश शिंदे

मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, उदगीर


प्रास्ताविकः

श्रीकांत देशमुख हे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील मौजे राहेरी (बु.) येथील रहिवासी आहेत. शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी आपले बालपण व्यतीत केले. खेड्यातल्या शेतकरी कुटुंबातल्या कोणत्याही मुलाच्या वाट्याला जे अभावग्रस्त जगणं येतं ते त्यांच्याही वाट्याला आले. अशा परिस्थितीमध्ये त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी मराठवाड्यात काही काळ प्राध्यापक म्हणूनही कार्य केले. पुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था या पदावर शासनाच्या सेवेत उच्चश्रेणी अधिकारी म्हणून ते कार्यरत आहेत. सरकारी खात्यात नोकरी करीत असताना सामाजिक संवेदनशीलता जपणे कठीण असते. मुळात ते शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मनाच्या तळातली ओल त्यांनी कमी होऊ दिली नाही. शेती आणि शेतकरी हा त्यांच्या आस्थेचा व जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे साहित्यनिर्मितीबरोबर त्यांनी शेती-मातीशी सर्जनाशी स्वतःला जोडून आपले पाय मातीत घट्टपणे खोलवर रोवून ठेवले.

श्रीकांत देशमुख यांनी आजपर्यंत डझनभर ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यात 'बळीवंत' (१९९७), 'आषाढमाती' (२००३), 'बोलावे ते आम्ही' (२०१३) हे तीन काव्यसंग्रह, 'पडझड वा-याच्या भिंती' (२०१५), 'साखर कारखानदारीतले दादा' (२०१६) हे ललितगद्य, 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ' (१९९७), 'कुळवाडी भूषण शिवराय' हे वैचारिक ग्रंथ तर महानोरांची कविता (२००३), समकालीन साहित्य विचार, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले गौरव ग्रंथ (२०१०),

भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य: नव्या पिढीचे अर्धशतकोत्तर पुरावलोकन (२०१०) हे संपादन कार्य त्यांनी केले. त्यांच्या या साहित्य लेखनामुळे निश्चितच मराठी साहित्यात मोलाची भर पडली आहे. त्यांच्या या लेखनकार्यासाठी साहित्य अकादमी नवी दिल्ली, महाराष्ट्र फाऊंडेशन अमेरिका, महाराष्ट्र शासन तसेच अनेक सामाजिक संस्थांचे मिळून दोन डझन भरतील एवढ्या मोठ्या संख्येने पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुरस्कारामुळे त्यांची किंमत वाढली नसून त्यांच्या साहित्य लेखनामुळे पुरस्कार देणा-या संस्थांना एक प्रकारची सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. एवढे मोठे कार्य त्यांनी आपल्या कसदार गद्य व पद्य लेखनाने केले. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांनी त्यांच्या लेखनाची दखल घेऊन अभ्यासक्रमात समावेश केला. त्यांच्या साहित्यावर संशोधन करून अनेक विद्यार्थ्यांनी एम. फिल व पीएच्. डी. सारख्या पदव्या प्राप्त केल्या. यावरून आपल्याला श्रीकांत देशमुख यांच्या साहित्यविषयक योगदानाची उंची लक्षात येते.

श्रीकांत देशमुख यांच्या ‘बोलावे ते आम्ही’ या काव्यसंग्रहाला भारत सरकारच्या वतीने साहित्य अकादमी नवी दिल्लीचा (२०१७) पुरस्कार प्राप्त झाला. हा पुरस्कार म्हणजे कसदार लेखन करणा-या एका कवीचा सन्मान आहे. त्याचबरोबर शेती मातीवर प्रेम करणा-या शेतक-यांच्या मुलाचाही हा सन्मान आहे, असे मला वाटते. १ जुलै १९९१ नंतर जागतिकीकरणाचे वारे भारतात वाहू लागले. भारतीय अर्थव्यवस्था आपली कूस बदलू लागली. जागतिकीकरणाचे फासे घट्ट बसत चालले आहेत. या सगळयांच्या परिणाम आणि प्रभावातून महाराष्ट्र व भारतातील शेती व ती करणारा शेतकरी राजा उद्ध्वस्त होऊ लागला. सामाजिक अभिसरणामुळे मोठ्या प्रमाणात उलथापालथी घडू लागल्या. लेखक व कवींसाठी हे एक प्रकारचे आव्हान होते. या आव्हानातूनच ‘बोलावे ते आम्ही’ हा शेतीनिष्ठ जीवनाचा आशय प्रकट करणारा काव्यसंग्रह जन्माला आला. पावसाळयात गाजर गवत उगवावे त्याप्रमाणे उदंड असे कवितेचे पीक जन्माला आले. याला छेद देत अत्यंत कसदार, आशययुक्त व सत्त्वशील कविता लिहिली जात होती. या परंपरेत

श्रीकांत देशमुख यांचे नाव आपल्याला आवर्जुन घ्यावे लागते. बहुस्तरीय सांस्कृतिक परिवर्तन पचवीत तर त्याला कधी विरोध करीत जमिनीमध्ये खोलवर पाय घट्ट रोवून उभ्या असलेल्या, शेती मातीवर प्रेम करणा-या भूमिनिष्ठांची वही म्हणजे त्यांची सत्त्वशील कविता होय, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. गावगाड्याचा बदलता अवकाश अतिशय व्यामिश्र स्वरूपात मुठीत घेणारा नव्वदोत्तरी कालखंडातील एक महत्त्वाचा काव्यसंग्रह म्हणून वाङ्मय इतिहासाला नोंद घ्यावी लागेल. कृषिव्यवस्था जखडून टाकणारी, शेती व शेतक-यांना संपविणारी व्यवस्था हा या काव्यसंग्रहाचा केंद्रिभूत विषय आहे. या काव्यसंग्रहात पाच विभाग आहेत. भूमी सावरण्याची गोष्ट, एका गावाची गोष्ट, उजळमाथ्यानं भूमिपुत्र, उजेडाचे मोर व नेणतं झाड अशा पद्धतीने विभागलेल्या एकूण ६८ कवितांचा संग्रह असलेला हा काव्यरूपी गुच्छ आहे. कवीने या संग्रहामध्ये वाचकाचे लक्ष हे खेड्यापाड्यातील मूळ संस्कृती व शेतीनिष्ठ जाणिवांकडे वेधले आहे. संत तुकारामांचा शेतकरी व त्याचा प्रभाव संपूर्ण काव्यसंग्रहावर कविता वाचत असताना जाणवतो. संत तुकाराम व महात्मा जोतीराव फुले यांच्या अभंग व अखंडाशी या कवितेचे जवळचे नाते आहे. कवी लिहितो-

**"बोलावे ते आम्ही आता अबोलणे।**
**एकाचि वचने सकळासि।।**
**मेघवृष्टी काही न विचारी ठाव।**
**जैसा ज्याचा भाव त्याची फळे।।**
**तुका म्हणे नाही समाधाने चाड।**
**आपणाही नाड पुढिलासी।।"**[1]

संत तुकाराम म्हणतात की, आम्ही जे बोलू ते सत्याचा आविष्कार करणारे असेल. आकाशातील ढग ज्याप्रमाणे पावसाचा वर्षाव करतात त्याप्रमाणे आपण आपल्या मनातील भाव किती शुद्ध-अशुद्ध ठेवावयाचा याचा विचार व्यक्तीपरत्वे बदलत असतो. अशा लोकांना समाधान तर लाभत नाही; परंतु ही प्रवृत्ती समाजाच्या दृष्टीने घातक असते. अशा घातकी वृत्तीवर त्यांनी आपल्या

विद्रोही भाषेत घणाघाती हल्ला चढविला. तीच जातकुळी व तोच प्रभाव पचवून शेतकरी, कष्टकरी व शेतमजूर यांची बाजू व त्यांची दुःखे अत्यंत ताकदीने श्रीकांत देशमुख यांची कविता विशद करते. नगरीय आणि महानगरीय जीवन जाणिवा यामधून बाहेर पडून श्रीकांत देशमुख यांची कविता शेती, माती, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व काबाडकष्ट करणारा कुणबी आणि कुणब्याची बायको यांचे जीवन चित्रण करण्यात दंग होते. शेतकरी हा कवीच्या चिंतनाचा कणा आहे. कवी पहिल्या भागात 'भूमी सावरण्याची गोष्ट' मध्ये लिहितो,

**"हाताला आलेली लय कणकण मातीतून**
**की भूमीच्या गर्भाळ हुंकारातून**
**मनाशीच एखादी ओवी गुंफत बाया निंदताहेत**
**भुईची निरी आलटून पालटून उकलत**
**गर्भारणीला द्यावा अलगद अंकुरण्याला होकार**
**अगणित बाया मातीसोबत माती होताहेत"[2]**

कष्टकरी स्त्रीचे रूप कवीने याठिकाणी व्यक्त केले आहे. कणकण, हुंकार गुंफत, निरी व अंकुरणे हे शब्द स्त्रीच्या सोशिकपणाचे द्योतक आहेत. कष्टकरी माणसाच्या आयुष्यातील वर्षच्या वर्षे संपून जातात तरीही जमिनीतील लव्हाळा व कुंदा मरत नाही. हरळी पुन्हा हिरवीगार होऊन डोके वर काढते. माणसांच्या हाडामासाची माती होते. आयुष्य संपत चाललेल्या काळाचा पदर कमरेला खोवून बायका काळ्या मातीत आपली काया झिजवून संपतात. तरीही त्यांच्या आयुष्यातील अंधार व दारिद्र्य संपत नाही. यासंदर्भात सुप्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार लिहितात, "श्रीकांत देशमुख ह्यांची कविता आणि त्यांचे एकूणच लेखन वाचताना प्रथम लक्षात येते की, आता मराठी साहित्यव्यवहाराचे केंद्र महानगरातून लहान गावांकडे वळले आहे. श्रीकांतची कविता त्यांच्या गाव-जमिनीत इतकी खोल मुळे रोवून आहे की, तिला कुठेही कापले तर तिला नवे धुमारे सरसरून फुटतील. ही जमीन रक्त, घाम, अश्रू, दैन्य ह्यांनी सिंचिलेली आहे. ह्या कवितेचे विलक्षण जिवंतपण,

जगलेल्या, भोगलेल्या जगण्यातून आलेले आहे. ह्या कवितेत वारंवार निसर्ग भेटतो, कवीचे त्याच्याशी असलेले आतड्याचे नाते ह्या कवितांमधल्या शब्दांमागे कायम स्पंदत असते. तरीही कवितांमध्ये केंद्रस्थानी आहे माणूसच. कष्टणारा, उन्हामध्ये कोळपणारा, मन भंगत असताना जिवटपणे आयुष्याचे ओझे उलचणारा ह्या झळा सोसत असतानाही मनातील उदंड माया आटू न देणारा. येथे निसर्ग आणि माणूस ह्या स्वतंत्र गोष्टी नाहीतच. त्या एकच आहेत. ह्या कविता भाष्य नाहीत वा निरीक्षणेही नाहीत. जगल्या-भोगल्याचा तो अर्क आहे. कवीच्या मनातली माया, त्याचे सतत प्रेम करणारे कातर मन ह्याठिकाणी कायम भेटत राहते आणि आपल्यामध्येच कोवळीक निर्माण करते."[3] एलकुंचवारांनी श्रीकांत देशमुख यांच्या कवितेवर केलेले भाष्य चिंतनशील व मूलगामी स्वरूपाचे आहे. महानगरात राहणा-या कवीची मनःस्थिती द्विधा स्वरूपाची दिसून येते. शेती माती हा त्याचा श्वास आहे असे जाणवते. या काव्यसंग्रहाच्या दुस-या भागात कवी एका गावाची गोष्ट सांगतो. शेतकरी रात्रंदिवस शेतात राबराब राबतो तरीही त्याच्या डोक्यावरील कर्जाचे ओझे कमी होत नाही. गावात जेव्हा कर्ज वसूल करण्यासाठी वसुली अधिकारी येतात तेव्हा हे लोक सकाळीच शेतावर पळून जातात. याबाबत कवी लिहितो,

**"कर्जाच्या वसुलीसाठी लोक येणार आहेत**
**ही गोष्ट एका गावाला कळते**
**तेव्हा अधिकारी येण्यापूर्वीच**
**प्रत्येक घराला कुलूप लागलेलं असतं**
**ती वेळही एका सकाळचीच असते."[4]**

अशी दयनीय अवस्था चित्रित करताना कवीच्या काळजाचे पाणी होते. मन अस्वस्थ होते. 'उजळमाथ्यानं' भूमिपुत्र' या तिस-या भागात कवी लिहितो, मातीपासून दुस-या पिढीचा देह परका होऊ नये म्हणून शेतकरी लहान मुलाला शेतावर घेऊन जातो. पण त्याठिकाणी उंदराच्या भीतीपोटी तो रात्रभर खुर्चीत बसून खुर्चीतच कसा झोपतो याचे तपशील सांगतो. त्या मुलाचा बाप जंगलात, रानावनात भटकतो मात्र मुलाला त्याची जाणीव राहत

नाही. जागतिकीकरणाचा संदर्भ असलेली ही कविता मूळ मातीपासून नवी पिढी तुटत चालल्याची जाणीव करून देते. 'उजेडाचे मोर' या चौथ्या भागात कवी पूर्वजाची आठवण काढतो. माझा शेतकरी शतकानुशतके आहे त्या अवस्थेत कसा राहतो, जगतो याची आठवण करून देतो.

**"उजेडाचे मोर आता येतील नाचत**
**डोंगराआडून**
**मी थकून बसेल कवटाळून**
**सर्वांगावर मातीचा थर"[5]**

या कवितेत कवीने शेतक-यांच्या दारिद्र्याची आठवण करून दिली आहे. अठराविश्व दारिद्र्य घेऊन जगणारा शेतकरी सुखी कधी होणार हा प्रश्न कवीला सतत अस्वस्थ करतो. 'नेणतं झाड' या पाचव्या भागात कवी श्रीकांत देशमुख संत तुकोबा व जोतीबा यांच्या कणखरपणाची आठवण करून देतात. कवी संत तुकाराम व महात्मा जोतीराव फुले यांनी शेतकरी व कष्टकरी वर्गाची घेतलेली बाजू समोर आणतो.

**"असे किती उन्हाळे पावसाळे तू पाहिलेस**
**तुझी कातडी आजही एवढी निरभ्र**
**उन्हाळी राखाडीपण साठलेलं पापण्यांच्या आसपास**
**कायम दुष्काळी प्रदेशासारखे तुझे डोळे"[6]**

शेतक-यांच्या जीवनात कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ कायमची पाठराखण करतो. पाचवीला पुजलेलं दुःख कधीही पाठ सोडायला तयार नाही. दुःख संपत नाही. अंधारही नष्ट होत नाही. दारिद्र्य शेतक-यांच्या घरात कायमचे वास करून आहे. याची जाणीव शब्दाशब्दातून वाचकाला करून देतो. म्हणून तो म्हणतो, दुःख असंच गद्यप्राय असतं. त्याला चाल लावता येत नाही की जात्याच्या पाळूवर बसून गाता येत नाही. पुनःपुन्हा दुःखाची गाणी म्हणण्यात काय अर्थ आहे. मनात गाळ असून वेदनांना उगाळण्यात अर्थ नाही. संत तुकाराम, महात्मा जोतीराव फुले व सानेगुरूजी यांच्या आदर्शांना समोर ठेवून शेतक-यांच्या कष्टाची गाथा सांगणारी ही कविता आहे.

**सारांशः**

श्रीकांत देशमुख यांच्या कविता भूदृश्ये आणि संस्कृती यातील बदल टिपणा-या असल्यामुळे त्या त्या संदर्भात महत्त्वाच्या ठरत गेल्या आहेत. ही भूदृश्ये अचल नसतात. तर ती हालचाल करणारी असतात. संस्कृती विशिष्ट अशी गतिमानता त्यामध्ये असते. सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक विश्वाशी आपली निष्ठा स्वाभिमानपूर्वक मिरविणारी पात्रे त्यांच्या प्रत्येक कवितेत दिसतात. त्यांच्या कवितेला इथल्या शेणामातीचा व शेतक-यांच्या कष्टाचा वास आहे. उंदरा-कोल्ह्यानं पिकांचा हंगाम नष्ट करू नये म्हणून शेतकरी राजा डोळ्यात तेल घालून पहारा करतो. पण त्याची पुढील पिढी या मातीपासून दूर जात आहे. हा विचारही या काव्यसंग्रहाने सूचकपणे आविष्कृत केला आहे. श्रीकांत देशमुख यांना भाषेचे अचूक असे ज्ञान व भानही आहे. त्यामुळे त्यांची कविता देशीवादी परंपरेला जोडत पुढे जाते. महानुभाव, संतांचा, शाहिरांचा, लोकपरंपरेचा व इथल्या गावगाड्याचा वारसा जपत एक ऋणानुबंध जोडते. त्यांच्या कवितेतील प्रतिके, प्रतिमा, शब्दकळा व शैली लोकपरंपरेचा विचार बिंबविणारी आहेत. श्रीकांत देशमुख यांना हे भान असल्यामुळे ते या भू-दृश्यांना नेमकेपणाने बोलके करतात.

**संदर्भसूची:**

१) देशमुख श्रीकांत: 'बोलावे ते आम्ही', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी 2018, उपोद्घातातून उद्धृत
२) तत्रैव: उ.नि., पृ.२
३) एलकुंचवार, महेश: 'बोलावे ते आम्ही', पाठराखण मधून उद्धृत
४) देशमुख, श्रीकांत: उ.नि., पृ.३२
५) तत्रैव: उ.नि., पृ.९२
६) तत्रैव: उ.नि., पृ.११३

***

# सामाजिक समतेचा पुस्कार करणारा काव्यसंग्रह आरंभबिंदू


## प्रा. डॉ. पंजाब शेरे

मराठी विभागप्रमुख, बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट


विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आंबेडकरवादी साहित्यिक लिहू लागला. अन्याय, अत्याचाराला वाचा फोडू लागला. सामाजिक समता निर्माण करण्यासाठी बुध्द, फुले, शाहू, आंबेडकरी क्रांतीमय विचाराची पेरणी करु लागला. 'स्व' अस्तित्वाची जाणीव करून देऊ लागला.समाजातील वाईट रुढी परंपरा, कर्मकांड, अंधश्रद्धा नष्ट व्हाव्या यासाठी आपल्या लेखनातून  प्रखर विचार मांडू लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथांग परिश्रमाने सर्व बहुजनांचे कल्याण झाले आहे. आंबेडकरी लेखक, कवी त्यांचा समतावादी विचार समाजात पेरत आहेत.

जेष्ठ कवी नामदेव ढसाळ, दया पवार, योगीराज वाघमारे, यशवंत मनोहर, महेंद्र भवरे, भुजंग मेश्राम, रविचंद्र हडसनकर, सागर जाधव, अनंत राऊत, चंद्रकांत वानखेडे, प्रकाश मोगले, प्रतिमा अहिरे, संध्या रंगारी, सुनिता बोर्डे, अमर रामटेके, केतन पिपळापुरे, अशोक इंगळे अशा अनेक कवींनी दलित जाणिवा व्यक्त केलेल्या आहेत. दलित जाणीवा घेऊन सामाजिक समतेचा 'आरंभबिंदू' च्या रुपाने अजय खडसे यांनी साहित्यक्षेत्रात पहिला काव्यसंग्रह प्रकाशित करुन पदार्पण केले आहे.दलित साहित्य हे मानवी अस्मिता व्यक्त करुन आंबेडकरी विचारांचे क्रांतीचे वादळ निर्माण करणारे आहे. समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय ही मूल्य समाजात पेरण्यासाठी कथा, कविता, कांदबरी, आत्मचरित्र, आत्मकथन या साहित्यप्रवाहातून विद्रोही, नकारात्मक, संवेदना मांडत आहेत. कवितेतून  सामाजिक संवेदना व्यक्त होत आहेत. दलित कविता ही दलित कवीने स्पष्ट केलेली अस्मिता आहे. "ही सारी कविता

बांधिलकीची कविता आहे. हे कवी आपल्या समाजाशी बांधील आहेत. या समाजाचा अन्यायाविरुद्ध, अमानुषतेविरुध्द, शोषणाविरुध्द, आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी जो लढा चाललेला आहे त्यामधील एक हत्यार म्हणून या कवितेचा वापर अधिक केला जात आहे "१

अजय खडसे यांनी 'आरंभबिंदू'या काव्यसंग्रहातून समतावादी विचाराची क्रांतीची मशाल शब्दातून पेटवली आहे. बुध्द, फुले, शाहू, आंबेडकर, साठे व सर्वच महापुरुषांच्या विचारांचे आचरण केल्याशिवाय प्रगती साधता येणार नाही म्हणून कवी अजय खडसे म्हणतात

**"पिंपळ म्हणजे**
**न पेरताच**
**उगवणारा वृक्ष**
**बुद्धाच्या बुध्दिप्रामाण्यावरच**
**त्याची पटून जाते साक्ष"२**

विश्वातील पहिले वैज्ञानिक शास्त्रज्ञ तथागत गौतम बुद्ध आहेत. तथगाथाचा बुध्दधम्म हा विज्ञानावर आधारित आहे. याची साक्ष आपणास मिळते. त्यांचा धम्म विचार बुद्धीप्रामाण्यवादी आहे. धम्म हा समतेचा मार्ग आहे.

खरे, खोटे यांची जाणीव करून देणारा आहे.आम्ही समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावेत. परंतू येथे जी वादळे निर्माण झालीत ती शांत करावी यासाठी आयुष्यभर झगडावे. या संदर्भाने कवी अजय खडसे आरंभबिंदू या काव्यसंग्रहात असे म्हणतात.

**" जिथ होकायंत्रच दिशाहीन झालं.**
**तिथ वादळ काय करणार?**
**कुणाच्याही वेदनेसाठी**
**फक्त आयुष्यभर झुरणार....**

महापुरुषाची समतावादी विचारांची पताका खांद्यावर घेऊन
"मार्कस, लेनिन, बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर, चार्वाक, तुकाराम आदी तमाम विचारवंतांचे विचार कोळून पितोय

अनादिकालापासून.. "३

या महापुरुषांच्या कार्यातून उर्जा घेऊन जीवनाची उभारणी करीत आहे. समतेचे, एकतेचे कवन रचित आहे. कविता, कल्पनेला भावविश्वात रमवायंचे नाही तर मानवी संवेदना, गावकुसाबाहेरील दुःख मांडून सावरणे आहे. ही जाणीव कवी व्यक्त करतो.

**"कवितेला हुडकायचा आहे**
**पाताळपाण्याचा आरंभबिंदू**
**आदिवासी कुपोषित बालकाचा**
**कोरा करकरीत भानहीन मेंदू"४**

वंचित, गावकुसाबाहेरील घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरंभबिंदू घडविणार आहे. हे कार्य करीत असतांना

**"माझ्या विकासात जे-जे घालतात खोडा.**
**अशा व्यवस्था -परंपरेला**
**लावला पाहिजे घोडा."..! ५**

कवी येथे व्यवस्था परिवर्तन घडवून आणण्यासाठी विद्रोह व्यक्त करतो. कट, कपट रचून कमी लेखणा-या जातीयवादी व्यवस्थेवर प्रहार करतो.जातीमुळे हीन समजून पराजय करणा-या प्रवृत्ती संदर्भात.कवी विद्रोहाची भावना व्यक्त करतो.

**"काही तरी करू**
**म्हणतो अजय**
**होतो पराजय**
**जातीमुळे".६**

जिथे जय होतो पंरतु जातीमुळे पराजय पचवावे लागते. ही जात नाही ती जात अनेक चटके देऊन जाते. ही चिंताजनक बाब कवी खेदाने मांडतो.

**'विनम्रपणे नमस्कार करतो**
**तर तो लाल दिव्याच्या गाडीतून**
**हात उंचावतो."७**

आम्ही नम्रपणे समजुन घेतो तो लालदिव्याच्या गाडीतून नुसता हात उंचावत जातो. माणूसपण नाकार-या व्यक्तीचे वास्तव मांडतो.

**"पृथ्वी फिरत असते म्हणतात**
**गावकुसाबाहेर**
**पश्चिमेला असलेलं माझ घर**
**पूर्वेकडल्या मध्यवस्तीत**
**आलेलं**
**मी तरी अद्याप पाहिलेलं नाही."८..**

गावकुसाबाहेरील जगणं किती दाहक होते यांचे वास्तव चित्रण केले आहे.

**"इंथ जगतानी माह्या जीव तियं -    तियं तुटे**
**रोज कष्टाची भाकर पाखरं यिऊन लुटे"९**

गोर गरीबांना लुटणा-या व्यवस्थे विरुद्ध आवाज उठवण्यासाठी संघटन करावे. एक दुस-यांचे सुख- दुःख  समजून घ्यावे. येथे कष्ट करणारा उपासी व ऐदी तुपासी खात आहे ही खंत व्यक्त होते.

**"तुला कळायला हवे**
**माझ्या काळजाचे भोग**
**सा-या व्याधीत जहाल**
**असे एक चिंतारोग."१०**

व्यवस्थेने छळ केला. जीवन जगणे असह्य केले. माणूस असून माणंसाप्रमाणे जगू दिले जात नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन अनेक व्याधीना सामोरे जावे लागते व चिंतित होऊन जगावे लागते. माणूस परंपरेला सोडुन जगत नाही ही खंत कवी येथे व्यक्त करतो.

**"एकीकडे सारंच मी**
**परपरेन करतो अन दुसरीकडे**
**चळवळीतून बौध्दमय भारतासाठी लढतोय"११**

परंपरेला नाकारून समतेसाठी निष्ठेने एक व्हावे.बौध्दसंस्कारातून जीवन घडवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते 'संपूर्ण भारत बौध्दमय करेन' हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत असे कवी सूचित करतो.

**"कालबाह्य व्हावी**
**इथे गावकुस**
**समतेची वेस**
**जोपासावी "१२**

गावकुसे आता नष्ट व्हावी.

सर्वांनी समतेची वेस जोपासावी यातच मानवाचे कल्याण आहे.

**"माझ्या मेंदूचा रिमोट बुद्धाच्या**
**तर काळीज तुझ्या हाती आहे**
**म्हणुन बरे आहे**
**अन्यथा आखीव -रेखीव**
**बांध्याच्या उंच -सखल प्रदेशात**
**मी फसलो असतो निमिषार्धात"१३**

बुध्द विचाराने वैज्ञानिक दृष्टी लाभली. वास्तव, सत्य कळू लागले. कर्मकांड, अंधश्रध्देत अडकुन न रहात वास्तव जीवन लक्षात आले.

**"बाबासाहेबांचं धर्मांतर म्हणजे**
**मन्वंतर होत'**
**असं विचारवंत म्हणतात**
**अन ते खरं आहे**
**म्हणून मला रहायला**
**झोपडीऐवजी घर आहे."१४**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे लाखो बांधवांना बौध्द धम्माची दीक्षा देऊन नवा जन्म दिला आहे. माणसात स्वाभिमान पेरला आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेली गुलामगिरी त्या धम्मक्रांतीने संपवली आहे. म्हणून आज आम्ही सुखी जीवन जगत आहोत. शैक्षणिक, सामाजिक,

राजकीय, हक्क भारतीय संविधानाने दिले आहे म्हणून आज झोपडीतला माणूस बंगल्यात राहत आहे. ही सर्व देणं बाबासाहेबांची आहे.

**"बहुजनाविषयी कळवळा असणारे सर**
**सदोदित पितात**
**इंपोर्टेड बिस्लेरीचे पाणी..**
**अन फाईव्ह स्टारमध्ये हादडून**
**गातात चळवळीची गाणी.".१५**

बहुजन कार्यकर्त्या विषयी ही कवी खंत व्यक्त करतो. हे खरे आहे. आपण विचार करावे. कवी जे दिसते ते मांडतो आहे.

"दलित कविता ही एकीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मूल्यांवर श्रध्दा ठेवणारी, तर दुसरीकडे आंबेडकरांचा विचार विसरलेल्या व आत्मकेंद्री बनलेल्या दलित माणसांची चिकित्सा करणारी आहे. दलित सवर्ण यांच्यातील हेवेदावे ती प्रखरपणे मांडते व दलितांमधील अंतर्गत कलह, विरोध ती लपवून ठेवत नाही. साठोत्तरी मराठी दलित कवितेपेक्षा, नव्वदोतरी दलित कविता अधिक निर्भीडपणे रसिकांसमोर येते. कुणाचीही तमा न बाळगता जे सत्य आहे,जे वास्तव आहे, जे नवे आहे, ते ती मांडते. दैववाद, मनुवाद, ब्राम्हणवाद, चंगळवाद इ. वर हल्ले करुन ती मानवतावाद, समतावाद, प्रयत्नवाद प्रभावीपणे रुजविते. म्हणून या काळातील कविता वेगळी आहे. "१६

आज स्टेजवरुन समतेचे गाणे गायाचे व स्टेजवरून उतरताच मोठ्या हा ॅटेलात जायंचे ही भुमिका बदलून बहुजन समाजातील विकासासाठी पुढे यावे.बुध्द विचार आचरण करावे.

**"डोक्यात तयांच्या**
**बुध्दाचा विचार**
**निर्बुद्ध आचार**
**व्यवहारी.."१७**

जो व्यक्ती बुध्द विचार अचरण करतो. तो कधीच अव्यवहारी वागत नाही.

**'माझ्या कवितेत**

**आत्म -अनुभूती**
**कशी पाळू भीती**
**अस्तित्वाची."...१८**

कवी म्हणतो माझ्या कविता अस्तित्वाची जाणीव करून देणारी आहे.

**"आता शिरजोरीवर**
**आहे आमची नजर**
**ओठाओठांवर आहे**
**भीम बुद्धाचा गजर "१९**

आमच्या जीवनाचे सोनं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. तथागत गौतम बुद्ध यांचे विचार, आचार दिले.परंपरेला नाकारून बौध्द धम्माची दीक्षा देऊन नवा जन्म दिला.समतावादी विचारांतून सम्यक क्रांतीची मशाल जागविण्यासाठी बुध्द, भीम यांचा विचाराचे गजर करण्यासाठी कवी इच्छा व्यक्त करतो.पुढे जातीयता नष्ट करुन समतावादी विचारांची पेरणी करण्यासाठी ,समतेने नांदण्यासाठी आरंभ करावे असे कवी सूचित करतात.

**"शुक्राणू असतात आरंभबिंदू**
**माणसांच्या आयुष्याचे**
**आसक्त, अनावर शुक्राणू**
**खोल दरीत कोसळतात धबधब्यासारखे**
**काहींची दरीत अल्पकाळ विलीन होण्याची**
**असते आकांक्षा**
**तर काहींच्या**
**विस्तीर्ण होण्याच्या असतात अपेक्षा.."२०..**

ही अतिशय चिंतनशील रंचनेतून वास्तव कथन केले आहे. मानवी समता प्रस्थापित करण्यासाठी आरंभ करावे. कवी अजय खडसे यांचा 'आरंभबिंदू' हा पहिला काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहात एकुण बाव्वन्न कविता आहेत. साहित्याक्षर प्रकाशन संगमनेर येथुन प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहास प्रसिद्ध विचारवंत, कवी महेंद्र भवरे यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. अजय खडसेंची सर्वस्पर्शी कविता आहे असे अभ्यासपूर्ण विवेचन प्रसिद्ध विचारवंत अशोक थोरात, पुणे यांनी केले आहे.

अजय खडसे यांच्या या काव्यसंग्रहातील कवितेत समतेचे विचार महत्वपूर्ण आहेत. मानवी संवेदना या काव्यसंग्रहातील कवितेतून व्यक्त होते. समतावादी दृष्टी ठेवून काम करीत राहवे. महापुरुषांच्या क्रांतिकारी विचार मानव कल्याणासाठी उपयोगात आणणे गरजेचे आहे. बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक परिवर्तन कवीने स्पष्टपणे मांडले आहे.

त्यांना खुप खुप शुभेच्छा

**संदर्भ** :


१) म.सू.पाटील,दलित कविता व दलित साहित्याचे सौदर्यशास्त्र,२०१०,पृष्ठ. ९७.

२) अजय खडसे, आरंभबिंदू, साहित्याक्षार प्रकाशन, संगमनेर, प्रथमावृत्ती २०२१.पृष्ठ ५७

३) तत्रैव, ४४ ४) तत्रैव, ४५ ५) तत्रैव, ४७

६) तत्रैव, ५१ ७) तत्रैव, ५२ ८) तत्रैव, ५५

९) तत्रैव, ६० १०) तत्रैव, ६१ ११) तत्रैव, ६७

१२) तत्रैव, ७१ १३) तत्रैव, ७३ १४) तत्रैव, ७६

१५) तत्रैव, ७८

१६) डॉ. संगीता घुगे, डॉ. शंकर विभूती, संपादक, नव्वदोत्तरी मराठी कविता ,प्रकाशन यशवंत महाविद्यालय,नांदेड.२०१७, पृष्ठ- १७४

१७) अजय खडसे, आरंभबिंदू, साहित्याक्षर प्रकाशन, संगमनेर प्रथमावृत्ती २०२१,पृष्ठ ८१

१८)तत्रैव, ८५

१९) तत्रैव, ८९

२०) तत्रैव ,६६


***

# विषमतेविरूद्ध बंड पुकारणारी कविता: 'आता क्रांती दूर नाही'


## प्रा. डॉ. संतोष चंपती हंकारे

मराठी विभाग प्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता.गंगाखेड जि.परभणी


डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून जागृत झालेल्या अनेक साहित्यिकांच्या लेखणीतून खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी कवितेचा उदय झालेला दिसतो इ.स. २००० नंतरच्या आंबेडकरवादी मराठी कवितेचे स्वरूप पाहता आपल्या असे लक्षात येते की, आंबेडकरी चळवळीच्या सातत्यपूर्ण प्रबोधन प्रक्रियेमुळे मूळचे जन्म दलित असलेल्या आणि जन्माने दलित नसलेल्या अनेक कवी आणि लेखकांचे प्रबोधन झाले आणि त्यातुनच आंबेडकरी चळवळीच्या संपर्कात आलेल्या अनेक कवी लेखकांना खऱ्या अर्थाने आत्मभान आले. त्यातूनच ते आपल्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा शोध घेऊ लागले. प्रस्थापितांनी स्वतःच्या स्वार्थासाठी निर्माण केलेल्या धूर्त आशा शोषणव्यवस्थेची ते चिकित्सा करू लागलेले.तिला प्रश्न विचारू लागले. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भूमिका घेऊन बंड करू लागले. बुद्धिवादला विज्ञानवादाची जोड देऊन आपल्या काव्य लेखनातून परखडपणे आंबेडकरवाद मांडू लागले. २००० नंतर मराठी कवितेमध्ये उदयाला आलेल्या अनेक आंबेडकरवादी मराठी कवींनी आपल्या काव्यलेखनाच्या माध्यमातून मराठी साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भगवान पाटील -न्याय चक्र ,कैलास भाले- ग्रहण मुक्त, सर्जेराव चव्हाण -आपण गाफील राहिलो तर , युवराज सोनटक्के -अग्नि शाळा, प्रकाश मोगले -युद्ध अटळ आहे ,गंगाधर ढवळे-अग्निध्वज, आनंद इंजेगावकर-आता क्रांती दूर नाही, अनंत राऊत - अनंताची अभंगवाणी, दुर्गानंद वाळवंटे -माणुसकीचा सातबारा, संध्या रंगारी -संध्यारंग असेही काही महत्त्वाचे कवी आहेत या सर्वच कवींनी प्रस्थापित व्यवस्थेला छेद देत आंबेडकरवादी मराठी कवितेत मोलाची भर टाकली आहे. पण प्रस्तुत शोधनिबंधात डॉक्टर आनंद इंजेगावकर यांच्या'आता क्रांती दूर नाही' या काव्यसंग्रहाच्या अनुषंगाने चर्चा केली आहे.

इसवी सन २००० नंतर आंबेडकरी विचाराने आणि बुद्ध तत्त्वज्ञानाने प्रेरित झालेले कवी म्हणून आनंद इंजेगावकर यांची ओळख आहे.मूलनिवासी बहुजन चळवळीचे ते एक सच्चे कार्यकर्ता कवी आहेत. एक बंडखोर वृत्तीचा

कृतिशील विचारवंत कार्यकर्ता कवी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. 'आता क्रांती दूर नाही' या पहिल्याच कवितासंग्रहाच्या माध्यमातून मराठी साहित्यात त्यांनी  पदार्पण केले आहे. ओठात एक आणि पोटात एक न ठेवता आपल्याला जे वाटतं ते स्पष्टपणे बोलून दाखवणं आणि शोषण व्यवस्थेच्या विरुद्ध आवाज उठवणं असं त्यांचं रोखठोक निर्भीड आणि तेवढेच स्पष्ट व्यक्तिमत्व आहे. त्यांचे 'आता क्रांती दूर नाही', 'तिसऱ्या महायुद्धाची तयारी', हे दोन कवितासंग्रह असून 'मराठीतील बंडखोर कविता :नवा शोध',स्त्रीमुक्तीच्या युद्धकथा हे दोन समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या ग्रंथांची संख्या अल्प असली तरी त्या ग्रंथांची नावे जर आपण सहज आपल्या डोळयाखालून घातली तर हे ग्रंथ किती महत्वाचे आहेत हे आपल्या सहजपणे लक्षात येते.आणि त्या सर्व ग्रंथाच्या शीर्षकावरूनच ग्रंथ वाचनाची वाचकांना उत्सुकता लागते.या ग्रंथाच्या शीर्षकावरून आपणास त्यांचा समाजाकडे पाहण्याचा आणि साहित्यनिर्मितीचा एक विशिष्ट असा वेगळा दृष्टिकोण जाणवतो.आपल्या साहित्यनिर्मितीची भूमिका व्यक्त करताना ते आपल्या मनोगतात म्हणतात."माझी कविता बंद खोलीत जन्माला आलेली बंदिस्त कविता नाही तर जीवनाच्या रणांगणात जन्माला आलेली ही कविता आहे. बुद्ध फुले शाहू आंबेडकर विचारधारा आणि भारतीय संविधान ही माझ्या कवितेची प्रेरणा आहे; तर  जिजाऊ,अहिल्या, सावित्री ,फातेमा, माता रमाई ही आराध्य स्थळ आहेत. पुरोगामी महापुरुषांच्या आणि महान स्त्रीरत्नांच्या विचारधारेवरील कवी मनाचे चिंतन येथे काव्यरूपाने साकारले आहे."आशी ते आपल्या काव्यलेखन निर्मितीच्या संदर्भात आपली भूमिका मांडतात. 'आता क्रांती दूर नाही' या काव्यसंग्रहातील समग्र कविता ही सामाजिक भान असलेली आणि अनेकांना माणूस म्हणून आपले काय कर्तव्य आहे ? याची जाणीव करून देणारी ही कविता आहे.शोषणाची कारण मिमांसा शोधून शोषित समाज घटकांमधील नव्या पिढीला जागृत करून प्रस्थापित शोषण व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यासाठी सर्वसामान्य माणसाला लढण्याच्या दिशेने प्रावृत्त करणारी ही कविता आहे.

समाजातील संवेदनशील माणसे समाजातील इष्ट अनिष्टांचे सूक्ष्म पातळीवरून निरीक्षण करतात.चांगल्या आणि वाईट गोष्टी समाजाच्या लक्षात आणून देतात. कारण अशा व्यक्ती समतावादी, बुद्धिवादी व विज्ञानवादी अशा नव्या दृष्टिकोनातून समाजाकडे पाहू लागतात. तेंव्हा तर त्यांना समाजातले अधिक व वेगळे काही दिसत असते.आनंद इंजेगावकर यांच्या काव्यसंग्रहातून प्रकट होणारे

भावविश्व हे काहीसे अशाच स्वरूपाचे आहे.सामाजिक, बुद्धिवादी विज्ञानवादी नवमूल्यनिष्ठ व मानवतावादी स्वरूपाचे आहे.त्यांची कविता ही धर्मांधवृत्तीचे वाभाडे काढणारी, दलबदलू पांढरपेशीवृत्तीचे पितळ उघडे करणारी, समाजाला प्रेरणादायी ठरणाऱ्या महापुरुषांच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून देणारी कविता आहे. तथागत गौतम बुद्ध, क्रांतिबा जोतीराव फुले,राजश्री शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि अहिल्याबाई होळकर,माता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करते. व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देते.प्रबोधनाच्या चळवळीतील हे सर्वच महापूरूष आणि भारतीय संविधान ही कवीची श्रद्धास्थाने आहेत आणि या कवितासंग्रहातील कवितेचीही ती बलस्थाने आहेत. कवितासंग्रहातील कवितेमधून या सर्वांप्रति कवी कृतज्ञताभाव तर व्यक्त करतोच परंतु आपल्याला प्रेरणादायी असलेल्या अनेक महापुरूषांची प्रेरणादायी व्यक्तिचित्रे तो काही कवितांमधून जीवंतपणे साकारतो.

आपल्याला श्रद्धास्थानी असलेल्या तथागत बुद्धापासूनच कवी आपल्या कवितेची सुरुवात करतो आणि आपल्या कवितेचा शेवटही तो बुद्धाच्याच कवितेने करतो. अख्या विश्वाने बुद्ध समजून घेतला परंतु अख्या विश्वाला प्रकाश देणारा बुद्ध आम्ही समजूनच घेतला नाही तर आमच्या देशात बुद्ध आम्हीच कसा मारला म्हणजे बुद्धाच्या देशातच बुद्धाच्या विचाराची आम्ही कशी प्रतारणा करीत आहोत याचा प्रत्येक करून देणारी 'माफ कर बुद्धा' ही कविता आहे. या कवितेत कवी म्हणतो.

**"निसंदेह जगाला प्रकाशित करणाऱ्या बुद्धा**
**तुझ्यावर सगळं काळोखाचं आभाळ भरलंय**
**तुझ्या अहिंसेला फाशी देऊन हिंसेच बीज पेरलय**
**खरं सांगायचं म्हणजे तुला तर आम्ही केव्हाच मारलंय "**

(माफ कर बुद्धा- पृष्ठ - २१)

किंवा

**शेवटच्या कवितेमध्ये कवी म्हणतो.**
**धम्मक कळलेला तो भिमराव होणे**

**म्हणजे बुद्ध होणे.**
**भिमाच्या आंदोलन पुढेच पुढे नेणे,**
**म्हणजे बुद्ध होणे.**

(बुद्ध होणे-पृष्ठ-१२५)

असा आपल्या कवितेचा प्रारंभ कवी बुद्धानेच करतो आणि कवितेचा शेवटही तो बुद्धानेच करतो.'आता क्रांती दूर नाही' या काव्यसंग्रहातील 'माफ कर बुद्धा'ही पहिली कविता आणि 'बुद्ध होणे' ही या काव्यसंग्रहातील शेवटची कविता आहे.म्हणजेच कवितेची सुरुवातही बुद्धापासून होते आणि कवितेचा शेवटही बुद्धापाशीच येऊन थांबतो. कवीचा हा योगायोग नाही तर शोषणमुक्त मानवी समाज निर्मितीसाठी बुद्ध हाच त्यावरचा एकमेव जालिम उपाय आहे. कारण संपूर्ण विश्व आज बुद्धाच्या मार्गाने निघाले आहे. संपूर्ण जग बुद्धाच्या मार्गाने जात असतांना आपणास मागे राहून चालणार नाही.कारण मानवी जीवनाचे कल्याण केवळ बुद्ध मार्गानेच गेल्याने होणार आहे.यावरती कविचा आढळ विश्वास आहे.म्हणून तर कवी समाजातील स्त्री शूद्रादी, शोषित पीडितांना प्रस्थापित शोषण व्यवस्थेविरुद्ध पेटून उठण्यासाठी आणि तिला नेस्तनाबुत करण्यासाठी एकत्र येऊन लढण्याचे आव्हान करतो.शोषितांचे दुःख वेदना मांडून हा कवी नुसता आक्रोशच करत नाही तर कभी नवे बंड करण्यासाठी विद्रोहाचा सूर आळवतो.

**आपल्या दुःखची शेतकऱ्यांना जाणीव करून देतांना कवी म्हणतो.-**

**" जाऊ नको फाशी आता लाव तू फासे**
**चिमण्या उडून गेल्यावर चिमण्या पाखरांनी जगायचे कसे ?**
**चढव त्यांना फासावर ढेऱ्या वाढल्या**
**ज्यांच्या तुझ्या घासावर , ठेव नख त्यांच्या नरड्यावर**
**भाजल्या पोळया ज्यांनी तुझ्या मड्यावर "**

**(वटीत ठेव धोंडे- पृ.६४.)**

अशी विद्रोहाची आणि क्रांतीची भाषा करत समाजातील दांभिकतेवर इंजेगावकरांची कविता तुटून पडते. शेतकरी, कष्टकरी बांधवांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करून शेतकऱ्यांना आत्महत्येच्या मानसिकतेतून बाहेर काढून लढण्यासाठी नवे बळ देते.

२००० नंतरची आंबेडकरवादी कविता ही खऱ्या अर्थाने आंबेडकरवादाने प्रेरित झालेली कविता आहे.असे असले तरी २०० नंतरच्या आंबेडकरवादी कवितेत २००० पूर्वीच्या दलित कवितेत आलेल्या जाणिवा आणि २००० नंतरच्या आंबेडकरवादी कवीने व्यक्त केलेल्या जाणिवा यामध्ये आपणास परिवर्तन झालेली दिसते. जीवनाचे संदर्भ नव्याने बदललेले दिसतात. प्रचंड आत्मविश्वास आणि लढण्यासाठीची उमेद निर्माण झालेली दिसते. २००० नंतरचे समकालीन वास्तव रेखाटताना कवी म्हणतो प्रजासत्ताकाचा सुवर्ण महोत्सव आम्ही जरी साजरा केला तरी लोकशाहीला अपेक्षित असलेला बदल अजूनही आमच्या देशात घडून आलाच नाही. या देशातील राजकारणी नेत्यांनी, भांडवलदार धनदांडग्यांनी या देशांचे कसे वाटोळे केले.गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सर्वच नेत्यांनी देशाला कसे लुटून खाले.तुला किती अन् मला किती म्हणून अनेकांनी आपल्याला हवं ते कसे आपापसात वाटून घेतले. कचरा छाप लिहिणारे पुरस्कार प्राप्त झाले. देश विकणारे आणि लाल किल्ल्यावरून तेच तेच सांगणारे भाव खाऊन गेले आणि तेच इथे अंध भक्तांच्या गळयातले ताईत झाले. देशाचे मात्र वाटोळे झाले .याचे वर्णन करताना कवी म्हणतो.-

**"प्रजासत्ताकाच्या या वर्षात काय काय नाही झाले**
**तरुण मुलींचे देह अत्यंत स्वस्त झाले**
**कचरा छाप लिहिणारे पुरस्काराने सन्मानित झाले**
**मोबाईल नावाचे इंद्रिय माणसाला आले**
**कमिशन आणि लाच वाल्यांची उत्पन्न वाढले**
**विद्वत्तेपेक्षा पदाला महत्व आले**
**प्रजासत्ताकाच्या या वर्षात काय काय नाही झाले "**

( प्रजासत्ताकाची ऐसी की तैसी,पृ.२५,२६)

'आता क्रांती दूर नाही' या कवितासंग्रहात २०००नंतरच्या ज्ञान- विज्ञान आणि तंत्रज्ञान या समकालीन युगाचे असे वास्तव तर आले आहेच परंतु या समकालीन वास्तवावर कशी मात करायची यासाठीची उठाव ऊर्जाही आहे.

**" सारेच आता पेटून उठलेत**
**सारेच आता पेटवत सुटलेत**

**दगडालाही झाली पेटण्याची घाई**
**आता क्रांती दूर नाही..."**

(आता क्रांती दूर नाही,पृ.६९)

कवीचे हे सशक्त क्रांतिशक्तीचे सूचन महत्त्वपूर्ण आहे.सभोवतालच्या परिस्थितीचा अचूक वेध घेत माणूसपण हरवत चाललेल्या माणसांमध्ये माणूसकी जागवण्यासाठी नवी उर्जा निर्माण करते.जागतिकीकरणाच्या युगात उपेक्षेच्या आगीत उभ्या असलेल्या माणसाला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देते.

आज अविचाराने विचारचा पराभव केला. माणसाला माणसानेच खाऊन टाकले. नित्तीमता, सदाचाराऐवजी माणसांच्या हाती शस्त्र आले. धर्माने हिंस्त्र स्वरूप धारण केले.चोर शिरजोर झाले आणि सज्जन कमजोर झाले. अशी वर्तमानकालीन स्थिती आहे. ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा एकीकडे भडिमार होत आहे तर दुसरीकडे मात्र मानवी जीवनमूल्यांचा ऱ्हास होऊन माणुसकी लोप पावत चालली आहे. देव, बापू ,बुवा, बाबा, महाराज,योगी,यांच्या रूपाने धर्माच्या नावाखाली पुन्हा नव्याने माणसाचे शोषण करणे सुरू झाले आहे. माणसाचे शोषण करण्यासाठी मंदिराच्या रूपाने आधुनिक कत्तलखाने आज निर्माण केली जात आहेत. समाजाचे माळरान झालेले आहे. सर्व सामान्य माणसे भयभीत झालेली आहेत. चोहबाजूंनी माणसाचे सर्व पातळीवर माणसांचे शोषण केले जात आहे. चंगळवाद बोकाळला आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात जागतिकीकरणाच्या नावाखाली मुठभर भांडवलदारांचे वर्चस्व आज प्रस्थापित करून लोकांच्या माथी मारल्या जात आहे.सत्तेचे दात आणि नखे गरिबांच्या रक्ताने माखली आहेत. वर्तमानातील सत्ताकौर्याने माणसांना आणि माणसांच्या चळवळींना पराभूत केले आहे.अशा वातावरणात इंजेगावकरांची कविता शतकानुशतकांच्या वेदनांना शब्दरूप देत बुद्ध -फुले- शाहू- आंबेडकर ,अहिल्या- जिजाऊ -रमाई यांच्या असिम त्यागाची विचार उर्जा सोबतीला घेऊन, भारतीय संविधान केंद्रस्थानी ठेवून प्राप्त परिस्थितीशी दोन हात करण्याची भाषा करते.

**"महापुरुषाने आमच्यासाठी फोडला आहे धनाचा साठा**
**झोपू नका गड्यांनो उठा, आल्या प्रबोधनाच्या लाटा**

**बुद्धाचा तो विचार, शिवबाची ती तलवार**
**बाळासाहेबांचे संविधान आम्हा मिळाले रसायन**
**धगधगता हा इतिहास आमचा तुम्हा घेऊ खाली बुटा "**

(प्रबोधनाच्या लाटा, पृ.१११)

महापुरुषांनी फोडलेल्या धनाच्या साठ्यामुळे निर्माण झालेला उजेड कवी इंजेगावकरांच्या कवितेत जागजागी डोकावतो.महासूर्य तळपत राहावा तसा तो तळपत राहातो.

महापुरुषांच्या विचार क्रांतितूनच कवीला विद्रोहाचे बळ मिळालेले दिसते. त्यामुळेच मूळचा परंपराप्रिय आणि रूढिवादी भावविश्व असलेला कवी क्रांतिकारी विचार चळवळीच्या विश्वात सामील होतो. समाजातील मूल्य-ऱ्हासा बद्दलची तो खंत व्यक्त करतो. प्रसंगी चिडतो, संतापतो एवढेच नाही तर समाजातील दांभिकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून महात्मा फुलेंचा आसूड हाती घेऊन तो मैदानी जंग लढतो आणि त्यांची सारी सोंगेढोंगे तो उघडी पाडतो.

**"उघडी पडली तुमची सारी सोंगं ढोंग**
**होईल मैदानी जंग तुमची आमची "दो**

(मैदानी जंग,पृ.९१)

इंजेगावकरांची कविता ही २००० नंतरच्या आंबेडकरवादी कवितेच्या कडाडत्याय परंपरेतील कविता आहे तिला चंगळवादाचा धर्मांधतेचा आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीचा एक संदर्भ आहे. औद्योगिकीकरणाने आणि भांडवली जागतिकीकरणाने केलेल्या मानवी जीवनाच्या उलथापालथीचाही संदर्भ आहे.माणसांपुढे आणि माणसांच्या जगण्यापुढे विषमव्यवस्थेने निर्माण झालेल्या आवाहानांचा आणखीन एक संदर्भ आहे.मनुवादी व्यवस्थेने लोकशाही पुढे उभ्या केलेल्या संकटाचा आणखी एक संदर्भ आहे.जागतिक जीवनात विज्ञान आणि धर्मांधता यांच्यात सुरु झालेल्या दृश्यअदृश्य अशा युद्धाचा ही एक संदर्भ आहे.परिवर्तनाच्या चळवळीच्या पडझडीचा आणि त्यातून व्यक्तीला आलेल्या नैराश्याचाही संदर्भ आहे. परंतु कवी मूलनिवासी बहुजनाच्या चळवळीचा एक सच्चा प्रमाणिक कार्यकर्ता असल्यामुळे या सर्व अरिष्टांवरती मात कशी करायची यासाठी कटिबद्ध होऊ घातलेल्या मानवमुक्तीच्या आंदोलनाचा संदर्भ आहे.म्हणून

तर आव्हानशीलता हा इंजेगावकरांच्या कवितेचा मूळ प्रकृतीधर्म आहे.विषमतावाद्यांना आवाहन देत त्यांच्यासमोर स्वतःचे समतावादी नवे आवाहन ही कविता उभी करते.जगभरातील शोषित पीडितांना एकत्र करून त्यांच्या भणंग मानसिकतेत आमूलाग्र बदल करण्याचाही ही कविता प्रयत्न करते.

बुद्धाची करुणा आणि मैत्रभाव जोपासत शत्रूवर तुटून पडणारी आणि विषमतेविरूद्ध बंड करणारी ही कविता आहे. शत्रू कोण आणि मित्र कोण ? याची कवीला पूर्ण जाणीव आहे. तरी जीवनाच्या परिवर्तनाचे सत्य आज असत्यानी घेरलेले असल्यामुळे अनेक अडथळयांचा खडतर प्रवास कवीला अजून पार करायचा आहे. सर्वांच्या समान हिताचे इच्छित तेच सत्य तिला येथे रुजवायचे आहे. म्हणून तर कवी गुलामगिरीचे जोखड फेकून देऊन माणसांची मने तोडण्याऐवजी जोडण्यासाठी धडपड करतो.

**" मने जोडायची**
**माना मोडायचा नाही**
**न्यायासाठी लढायचे**
**अन्यायात लोळायची नाही"**

(काय करायचे ? पृ.४०)

बाबासाहेबांनीच ख-याअर्थाने इंजेगावकरांसारख्या अनेक कवींच्या हातात लेखण्या दिल्या. आणि या लेखण्यांनीच अगणित अशा उजेडाच्या मशाली पेटवल्या म्हणजेच बाबासाहेबांनी कवींना दिलेल्या लेखण्याच आज क्रांतिची मशाल झाल्या आहेत. याच मशाली अनेकांची मने प्रज्वलित करून समतावादी विचारांची पेरणी करीत आहेत.बाबासाहेबांनी साहित्याकडून सामाजिक सांस्कृतिक क्रांतीची जी अपेक्षा केली होती तीच अपेक्षा कवीला आहे. म्हणून तर कवी म्हणतो "मित्रहो बाबासाहेबांपेक्षा मला थोडेच वेगळे काही सांगायचे आहे." असे म्हणून आपल्या साहित्यविषयक भूमिकेला तो पूर्णविराम देतो.

या कवितासंग्रहात एकूण ६० कविता असून एकूण १२५पृष्ठांचा हा कवितासंग्रह आहे.या कविता संग्रहातील सर्वच कविता सामान्य वाचकांच्या मनात जशी समाज जाणिवेच्या प्रेरणा बीजांची पेरणी करतात. तशाच त्या नवजागृत ओबीसी बहुजन वर्गाला एकूणच सर्वच शोषित,पीडित दलित समाजघटकांमधील

नव्या पिढीला समाजक्रांतीला सिद्ध होण्यासाठी प्रेरित करतात. स्त्रियांबद्दल आणि समग्र शोषित वंचिताबद्दल आत्मियतेने बोलतात. दुःख वेदनेशी आणि कष्टमय जगण्याशी त्या एकरूप होतात. शेतकऱ्यांचे, स्त्रियांचे तर कधी बेकारांचे दुःख ही मांडतात. तर कधी महापुरुषांचे आदर्श डोळयासमोर ठेवून भारतीय संविधानाची कल्याणकारकता लोकांना पटवून देतात.अंधश्रद्धामूलक संस्कृती परंपरेची चिकित्सा करून समग्र मानव जातीला शोषित व्यवस्थेविरुद्ध लढण्याचे आवाहन करतात.

तशी कवीची मूळची प्रकृती सामाजिक व चिंतनशील स्वरूपाची आहे. त्यामुळे कवितेतील चिंतन वाचकांना योग्य दिशेने घेऊन जाते.भारतातील विषमतावादी शोषणव्यवस्थेचे वास्तव दर्शन घडवते. परंतु उत्तम काव्यनिर्मीतीसाठी चिंतनाला उत्कट भावनेची जोड द्यावी लागते. उत्कट भावनेचा सहज आविष्कार असल्याशिवाय उत्तम कविता निर्माण होऊ शकत नाही ते नुसते चिंतन असते एक प्रकारचा तो पद्यात्मक निबंध वाटतो.असे काहीसे कवी आनंद इंजेगावकर यांच्या कविते संदर्भात झालेले दिसते. या संग्रहातील कविता काहीशी अशा स्वरूपाची आहे.म्हणून त्यांच्या कवितांना कविता म्हणून निश्चित काही मर्यादा जाणवतात.असे असले तरी मुक्तछंदातील परंपरेच्या वाटने न जाता कवितेच्या रचना बंधाचे साखळदंड धुडकावून कवितेचा कसला ही फॉर्म न घेता विचार कविता म्हणून स्वतःची स्वतंत्र वाट निर्माण करतात.परंपरेतील अभंग हा रूपबंध काही कवितेत कवींनी स्विकारला आहे .काही का असेना मात्र महापुरुषांच्या विचाराचा उजेडाचा वारसा मात्र कवीने नव्या पिढीला सजग करण्यासाठी पोटतिडकीने मांडला आहे. म्हणून आंबेडकरवादी मराठी कवितेतील ही महत्त्वाची कविता आहे. कारण आंबेडकरवादी कवी म्हणून कवीनी ' आता क्रांती दूर नाही' या आपल्या पहिल्याच कवितासंग्रहाच्या माध्यमातून आपली स्वतःची स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. त्यासाठी मी कवी आनंद इंजेगावकर यांचे अभिनंदन करतो आणि स्वागतही करतो. उद्याची प्रगल्भ आंबेडकरवादी कविता निश्चितच त्यांच्या हातून लिहिली जाईल त्यासाठी त्यांना भरभरून शूभेच्छा देतो.

***

# जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा

प्रा. गोरोबा शेषराव रोडगे

प्रमुख, मराठी विभाग, शिवनेरी महविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

प्रस्तावना:

मराठी ग्रामीण कवितेमध्ये कवी म्हणून जगदीश कदम यांचे नाव आज परिचित आहे. ग्रामीण वास्तवाचे बदलत्या स्थिती-गतीचे त्यांनी केलेले आविष्कारण मनाला भिडणारे आहे. शेती, शेतकरी, शासन, दलाल, खेड्यातील दारिद्र्य, निसर्गाचा लहरीपणा, भूख, मतभेद, गटबाजी, राजकारण, नातेसंबंध, शिक्षणाचे येणारे संदर्भ हे सर्व काव्यमय रूपात समोर येताना वाचकांना विचारप्रवृत्त करावयास लावणारे आहेत. कारण ही कविता ग्रामीण जीवनाचे वास्तव साकार करते. हे जीवन काव्यमयरित्या व्यक्त झाल्याने ग्रामीण जीवनाची खोली आणि व्यापकता लक्षात येते. जगदीश कदम यांचे अनुभवविश्व व त्यांनी साकार केलेल्या कवितेतील महत्त्वाच्या व्यक्तीरेखा. या व्यक्तीरेखांतून विविध जाणिवा साकार झालेल्या आहेत. जगदीश कदम यांनी ‘रास आणि गांडार', 'झाडमाती', 'नामदेव शेतकरी', 'गाव हाकेच्या अंतरावर' हे कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. या कवितासंग्रहातून त्यांनी साकार केलेल्या व्यक्तिरेखांचा आपण पुढीलप्रमाणे विचार करू.

**'रास आणि गोंडार' या कवितासंग्रहातील व्यक्तिरेखा :**

'रास आणि गोंडार' हा जगदीश कदम यांचा ग्रामीण कवितेचा संग्रह ग्रामीण कवितेमधील एक अतिशय संवेदनशील व ग्रामीण जीवनाचे वास्तव प्रकट करीत करीत झालेल्या व होत असलेल्या अंतरबाह्य परिवर्तनाचा व जीवनाचा एक वेदनामय पट आहे. ग्रामीण जीवन दिवसेंदिवस बदलते आहे. औद्योगिकीकरणाने खेडी ओस पडून शहरे खचाखच भरत आहेत. शहरांच्या निवाऱ्याला आल्यानंतर ग्रामीण माणसात पडत जाणारे अंतर खेड्यातील आई-वडिलांचा मुलांवर असलेला जीव, पती-पत्नीचे असलेले नाते, आई, मुलगा, वडील यांच्यामध्ये प्रसंगानुरूप उदभवणारे वाद, भावा भावांमध्ये शेतीबद्दल निर्माण होणारे वितुष्ट, मातीवर निस्सीम प्रेम करणारा शेतकरी व त्यांचे प्राणीविश्व, स्त्रियांच्या मनाच्या विविध भावावस्था, शेती, शेतकरी. त्यातून त्याची उपजिविका आणि वास्तवता याचं प्रत्ययकारी चित्रण अस्वस्थतेतून आणि वेदनेतून आविष्कृत होताना ही कविता आपल्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून स्वतःचं अस्तित्व व वेगळेपण प्रकट करते.

या काव्यसंग्रहातून ग्रामीण भाषेचे अस्सलत्व नाट्यमय चित्रणातून, वेदनेतून, चित्रणातून व्यक्त झालेल्या दुष्काळातून, शब्दकळा, प्रतिमा, प्रतिकांमधून, स्त्रीविश्वातून, प्राणीविश्वातून व्यक्त होते. यातील संवेदनशील मनाने टिपलेले जीवनानुभव मनाला सुन्न व अस्वस्थ करतात. कवितेतील प्रतिमा सधन असलेली ही कविता आहे. जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा ह्या ओढून ताणून आणलेल्या नाहीत तर तो वेदनेचा हुंकार आहे. ही वेदना त्यांनी आपल्या व्यक्तिरेखांतून प्रकट केली आहे.

जगदीश कदम यांनी 'रास आणि गोंडार' हा कवितासंग्रह कवितेला जीव कसा लावावा ते शिकविणाऱ्या गुरुवर्य भु. द. वाडिकर, भगवंत क्षीरसागर आणि सुधीर रसाळ यांना अर्पण केला आहे. यावरून असे दिसते की, त्यांच्या कवितेत आलेल्या व्यक्तीरेखा ह्या कशा जीवंत पद्धतीने असणार आहेत याचे प्रकटीकरण होते. जगदीश कदम यांच्या 'बैल' या कवितेतून धुरकरी यांची व्यक्तिरेखा विशेष भावून जाते. ते व्यक्तिरेखेसंदर्भात लिहितात की,

'मुक्या बैलांच्या भावना डोळ्यातून पाझरती
काळजाला छेडणाऱ्या कथा कोणत्या सांगती
गेला कसा धुरकरी एकाएकी दूर गावा
घरामधी चाललेला माय-लेकरांचा धावा."[1]

या कवितेमध्ये धुरकरी जाण्याने व्याकूळ झालेल्या बैलांचे डोळे पाझरताना दिसतात. कंबरेला विळा खोचून डोक्यावर गवताचा भारा आणणारा धुरकरी वीज कोसळून जमिनदोस्त होतो. असाह्यपणे ही घटना पाहणारे त्याच्या कुटुंबातील बैलांना मग चारापाणी कसा गोड लागावा.

**'झाडमाती' या कविता संग्रहातील व्यक्तीरेखा :**

महात्मा फुलेंनी शोषणाविरोधात संघर्षाची रेषा विद्या विरुद्ध अविद्या अशा स्वरूपात मांडलेली होती. भटशाही विरुद्ध कुणबी हा लढा त्यांनी हयातभर लढविला. काळ गती प्रमाणे आज भटशाहीचे चेहरे बदलत गेले आणि शोषण मात्र थांबलेले नाही. म्हणूनच शोषणव्यवस्था जोपर्यंत कार्यरत आहे तोपर्यंत ग्रामीण साहित्याचे अस्तित्व कायम राहणार आहे. जगदीश कदम यांचा 'झाडमाती' हा काव्यसंग्रह २००३ साली प्रकाशित झाला. या कवितासंग्रहामध्ये कुणबिकीच्या कविता आहेत. तथापि, बदलणाऱ्या ग्रामीण समाजाला आत्मभान देणारी कविताही आहे. आजच्या कवितेत दीर्घ-प्रदीर्घ खंडप्राय कवितेची परंपरा निर्माण होत असताना अल्पक्षरत्वाचा प्रयोग परिवर्तनशीलतेचाच भाग असावा असे वाटते.

जगदीश कदम यांच्या कवितेतून शेतकऱ्याचं दुःख, कष्टकऱ्यांच्या भावना व्यक्त झालेल्या आहेत. म्हणजेच जी शोषणव्यवस्था ज्यावेळी नष्ट होईल, त्यावेळी शोषणमुक्त असा समाज निर्माण होईल आणि प्रत्येकाला आपल्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळेल. परंतु शेतातील उत्पादीत झालेल्या

मालाला काय भाव द्यावा तो दलाल ठरवित असतो. ही पूर्वापार चालत आलेली प्रथा बळीराजाला मात्र दारिद्र्यात लोटत असते. ‘बळीराजा’ हा शब्दही आता उपहासाने वापरला असे वाटण्यासारखी शेतकऱ्याची परिस्थिती झाली आहे. नावालाच राजा पण घरी मात्र दारिद्र्य असा हा शेतकरी आपल्या कष्टाला बांधलेला आहे. 'बळीराजा' या कवितांतून बळीराजाची व्यक्तीरेखा साकारताना जगदीश कदम म्हणतात की,

'नाही फिटता फिटत जाते वाढतच रीण

नावालाच बळी राजा त्याचं धसकटाचं जीण, [2]

म्हणजेच बळीराजाचं नुसत नावाच राजासारख घ्यायचं, त्याच्या पदरी मात्र प्रचंड सावकारी व सरकारी कर्ज डोक्यावर बसलेलं असतं. शेतातलं ज्या पद्धतीनं धसकट असतं त्यासारखीच अवस्था या बळीराजाची झालेली आहे, अशी प्रत्ययकारी भूमिका जगदीश कदम यांनी या कवितेतून मांडली आहे..

'नामदेव ‘**शेतकरी’ या काव्यसंग्रहातील व्यक्तिरेखाः**

जगदीश कदम यांची नाळ जशी रास आणि गोंडार यांचा आलेख मांडून झाड मातीशी नाते सांगते तसे नामदेव शेतकरी यांच्या वेदनेशीही जवळीकतेचे नाते सांगते. नामदेव शतकरी हा काव्यसंग्रह (दीर्घकाव्य) आधुनिक शेतकऱ्यांच्या जनजीवनाचा दाहक आविष्कारच होय. पावसाचे आखडते हात आणि शासनाचा कानाडोळा, त्यात सावकाराचे शेतकऱ्यांच्या गळयाला आवळणारे फास या परिस्थितीमुळे हतबल झालेल्या नामदेवासारख्या असंख्य शेतकऱ्यांच्या वेदनेचा उद्रेक म्हणजे नामदेव शेतकरी हा काव्यसंग्रह होय. यासंदर्भात डॉ. भारत कचरे म्हणतात की, 'नामदेव शेतकरी हे दीर्घ प्रयोगशील काव्य असून, शेतकऱ्याच्या वेदनेचा एक दस्तऐवज म्हटले तरी वावगे ठरू नये. कवीने सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत जी लय पकडली होती ती शेवटी मुक्त छंदातील शेतकऱ्याच्या संवादकाव्यात हरवलेली दिसते. जगण्याची लयही तेथेच संपते. कवीने काव्यरचनेच्या बाबतीत अष्टाक्षरी रचनेचा प्रयोग यशस्वीपणे हाताळून नामदेव शेतकऱ्याची वेदना समर्थपणे मुखर केलेली दिसून येते.[3] म्हणजेच नामदेव शेतकरीमधून आविष्कृत झालेल्या जाणिवांच्या आधारे या संग्रहाची मीमांसा करता येईल. नामदेव शेतकऱ्याची अवतीभोवतीची समाजस्थिती, त्याची जगण्याची रित, कष्ट, श्रमाचं चुकलेलं गणित, नामदेवाची पतप्रतिष्ठा, त्याची भक्ती आणि फितूर झालेली व्युत्त शक्ती, मायबापाच्या ऋणाची जाण अन् शेतीत राबताना गायी-गुरे या मुक्या प्राण्यांच्या जिव्हाळयाचे भान अशा कृषी जाणिवांना अंतरात जोपासणारा नामदेव शेतकरी त्यांच्या दुःख संवेदनासह उभारण्यात जगदीश कदमांची प्रतिभा पणास लागल्याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. यासंदर्भात जगदीश कदम लिहितात की,

नाही लवाडी लताडी नीट फुटलेली वाट
नच होऊ दिले त्याने त्याचे जगणे बोभाट ४

याचा अर्थ असा की, सरळ साधी भोळी विचारसरणी असणारा नामदेव शेतकरी. त्याचे कुटुंबावर नित्तांत प्रेम आहे. वडीलधाऱ्यांचा आदर आणि सांभाळ करणे, आपले आद्य कर्तव्य आहे याची मानवी मूल्य जाणिव तो जोपासतो. कृषी जीवनाचा हाच तर खरा पाया आहे.

**गाव हाकेच्या अंतरावर या संग्रहातील व्यक्तीरेखा :**

गाव हाकेच्या अंतरावर असले तरी शहर व ग्रामीण हे अंतर कधीच न तुटणारे. कधीच ते एकमेकाला उपायोगी पडून मानवतेचा प्रत्यय आणून देणारे झालेले आहे. असे आतापर्यंतच्या इतिहासात तरी घडलेले नाही व येत्या काही वर्षात तरी असे घडू  शकेल, असे वाटत नाही. म्हणून कवीमन व्याकून होते. विरोधाभास अन् अन्याय पाहून व्यतित होते. ते परिस्थिती सापेक्ष तुलना करू लागते, संगती लावू पाहते आणि यातील विसंगती, अन्याय, शोषण, मतलबीपणा पाहून बंड करून उठते. म्हणून कवीला सळसळणाऱ्या पिंपळ पानात बुद्ध दिसू लागतो. मन शोध-प्रतिशोधाच्या खाईत लोटून अनेक प्रश्न विचारू पाहते. क्षोभ, शोध नि क्षोत यांची मांडणी करू लागते. म्हणून गाव हाकेच्या अंतरावर या कवितासंग्रहातील हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

गाव हाकेच्या अंतरावर या काव्यसंग्रहाच्या संबंधात प्र. श्री. जाधव म्हणतात की, 'मनातून विसरावं म्हटलं तरी न विसरता येणारं बालपण आणि दाहक परिस्थिती परंपरेला चिकटून बसलेला गाव, संवेदनाशुन्य झालेली माणुसकी, सरकारी धोरणे, पावसाचा अनियमितपणा, शेतीत होत जाणारी नापिकी याला कंटाळून जाऊन कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करू धजणारा शेतकरी इत्यादी पाहून संवेदनशील वृत्ती जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत तरी कवीमन शब्दासाठी अडून बसत नाही. मांडणी जुळत राहते. आपसूक शब्दच अनेक विविध रुपात व्यक्त होऊ लागतात. भावआशय सहज व्यक्त होत जाणारा, ग्रामीण तत्त्वाचा वारसा लाभलेला नि अनुभूती संपन्न असलेला हा संग्रह म्हणजे गाव हाकेच्या अंतरावर होय.'५ गावाच्या मातीला हाक मारणारे कवीमन आठवणीचे उसासे शब्दबद्ध करताना सर्वच शेतीमातीच्या लेकरांना जगदीश कदम यांचे काव्यविश्व आपलेच वाटू लागते. कारण गावच्या मातीचा गंध करोडो लोकांच्या जन्मसंदर्भाना जुळलेला असतो. आधीच्या काळातील दानेदळण आणि चिमण्यांनी भरलेले अंगन कविच्या गावात पारखे झाले. चिमण्या उडून गेल्या. अंगण दुष्ट की चिमण्या लबाड या भिजलेल्या कोड्याचे उत्तर जगदीश कदम यांना मिळाले नाही, परंतु या कवितासंग्रहामध्ये मायीची व्यक्तिरेखा साकार करताना जगदीश कदम लिहितात की,

कोसळणाऱ्या उभ्या आडव्या पावसाने मायीची उडालेली तारांबळ

आजही जखमेसारखी ठणक राहते मनाच्या खोल कपाऱ्यात.[6]

याचा अर्थ असा की, हा ठणकणारा कोपरा घेऊनच आजही कविला जगणे अपरिहार्य आहे. जगदीश कदम यांच्या बालपणाची वेदना बहुआयामी आहे. लाख मुंग्याचं बाळांतपण करून थकलेल्या आणि उंदरांनी कुरतडून टाकलेल्या चिंदकासारखे हे बालपण आठवताना कविला असाह्य वेदना होतात. हे बालपण केवळ कविचे नसून समस्त कुणब्यांच्या पोरांचे आहे.

**समारोप:**

जगदीश कदम यांनी आपल्या कवितांमधून दारिद्र्यविषयक, कृषीविषक, निसर्गविषयक, सामाजिक आदी जाणिवांचा आविष्कार केला आहे. कलावंत हा सामाजिक जीवनातील महत्त्वाचा भाग असतो. ग्रामीण कवी या नात्याने जगदीश कदम यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून समकालीन समाज वास्तवाला समोर ठेऊन आपले लेखन केले आहे. सोशिक ग्रामीण समाजाला आत्मभान प्राप्त करून देणे व त्यांचा आत्मविश्वास वाढविणे या भूमिकेतून जगदीश कदम यांनी लेखन केलेले दिसते. जगदीश कदम यांच्या कवितेतून शेतकरी हा शेती कसणारा, शेतीवर निष्ठा ठेवणारा असल्याने शेतीवर जीवापाड प्रेम करीत असतो. शेतीवर साऱ्या जगाची पोटं भरली जातात, परंतु शेती करणारा हा वर्ग अर्धपोटी, अर्धनग्न राहतो. शेतकरी हा कमालीचा सहनशील आहे. त्याला त्याच्या परिस्थितीची जाणिव करून देणे आवश्यक आहे. जगदीश कदम यांच्या कवितेने ग्रामीण जीवनवास्तव जीवंतपणे सांकार केले आहे.

संदर्भसूची :


१. कदम जगदीश, रास आणि गोंडर, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००८, पृ. १९
२. कदम जगदीश, झाडमाती, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००३, पृ. ३५ पांचाळ संजीवकुमार व जाधव संध्या (संपा.), डॉ. जगदीश कदमः व्यक्ती आणि
३. वाङ्मय, समीक्षा प्रकाशन, नांदेड, २०१६, पृ. ९३
४. कदम जगदीश, नामदेव शेतकरी, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००६, पृ. १३
५. पांचाळ संजीवकुमार व जाधव संध्या (संपा.), उपरोक्त, पृ. ११९ कदम
६. जगदीश, गाव हाकेच्या अंतरावर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१४, पृ. ३६


***

# २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न

**प्रा. डॉ. राजेश धनजकर**
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी

आदिवासी हा या भूमीचा मूळ मालक. हजारो वर्षापासून तो इथल्या जंगल-पहाडात व दऱ्याखोऱ्याच्या भूभागात वास्तव्य करताना दिसतो. आजही त्याने आपले घनदाट अरण्यातील पूर्ण वास्तव्य सोडलेले नाही. त्यामुळे तो आधुनिक विकास व सोयी-सुविधापासून कोसो दूर आहे. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत व त्यानंतर काही काळ अदिवासी समाज हा अरण्यवासीच होता. जंगल हेच त्याने आपले सर्वस्व मानले होते. परंतु १९७०-८० च्या दशकात मात्र आदिवासी माणसाला थोडे आत्मभान आले. खेडोपाडी व ग्रामीण भागात आश्रम शाळांची स्थापना झाली. आदिवासी समाजाची तुरळक मुले त्यावेळी आश्रमशाळेत जाऊ लागली. शाळेबरोबर जेवणाचीही व्यवस्था होते, हे पालकांना अधिक महत्वाचे वाटे. त्यामुळे तेही शाळेत पाठवण्यास तयार होत असत. पुढे-पुढे आदिवासी विद्यार्थी रडतपडत का होईना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ लागला. त्यातून त्यांना थोडे आत्मभान आले. थोडेबहूत शिक्षण घेतलेल्या सुज्ञ मंडळींना ‘स्व’ ची जाणीव झाली. त्यांच्या वैचारिक प्रतिभेला धुमारे फुटू लागले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाने आदिवासी समाजाला आरक्षणाचे कवचकुंडल प्राप्त झाले. त्यांना अनेक सोयी-सवलती मिळू लागल्या. आदिवासींचा समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा मार्ग मोकळा झाला. उत्तरोत्तर आदिवासी समाजाला शिक्षणाचे मानवी जिवनातील महत्व पटू लागले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ही समज त्यांच्यात दृढ झाली. प्रस्थापित वर्गात शिक्षणाची गंगा ‘ धो-धो’ वाहत होती, त्याचवेळी आदिवासींच्या, ‘वाडी’ ‘वस्ती’ वर तिची गती मात्र अतिशय

संथ होती. हे जरी सगळे सत्य असले तरी त्याच 'वाडी' 'वस्ती' तून शिक्षण घेऊन काही सुशिक्षीत तरुण 'वाडी' बाहेर पडू लागले. नंतर त्यांनी तालुक्याचे ठिकाण गाठले. खऱ्या शिक्षणाची व 'स्व' अस्तित्वाची जाणीव त्यांना तिथेच झाली. आरक्षणाने आपल्याला नोकरीचे दालन खुले असल्याची समज तिथेच आली.

१९८० नंतर आदिवासी तरुणांचा अल्प प्रमाणात का होईना नोकरीत प्रवेश झाला. पण खेदाची बाब ही की, त्या वेळी आदिवासी मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण मात्र अतिशय निराशाजनक होते. त्यामुळे त्यांचा नोकरीत शिरकाव होऊ शकला नाही. आनंदाची गोष्ट एवढीच की, आदिवासी तरुणांनी आपली नोकरी सांभाळून 'वाचन संस्कृती' कडे लक्ष्य दिल्यामुळे त्यांच्या मनाच्या कक्षा रुंदावल्या. वाचनाच्या सातत्यामुळे त्यांनाही आपल्या समाजाच्या व्यथा आणि वेदनांची जाणीव झाली. आदिवासींचे दु:ख आणि दारिद्रय पाहून व अनुभवून हाही वर्ग अस्वस्थ व्हायचा. विचाराचे चक्र गतिमान होऊ लागले. वाचनातील सातत्यामुळे त्यांना साहित्याचा परिचय झाला. अनेक साहित्य प्रकार व प्रवाहांमधील दु:ख, दारिद्रय, उपासमार, शोषण, पिळवणूक, अन्याय-अत्याचार त्यांच्या वाचण्यात आले. आदिवासी-मधला सुज्ञ वाचक अस्वस्थ झाला. आदिवासींचे जगणे यापेक्षा वेगळे नसल्याची त्याला जाणीव झाली. त्यामुळे आपल्याही समाजाचे अनंत प्रश्न व समस्या आपण साहित्याद्वारे मांडले पाहिजेत, अशी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली आणि खऱ्या अर्थाने इथूनच आदिवासी तरुण लिहिता झाला.

आज आदिवासी साहित्यिकांच्या एकूण साहित्याचा विचार केला, तर त्यात 'कविते' चे दालन अधिक समृध्द केल्याचे निदर्शनास येते. परंतु त्यामाने कथा, कांदबरी, नाटक, चरित्र व आत्मचरित्र या साहित्य प्रकाराकडे तो फारसा वळाल्याचे दिसत नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी कवींच्या  कवितांचाच थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसे पाहिले तर, आदिवासी समाजातील ज्या-ज्या कवींनी काव्याच्या प्रांतात उडी घेतली. त्या सर्वच कवींवर फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा फार मोठा

पगडा असल्याचे दिसते. कारण त्यांच्या विचार व प्रेरणांचा संबंध हा आपल्या जीवन जाणिवांशी आहे, म्हणून त्यांनी आंबेडकरी विचार हे परिवर्तनाचे शस्त्र माणून काव्यलेखन केले. वाहरु सोनवणे, बाबाराव मडावी, तुकाराम रोंगटे, संजय लोहकरे, सुरेश धनवे, सखाराम डाखोरे, शीतल ढगे, प्रकाश गारोळे, पांडुरंग वागतकर, सोपान भुरके, शंकर बळी, दशरथ मडावी, पी. डी. आत्राम, कविता आत्राम, सनील कुमरे, विनायक तुमराम असा काही आदिवासी कवींचा वर्ग काव्याच्या प्रांतात पाय रोऊन उभा आहे.

आंबेडकरी विचारांचा वारसा लाभलेल्या आदिवासी कवींनी आपल्या समाजावर होत असलेले अन्याय-अत्याचार, शोषण, उपासमार, दारिद्रय, कष्ट, दु:ख, भूक आणि भाकर यासारखे अनंत विषय तेवढयाच पोटतिडकीने मांडले आहेत. आदिवासींचा मूळ प्रश्न आहे तो भाकरीचा भाकरीच्या एका-एका तुकडयासाठी जंगल-पहाडात टाहो फोडणारी व तडफडणारी माणसे आदिवासी कवींच्या कवितेने हेरली आहेत.

**" पाखरांचे थवे माझे**
**निघाले भाकरीच्या शोधात**
**ही कोणती बेबंदशाही**
**जीवाचे हाल या देशात"1**

स्वातंत्र्य् प्राप्तीनंतरही या देशाच्या मूळ मालकाचे भाकरीच्या तुकडयासाठी एवढे हाल व्हावते, ही कवीची शोकांतिका आहे. हा कोणता देश आहे, की ज्या देशाने आदिमांचे जीवन जगणे असहय करुन टाकले. दऱ्याखोऱ्यातल्या व जंगल पहाडातल्या आदिवासी माणसांचे थवेच्या थवे भाकरीच्या शोधासाठी पायपीट करत आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी धडपडत आहेत, ही धडपडच कवीला अस्वस्थ करते.

**" साहेब,**
**भरल्या पोटाने कधी क्रांती होत नाही**
**झोप येते स्वप्न पडतात**
**जेव्हा पोटाला भूक लागते ना**

**तेव्हा माणूस तळमळतो तडफडतो**
**अन डोळे भाकरीच्या दिशा शोधतात**

क्रांती घडून येण्यासाठी माणसाचे पोट रिकामे असावे लागते. इथे तर भरल्या पोटाने लोक क्रांतीची भाषा करतात. या धनदांडग्यांना भरल्यापोटी झोप जरुर येईल, सुखाची स्वप्नेही पडतील. परंतु त्यांच्या हातून क्रांती होणार नाही. जो भूकेने व्याकूळ आहे, भाकरीविना तळमळतो-तडफडतो त्यांच्याच जिभेवर क्रांतीची भाषा खेळते. तेच क्रांती करु शकतात. कवयित्री अशाच भूकेने तडफडणाऱ्या आदिम बांधवाना क्रांतीसाठी सज्ज होण्याचे आवाहन करते.

**या देशात पोटासाठी पोट येते**
**पोटाच्या भुकेसाठी कमरेखालची भूक भाग घेते**
**कोण आहे तो**
**भाकरीवर भाषण देतो**
**भाकर भाकर म्हणत**
**भाकरीवरच कर लावतो**
**आता 'भ' भटजीचा नसून**
**भाकरीचा झालाय**
**'क' कांद्याचा अन**
**'र' रिकाम्या पोटाचा" 2**

आदिवासींच्या जीवनातले दु:ख आणि दारिद्रय त्यांना कुठल्या थरापर्यंत नेऊन सोडेल, याचा काही नेमच नाही. हे ' पोटासाठी पोट येते' या चरणावरुन आपल्या सहजच लक्षात येते. जी माणसे धनाढय आहेत. ज्यांच्याकडे गडगंज संपत्ती आहे. अशा मस्तवाल लोकांची पोटाची भूक सहजच भागविली जाते. आणि तीच माणसे 'भूक आणि भाकरी' वर भाषणं ठोकतात. भरभरुन बोलतात पण भाकरीचा प्रश्न काही केल्या ते सोडवू शकत नाहीत. कारण वासनेची भूक शमविण्यासाठी त्यांना कमरेखालची भूक हवी असते. कवयित्री अशाच लबाड, फसव्या व ढोंगी लोकांवर शब्दाचे आसूड ओढते. हजारो वर्षे

येथील बहुजनांना व स्त्रियांना छेळणाऱ्या 'मनुवादी संस्कृती' चा कवयित्री या ठिकाणी धिक्कार करते. 'भ' भटजीला मुळासकट उपटून त्या जागी भाकरीचे बिजारोपण करते. तसेच रिकाम्या पोटाला कांदा अन भाकरीची किती आवश्यकता आहे, हेही पटवून देते.

**"पोटाची आग विझविण्यासाठी**
**भाकर लागते भाकर ......**
**कोणत्याही जातीची ....**
**आणि ती कष्टाने मिळते**
**नशिबाने नाही" 3.**

माणसाच्या भूकेला जातीपातीची बंधने अजिबात नसतात, तर पोटाची भूक भागविण्यासाठी भाकरीचीच गरज असते. मग ती भाकर कोणत्याही जातीतल्या माणसाची असो, तिने भूकेचा आगडोंब शांत करता येतो. अशी भाकरी ही कष्टानेच मिळविलेली असते. कवीचा इथे नशिबावर नाही, तर आपल्या कष्टावर व मेहनतीवर प्रचंड विश्वास आहे. कारण कवीला या ठिकाणी फुकटाची भाकरी नको आहे, तर ती 'स्व' कष्टाच्या घामाची हवी. आणि म्हणूनच कवीने नशिबाला लाथाडून कष्टाला मिठी मारली. तसा आदिवासींचा आणि जंगलाचा फार घनिष्ठ संबंध. तो जंगलाच्या सानिध्यातच वाढला व त्याचा विकास झाला. याच रानावनातील चारं, बोरं, कारं, वाळकं आदी रानमेंव्यांनी आदिवासी पोरांची भूक शांत व्हायची. काही काळ त्यांच्या भूकेचा प्रश्न तिथेच मिटायचा.

**"रानावनात फिरताना**
**गोळा केलेली कंदमुळे**
**ढोरं बांधल्यावर भाजताना**
**भूकेला कोंब फुटायचे**
**रानमेव्यावर पोसलेला देह**
**चावी हमींद खरपुडीसारखा**
**भुकेल्यांच्या पोटामधली**

**थोडी तरी भूक भागवील?" 4**

जंगल-जिव्हाऱ्यातल्या फळाफुलांवर व कंदमुळांवर आदिवासी पोरांचा देह पोसल्याची कबुली कवी या ठिकाणी देतो. एकूणच काय तर आदिवासींचे वास्तव्यच मुळात अतिशय घनदाट अरण्यात असते. त्यामुळे तेथील 'रानमेवा' त्यांना सहजच उपलब्ध होतो. आदिवासींच्या पोटाची संपूर्ण भूक भागविली जात नसली, तरी भूकेची तिव्रता मात्र थोडी कमी करता येऊ शकते, यावर कवीचा विश्वास आहे.

**"काबाडकष्ट अंगमेहनत**
**रानावनात देशी-विदेशी**
**जिच्यासाठी गाळला जातो घाम**
**ती असते शिळीपाती भाकर....**

**कव्हा सहजच अंग मेहनतीने**
**कव्हा लांडी लबाडी, चोरीनेही**
**उघडया नागडयांच्या खळगीसाठी**
**नाविलाजाने मिळवतो माणूस**
**ती असते शिळीपाती भाकर" 5.**

चार घास सुखाचे मिळावेत म्हणून आदिवासी माणसाला ढोर मेहनत करावी लागते. काबाडकष्ट करावे लागतात. रानावनात वणवण भटकंती करावी लागते. एका-एका भाकरीच्या तुकडयासाठी त्याला परप्रांतात जाऊन घाम गाळावा लागतो, तेव्हा कुठेतरी भाकरीचा कोरकुटका त्याच्या पदरी पडतो. आजही ऊस तोडणे, कापूस वेचणे, कांदे काढणे, मिरच्या तोडणे आदी कामासाठी आदिवासींचे थवेच्या थवे वाडी-वस्तीच्या बाहेर पडल्याचे निदर्शनास येतात.

तसे भाकरी मिळविण्याचे अनेक मार्ग कवीने सांगीतले. परंतु आदिवासी माणूस हा कष्टाच्या भाकरीलाच प्राधान्य देताना दिसतो. त्याला घामातून मिळविलेल्या भाकरीनेच शांत झोप येते आणि यदाकदाचित अन्य मार्गाने कुणी भाकरी मिळविलीच, तर त्यात त्यांचा दोष नाही तर येथील प्रस्थापित

व्यवस्थेचा आहे. त्यामुळेच तर भूकेचा प्रश्न अजूनही आदिवासी समाजाला छळताना दिसतो. अगदी अलीकडच्या काळात आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रचार-प्रसार बऱ्यापैकी झाला आहे. समाजाबरोबर भूकेचे चटके सहन करुन अनेक तरुणांनी शिक्षण घेतले. त्यातील काहींची वैचारिक प्रगल्भता वाढली. अशा काही जाणकारांनी लेखनीची तलवार हातात घेऊन भूक-भाकरीचा फडशा पाडला. पोटाच्या भूकेबरोबर त्यांना ज्ञानाची भूक महत्वाची वाटू लागली.

**"आम्हा भूक लागावी**
**ज्ञानाची पुस्तकी पानाची**
**एक भाकर कमी खाऊ**
**पण शाळेला रोज जाऊ**
**पुस्तकाचे पंख लेऊ**
**गगन भरारी घेऊ"6.**

पोटाची भूक शमविण्यासाठी भाकरीची जेवढी आवश्यकता असते. तेवढीच, किंबहुना त्याहूनही अधिक भूक ज्ञानाची लागावी अशी कवयित्रीने या ठिकाणी अपेक्षा व्यक्त केली. कारण आदिवासींच्या जीवनात भाकरीएवढेच महत्व पुस्तकाला आहे, हे कवयित्री जाणतात. एक वेळ भाकर नाही मिळाली तरी हरकत नाही, परंतु पुस्तकांचा साठा मात्र तुमच्याकडे असायलाच हवा. कारण पुस्तके ही काळाच्या विशाल समुद्रातून वाहून नेणारी फार मोठी जहाजे होत. ती तुमच्याकडे संग्रही असणे जरुरीचे आहे. त्याशिवाय तुम्हाला उच्च स्थानी किंवा वेगवेगळया क्षेत्रात भरारी मारताच येणार नाही, हे कवयित्रीचे म्हणणे अगदी रास्त आहे. आज देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असला, तरी या देशाने येथील मूळनिवासींच्या मूलभूत गरजांची पुर्तता अद्यापही केलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. कुपोषणाचे प्रमाण म्हणावे तर तेही कमी झाले नाही. आदिवासी विकास योजनांचा अजूनही बट्टयाबोळ आहे. आदिवासी आश्रमशाळांची अवस्था दयनीय आहे. □ट्रॉसिटीचा कायदा असूनही आदिवासींवर अन्याय-अत्याचार होतच आहेत. समाजातल्या

अंधश्रध्दांचे पेव कायमच आहे. या व अशा अनेक समाजविघातक समस्यांकडे आदिवासी कवींचा मोर्चा निघाला, तर आदिवासींच्या वाटयाला सुखाचे दिवस येतील अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही.

**संदर्भ** :-


1) बाबाराव मडावी ‘पाखरं’ प्रियंका प्रकाशन, यवतमाळ प्रथमावृत्ती 2009 पृ. 54

2) कविता आत्राम ‘काजवा’ कविता प्रकाशन, धुळे प्रथमावृत्ती-2011 पृ. 8, 9

3) सखाराम डाखोरे ‘रानवा’ डिंपल पब्लिकेशन, वसई-प्रथमावृत्ती-2019 पृ. 82

4) संजय लोहकरे ‘पानझडी’ अक्षता प्रकाशन, पुणे-प्रथमावृत्ती-2011 पृ. 20

5) प्रकाश गारोळे (अप्रकाशित कविता)

6) शीतल ढगे ‘रानफूल’ समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर-प्रथमावृत्ती-2021 पृ. 58


***

# २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण

प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे
महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.

जागतिकीकरण हे भांडवली देशाच्या सुखलोलुप प्रवृत्तीतून झालेले आहे. औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगप्रधान युरोपीय राष्ट्रांनी व्यापाराच्या निमित्ताने जगभर आपल्या वसाहती स्थापन केल्या आणि त्यात गरीब व अविकसित राष्ट्रांची परिस्थिती खालावली. जागतिकीकरण भांडवलीकरण उदारीकरण व खाजगिकरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विश्व स्तरीय सामान्य माणसांचे या बाबींमुळे शोषण होत आहे. जागतिकीकरण ही भांडवलदारांच्या भल्यासाठी जोपासली जाणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरण हे नवे अराजक आहे. प्रचंड प्रमाणातील उपभोगवादी संस्कृती निर्माण करणारी जागतिकीकरण ही प्रक्रिया आहे. जागतिकीकरण हे नवे अराजक आहे. प्रचंड प्रमाणात उपभोगवादी संस्कृती निर्माण करणारी जागतिकीकरण ही प्रक्रिया आहे. पारंपारिक संवेदनशीलता छेदून नवी संवेदनशीलता वाढविणारी जागतिकीकरण ही प्रक्रिया आहे. त्यामुळे समाजजीवनाला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

जागतिकीकरणातील व्यापारी प्रवृत्तीमुळे स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी मात्र बदलत गेली. फॅशन शो, सौंदर्यस्पर्धा, जाहिरात यांच्या नावाखाली तिला प्रेक्षणीय बनविले गेले आहे. या माध्यमातून स्त्री, स्त्रीत्व, मातृत्व, तिची अस्मिता, तिची अब्रू, स्त्रियांचे समाजातील स्थान तिचे परिवारातील राष्ट्रातील स्थान, तिचे अधिकार कर्तव्य याबाबतीत आज जोरकसपणे बोलल्या जाऊ लागले आहे. एकीकडे तिच्या स्त्रीत्वाला आधुनिकीकरणाच्या गोंडस नावाखाली पणाला लावले आणि दुसरीकडे तिच्या स्त्रीत्वाला न्याय मिळावा म्हणून उभा केलेला संघर्ष या चक्रात ती अडकली आहे. आज जागतिकीकरणामुळे तिला वेगवेगळया समस्यांना आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. “जागतिकीकरण हा प्रगत देशांचा विकास आणि आधुनिकीकरण यांच्या नावाखाली सुरू असलेला नवा

साम्राज्यवाद आहे. त्याचा मुखवटा बाजूला केल्यानंतर आपल्या वसाहती आणि साम्राज्यवादी शोषणाचा खरा चेहरा दिसून येतो. एत् देशीय यांचे शोषण करीत त्यांना त्यांच्या मूळ जागेवरुन उखडून फेकणे. त्यांच्या देशातील नैसर्गिक साधन संपत्ती स्वतःच्या नफ्यासाठी पिळून घेत ती नष्ट करणे हे वसाहतवादाचे आणि साम्राज्यवादाचे हेतू या प्रक्रियेतही लपलेले असतात. त्यात सर्वात जास्त भरडल्या जातात त्या स्त्रिया होय. गेल्या काही वर्षात भारत आणि त्याच्या सारख्या अनेक प्रगत राष्ट्रांनी आपला मोर्चा वळवलेला आहे. अशा जमायका, हैती,वेस्टइंडीज,चीन,नायजेरिया इत्यादी देशातून स्त्रियांचा मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू आहे."१ गरीब कष्टकरी वर्गातील स्त्रियांच्या श्रमातील वाढ आणि असहाय दडपणात त्यांना आपले विकावे लागणारे श्रम यासंदर्भातील पार्श्वभूमीवर प्रभा गाणोरकर यांचे वरील मत पटते.

जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर पडलेला आहे. "ग्लोबलायझेशन ही संज्ञा १९८२ पर्यंत ऑक्सफर्ड डिक्शनरीत देखील सापडत नाही. म्हणजे केवळ २०-२५ वर्षातच या संज्ञेने व तिने बोध होणाऱ्या प्रक्रियेने या भूतलावरील हजारो वर्षाच्या सभ्यता व संस्कृतीच्या पायावर उभ्या असणाऱ्या समग्र मानवी समाजाला मुळापासून हादरवून सोडणारा असा त्यांचा कब्जा घेतलेला आहे."२ या पार्श्वभूमीवर संपूर्ण जगाची अनेक पातळ्यांवर फेरमांडणी होत आहे.२१ व्या शतकाला सामोरे जाताना समाजालाही फेरमांडणीचा विचार करावाच लागेल. "विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकातील बदलत्या समाज प्रवृत्ती व साहित्य प्रवृत्ती या स्वतंत्रपणे अभ्यासनीय ठरतात. या प्रकारच्या बदलामागे जागतिक परिस्थितीची ही पार्श्वभूमी आहे. नवे निसर्ग, पर्यावरणीय भान, निसर्ग संपत्ती व मनुष्य संख्या यात निर्माण झालेला घातक असमतोल वाढता बेबंद हिंसाचार, धार्मिक मूलतत्त्ववादाची नवी हिंसक रूपे, जीवनमूल्यांची नाममात्र उरलेले तारण, विज्ञान युगाच्या अफाट प्रगतीचा टप्प्यावर प्रकर्षाने जाणवणारे ब्रह्मनिराशाचे वैफल्य व भौतिक नेतृत्वाचा अभाव, संकुचित अस्मितांचा बुजबुजाट, मनुष्य सृष्टीचे नकळत होत चाललेले खूप खेडेकरण प्रसारमाध्यमांचा विस्तार यासारख्या कितीतरी गोष्टींचा प्रभाव मराठी संवेदनशीलतेवर व सर्जनशीलतेवर अटळपणे पडत आहे. आंतरिक जागतिकीकरणाची ही प्रक्रिया व प्रभाव कोणत्याच

समाजाला यापुढे रोखता येणार नाही."[३] मराठी साहित्यावरही जागतिकीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावात आलेल्या कवयित्री मनाने या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून पुढे येणाऱ्या समाज मानवाच्या अंतर विरोधाचे दर्शन आपल्या कवितांतून दुगोचर केले आहे. जागतिकीकरणाच्या परिप्रेक्षात नवदोत्तरीय मराठी कवितत्रींनी जागतिकीकरणाचे या युगातील बदलाचे, मानवी अनुभवांचे 'स्त्री' घुसमटींचे वास्तव टिपले आहे.

पुराणकाळापासून स्त्री यांना धर्मशास्त्राच्या विषम लेखनाने मुख्य प्रवाहात येऊ दिले नाही. प्राचीन काळात सक्षम असलेल्या स्त्रीला 'चूल-मूल' या कार्यक्षेत्रात जखडून टाकले. नीतिमूल्यात बांधून टाकले, सर्वच स्त्रियांना भस्त्रांची (कातड्याची पिशवी) उपमा दिली. एवढेच नव्हे तर तिचे माणूसपण हिरावून घेतले. स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे उलटून गेल्यावरही तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात फारसा फरक पडला नाही. जागतिकीकरणाच्या या युगात फॅशनच्या जाहिरातींच्या नावाखाली तिला आजही उपभोगत ठरवले जात आहे. जागतिकीकरणात स्त्रियांच्या वाटेला आलेल्या दुःखाची जाणीव कवित्री प्रज्ञा लोखंडे यांना आहे म्हणूनच मानवतेची वागणूक स्त्रियांना मिळाली. तिचा माणूस म्हणून विचार व्हावा एवढीच माफक अपेक्षा त्या व्यक्त करतात. पुराणकाळापासून ग्लोबलायझेशन पर्यंत आलटून पालटून अद्यावत गृहीत धरणं, सहजीवन, संभोग, समभाव, समानता, स्वातंत्र्य समाजाबाहेर सोयीस्कर ढकलणं जागतिकीकरणाच्या चक्रव्यूहाने मानव व मानवी जीवन व्यवहारांना सर्व बाजूंनी कवेत घेतले आहे. मानवी जीवनातील सर्व मूल्य व जीवन मूल्य अक्षरशः कोलमडून पडली आहे. याचे प्रभावी चित्रण 'स्नेहलता चिटणीस' यांच्या "आकाशस्पर्श" (२००६) मध्ये आले आहे. **आजकाल सगळे। विचित्रच घडतंय। माणसातले मोठेपण कमी होतंय। का ते कळत नाही...। पण माणसं बदलली। माणसातलं मी पण वाढत चाललंय। घेणं पुरत नाही। देणं सुचत नाही। चंगळवादात सार बिघडलंय। या घरादाराला ग्रहण लागलंय (आकाशस्पर्श - आजकाल सगळं पृष्ठ क्र.८**

जागतिकीकरणामुळे माणूस विनाशाकडे वाटचाल करतो आहे. यामुळे निसर्ग सुद्धा धास्तावला आहे असेही त्यांना वाटते. **'सारा निसर्गच धास्तावला आहे। कुठल्याच गोष्टीत तृप्त न होणारा ।हा मानव प्राणी**

**।विश्वाचा नाश जवळ जवळ आणतो आहे' (आकाशस्पर्श झाकोळलेला सूर्य' पृष्ठ क्र.१२)** जागतिकीकरणाचा प्रभाव कुटुंबव्यवस्थेवर सुद्धा पडला आहे. मोबाइलच्या रेंजमध्ये काम करणाऱ्या आई-वडील तसेच कुटुंबातील सर्वच घटकातील सुसंवाद हरवत चाललेला आहे. मुलांचे बालपण पार कसून गेले आहे.

आई-वडील दोघेही नोकरीनिमित्त बाहेर. सोबत खेळायला कोणीही नाही. अशावेळी ही मुल घरात असलेल्या कॉम्पुटरवर खेळत राहतात. याचे वास्तव चित्रण 'खेळ' या कवितेतून 'प्रज्ञा लोखंडे' यांनी केलेले आहे.
बंद खोलीत कॉम्पुटरवर। खेळताहेत **।एक एकटी मुलं। अख्खच्या** अख्ख जग त्यांच्या पुढ्यात **।एकावर एक वेस्टनांची । चाळत लावून उभं ।त्यांच्यासाठी आतडं तिमळतिळ । तुटण्याची । वेळच आता संपून गेलीय."(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ.क्र.२४ )** तर **"बाल्य हरवलेली । पण बालिश होऊ इच्छिणारी । ही आजची पिढी । मोबाईलचे खुळखुळे हाती घेऊन । रस्त्यावर हिंडले आहे । चॉकलेटची चव तोंडात घालून । गुळगुळीत वास्तव चघळीत शिकले आहे । (दारातल्या रांगोळीचे रंग, पिढी पृ. क्र.२१)**

या शब्दात 'सिसिलिया काव्हालो' यांनी नवीन पिढीची वेदना मांडली. जागतिकीकरणामुळे भाषा, संस्कृती कुटुंब यांची पार वाताहत झाली. हे सत्य प्राध्यापक 'संध्या रंगारी' यांनी रेखाटले आहे.

"कवितेतून चित्रीत करताना । बाईची मॉम झाली । स्कर्ट घालून कॅफेत गेली । बाचा पॉप झाला । टाय लावून पॉप म्युझीकवर । शेपूट हलवू लागला । पोरगा पाळणाघरात मायबाप वृद्धाश्रमात । (संध्यारंग २०१० पृ. क्र.६७)

जागतिकीकरणाच्या तडाख्यातून मातृत्व ही सुटले नाही. शास्त्रीय संशोधनाने 'सरोगेट मदर' अस्तित्वात आली. स्त्रीला भावनिक आवाहन करून सरोगेट मदर व्हायला भाग पाडले. तिनेही ते स्वीकारले. आर्थिक नड यामुळे भागते आहे हे ही तिच्या लक्षात आले. परंतु पुढे **"सरोगेट मदर होण्यासाठी तिलाही वाटले, काय हरकत आहे? थोडी निवड भागेल । तिच्या बेसावध होकारानंतर । ती मशीनच झाली. गर्भ संभाळून पैसे मिळविणारी." (मिळून साऱ्याजणी- सप्टें. २०१३- बाईपण पृ. क्र. ४३)**

अशा शब्दात तिची व्यथा 'यामिनी रानडे' आपल्या कवितेतून मांडतात. सरोगेट मदरच्या लाभाने आईच्या मातृत्वाची बोली जागतिकीकरणात लावल्या गेली आहे. स्त्रीच्या गर्भाचा उपयोग अर्थ प्राप्तीच्या लालसेने सतत होत राहिला तर तिच्या आरोग्याचे काय होणार याचा विचारही तिच्या मनात आला नाही. तिच्या साथीदाराने आर्थिक हव्यासासाठी या शरीररूपी मशीनची काळजी घेणे सुरू केले. **"आता घरात सुकामेवा फळफळावळ। येऊ लागली फक्त तिच्यासाठी। दोन्ही वेळा दूध घेतलं का? । नवरा आवर्जून विचारू लागला." (बाईपण पृ. क्र.४३)** सरोगेट मदर, स्त्री बीजांची निर्मिती व विक्री, शरीर विक्रय यासारख्या शरीराशी संबंधित घटकांशी बळजबरी जागतिकीकरणाच्या रेट्यात स्त्रीला सहन करावी लागत आहे. जागतिकीकरणाने प्रगत राष्ट्रांचा विकास तर विकसनशील राष्ट्र भकास होत आहे. ही भकासपणाची परिणीती केवळ अर्थव्यवस्थेपुरतीच नाही तर मानवी मन, संस्कृती, समाज, नैतिकमूल्य यांनाही तिने कवेत घेतले. जागरण या कविते सिसिलीया कार्व्हालो म्हणतात, **"कुठे जळतय सदन । साजरे होतेय मरण ।" (दारातल्या रांगोळीचे रंग २००७) औद्योगिक क्रांती,चंगळवाद, जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाची वाताहत होतेय." कुठे फुटतात फटाके । कुठे फुटतात कवट्या । ऐकू येत नाही फटाका । फुटणाऱ्या काळजाचा ।" (दारातल्या रांगोळीचे रंग, काजळतात दिवे पृ. क्र.६१)**

जागतिकीकरणाने सर्वच क्षेत्राला तडाखा दिला आहे. त्यातून शिक्षण क्षेत्रही सुटले नाही. शिक्षण क्षेत्रातील मूळ व्यवस्था पार ढासळून गेली. तिचे बाजारीकरण झाले आहे. याचे चित्रण प्राध्यापक 'संध्या रंगारी' यांनी केले आहे. **जाहिरात करावी लागते । असणाऱ्या नसणाऱ्यांना स्कीलची शिक्षणाचं झालेले बाजारीकरण । शाळा करताहेत धंदा, संस्था म्हणजे दुकान" (संध्यारंग पृ. क्र.८६)** त्यामुळेच या जागतिकीकरणाला ठणकावतात. **"सेझची क्रेज आणून आमचं सरण रचून नका । खाऊ या खाउजा म्हणत । आम्हालाच खाऊ नका।" (संध्यारंग पृ. क्र.६१.)**

जागतिकीकरणाचा प्रभाव जसा मानवी जीवनावर झाला तसाच टो निसर्गावरही झाला याचे चित्रण अत्यंत प्रभावी शब्दात कवयित्री प्रज्ञा लोखंडे करतात, **"आपल्या हातून । सुटल जंगल । सुटल पाणी । सुटली जमीन । तुटली नाती । ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला आपली**

**अस्सल कातडी ." (संध्यारंग २०१० तिच्या जगण्याचा वेणा , ग्लोबल व्हिलेज पृ.क्र.६५)** ग्लोबल व्हिलेजात माणुसकी गमावण्याचा धोका आपल्या समोर आहे .माणूसपण गमावण्याचे भयानक परिणाम आगामी काळात भोगावे लागू शकतात ? हा विचार या कवितेच्या माध्यमातून त्यांनी मानव जातीला दिला आहे.

जागतिकीकरणामुळे शहर आणि खेडे यांच्यात शीतयुद्ध सुरु झालंय याचीही नोंद त्यांनी आपल्या कवितेतून घेतली आहे. "**ग्लोबल व्हिलेज विरुद्ध** I लढतयं माझं खेडं I इंडिया विरुद्ध भारत I चाललंय एक शीत युद्ध I **(संध्यारंग पृ. क्र.१७१.)**

जागतिकीकरणाच्या परिणामाने शेतकरी पार हवालदिल झाला. त्याची ससेहोलपट 'कल्पना दुधाळ' या कवयित्रीने 'सिझर कर म्हणतेय माती' या काव्यसंग्रहात रेखाटली. **"मी टाकलेली मेथी आणि कोथंबीर I मागतेय माझ्याकडं I युरियाचा खाऊ... I आणि लुसलुशीत व्हायचं स्पेअर I रखरखीत झाडांच्या सालीनं I मॉईश्चरायझरचा हट्ट धरलायं...I आणि माती अडून बसली आहे सिझर कर मनत... I मी काय करू I" (सिझर कर म्हणतेय माती २०१० पृ.क्र.१७)**

जागतिकीकरणामुळे प्रचंड स्पर्धा वाढली, निवडणुकीच्यावेळी वाकून पाया पडणारी व्यक्ती निवडून आली म्हणजे पाच वर्षे ढुंकूनही पाहत नाही म्हणून कवयित्री 'विजयालक्ष्मी वानखेडे' आपल्या इशारा काव्यसंग्रहात म्हणतात, **"सावधान अठरा वर्षाच्या मत जा त्यांना सावधान जाणू उद्या त्यांना आपले अस्तित्व सांगा त्यांना ठणकावून आम्हालाही कुणी फिरवू शकत नाही साम दाम दंड आणि झुकू शकत नाही कळसूत्री बाहुल्या प्रमाणे वाचू शकत नाही तरुण रक्ताला धर्म नसतो जात नसते पक्ष नसतो त्याच्या ध्वजाला विशिष्ट रंगहीन असतो एक मात्र जाणीव असते अस्मितेचीI" (इशारा २००० पृ.क्र.४४)**

तर अश्विनी घोंगडे यांच्या कवितेतून जागतिकीकरणाचे चित्रण येते. **"एकावर एक फ्रीच्या वास्तवाला त्या टिपतात. एकावर एक फ्री I त्वरा करा त्वरा करा I हवा तो माल उचला I" (बाय डॉट कॉम २०१० पृ. क्र.२६)**

जागतिकीकरणामुळे बदललेले समाज वास्तव आसावरी काकडे यांनी टिपले आहे पुढील प्रमाणे **–"नवनवीन आजारांच्या भीतीने धास्तावलेला I**

**की कम्युनिकेशन अनावर साधनांनी । बाहेरून सर्वांशी जोडलेल्या आणि आतून अगदी एकाकी झालेला?" (मी एक दर्शन बिंदू१९९९ पृ क्र. ९०)**

जागतिकीकरणामुळे अस्वस्थता, असुरक्षितता, एकाकीपण स्त्रीचे होणारे वस्तुकरण कवयित्री 'मीनाक्षी पाटील' यांनी सातत्याने मांडले आहे की स्त्रीवादी विचारधारा समजणारा पुरुष स्वतःची वस्तू झालाय. **बाईला वस्तू साधन समजणारा पुरुष । स्वतःच कधी झाला वस्तू। हेच कळू द्यायचं नाही त्याला । हाच मोठा आंतरराष्ट्रीय करा" (इज इट इन युअर डी.एन.ए.पृ. क्र.६५)**

जागतिकीकरणात माणसाच्या गरजा ह्या निर्माण केल्या जातात. मानवाच्या हिताच्या नसल्या तरी तीच व्यवस्था राबवली जाते. हे समकालीन वास्तव कवयित्री 'प्रज्ञा लोखंडे' नोंदवितात- **"गच्च ओसंडून वाहतो आहे । शॉपिंग मॉल । गच्च रिकामेच रिकामे आहेत गच्च भुकेले हात गच्च कुठल्या काउंटरवर ठेवलीय । माझी कविता । डिस्काउंट विक्री। (मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा २००७ पृ. क्र.५७)**

जागतिकीकरणामुळे खेडे बदलले आहेत आर्थिक सुबत्ता आली तरी पितृसत्ता, जातसत्ता, वर्गसत्ता या व्यवस्थांना हात लावू शकले नाही. उलटपक्षी या व्यवस्थांना बळकटी मात्र येत आहे. यावर कवयित्री 'नीरजा' भाष्य करतांना लिहितात, **"काळ काम वेगाचं चुकलं आहे त्याचं गणित । जागतिकीकरण आणि त्यासोबत वस्तीला आलेली गती । अर्थ लागत नाही त्यांना कशाचाही । प्रश्न पडू नयेत कोणते म्हणून प्रार्थना म्हणताहेत ती एकसारखी । उत्तराचे पर्याय गोंधळून टाकताहेत त्यांना । मुलांना सापडत नाही सोपा मार्ग । या रक्ताच्या भेंडोळयातून बाहेर पडण्याचा ।" (निरर्थकाचे पक्षी २०१० पृ. क्र.११७)**

ग्रामीण भागातील स्त्रिया आजही दारिद्र्य अज्ञान जातीव्यवस्था सामाजिक सांस्कृतिक आर्थिक प्रश्नांच्या चिखलात रुतले आहेत. व्यवस्थेने तिचे वस्तूत रूपांतर केले. जागतिकीकरणाने भरणाऱ्या स्त्री वर्गाचे विदारक वैषम्य 'हिरा बनसोडे' यांच्या कवितेत येते हिरा बनसोडे म्हणतात, **"पाऊल स्थिर ठेवावे असा जमिनीचा वीतभर तुकडा राहिला नाही माझा म्हणून." (खरं सांगा पृ. क्र.१७)** कुटुंबासाठी संसारासाठी अहर्निश कष्ट उपसणारी स्त्रीची ही व्यथा बोलकी आहे. शेवटच्या श्वासापर्यंत लढणारी स्त्री कवयित्री ज्योती लांजेवार तू कधी दिसली नाही

म्हणून रेखाटतात. स्वातंत्र्यानंतरही स्त्रियांवरील बंधने वाढत आहेत. तिचे बाजारीकरण सुरूच आहे. मॉलसारख्या नवनवीन संस्कृतीत कोंडलेल्या स्त्रियांचे मूळ आक्रंदनाची नोंद कवयित्री प्रज्ञा पवार घेतात **शुगर लॉबी सहकारी दूध उत्पादक संघ। झेडपी सूतगिरण्या । एम.आय.डी.सी., महामंडळ । बाईला नाचविणाऱ्या दौलतजादा करणाऱ्या । सत्तेच्या मत्तेच्या । चिरेबंदी वाड्या वाड्या। (चिरेबंदी वाड्या आरपार लयत, प्राणांतिक पृ. क्र.४४)**

जागतिकीकरणाच्या तडाख्यात स्त्रीने स्वतःला सांभाळून **तिच्या स्त्रीत्वाला हानिकारक गोष्टींना विरोध केला पाहिजे** अशी सूचना कवयित्री उषाकिरण आत्राम देतात. **सावध हो पोरी । हो ! सूर्यसळी । हो! नागकमळी! हो सूर्यफूल । तांबडी पळसाची लाल अंगार । तरचं उठून दिसल । या बाजार फुलक्या तुहा शृंगार। (म्होरकी१९९७ शृंगार पृ. क्र.२५)**

स्त्री जीवनाचे यथार्थ दर्शन, पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रखर प्रहार आणि जागतिकीकरणातील समकालीन वास्तव कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी मांडले आहे- **"खरंच मला नकोय । फक्त स्वतः पुरतीच अनुकूलता । मला नकोय परिघाबाहेरची शाश्वत । शाश्वतता । मला हवीय खूप सुख भोगल्यानंतरची । शांतता । मला हवीय ।खूप दुःख भोगल्यानंतरची । शांतता ।" (अस्मितादर्शन विशेषांक२००५पृथगाल्भ)** येथे 'प्रज्ञा लोखंडे' जणू काही समग्र स्त्री विषयीची जाणीव व्यक्त करीत आहेत. जागतिकीकरणाच्या युगात स्त्रियांना शोषणाला सामोरे जावे लागते. आधुनिक काळात वेगवेगळ्या मार्गाने स्त्रियांचे वस्त्रहरण होत आहे आणि वस्त्र पुरवणारे हात मात्र संस्कृतीकडे गहाण आहेत. व्यवस्थेची कट-कारस्थान उघडे पाडण्याची कवयित्री 'ज्योती लांजेवार' स्त्रियांना जागृत करतांना म्हणतात- **"हर युगात । तुझे वस्त्रहरण । निमित्त वेगवेगळे । वस्त्र पुरवणारे हात । संस्कृतीकडे गहाण । तुझी थोरवी स्वर्गाहून ही महान ।" (अस्मितादर्श विशेषांक २००४ उलथापालथ)**

नव्वदोत्तरी कवयित्रीने प्रस्थापित जाणिवेला छेद देत नव्या व्यवस्थेतून नवी आशा फुलत जाते असे स्वप्न पाहिले कवयित्री विमल वाघमारे म्हणतात- "**कवितेच्या गर्भार ओठांवर । मानवतेच्या कोवळया देठांवर असु दे उद्याचा सूर्य...। भक्कम अवजड बुरुजांवर, तटांवर साऱ्या**

**अवघड, दुर्गम घाटांवर असु दे उद्याचा सूर्य...। खवळणाऱ्या सागराच्या बेफाम लाटावर । संस्कृतीच्या अंधाऱ्या काळीज काठांवर असु दे उद्याचा सूर्य" (प्रकाशाची वाट २००१ पृ. क्र.१८)**

**समारोप**

नव्वदोत्तरी स्त्रियांच्या कवितेतून जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले समाजवास्तव उभे राहते. जागतिकीकरणामुळे स्त्रियांच्या जीवनावर झालेला परिणाम ही कविता अभिव्यक्त करते. महानगर तथा ग्रामीण जीवनात जागतिकीकरणामुळे कोणते बदल झाले. याचे चित्रण ह्या कविता करतात. जागतिकीकरणामुळे मानवी मुल्यांची झालेली घसरण नाही. या कविता अधोरेखित करतात. प्राचीन काळापेक्षाही नवीनच गुलामगिरी स्त्रियांच्या वाट्याला येत आहे. याचेही चित्रण स्त्रियांच्या कवितांमधून होत आहे. इंटरनेटवर वाढता सेक्स व्यापार व स्त्रियांच्या विविध अवयवांचे वस्तूकरण करून चालणारा व्यापार हे जागतिकीकरणाची देण आहे. हे सर्व कोण कधी थांबविणार याचे चित्रण काव्या मधून तितकेसे येत नाही. कुटुंब, नातेसंबंध, शेती, संस्कृती या भोवतीचा फेर या कवितांमधून दिसतो. कार्पोरेट जग लैंगिक पर्यटन केंद्रे, झोपडपट्टी यासारखे अनेक विषय अद्याप दुर्लक्षित आहेत.

**संदर्भ सूची:**


१. शहा मु.ना. संपादक आमची श्रीवाणी - जागतिकीकरण मराठी भाषा व साहित्य सद्यस्थिती आणि भवितव्य वर्ष१६ अंक ऑक्टोबर२००८ ते जानेवारी २००९पृ.क्र.४३

२. डॉ. जोशी श्रीपाद भालचंद्र – जागतिकीकरण संवाद माध्यमे आणि फेरमांडणी चे नवे आव्हान स्वरूप प्रकाशन औरंगाबाद पृ. क्र.१४

३. कोतापल्ले नागनाथ (संपा.)- 'स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी, कला, साहित्य व समाज साहित्य आणि समाज', प्रतिमा प्रकाशन, पुणे२००७ पृ.क्र.१२९


***

# २००० नंतरच्या ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप


## प्रा. डॉ. संजय खाडप

वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर, जि. बीड


२००० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप लक्षात घेत असताना २०२० पर्यंतचा विशेषत: दोन दशकांचा, बदलत्या समाजस्थितीचा चेहरा लक्षात घ्यावा लागतो. आज प्रत्येक खेडे-पाढे, जाती-धर्मामध्ये विभागलेले दिसून येत आहेत. शहरामध्ये आढळणाऱ्या परस्परावरील अविश्वासाने गावातही आपले हात - पाय पसरलेले दिसून येत आहे. राजकारण गढूळ झाले. नापिकी, कर्जबाजारीपणा, अग्ातिकता पराकोटीची असहाय्यता यातून आत्महत्यांची साथ गावा - गावात पसरलेली दिसून येते. माणसाचे मनं अधिच बधी झालेले दिसून येते. त्याचबरोबर परिवर्तन, प्रबोधन याशिवाय अपेक्षा, त्यातील फोलपणा, शिक्षणक्रांती, भ्रमनिरास, वास्तव, भौतिकता आणि माणूस यांच्यातल्या बदलामुळे माणसांचे गौणत्व अशा काही समाज जीवनावर स्पष्ट कोरीव परिणाम करणाऱ्या गोष्टी २००० नंतरची दशके एकूण जबरदस्त पध्दतीने बदलून टाकण्यासाठी कारणीभूत झाल्याचे दिसून येते.

इ.स. २००० नंतर ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. हे बदल म्हणजे राजकारण आणि निवडणूका यांनी माणसांची किंमत व हिम्मत कमी केली. समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण केली. भ्रष्टाचारात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. माहितीचा अधिकार आला. लोक कल्याणकारी नवे कायदे तयार झाले. नव्या शैक्षणिक संस्था व शेतीचं नवं तंत्रज्ञान ग्रामीण भागात आले. साधन आणि संपत्ती यांची सहज उपलब्धी झाली. नोकरी क्षेत्रात ग्रामीण भागातील तरुण मोठ्या प्रमाणात येऊ लागला. जीवघेण्या स्पर्धा वाढल्या. बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली. अहंकार वाढला, माणसाच्या मनामध्ये इतरांबद्दल आकस वाढला. पैसा, मतलब, याच्या भोवतीच दुनिया फिरु लागली. दळणवळणांची साधने, प्रसारमाध्यमे, इंटरनेट, नवे माहितीजाल ग्रामीण भागात आले. याचे परिणाम ग्रामीण बोलीभाषेवर झाले. याचे चित्रण डॉ.भारत हंडीबाग यांच्या 'संवाद चकल्या' या कविता संग्रहात दिसून येते.

**"मला भेटण्यासाठी तू**
**कधीच आला नाहीस वेळेवर**
**आता मात्र तू ये**

**ठरलेल्या वेळी संकेत स्थळावर"**

वरील कवितेत प्रेयशी आपल्या प्रियकराबद्दल तक्रार करताना दिसते. खरंतर प्रियकर असो अथवा प्रेयशी दोघांनाही एकमेकांबद्दल भेटण्याची ओढ असते. दोघा पैकी एकाला जरी येण्यासाठी उशीर झाला तर मनाला रुकरुक लागून राहते. ही रुकरुक, ही ओढ, ही खंत प्रेयशी व्यक्त करते आणि प्रियकराला संकेत स्थळावर ठरलेल्या वेळेप्रमाणे भेटण्याचे सुचवते. प्रेयशीला प्रियकराबद्दल जशी ओढ आहे, तशी प्रियकरालाही प्रेयशी बददलची ओढ डॉ.भारत हंडीबाग यांच्या कवितेत दिसून येते.

**"तुझ्या मनाचे ढग बघून**
**कृत्रीम पाऊस पाडायला गेलो**
**एकही थेंब गळाला नाही तरी**
**नुसतंच विमान उडवीत गेलो. "**

संकेतस्थळ, कृत्रीम पाऊस, विमान इत्यादी शब्द, इत्यादी प्रतिमा ग्रामीण भाषेत आलेल्या दिसून येतात. आज ग्रामीण भागातील व्यक्ती शिक्षण घेऊन नोकरी करु लागला आहे, जैविक शेती करु लागला आहे. रासायनिक खते बियाणे यांचे सर्रास वापर करु लागला आहे. भूता-खेतावरचा विश्वास उडाल्यामुळे गंडे दोऱ्याचे प्रमाण दिवसें-दिवस कमी होत आहे. आज वैज्ञानिक दृष्टीकोण डोळयासमोर ठेवून ग्रामीण जीवन बदलत आहे.

याचे चित्रण जेष्ठ कवी वि.सो.वराट यांच्या कवितेत दिसते.

**"लिंबा नारळाचे चोचले**
**किती दिवस पुरवायचे**
**बळीसाठी पाच-पाच बकरे**
**आणा कुणाच्या बापाचे**
**आमच्याकडून खाणारा तू**
**तूझ्याकडून मिळणार काय ?"**

संत तुकाराम महाराज ज्याप्रमाणे अंधश्रध्देवर प्रहार करतात. अग्ादी त्याचप्रमाण्ो वि.सो.वराट सुध्दा अंधश्रध्देवर प्रहार करतात विज्ञानाची डोळस दृष्टी देतात.

हुंडा घेणे आणि देणे हा कायद्याने गुन्हा आहे, तरीही मोठ्याप्रमाणात हुंडा दिला- घेतला जातो. त्यामुळे अनेक घर दारिद्रयाच्या खाईत लोटले जातात. आज ग्रामीण भागातील मुलं-मुली शिक्षण घेत आहेत. उच्च विद्या विभूषीत होत आहे. त्यामुळे हुंडयाचे प्रमाण कमी होत आहे. आज ग्रामीण भागातील स्त्रीयांसुध्दा हुंडयाच्या विरुध्द आहेत यांचे चित्रण डॉ.भारत हंडीबाग यांच्या कवितेत दिसते.

**"कालेजच्या कार्यक्रमात विद्येन**
**लई चांगलं भाषण केले,**
**मी हुंडा नाही घेणाऱ्याशी**
**अन सिकलेल्या पोरासंगच लगीन करणार**
**मग त्योव कुण्याबी जाती धर्मातला असो"**

आंतरजातीय विवाहाचे प्रमाण पूर्वी शहरामध्येच दिसून येत असे, पण आता याचे लोन ग्रामीण भागातही दिसून येत आहे. आज विज्ञानाने जग घरात आले, पण घरातील माणसं बाहेर फेकल्या गेली. आपली बायको, मुले आणि स्वत: एवढेच मर्यादीत कुंटुंब झालेले दिसते. घरातील वृध्द माणसे नकोशी झालेली दिसत आहे. म्हणजेच शहरातल्याप्रमाणे ग्रामीण भागातही आई-वडील, म्हतारं-म्हातारी नकोशी वाटू लागली आहे. यांचे चित्रण रमेश मोटे यांच्या 'साहेब' या कवितेत दिसून येते.

**"नातवंडांना भेटण्यासाठी**
**म्हातारी लाळ घोटायची**
**गोठ्या मध्यल्या गावंढळ मायीची**
**लाज त्याला वाटायची"**

अशा ही लाळघोठी अवस्था खेडयापाडयातील दिसून येत आहे. नोकरीच्या निमित्त मुलगा शहरात राहतो. आई-वडिलांना मात्र गोठ्यातच ठेवतो. त्यांना नातवडांना भेटावं वाटतं, पण त्यांना भेटता येत नाही. आज मुलाला आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांची लाज वाटत आहे. अशाप्रकारे २००० नंतरची ग्रामीण कविता, तीचे स्वरुप तीचे बदलते जीवन पहाण्यास मिळते.

**संदर्भ :**


1) ग्रामीण साहित्य - स्वरुप आणि संदर्भ, संपा.प्रा.डॉ.जयद्रथ जाधव.
2) संवाद चकल्या- डॉ.भारत हंडीबाग
3) बरस बरस मोती- वि.सो.वराट
4) राना- मनातील कविता - रमेश मोटे.
5) धनी - डॉ.भारत हंडीबाग


***

# कृषी कृषक जीवन वेदना- “भोग सरू दे उन्हाचा”

**डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे**

मराठी विभाग प्रमुख, सहयोगी प्राध्यापक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर ता. नवापूर जि. नंदूरबार

**प्रास्ताविक :**

२००० नंतरच्या ग्रामीण समाज वास्तवाचा विचार करताना समकालीन जीवन विचारात घ्यावे लागते. ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण समाज जीवन या घटकांचा विचार मांडताना, साहित्य आणि २००० सालानंतरचे ग्रामीण समाज जीवन यामध्ये अमूलाग्र बदल होत गेला. पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांचे शेती, गावगाडा, ग्रामव्यवस्थाशी असणारे घनिष्ठ संबंध आज बदलले आहेत. २००० साला नंतर संपूर्ण ग्रामीण जीवन, शेतीव्यवस्था पूर्णत: व्यवहारिक, आर्थिकदृष्टीने होत असल्याचे दिसून येत आहे.

पूर्वीच्या काळातील शेतीसाठी विहीरीवरील मोट, बैलबारदाना, पशूधन या गोष्टी महत्त्वाच्या होत्या. परंतु १९८० पासून आणि २००० नंतरचे ग्रामजीवन खूप बदलले. यंत्र युगाचा प्रारंभ शेतीमध्ये मोठया प्रमाणात होऊ लागला. काळीआईशी असणारी नाळ अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. उत्पादन वाढवणे, यंत्राचा, रासायनिक खतांचा वापर इत्यादी गोष्टीमुळे पारंपरिक शेती व्यवस्था यंत्राच्या सहाय्याने वाटचाल करु लागली.

ग्रामीण समाज वास्तव कृषी-कृषक व्यवस्था समजून घेण्यासाठी काळीआई आणि पाढंराई विचारात घ्यावी लागते. शेतीमध्ये झालेल्या विविध बदलाचा परिणाम पाढंराईवर ही मोठया प्रमाणात झाला. त्याचेही भयानक वास्तव दिसून येते. शब्दालय प्रकाशनाने २००७ मध्ये प्रकाशित केलेल्या ‘कवी कैलास दौंड’ यांच्या “भोग सरू दे उन्हाचा” या काव्यसंग्रहातून कृषी-कृषक जीवन वेदना चित्रित केल्या आहे.

**शतकोत्तर ग्रामजीवनाचे बदलते वास्तव रुप :**

'कवी कैलास दौंड' यांनी "भोग सरू दे उन्हाचा" या काव्यसंग्रहामधून बदलती ग्रामजीवन व्यवस्था, कृषी व्यवस्थेचे स्वरुप चित्रित केले आहे. 'डॉ. गणेश देशमुख' यांच्या शब्दात सांगायचे तर- "व्यंकटेश मांडगूळकरांच्या 'बैलगाडी' व 'सर्व्हिस मोटार' यांचे नाविण्य संपुष्टात येऊन टॅक्टर, जीप, बस, टक, रेल्वे ही वाहने, रस्ते, वीज, नळयोजना, निवडणूका, दूरचित्रवाहिण्या, संगणक, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट, हॉटेल, ढाबा, पाणटपऱ्या, चित्रपट इ. अनेक कारणांनी ग्रामीण जीवनाचे पूर्वापार स्वरुप अमूलाग्र बदलले. आज स्वतंत्र, स्वंयपूर्ण खेडे हा केवळ इतिहासाचा भाग ठरत आहे. तर दुसऱ्या बाजूने शेती करण्याची पद्धत अवजारे बियाणे, शेतीकडे बघण्याची परंपरागत दृष्टी इ. ग्रामीण समाज वास्तव बदल्याने ग्रामीण साहित्यातून प्रकटणारे ग्रामीण विश्व बदलले."-१ 'कैलास दौंड' यांनी शतकोत्तर ग्रामजीवन व्यवस्था टिपण्या बरोबरच गाव पांढरीमध्ये व काळयाआईसोबत शेतकऱ्यांची, सामान्य ग्रामीण माणसाची जीवघेणी कोंडी रेखाटली आहे.

**अन्न, वस्त्र, निवारा इ. गरजांच्या पूर्तीचा अभाव-**

'कवी कैलास दौंड' यांनी शेतकऱ्यांची दु:खाची व्यथा आणि वेदना लिहिण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

**"गाव नदीत हिंडला**
**बंधाटयाचा शोध घेत घेत**
**उसवल्या सपराला**
**मनामधी शेकारीत"** (पृ.क्र.७२)

या कवितेमधून शेतकऱ्याला आयुष्यभर कष्ट करुनही राहण्यासाठी साधे घर बांधणे शक्य होत नाही. शेतामध्येच छोटया झोपडीत गवत, लाकूड शेणमातीच्या सहाय्याने बनवलेल्या शेणकुडाच्या छप्पारामध्ये राहावे लागत असल्याचे दिसून येते. रानात, जमिनीवर उघड्या या आकाशाखाली दमून, थकून विसावा घेण्याशिवाय पर्याय शेतकऱ्याकडे नाही म्हणून कवी म्हणतात-

**"जशी जन्मदेते माती, तशी माती जगविते.**
**थकलेल्या जिवालाही माती, अंती मांडी देते."** (पृ.क्र.१७)

शेतकऱ्यांचा जीवन जन्म झाल्यापासून शेतात राब-राबून जीवनाच्या शेवटी त्याला मातीतच गाडून घ्यावे लागते. आजच्या एकविसाव्या शतकातही ग्रामीण माणसांना आणि शेतकऱ्यांना शेतात कितीही श्रम केले तरी त्याला पोटभर अन्न मिळत नाही. सर्वांना अन्न पुरविणारा जगाचा पोषिंदा शेतकरी भूमिपूत्र शेवटी उपाशीच रहातो.

**शेतकरी कुटुंबातील स्त्री चित्रण-**

"भोग सरू दे उन्हाचा" या कवितासंग्रहामधून 'कवी कैलास दौंड' यांनी कुणबीन स्त्रीचे चित्रण रेखाटले आहे. ते म्हणतात---

**"नसं घरामंदी पीठ, आणि गोणी मंदी दाणं**
**तरी लेकराच्यासाठी, तीनं गाईलंया गाणं"** (पृ.क्र.७८)

शेतकऱ्यांच्या घरात लहान थोरांना शेतात काम करावे लागते. शेतकऱ्याची स्त्री आपल्या धन्याच्या खांद्याला खांदा लावून लेकरांसाठी राबते, 'कवी विठ्ठल वाघ' यांची "काळयामातीत मातीत 'तिफण' चालते" या कवितेतील कुणबीन स्त्रीचे स्वन म्हणजे- "काळया ढेकलात डोळा हिरवं सपान पाहतो, डोळा सपान पाहतो, काटा पाया रुततो. काटा पायात रुतता,......... लाल रगात सांडतं, लाल रगात सांडत, हिरवं सपान फुलतं." या कवितेतील स्त्री प्रमाणे 'कवी कैलास दौंड' यांची कुणबीन स्त्री कुटुंबासाठी, मुलांसाठी पतीप्रमाणे स्त्री ही वेळ प्रसंगी उपाशी राहते. आपल्या जीवनाला मातीत गाडून मुलांच्या भविष्याची उ्ज्वल स्वप्न उराशी बाळगते.

**कुणब्याचे उज्वल भविष्याचे स्वप्न अपूर्ण-**

कुणबीन स्त्री प्रमाणेच शेतकरी बळीराजा शेतात राबराबतो त्यांच्या कष्टला सीमा नाही, अंत नाही. म्हणून कवी कैलास दौंड म्हणतात....

**"जरी झाकूवनी मढं, केली रानात पेरणी,**
**शिवारातून उगेल, साऱ्या जगाची शेरणी"** (पृ.क्र.१६)

सर्व जगाचा पोषिंदा बळीराजाचे जीवन हे जनावराप्रमाणे राबण्यात व्यतीत होते. शेतीमध्ये बैल जेसे नांगराला जुंपले जातात. त्याचप्रमाणे शेतकरीही आयुष्यभर शेतीला जुंपून घेतो. त्या कष्टामधून त्यांची सुटका कधीच

होत नाही. ऋतूचक्राबरोबरच हा बळीराजा सतत शेतात गुंतलेला रहातो. शेतात चांगले पीक येईल या आशेवर मेहनत करुन उज्ज्वल भविष्याचे स्वप्न उरात बाळगतो.

**बळीराजाच्या डोक्यावर कर्जांचा वाढता डोंगर-**

भारतीय कृषी व्यवस्था ही देशाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे. परंतु भारतीय शेतीही निसर्गासोबत खेळला जाणारा जुगार आहे. निसर्गाने साथ दिली तर बळीराजा शेतात सोनं पिकवेल परंतु निसर्ग विरोधात गेला तर बळीराजाच्या कष्टाला मातीचे मोल मिळते. म्हणून पाऊस वेळेवर चांगला पडला तर पीक, सुगी चांगली होईल अशी माफक अपेक्षा असते. म्हणून ‘कवी कैलास दौंड’ म्हणतात.....

**“देणे रानाचे फेडण्या, येते उमलूनी सुगी**
**रिणं सुगीचे फेडायला, कर घट्ट मन उगी”** (पृ.क्र.१३)

काळीआई ही भर भरुन देते. पण शेतीचा खर्च आणि महागाईमुळे शेतकऱ्यांना खूप महाग दराने खाजगी सावकाराचे कर्ज घ्यावे लागते. ते फेडण्यासाठी पिकाची वाट पाहावी लागते. ‘डॉ. सतीश बडवे’ म्हणतात.... “निसर्गाची अवकृपा, सामाजिक व्यवस्था आणि मूल्यहीन राजकारण यामुळे पिचलेला ग्रामीण माणूस किंवा शेतकरी विद्रोहाचे नारे लावताना दिसत नाही. मातीशी असणारे घट्ट नाते त्याला तोडता येत नाही आणि तिथला गोतावळा सोडताही येत नाही.” २ तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करण्याशिवाय पर्याय त्यांच्या जवळ रहात नाही.

**शेतकरी आत्महत्याचे चित्रण-**

‘कवी कैलास दौंड’ यांनी “भोग सरू दे उन्हाचा” या कविता संग्रहामधून शेतकरी आत्महत्येच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. बळीराजा हा काळीआई मधील देव देवतांना पूजतो. देवाची उपासना, आराधना करतो. परंतु निसर्ग, शासकीय कायदे इ. घटकामुळे बळीराजा कर्ज बाजारी होतो. म्हणून कवी म्हणतात........

**“म्हसूबाच्या लिंबाला, नाम्या फाशी घेऊन मेला,**

**म्हसुबाला शेंदूर कवा लागलाच नाही,**
**शिवाराला म्हसूबा पावलाच नाही"** (पृ.क्र.२६)

पारंपरिक शेती व्यवसायावर बळीराजाची उपजिविका भागत नाही. "शेतकऱ्यांच्या प्रश्नापासून दूर जाणाऱ्या शेतकरी संघटना आणि सहकार चळवळील बँका, सोसायट्या, पतपेढया, साखर कारखानदारी, रासायनिक बी-बियाणे, खते, किटनाशके फवारण्या, महागाई, वांझोटी बियाणे या भांडवलदार दुकानदाराकडून फसवला व लुटला चाललेला शेतकरी, सावकारी व बँकाचे न फिटणारे कर्ज."3 यामुळे दिशाहीन झालेल्या बळीराजाचा इथली व्यवस्था बळी घेते. पर्यायाने शेतकऱ्याला आत्महत्या करण्याची वेळ त्याच्यावर येते याची कारण मीमांसा 'कवी कैलास दौंड' यांनी केली आहे.

**ग्रामीण आणि शहरी जीवनातील विरोधाभास-**

'कवी कैलास दौंड' यांनी ग्रामीण जीवन आणि शहरी जीवनातील विरोधाभासाचे उत्तम चित्रण केले आहे. ग्रामीण जीवन हे कृषीशी निगडीत असून निसर्गावर उवलबूंन आहे. पाऊस वेळेवर पडला तर शेती पिकेल नाही तर शेतकऱ्यांचे जीवन उध्दवस्त होते. परंतु शहरी जीवनावर या लहरी निसर्गाचा फारसा परिणाम होत नाही. शहरी बाग बगीचे, बंगल्यातील बागा फुलतात. बागेत पाण्याचे फवारे उडत राहतात. परंतु ग्रामीण जीवनात शहरापेक्षा वेगळे विरोधी चित्र पहायला मिळते म्हणून कवी म्हणतात....

**"सारी सुकतात इथे, काही जण काही झाडे**
**बंगल्याच्या बगीच्यात, पाणी कारंज्याचे उडे"** (पृ.क्र.२०)

शेतीला पाणी मिळत नाही, पिण्यास पाणी मिळत नाही. पाण्यावाचून पिके जळून जातात. आणि शेतकऱ्यांनी पाहिलेले सुगीचे, सुखद स्वप्न, उध्दवस्त होते. याचे दर्शन 'आगोठ', 'रोज पेर्तें व्हा' इ. कवितामधून 'कवी कैलास दौंड' यांनी चित्रण केले आहे. "खेड्यातील सुतार, लोहार, चांभार, कुंभार, सोनार, शिंपी, कोष्टी, न्हावी, कोळी इ. परंपरागत उद्योग धंद्यामध्ये फार बदल झाला आहे. आधुनिकीकरणामुळे त्यांचे स्वरुप पार बदलले आहे. त्यामळे पैशा अभावी त्यांना परंपरागत धंदे बंद करुन खेडयातच इतर श्रमाची

कामे करावी लागत आहेत. सगळयांनाच स्वत:च्या खेडयात अशी श्रमाची कामे मिळत नाहीत. म्हणून शहराकडे धाव घ्यावी लागत आहे. त्यामुळे त्यांना सक्तीचे उपरेपण प्राप्त झाले आहे. शहरातून त्यांचे निवासाचे नित्याच्या रोजगाराचे प्रश्न निर्माण झाले आहेत."[४] शहरात उघडया मैदानात आणि जेथे जागा मिळेल तेथे झोपडपट्टयामध्ये राहावे लागते. पर्यायाने शहराच्या आजुबाजूला नवनवीन झोपडपट्टया अस्तित्वात आल्यामुळे शहराचे आकारमान वाढत आहे. ग्रामीण भागात वीज कधी-कधी येते. तर शहरात दिवसरात्र वीज उपलब्ध्र असते. शेतात पाणी असते. परंतु वीज नसल्यामुळे शेतीला पिकाला पाणी देता येत नाही. तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही ग्रामीण भागात बिकट आहे. स्त्रियांना डोक्यावर पाणी लांबून वाहून आणावे लागते, अशा अनेक सोयी सुविधांचा विरोधाभास ग्रामीण भाग आणि शहरी भागात दिसून येतो.

**कृषी उत्पन्न बाजार समिती की, लुटारूंची टोळी ?**

"भोग सरू दे उन्हाचा" या कविता संग्रहामधून शेतकऱ्याच्या शेतमालाला बाजरभाव योग्य प्रमाणात मिळत नाही. वेळप्रसंगी कष्टाने घाम गाळून पिकविलेला शेतमाल रस्त्यावर फेकून द्यावा लागल्याचे दिसून येते. कवी म्हणतात...

**"सोनं पिकलं रानात, होते बाजारात माती,**
**सालोसाल तुझे कष्ट, असे केरात जाती,**
**तुझ्या कबाड कष्टाला, नाही मिळणार भाव**
**तुझ्या जीवनाची बोली तुच बाजारात लाव"** (पृ.क्र.९)

ग्रामीण शेतीही विविध संकटांचा सामना करुन तग धरुन आहे. आस्मानी सुलतानी संकटांची अव्हाने ती पचविते.... "लोक प्रशासनातील शासकीय कर्मचारी, आडते, खरेदीदार, सरकारी धोरणे लहरी निसर्ग या सर्व घटकांकडून आणि समकालीन समाज व्यवस्थेकडून शेतकऱ्यांचे होत असलेले दीर्घकाळ शोषण."[५] यांच्या कचाटयात, सापडलेल्या शेतकऱ्याची व्यथा, वेदना ही, 'दाम', 'भाव', 'धूळमाती', 'अंश' इ. कवितेमधून शेतमालाची बाजार

व्यवस्था आणि तेथे होणारी लुबाडणूक 'कवी कैलास दौंड' यांनी चित्रित केलेले आहे.

**शेतकऱ्यांमधील वाढत्या व्यसनाधीनतेचे चित्रण-**

'कवी कैलास दौंड: यांनी "भोग सरू दे उन्हाचा" या कविता संग्रहामधून ग्रामीण भागातील सर्व सामान्य माणूस आणि शेतकरी ऊसतोड कामगार म्हणून गाव सोडून परप्रांतात ऊस तोडीच्या कामाला जातो. दिवसरात्र ऊस तोडून बैलाप्रमाणे राबराबून साखर उद्योगाला चालना देणारा शेतकरी, बायको, मुलांसह साखर कारखान्यावर ऊस पोहोचवतो. अल्प मोबदल्यात प्रचंड कष्ट उपसतो. त्याच्या श्रमाला, कष्टाला उतार पडावा, श्रमपरिहार व्हावा म्हणून ऊसतोड कामगार त्या ऊसाच्या मळीपासून तयार झालेली दारु पिऊन झिंगू लागला आहे. म्हणून 'कवी कैलास दौंड' म्हणतात...

**"बांधा बांधावरली झाडं**
**मळी पिऊन झिंगू लागली**
**तोडणारी कोयती मात्र**
**रानोमाळ पांगली"** (पृ.क्र.६७)

आर्थिक व्यवस्थेपुढे झुकलेल्या आणि सर्व प्रकारच्या संकटात सापडलेला शेतकरी उध्दवस्त झाला आहे. याचे चित्रण कवीने, 'घरकुलाचं स्वप्न', 'वेध', 'सैरभैर', 'परजून घेऊ', 'पाहू नका वाट' इ. कवितेमधून चित्रित केले आहे.

**समारोप :-**

२००० सालानंतर ग्रामीण जीवनामध्ये मोठयाप्रमाणात स्थित्यंतर घडत आहे. याचा प्रभाव सर्वसामान्य माणूस आणि शेतकरी, आणि शेतीवर झाला आहे. शहराचे आकर्षक आणि शहरीकरणामुळे ग्रामीण जीवनाचे स्वरुप अंर्तबाह्य बदलून गेले. भौतिक सुविधांचे जाळे खेडयापर्यंत पोहोचले. सेंद्रिय शेती आता रासायनिक खताच्या सहाय्याने होवू लागली. पशूधन जावून यंत्रांचा मोठया प्रमाणात वापर होऊ लागला. ग्रामीण माणूस अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरु लागला. कर्ज बाजारीपण वाढले. परिणामी शेतकऱ्यांना आत्महत्या करणे सोयीचे वाटू लागले. शेतकरी आत्महत्येचे भांडवल करुन राजकीय लोकांनी आपली पोळी

भाजून घेतल्याचे ही दिसून येते. शेतमालाच्या बाजारभावाचा प्रश्न गंभीर बनला आहे. इ. सर्व घटकाचे चित्रण 'कवी कैलास दौंड' यांनी "भोग सरू दे उन्हाचा" या कविता संग्रहामधून दिसून येते.

**निष्कर्ष:**

१. 'भोग सरू दे उन्हाचा' या कविता संग्रहामधून 'कवी कैलास दौंड' यांनी ग्रामीण जीवन, कृषी व्यवस्थेचे भीषण वास्तव चित्रित केले आहे.

२. मराठी साहित्यामध्ये २००० नंतरच्या शतकोत्तर ग्रामीण कवितेच्या इतिहासामध्ये 'भोग सरू दे उन्हाचा' या कविता संग्रहाचे महत्त्वाचे योगदान आहे.

३. 'कवी कैलास दौंड' यांनी अतिशय सोप्या भाषाशैलीत आपल्या बळीराजाची व्यथा आणि वेदना मुखर केली आहे, त्यामध्ये भावनेचा ओलावा आहे. कवींनी आपल्या कवितेमधून समकालीन व्यवस्थे विरुद्ध आक्रोश, आक्रस्ताळेपणा कोठेही दिसत आहे.

४. 'भोग सरू दे उन्हाचा' या कविता संग्रहामधून ग्राम जीवनाचे वास्तव दर्शन घडवून वाचकापर्यंत पोहचवून विचार करण्यास प्रवृत्त केले आहे.

५. ग्रामीण जीवन आणि शहरी जीवनातील परस्पर विरोधी वास्तव मांडले आहे.

६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या मागील कारण मीमांसा केली आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. देशमुख गणेश : '१९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी', '१९८० नंतरचे मराठी साहित्य: स्वरुप आणि समीक्षा' संपा. डॉ.जयद्रथ जाधव, डॉ. भरत देशमुख अरुणा प्रकाशन लातूर प्र.आ.२०१२ पृ.क्र.१०६ ते १०७

२. डॉ. बडवे सतीश : '१९८० नंतरच्या ग्रामीण कवितेची बदलती रुपे : एक दृष्टिक्षेप','१९८० नंतरचे मराठी साहित्य: स्वरुप आणि समीक्षा' संपा. जयद्रथ जाधव, डॉ. भरत देशमुख अरुणा प्रकाशन, लातूर प्र.आ.२०१२ पृ.क्र.६९

३. डॉ. जाधव जयद्रथ : 'मराठी ग्रामीण कादंबरी: संशोधनाच्या नव्या दिशा' '१९८० नंतरचे मराठी साहित्य: स्वरुप आणि समीक्षा' संपा. डॉ. जाधव, डॉ. भरत देखमुख, अरुणा प्रकाशन लातूर प्र.आ.२०१२ पृ.क्र.२०६-२०७

४. डॉ. मुलाटे वासुदेव : संपादकीय प्रस्तावना- 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही' मेहता पब्लिशिग हाऊस, पुणे प्र.आ.१९९६ पृ.क्र. नाही

५. डॉ. जाधव जयद्रथ : तत्रैव


***

# २००० नंतरच्या शेतक-यांचे जीवन चित्रण : विशेष संदर्भ 'कुणब्याच्या पोरा'

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव,ता. चाकूर जि. लातूर.

शेतक-यांच्या ठिकाणी व संयुक्त कुटुंबातील व्यक्तींच्या ठिकाणी जाणवणारे ताणेबाणे, कंगोरे हे जितक्या रेखीवपणे त्यांच्या हाती लागले तितक्याच प्रभावीपणे शेतक-यातील बापाचे माणूसपण, खुजेपण, असहायताही त्यांनी टिपकागदासारखी टिपली आहे. बाप माझा या कवितेत एकत्र कुटुंब पध्दतीत सदस्यांची संख्या जास्त असते. खाणारी तोंडे जास्त आणि राबणारे हात कमी असतात. तरीही बापाचे प्रेम सर्व मुलांवर सारखेच असते. बापाचाही नाविलाज आहे. दारिद्रय त्यांच्या जीवनात गडद रंग घेऊन आले आहे. सावकाराचा नोकर झुंजरक्यालाच वसुलीसाठी येत असे. त्याला पाहून बापाचा प्राण वैतागून जाई. एक-दोन म्हणत अर्धा डजन झाली लेकरं. पाळणा वर्षालाच घरात हलू लागला. बाप शेतात कष्ट करून बेजार होत असे. गरीबीला सतरा भोकं असतात. एक शिवलं, बुजवलं की, दुसरं उसवत असते. बापाच्या नशिबी थोरलं पोरगं चांगल दुसरा, चौथा बोलत नाही तिसरं, पाचवं लंगडं सहाव्याला बघायची गरज नाही. बाप उभं आयुष्य जाळात काढी फासावरच्या सुळावरी एकच कपडा घाली सालोसाल अंगावरी पाणी रक्ताचं करत बापकरी काम शेतात. इतकी दैना शेतकरी बापाची होते. त्याच्या कष्टाला सिमा नसते. बापाला एकच अपेक्षा होती की, कवीने शिकावे, अभ्यास करावा, आनंदाने पोटभर भाकर खावे जे आपल्या वाटयाला दु:ख वेदना आली आहे ते आपल्या पोरांच्या वाटयाला येऊ नये असे वाटते. हे स्वप्न बापाचे कवीने खरे करून दाखविले. शिकून पदवी घेऊन नोकरी मिळवली. कवीने बापाला नोकरी लागल्यानंतर नोकरीच्या गावी सोबत घेऊन जाण्याचे ठरविले. परंतु बापाने नकार दिला. ज्या गावात, शेणा-मातीच्या घरात, गावपांढरीत जन्म झाला त्याच गावात, घरी शेतकरी, ग्रामीण माणूस मृत्यू झाल्यानंतर मिसळून जाण्याचा निश्चय करत असतो. बापाकडे बघताना कवीचे -हृदय भरून आले. बापाने पूर्वीचे दिवस, भूतकाळ विसरलेला नाही. वृध्द वयातही हातात काठी घेऊन बाप शेताला चक्कर मारून येताना

रिकाम्या हाताने कधीही घरी येत नाही. जातीवंत कुणब्याची ही खरी-खुरी लक्षणे असतात. काळया शेतात कष्ट करून शेतकरी बाप कष्ट करून शेती करतो. तेंव्हा कुठं त्यातून सोनं उगवतं. पिकाला बहर येतो. अशा काळया मातीची माया अपार असते. या मायेला सीमा नसते. सर्व जगाचं पोषणही तीच करते. ग्रामीण भागातील कृषिजीवनातील कुणबी व मूकं जनावरं, बईल या दोहोबाबत कवीच्या मनात प्रगाढ सहानुभूती आहे. या दोहोचेही कष्ट, यातना, जीवघेणे सोसणे हाच कवीच्या मनातील मंथनाचा धागा आहे. केवळ दृश्यात्मक चित्रणच येते असे नाही तर चिंतनाचाही स्पर्श त्यास जाणवतो. गाय, बैल, म्हैस, वासरं, वंटरं, शेळया, मेंढया, कोंबडे, फास, इडी, फारूळं, फाळ, जानवळं, कुळवं, कुत्रं, मांजर, येस, शिव, निसर्ग, डोंगर, नदी, काळी माती, गावातील माणसं, गोठा, कोप, बैलगाडी हेच शेतक-याचा गोतावळा आहे. कष्टातूनच खायला मिठभाकर कांदा मिळतो. म्हणून तर होत नाही कधीच वांदा, शेतक-यांच्या घरी गाई-म्हशीचे दुध-दुभते असते. शेतातील पीकाला कधीचे झाकण नसते. आळया, बुरशी, मावा, कल्यामल्या, चिकटा, टोळधाड, करपा असे ईगीन पडतात. त्यामुळे शेतकऱ्यांची पिकं काळवंडतात आणि नुकसान होते. मुंगीपासून ते राजापर्यंत शेतकऱ्याला ओरबडून खातात. शेतकऱ्या इतका उदार प्राणी पृथ्वीवर दुसरा कोणीही नाही. शेतकरी बैलाच्या खुरात लक्ष्मी असते असे मानतो. मुका बिचारा आपले कष्ट, आपले दुःख कोणाकोणाला सांगणार आणि सांगितलं तरी ते कोण जाणून घेणार. उलट त्या मुक्या बैलाच्या अंगावर झुली घालून त्याचा उत्सव करतात. बैलाच्या या दुःखाला कधी वाचा फोडणार. वेदात जेव्हा नव्या ऋचा येतील त्यासाठी रक्ताची शाही त्या लिहिण्यासाठी लागेल. कष्टाच्या श्रमाची त्यावेळी खरी कदर होईल व त्याची पूजा केली जाईल. काळया मायशी इमान राखून बाप शेतात कष्ट करतो. भविष्यातील सुखाच्या आशेने रोज घाम गाळतो. ग्रामीण संस्कृतीची आपले नाते जुळून आणि शेतकरी काळया मातीला माय समजून बाप चंद्र निघाला की, कुंदा खंदाय शेतात जातो. कवीची आई म्हणजे साक्षात लक्ष्मीच आहे. भल्या पहाटे आई दळण दळत ओव्या गात महालक्ष्मीच्या सणा दिवशी मायच्या अंगावर फाटके लुगडे परंतु नटून-थटून महालक्ष्मीचे पूजन करते. शेतातील धान्याच्या राशी लक्ष्मी पुढे मांडते खडीसाखरेने लक्ष्मीची ओटी भरते आणि दंडवत घालून लक्ष्मीला यंदा तरी माल येऊ दे बळदाला असे मागणे मागते. ग्रामीण संस्कृतीची श्रेष्ठ परंपरा आहे. ग्रामीण जीवन प्रणालींची मुळे किती उदात्त आहेत हे लक्षात येते. कवी मारुती कच्छवे यांचे पाया

खालची जमीन सोडत नाही विसरत नाहीत. 'लागले कापसाला, कापसाला मोठाली बोंड माझ्या मायेच्या, माईच्या लुगड्याला दांड मिळत नाही घालायला सदरा. या शेतीचा, शेतीचा शेत अधिकारी बाप झालाया, झालाया कर्जबाजारी सावकार मारती त्याच्या घरी चकरा'' चंद्राला लाजवणारे कापसाचे पांढरी शुभ्र बोंड पाहून आपल्या देशातील राब राब राबत्या माय माऊली चे स्मरण होते. माळरान असले तरी कष्टातून फुलवले आहे. कापसाचे उत्पादन करूनही लज्जारक्षणापुरते कापडही मिळू नये हे क्रूर वास्तव त्यांना अस्वस्थ करून सोडते. शेती माती आणि त्यात राहणाऱ्या माऊलीला ते विसरू शकत नाहीत. म्हणूनच त्यांचा एक हात बहिणाबाईच्या व विठ्ठल वाघ यांच्या हाती आहे, तर दुसरा हात इंद्रजित भालेराव यांच्या हाती आहे असे दृश्य मला दिसते. कष्ट करणारा शेतीचा मालकच आज स्वतःला विकायला निघाला आहे. कारण तो कर्जबाजारी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या घरी सावकार चकरा मारत आहे. नैतिक मूल्यांची पडझड, भ्रष्ट पुढारी, राजकारण्यांनी केलेल्या शोषणामुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्याचे वास्तव चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला कवडीमोल किंमत मिळत असल्याने शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडला आहे. अन्यायाचा अंधार वाढला आहे. सामान्य गरीब लोकांचा वाली कुणीच नाही विविध शासकीय योजनांत भ्रष्टाचार करून गोरगरीबांना विकासापासून वंचित ठेवले आहे. सोसायटीचे कर्ज, सावकाराचे कर्ज शेतकऱ्यांना डोईजड झाले आहे. कर्जाने त्रस्त होऊन काही लोक आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाली आहेत. शेतकऱ्यांच्या दुःखाची करून कहाणी अतिशय तरल, मोजक्या आणि नेमक्या शब्दात मांडली आहे. निसर्गाचे चक्र उलटे फिरले आहे. माणसाचाही समतोल बिघडलेला दिसतो. या रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला धीर देण्याचा प्रयत्न कवी करतो आहे. 'थांब जरा बळी दादा मरू नको रे' या कवितेतून कवी कच्छवे आज ना उद्या एक दिवस तुला चांगले दिवस येतील आणि तुझ्या हिताचा कायदा होईल अशी अपेक्षा दाखवून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याला मरू नको म्हणून आधार देण्याचा प्रयत्न करताना म्हणतात, ''जीवनाचा अंत दादा करू नको रे थांब जरा बळी दादा मरू नको रे झुंझुरकीपासून राणी करतोस काम मातीत मिसळला तुझा कि रं घाम तू आहेस जगाचा पोशिंदा विसरू नको रे, तुझ्या अंगात हाय सदा फाटकी बनी काळयामातीत राबतुस पायी अनवाणी तु झाकतूस जगाची इज्जत विसरू नको रे भारत हा कृषिप्रधान देश येथील लोकांचा वेगळा वेश सगळयांच्या नजरा तुझ्याकडं घाबरू नको रे काळया

मातीच सोनं दिलं तुला निसर्गानं तिला होऊ नको रे कधी तू बेईमान एक दिस तुझ्या हिताचा कायदा येईल रे थांब जरा बळी दादा मरू नको रे" कायदा, निसर्ग, रोगराई, वाढती महागाई, शेतमालाला भाव मिळत नाही, कर्जाचा डोंगर, भ्रष्टाचार, महागडी रासायनिक खते, बी-बियाणे, अस्मानी सुलतानी संकटे शेतकऱ्याची पाठ सोडत नाहीत. परंतु कवी शेतकऱ्याला जीवन जगण्यासाठी धीर देतात. आपला भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. सर्वांचे लक्ष तुझ्याकडे आहे. म्हणून बळीदादा घाबरून जीव देऊ नको. निसर्गाने शेती हे तुला सोनं दिलं आहे तिला बेईमान होऊ नको. काळ्या मातीत राहून फाटके कपडे तू घालून सर्व जगाची इज्जत झाकतोस हे विसरू नको तूच या विश्वाचा पोशिंदा आहेस. ही शेती तुला कधीही बेईमान होणार नाही. पेरलेल्या बिया पोटी पुन्हा धान्य उगवेल. तुम्ही आत्ताच धीर सोडून हतबल होऊ, नका पुन्हा या मातीने आपणास फळ मिळणार आहे. निसर्गाच्या अवकृपेपोटी पाऊस वेळेवर पडत नाही. अतिवृष्टी झाली की पीक नासून जाते म्हणून बळी दादा हतबल झाला आहे. शेतकऱ्याच्या नशिबी उपासमार, दारिद्र्य, नैराश्यापोटी तो हतबल झाला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये जगाचा पोशिंदा जगला पाहिजे असा संदेश या कवितेतून प्रकट केला आहे. आज ना उद्या आपल्या शेतामध्ये पिकांना उधाण येणार आहे. आपल्या शेतातील धान्य काळी आई आपल्याला पुन्हा कुबेरालाही भीक द्यायला लावणार आहे. शेतातील धान्याची रास व त्यातील खळयांचे मात्रे अजून सरले नाहीत. आताच जीवनाचा अंत करण्याची भाषा करु नको. आत्महत्येचा विचार करू नको. काळी आईच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. बळी दादाने खचून जाऊन धीर सोडू नये. शेतकऱ्याचे दुःख डोंगराएवढे आहे. त्याच डोंगरात उभ्या जगाचा पोशिंदा अडकला आहे. त्याला जगण्यासाठी बळ देणारी विचारसरणी कवीची आहे. कर्जाच्या आणि शेतकऱ्यांचे आयुष्य होरपळून निघाले आहे. शेतकरी हा संपूर्ण जगाचा अन्नदाता आहे. त्याच्या श्रमावर, कष्टावर अनेक लोकांना पोटभर अन्न मिळते. परंतु शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक समस्या आहेत. त्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त होतो. दुष्काळ, अतिवृष्टी, वाढती महागाई, शासकीय योजनेतील भ्रष्टाचार, शेतमालाला मिळणारी कवडीमोल किंमत, कर्जबाजारीपणा अशा अनेक समस्यांनी शेतकऱ्यांना ग्रासले आहे. त्याला उपाशी पोटी दिवस काढावे लागत आहेत. बळी जगाचा पोशिंदा, व्यथा, शेती करणे सोडू नको इत्यादी कवितातूनही शेतीत राबून आलेले अनुभव शब्दबद्ध केले आहेत. शेतीचा आपल्या जीवनाचे जीवन म्हणणाऱ्या शेतकऱ्यांची शेतीवरील निष्ठा प्रत्ययास येते. रात्रंदिवस कष्ट करूनही त्याच्या हातात

काहीच पडत नाही. शेतकऱ्यांच्या जीवनात सततचा उन्हाळाच असतो. पिढ्यानपिढ्या माती मध्ये राहतो परंपरागत तीन दगडांच्या चुलीत खोडक्यांचा धूर साऱ्या घरात पसरलेला असतो. शेतामध्ये राहूनही खाण्याजोगे घरांमध्ये अन्न नाही हेच दारिद्र्य सात पिढ्या गेल्या तरी वेळेवर भाकरी मिरचीही पोटभर मिळत नाही. ''भाजीपाल्याला बाजारी भाव मिळं मातीमोल बियाणांची ही किंमत होत नाही वसूल पोसोनी साऱ्या जगाला लेकरं झोपती, उपाशी फोड आता रे डरकाळी बंगल्यात जेवती तुपाशी मिळेना वेळेवर भाकर कोणी घेईका भेटी लुटती सारे जगा चारूनी तुपरोटी' शेतक-याच्या दारिद्रयाकडे कोणीही लक्ष दिलेले नाही. शेतकऱ्याची आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण पुढारी, सावकार, आडतव्यापारी, भांडवलदाराकडून पिळवणूक होऊन घरी मात्र शेतकरी भाकरीसोबत चिमूटभर राख खातोय. त्याची मुलंबाळंही उपाशी झोपतात भाजीपाला बाजारात घेऊन गेले तरी भाव मिळत नाही. साधी बियाणाची सुद्धा किंमत निघत नाही. शेतकऱ्यांच्या मढयावरील टाळूवरचे लोणी खाऊन बंगल्यात तुपाशी तळलेली कोंबडी खाऊन तर एसीच्या वाऱ्याला अजगराप्रमाणे सुस्त घोरत पडलेले आहेत. कवी शेतकऱ्यांना डरकाळी फोड असे म्हणतो म्हणजे या व्यवस्थेविरुद्ध शेतकऱ्यांनी एकत्र येऊन न्यायासाठी संघर्ष करून लढले पाहिजे. आता शेतकऱ्यांनी पेटून उठले पाहिजे. आता मात्र या गाळामधून विद्रोहाची नदी वाहील. म्हणजे शेतकऱ्याकडे येथील शासनव्यवस्था, भांडवलदार यांनी उभ्या जगाचा पोशिंदा याचे दारिद्र्य काय असते हे पहिलेच नाही. यासाठी शेतकरीही पेटून उभारायला हवा आहे. शेतकऱ्याने आता गप्प बसून चालणार नाही. त्याच्या मालाला योग्य भाव द्यावा लागेल. आर्थिक, शासकीय मदत करावी लागेल. परंपरेने चालणाऱ्या व्यवसायासाठी शासकीय मदत मिळावी लागेल. नाहीतर शेतकरीच आयुष्यभर तुम्हाला महागाईची किंमत दाखवून देईल. असा रोखठोक सवाल कवी येथील सरकारला करतात.

कृषी जीवनात पोळा सणाचं आणि बैलाचं महत्त्व अपार आहे. भारतीय संस्कृतीत बैल, कुत्रा, साप, कोकिळा यांची पूजा केली जाते. हे प्राणी शेतकऱ्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. हेच त्यांचं रक्षण करतात. या प्राण्यांच्या उपकारांतून उतराई होण्यासाठी भारतीय संस्कृतीत त्यांचेही काही सण आहेत. कवी मारुती कच्छवे यांच्या 'शेतकरी बाप' यांच्या कष्टाबरोबर बैलाच्याही कष्टाचे, सोबत असण्याचे अनेक कवितेत वर्णन येते. 'सण पोळा' ही कविता तर पोळयाला शेतकरी बैलांना सजवितात, त्याला

खंडमळण्यादिवसी पौवणी घालतात एरंडी तेल, अंडी, गुळाचे आळण तुरटी घातलेले गुळवणी पाजवतात, तळयामध्ये पौवणी घालताना बैल उलतीला जातो. पूर्णपणे बैल पाठीच्या नळावर उताणा केला जातो. त्यामुळे बैलाचा आळस, थकवा, दुखवा निघत असतो. दुसऱ्या दिवसी पोळा सण असतो. याला बैलपोळा असेही म्हटले जाते. पोळया दिवशी बैलाला पुरणाची पोळी खाऊ घालतात. त्याच्या शींगातही पिठाचे उकडलेले कडबोळी घालतात. पोळा सणा दिवसी आंघोळ घालून पाराजवळ झूल, घुंगरमाळा, शिंगाला वारनेस, पाठीवर वेगवेगळ्या कलरचे विडीने गोल ठसे मारतात. कपाळावर चमकणारे बाशिंग बांधतात, शिंगात गोंड्याच्या मटाटाच्या गोंडे बांधतात. साऱ्या गावचे बैल पाराजवळ आणतात. त्याचे वर्णन करताना कवी कच्छवे म्हणतात, ''मोत्यापळयाच्या गळा घालुनी घागरमाळा, वाजंत्री वाजता साऱ्या गावाची बैल होती गोळा, मारुतीच्या मंदिराला अगोदर फिरे मानक-याचा पाच येडे झाल्यावर पुन्हा फिरती बैल, वारणेस लावूनी सिंगाला येडे मारुती मंदिराला पाठीवर झुली बईल मारती चकरा मंदिराला मानक-यांच्या हस्ते तोडून तोरण घरोघरी लावती बैलाचं लगीन.'' (पृष्ठ २) बैलाला मंदिराच्या सभोवती मानक-यांचे बैल फिरल्यावर गावातील इतर शेतकऱ्यांचे बैल फिरतात आणि त्याची पूजा करतात व एक दिवस बैलाला विश्रांती देतात. त्याचे दृश्यात्मक चित्रण चपखलपणे कवी कच्छवे यांनी चितारलेले आहे. वर्षभर नांगर, कुळव, दुंडे, गाडी, वखर ओढून बैल शेतात राबत असतो. त्याच्या आणि शेतकऱ्याच्या कष्टाला गिनतीच नसते. काय बैलासारखे राबलाईस असे शेतकऱ्याला म्हटले जाते. त्याच्या जीवावर शेती शेतकरी करीत असतो. शेत नांगरण्यापासून ते वखरण्यापर्यंत, पेरणी, मळणी व धान्य घरात आणून टाकीपर्यंत बैल हाच शेतकऱ्याचा साथी असतो. पोळयाच्या सणाचा हा रिवाजच आहे. पोळयाच्या सणादिवशी खरे पाहता बैलांची पूजा करून त्याच्या ऋणातून मुक्त झाले पाहिजे. ग्रामीण भागातील कृषी जीवनातील कृषक आणि मूकं जनावर या दोहोबाबत कवीच्या मनात विलक्षण प्रगाढ सहानुभूती आहे. या दोघांचेही कष्ट, यातना, जीवघेणे, सोसणे हाच कवीच्या मनातील मंथनाचा धागा आहे. दृश्यात्मक चित्रणात येते असे नाही तर चिंतनाचाही स्पर्श जाणवतो.

शेतकऱ्यांच्या दुःखाची करूण कहाणी अतिशय तरल, मोजक्या आणि नेमक्या शब्दात मांडणी केली आहे. निसर्गाचा समतोल बिघडला आहे. तसेच माणसाचाही समतोल बिघडलेला दिसतो. या रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या

शेतकऱ्याला धीर देण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. निसर्ग आत्ताच कोपला आहे. निसर्गाच्या चक्राप्रमाणे पावसाचा पाठशिवणीचा खेळ हा लपंडावाचा सारखा आहे. कधी पावसाची अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते तर कधी पाऊसच पडत नाही.

शेतकऱ्याला आभाळाकडे टक लावून पावसाची वाट बघावी लागते. पाऊस पडत नसल्यामुळे जमिनीला भेगा पडतात. शेतकऱ्यांची शेतातील पिकं करपून जातात. त्याचबरोबर जनावरांना, पशुपक्ष्यांना, माणसांना पाणी मिळत नाही. नदी नाले कोरडे पडतात. त्यामुळे कोरडा दुष्काळ पडल्याने शेतकऱ्याच्या घशाला चिंता करून कोरड पडते. असा लहरी निसर्ग पाऊस शेतकऱ्याचा पिच्छा सोडत नाही. विविध प्रकारचा पाऊस कवी मारुती यांच्या पड पड रे पावसा, पाऊस, आरं ए पावसा, कृत्रिम पाऊस, गारपीट, वाचवा थेंब थेंब पाणी, गोदामाय, मेघराजा, पाणी, धो-धो पाऊस पडला, असा कसा हा पाऊस या अकरा कवितांमधून पावसाची विविध रूपे कवीने रेखाटली आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनात पाऊस येताच आनंदाचे उधाण येते. मातीच्या सुगंधाने मन भरून जाते. शेत-शिवार भिजतात. नदी-नाले भरतात. धो-धो पाऊस पडला या कवितेत कवी म्हणतात, ''धो धो पाऊस पडला नदी, नाले एक झाले सगळीकडे झालं पाणी गावात पाणी शिरले धो-धो पाऊस पडला जनावरांना झाला चारा पोटभर खाऊन चारा गाई पाजू लागली वासरा.'' पाऊस शेतकऱ्याला मारणारा आणि जगवणारा पडला आनंद, नाही पडला दुःख, मरण. तोही पुन्हा योग्य वेळी पडायला पाहिजे. अवकाळी पडला तर नुकसानच करतो. तेव्हा पहिला पाऊस येतो तेव्हा मन उधाणून जाते. धरित्रीच्या परिमळानं मन भरून जाते. शेती, शिवार भिजतात. नदी-नाले भरतात तसं त्याचं मनही भरून जाते. गाई हिरवे गवत खाऊन वासराला पाना सोडून पाजतात. पाऊस पडत नसेल तर करूणा भाकतात, तर निसर्गाच्या अवकृपेने पोटी पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी हतबल होतो. शेतकऱ्याच्या नशिबी उपासमार दारिद्र्य या नैराश्य पोटी तो हतबल झाला आहे. गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. ज्वारी आडवी पडून काळी पडते. तसेच कणसाला ज्वारी वापत असते. तोंडाशी आलेले पीक हातातून जाते. एका क्षणातच होत्याचं नव्हतं होते. बळीराजा हवालदिल होऊन उघड्यावर पडतो. सरकारच्या मदतीकडे डोळा टक लावून पाहत वाट पाहतात. शासनाची तुटपुंजी मदत मंजूर झाली तरी इथून तिथून त्याचे भागीदार असतात. हातात जी काही रक्कम पडली की, यमासारखा लगेच

नरड्यावर सावकार दारात येऊन व्याज घेऊन जातो तरी काही वेळेला शेतकरी पाऊस पडावा म्हणून करुणा भाकतो, ''पड पड रे पावसा माझ्या अंगणी, गाईन तुला मी नवीन नवीन गाणी, पड माझ्या राणी, माती न्हावून धुऊन पाणी वाहील रानोरानी.'' शेतकऱ्याच्या डोळयातील ही करुणा जीवाला फुलवून जाते. शेतकरी जीवनात वेळेला म्हणजेच वक्तशीरपणाला फार महत्त्व असतं. केव्हा केव्हा हेच आभाळ पाऊस नकोसं होतं. धास्ती निर्माण करतं. पावसाच्या आगमनाने जसा शेतकरी आनंदी होतो तसाच तो अवेळी पाऊस येण्याने धास्तावूनही जातो. ओल्या दुष्काळाच्या धास्तीने तो कोसळतो आणि मग त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडतात – ''आस्मानी संकट कुटुंब पडली उघड्यावर जमा करूनही किडूक-मिडूक होता केला संसार जिकडेतिकडे झालं पाणी वाहून गेला संसार गोदामाय कोपली.'' अशा अवेळी महापूर येण्यानं सर्व संसार उद्‌ध्वस्त होतो ही ग्रामीण जीवनाची खूप मोठी समस्या ठरते. शेतकऱ्याच्या जीवनातील निसर्गाच्या कोपामुळे होणारी दुर्दशा ही 'कुणब्याच्या पोरा' या कवितासंग्रहातील पावसाच्या कवितांमधून तेवढ्याच प्रभावीपणे कवी कच्छवे यांनी चितारलेली आहे. नैसर्गिक आपत्तीचे हे दर्शन मन हेलावून टाकते. शेतकरी जीवनातील शेतकऱ्यांचे दुःख पहाडाएवढे मोठे आहे. त्याच पहाडामध्ये उभ्या जगाचा पोशिंदा अडकला आहे. त्याला जगण्यासाठी बळ देणारी विचारसरणी कवीची आहे.

अशा प्रकारे 'कुणब्याच्या पोरा' या कवितासंग्रहातील कवितेत ग्रामीण बोली भाषेचा अलौकिक ठेवा आहे. मराठवाडी प्रदेशाची खास वैशिष्ट्ये दिसून येतात. परभणी आणि लातूर जिल्ह्यातील बोलीभाषेचे अलौकिक दर्शन घडते. येथील निसर्ग बोलीभाषा जनजीवनातील सण, उत्सव, परंपरा, राहणीमान व गावकीच्या कामाचे दर्शन घडत जाते. तसेच ग्रामीण भाषा, ग्रामीण संवेदनशीलता, मानसिकता, अनुभव सृष्टी यांचा प्रत्यय देणारी, ग्रामीण बोलीच्या प्रत्ययाचा अंगीकार करून ग्रामीण कविता प्रकटते. शहरी आणि ग्रामीण अशी सरमिसळ त्यात जाणवते. शहरात बसूनही कवी कच्छवे यांनी ग्रामीण अनुभव चितारताना भाषेचा मूळ स्वभाव, ढब न सोडता व ग्रामीण अभिव्यक्तीचा आव आणताना भाषेचा सरमिसळपणा आणला आहे.

उदा - कुणब्याच्या हातातलं, रूमनं जाणार नाय, दररोजच तांबड फुटायला उठणं, काळया मातीला समजतो माय, उद्याच्या आशेने जगतच हाय, आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच नाय, माय बापाने महय रानी बी टोवलं

यातील जिवंतपणा, चैतन्यशीलता अनुभवाचा अस्सलपणा केवळ बोली मुळेच प्रकट झाला आहे. ग्रामीण जीवनाची संवेदनशीलता वास्तववादी स्वरूपात अभिव्यक्त करण्यासाठी लोकभाषेचाच उपयोग केला आहे. हे कवितेतील बोलीभाषेच्या आविष्कारातून दृग्गोचर होते. त्यामुळे ग्रामीण वास्तवाचा जिवंतपणा साकार झाला आहे. ग्रामीण सूर, ताल, लय, ढंग याचे वैविध्य चितारण्यासाठी ग्रामीण बोलीचा उपयोग पडलेली आहे. त्यांच्या कवितेतील बोलीभाषेत संयम, शालीनता, आदर, मुलायमपणा पोटतिडकीने जाणवतो. उग्रता, भडकपणा, उरबडवेपणा, उसनवारी किंवा उंटावर बसून शेळ्या हाकलेल्या नाहीत किंवा कल्पनेचे पंख लावून आकाशात भरारी घेतली नाही. जमिनीवर पाय ठेवून वास्तव जीवन जे उघड्या डोळयांनी पाहिले, भोगले, अनुभवले तेच रेखाटले आहेत. हाताला घट्टे, पायाच्या टाचेला भेगा, काटे पायात मोडलेली, आराटी बोराटीची काटे, अंगाला चिकटलेले शेण, चिखलात हात भरलेले, पायाच्या बोटाला चिखल्या पडलेले, रक्ताचा घाम करून जमीन ओली केलेले, पायाच्या बोटांना ठेचा लावून, घोटे सडकून केलेले कष्ट अशी जिवंत अहमदपूर तालुक्यातील खास अशी ठसठशीत, झणझणीत हायब्रीड हिरव्या मिरच्यांचा ठेचाची कोकणगाव या खेड्यातील बोली भाषा वापरून जिवंत चित्रण केलेले आहे. या ग्रामीण बोलीभाषेतून चैतन्य निर्माण होते. अस्सल ग्रामीण प्रतिमाही जातिवंत पिंड घडवितात. बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, ना. धो. महानोर यांच्या कवितांचा प्रभाव त्यांच्या कवितावर जाणवतो. त्यांच्या गावाकडील निसर्गाचं हुबेहूब शब्दचित्र दृग्गोचर होतं. त्यांना गावाकडील निसर्गाचे, शेतीचे, मातीचे प्रचंड वेड आहे. आजही या आठवणी त्यांच्या मनाला भुरळ घालतात आणि त्याच कविता त्यांच्या ओठातून, लेखणीतून एका लयीत बाहेर पडतात. त्यांच्या कवितेत गंध, स्पर्श, स्वाद आहे. पंचज्ञानेंद्रियांनी कवितांचा आस्वाद घेऊ शकतो. त्यांची शब्दकळा सौंदर्यवादी कवितेची नाते सांगणारी आहे. मन आपले अनुभवविश्व समर्थपणे साकार करतात. त्यांची कविता खेड्याची म्हणण्यापेक्षा शेतातली, मातीतील कविता म्हणणे हे सर्वार्थाने युक्त आहे. शेतातल्या रंग, रूप, लावण्याच्या छटा, रानाची श्वास उच्छवास शेतावरून घरंगळून जाणारे प्रहर रानावरचे वर्षाव, रान वाऱ्याचा, रान झ-याचा, नदी चा नाद, रानफुलांचा गंध अशा अनेकविध संवेदना जाणवतात. माती म्हणजे शेती आणि जलधारा यांचा वर्षाव करणारे आभाळ यातून सुख दुःखांचा सूचक सर्जनात्मक संबंधाचा परिमल सहजपणाने घमघमतो. मेघराजांच्या विशाल फलकावरील जिते जागते सौंदर्य आणि धरतीवर पहुडलेली चैतन्यमयता याचे

एक सौंदर्यपूर्ण कलाविश्व, कुणब्याचे सोसणे अनुभवता येते. ज्वारी, बाजरी, गहू, बैलाची सोबती यांच्या कवितेतून अभिव्यक्त होतात. प्रादेशिक शब्द आणि सौंदर्यपूर्ण शहरी शब्द यांचे एक अनुपमेय रसायन या 'कुणब्याच्या पोरा' कवितासंग्रहातील कवितांमधून एकविसाव्या शतकातील शेती कसणाऱ्या कुणब्याला शेती विश्वाला सामर्थ्य देते.

**संदर्भग्रंथ :-**


१) मारोती कच्छवे, 'कुणब्याच्या पोरा' न्यूमॅन पब्लिकेशन्स, परभणी, प्रथमावृत्ती २०१२

२) नागनाथ कोतापल्ले व दत्ता भगत, 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' (प्रा. प्रल्हाद लुलेकर गौरव ग्रंथ) सायन पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७

३) रामचंद्र काळुंखे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१६

४) पी. विठ्ठल, 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१९


***

# ‘बोलावें ते आम्ही’ : ग्रामीण जीवनाची गाथा

**डॉ. मारोती बालासाहेब भोसले**

मराठी विभागप्रमुख, स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा जि. परभणी-४३१५११.

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपण पुस्तकातून लिहितो आणि स्टेजवरून बोलतो.परंतु कृषी व्यवसायावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अवलंबून असणाऱ्या जवळपास साठ टक्केशेतकरी व शेतमजूरांकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. हे स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांनंतरही जाणवत आहे. ‘जय जवान जय किसान’ चा नारा आपण अभिमानाने देतो. जिवाची पर्वा न करता सीमेचे रक्षण करणारे जवान आणि देशाची भूक भागविण्यासाठी रात्री-बेरात्री विंचू-किड्यात शेतावर राबणारे किसान दोघेही देशासाठी महत्त्वाचे योगदान देतात. जवान देशासाठी बलिदान देतात ते शहीद होतात. परंतु शेतकऱ्यांच्या मृत्यूची मात्र फारशी गांभीर्याने कोणी नोंदही घेत नाही.

जागतिकीकरणामुळे सर्व देशांच्या सीमा सर्वांसाठी खुल्या झाल्या. तेव्हा जग लहान झाल्यासारखे वाटू लागले. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी संपूर्ण जग काबीज केले. भारतासारख्या विकसनशील देशाला तेपेलवले नाही. छोटे-मोठे उद्योगधंदे डबघाईला आले. स्वावलंबी खेडी, गावगाडा मोडकळीस आला. आलुतेदार, बलुतेदार देशोधडीला लागले. उदरनिर्वाहासाठी ते खेडी सोडून शहराकडे गेले. खेडे गावापर्यंत डांबरी रस्ते, टीव्ही, मोबाईल, मोटरसायकल, बियर शॉपी, आले. खेडेगावात आर्थिक सुबत्ता आली. लोकांच्या ठिकाणी बिनधास्तपणा, चंगळवाद, भोगवादीवृत्ती, आत्मकेंद्रीपणा वाढला. पाश्चात्य संस्कृती हळूहळू भारतात पाय पसरू लागली. तिचे लोण ग्रामीण भागातही पोहोचले. ग्रामीण संस्कृती खिळखिळी होऊ लागली.

जागतिकीकरणाचे चटके प्रारंभी शहरी शहरवासीयांना बसले. नंतर ग्रामीण, सर्वसामान्य माणूसही भरडलागेला. जागतिकीकरणामुळे गरीब-श्रीमंत दरी अधिक वाढली. विकासाचा भास निर्माण झाला. वास्तवात नातेसंबंध, मानवीमूल्यांची पडझड झाली. शेतीविषयक तंत्रज्ञान, रासायनिक खते, संकरित बी-बियाणे, आले. परंतु ते सर्व सर्वसामान्य शेतकऱ्याच्या आवाक्या बाहेर गेले. धनदांडगे, श्रीमंत बोटावर मोजण्याएवढ्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. सर्वसामान्य शेतकरी भांडवला अभावी शेती करू शकत नाही. शेती केली नाही तर उपजीविकेचे दुसरे साधन नाही.

श्रीकांत देशमुख यांनी अशा कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्याचे जीवनअतिशय जवळून पहिले आणि अनुभवले. ते आपल्या प्रतिभेच्या बळावर संवेदनशील पणे कवितून साकारले. त्या कविता इसवी सन २०१३ या वर्षी 'बोलावें ते आम्ही.....' या कवितासंग्रहातून प्रकाशित झाल्या. इ.स. २००० नंतर लिहिलेल्या साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त केलेल्या, प्रस्तुत कविता संग्रहतील कवितेवर शोधनिबंध लिहिण्याचा योग आला.

**श्रीकांत देशमुख यांचा अल्प परिचय:**

श्रीकांत साहेबराव देशमुख यांचा जन्म दिनांक ३ जुलै, १९६३ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात मौजे राहेरी (बुजुर्ग) या गावी सर्वसामान्य शेतकरी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे वडील अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरी होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या मुलाला जी कामे करावी लागतात की सर्व शेतीवाडीची कामे करीत, जन्मगावी त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. बालपण गावातच गेले. महाविद्यालयीन शिक्षण औरंगाबाद या ठिकाणी झाले. काही काळ त्यांनी पीपल्स महाविद्यालय, नांदेड या ठिकाणी प्राध्यापक म्हणून सेवा केली. एवढ्यावर ते स्वस्थ बसले नाहीत. स्पर्धा परीक्षा पास करून १९९४ साली ते उपनिबंधक म्हणून सहकारी संस्था, नांदेड येथून प्रशासकीय सेवेत रुजू झाले. दिनांक ३१ जुलै २०२१ रोजी ते विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर या ठिकाणाहून नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. प्रशासकीय सेवा करीत असतानाही त्यांनी गावाशी, मातीशी, नात्याची नाळ कधीच तुटू दिली नाही. त्यांनी गाठीशी असलेल्या अनुभवाच्या आधारावर साहित्य लेखन केले.

**'बोलावें ते आम्ही 'मधील कवितेचे स्वरूप:**

श्रीकांत देशमुख यांचा 'बळीवंत' (१९९७), हा पहिला 'आषाढमाती'(२००३), दुसरा आणि 'बोलावें ते आम्ही.....'(२०१३) हा तिसरा कवितासंग्रह प्रकाशित झाला. 'बोलावें ते आम्ही.....' या कविता संग्रहामध्ये एकूण ६८ कविता समाविष्ट आहेत. त्या विविध विषय आणि आशयाच्या आधारे पाच विभागांमध्ये विभागलेल्या आहेत. निसर्ग, गाव, माती, शेती, नाती, शेतकरी अशा वेगवेगळ्या विषयावरील या अतिशय कसदार कविता आहेत. जागतिकीकरणाचे मानवी जीवनावर झालेले परिणाम आणि त्यामुळे आमुलाग्र बदललेली जीवनशैली, जागतिकीकरणाच्या जात्यात भरडला जाणारा शेतकरी या कवितेतून चित्रित झाला आहे. उभ्या जगाचा पोशिंदा सध्या अतिशय बिकट स्थितीतून जात आहे. त्याच्याकडे फारसे गांभीर्याने कोणी पाहत नाही.त्याविषयी श्रीकांत देशमुख लिहितात,

"आम्हाला टाळून जगाची रीत भात सावरण्याची कोण करते भाषा
वाऱ्यावर थापून प्लास्टिकच्या भाकरी नाही भरणार त्यांचं पोट
ते नाहीच उभी करू शकणार एखाद्या अत्याधुनिक प्रयोगशाळेत
दाण्यांना रुजवून पोट झाकणारी गव्हाळ माती
सगळे बायप्रॉडक्ट्स रद्द करण्याच्या या काळात
कोण करतंय मातीला आणि मातीवरल्या माणसांना रद्द करण्याची भाषा"

शेती आणि शेतकरी यांच्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. तर येणाऱ्या काळात प्रत्येकाला त्याची फार मोठी किंमत मोजावी लागणार आहे. आपल्या कवितेतून असा गर्भित इशारा कवीनेदिला आहे.

**गोष्टी रुपी कविता:**

'भूमी सावरण्याची गोष्ट' या पहिल्या कवितेत कवी शेती आणि स्त्री विषयी  लिहितो. शेतीचा शोध स्त्रियांनीलावला. तेव्हापासून स्त्रिया शेतात राबत आहेत. तरीही शेतातील हराळी आणि कुंदा या गवताच्या दोन जाती काही केल्या मरत नाहीत. मातीत राबून स्त्रियांच्या आयुष्याची माती झाली. तरी त्यांच्या आयुष्याचे निंदण म्हणजे श्रम काही संपत नाहीत. त्यांनी आयुष्याचे अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले. ते सर्व पचवून स्त्रिया पतीने आणलेल्या पिठात आपल्या कमाईचे मीठ मिसळून कुटुंबासाठी स्वयंपाक बनवितात. आपली आणि कुटुंबाची भूक भागवितात. त्याविषयी कवी लिहितो,

"एकेक पाथनिंदून व्हावी तशी संपून जातात वर्ष
मातीखालची लव्हाळी हराळीकुंधा कधीच मरत नाही
हाडामासांची होते माती तरी निंदण सरत नाही"

'सीताफळ बागेची गोष्ट' या कवितेतून कवीने स्त्रियांच्या सोशिकते विषयी आणि सहनशक्ती विषयी लिहिले आहे. पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची सहनशीलता आणि सोशिकता जास्त असते. स्त्री परिस्थितीशी फार लवकर जुळवून घेते. ती राजाची राणी असली तरीही शेवटी स्त्री आहे. तिला सर्वभोग भोगावे लागतात. तरीही स्त्री दुःखाचे पाढे वाचत बसण्यापेक्षा आलेल्या संकटाचा कसा सामना करायचा हा विचार करते. हेच या कवितेतून कवीने सांगितले आहे.

'एका गावाची गोष्ट'  या कवितेतून कवी काबाडकष्ट करून उदरनिर्वाह करणाऱ्या गावाविषयी लिहितो. शेती व्यवसाय सतत तोट्यात चालला आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. कर्ज वसुलीसाठी बँकेचे अधिकारी गावात येणार ही बातमी गावातील लोकांना कळल्यानंतर सर्वजण सकाळी

शेतात कामावर जातात. प्रामाणिकपणे कर्ज भरण्याची इच्छा असून देखील उत्पन्ना अभावी ते कर्ज भरू शकत नाहीत. त्यामुळे बँकेचे अधिकारी कर्जवसुलीसाठी दुसऱ्या गावात गेले. आपल्याकडे कर्ज भरण्यासाठी पैसा नाही म्हणून एका शेतकऱ्याने बेइज्जतीच्या भीतीपोटी आत्महत्या केलेली असते. त्याच्या खिशात तशी चिठ्ठी सापडते. त्याविषयी श्रीकांत देशमुख लिहितात,

"एका तांड्यावरच्या माणसाच्या खिशातही
कर्जाची चिठ्ठी आहे
गरिबीच्या सनातन वासान
अधिकारी तांड्यावर जात नाहीत"

उभ्या जगाचा पोशिंदा शेतकरी सन्मानाने आणि सरळ मार्गाने सध्याजगू शकत नाही.त्यामुळे बेइज्जतीच्या भीतीपोटीतोआत्महत्या करीत आहे.

'पावसाळी दिवसाची गोष्ट' या कवितेत कवी आपल्या आजोबांच्या मृत्यूची गोष्ट सांगतो. गवत कापताना आजोबा साप चावून शेतात मरून पडले. तेव्हा वडिलांच्या डोळयातून पाण्याच्या धारा पावसा सारख्या कोसळल्या. आजोबाच्या डोळयांना मुंग्या लागल्या. तरीही बाप मुंग्यांची रांग दिसली की साखर, ज्वारीचे पीठ टाकतो. त्याविषयी कवी लिहितो,

"बाप मेला त्याचे रान सावरणारे डोळे मुंग्यांनी खाल्ले तरी
घराचं घरपण टिकवण्यासाठी मुंग्यांना उपाशी ठेवणं
आपल्या कुणबीपणाला शोभत नाही असं म्हणून
तो सांगतो पुन्हा बाप मेल्याच्या पावसाळी दिवसाची गोष्ट
दिव्याच्या मंद उजेडात मुंग्यांना पीठ टाकत"

शेतकऱ्याकडे आजही माणुसकी शिल्लक आहे. हे या कवितेतून दिसून येते.

**जागतिकीकरणाचे ग्रामीण जीवनावरील परिणाम:**

१९९० च्या सुमारास जागतिकीकरणास सुरूवात झाली. अनेक देशांच्या सीमा व्यापारासाठी खुल्या झाल्या. उद्योगधंद्यात प्रगती झाली. भारता सारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था डबघाईला आली. भारतातील कापडगिरण्या, मील, छोटे-मोठे उद्योगधंदे बंद पडले. त्या जागेवर टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या.पाश्चात्य लोकांचे येणे-जाणे वाढले. त्यांची संस्कृती भारतात रुजली. शहरी जीवन ढवळून निघाले. हळूहळू त्याचे लोण ग्रामीण भागा पर्यंत पोहोचले.

जागतिकीकरणाचा पहिला घाव गावगाड्यावर बसला. अलुतेदार, बलुतेदार यांचे व्यवसाय उद्ध्वस्त झाले. त्यांनी उदरनिर्वाहासाठी शहराकडे धाव घेतली. गावगाडा विस्कळीत झाला. त्याचे परिणाम शेती व्यवसायावर उमटले. शेती व्यवसाय मोडकळीस आला. पारंपरिक बी-बियाणे कालबाह्य

झाले. नवीन रासायनिक खते, बी-बियाणे, कीटकनाशके, नवेतंत्रज्ञान, यांनी बाजार काबीज केला. त्याच्या किंमती भरमसाठ वाढवून शासन, व्यापारी, दलाल सर्वांनी मिळून शेतकऱ्यास लुटण्यास सुरवात केली.

शेतकरी परावलंबी झाला. शेती कसावी तर परवडत नाही. सोडावी तर जगण्यास दुसरे साधन नाही. जोडधंदे, शासनाच्या योजना, अनुदान राजकीय पुढारी आणि त्यांचे कार्यकर्ते यांनी उचलून घेतले. शेतकऱ्यास बँकांनी कर्जाच्या नावाखाली लुटले. सध्याच्या काळात शेती व्यवसाय करणे वेडेपणा ठरत आहे. कर्जाच्या ओझ्या खाली दबलेले शेतकरी फाशी घेऊन आत्महत्या करीत आहेत. त्याविषयी कवी लिहितो,

"एका तांड्यावरच्या माणसाच्या खिशातही
कर्जाची चिठ्ठी आहे गरिबीच्या सनातन वासानं
अधिकारी तांड्यावर जात नाहीत
एका तांड्यावरच्या डोईवरचे कर्ज त्यांना पुन्हा वाढवायचे नाही"

जागतिकीकरणामुळे छोटे व्यवसायिक देशोधडीला लागले. किराणा दुकान, कापड दुकान ही संकल्पना मोडीत निघाली. त्या ठिकाणी मोठमोठे मॉल उभे राहिले. भांडवलशाही अस्तित्वात आली. लहान शेतकऱ्यांना शेतीचा खर्च परवडत नाही. जे शेतकरी जमिनीस काळीआई मानून तिची सेवा करतात. शेत विकण्यास त्यांचे मन धजावत नाही. ते कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत आहेत.

**ग्रामीण जीवनातील बदल**:

इसवी सन २००० नंतर ग्रामीण जीवनात अमुलाग्र बदल झाले. पहाटे मंदिरातून येणारा काकड आरतीचा आवाज, पहाटे चरायला जाणाऱ्या बैलांच्या गळयातील घुंगुरमाळांचा आवाज, पक्ष्यांची किलबिल, मळयातील मोठे वरचं गाणं, जात्याची घरघर, ऐकायला येत नाही. भरमसाठ वाढणारी लोकसंख्या आणि सीमित असणारी जमीन शेतकरी पडीत जमीन ठेवत नाही. गुरांना चरण्यासाठी गायरान उरली नाहीत.गुरांचे पोट भरत नाही. त्याविषयी कवी लिहितो,

"संध्याकाळी निमूटपणे उतरतात
गाव दिशेनं लाल राखाडी गुरंढोरं
अर्धभरल्या खपाती पोटानं
दिवसभर तोंड घासून दगडमातीवर"

खेड्यापर्यंत भौतिक सुविधा पोहोचल्या. पाणंद काढून त्याठिकाणी डांबरी सडक आली. रेडिओच्या जागी टीव्ही, पत्र्यांच्या जागी स्लॅब, चुलीच्या जागी गॅस, किराणा दुकानाची जागी बियर शॉपी आली. प्रत्येकाकडे अँड्रॉइड मोबाइल, मोटरसायकल, भारी कपडेआले. दिल्लीतील राजकारण गल्लीत शिरले. पक्ष्या-पक्षात गाव विभागले गेले. प्रत्येक खेड्यात गट-तट पडले. गावात लाईट आली. गावभर प्रकाश दिसू लागला. परंतु आतून मात्र गाव भकास बनला. उत्पन्न कमी असणाऱ्या ग्रामीण माणसाला हा जास्तीचा खर्च परवडणारा नाही.

ग्रामीण माणूसजाहिरातीच्या आहारी जाऊन शहरी माणसांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करूलागला. त्यामुळे तो कधी कर्जबाजारी बनला हे त्यालाही कळलं नाही. त्याविषयी 'अंधार' या कवितेत कवी म्हणतो,

"खेड्याभोवती पांगलेला खूप गर्द
काळा अंधार अजगराच्या पोटातील
कातळासारखा निबिड
अंधार फक्त अंधार"

खेडेगावात पूर्वीपेक्षा थोडीफार सुबत्ता आली. हातात पैसाखेळू लागला. त्याहीपेक्षा खर्च अधिक वाढला. पाश्चिमात्य संस्कृती हळूहळू खेड्या पर्यंत पोहोचली. त्यामुळे मोबाईलच्या सोबत खेड्यातही चंगळवाद पोचली. खेड्यातील तरुणही उघडे नागडे चित्रपट, वेब सिरीज पाहू लागले. त्यामुळे संवेदना बधिर झाल्या. बेफिकिरी, बिनधास्तपणा वाढला. ग्रामीण माणूसही हळूहळू आत्मकेंद्री बनू लागला. नातेसंबंध विस्कळीत होऊ लागले. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. स्त्री स्त्रीकडे केवळ भोग वस्तू म्हणून पाहिले जात आहे. व्यसनाधीनता वाढली. तरुण-तरुणींमध्ये शारीरिक आकर्षण वाढले. अल्पवयीन मुले-मुली मर्यादा ओलांडू लागले. त्यातून काही तरुणी लग्नाअगोदर गरोदर राहत आहेत. तरुणाने लग्नास नकार दिल्यानंतर बदनामीच्या भीतीने आत्महत्या करीत आहेत. त्याविषयी 'भूमी' या कवितेत कवी म्हणतो,

"कुणीतरी टाकून दिलेली
जंगलात जाताना
एक गर्भवती मी पाहिलीआहे
निबिड अरण्यात पालापाचोळ्यात बाळंत होताना
एक आई मी पाहिली आहे"

इसवी सन २००० नंतरच्या बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण श्रीकांत देशमुख यांनी आपल्याकवितेमधून अतिशय परखडपणे केले आहे.

**कवितेतील प्रतिमा:**

**उंदीर:** उंदीर हा निशाचर जीव. दिवसा फारसा कुणाच्या दृष्टीस पडत नाही. मांजर उंदराची शिकार करण्यासाठी सतत उंदराच्या मागवला असते. त्याचप्रमाणे साप देखील उंदरांना खाण्यासाठी आतुर असतो. परंतु उंदीर अतिशय चाणाक्ष. तो सतत मांजर आणि सापाला हुलकावणी देऊन उदरनिर्वाहासाठी बिळात लपून बसतो. शेतकऱ्याच्या घरात सांडलेला दाळ दाणा खाऊन आपली गुजराण करतो.मांजराची चाहूल लागताच तो बिळात जाऊन लपतो. त्याचं आत-बाहेर करणं सतत सुरू असते. दिवसेंदिवस त्याची मजल वाढत जाते. शेतकऱ्यांच्या घरातील पोते, पिशव्या कुरतडायला सुरूवात करतो. तो निर्ढावल्यानंतर पोत्यांच्या थप्प्या, गोदाम, राशनचामाल सर्व खाऊन फस्त करतो. शेतातले उंदीर सुरूवातीला आडवे पडलेले पीक, ऊस कुरतडतात. नंतर उभ्या पिकावर ताव मारून पीक खाऊन नष्ट करतात. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिसकातात. त्याविषयी कवी लिहितो,

“उंदराबरोबरच आता तर शेतीभातीचीच भीती वाटतेय
पृथ्वी कुरतडणारा उंदीर येत राहतो हमेशा स्वप्नात
ऐन हंगामात दिसतात उभं पीक खाणाऱ्या उंदरांच्या टोळया
झोपेतच उंदीर कुरतडतोय माझी माती सावरणारे बोटं”

शेती आणि शेतकऱ्यांसाठी अतिशय घातक ठरणारा उंदीर शासन प्रशासनाची मात्र मदत करतो. काळ्याबाजारात विकलेला राशीचा माल उंदीर आपल्या नावावर घेतो. मतदान पेटीतील मतपत्रिका बदलल्या तरी उंदीर मतदान पेटीचे सील मीकुरतडले म्हणतो. शासन प्रशासनाची मदत करणारा उंदीर शेतकऱ्याचे जगणे मुश्किल करतो. त्याचा बंदोबस्त करावा म्हणून उंदीर मारण्याचे औषध ठेवले तर शेतकऱ्याचे नुकसान करतो. त्या विषयी कवी लिहितो,

“शेतातल्यापिकांच्या पिढ्या बरबाद करणाऱ्या
उंदरांचा करावा बंदोबस्त म्हणून
आणलं बाजारातून जालीमविष तर
शेत राखणारा इमानी कुत्राच मेला उंदीर खाऊन”

अशा प्रकारे कवीने राजकीय पुढाऱ्यांसाठी शेतकऱ्यांचे जगणे भयावह बनविणारा उंदीर ही प्रतिमा वापरली आहे. इथल्या विश्वासघातकी पुढाऱ्यांनी व्यवस्थेलाही कुरतडले आहे. शेती आणि शेतकरी पोखरला आहे. कवितेत उंदीर हा भयसूचकतेचे प्रतिक म्हणून आला आहे.

**रानडुक्कर:**

निसर्गाने डुक्कर हा प्राणी अतिशय बलशाली बनविला आहे. तो नैसर्गिकपणे मेलेला कुठे दिसत नाही. शहरातील घाण साफ करण्यासाठी शहरात डुकरं सोडले जातात. श्रीमंतांना डुकरांचा त्रास होत असल्यामुळे अलीकडे बंदिस्त वराहपालन सुरू झाले. याची चाहूल लागल्यामुळे की काय गावातील डुक्करं रानात पळाले आणि त्यांना रानडुक्करं असे म्हटले जाऊ लागले. शहरात घाण साफ करणारी डुकरं शेतात जाऊन शेतकऱ्याची पीकं खाऊन फस्त करीत आहेत. उसाचे फड रानडुकरांचे अड्डे बनले आहेत. डुकरं कळपाने राहतात. एकट्यादुकट्या माणसावर हल्ला करतात. इतर प्राणी पोट भरल्यानंतर खाणं थांबवतात. सतत खात राहणे आणि विध्वंस करणे हा डुकरांचा आवडता छंदच आहे. आदम आणि विध्वंसक डुकरांना कोणी मारू शकत नाही. वन्य जीवसंरक्षण कायद्याने त्यांना संरक्षण दिले आहे. त्याविषयी 'रानडुकरांचे कळप' या कवितेत कवी म्हणतो,

"रान डुकरांना गरजेपेक्षा कितीतरी पटींनी अधिक खाण्याची
चांगलं देखणं दिसेल त्यावर सुळ्याचा नांगर फिरवण्याची
गुणसूत्रातून संक्रमित झालेली उपजत सवय असावी"

ऊसा भोवती फिरणारे राजकारण, साखर कारखानदारीतील नेत्यांचे भ्रष्टाचार, सतत खात रहाणे, आवश्यकतेपेक्षा जास्त खाणे, विध्वंसक हल्ले करणे, हे गुण कवीला राजकीय पुढाऱ्यांमध्ये दिसतात. त्यामुळे कवीने 'रानडुक्कर' ही प्रतिमा वापरली आहे.

**निष्कर्ष:**

श्रीकांत देशमुख सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मले. ग्रामीण संस्कृतीमध्ये वाढले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत रुजू झाले. नोकरीनिमित्त गावापासून दूर राहावे लागले. परंतु या शेतकरी पुत्राने मातीशी आणि नाते अशी नाळ कधी तुटत दिली नाही. त्यांची जन्मभूमी विदर्भ असलीतरी कर्मभूमी मराठवाडा आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात मराठवाडी भाषा आलेली आहे. त्यांच्या कविता निसर्ग, गाव, माती, शेती, नाती असे विविध विषय आणि आशय अविष्कृत करणारी आहे.

अनुभवाची शिदोरी कवीच्या गाठीशी आहे. जागतिकीकरणामुळे गावगाडा उद्ध्वस्त झाला आहे. जागतिकीकरणाच्या जात्यात भरडला जाणारा माणूस, त्यांनी अतिशय प्रत्ययकारीपणे रेखाटला आहे. त्याचे शेती व्यवसायावरील परिणाम उमटले. शेतकऱ्याची व्यापारी, बँक, पुढारी, दलालांनी केलेली लूट कवीने अतिशय वास्तववादी रेखाटली आहे. भूमीची गोष्ट, सिताफळाची गोष्ट, गावाची गोष्ट, झाडाची गोष्ट अशा गोष्टीरूपी कवितेतून ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडले आहे. ग्रामीण संस्कृती टीव्ही, मोबाईलच्या विकासात खिळखिळी होत आहे. ग्रामीण भागातही भोगवादी,

चंगळवादी, आत्मकेंद्री, बिनधास्तपणा वाढीस लागला आहे. त्याचे चित्रण त्यांच्या कवितेतून आले आहे.

श्रीकांत देशमुख यांनी शेतीला कुरतडणारे, उसाचे फड खाऊन फस्त करणारे, रानडुक्करं खेडेगावाला विळखा घालणारा अंधार, मळ्याच्या टाळूवरचं लोणी खाणारे पुढारी, राजरोसपणे कॅमेऱ्यासमोर मिरवणारे खाउजेडाचे मोर अशा चपखल प्रतिमा 'बोलावें ते आम्ही.....' कवितासंग्रहात वापरून ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना चित्रित केल्या आहेत. ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडणारी त्यांची ही कविता आहे नात्याविषयी, स्त्रियांविषयी आस्था त्यांच्या कवितेतून आविष्कृत होते. कृषी संस्कृती त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. त्यांची कविता म्हणजे भूमीनिष्ठांची गाथा आहे. आपल्या कवितेतून अनेक व्यक्तिरेखा अतिशय प्रत्ययकारीपणे त्यांनी रेखाटल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१ देशमुख श्रीकांत,बोलावें ते आम्ही...., ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

२ देशमुख विश्वास (संपादक) , झाडमाणूस , श्रीकांत देशमुख गौरव ग्रंथ समिती, लातूर

३ राऊत रमेश (संपादक) , साक्षात (श्रीकांत देशमुख विशेषांक) , साक्षात प्रकाशन, औरंगाबाद

४ सार्वेकर कैलास, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

५ गायकवाड हेमलता, आधुनिक मराठी ग्रामीण कविता, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६ बापट वसंत/गुप्ते चारूशीला, आजची मराठी कविता, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

***

# 'शिंपल्यातील मोती' : प्रबोधनाचा जागर घालणारी कविता


**डॉ. मारोती कसाब**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर.


'कविता लिहून परिवर्तन होत असते का..?', 'लिहा तुम्ही कविता ; पण वाचतंय कोण..?', 'मायच्यान लै झालेत कवडे', 'आपुणच लिहा आणि आपुणच वाचा...वा रे कवी..!' असे टोमणे आजकालच्या कविंना आपल्या अवतीभवती ऐकायला मिळतात. अनेक साहित्य संमेलनातून आणि नियतकालिकांतून समीक्षकही कवी आणि कवितेवर घसरताना दिसतात. कविता हा प्रकार जरी उदंड झाला असला तरी त्याचा वाचकही अफाट असतो, हे मात्र कुणी लक्षात घेत नाही.

मूळातच माणूस हा संवेदनशील प्राणी असून, उत्कट भावनांच्या अभिव्यक्तीसाठी कवितेसारखा अन्य कलाप्रकार नाही. म्हणूनच मोठ्या प्रमाणात जगातल्या जवळपास सगळयाच भाषांमध्ये कवितेची निर्मिती होत असते. भारतातल्या मूळनिवासी बहुजनांच्या सिंधू संस्कृतीचा वारसा जपणारी मूळ प्राकृत असलेली मराठीही त्याला अपवाद नाही.

मराठीमध्ये हल्ली अत्यंत दर्जेदार कविता लेखन होत आहे. मात्र या नवकवींना योग्य प्रसिद्धी मिळत नाही. कारण इथली वृत्तपत्रे आणि काही अपवाद वगळता नियतकालिकेही सध्या सत्ताधिश आणि भांडवलदारांच्या हातातली बाहुले बनले आहेत. बहुतेक सर्वच वृत्तपत्रांनी आपल्या रविवार पुरवण्या बंद केलेल्या आहेत किंवा ठराविक रतीब घालणाऱ्या लेखकांसाठी त्या राखीव ठेवलेल्या आहेत. त्यामुळे नवलेखकांना प्रसिद्धीसाठी जागा मिळत नाही.

अशाही परिस्थितीत काही लेखक-कवी सामाजिक जाणिवेतून आपले लेखन प्रसिद्ध करण्याचा आटापिटा करतात. आपलं साहित्य लोकांपर्यंत पोहोचावं यासाठी प्रयत्न करतात. कारण साहित्यातून सामाजिक परिवर्तन होईल, अशी त्यांची भाबडी आशा असते. अशाच सामाजिक जाणिवेतून

लिहिणाऱ्या कवींपैकी एक म्हणजे परभणीच्या कै. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य व इंग्रजीच्या प्राध्यापक असलेल्या डॉ. संगीता अवचार या नवकवयत्री होत.

कविता हा अलीकडच्या काळात थट्टेचा विषय बनलेला असला तरी कविता लिहिणं थांबत नाही. उलट दिवसेंदिवस कविता हा वाङ्मय प्रकार अधिक लोकप्रिय होताना दिसतो. आजच्या ब्राम्हो- भांडवली जातकेंद्री जागतिकीकरणाच्या युगात बोलघेवड्यांकडून कवितेची थट्टामस्करीच अपेक्षित आहे. कारण कवी हा नेहमीच खरं बोलत असतो आणि खरं हे सत्तेला आवडत नसतं. खऱ्याचं सत्तेला वावडं असतं. म्हणूनच कवितेचंही सत्तेशी वाकडं असतं. कविता ही नेहमीच दुबळयांची बाजू घेत असते. गरिबांचा कैवार घेत असते. तिला खोट्याची चीड आणि सत्याची चाड असते. संगीता अवचार यांची कविताही या गोष्टींना अपवाद नाही.

कवयित्री संगीता अवचार यांचा 'शिंपल्यातील मोती' हा काव्यसंग्रह नांदेडच्या निर्मल प्रकाशनाने अत्यंत देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. ८८ पानांच्या या संग्रहात ४५ कविता आहेत. या कविता म्हणजे एका अर्थाने कवयित्रीचे ते आत्मकथनच आहे. स्वातंत्र्य मिळून पाऊणशे वर्षे उलटली तरी या देशात अजूनही स्त्रिया, दलित, आदिवासी, शेतकरी, कष्टकरी या वर्गांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारलेलाच आहे. राज्यघटनेने अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले असले तरी ते फक्त पुस्तकातच आहे. वास्तवात या वंचित वर्गांना बोलण्याची बंदीच आहे. खूप लिहावं वाटतं ;पण लिहायलाही इथं बंदी आहे, हे सांगताना कवयत्री म्हणते -

**" कुणी म्हणतं-**
**व्यक्त हो; परवानगी आहे**
**कुणी टोचतं अबोल राहा,**
**ही दुनिया शतरंगी आहे..!"**

दबलेल्या, पिचलेल्या वर्गांना भीतीचा बागुलबुवा दाखवून, पिढ्या न पिढ्या सत्तेची फळे चाखण्याची अभिजन परंपरा इथे जुनीच आहे. २००० नंतरच्या काळात सामान्य माणसाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सत्तेवर आलेल्या जातीधर्माच्या ठेकेदारांनी सतत केला आहे. २०१४ नंतर त्यात

अधिकाधिक वाढ होत आहे. कवी, शाहीर, लेखक आणि सांस्कृतिक कार्यकर्त्यांना शहरी नक्षलवादी घोषित करुन बेमुदत तुरुंगात डांबले जात आहे. त्यांची दाद ना फिर्याद. वृत्तसंस्था आणि प्रसार माध्यमांनी फक्त जाहिराती आणि सरकारी बातम्या प्रसारित करण्याचे धोरण अवलंबले आहे. व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्यांना पुरस्कार आणि विरोध करणाऱ्यांना जेलमध्ये टाकले जात आहे. या काळात विद्रोहाचा स्वर मंद झाला आहे. मात्र ही कवयत्री थेट तुकोबाशी नाळ जोडत

"बुडती हे जन देखवेना डोळा" या भूमिकेतून निर्धास्त होऊन लिहित राहते. ती कुणाचा मुलाहिजा बाळगत नाही. कारण ती छत्रपती शिवरायांचा वारसा सांगते. आपल्या कवितेतून शिवरायांना म्हणते -

**"जरी ओलांडली स्वातंत्र्याने सत्तरी**
**रूढी परंपरांचे जोखड**
**अन् जात नाही ती आम्ही फेकली**
**धर्मनिरपेक्षता तुमची**
**अजून कित्येकास नाही उमगली**
**'हिंदू' बनवून ठेवले**
**या अगाध शक्ती सामर्थ्यवानास आम्ही**
**जरी प्रत्येक कृतीतून तुम्ही**
**धर्म सहिष्णुता आणि माणुसकी जपली..!"**

इतिहासाचं विकृतीकरण करून आमच्या महामानवांना जाती-धर्मात कोंडण्याचे महापाप इथल्या परंपरावाद्यांनी केले, त्याचा भंडाफोड कवयत्री मोठ्या ताकतीने येथे करते.

संगीता अवचार यांची कविता समाजातील अनेक विसंगती उघड करते.कवितांतून त्यांनी स्त्रियांचा कैवार घेतला असला तरी प्रसंगी आजच्या स्त्री जीवनातील विसंगतीवरही त्या बोट ठेवतात.

**"सावित्रीमाई, काळ आता बदलला आहे**
**ज्ञानापेक्षा दिसणे**
**असण्यापेक्षा दाखविणे महत्त्वाचे झाले आहे**
**तुझ्या अनवाणी पायात लाखो काटे टोचत**

**आता मात्र स्त्रियांना**
**अज्ञानाचे ओझेही नाही बोचत "**

आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी खाल्लेल्या खस्ता लोक विसरले आणि पुन्हा अंधाराचेच राज्य आले, ही खंत कवयित्रीने येथे व्यक्त केली आहे. सत्य बोलण्याची किंमत प्रत्येकाला मोजावीच लागते. आजच्या काळात तर ती अधिकच मोजावी लागते. कवयत्री लिहिते-

**"चक्रव्यूह मी रोजच भेदते आहे**
**कधी आपल्यातल्या परक्यांचे**
**कधी खऱ्याखुऱ्या परक्यांचे**
**घाव मी रोजच झेलते आहे "**

'शिंपल्यातील मोती' या काव्यसंग्रहातील सर्वच कविता या व्यवस्थेविरुद्ध एल्गार पुकारतात. अज्ञान, अंधश्रद्धा, खोटारड्या रूढी-परंपरा, लिंगभेद, जातिभेद, धर्मांधता नाकारतात आणि मंगलमय मानवतेचा पुरस्कार करतात. कवयित्रीला सामाजिक प्रश्नांची जाण आहे. म्हणून ही कविता व्यक्तिगत पातळीवरून सामूहिक पातळीवर जाते. स्वतः नीती मूल्यांना धरून, निर्भयपणे ही कवयत्री समग्राशी डोळा भिडवतेच; त्याचबरोबर शोषित समूहातील स्त्रियांनाही लढण्याची प्रेरणा देते. स्त्री मनाला साद घालताना ती लिहिते -

**"किती सोशिक असावंस तू**
**यालाही काही मर्यादा हव्याच**
**आणि तरीही**
**तुला अबला म्हणणाऱ्या**
**आणि ठरवू पाहणाऱ्यांच्या**
**जिभेला हाडच नसावे**
**यालाही काही मर्यादा हव्याच "**

कवयत्री स्त्रियांना त्याग, बलिदान, सोशिकता या नावाखाली गुलाम करु इच्छिणाऱ्या व्यवस्थेला जाब विचारण्याचे आवाहन करते. नुकत्याच जन्मलेल्या मुलीपासून ते काठी टेकीत चालणाऱ्या वृद्ध माऊली पर्यंत इथे

कुणीच सुरक्षित नाही. हे वास्तव उजागर करताना कवयत्रीच्या लेखणीला भाले फुटतात, धार चढते. ती म्हणते-

**"काय माझा देश आणि काय इथले वारे**
**वेशिवर टांगतात जिथे स्त्रीच्या अब्रूची लक्तरे**
**लांडग्यासम फाडले जाते**
**केले जातात शरीराचे तुकडे**
**जंगली जनावर जिथे वरमले**
**हा नीचपणा फिका**
**तिथे हे क्रौर्य नाही कसे गोठले**
**कोणत्या रानटी व्यवस्थेचे**
**हे निलाजरे पाईक सारे**
**कसले घृणास्पद राजकारण**
**कुठे गेले बुद्धिवाद्यांचे जथ्थे**
**याच भूमीत जन्मले होते का थोर शिवाजी राजे**
**येथलेच का कैवारी स्त्रीचे वीर महात्मा फुले ? "**

अशा प्रकारे अन्याय अत्याचाराविरुद्ध कवयित्रीच्या लेखणीला तलवारीची धार चढते. ती रणरागिनी बनते. महात्मा फुले यांना इथे संगिता अवचार यांनी 'वीर' ही सार्थ उपाधी दिली आहे.

या संग्रहात स्त्रीसुलभ भावनांचा वावर असला तरी मोठ्या प्रमाणावर सामाजिकता हाच या काव्यसंग्रहाचा विशेष आहे. प्रेमावर, भावनिक बंधावर अनेक जण लिहितात. मात्र संगीता अवचार यांची ही कविता सामाजिक प्रबोधनाचा जागर घालणारी आहे आणि म्हणूनच ती मला महत्त्वाची वाटते. या कवितेची मुळे इथल्या मातीत घट्ट रुजलेली आहेत. त्यामुळे या कवितेला निश्चितच भवितव्य आहे.

२००० नंतरच्या काळात जागतिकीकरणाच्या, खासगीकरण, उदारीकरण आणि भांडवली जातकेंद्री व्यवस्थेचा बुरखा फाडून समतावादी शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी लिहिणाऱ्या कवयत्री नीरजा, प्रज्ञा दया पवार, सुचिता खल्लाळ, कल्पना दुधाळ, सारिका उबाळे, छाया बेले, कांता शिंदे, छाया कोरेगावकर, योगिनी सातारकर, सुचिता गायकवाड

यांच्यासह कवयत्री संगीता अवचार यांनी अजून खूप लिहावे. सामाजिक प्रश्न मांडावेत आणि कवितेचे उत्तरदायित्व निभवावे, हीच मंगल कामना. त्यांच्या पुढील लेखनासाठी माझ्या खूप खूप शुभेच्छा..!

संदर्भ:

१.अवचार संगीता 'शिंपल्यातील मोती' निर्मल प्रकाशन, नांदेड, प्र. आ. ९ मार्च २०२०

***

# जागतिकीकरण आणि २००० नंतरची दलित कविता

डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गिते
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणार जि. बुलढाणा

**प्रास्ताविक :-**

साहित्य सृजनाच्या प्रसव वेदना या समाज वेदनेतून अंकुरत असतात. समाज, संस्कृती, इतिहासाच्या परिवर्तनातून साहित्याला नवी दिशा, नवे आयाम लाभत असतात. साहित्य हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. समाजातील बारीक-सारीक घटना, घटीतांचे प्रतिबिंब साहित्यातून अभिव्यक्त होते. समाजातील विविध परिवर्तन चळवळीला बहुआयामी स्वरूप प्राप्त करून देण्या बरोबरच समाजाला दिशा दाखवण्याचे काम साहित्य करत असते. एवढेच नाही तर यापुढे जाऊन असे म्हणता येईल की, साहित्य चळवळ आणि समाज परिवर्तनाची चळवळ यांचा समांतर सहप्रवास होताना दिसून येतो. पारंपारिक रूढी, परंपरा, धर्म, संस्कृतीची जोखड झुगारून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, स्वाभिमान, अस्मिता आदी मूल्यांवर आधारित नवसमाजाची उभारणी करण्याचा प्रयत्न साहित्य चळवळी आणि समाजपरिवर्तनाच्या चळवळींनी केला आहे. त्यामुळे मराठी साहित्य अधिकाधिक समाजाभिमुख झाले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणामुळे, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांन मुळे झालेली सामाजिक जाणीव, स्वातंत्र्या कडून अपेक्षा आणि स्वअस्तित्वाची जाणीव यामुळे समाजव्यवस्थेतील दाहक विषमता अधिक प्रकर्षाने जाणवू लागली. त्याविरुद्ध बंड करण्याची मानसिकता आणि विद्रोहाची भाषा समाज मनात निर्माण झाली. त्याचे प्रतिबिंब मराठी साठोत्तरी साहित्यातील विविध वाङ्मयीन  प्रवाहातून अविष्कृत झाली. त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी होय. या वाङ्मयीन प्रवाहातील महत्व पूर्ण  प्रवाह म्हणजे दलित साहित्य प्रवाह होय. दलित साहित्य विविध वाङ्मयीन प्रकारातून अभिव्यक्त झाले आहे. अनेकविध वाङ्मय प्रकारांपैकी कविता हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय आहे. किंबहुना दलित

साहित्याचा पायाच कविता आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या संदर्भात दलित कवयत्री प्रज्ञा पवार यांचे विचार महत्त्वाचे ववाटतात.

**"कवितेच आणि माझं नातं तसं श्वासा इतकं सहज तेच असं असावं"१**

१९६० नंतरच्या दलित साहित्यातील कविता हा एक समृद्ध व समर्थ असा वाङ्मय प्रकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागृत केलेल्या, आत्मभानातून प्रस्थापित परंपरा, रूढी, समाजव्यवस्थेविरुद्ध दलितांचा पहिला स्वर कवितेतूनच बाहेर पडला आहे. हा स्वर समूह वेदनेचा होता. या संदर्भात भालचंद्र फडके म्हणतात.

**"दलित कविता हि समुहाच्या वेदनेची कविता आहे."२**

१९६० ते १९९० पर्यंत दलित कवितेने मराठी साहित्यविश्व समृद्ध केले. त्यांनी मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावल्या. या संदर्भात प्रा. बाळकृष्ण कवठेकर म्हणतात.

**"मराठी कवितेचे अनुभवविश्व दलित कवितेने अधिकाधिक व्यापक केले. शेकडो वर्षे मुकी राहिलेली अंत:करणे दलित कवितेद्वारे प्रकट होऊ लागल्याने जाणिवांचा एक समर्थ प्रवाह मराठी कवितेत जोमाने अवतरला. दलित कवितेने आणलेल्या अस्सल, शक्तिशाली जीवन जाणिवांच्या प्रवाहाने मराठी कविता तेजस्वी झाली. दलित कवितेचे हे श्रेय निसंकोचपणे मान्य केले पाहिजे."३**

**विषय विवेचन :-**

१९९० नंतरची दलित कविता आपले आयाम बदलताना दिसून येते. कारण १९९० नंतरच्या काळात जागतिकीकरनाणे उद्भवलेल्या जटिल, भयावह समस्या आणि त्यामुळे बदललेले मानवी वर्तनव्यवहार, आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर मूलगामी स्वरूपाचे झालेले बदल महत्त्वाचे आहेत. या काळात जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या "खाऊजी" त्रयीतून समाजात झपाट्याने बदल होऊ लागले. त्यातून एक नवे सामाजिक रचित आकाराला आले. लोकशाही मूल्य सोयीस्कर बाजूला सारून आणि भांडवलशाही मूल्यांचा सरेआम शिरकाव होताना उघड्या डोळयाने पाहत बसण्याची वेळ आली. सरंजामशाही, भांडवलशाहीच्या माध्यमातून शोषणाची नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली. खेड्यांचे ग्लोबलायझेशन करण्याचं स्वप्न दाखवून भारताचा इंडिया कडे जाणारा प्रवास ग्रामीण, आदिवासी, दलित, वंचित, उपेक्षित, भटके, स्त्रियांच्या सरनावरून जाताना दिसत आहे. भांडवलशाहीकरणाने लोकशाही मूल्य, समाजवाद, महापुरुषांचे विचार उद्ध्वस्त करण्याचं भयानक षडयंत्र रचले जात आहे. सत्ता केंद्री राजकारणामुळे पुन्हा सरंजामशाहीच्या दिशेने उलटा प्रवास होताना दिसून येत आहे. हे भयानक वास्तव संवेदनशील प्रतिभासंपन्न दलित कवींच्या

नजरेतून सुटले नाही. या ग्लोबल जगात पुन्हा दलित, वंचित, आदिवासी आपलं अस्तित्व शोधण्यासाठी धडपडत आहेत. त्यांना दिशा दाखवण्याचे काम दलित कवितेने केले आहे.

२००० **नंतरची दलित कविता :-**

२००० नंतरची दलित कविता अधिक प्रगल्ब व विस्तारित झाली आहे. जागतिकीकरणाचे परिणाम व संभाव्य धोक्याचा विचार केंद्रस्थानी ठेवून वाटचाल करत आहे. या दिशाहीन आंबेडकरी जनतेला पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जागतिकीकरणाच्या विळख्यातून बाहेर काढू शकतात असा आशावाद २००० नंतरची दलित कविता व्यक्त करताना दिसून येते. दलित, वंचित, ग्रामीण समाजाचे शोषण करण्याच्या नव्या पद्धती निर्माण करून शोषणाचे नवे मार्ग कसे अवलंबले जातात याचे वास्तव चित्रण २१ व्या शतकातील दलित कविता करताना दिसून येते. यात प्रामुख्याने यशवंत मनोहर, अरुण काळे, उत्तम अंभोरे, उत्तम कांबळे, संध्या रंगारी, सोनवणे, सुरेखा भगत, प्रज्ञा पवार, केतन पिंपळापुरे, महेंद्र भवरे, अविनाश गायकवाड आदी कवींचा प्रामुख्याने समावेश होतो. नव्याने निर्माण होत असलेल्या शोषण, दमनकारी यंत्रणेचा पडदा फास या कवींनी आपल्या कवितेतून केला आहे.

जागतिकीकरणाच्या, भांडवलीकरण्याच्या, सरंजामशाहीच्या, राजकारणाच्या कचाट्यात उपेक्षीत, मागास, दलित समूह चिरडला जात आहे. वर्णभेद, धर्मभेद, मानसिक गुलामगिरी लादण्याच्या नवीन क्लुप्त्या, शक्कल लढवली जात आहेत. अशा नव्या संकटांच्या विरोधात लढण्यासाठी एकत्र येऊन फुले, शाहू, आंबेडकरी विचारांना अधिक धार लावून, या धूर्त षडयंत्रातून बाहेर पडून, धूर्तपणे कावेबाज पणे केलेली आमच्यातील दुही फोडून, एकसंध होऊ असा आत्मविश्वास कवी यशवंत मनोहर आपल्या कवितेतून व्यक्त करतात.

**“आता एक होऊ, तुझ्या मदतीने आम्ही|**
**एकाच गाण्याचे शब्द होऊ, सर्व दुःखाचे जागतिक संगीत होऊ|**
**जागतिक पातळीवरची, एकसंध युद्धाची छावणी होऊ|”**[४]

नव्वदोत्तर मराठी कवितेच्या प्रांतातील मुख्य प्रवाहातील कवी म्हणजे अरुण काळे होय. जागतिकीकरणाच्या पसाऱ्यात दलित कवितेचा परीघ विस्तारण्याचे काम त्यांनी केले. या व्यवस्थेतील शोषित, सर्वहारा, सामान्यवर्ग त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. त्यांच्या ‘रॉकगार्डन’, ‘सायरन चे शहर’, ‘नंतर आलेले लोक’, ‘ग्लोबल चे गावकुस’ या कवितासंग्रहाच्या नावावरूनच जागतिकीकरणाची विविध रूपे या संग्रहातील कवितातून आल्याचे जाणवते. या काळोखी, अस्थिरविश्वातील, अगतिक माणूस

कवितेच्या केंद्रस्थानी आहे. 'नंतर आलेले लोक' या संग्रहातील अनेक कवितांमधून जागतिकीकरणाच्या राक्षसी भुकेचा सूक्ष्म धांडोळा घेण्यात आला आहे. यातील 'मल्टीलुटालूटीचा झिंग लपालपा' ही कविता अत्यंत बोलकी आहे. माणूस कसा सुख वस्तू, भौतिकवादी आणि यांत्रिक बनवला जातो हे त्याचे त्याला पण लक्षात येत नाही. 'जगा आणि जगू द्या' हे मानवतावादीतत्त्व कसं पायदळी तुडवल जातं याचं मूर्तीमंत उदाहरण त्यांच्या पुढील कवितेतून लक्षात येते.

**"टूक टूक पाहणाऱ्यांनो, कोल्हे-लांडगे, गिधाडांनो,**
**तुटून पडा, लुटा लुटा, दात विचका पुढे घुसा|"**[५]

जागतिकीकरणामुळे माणसाची क्रमाक्रमाने पशूत्वाकडे चाललेली वाटचाल उद्याच्या शोषित समाजव्यवस्थेत बदलणार आहे. याचे भाकीत कवी करताना दिसून येतो. यामुळे दलित शोषित मानवतावादी चळवळी मोडीत निघत आहेत. 'प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण' ही कविता या संग्रहातील एक महत्वाची कविता आहे. भोगवादी समाजात संस्कार शून्य पिढी कशी निपजली जात आहे. या संदर्भात अरुण काळे आपल्या कवितेत म्हणतात.

**"बापाने मुलाला विचारलं कितव्या वर्गात शिकतो?**
**मुलाने बापाला विचारलं तुमचं पूर्ण नाव काय?"**[६]

असी संस्कारहीन, संवादहीन, मूल्यहीन पीडी घडण्याचं कारण जागतिकीकरण आहे. यात वस्तूकेंद्रीत विश्व आकारला आले आहे. शीतपेये, संगणक, सायबर कॅफे, डान्सबार, फास्टफूड, प्रचंड मॉल्स, व्यसनाधीनता अशा प्रलोभनीय जंजाळात सामान्य माणूस आपसूकच खेचला गेला आहे. उपभोगाच्या नशेत राहू लागला. यामुळे संस्कृती आणि मूल्य यांचे चौका-चौकात धिंडवडे निघत आहेत. आरक्षणाच्या नावाखाली समाजात द्वंद्व पेटवून देण्याच घातक षडयंत्र रचले जात आहे. दलित-दलितेतर संघर्ष पेटवून स्वार्थी, मतलबी राजकारणाची पोळी भाजून घेण्याचं काम केलं जात आहे. यासंदर्भात कवी संजीव कुमार सोनवणे म्हणतात.

**"अगदी काल परवाच,**
**तो मला संस्कृतीच्या चौपाटीवर भेटला|**
**माझ्या खिशात हात टाकीत म्हणाला...**
**थोडीशी जात देतोस का उचल वार?**
**राखीव जागांसाठी|"**[७]

दलितांचे हक्काचे आरक्षण उच्चवर्णीयांच्या डोळयात सलत आहे. आरक्षणातून दलितांची होणारी सामाजिक, आर्थिक प्रगती देखवत नाही. समाजातील समरसता त्यांना नको आहे. उपहासात्मक जातीचा, आरक्षणाचा उल्लेख करून आरक्षणाचे डॉ. बाबासाहेबांनी दिलेलं कवच ते काढून घेण्याच

भयानक षड्यंत्र रचल जात असल्याचं कवी कवितेतून अधोरिकीत करताना दिसून येतो.

जागतिकीकरणा नंतर सरंजामशाही राजकारणाच्या माध्यमातून सत्ता केंद्री घराणेशाही, राजकारण आणि त्यातून भांडवलीकरण या दुष्टचक्रात सामान्य माणूस हा कंगाल होत जात आहे. हाताच्या बोटावर मोजता येणारे मात्र गडगंज श्रीमंत होत आहेत. या संदर्भात डॉक्टर सुदेश वर्धे  यांचे मत विचारात घेता येईल.

**"२१ व्या शतकातील वर्तमानाला भयानक चेहरा चिकटवून पोकळीतील काळोख आणखीच गडद होत जातोय, याच पोकळीतील काळोखात थव्याथव्याने दबा धरून बसलेले, अंधारावर रक्तांची अक्षरं लिहिणारे सत्ता काबीज करून प्रकाशात येऊ पाहत आहेत."[८]**

जागतिकीकरणाने एक सुंदर गोंडस स्वप्न रंगवलेलं आहे. या स्वप्नाच्या मायानगरीत सामान्य माणूस नागवला जात आहे. शोषणाच्या नव्या मार्गाची निर्मिती केली जात आहे. या शोषकांच्या उद्धाराचा एकमेव उद्धारकर्ता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत. आंबेडकरी विचार हा असा अँटिव्हायरस आहे. की कोणतेही व्हायरस आले तरी त्याचा पराभव करण्याची त्यात क्षमता आहे. कवी अरुण काळे आपल्या कवितेतून संगणक, तंत्रज्ञान, व्हायरस, प्रोग्राम इ. माहिती तंत्रज्ञानातील प्रतिमा-प्रतिकांचा खुबीने वापर करताना दिसून येतात. हा देखील कवितेवर झालेल्या जागतिकीकरणाचा परिणाम म्हणता येईल.

**"आता या आयटीच्या युगात**
**दलितांना डि-लिट करण्यासाठी**
**नवनविन सॉफ्टवेअर येता हेत**
**आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी**
**सोडले जाताहेत विषाणू**
**तरी ही तुझी अँन्टी व्हायरस खबरदारी**
**पुन्हा-पुन्हा करतेय त्यांना पराभूत"[९]**

आंबेडकरी विचार हे काळाच्या पटलावरील रामबाण इलाज आहेत. प्रत्येकाने आंबेडकरी विचारांना आत्मसात केले पाहिजे. सर्व शोषणापासून मुक्ती मिळवून समाज हा सोशल मुक्त होऊ शकतो. समाजात सामाजिक समरसता नांदेल असा आशावाद कवी व्यक्त करताना दिसून येतो.

जागतिकीकरणात माणूस भौतिक सुखाच्या मागे लागल्याने वस्तू केंद्री होत आहे. जे डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या आरक्षणाचा फायदा घेऊन उच्च पदावर गेली. अशींनी स्वतःच्या स्वार्थासाठी दलित चळवळ राजकीय पक्षांच्या दावणीला बांधली आहे. आंबेडकरी अस्मिता कुठेतरी घाण ठेवली

जात आहे. यातून फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची, तत्त्वज्ञानाची पायमल्ली होत आहे. हे सर्व जागतिकरणाचे विपरीत परिणाम आहेत. याची खंत कवयित्री संध्या रंगारी आपल्या कवितेतून व्यक्त करताना म्हणते.

**"धम्म परिषदेचा भरलाय उरूस**
**उधळत आहेत निळ**
**चुरमुरे फुटाणे बताशात चळवळ**
**भिकू बडव्यांचे प्रतिरूप**
**धम्म होतोय धर्म**
**जाणून मर्म**
**आपण मख्ख"**[१०]

ज्या धर्माने आपल्या पूर्वजांना पशु पेक्षा वाईट वागवले. त्यापासून मुक्ती मिळवून देण्यासाठी क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेबांनी धम्माचा पर्याय निवडला आणि आपल्याला माणूस म्हणून अस्मिता प्राप्त झाली. त्या धम्माचा पुन्हा उलट्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे. धर्माचे रक्षण कर्ते भिकुच बडव्यांच्या रूपात कवयित्रीला दिसत आहेत. येते बडवे म्हणजे शोषण करणारी व्यवस्था आहे. आणि आपण सर्वजण हे जाणून देखील गप्प आहोत याची खंत कवयत्री व्यक्त करते. आपल्याला 'दिसून आंधळे, ऐकून बहिरे होण्याची वेळ' या जागतिकीकरणाच्या रेट्याने आणली आहे. मनुष्य यंत्र झाला आहे. आजूबाजूला काय जळत आहे याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. म्हणून हे सर्व घडत आहे. असे सूचक विधान कवयित्री करून जाताना दिसते.

साहित्यिक हे संवेदनशील मनाचे असतात. असे म्हटले जाते की 'जिथे न जाय रवी, तेथे जाय कवी' या म्हणी प्रमाणे सभोवतीच्या बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेत, त्याची नोंद घेत, वर्तमान काळाच्या गर्भात, नव्या येणाऱ्या शतकामध्ये, मानवी प्रगतीतील संभाव्य अडचणींची नोंद कवी सुदाम सोनुले आपल्या कवितेतून घेताना दिसून येतो.

**"ग्लोबल संस्कृतीच्या पर्यावरणात**
**पेट घेतेय त्रस्त वस्ती**
**देहाची बाजारपेठ होत आहे सस्ती**
**आता इथले उदय-अस्त बदलायला हवे**
**लुकलुकणारे तारे ही हद्दपार करायला हवे"**[११]

या ग्लोबलायझेशन मुळे माणसाची किंमत शून्य झाली आहे. माणसांचे मरण स्वस्त झाले आहे. सर्वच आता नव्याने मांडणी करण्याची गरज आहे. या व्यवस्थेला खतपाणी घालणारे, सारेच हद्दपार करण्याची, विद्रोहाची भाषा नव्या दमाचा कवी सुदाम सोनुले कवितेतून व्यक्त करताना दिसून येतो.

जागतिकीकरणाच्या या शोषणवस्थेत सर्वजण बिळात बसले आहेत. आपल्या हक्कासाठी शोषणाविरुद्ध, आरक्षणाच्या पळवा पळवी विरुद्ध एक सुद्धा संघटना, चळवळ, नेता बोलत नाही. मोर्चा काढत नाहीत. नेते पक्षाच्या दावणीला बांधले गेले आहेत. कार्यकर्त्यांनी इमान विकलं आहे. अशा दाहक अग्नितांडव सर्वत्र पेटला आहे. आंबेडकरी चळवळीतील जाज्वल इतिहासातील गवरवशाली आठवणी मनाला थंडावा देतात. अश्या आठवणी येणे सहाजिक आहे. आपल्या हक्कासाठी दलित चळवळीने आजपर्यंत केलेला संघर्ष, मोर्चे, नेते, कार्यकर्ते किती प्रमाणिक आणि समाजहिताला प्राधान्य देणारे होते. याची आठवण काढतानाच आजच्या दिशाहीन चळवळी, नेते, कार्यकर्त्यांबद्दल कवी पुढील कवितेतून खंत व्यक्त करतो.

**"तुरुंगात पाय ठेवायला जागा नसायची**
**घोषणा निषेधाच्या डरकाळ्या फोडीत**
**निळेझेंडे दिमाखात फडकावित**
**सिंहासारखे निर्भिळ, मोर्चा पुढे चालायचे नेते**
**कार्यकर्ते नेक होते, पुढारी सगळे एक होते**
**ते पँथरचे दिवस होते."**[१२]

एकंदर कवी सर्व आंबेडकरी अनुयायांना एका निळया झेंडयाखाली पुन्हा एक होण्याच आव्हान करत आहे. या ग्लोबलायजेशन, भांडवलीकरणानं आपल्यात फूट पाडून सोयीस्कर आपले शोषण होणार आहे. सर्वजण एकत्र येऊन आंबेडकरी विचार धारेचे पाईक होण्याचे आव्हान करत आहे.

विविध सामाजिक, सांस्कृतिक, परिवर्तनवादी चळवळीमध्ये सक्रिय असणारे, कवी उत्तम अंभोरे यांचा उल्लेख जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर दलित जाणिवेच्या कविता दमदारपणे लिहिणारे कवि म्हणून केला जातो. ते फुले, शाहू, आंबेडकर विचारधारेचे सच्चे अनुयायी आहेत. त्यांचा "पत्ता बदलत जाणारा गनीम" हा काव्यसंग्रह म्हणजे आंबेडकरी विचारांबरोबरच विद्रोहाची भाषा बोलतो. दलित चळवळ, नेते, कार्यकर्ते पांगत आहेत. ज्यांनी दलित चळवळीच्या माध्यमातून स्वतःच्या पात्रावर अधिकचा भात ओढून घेतला आहे. ज्यांचे पोट भरले आहे. ज्यांच्या ढेरीवरून हात फिरवले जात आहेत. अशांनी स्वतःचे पांढरपेशीकरण करून घेतले आहे. अनेक दलित विचारवंत अभ्यासक परिवर्तनाच्या चळवळीपासून दूर जात आहेत. आंबेडकरी विचार, तत्वज्ञाना व्यतिरिक्त दलित चळवळ, दलित साहित्य म्हणजे नुसती करमनुक होईल असा ठाम विश्वास कवीला वाटतो. म्हणून कवी म्हणतो...

**"नेहमी नेहमी**
**त्याच त्याच गोष्टी**
**सांगण्याची नि ऐकण्याची**

**सवय झाली आपल्याला**
**आता आपले कान कापले पाहिजेत**
**नि सांगणाऱ्यांचे तोंड झोडले पाहिजे"**[१३]

आंबेडकरी चळवळीत घुसलेल्या अपप्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी, अपप्रचार करणाऱ्यांचे तोंड झोडण्याची भाषा कवि करत आहे.

**निष्कर्ष :-**

१. साठोत्तरी दलित कवितेने मराठी साहित्य संपन्न समृद्ध केले असल्याचे चित्र स्पष्ट होते.
२. दलित चळवळीने दलित साहित्याला दिशा दिली आहे. तसेच दलित साहित्यामुळे दलित चळवळ अधिक लोकाभिमुख झाली असल्याचे आढळून येते.
३. दलित कवितेने १९९० नंतरच्या जागतिकीकरणाचा सुक्षम आढावा घेतल्याचा दिसते. दलित, वंचित, भटक्यांच्या अस्मितेचा आढावा घेतानाच नव्या शोषण पद्धतीचा समाचार २००० नंतरची दलित कविता घेताना दिसते.
४. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे दलितातील पहिल्या उच्चशिक्षितांचे होणारे पांढरपेशी करण, धम्माचा धर्मात होणारा प्रवास, नेते, कार्यकर्ते, भिक्कुंच्या निष्ठेचा प्रश्न, स्वार्थासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांचा होणारा वापर इत्यादी विषयावर २००० नंतर ती दलित कविता परखडपणे, प्रखरपणे, रोख-ठोक विचार अभिव्यक्त करताना दिसते.

**सारांश :-**

एकूणच २००० नंतरची दलित कविता अंतर्बाह्य बदलत आहे. खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरणाने निर्माण केलेल्या जटिल समस्या, मानवा पुढील अस्तित्वाचे प्रश्न, पर्यावरणाचे प्रश्न, सत्ता केंद्रित घराणेशाहीचे, स्वार्थी राजकारण आदी असंख्य प्रश्नांचा गुंता सोडवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्वाचे आहेत हे विसरून चालणार नाही. फुले, शाहू, आंबेडकरी विचार आज सुद्धा दलित कवितेचा मुख्य ऊर्जा स्त्रोत, प्रेरणा असल्याचे दिसून येते. नव्वदोत्तरी नव्या दमाच्या मराठी दलित कवींनी दलित कविता अभिव्यक्त करताना जगण्याचे अनेक प्रश्न मांडले आहेत. आंबेडकरी, सामाजिक, परिवर्तनवादी चळवळीला पुन्हा नव्याने एका निळया झेंडया खाली आणण्याचा आशावाद दिसून येतो. माणसाची चंगळवादी भोगवादी वृत्ती, त्यामुळे पर्यावरणाचे होणारे अतोनात नुकसान, यातून निर्माण होणारी एक नवी शोषण व्यवस्था यावरही कवितांच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचे काम केले आहे. दलित कविता जरी जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर जागतिकीकरणाचे प्रश्न मांडत असली तरी दलित कवितेचे ऊर्जास्त्रोत म्हणून

फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांना त्यांनी शिरसावंद्य मानत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :-**


०१. प्रज्ञा लोखंडे – 'अंत:स्थ', मानसन्मान प्रकाशन, पुणे. पृ. क्र. २५.

०२. भालचंद्र फडके – 'दलित साहित्य, वेदना आणि विद्रोह' श्री विद्या प्रकाशन, पुणे. पृ. क्र.११३.

०३. बाळकृष्ण कवठेकर – 'दलित साहित्य एक आकलन' पृ. क्र. २१.

०४. संपा उत्तम कांबळे – 'जागतिकीकरण व मराठी कविता' पृ. क्र.०१.

०५. अरुण काळे – 'नंतर आलेले लोक' पृ. क्र. ९६.

०६. अरुण काळे – 'नंतर आलेले लोक' पृ. क्र. ३९.

०७. म. सु. पगारे – 'दलित साहित्याचा इतिहास' पृ. क्र. ७८.

०८. सुदेश वर्धे – 'आता माणसाचा शोध सुरू आहे' पृ. क्र. २५.

०९. अरुण काळे – 'नंतर आलेले लोक' पृ. क्र. ४५.

१०. संध्या रंगारी – 'संध्या रंग' पृ. क्र. १२४.

११. सुदाम सोनुले – 'सूर्यफूल आणि काळोख' पृ. क्र. ४०.

१२. सं.पा. मंडळ – 'अस्मितादर्श' आवृती-२०१५ पृ. क्र. ५८.

१३. उत्तम अंभोरे – 'पत्ता बदलत जाणारा गनीम' पृ. क्र. ६७.


***

# २००० नंतरच्या कवितेतील  वास्तव दर्शन


## डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.


२००० नंतर च्या कवितेतून आलेल्या वास्तव जीवनाचा वेध आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येतो. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजामध्ये घडणाऱ्या घडामोडीचा तो एक आलेख असतो. ज्या काळातील साहित्य निर्माण होते त्या काळाचं वास्तव प्रतिबिंब त्या साहित्यात पडताना दिसते. तो प्राचीन काळा असो अर्वाचीन काळ असो की आज २००० नंतर साहित्य असो. या सर्व साहित्यामध्ये समाजाचं वास्तव दर्शन घडत असते.

कविता हा कवीच्या आत्म्याचा उद्गार असतो. कवीही इतरांसारखा समाजव्यवस्थेमध्येच राहात असतो; पण सुदैवाने त्याला इतरांपेक्षा वेगळी संवेदनशीलता नियतीने दिलेली असते. त्यामुळे त्याच्या अवतीभवती जे जे घडत असते, त्याचा काही एक परिणाम त्याच्या मनावर होतो. आपोआप त्याच्या मनात दाटून आलेले शब्द कागदावर उमटतात आणि त्यातून त्याला जाणवलेले दुःख कविता होऊन प्रकट होते. कवी इतर जगणाऱ्यांपेक्षा जास्त जिवंत असतो; याचे कारण, तो अखंड जागाच असतो. म्हणून तो जगातील वास्तव रेखाटत असतो.

साहित्य ग्रामीण असो, शहरी असो आदिवासी असो, कुठल्याही प्रकारचा साहित्य प्रकारअसो, त्या साहित्यामध्ये त्या प्रदेशाचा त्या काळाचा ठसा व म्हटलेला असतो. ग्रामीण साहित्याच्या संदर्भाने या साहित्यात कोण कोणत्या बाबी चा समावेश होतो. हे आपणाला पुढील बाबीतून दिसून येईल

“खेड्यतील माणसांच्या जीवनशेती, श्रद्धाविश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारा भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक आर्थिक संबंधाची पारंपरिक व्यवस्था आधुनिक काळातील ग्रामपंचायत व्यवस्था, सहकार तत्त्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्रसंस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले अक्रमण व त्याचे परिणाम जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन ग्रामीण जीवनातील मानवसमूह, या मानवसमुहात असलेले ग्रामीण भागातील राजकारण व समाजकारण या राजकारणातील व समाजकारणातील व्यक्ती आणि व्यक्तिजीवन त्यांच्या भावना व जाणिवा या समुहातील ताणतणाव ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्र असतात." १ ग्रामीण माणसाच्या जीवनविश्वातील ही आशयसूत्र लक्षात घेतल्यास ग्रामीण जीवन संस्कृती व संज्ञा संकल्पनेत अर्थतः सहज ज्ञात होते. तरीही अधिक विस्तश्तपणे ही संज्ञा लक्षात घेण्यासाठी मराठी वाङ्मय कोशकारांनी कोशामध्ये ग्रामीण साहित्याचा

जोड उल्लेख केलेला आहे, तोही येथे पाहता येण्यासारखा आहे “ग्रामीण साहित्याचा उल्लेख 'जानपद साहित्य' असाही केला जातो. विशेषत: १९४० पूर्वी ग्रामीण साहित्याला जानपद साहित्य असे म्हटले जात असे. त्याचा शब्दश: अर्थ या देशातील जनसामान्याचे साहित्य असा होतो. आपल्या देशातील ७० ते ७५ टक्के सामान्यजन सर्वसामान्य हे समानार्थी शब्दप्रयोग ठरतात. ग्रामीण साहित्य असा वेगळा साहित्यप्रकार नाही. तो एक वेगळा असा साहित्यप्रकार मानता येईलग्रामीण विभागाशी संबंधित असे जीवानानुभव ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतात."[२] ग्रामीण साहित्यास पूर्वी जानपद साहित्य असे म्हटले जात असल्याचा उल्लेख कोशामध्ये येतो आपल्या देशातील एक ८० टक्के जनता ग्रामीण भागात राहते हेही येथे खरे आहे.

मधुकर खराटे यांच्या धानाच्या सुकल्या बांद्या या कवितेतून येणारं वास्तव ते पुढीलप्रमाणे मांडतात

"किती उन्हाच्या अजुनी झळा, कापूस सोया होत असे 'लिवलिवा'
अळी शोषतेअन्नरस, जातील किती बळी हे लिहून ठेवा
किती जरी केलेल्या घोषणा किंवा मलमपट्टी केली
धानाच्या सुकल्या बांद्या असुनी यंत्रणा भवताली"३

हे ग्रामीण भागातील जळजळीत वास्तव मधुकर गराटे यांच्या कवितेतून व्यक्त झाले आहे.

मधुकर गराटे यांच्या रस्त्यावरचे ठसे या कविता संग्रह संदर्भात ते असे म्हणतात," रस्त्यावरचे ठसे हा त्यांचा नवा कवितासंग्रह नावापासूनच थेट मातीशी नातं सांगणारा! क्षणात अंत:र्मुख पाहायला लावणारा! आपली जुनी माती आणि तिच्यावर होत असलेलं, होऊ घातलेलं प्रगतीच्या नावावरचं बेबंद आक्रमण बघून अस्वस्थ होणारी ही कविता! सारेच ऋतू बेभरवशाचे झाल्यानंतर नवनिर्मितीचाच पिके उदरात जोपासणाऱ्या तहानलेल्या मातीनं भरवसा तरी कुणावर ठेवायचा? भेगाळलेल्या मातीची तहान आण थेंबा थेंबाची वाट पाहून सुकलेलं उदास रान यांचा अस्वस्थ आकांत म्हणजेच 'रस्त्यांवरचे ठसे'! "४

ग्रामीण भागातील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण कवी करतो.

"गढी उभी आहे वर्षानुवर्ष
रुढींच्या खपल्या
अंगा-खांद्यावर मिरवत
पावसाच्या धारा अंगावर झेलत"५

ग्रामीण जीवनात एकेकाळी ज्या ठिकाणाहून संपूर्ण गावाचा कारभार पाहिला जायचा ती सत्ताधीश गढी नेस्तनाबूत झाली आहे. गतवैभवाच्या आठवणी ताज्या राहिल्याचे कवी सांगतो आहे. आज असलेले गढीचे वास्तव कवी आपणा समोर मांडतो आहे. ग्रामीण जीवनात राजकारण खूप

वाढले आहे. गल्ली बोळात पुढारी निर्माण झाले आहेत. पण त्या सर्वांची वागण्याची रित वेगळी आहे. प्रत्येकाला स्वतः चे हितसंबंध जोपासावे वाटतात.

" गल्लीपासून दिल्लीपर्यंत
रीत आहे न्यारी
आयक माह्य गणपत
सारेच नते भ्रष्टाचारी
राजकारणाचा यांनी
अर्थच उलटा लावला
स्वार्थासाठी देश यांनी
बाजारात विकायला काढला."६

या आजच्या परिस्थितीचे चित्रण कवितेतून येताना दिसते. शेतकऱ्यांच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण करताना कवी शिवाजी शिंदे लिहितात,

'इथं सगळेच बोंबा मारतात
महाग झालेत म्हणून कांदे
मात्र कोणालाच दिसत नाहीत
माझ्या शेतकऱ्याच्या जगण्याचे वांदे'

दैनंदिन जीवनात चार-दोन रुपयांनी कांदा महाग झाला तरी, दोन रुपयांनी कोथिंबीर महागली तरी किती गहजब होतो, सगळीकडे बोबा सुरू होते. कोथिंबीर येण्यासाठी काय आणि कसे पेरावे लागते, ती दिवसात उगवते, याचे जराही ज्ञान नसणारे लोक माध्यमांच्याद्वारे बौद्धिक घसरगुंड्या खेळू लागतात. सामान्य माणूस कसा अडचणीत आलाय वगैरे वारेमाप चर्चा होते. बिचारा पिकवणारा हे सारे ऐकतो, पाहतो आणि दुःखी होने एकाकी होतो. वेतन आयोगाच्या जराशा लांबणीने अस्वस्थ होणारे आणि एक तारखेऐवजी दोन तारखेला जर पगार झाला, तर आकाश-पाताळएक करणारे आम्ही 'कांद्याचे वांदे'चा बोंबाबोंब प्रयोग जोरात सुरू करतो. पण कवी शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनाचा शोध घेतो. सरकारचे धोरण  कुचकामी ठरणारे असतात. ग्रामीण भागामध्ये एक म्हण आहे .लबाडाच्या घरचे निमंत्रण जेवल्याशिवाय खरं नसतं असाच एक प्रसंग आपल्या कवितेतून कवी मांडतो,

'शासनाच्या मदतीची चातकाप्रमाणं वाट पाहत बसावं
तर कधी पंचनाम्याचं नाटक सहन करावं
शेवटी यातून काहीच मिळत नसल्यानं
शेतकऱ्यानं मात्र मरणालाच कवटाळावं'८

हे जिवंत चित्रण शिवाजी शिंदे यांच्या कवितेतून व्यक्त होत.

शेतकऱ्याला निसर्ग ही साथ देत नाही त्यामुळे शेतकऱ्याच्या प्रश्नाची ओरड कधीही न संपणारी आहे. त्यातच त्याला पाऊस दगा देणार नाही म्हणून तो काहीबाही पेरतो. पण भरवशाचा बेभरवसा होतोच. बियाणंच खोटं, काहीच उगवत नाही. उगवते ते फक्त प्रश्नांचे तण. ते कितीही काढले तरी पुन्हा उगवत असते. डॉ. शिवाजी शिंदे यांनी 'पोरीचं लगीन' या कवितेत हीच व्यथा मांडली आहे.

'कसंबसं पाव्हणं पोरीला बघायला आलं
पाहुण्याच्या मोठ्या हुंड्याच्या मागणीनं
बापाचं काळीज गेलं फाटून
सांगा बरं, यंदा कसं व्हईल माझ्या पोरीचं लगीन ?'

असा केविलवाणा स्वर शेतकऱ्यांच्या तोंडून बाहेर पडतो. एकंदरीत साहित्यातून आजचे असणारे भयान वास्तव कवी लेखक मांडताना दिसून येते

संदर्भ.


१)संपादक प्रभा गणोरकर वाङ्मयीन संज्ञा संकल्पनाकोश मुंबई २००१ २००
२)डॉ. विजया राजाध्यक्ष खंड-४ म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई २००२पु .१३५
३)मधुकर गराटे : रस्त्यावरचे ठसे संवेदना प्रकाशन, नागपूर २०१६ ,प.१५
४)मधुकर गराटे : रस्त्यावरचे ठसे संवेदना प्रकाशन, नागपूर २०१६ ,प्रस्तावना.
५)प्रवीण वानखडे -अस्वस्थ युगाची कविता ,अनघादित्य प्रकाशन पृ.१५
६) प्रवीण वानखडे -अस्वस्थ युगाची कविता ,अनघादित्य प्रकाशन पृ.७५
७) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. प. २२
८) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. प. २१
९) शिवाजी शिंदे - कैवार शब्द शिवार प्रकाशन ,मंगळवेढा सोलापूर. प. २५


***

# नातीगोती सांभाळत सुगीचे दान देणारी कविता : "सुगीभरल्या शेतातून"

शरद ठाकर
संशोधक विद्यार्थी,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
डॉ. अशोक पाठक
मराठी विभाग, लालबहादूर शास्त्री महाविदालाय, परतूर, जि. जालना

सुगीभरल्या शेतातून हे सुप्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांच्या निवडक कवितांचे व्यासंगी समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी संपादित केलेले संपादन. इंद्रजित भालेराव यांच्या शेती-माती, ग्रामीण जीवन, ग्रामीण जीवनातले ताणतणाव, सण-समारंभ शेतकरी कष्टकऱ्यांची होणारी पिळवणूक, जागतिकीकरण अन् शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेले अस्मानी-सुलतानी संकट हे कायम सोबतीला असलेले जीवन जगणं शेतकऱ्यांच्या नशीबी असले, तरी इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील शेतकरी याही परिस्थितीत रडगाणं गात बसत नाहीत. तर शेतकरी आत्मविश्वासाने जगला पाहिजे, कठीण परिस्थितीतही तो संकटांना तोंड देत उभा राहिला पाहिजे. यासाठी शेतकऱ्याचे आत्मबळ वाढवणाऱ्या कविता ते लिहितात. इंद्रजित भालेराव यांच्या समग्र कवितांचा संग्रह अर्थात "सारे रान" आपल्याला माहीतच आहे. इंद्रजित भालेराव यांच्या कसदार आणि जोमदार कवितांनी "सारे रान" फुलून आलेले आहे. अशा ह्या "सुगीभरल्या शेतातून" शेतकरी जेव्हा त्याच्या खूप जवळच्या आत्मीयता असलेल्या पाहुण्या राहुळयांना, आपल्या मित्राला शेतातला वानवळा द्यायचा असेल तर तो पुन्हा डांभ्यात जातो. म्हणजे शेतातल जे सर्वोत्कृष्ट पिकलेले आहे. ते आपल्या प्रिय व्यक्तीला देत असतो. त्याच पद्धतीने या कवितेच्या 'सुगीभरल्या शेतातून' ही कविता ज्यांचा आस्थेचा आणि अभ्यासाचाच विषय नाहीतर, कविता ज्यांचा जणू श्वास आहे असे समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे हे सुगीने भरलेल्या ह्या कवितेच्या शेतातून काव्य वाचकांना. तन्मयतेने कवितेचा वानवळा देण्याची पारख असलेल्या प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी इंद्रजित भालेराव यांच्या समग्र कवितेतून १०६ कविता वाचकांसाठी या संपादनात

निवडलेल्या आहेत. या कवितांमधून इंद्रजित भालेराव यांची कविता, समजून घेता येईल. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेच पीक कस जोमदार, दमदार आणि कसदार आहे त्याचं मासलेवाईक उदाहरण म्हणजे "सुगीभरल्या शेतातून" हे संपादन आहे. याच संपादनात 'मातीच्या मार्दवामुळेच' या कवितेत डांभ्याच पोषण कसं होतं. कठाळयाला डांभा जसा आपल्याच मालकीचा वाटतो. तसाच तो गरीब गाईलाही आपलासा वाटतो, एवढेच नाही तर रानातली माणसं डांभ्या जवळच सापडतात किंवा चिमणी पाखरंही हमखास डांभ्यावरच असतात. एवढंच नाही तर भाग्यवंताच्याच शेतात अनेक डांभे असतात आणि अख्ख शेतच डांभा असत असा बळीवंत एखादाच असतो.हे सांगताना इंद्रजित भालेराव म्हणतात.

"भाग्यवंताच्या शेतात
अनेक डांभे असतात
ज्याच अख्खं शेत डांभा
असा बळीवंत एखादाच" (पृ.१२५)

इंद्रजित भालेराव यांच्या कवितेच अख्ख शेतच डांभा झालेले ते भाग्यवंत कवी आहेत आणि त्यांच्या ह्या डांभ्यातल्या निवडलेल्या कविता वाचून वाचकाला इंद्रजीत भालेराव यांची समग्र कविता समजून घेता येईल. 'भालेरावांची कविता आपल्या मातीशी, संस्कृतीशी इमान राखणारी आहे. पोळा, दिवाळीविषयी येणाऱ्या 'पेरा' संग्रहातील कविता येथील संस्कृतीचे निदर्शन करून देतात.'[१] शेती-माती, शेतकरी त्यांचे विविध सण-समारंभ,आपल्या कवितेतून मांडून शेतकऱ्यांना लढायला शिकवणाऱ्या कविता लिहिणारे इंद्रजित भालेराव यांनी शेती- मातीचीच कविता लिहिली त्याच्या मागचं कारण ते 'दो जीवाची' या कवितेतून सांगतात.

"भर उन्हात जन्माला माती तोंडात घेऊन,
**वाढलास एवढा तू धान मातीचं खाऊन**
**मातीसाठीच जगावं मातीसाठीच मरावं**
बाळा,मती लई थोर तिला कसं इसरावं" (पृ.४८ )

अशा पद्धतीने आईने मातीची थोरवी, मातेचे महत्व सांगितल्यामुळे मातीच्या आणि शेतकऱ्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी ते शेती मातीची कविता लिहीत असावेत. या संपादित कवितांमध्ये माझं माहेर तुटलं

पृ.४३, मीया मनलं पृ.४९, ऐक ऐक सूनबाई पृ.६८, उभ्या उभ्या आड रातर पृ.७८, जाय तुला बोलायचे न्हाय पृ.१३१, लेकीचा जलम पृ.१३२, माहेरचा झोका पृ.१३३, सांग पृ.११७ ह्या कवितेतून कुटुंबातील माय-लेक, बाप-लेक, बहीण-भाऊ असे विविध नाते संबंध आपल्या उलगडून येतात. त्यासोबतच लेकीला, सुनेला कसे जगले पाहिजे, कसे वागले पाहिजे. हे साध्या सोप्या भाषेत ह्या कवितांमधून ते सांगतात. लेकीला पाहुणे पहायला येणार असतात. तेव्हा आई ताडमाड वाढलेल्या लेकीला कवितेत काय म्हणते ते पहा.

असा लेकीबाळीला सल्ला देतानाच 'गावाकड' या कवितेतून इंद्रजीत भालेराव आपल्याला गावाकडे घेऊन जातांना म्हणतात.

"काट्याकुट्याचा तुडवीत रस्ता
माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता" (पृ ७०)

याच प्रमाणे

"माझ्या गावच्या पाण्याचे
खोल जमिनीत झरे
कुणी फाकवारे माती
झरे होतील पिसारे" (पीकपाणी पृ.१४)

"अशी किमया करण्याची धमक या कुणब्यात आहे. रात्रंदिवस मातीशी,दुष्काळाशी झट्याझोंब्या घ्याव्या लागतात, तेव्हा माती पान्हावते.रुमण्याच्या जागी मेरूमणी पाहण्याची दृष्टी या कवितेला - कवीला आहे."[२] गावाकडे गेल्यानंतर गावात उन्हातानात माणसं कशी कष्ट करतात. त्यांना शेती करताना किती यातना भोगाव्या लागतात. हे ह्या कवितेतून सांगताना शेतकरी या भूमीचा मूळ अधिकारी असून त्याला आज कसं भिकाऱ्यासारखे काम मागत गावोगाव कस फिराव लागतय हे सांगतानाच. जागतिकीकरण आणि त्यामुळे बदलत गेलेला गावात, गावात आलेल बकालपण, बदलत गेलेले माणसाचे स्वभाव, नातेसंबंध, बदललेला निसर्गाने या सर्वांची शेती आणि शेतकरी जीवनावर झालेले परिणाम. गावपांढरी ओस झाली पृ.४४, जागतिकीकरण पृ.९५, मनाचे कुपोषण पृ.१५२ या कवितांमधून बदललेल्या गावाबद्दल बोलतांनाच ते 'होते विठूचे मंदिर' या कवितेतून ते पुढील आशावाद व्यक्त करतात.

"कुणी यावा भगीरथ |
गंगा आणावी गावात |
आम्ही त्याच्याच नावात |

देव शोधू |" (पृ.५७)

गाव बदलल, गावातली माणसं बदलली तरी गवत बदलत नाही आणि ते मरतही नाही.ते अमर का आहे ?त्याचे विविध प्रकार हे आपल्याला समजून घ्यायचे असेल तर इंद्रजीत भालेराव हे आपल्याला सहज सोप्या भाषेत गवताचे विविध प्रकार, त्यांची नावे, त्यांची वैशिष्ट्ये सांगतात. गवतात आपल्या भोवती सृष्टी उभी करण्याची ताकत कशी आहे.ते पुढील शब्दात सांगतात.

"कुठेही पडो कसंही पडो आपल्या अवतीभोवती
सृष्टी उभी करण्याची ताकत गवतात असतेच असते" (पृ.१३७)

आशा गवताच्या संदर्भातल्या कविता याच्या हिरव्या १२४, रानलहू आणि पानलहू १३४,धान पूर्वी तनच होत १३५, गवत १३६, भुईवर पसरलेली १३८, कावसाड -कसई१३९, आवधान नावाचं १४०, चालणारे बैल १४१, गरोदर बाईच्या १४२, दिवाळी आणि उन्हाळी १४३ या गवता संदर्भातल्या कविता संपादनातून वाचायला मिळतात 'सर्वांनाच बांधता यावीत' या कवितेतून इंद्रजित भालेराव यांचा मृदू स्वभाव आणि त्यांच्यातला सर्वांचं भलं होण्यासाठी तळमळणारा कवी आपल्याला दिसून येतो. सर्वांना चौसोपी वाडे बांधता यावेत. सर्वांनाच दही-दूध-तूप-लोणी खायला मिळावं, गोठ्यात गाई अन् वासर असावीत, सासुरवाशिनींना सासर-माहेर वेगळे वाटूच नये अस प्रेम असावे. तद्वतच गावाला तटबंदी नसावी किंवा आत बाहेर वेगवेगळया जाती धर्माच्या वस्त्या नसाव्यात. सर्वांनी गुण्यागोविंदाने एका दिलाने नांदावं असं गाव असाव अस वाटतं अशी माणुसकीची शिकवण देणाऱ्या दिवाळी पृ.७१, पावसा पावसा पृ.७२, बाप म्हणायचा पृ.७६, बैलांना वेळेवर पृ.९७ ह्या कविता संपादनात वाचायला मिळतात. सर्वांचं भलं चिंतनाऱ्या, सर्वांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या कविता इंद्रजित भालेराव लिहितात, पण शेवटी कोणाला ऐकायचं की नाही. हे ज्याच त्यान ठरवाव. कोणाला चांगलं माणूस व्हायचं,की वाईट ज्याचं त्याने ठरवावं हे सांगताना ते सोप्या शब्दात उपयोगी येणार कणीस व्हायचं, की निरुपयोगी कानी व्हायचं हे पुढील शब्दात सांगतात.

"व्हावा कोणता माणूस ज्याचे त्याने ठरवावे
कानी व्हावे का कणीस ज्याचे त्याने ठरवावे"[३]

शेतकऱ्याला शेतात काही उत्पन्न होवो अगर न होवो शेतकरी नित्यनेमाने पाऊस पडला, की काळया आईची ओटी भरायचे काम करतो. त्याची शेती

निष्ठा ढळू देत नाही. शेतच ईमान पृ.६१, एकाचे दाने हजार पृ.१०४, बापाची लोककथा पृ.१५१ या कवितेतून त्यांनी शेतकऱ्यांची निष्ठा मांडलेली दिसून येते. काही शेतकरी आपल्या मालाला योग्य भाव मिळावा, शेतीला चांगले दिवस यावेत,कोणीतरी आपला तारणहार होईल म्हणून वेगवेगळया पुढाऱ्यांच्या मागेपुढे निष्ठावान कार्यकर्ता म्हणून निष्ठेने कार्यकर्ता म्हणून शेतकरी पुढाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून फिरतात. हे निष्ठावान पृ.१४८, बिल्ला पृ.१४९, या कवितेतून दिसून येते. थोडीशी लालूच दाखवून इथली व्यवस्था पुढा-यालाच कसे आपल्या दावणीला बांधते आणि म्हणून शेतकरी हिताचे निर्णय इथे झालेले पाहायला मिळत नाहीत, म्हणून ते 'खांदा' या कवितेत म्हणतात.

"खांदे घडवण्यात आपण अपयशी झालो
की आयते खांदे पळवण्यात ते यशस्वी" ( पृ.१५०)

अशा पद्धतीने पुढारी जरी शेतकऱ्याची साथ सोडणारे, बाजू न घेणारे असले तरी शेतकऱ्यांना आहे त्या परिस्थितीत हिंमतीने लढण्याचं बळ देण्यासाठी शेतकऱ्याच्या पोराला ते म्हणतात.

"शीक बाबा,शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा,
आता लढायला शीक" ( पृ.८२ )

कारण गप गुमान अन्याय सहन करत राहिलं तरी इथली व्यवस्था त्याचा विचार करणार नाही, त्यामुळे त्यांना नाविलाजाने म्हणाव लागत.

"सांगा माझ्या बापानं नाही केला पेरा,
तर तुम्ही काय खाल ? धत्तुरा !" ( पृ.८१ )

शेतक-यांचे आत्मबळ वाढवणाऱ्या माझ्या वासराने पृ.५१, इडा पिडा टळो पृ.५२, उपाय पृ.९२,९३,९४,माती पाणी पृ.९८ दुःख असो जीवघेणे पृ.१०५,फोटो पृ.१५७ ह्या कविता या संपादनात आहेत. इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील फक्त शेतकरीच परिस्थितीशी लढणारा आहे, असे नाही तर त्यांच्या कवितेतील स्त्रियाही खंबीरपणे लढणाऱ्या आहेत. त्यांनीही परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी कमरेला पदर खोचून परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी तयार आहेत. असा आशय रानातल्या उन्हातानात पृ.५५, किती टाकलं साऱ्यांन पृ.६३, कणगी सारखी भरलेली पृ.१६२ ह्या कवितेतून दिसून येते. "रानातल्या उन्हातानात" या कवितेतील खंबीर स्त्रीचे वर्णन करताना ते म्हणतात.

“रानावतल्या उन्हा तान्हात वाळलेल्या सासुरवाशिनी गोवऱ्या वेचते
**आपल्या फाटक्या जिंनगानीचा पदर**
एकदाचा खच्चून कंबरेला खोचते” ( पृ.५५ )

जात धर्म विसरून सुईनपण करणाऱ्या सुईनीची “आडलेली बाई सोडवताना” ही कविता म्हणजे जात-धर्म विसरायला लावणारी, सामाजिक सलोखा शिकवणारी, बुद्धाच शांतीच तत्त्वज्ञान सांगणारी कविताही या संपादनात समाविष्ट केलेले आहे. समीक्षा क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख असणारे समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वातंत्र्योत्तर काळापासून ते इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेपर्यंत आणि इंद्रजित भालेराव यांच्या समग्र कवितेची अभ्यासपूर्ण समीक्षा प्रस्तावनेच्या रुपात केलेली आहे. ती मुळातून वाचावी अशीच आहे. एकंदरीतच नातीगोती सांभाळत “सुगीभरल्या शेतातून” आनंदाने सुगीचे दान देणारी कविता या संपादनात वाचायला मिळते. रविमुकुल यांनी सुंदर असं मुखपृष्ठ साकारलेल असून. सुरेश एजन्सी, पुणे यांनी हे संपादन प्रकाशित केलेले आहे.

संदर्भ ग्रंथ -


1. प्रा. घुगे मारोती, इंद्रजित भालेराव यांची कविता, पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन, पृ.११
2. संपा. उमरीकर श्रीकांत, सारे रान, इंद्रजित भालेराव यांची समग्र कविता, औरंगाबाद, जनशक्ती वाचक चळवळ, पृ.१६
3. संपा प्रा. डॉ. शिंदे रणधीर, सुगीभरल्या शेतातून, पुणे, सुरेश एजन्सी, पृ.११०


***

# उपेक्षितांच्या वेदनेचा आशावादी हुंकार - मारोती कसाबांची कविता

## डॉ. प्रल्हाद भोपे

सहयोगी प्राध्यापक, मराठी पदवी व पदव्युत्तर विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

साहित्य समाज आणि संस्कृतीमध्ये कविता या वाङमय प्रकाराचा मौलिक वाटा आहे. मानवी जीवन हेच एक काव्य आहे असे म्हटले तर वावगे ठरत नाही. मानवी भावनेला आवाहन करण्याचे कार्य कविता करते तर विविध विचारांना गती देण्याचे कार्य गद्य लेखन करते. कविता हा सर्जनशील व संवेदनशील असा वाङमय प्रकार आहे. सर्वच साहित्य प्रकारात कवितेचा इतिहास हा प्राचीन व सर्वात मोठा आहे. कारण मनुष्याची पहिली अभिव्यक्ती कविता असली पाहिजे. मॅथ्यू अर्नोल्ड तर poetry is the criticism of life म्हणजे "साहित्य जीवन भाषा असते" म्हणतो. २००० नंतरच्या या मराठी काव्य प्रांतांमध्ये आपले योगदान देणारी व उपेक्षितांच्या वेदनेचा हुंकार ठरणारी मानवी जगण्याचे आशावादी सूर मांडणारी कविता म्हणून मराठवाड्यातील उदयन्मुख कवीमध्ये कवी मारोती कसाब यांच्या कवितेचा उल्लेख करावा लागतो. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'पोरगं शेकत बसलं इ.स. २००५ साली मुक्तरंग प्रकाशनाने प्रकाशित केला व मराठी कवितेच्या प्रांगणात त्यांचा प्रवेश झाला. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या कवितेची प्रमुख प्रेरणा आहे.

आपल्या कवितेविषयी ते म्हणतात की, "कविता ही माझी जीवनसंगिनी, श्वास आणि ध्यास आहे. कळत्या वयापासून तिची मला सोबत आहे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर ती मला भेटली. परिस्थितीच्या रेट्याने जेव्हा जेव्हा कोलमडलो तेव्हा तिनेच मला आवरले, सावरले हे तिचे थोर उपकार घेऊनच मी जगत आलो." त्यांचा तब्बल पंधरा वर्षांनी दुसरा कवितासंग्रह 'रात्रंदिन असे' २०२१ मध्ये गणगोत प्रकाशनने

प्रकाशित केला. कोंडलेले श्वास, सततचा दुष्काळ, समाज जीवनातील विसंवाद, बेकारी, राजकारणातील अनैतिकता, देवाच्या दरबारातील शोषण, असत्याचा पराजय आणि सत्याचा विजय, दुःख वेदना, नकार आणि विद्रोह ही त्यांच्या कवितेची बलस्थाने आहेत. प्रस्थापित व्यवस्थेला नकार देणारी त्यांची कविता स्वप्नाळू नसून कठोर वास्तवाला संयतपणे सामोरे जाणारी आहे. ती आत्मशोध घेत आशावादी जीवनाची सजग वाटचाल करणारी आहे. त्यांची कविता २००० नंतरच्या भविष्याची उज्ज्वल स्वप्ने रंगविणाऱ्या कविता आहे. त्यांच्या कवितेचा वेग कमी असला तरी सजगपणे आणि सहजपणे परिवर्तनाच्या दिशेने झेपावणारी त्यांची कविता आहे. मानवी जीवनाचे व्यामिश्र दर्शन ती घडवताना दिसते. संत तुकारामाच्या कवितेशी नाळ जोडणारी त्यांची कविता आहे. समकालीन प्रश्नांकडे त्यांची कविता गंभीरपणे पाहत, वर्तमानाचा वेध घेत, इतिहासाचे दाखले देत भविष्यातील संभाव्य धोके ती सांगते. महामानवाच्या विचारांवर उभी असलेली ही कविता परिवर्तनाची दिशा सूचित करते. नवा समताधिष्ठित शोषण विरहित समाज रचनेसाठीकवी आणि कवितेचा आग्रह कायम राहिलेला आहे. कवी हा त्या त्या काळाचा साक्षीदार असतो. जे अनुभवाला आले. प्रखर अनुभव विश्व काव्य विश्व बनते. त्यांच्या कवितेविषयी डॉ. राजकुमार मस्के म्हणतात, "कवी कसाब यांच्या कवितेला कलात्मक सौंदर्य प्राप्त झालेले आहे. कविता चैतन्यशाली व्यक्तिमत्त्वानं 'पोरगं शेकत बसलंय' मधील कविता भावगर्भ झालेली आहे. या कवितेला स्वतःची एक लय, स्वतःचाच एक सुंदर आकार आहे."

विशेष म्हणजे त्यांनी हा कविता संग्रह 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ध्येयाने प्रेरित उदगीरच्या सीमा भागात ज्ञानगंगा पोहोचविणाऱ्या कै. बापूसाहेब एकंबेकर पाटील कै. पी. जी. पाटील, ॲड. सी. पी. पाटील, मा. अशोकराव पाटील यांच्या कार्याला व किसान शिक्षण प्रसारक मंडळास अर्पण केलेला आहे.

कवी मारोती कसाब यांचा जन्मच प्रतिकूल परिस्थितीत म्हणजेच दुष्काळामध्ये झालेला होता. गाणे गाण्याचा व कविता करण्याचा वारसा कवी कसाब यांना त्यांच्या आईकडून लहानपणीच मिळाला. चौथीला

असतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गीत गाणं हा छंद कवीला लागला होता. त्यामुळे ते सर्वांचे आवडते होते. शाळेमध्ये सुद्धा ते सर्व गुरुजींचे आवडते होते. चौथी नंतर ते मामाच्या गावाला शिकायला गेले. त्याच्या मामाकडे गावची गावकी होती. फडे, टोपले गावात विकायचे. सगळ्या देवापुढ शहाडा वाजवायचा. रात्री प्रत्येक घरासमोर जाऊन भाकरी मागायचे. शेतात खळ बलुतं मागायचं. त्यावेळस लोक मात्र गाणं त्यांना म्हणायला लावायचे. सेलूच्या नूतन महाविद्यालयात नंतर अकरावीला प्रवेश त्यांनी घेतला. डॉ.गोपले यांच्या चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला. उफडे फोडणे, पोतराजांची केस कापणे असं सगळी मांगकी सोडण्याचे कार्यक्रम गावोगावी सुरू होते. त्यावेळी गावोगाव अत्याचारही मांगावर सुरू झाले होते. या सर्वांचा प्रभाव कवी वर पडला. लहुजी, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराने प्रभावित होऊन कवी चळवळीत सामील होऊ लागले. मोर्चात गाणी म्हणायला घोषणा द्यायला लागले. पुढे लालबावटा, छात्रभारतीचे कामही त्यांनी केले. अशाप्रकारे शिक्षण आणि चळवळ एकाच वेळी त्यांची सुरू होती. चळवळीत काम करत असताना फुले-शाहू-आंबेडकर, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे, इंद्रजीत भालेराव, संतांचे साहित्य त्यांनी वाचलं.

कवी मारोती कसाब यांची पहिली कविता दै. मराठवाड्याच्या चिगूर या पुरवणीत १९९३ साली प्रकाशित झाली. औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षण घेत असताना डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. एस. एस. भोसले, डॉ. शरद व्यवहारे, डॉ. सुदाम जाधव, प्रा. अरविंद कुरुंदकर यांच्या सानिध्यात कविता बहरली.

उच्च शिक्षण झाल्यानंतरही कवीची भटकंती थांबली नाही. मानवत, परभणी, माहूर गेवराई, बीड येथे नोकरीच्या निमित्ताने ते राहिले. त्यामुळे विविध रंगाची ढंगाची माणसं वाचता आली. त्यांच्या मित्रमंडळींनी त्यांची कविता खऱ्या अर्थाने जगवली.

कवी नारायण सुर्वे यांच्या शब्दांमध्ये

**काही पाहिलेले काही साहिलेले आहे**

**जसा शब्दात आहे तसा  जगात आहे.**
**माझ्या जगण्याची गंधवेणा त्यात आहे**

मी कामगार आहे, तळपती तलवार आहे सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे." अशीच नाळ कवी मारोती कसाब यांच्या कवितेची मला दिसते.

पोरगं शेकत बसले या कवितासंग्रहातील कविता त्यांच्या अनुभूती आहेत. त्यांच्या  जीवन कथा आहेत. उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही अशा तमाम उच्चशिक्षित तरुणाची खंत व्यक्त करणारी त्यांची कविता आहे. .शिकून-सवरूननही स्वप्न पूर्ण होत नाहीत त्यांची खंत कवीला वाटते

**ल्योक शिकून**
**सायब व्हईन**
**आम्हाला न्हाई**
**निदान त्याची त्याला**
**पोटाला पोटभर खाईन**
**ही माफक अपेक्षाही पूर्ण होत नाही म्हणून**
**आता**
**पोरगं शेकत बसलय**
**समद्या डिगर्या पेटवून**
**निदान**
**तेवढीच उब**
**माय-बापाच्या थरथरत्या देहाला !**

त्यांची कविता साज-शृंगार लेणारी नसून वेदनेचा अंगार लेणारी आहे. प्रयत्न करूनही अडचणीत सापडलेला एक तरुण त्यांच्या कवितेतून सातत्याने दिसतो. त्यांची कविता विश्वात्मकता  धारण करते. कारण ती त्यांची कविता केवळ  त्यांची राहत नसून सकल अशा अडचण ग्रस्त तरुणांची ती होते. हेच त्यांच्या कवितेचे यश आहे

केवळ कारकून बनविणाऱ्या शिक्षण पद्धतीवरही कडाडून त्यांची कविता हल्ला करते. कवितेच्या प्रस्तावनेतच सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब म्हणतात की "कवी मारोती कसाब यांची कविता नाचत मुरडत नखरे करीत येत नाही. तिला शृंगार नखरे माहित नाहीत. ती नाटकी नाही

ती सरळ सूट आणि बेधडक आहे."  संत साहित्याने ही कवी व कवितेची कविता प्रभावित झालेली दिसते.

**गुणवत्तेचे पार**
**निघाले दिवाळी**
**सत्तेचे सोहळे**
**चाललेले...**
**-----------**
**पंढरपुरात**
**बडव्यांचा मौजा**
**त्यांच्याच फौजा**
**विठू भोवती**
**-------------**
**राजकारणाने**
**धूर्त मोठे झाले**
**प्रज्ञावंत राहिले**
**झोपडीत...**

अशी कितीतरी उदाहरणे कवी देतो. अनुभवास आलेली परिस्थिती, अन्याय, शोषण, अत्याचार

यामुळे कवीचे मन बेचैन व हतबल झालेले आहे त्यास आलेली अस्वस्थता त्याला स्वस्थ बसू देत नाही व तो लिहिता होतो त्यांच्या सर्वच कविता सामाजिक जाणिवेचे आहेत स्वतः बद्दल बोलताना सामाजिक संदर्भ कवी घेतो. दुष्काळाची होरपळ त्यांची कविता मांडते. आपल्या आई बापाचे कष्ट, आईचे हाल अत्यंत मार्मिक शब्दात व्यक्त करणारी त्यांची कविता आहे. सत्यदर्शन त्यांची कविता घडवते.

**जिथे तिथे दिसे**
**खोटयांचा बाजार**
**खऱ्याची माय**
**कोण्या गावा गेली?**
**अशी सुरुवात करून**
**देवळात जत्रा भरली पाप्यांची**
**पुण्यवंत दारी.... पेंगुळले**

**असा प्रवास करीत शेवटी कवी**
**सत्य हाच धर्म सांगतो**
**सत्य एक धर्म**
**सत्य एक वर्म**
**सत्याचेच मर्म**
**सांगतो मी...**

लोकसंस्कृतीचा स्पर्श त्यांच्या कवितेला आहे. तो वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळालेला आहे.ज्या महामानवांनी दलितांच्या आयुष्याला नवी दिशा दिली त्या महामानवांच्या कार्याचा आणि नावाचाही उल्लेख त्यांची कविता करते. ती त्यांची श्रद्धास्थाने आहेत.

**लहू-फुले-शाहू**
**आंबेडकर-आण्णाभाऊ**
**विचार तयांचे घेऊन**
**समतेच्या गावा जाऊ!**

महामानवांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाणारी कसाब यांची कविता आहे. ७२चा दुष्काळ, वाढण, पोरगं शेकत बसलय या कविता अस्वस्थ करणाऱ्या आहेत. सात जन्माचे दारिद्र्य आणि भुकीची व्यथा प्रकट करताना कवीच्या अभिव्यक्तीला कधी त्वेषाची धार चढून जाते ते आपल्यालाही कळत नाही.

कवी म्हणतो -

**तेव्हा दोस्त हो,**
**उसळत्या लेखणी बरोबर**
**आता गंजलेली**
**ढोर फाडण्याची जुनी हत्यारही**
**पाजळून ठेवायला**
**विसरू नका !**

अशाप्रकारे संत तुकारामाच्या कवितेप्रमाणे विद्रोहही कसाब यांच्या कवितेमध्ये दिसतो. कवितेच्या निर्मितीबाबत ते म्हणतात,

**कविता जगवते**
**कविता जागवते**
**माणसाला माणुसकीपर्यंत**

**पोहोचविते कविता!!**

'आयुष्याचा चिंतन, कवितेमधून इतकी कुणाची किव करण्याचा व संवेदनशील राहण्याचा जमाना नाही यावर वास्तव चिंतन प्रगट केले आहे. खरे बोलणारे तोंड शिवून घ्यावे अन्याय-अत्याचार उघड्या डोळयाने पहावे.

**आलाच दारावर भिकारी**
**तर पुढच्या घरी जाण्याचा**
**खुशाल सल्ला द्यावा अन्**
**टीव्हीवरील छबी पहात**
**आपण सुखाचा घास घ्या! वा**

या देशात दगडात देव दिसतो पण माणसात देव दिसत नाही माणसाला अजूनही स्वीकारल्या जात नाही या सर्व बाबींची चीड कवीच्या मनामध्ये आहे. कवी म्हणतो,

**आम्ही त्यांचे पाय धरावेत**
**आणि त्यांनी सणसणीत लाथ द्यावी**
**ढुंगणावर.**
**हीच उफराटी संस्कृती**
**नांदे इथे माझ्या बापा...**
**कसं सांगू तुला मनुने मारून ठेवलेली मेख ढिली होत नाही अजूनही**
**समतेच्या पाण्यानं**
**माझ्या बापा !!!**

कवी कसाब यांची प्रत्येक कविता जगण्याचं तत्त्वज्ञान मानते. कवितेचे शीर्षकही आशयपूर्ण  आहेत. वाचकांची जिज्ञासा जागृत करणारे आहेत. कविता वाचल्याबरोबर कोणालाही सहज समजावी असी सुलभता कवीने जाणीवपूर्वक वापरलेली दिसते. विविसाव्या शतकातील तीव्र सामाजिक जाणिवा व्यक्त करणारे मारुती कसा भी तत्वनिष्ठ शिक्षक उत्तम संशोधक आणि चळवळीचे जाणीव असणारे सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांचा तब्बल पंधरा वर्षानंतर दुसरा कवितासंग्रह 'रातंदिन असे' हा प्रकाशित झाला. उपेक्षित समाजाच्या करुण वेदनेची कहाणी म्हणजे त्यांच्या कविता होत. तथगत बुद्ध, छत्रपती शिवराय, संत बसवेश्वर, चार्वाक, संत

तुकाराम,संत नामदेव संत कबीर, लहु साळवे, अण्णा भाऊ साठे, मुक्ता साळवे यांचे समतेचे विचार त्यांची कविता व्यक्त करते. 'बुद्ध माझा' ही त्यांची कविता बुद्धाचे तत्त्वज्ञान विशद करणारी आहे.

**मायेचे माहेर । प्रज्ञेचे सागर ।**
**करुणा सागर । बुद्ध माझा ॥**
**अष्टांग मार्ग हा । बुद्धाने दाविला ।**
**जन्म उद्धरिला । मानवाचा ॥**

तुकाराम एक तत्व आहे. तुकाराम एक विचार आहे. ज्याने ज्याने तो अंगीकारला तो धन्य झाला. हा विचार त्यांची कविता करते.

**तुका ध्यानी धरा । तुका मनी धरा ।**
**रात्रंदिनी स्मरा । तुकाराम ॥**
**बुडणार नाही । पुन्हा कधी गाथा ।**
**सावध सर्वथा । होऊया रे ॥**

माय बाई, आदिमाया, कामवाल्या बाया, कुठे जात असलेल्या मुली, प्रिय मुक्ता,स्तनयोनी आदी कविता स्त्री जाणिवेच्या आणि तिच्या त्यागाच्या निदर्शक आहेत. 'तू दुधावरची साय' कवितेतून आई विषयीचा कृतज्ञताभाव  ते व्यक्त करतात. जाती संपुष्टात याव्यात आणि सर्वत्र मानवता नांदावी असा आशावाद कवी पेरताना दिसतो.

**जाती धर्मापेक्षा । माणूसच मोठा शोई**
**भेदभाव खोटा । सजिवांत ॥**

नदीच्या जाण्याने सारे गेले ही भावना रसिक वाचकाचे मन गलबलून टाकणारी आहे. गांधी मरत नाहीत तसेच अण्णा तुम्ही वाहत आहे आमच्या नसानसातून ही हमी कवी कसाब 'हमी' कवितेतून देतात. चला चाल करुया, फकिरा पुन्हा येणार आहे! नव्या समताधिष्ठित, शोषण विरहित समाज रचनेस साहाय्यभूत ठरणाऱ्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

1.'पोरगं शेकत बसलंय' - मारोती कसाब

2.'रात्रंदिन असे' - मारोती कसाब

***

# २००० नंतरच्या कवितेतील प्रतिमा विशेष संदर्भ श्रीकांत देशमुख यांची कविता

डॉ. शिवसांब कापसे

मराठी विभागप्रमुख, श्री गुरू बुद्धीस्वामी महाविद्यालय पूर्णा, जि. परभणी

श्रीकांत देशमुख यांनी बळीवंत (१९९७) व आषाढमाती (२००३) या कवितासंग्रहातून शेती,शेतकरी आणि ग्रामीण जीवन केंद्रस्थानी ठेवून काव्यलेखन केलेले आहे. त्यांची कविता हा उजळ माथ्याने येणारा कुणबीपणाचा उद्गार आहे. त्यांची कविता अस्सल देशीपणाचा वाण असून कविता ही लोकगीताचे, ओवी रचना बंधाचे संस्कार घेऊन येते. शेतीवर रात्रंदिवस राबणाऱ्या कुणब्याच्या जीवनाची गाथा कवितेतून मांडताना कवी पारंपरिक संदर्भांना महत्त्व देतो. आदिम काळापासून शेतीवर कष्ट उपसणाऱ्या कुणब्याच्या जगण्याची व्यथा कवितेत येते. श्रीकांत देशमुख यांची कविता शेतात राबणाऱ्या आणि माती सोबत एक होऊन पिकांना फुलवणाऱ्या माणसांचे गीत गाते, तसेच रानासोबत राबताना मरण यातना पुन्हा नवी उभारी देऊ पाहणाऱ्या आई बापाची ही कविता माणसाचे वास्तव मांडते.

‘आषाढमाती’ या संग्रहातील श्रीकांत देशमुख यांची कविता पिढ्यानपिढ्या पासून विटेवर बांधून ठेवलेल्या अर्धमेल्या काळ निळया दुःखाला आस्थेच्या केंद्रस्थानी ठेवून गावगाड्यातील कृषी समूह संस्कृतीतील एकूणच लोक संवेदनातील पडझडीच्या वर्तमानाचा वेध घेते”[1]. त्यांची कविता शेती शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे, शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण, दुष्काळ, अतिवृष्टी, निराशा, नापिकी अशा अनेक समस्यांना कायम तोंड देत नशीब आणि नियतीच्या चक्रात अडकल्याची भावना ठेवून संघर्ष देणारा हा कुणबी पुन्हा पुन्हा परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या या प्रयत्नात त्यांना विठ्ठलाचा आधार मिळतो असा भाव कुणब्याचा असतो, म्हणूनच तो आषाढी कार्तिकीची वारी करतो. विठ्ठलावर असलेली श्रद्धा कष्ट करणाऱ्या कुणब्यांना बळ पुरविते.

वर्तमान काळात शेतीवर राबणाऱ्या या वर्गाचे होणारे हाल खूपच वाईट आहेत, याविषयी कवी चिंतन करतो. त्यातून कुणब्याच्या जगण्याचा पट काव्यातून उभा राहतो. बदलत्या काळाचा संदर्भही कवी मांडत जातो

ग्रामीण माणसाचे दैन्य, दारिद्र्य, दुःख कवीच्या चिंतनाचे विषय आहेत, याविषयी डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, "ग्रामीण माणसाचे दुःख आणि त्याची होरपळ या कवितेच्या केंद्रस्थानी आहे अभंग आणि ओवीसारख्या लोक परंपरेतील जगरहाटीचे वेधक चित्रण करते.[२]

२००० नंतरच्या ग्रामीण कवींनी जीवनासंबंधीचे नवे भान कवितेतून व्यक्त केले, स्वतःचे वेगळे अस्तित्व जपत ही कविता साकार होत होती. श्रीकांत देशमुख यांच्या कवितेने स्वतःचे अस्तित्व जपत ग्रामीण जीवन अनुभवाचे वेधक चित्रण केले आहे, मातीशी असलेला कुणीही शेती घर आणि गुराढोरांना कोणत्याही परिस्थितीत दूर करू शकत नाही तो मातीशी जोडलेली नाळ तोडत नाही. कवीची शेतीशी असलेली नाळ या कवितांमधून जाणवते, त्यांच्या कवितेविषयी रंगनाथ पठारे म्हणतात, "श्रीकांत देशमुख यांची आषाढ मातीतली कविता ही आधुनिक जाणीवेची प्रगल्भता प्रकट करणारी आहे तिला कादंबरीच्या आख्यानाचा बाज आहे वर्तमान वास्तवाचं प्रखर भान या कवितेला आहे व त्यावर भाष्य करताना ती भेदक होताना दिसते उजळ माथ्याने कोणतीपण मिरवणारी ही कविता म्हणूनच फक्त चांगली कविता नाही तर सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ही आहे." ग्रामीण भागातील लोकांची जगण्यासाठी चाललेली धडपड चिंतनात्मक पातळीवर कवी मांडतो. त्यांच्या कवितेतील आशयाला नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी प्रतिमा देखील तितक्याच प्रभावी येतात. कवीची ही प्रतिमांची भाषा अपरिहार्यपणे आलेली जाणवते, त्यांच्या कवितेतील प्रतिमाविषयी प्रा. राजन गवस म्हणतात, "देशमुखांच्या कवितेत येणाऱ्या प्रतिमा, प्रतीके ही खास कृषीजन व्यवस्थेतील आहेत. ते दुष्काळापासून सर्व प्राणिमात्रा, माळ,वैरण इत्यादी प्रतिमा जाणीवपूर्वक वापरून कवितेची अर्थवत्ता वाढवतात, कवितेच्या अर्थघनतेला वाव प्रतिमामधून मिळतो. अनेक संदर्भासह या प्रतिमा येतात. त्यामुळे त्यांच्या कवितेच्या अर्थाची कंगोरे, धुमारे विविध दिशेने बाहेर पडतात. कवी  हा आपल्या अनुभवास आलेल्या वस्तू, घटना,स्थळ, प्रसंग यामधून या प्रतिमा निर्मिती करतो. साहजिकच या प्रतिमा या वस्तू स्थळा सह व्यक्त होताना कवितेच्या आशयाला अधिक स्पष्ट करणाऱ्या असतात.

कवी श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतून येणाऱ्या प्रतिमांची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे. निसर्ग प्रतिमा,प्राणी विषयक प्रतिमा, अंधार, बाप, देह, कृषीविषयक प्रतिमा, इतर प्रतिमा

१)   **निसर्ग प्रतिमा** :

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतून येणाऱ्या निसर्ग प्रतिमा खेड्यातील दारिद्र्याचे वास्तव, शेतीतील नापिकी, शेतकऱ्यांचे कष्ट, दुष्काळी परिस्थिती, पाऊस पाण्याचा ग्रामीण भागावर होणारा परिणाम, भोवतालचे वीटके रंग,माणसाची स्थिती यास व्यक्त करण्यासाठी येतात. ग्रामीण भागातील अगतिकता,माणसांची होणारी कुचंबणा त्यामुळे वाट्याला येणारी दुःख, माणसाची झालेली वाताहत हे कवीला 'जळून गेलेल्या पानगळ गती झाडासारखे' वाटते. पाण्यावाचून हातात आलेली पिके करतात, दुष्काळी परिस्थिती गावावर अवकळा पसरविते. त्यामुळे सर्वत्र शांतता पसरते सर्वांना जगण्याची दिवस काढण्याची चिंता लागलेली असते अशावेळी गावातील माणसे निराशेने पछाडतात, त्यांच्या तोंडून मरणाच्या आणि संपलेपणाच्या गोष्टी निघतात कारण,

"हरवतात धुक्यात मातीचे डोळे
नाहीच दिसत धांड्याला कणीस
ओलावते कणसातील काजळी
नुसते मरणावर सांडते पाणी
(धुक्यात हरवतो गाव- पृ. **५०**,आषाढमाती)

ज्यावेळी पाऊस हवा असतो त्यावेळी तो येत नाही. पाऊस आणि नियती शेतकऱ्याच्या वाट्याला निराशा देणारी ठरते आहे, रात्रंदिवस कष्ट उपसून उभ पिकं  पावसामुळे आडवी होतात, पाण्याशिवाय शेती ही कल्पनाच करता येत नाही,परंतु हे पाणी पिकाला वेळेवर मिळाळे  तरच ते जीवदान ठरते. प्रत्येक वेळी असे होत नाही. असे असले तरी शेतात राबणारा कुणबी वर्षभर राबवताना स्वतःच्या जगण्यापेक्षा पिकाची काळजी अधिक घेतो.

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेला शेतीचा वास आहे त्यामुळे शेतीला अनुकूल प्रतिकूल ठरणारा निसर्ग या कवितेत आभाळ, पाऊस, ऊन, वारा अशा प्रतिमा बनवून येतो तर निसर्गातील इतरही घटक उदाहरणात झाड, ढग, चांदणी, अशाही प्रतिमा येतात

२ ) **पक्षी व प्राणीविषयक प्रतिमा:**

श्रीकांत देशमुख यांच्या कवितामधून पशुपक्षी प्राणी यांचे संदर्भ अनेक ठिकाणी आले आहेत. कृषी संस्कृतीतील हे पशुपक्षी अपरिहार्य घटक आहेत. शेतकऱ्यांसह राबणाऱ्या बैलां प्रमाणेच शेती वरती आधारित अशा पक्षी आणि प्राण्यांचे प्रतिमा रूपात येणे स्वाभाविक वाटते. 'पाचोळासारखी खरं बैल', 'ओढतो मोट ओढावं आयुष्य', 'कसं मेल्यामोरांची गोमाशी', 'आयुष्य

ओढणारी गुरंढोरं', 'मेलेल्या बैलाच्या धडासारखी', 'माळाची कपार', 'कवड्यावर आलेला नाग', 'अधांतरी टांगलेली कचककणारी वटवाघळे', 'पापणी हीं डोळयाची पाखर', 'खुराड्यात झुरणाऱ्या कोंबड्या', 'कावळ्याचा डोळा', 'पाखरांची दिंडी', 'मोहाच्या माशा', 'म्हशीच्या लेकरू, 'नवसाचा कोंबडा', 'मेल्या चिमणीची हडक', 'बवारस कुत्रे', अशा अनेक प्रतिमा येतात, देशमुख यांची कविता कृषी जनसमूहाच्या उद्गार आहे कृषी जनम समूहाचे जगणे माणसा सोबतच किडा-मुंगी, पाल, चिमण्या, कावळे, बैल, गाय, वासरू, झाड, झुडपे, वेली, नदी, शेती, माती यांनी साऱ्या गजबजलेलीपणाला ही कविता सामावून घेते. त्यामुळेच या कवितेत साऱ्या प्रतिमा सहजपणे येतात. कृषी संस्कृतीच्या परिघातील या घटकांना कवीने प्रतिमा रूपात उपाय योजिले, त्या घटकांच्या विशेषामुळे या कवितेतील आशय परिणामकारक बनतो. कवी ग्रामीण जाणीवा व्यक्त करताना अनेक प्रतिमा वापरतो, या प्रतिमा त्यांच्या अनुभव आणि आशयाला परिणामकारकपणे व्यक्त करतात. खेड्यातील लोकांच्या जगण्यातील भीषणता मांडताना कवी म्हणतो,

"त्याचे पहाडी खांदे
होते गेले गाळ
पाखरासारखा तो तळमळला"
(दिवसेंदिवस पृ. **५२**,आषाढ माती)

'पंख तुटलेल्या पाखरा'ची प्रतिमा कुणब्याच्या पिकाविषयीची ओढ व्यक्त करते. हिरवी पिके डोळयादेखत वाढताना पाहून त्याचे मन तुटते. हतबल होऊन तो तळमळतो. पाण्याशिवाय पिकांच हिरवेपण टिकणार नाही. उन्हाच्या तीव्रतेने करपणाऱ्या पिकांकडे हतबल होऊन कुणबी पाहतो, त्याच्या दुःखाचे चित्र या काव्यात दिसते. पाण्यावाचून सर्वांचेच असे हाल होतात, या परिस्थितीला सामोरे जाण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. दुष्काळाच्या तीव्रतेणे जीवन जगणे असह्य होते, पाण्यावाचून सर्व ठिकाणी निर्माण झालेली ओढाताण प्रकर्षाने जाणवते. गुराढोरांन प्रमाणेच माणसेही जगण्यासाठी केविलवाणा प्रयत्न करतात, तेव्हा पाण्याचे मोल समजू लागते. शेती पाण्यावाचून करता येत नाही. तेव्हा शेती करायची कशी हा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीतही शेतीवर निष्ठा असणारा शेतकरी पिढ्यानपिढ्या पासून शेती करतो, परंतु शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आता बदलत आहे. आधुनिक काळाच्या प्रभावात श्रद्धा, प्रेम, निष्ठा या भावनांना फारसे स्थान उरलेले नाही. म्हणून शेतीच्या दुरावस्थेला मांडताना कवी म्हणतो,

"कसायाने कापावा बोकड
आणि करावे तुकडे तुकडे
तशी माती कापली जाते" (आषाढमाती पृ. ८४,)

उन्हाळयाच्या तीव्रतेने सर्वांचे जगणे असेही होते अशावेळी पशुपक्षी गुरेढोरे उष्णतेपासून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करतात अशा वेळी रानात सर्वत्र नीरव शांतता पसरलेली असते. 'ऊणाच्या लाह्या डोळयावर चमकत' असतात, तर 'माळाची कपार उन्हात वाळत घातलेल्या मेलेल्या बैलाच्या धडा सारखी दिसते', 'वस्ती वाळलेल्या शेंगा' सारखी दिसते. एकूणच पशुपक्षी, प्राणी, झाड यांचे येणारे संदर्भ कवितेचे परिणाम वाढवतात. 'पाचोळया सारखी पाखरं', 'मोट पाखरांच्या धडा सारखा माळ', 'अधांतरी टांगलेली कचकचनारी', 'बाप पोरक्या वासरासारखा' अशा प्रतिमा मधून ही कविता येते. आशयाला परिणामकारक करते तसेच कवीने अनेक कवितांमधून पाखरांचा प्रतीक म्हणून केलेला वापरही महत्त्वपूर्ण आहे. या प्रतीका मधून अनेक अर्थवलय निर्माण होतात. त्याचप्रमाणे शेती, शेतकरी आणि पाखर  यातील परस्पर असलेला जिव्हाळा, स्नेह देखील व्यक्त होतो, ग्रामीण जीवनाच्या अस्सल काव्य अनुभूतीसाठी समग्रतेच्या परिप्रेक्ष्याची आवश्यकता असते हे जसे खरे आहे त्याचप्रमाणे शब्दांची अचूक निवड प्रतिमांचा नेमका आणि अर्थपूर्ण वापर यांचीही आवश्यकता असते कवीने प्रतिमांचा नेमका आणि अर्थपूर्ण वापर केलेला दिसतो. लोकगीताच्या लयीतून याचे भान राखून, बोलीच्या वापरातून आणि अभंगाच्या रचना तंत्रातून काव्याविष्कार केला आहे.

**संदर्भ:**


1) बांदेकर प्रवीण - आषाढमाती मलपृष्ठ शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर प्र आ २००३

2) संपा. मेश्राम केशव - वाङ्मयीन प्रवृत्ती तत्व शोध प्रतिमा प्रकाशन २००७ पृ. १०८

3) पठारे रंगनाथ - आषाढमाती उजळ माथ्याने कुणबी पण मिरवणारी कविता अप्रकाशित पृ .१४

4) गवस प्रा. राजन - बळीवंत लोक विद्या प्रकाशन परभणी पृ. ८२


***

# कविता महाजनांच्या 'मृगजळातील मासा' या काव्यसंग्रहातील प्रतिमा

**वीणा गुलदेवकर**
संशोधक विद्यार्थीनी, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

जागतिकीकरणाच्या विळख्यामध्ये खेडे, गावगाडा तेथील संस्कृती, प्रथा, परंपरा इ. घटकांवर विपरित परिणाम झालेला जाणवतो. भूतकाळामध्ये घडून गेलेल्या विविध सरंजमशाही शोषक व्यवस्था संपुष्टात आलेली असली, तरी त्याचे पडसाद हे काहीशा प्रमाणात टिवूâन असलेले जाणवतात. वर्तमान वास्तवात या संस्कृतीचा परिणाम हा आजही समाज वास्तवावर असलेला जाणवतो. समाजामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे स्त्रियांना या व्यवस्थेला सामोरे जावे लागते. नंतरच्या कालखंडामध्ये इंग्रजी राजवटीच्या काळामध्ये विविध सुधारणा ह्या घडून आल्यात. भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार झाला. आधुनिकतेचे पडसाद समाजव्यवस्थेवर पडले. इंग्रजांच्या या आधुनिक विचारसरणीच्या प्रणालीमुळे भारतीय समाजसुधारकांना आपल्या समाजातील परिस्थितिची जाण झाली. त्यातून त्यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. सामाजिक प्रश्नांना हाताळत असताना त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांना महत्त्वपूर्ण असे स्थान दिले. स्त्रियांना घराच्या बंदिस्त चौकटीतून बाहेर काढून मुख्य प्रवाहात सामिल केले. स्त्रियांच्या बाबतीत असणाऱ्या विविध जाचक प्रथा व परंपरा यातून त्यांची सुटका झाली. समाजव्यवस्थेत स्त्रियांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली. महात्मा फुलेंच्या स्त्री शिक्षणविषयक कार्यामुळे स्त्रिया या शिक्षित झाल्या. स्त्रीशिक्षणामुळे त्यांच्यात आत्मभानाची जाणीव निर्माण झाली. वर्तमान वास्तवाला सामोरे जात असताना स्त्रियांना व्यवस्थेला तोंड देण्याकरिता आपले विचार हे साहित्याच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. स्त्रीला स्त्रीत्वाचे भान येणे हा महत्त्वाचा घटक आहे. याविषयी अविश्वनी धोंगडे

म्हणतात, "स्त्री ही माणूस आहे. ही स्त्रीवादाची पहिली भूमिका आहे. त्यामुळे माणसासारखं जगणे ही स्त्रीची भूक आहे."[१]

२००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचा विचार करीत असताना कविता महाजन यांच्या साहित्याचा विचार करणे आवश्यक आहे. कविता महाजन यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या समस्यांना अधोरेखित केलेले आहे. त्यांच्या साहित्यातून प्रकटणारी स्त्री शोषित, पीडित असूनदेखील आत्मभानाची जाणीव असणारी आहे. समाजामध्ये विविध स्थित्यंतरे घडून येतात. त्यातून सामाजिक परिवर्तनाला वाव मिळतो. सामाजिक स्थित्यंतरातूनच स्त्रिया या आत्मविश्वासाच्या बळावर पुढे सरसावून साहित्यनिर्मिती करीत आहेत. डॉ. कुलकर्णी म्हणतात, "कालपरिस्थितीत घडलेली स्थित्यंतरे आणि साहित्याला मिळालेली नवी वळणे यांचे आंतरिक संबंध असतात."[२]

कालपरिस्थितीमध्ये होणाऱ्या बदलांना स्विकारून विचारांची तर्कसंगती लावणे आवश्यक असते. कविता महाजन यांनी आपल्या साहित्यातून आधुनिक तत्त्वप्रणाली स्विकारून स्त्रियांचे प्रश्न चित्रित केले आहे.

कविता महाजन यांनी प्रथमत: काव्यलेखनाच्या माध्यमातून आपल्या लेखनास प्रारंभ केला. त्यांचा 'मृगजळीचा मासा' हा कवितासंग्रह २००८ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचा हा तिसरा काव्यसंग्रह असून त्यात त्यांनी व्यापक पद्धतीने अर्थात्मकदृष्ट्या महत्त्वाचे अनुभवविश्व हे कलात्मकपणे मांडले आहे. या काव्यसंग्रहामध्ये ८५ कवितांचा समावेश असून रूपकाची निर्मिती आहे व मी-तू च्या पद्धतीने ते केंद्रित केलेले आहे. आयुष्यामध्ये एकाकी जीवन जगताना येणारे अनुभव कवितेच्या माध्यमातून येतात. आपल्या संस्कृतीने लादलेला लिंगभाव हा सत्तेच्या राजकारणातून अस्तित्वात आलेला आहे. ही जाणीव स्फोटकपणे येते. या कवितेच्या माध्यमातून 'तू' हा 'मी' ला विंâवा पुरुष हा स्त्रीला नेहमी का नाकारत असतो याचा शोध घेताना दिसते व या माध्यमातूनच 'मी' चा आत्मशोधनाचा प्रवास हा सुरु होतो. मी आपल्या मनातील विश्वामध्ये पुरुषाची तिला वाटणारी प्रतिमा निर्माण करते. 'मृगजळीचा मासा' या कविता संग्रहामध्ये 'मी' ही स्वत:च्या मनामधील पुरुषप्रतिमेचे अनेक संदर्भ तयार करते. या कवितेतून विविध प्रतिमांचे चित्रण केलेले आहे.

**पावसाची प्रतिमा :**

'पावसाची प्रतिमा' ही कविता महाजन यांनी पुरुषसत्ताक संस्कृतीला उद्देशून केलेली आहे. पावसापाण्यामध्ये मलूल असा अंधार पडलेला आहे. तरी स्त्री ही पुरुषाची अतिशय काळजीपूर्वक वाट बघत आहे.

**"घरभर मऊ मलूल अंधार**
**संततधारा विचार**
**तुझाच... तुझाच... कोसळणारा बाहेर**
**दिसेनासं होतयं जवळचंही हळूहळू**
**सगळं परिचित संदर्भ एकाएकी**
**परके वाटताहेत... वाटताहेत इतर....**
**आणि या साऱ्या पाणपसाऱ्यात**
**कुठं कसा आहेस तू**
**माझा मृगजळातील मासा."(पृ. क्र. १३)**

या मुसळधार मलूल अंधारामध्ये पडणाऱ्या पावसात मासा हरवलाय. परंतु तिला वाटणारे भय हे व्यर्थ आहे. कारण पाण्यामध्ये मासा हा हरवला आहे. त्या पाण्यातील संपूर्ण विश्व हे त्याचेच आहे व आपल्या विश्वामध्ये तो सुरक्षित असणारच. अशा विविध बाबी तिच्या मनात येत आहे व कवितेतून व्यक्त होत आहे.

'पाणी' या प्रतिमेच्या माध्यमातून स्त्री-पुरुष या कवितेतून झालेला आहे. 'ओल' या कवितेमध्ये 'पाणी' या प्रतिमेतून स्त्री मनातील असह्यता आलेली आहे.

**"मी रडत नव्हते**
**माझ्या डोळयातून**
**टपकत होतं पाणी अविरत**
**ओले झाले तुझे गालिचे**
**ओला झाला गालिचाखालचा ग्रॅनाइट**
**ओली झाली ग्रॅनाइटखालची जमीन**
**ओल वाढवून झिरपू लागल्या भिंती." (पृ. क्र. ४३)**

स्त्रीच्या डोळयातून अविरतपणे अश्रू हे वाहत आहेत. त्यामुळे त्याचे असणारे घर हे पाण्याने पूर्णपणे भरलेले आहे. तरीही त्याला जाणीव होत नाही. त्यामुळे आपण या घरात एकटेच आहोत व हे घर आपले नसून त्याचे आहे याची जाणीव होते.

**डोअरबेलची प्रतिमा :**

कविता महाजन यांनी 'तू घरी येशील' या कवितेतून पुराणातील कथेची आ'वण करून दिली आहे. सुरवातीच्या कालखंडापासून ते आजतागायत स्त्री ही पुरुषाची आतुरतेने वाट बघतच असते. डोअरबेलच्या माध्यमातून स्त्रीची उत्कंठा सांगितली आहे. तू घरी येशील तेव्हा डोअरबेल वाजणार नाही व कुठलाही आवाज हा होणार नाही. वीज गेलेली असल्याने बेल वाजणार नाही व आपल्यात संवाद होणार नाही या आधुनिक प्रतिमेच्या साह्याने स्त्री ही किती एकाकी झाली ते सूचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**"तू घरी येशील**
**आणि वीज गेलेली असेल वाजणार नाही डोअरबेल." (पृ. क्र. ४७)**

स्त्रीला हे अखेर ठाऊक झालेले आहे की, आपण एकाकीच राहणार नाही. हे वास्तव ती स्विकारत आहे.

**रंगप्रतिमा :**

कविता महाजन यांनी 'मृगजळीचा मासा' या काव्यसंग्रहामध्ये विविध रंगप्रतिमांचा वापर केलेला आहे. 'जाग आल्यावर' या कवितेमध्ये स्त्रियांना कोणत्याही स्वरूपाचा रंग आपल्या जीवनामध्ये नाही. त्या निव्वळ पाण्याच्या रंगाच्या असतील असे पुरुष गृहित धरताना दिसतात. घरामध्ये असणाऱ्या सर्व साहित्यांना, वस्तूंना रंग असतो, परंतु स्त्रियांचे जीवन हे बिनरंगाचे जाणवते.

**"माणसं कोणत्या रंगाची असतील त्या घरात?**
**पुरुष बाहेर उधळत असतील का रंगढंग?**
**आणि बायकांना गृहीत धरत असतील पाण्याच्या रंगाच्या? (पृ.१०६)**

मी गत ला एक स्वप्न पडत असतं व त्यामध्ये तिला एक निळे दुमजली घर दिसत असते व त्याविषयी तिच्या मनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्या घरातील वस्तूंना विविध रंग प्राप्त झालेले असतील. परंतु माणसांना कोणता रंग असेल त्याचा ती विचार करते. तेव्हा पुरुष हा विविध रंग उधळताना दिसत असून ती स्वत: पुरुषांना पाण्याच्या, रंगाची भासते. यावरून स्त्रियांचे दैनंदिन घरातील असलेले स्थान या कवितेतून रंगप्रतिमांच्या माध्यमातून चित्रित केलेले आहे.

**लैंगिक जाणिवेची प्रतिमा :**

कविता महाजन यांनी 'अलगद' या कवितेमध्ये आठवणीतून प्रेम जाणिवा व्यक्त केलेल्या आहेत. विस्मरणामध्ये गेलेल्या लैंगिकतेचे कळस हे जाणवू

लागले आहेत. एखाद्या निळ्याभोर आकाशात तरंगणाऱ्या काळ्या थव्यांप्रमाणे संपूर्ण शरीर हे प्रेमाच्या रंगामध्ये रंगत आहे. प्रेम जाणिवा या लैंगिक भावातून व्यक्त होत आहेत.

**"त्वेचला स्पर्श आठवले**
**आठवली दुसरी बोटं बोटामधल्या रिकाम्या जागांना**
**केसांना फुलं आठवली**
**ओठांना ओठ, स्तनांना दातांच्या खुणा**
**मांड्यांना नखांच्या चंद्रकोरी**
**आणि गर्भाशयाला आठवलं बीज." (पृ. क्र.१२)**

स्त्रीमनातील पुरुषाविषयी असणारे प्रेम हे 'मी' गत आठवणीतून व्यक्त करीत आहे. प्रत्येक त्वचा ही या स्पर्शाचा अनुभव घेऊन आपले प्रेम व्यक्त करीत आहे.

**प्रियकराची प्रतिमा :**

'मृगजळीचा मासा' या कवितेतून कविता महाजन यांनी प्रियकराची प्रतिमा चित्रित केलेली आहे. यातील प्रियकर हा प्रेमळ आणि हिंसक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे. यातील प्रियकराची रूपे ही नैसर्गिक रुपांमधून येताना दिसतात. संभ्रमाप्रमाणे वाढत जाणारे पाणी, घरामध्ये पसरणारा मऊ असा मलूल अंधार, सततपणे कोसळणारा पाऊस यातून प्रेम व्यक्त होताना दिसते.

**"दिसेनासं होतयं जवळचंही एकाएकी**
**परके वाटताहेत.... वाटताहेत इतर...**
**आणि या साऱ्या पाणपसाऱ्यात**
**कुठं कसा आहेस तू**
**माझा मृगजळातील मासा." (पृ. क्र.१३)**

'मृगजळातील मासा' ही प्रतिमा प्रियकरासाठी वापरण्यात आली आहे. प्रियकराची विविध रूपे आ'वणी यातून चित्रित होतात. प्रियकराच्या आ'वणीने सर्व निसर्गातील रूपे ही संभ्रमासारखी होत आहेत. एकाच क्षणी प्रेम व एकाच क्षणी हिंसकता ही रूपे 'मी' गत बघत आहे. सृष्टीतील असणाऱ्या या पाणपसाऱ्या यामध्येही 'मी' गत ला परके झाल्यासारखे वाटत आहे. या पाणपसाऱ्यामध्ये परके झाल्यावरही मृगजळातील मासा हा अदृश्य झालेला आहे. त्याचा भाससुद्धा होत नाही.

**फोनची प्रतिमा :**

कविता महाजन यांनी 'नुसतीच' या कवितेमधून स्त्रीमनातील प्रेमाची उत्कंठा व्यक्त केलेली आहे.

> **"मी फिरवत राहिले रिंग फिरून फिरून**
> **तुझ्या फितूर फिरंगी शब्दांसाठी**
> **काळ्या रिसीव्हरमधून निनादत होती बेल**
> **नुसतीच सलग एकसारखी सतावत." (पृ. क्र. ३२)**

'मी' गत ही तू चे शब्द ऐकण्याकरिता सारखी फोन लावत असते. त्याची रिंगही वाजत असते. पलिकडून आवाज येण्याआधीच स्त्रीमनातील शब्दचित्र व्यक्त होते. 'मी' ही 'तू' चे शब्द ऐकण्याकरिता आतूर झालेली असते. परंतु 'तू' हा फोन उचलत नाही. त्याचे शब्द हे उमटत नाही. तेव्हा तिला भिती वाटते की 'तू' नसण्याची विंâवा हा नंतर अस्तित्वात आहे की नाही.

> **"विरघळून वाहून जातंय माझ्या रक्तातून स्वत्व**
> **तरी फिरवत राहिले मी रिंग फिरून फिरून." (पृ. क्र.३२)**

'मी' गत वारंवार 'तू' ला फोन करीत असते. परंतु तिला 'तू' चा प्रतिसाद मिळत नाही. त्या क्षणभराच्या काळामध्ये तिला जाणवते की आपले अस्तित्व, आपले विचार हिरावून घेतल्या जात आहेत. आपण स्वत:हून आपले विश्व 'तू' ला सोपवत आहे. तरी ती फोन करीत आहे. स्त्रीमनावर पूर्वीच्या काळापासून अवितरपणे घातलेली बंधने ही या कवितेतून विविध रूपांमधून येतात.

**समारोप :**

कविता महाजन यांनी 'मृगजळीचा मासा' या काव्यसंग्रहातून स्त्रियांची मनोवस्था, उत्कंठा, दाहकता, शोषकता चित्रित केलेली आहे. आजपर्यंत दुर्लक्षित असणारे विचार यातून व्यक्त होतात. त्यांच्या कविता या स्त्रियांच्या जगण्यावर व सामाजिक समस्येवर भाष्य करतात. या काव्यसंग्रहातील 'मी' आपण नम्रपणे पुरुषासमोर झुकूनच जगले पाहिजे हे विसरते. आत्मभान अवगत झालेल्या स्त्रीमध्ये होत असणाऱ्या बदलाचे चित्र या कवितेत येते. यातील कविता आत्मभान जागृत झालेल्या स्त्रियांच्या आहेत.

**संदर्भ :**


१) धोंगडे अश्विनी, *१९९० नंतरची स्त्रीवादी कविता*, अक्षरगाथा, वर्ष पहिले, अंक तिसरा, १० ऑक्टोबर २०१०, पृ. ४२

२) भोसले, तरुजा, *मराठी भाषा साहित्य, समाज आणि संस्कृती*, सिंधुदूर्ग, दिर्बाई प्रकाशन, प्रथमावृत्ती, १० ऑगस्ट २०१०, पृ. ६७

३) जी.जी.कांबळे- "रंग्या" , वावरप्रकाशन,लातूर.पृ.क्र.८५.


***

# मराठवाड्यातील मराठी ग्रामीण कवितेतील अभिव्यक्ती


## साईप्रसाद मधुकर पंडीत

**संशोधक विद्यार्थी**

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**



**सारांश :**

मराठी काव्यामध्ये विविध विषयावर काव्य करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार या काव्याच्या रूपात विषयात वैविध्यता अढळून येते. प्राचीन काळापासूनच ग्रामीण जीवन हे वैशिष्टयपुर्ण राहिलेले आहे या पूर्ण ग्रामीण जीवनाचे विशेष करून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण हे कसे वैशिष्टय पूर्ण आहे हे या काव्यातून समजून घेता येते. ग्रामीण जीवनात चालनारे त्यांचे रोजचे दिनक्रम त्यातील त्यांचे भावजीवन देवानघेवान इतरांशी असलेले संबंध यावर प्रकाश टाकलेला आहे. गावाकडील लोक त्यांचे स्वभाव त्याच प्रमाणे त्यांचे जीवन ग्रामीण सन, उत्सव साजरे करण्याच्या पदधती ग्रामीण अर्थ व्यवस्था या काव्यातून कशी मांडली आहे हे अभ्यासता येईल. ग्रामीण जीवनातील भीषण प्रश्न हे ही यातील मुख्य घटक आहे.

ग्रामीण भागातील लोकांचे कामाच्या शोधासाठी होणारे स्थलांतर त्यात त्यांची होणारी हेळसांड याचे चित्रण या ग्रामीण काव्याच्या माध्यमातून दिसून येते. स्थलांतरील ग्रामीण लोकांचे हाल अपेष्टात जगणे कशे हालाकिचे होत जाते याचे चित्रण आले आहे.

भांडवलवादी व्यवस्थेचा ग्रामीण जीवनावर कसा प्रभाव पडत गेला ते अभ्यासता येईल. ग्रामीण लोक कसे या शेतीवर आधारित आहेत परंतु निसर्गाची न मिळालेली साथ आणि अकस्मिक संकटे यात अडकलेली ग्रामीण जनता यावर काव्यातून आलेल्या भावना अभ्यासता येतील. नवनविन तंत्रज्ञान पदधती यामूळे माणसे कशी दुरावत गेली हे या ठिकाणी अभ्यासता येईल. मानवी जीवनात निर्माण झालेली असमानता आणि या असमानतेमूळे ग्रामीण जनतेवर झालेले परिणाम या काव्याच्या माध्यमातून पाहता येतील. रोजच्या भाषेचा वापर ग्रामीण शब्द याचा समावेश या मराठवाड्याच्या काव्यातून कसा आलेला आहे हे अभ्यासता येईल.

ग्रामीण जीवन जगत असताना आलेल्या समस्या, पावलो–पावली घडलेला संघर्ष याचे चित्रण या काव्यातून आलेले दिसते. पोटासाठी लागणाऱ्या अन्नालाही मिळविण्यास किती कष्ट उपसावे लागतात याचे दर्शन घडते. ग्रामीण जीवनात शेतकऱ्याचे होत असलेले शोषण, शेतकऱ्याची पिडा या काव्यातून प्रतित होताना दिसते. शेतामधूनच हा समाज कशी मूल्ये शिकतो याचे दर्शन या माध्यमातून अभ्यासता येणार आहे. एकंदर मराठवड्याच्या ग्रामिण जीवनाचा आढावा घेता येईल, ग्रामीण जीवन अभ्यासता येनार आहे.

**प्रमुख शब्द :**

मराठवाडा, मराठी, ग्रामीण, कविता, अभिव्यक्ती.

**प्रस्तावना :**

ग्रामीण जीवनाचे जीवन वास्तव दर्शविणाऱ्या या विशिष्ट मराठवाड्यातील कविता या कवितेच्या माध्यमातून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनावर त्यांच्या अभिव्यक्तीवर प्रकाश टाकला आहे. ही सामान्य ग्रामीण जनता कशी जगत आहे. त्यांच्या जगण्यातील, हितसंबंधातील, वेगळेपणा याच्या या काव्याच्या माध्यमातून आपणास अभ्यासता येतो. सामान्य मानसाचा झालेला भ्रमनिरास या काव्यातून दिसतो आणि यामागे असलेली कारणेही समजतात. ग्रामीण जनतेने रोजगारासाठी केलेली पायपीट, यातून झालेले त्यांचे स्थलांतर यासारख्या समस्या या काव्यातून आपणास पहावयास मिळतात. शिक्षणाच्या बाबतीत कराव्या लागणारा समस्यांचा सामना हेही आव्हाण या ग्रामीण जनते समोर असल्याचे दिसते. पावसाच्या अनियमितपणा यामूळे शेतीवर आधारीत खेडूत, त्याची झालेली पंचायत यामूळे दु:खात जीवन व्यतित करणाऱ्याची व्यथा इथे पहावयास मिळते. शेती, शेतीचे तुकडे, तंटे अश्या सामाजीक समस्याचा सामना इथे पहावयास मिळते. गावगाडा कश्या पध्दतीने चालतो याचे वर्णन सामान्य खेडूताचे दु:ख आपणास या काव्याच्या माध्यमातून अनुभवायास मिळते. लोकश्रध्दा भावना यांच्या अभिव्यक्ती पहावयास मिळतात. यांत्रीकीकरणामुळे गावाचा जिवंतपणाच कसा हरवत चालला आहे याचीही काहीशी वेगळी झालर येथे पहावयास मिळते. गावकडच्या वातावरणात झालेला बदल आणि त्यास यंत्रीकरणाचे परिणास अस्था माध्यमातून बधने अशा प्रकारचा आषय पहावयास मिळतो. सततचा पडत असलेला दुष्काळ याचे पडसाद या काव्यातून उमटताना दिसतात. पाण्याची समस्या आणि ग्रामीण भागातील याचे भयाण वास्तव याची जाणीव काव्यातून होताना दिसते.

सदर शोधनिबंधाची व्याप्ती ही मराठवाड्यातील काही निवडक कविंच्या ग्रामीण कवितेवर आधारित आहे आणि हीच या शोधनिबंधाची व्याप्ती आणि मर्यादा आहे. हा शोधनिबंध मराठवाड्याच्या ग्रामीण कवितेचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असा आहे. मराठवाड्यातील ग्रामीण कवितेचा अभ्यास करणे. ग्रामीण कवितेतील अभिव्यक्तिाचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा उददेश आहे. ग्रामीण जीवन, मराठवाड्याच्या प्रदेशावर या जीवनावर झालेला परिणाम आणि या सर्वांचा मराठी कवितेवर पडलेला प्रभाव याचा अभ्यास करणे हा उददेश आहे.

**मराठवाड्यातील मराठी ग्रामीण कवितेतील अभिव्यक्ती :**

ग्रामीण जीवन हे तसे समृध्द जीवन समजले जायचे परंतू काळानुसार या जीवनामध्ये बदल घडत गेले. येथील जीवन व्यवस्था आणि व्यथा बदलत गेल्या. या विभागाच्या कविता मधून ग्रामीण भागातील शेतीशी निगडीत जीवनाच्या संपन्न आशयाचा प्रवाह ग्रामीण बोलीत अविष्कार झालेला आहे.

**''खाऊनी बी शेत, मागी महीन्याचं याज**
**करजाच्या पाइ जाइ शेत तशी लाज**
**डोइला मुंडसं नाही धड अंगालाही**
**चिध्या लागल्या ती व्हइ अंगाची ग लाही.'' (राम पिंगळीकर)**

या ग्रामीण व्यवस्थेत आर्थिक अडचणीसाठी जमीन गहान ठेवून पैसे घ्यावे लागतात. त्याचे त्या पैश्याचे व्याज भरता भरता अंगाला कपडाही रहात नाही आणि जमीन ही रहात नाही. सर्व आयुष्य कष्टात घालवत या मातीशी वेगळीच नाळ जुळलेली असते. राबराब राबुन या काळया आईत घाम गाळून शेतं भिजवावी लागतात. या कामात मदत करणारी बैलजोडी देखील जीवाभावाची वाटू लागते. कष्ट करत करत जीव मेटाकूटीला आला असे या काव्यातून व्यतित होते. या पोटासाठी, भाकरी साठी मी रात्रनदीस करतो चाकरी असे हा कष्टकरी म्हणतो आहे.

**''राबणाऱ्या या जीवाचं**
**काय कराल तुम्ही मोल**
**गळत्या घामाने माझ्या**
**झाली मातीत या ओल**
**गेला हडबडून जीव**
**नजरा बैलांच्या वळल्या**
**पाजून पिकाला पाणी**
**करतो धन्याची चाकरी'' (माधव कदम)**

हे जीवन माझे असे कष्टाने भरलेले या पोटासाठी मी चाकरी करतो आहे. अशा कष्टात हा खेडूत ग्रामीण शेतकरी राबत असतो. या काव्यातून मराठवाड्यातील रसाळ

मधून आणि गावाकडील भाषेचा अनुभव घेता येतो. बैलांच्या मदतीने जमीनीत बी रूजवत असताना झालेल्या वेदना त्यांची व्यथा आणि त्याचाच आनंद अशी स्थिती इथे निर्माण होते.

पाण्यासाठी होणारे हाल दुषकाळात कष्ट सहन करणारा खेड्यातील ग्रामीण भागातील तो खेडूत पाण्यासाठी वनवन करताना दिसतो. पाण्याचे दुर्मिळ या काव्यातून जानवते.

**''पाणी पाणी पाणी आणि पाणी पाणी पाणी**
**पाण्याविना दाहीदिशा आम्ही अनवानी ।।**
**सोडोनि संसार गेले देशांतरा कोणी**
**तळे मळे ओस झाले पाण्याच्या कारणी ।।    (ना.धो.महानोर)**

अश्या अनेक कठिण प्रसंगाचा समाना करीत ग्रामिण जीवन पूढे पूढे जात आहे. याही कठीण प्रसंगात शेतातील डुलनाऱ्या पीका सवे आपला वेळ कसा आनंदाने घालवला आहे हे पहावयास मिळते. प्राण्यावर दया करावी आणि पीकांवर माया करावी अशा मायाळूमनाची ही माणसे

**''रानातले अभंग**
**उभे पीक गाती**
**मृदंग सांगती**
**टाळ गात...**
**बळी राजा बोले**
**प्राण्यावर दया**
**पीकावर माय**
**वावरात...''          (निवृत्ती चांडोळकर)**

काळया आईवर प्रेम करनारा असा हा ग्रामीण समाज या काव्यातून आपणास दिसतो. त्याच प्रमाणे अपार कष्टात असलेले हे ग्रामीण जीवन वाटते तेवढे सोपे नाही. काबाड कष्ट करून पोटासाठी धान्य कमवावे लागते. त्याच्या वाटयाला डोंगर तोही दु:खाचा हे चित्र दिसते. त्याचे शरीर तर चिपाडासारखे बारीक झाले आहे, मायेला तर इतक फाटकं लुगड की त्याला सगळी ठीगळंच दिसतील. या कष्टाच्या घामात त्याला जगण्याचंही भान राहत नाही.

**''धान उफनिता माय**
**ध्यान तिचं वाऱ्यावर,**
**रास पायापाशी तरी**
**लागे हाताला गोंडर**
**हाडं राबतेत किती**
**बापू चिपाड झालेला,**
**घामातून जगण्याला**
**त्यानं इसार दिलेला''          (जगदीश कदम)**

जगण्यासाठी त्याने घामाचा मोबदलाच दिलेला आहे असे वर्णन आहे. यातूनच सतत चा पडणारा दूष्काळ या मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचा भाग बनला आहे. यामूळे पोटाच्या अन्नाचा ही मोठा भिषण प्रश्न बनलेला दिसतो. त्यातच विधवा असहाय स्त्री या ज्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडते. त्यांचे दु:ख तर काही वेगळेच आभाळ अपूरे पडेल अश्या भयावह भावना यातून प्रकटतात. कोरडया शिवारातून मी काय पीक घेवू आणि कसे पोट भरु असा सवालच इथे केलेला दिसतो.

**''कोरड्या या शिवारांत**
**कसं काढू पीक आता**
**पाण्याची रे साथ नाही**
**कस करु सांग नाथा ?**
**पडला दुष्काळ कसा**
**हंबरती गाई गुरं**
**सख्यासोबत्यांना या**
**आता लागणार मरं !''        (शंकर वाडेवाले)**

मुक्या जनावराचे जगन्याचे, त्यांच्या जिवाचे काय होईल याचेही भय यांना सतावते आहे. अशा या भावना या कवितेतून प्रकट होतात. भयान वास्तवाचे दुष्काळाचे चित्रण यातून दिसते. आता या गाववाटा उध्वस्त तर होणार नाहीत ना अशी भिती वाटू लागली आहे.

**''आम्मी जलमलो कुणब्याचे पोटी ।**
**शीळीपाती रोटी पोटाला ग ।।**
**फाटक्या कुडीला काटकी कुडती**
**डोंगर पुढति पेटलेला ।।        (शिवाजी मरगीळ)**

आमचा जन्मच कष्टासाठी झाला आहे अश्या भावना उराशी बाळगत हे ग्रामीण लोक अतिशय हाल अपेष्टेत जीवन जगत आहेत. आमची हयात मातीमोल आहे अश्या यांच्या भावना या 'कुणब्याचे अभंग' या कवितेतून प्रतित होतात. पैशासाठी व्याजाने पैसे घ्यावे आणि मग हे व्याजाचे असूड आयुष्यभर सोसावे असे यांचे दु:ख. हाच ग्रामीण शेतकरी असंख्य संकटाचा सामना करून देखील सन आनंदाने साजरे करतो, बैलाची शिंगे रंगवितो, बाशिंगे बांधतो, बाजा बाजवतो. भक्तीभावे पूजा करतो असा ग्रामीण समाज जीवनाचा नवा पैलू या काव्यातून दिसून आला.

**''शिंगे रंगविली**
**बाशिंगे बांधली**
**जोडी उभी केली**
**अंगणात.''     (दासू वैद्य)**

अशा प्रकारच्या भावना प्राण्याप्रति देखील पहावयास मिळतात. या मराठवाड्याच्या ग्रामीण कवितेतील अभिव्यक्ती अभ्यासता आल्या. या मध्ये जीवन, त्यांचे कष्ट, भुतदया, सण आणि भावनेचा आविष्कार पहावयास मिळाला.

**निष्कर्ष :**

यातून असे निष्कर्ष समोर येतात की, मराठवाड्याच्या ग्रामीण कवितेवर येथील भौगोलीक परिस्थितीचा प्रभाव जाणवतो. नापीकी, दुष्काळ या सारख्या आपत्तीचे चित्रण या काव्यातून दिसून येते. या काव्याची भाषा ही मराठवाड्यातील बोलीभाषेप्रमाणे दिसते, म्हणजे या काव्यावर बोली भाषेचा प्रभाव दिसतो. या काव्यातून ग्रामीण अभिव्यक्ती समोर येतात. अश्या प्रकारे या काव्यातून अनेक ग्रामीण अभिव्यक्ती अनुभवता आल्या.

**संदर्भ सूची :**

१) मराठवाड्यातील कविता फ.म.शहाजिंदे, निर्मल प्रकाशन, नांदेड.
२) इंद्रजित भालेराव दूर राहिला गाव प्रतिभास प्रकाशन, परभणी.
३) ग्रामीण जीवन – विकिपीडिया.

***

# २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील एकलव्य

**ज्ञानेश्वर नगाजी भडंगे**
**संशोधक विद्यार्थी**
**स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड**

आदिवासी या शब्दातच त्याचा मूळ मुख्य मतितार्थ दडलेला आहे. तो म्हणजे आदि म्हणजे सुरुवातीचा आणि वासी म्हणजे निवास करणारा निर्माता. यावरून आपण असे म्हणू शकतो की, आदिवासीच हा या देशाचाच नव्हे तर जगाचाही मूळ मालक आहे. म्हणूनच आदिवासी जमातीला आदिम जमात असेही संबोधले जाते. या जीवसृष्टीवर पहिले पाऊल टाकणारा हा आदिवासी होता. आदिवासी माणूस हा निसर्ग रक्षक, निसर्ग पूजक आहे. खऱ्या अर्थाने आदिवासीच प्रदूषणविरहित निसर्ग ठेवण्याचे कार्य हजारो वर्षापासून करत आलेला आहे. निसर्गाचे संवर्धन आणि संरक्षण हे आपले आद्य कर्तव्य आहे, असा मानणारा हा आदिवासी समाज. स्वतःच्या संस्कृतीचे जतन करत नैसर्गिक जीवनाचा आनंद घेत, हजारो वर्ष या जमातीने याच जंगलातील दऱ्याखोऱ्यात आणि कड्या, कपाऱ्यात काढले. आदिवासी हा या देशाचा मूळ मालक आहे. आजही आदिवासी जिथे राहतो तेथील जर आणि जंगल शाबित आहेत आणि आनंदाने वाऱ्यावर डोलत आहेत.

कालांतराने नंतरच्या काळात काही धूर्त लोकांचे भारतात आगमन झाले. आणि आदिवासींचा वनवास सुरू झाला. त्या लोकांनी सर्वप्रथम मूळ आदिवासी लोकांचा अभ्यास केला. आदिवासी जमातीचा साधेपणा, भोळेपणा, भित्रा स्वभाव, साधे राहणीमान, इमानदार आणि शब्दावर विश्वास ठेवणारा आदिम समाजाच्या अज्ञानाचा फायदा त्या धूर्त आणि स्वार्थी लोकांनी घेतला. आदिवासी आणि त्यांच्यात वारंवार संघर्ष झाले. येथील मूळ निवासी आदिम जमातीच्या सुपीक प्रदेशात व नद्यांच्या खोऱ्यात आर्यांनी आपले पाय रोवले ते कायमचेच. पुन्हा संघर्ष करण्यापेक्षा या आदिम पुत्रांनी जंगल व दऱ्याखोऱ्याचा आश्रय घेतला. आपल्या सांस्कृतिक विशेषासह नैसर्गिक जीवन जगण्यात आदिवासी समाजाने पसंद केले.

रामायण व महाभारत या महाकाव्यांमध्ये ही आदिवासी समाजाचा व या समाजातील महान सुपुत्र व वीरपुरुषांचा उल्लेख आवर्जून येतो. रामायणातील 'रावण' व महाभारतातील 'एकलव्य' हे आदिवासींचे आदर्श आहेत. परंतु त्यांचे कार्य व कर्तृत्व अजूनही आदिवासी समाजाला पुरते माहित नाहीत. अलीकडच्या काळात आदिम समाजातील सृजनशील कवींनी आपल्या काव्यातून अशाच क्रांतिकारक व वीर पुरुषांच्या कार्याची ओळख जगाला करून देण्याचा प्रयत्न केला. महाभारतात एकलव्य यांची ही कथा सुरुवातीलाच मांडलेली आहे. ती आदिवासी जमातीच्या दुःख व वेदनेवर चांगलेच मीठ चोळणारी आहे. आपल्या स्वार्थासाठी व वैदिक धर्म प्रचारासाठी विद्याबंदी घालण्याचा पुरावा महाभारतातच मिळतो. ही विद्या बंदी क्षुद्र व अतिशूद्र यांनाच राहणार होती असे नाही, तर ती आदिवासींनाही लागू होती. म्हणजेच शुद्र अतिशूद्रा पेक्षा आदिवासींची किंमत फार काही जास्त नव्हती, हे आदिवासी वीर पुत्र एकलव्य ला दिलेल्या वागणुकीवरून स्पष्ट दिसून येते.

आदिवासी समाज वर्णाश्रमाच्या चौकटीत बसत नसला तरी या वर्णव्यवस्थेने आदिम माणसाचे माणूसपण मात्र हिरावून घेतले होते. एकलव्य देखील या गढूळ व्यवस्थेला बळी पडला होता.

"गुरुदक्षिणेचे निष्ठाशास्त्र जाळावेसे वाटले असेल
वनपुत्रा ! तेव्हा वेदनांचा वनवा झाला असशील तू
अरे वर्णवादी आयुष्याने नाकारलेले गुरुत्व
शब्दबद्ध झाले होते-
प्रस्थापित आयुष्याच्या वीरतेशी
मान्य नाही इथल्या दीर्घजीवी वर्णशाहीला
तू श्रेष्ठतम धनुर्धर म्हणून

एकलव्याचे श्रेष्ठत्व मुळात येथील वर्णव्यवस्थेला मान्य नाही. आदिवासींच्या पोटी जन्मलेला एकलव्य धनुर्रविद्येतअर्जुनाला वरचढ ठरतो हे वर्ण व्यवस्थेविरुद्ध विरोधी कृत्य गुरूला पटत नाही. एकलव्याची वीरता गुरूच्या डोळयात काट्यासारखी सलते. त्यामुळेच गुरु एकलव्याच्या अंगठ्याची मागणी गुरूदक्षिणा म्हणून करतो. अशा या कटकारस्थाने रचणाऱ्या गुरु व व्यवस्थेला कायमचे झिडकारले पाहिजे, असे कवीला वाटते.

जुलूम व जबरदस्ती करणारी अन्याय व्यवस्था उध्वस्त केली पाहिजे अन्यथा भविष्यात हजारो एकलव्याची बोटेच काय हात देखील छाटण्यास ही व्यवस्था कमी पडणार नाही.

मित्रवरा ! तुझ्या भात्यातील तळपणाऱ्या तीक्ष्ण तीरांना
करणार आहे मी
क्रांतीच्या मशाली अन्
तुझ्या अंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने
लिहिणार आहे मी इथल्या सुवर्णशाहीचा मृत्युलेख
कारण वेदनांनी भरलेले
तुझे वनवासी जीवन
मी ही वर्ण बळी म्हणून जगतो आहे"

एकलव्याशी कवी याठिकाणी मित्रत्वाचे नाते जोडतांना म्हणतो की, मित्रा, मी आता क्रांतीसाठी सज्ज झालो आहे. तुझ्या भात्यातल्या तीक्ष्ण तिरांचा वापर मी क्रांतीसाठी करणार आहे. त्यांच्या मशाली करून येथील वर्णव्यवस्थेला भस्मसात करण्यास कवी उतावीळ झाला आहे. ज्या वर्णव्यवस्थेने तुझा अंगठा कलम केला, त्याच व्यवस्थेचा मृत्युलेख भळभळसांडलेल्या रक्ताने लिहिणार आहे. कारण तू जे वेदनादायी व दुःखद वनवासी जीवन जगलास, तेच जीवन मीही जगते आहे, अशी कबुली कवी देतात.

सुनील कुमरे हे एक आदिवासी साहित्य जगतातील एक सर्जनशील व प्रतिभावंत कवी आहेत.'तीरकमठा' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह १९९९ साली प्रकाशित झाला. तीरकमठा म्हणजे आदिवासी एकलव्याचे धनुर्धारी व प्रभारी आयुध.

"मस्जिद उद्ध्वस्त करून धर्मांध संघ म्हणाले,
हिंदूची अस्मिता आम्ही जागृत केली जय श्रीराम !
आपण असे लंगोटी-चिरगूट कुठपर्यंत सांभाळायचे
वेदना पाहिजे तिरकमाठ्यांनी आजवरचा काळोख
जय उलगुलान !

६ डिसेंबर १९९२ ला या देशातील वैदिक लोकांनी बाबरी मज्जिद पाडून आपल्या मनुवादी वृत्तीचा जयजयकार केला. याच घटनेने कवी अस्वस्थ होतो.

हिंदूंची अस्मिता जागृत होत असताना आदिवासींच्या काळोख जीवनाचे काय? हा कवीला पडलेला मूलभूत प्रश्न आहे. म्हणून कवी म्हणतात की येथील प्रस्थापीत व्यवस्थेने आदिमाचे दारिद्र्य हटवण्याचा आग्रह धरला पाहिजे. पण तसले प्रयत्न त्यांच्याकडून झाले तर ते कसले आले वैदिक.

"ही तर हिंदूमधील वनवासी संस्कृती
एकलव्य अंगठ्याच्या थारोळयात
उपेक्षित पणे अवाकच राहिला"

आदिमांच्या आयुष्यातील काळोख तीरकमठ्यानी भेदण्याचे आवाहन कवी करतो. कारण हेच संघवाले येथील मूळनिवासी आदिमाचे 'वनवासीकरण' करण्याचा घाट घालत आहेत. या संदर्भात डॉक्टर ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात, "आदिवासीच्या वनवासीकरणात एकलव्य हा अंगठ्याच्या थारोळयात आश्चर्यचकित नजरेने उभा आहे"

उषाकिरण आत्राम ह्या एक आदिवासी साहित्यक्षेत्रातील आघाडीच्या कवयित्री. कथा, कविता व बालगीत संग्रह या वाङमय प्रकारात त्यांचे विपुल लेखन. जंगल पहाडात यातनामय जीवन जगणारा आदिम समाज हा त्यांच्या लेखणीचा केंद्रबिंदू .

"तुम्ही असे कसे? दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिता
त्याच ओंजळी एकलव्याच्या अंगठ्यांचे रक्त पितात
कुणाच्या तंत्र-मंत्र उपदेश वाणीवर भाळू नका
आपणच आपले जगणे - मरणे ठरवा !
आपणच आपला अत दीप व्हा !"

आदिम समाजाला सावध करताना कवयित्री म्हणतात की,दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे बंद करा. असे हे धोकादायक आहे आणि आपण तो धोका एक वेळ पत्करलेला आहे. कारण त्याच ओंजळीच्या हाताने आपल्या भविष्याचा विश्वास घात केला आहे. एकलव्याचा अंगठा कापणारा तोच हात होता. तुम्ही तर त्याच हातावर विश्वास ठेवत आहात, ही फार मोठी धोक्याची घंटा आहे. अशा या कपट - कारस्थानी व अविश्वासू माणसांच्या कोणत्याच कृतीवर विश्वास ठेवू नका. मंत्र तंत्र व उपदेशवाणी-आदिंवरही भाळून जाऊ

नका. आपले जगणे व मरणे इतरांनी ठरवण्यापेक्षा आपणच ठरवले पाहिजे. आपणच आपल्या प्रकाशाचे दीप व शिल्पकार व्हावे, असे कवयित्रीला मनोमन वाटते.

मुळात एकलव्याने स्वतःच्या हिमतीवर व ताकदीवरच धनुर्विद्या ग्रहण केली होती. परंतु कपटी गुरु द्रोणाचार्याला ती पाहावत नव्हती. एकलव्याची जिद्द व चिकाटी पाहून आर्यपुत्राबरोबर गुरूही अस्वस्थ होत असे.

"विद्यादान न केलेल्या गुरूने
गुरु दक्षिणेच्या गोंडस नावाचा
कपट फास टाकून घात केला
तुझ्या अंगठारुपी विद्येचा प्राणच कापून घेतला"

द्रोणाचार्याकडे विद्यादान मागण्यासाठी एकलव्य गेला, परंतु गुरुने त्याला ज्ञान देण्याऐवजी त्याचा घातच केला.'गुरुदक्षिणा' या गोंडस नावाचा वापर करून कपटी द्रोणाचार्यांनी एका निष्पाप आदिवासी मुलाचा प्राणच घेतला. वर्णव्यवस्थेच्या गलिच्छ संस्कृतीने विद्यादान नाकारून एका आदिम वीराचा गळा घोटला. एकलव्य ज्याला गुरु मानायला गेला, त्याने आपले गुरूपण निभावले नाहीच, उलट कपटनीतीचा अवलंब करून एकलव्याचा अंगठा कापून घेतला.

कवयित्री कविता आत्राम यांचा 'काजवा' हा कविता संग्रह म्हणजे आदिवासींच्या अंधकारमय जीवनाला प्रकाशाचा मार्ग दाखविणारा आहे. आदिवासींच्या जीवन वाटेत संघर्ष व अन्यायाचा प्रतिकार करण्यास काजवा प्रेरणा देतो . हजारो वर्ष इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने आदिमांच्या जगण्याला सुरुंग लावला. सुधारणावादी युगाचा गवगवा करणाऱ्यांनी आमचं जगणं व आमचे हक्क हिरावून घेतले. तेव्हा या व्यवस्थेच्या विरोधात लढा दिल्याशिवाय व संघर्ष केल्याशिवाय ही व्यवस्था खिळखिळी होणार नाही, असे कवयित्रीला वाटते.

"एकलव्यासारखा
अंगठा कापून देणार नाही
न शिकविणाऱ्याला
गुरूही मारणार नाही
जे सत्य आहे

तेच सांगू
आणि उभे राहू लढ्याला
माणूस म्हणून ... "

कवयित्री याठिकाणी लढण्याची प्रेरणा देताना म्हणते की, एकलव्याच्या बाबतीत जे झाले, त्याची पुनरावृत्ती आता होऊ देणार नाही. खऱ्या गुरुची महती आम्ही जरूर गाऊ. कारण तो आदिमांचा धर्म आहे. परंतु द्रोनाचार्यासारख्या कपटी वैदिकाला आम्ही गुरु मानणार नाही. या वैदिक ब्राह्मणांचे व त्यांच्या कूटनीती गुरूंचे डाव आम्ही आता ओळखले आहेत. त्यांच्या खोटारडेपणाचा आता भांडाफोड झाला आहे. जे खरं असेल तेच आम्ही जगाला ओरडून सांगू आणि हे सांगण्यासाठी व लढण्यासाठी आम्हाला पहाडासारखे उभे राहावे लागेल.

संदर्भ :-


१) डॉ.विनायक तुकाराम, 'गोंडवन पेटले आहे', एकलव्य प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती -१९८७
२) कुमरे सुनील, 'तिरकमठा', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर – १९९९
३) डॉ.वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्य : एक अभ्यास', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद -२००९
४) डॉ. रोंगटे तुकाराम, 'आदिवासी कवितेचा उष:काल आणि सद्यस्थिती' संस्कृती प्रकाशन,पुणे प्रथमावृत्ती -२००७, पृ.३९(उषाकिरण आत्राम यांची कविता )
५) कविता आत्राम,'काजवा', कविता प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती -२०११
६) आत्राम पी.डी., 'पहाडी हुंकार',देवयानी प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती -२०११
७) वागतकर पांडुरंग,'व्यथा आदिवासींच्या', मुक्तरंग प्रकाशन, लातूर -२०१३


***

# २००० नंतरचे साहित्य : कलाकृतीच्या अनुषंगाने

**प्रा. बालाजी जी. गायकवाड**

मराठी विभाग, शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नायगांव (बा.)
ता.नायगांव (खै.) जि. नांदेड

मराठी साहित्याला समृध्द अशी परंपरा आहे. वेगवेगळया कालखंडामध्ये विविधांगी स्वरूपाचे साहित्य आकारास आले आहे. अगदी सुरूवाती पासून ते २००० पर्यंतच्या मराठी साहित्याचा आढावा घेतला तर त्यामध्ये कितीतरी विविधता असलेली आपणास पहावयास मिळते. मराठी साहित्य हे वेगवेगळया कालखंडातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, परीघाचे एक समृध्द दालन आहे. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र असे विविध साहित्यप्रकार मराठी साहित्यामध्ये आहेत. त्याप्रमाणे विविध प्रवाहदेखील मराठी साहित्यात आहेत. विशेषत: याठिकाणी आपणास "कविता" या साहित्य प्रकाराविषयी चर्चा अपेक्षित आहे.

मराठी कवितेला एक प्राचीन परंपरा आहे अगदी मराठी काव्याचा उगमापासून विचार केला तर मराठी कवितेला एक समृध्द परंपरा असलेली दिसून येते. कालखंडाचा विचार केला तर संत-पंत-तंत कवीपासून १८८५ पर्यंतची कविता, १८८५ ते १९४०, १९४० ते १९६०, १९६० ते १९९०, ११९० नंतरची म्हणजे नव्वदोत्तरी कविता आणि त्यानंतर २००० नंतरची कविता असे ढोबळ मानाने कालखंड आपणास सांगता येतील. मराठी साहित्यामध्ये यातील नवदोत्तरी साहित्य हे सामाजिक व आर्थिक बदलांचे प्रतिनिधीत्व करणारे साहित्य आहे. विशेषत: राजकीय अंगाने विचार केला तर १९९० नंतरच्या कालखंडात भारतामध्ये लक्षणीय बदल घडून आले. विशेषत: देशाच्या अर्थकारणामध्ये मोठा बदल घडून आला. देश जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण याकडे वळताना दिसतो. एकूणच देशात खुली अर्थव्यवस्था निर्माण होऊन देश पातळीपासून ते ग्रामीण पातळीपर्यंत एकप्रकारे भांडवलशाही व्यवस्था निर्माण झालेली होती. याचा दुरगामी परिणाम या

देशातील सर्वच घटकावर झालेला आपणास दिसून येतो. मग मला सांगा याला साहित्य कसे अपवाद असू शकते ? किंबहूना समाजातील सर्व घटकांचे, सर्व परिस्थितीचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते. कारण साहित्य हा समाजाचा आरसा असतो. त्यामुळे समाजाच प्रतिबिंब हे साहित्यामध्ये दिसणार नाही तर मग कुठे दिसणार ?

विशेषत: या भांडवलशाही व्यवस्थेमुळे येथील सर्वसामान्य माणूस भरडून जात होता. दलित, आदिवासी, मजुरदारवर्ग, शेतकरी, कष्टकरी, महिला या सर्वांना याचा फटका बसत होता. जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या खाईत येथील सर्वसामान्य माणूस भरडला जात होता. माणुसकी संपून स्वार्थीपणा वाढीस लागला. विशेषत: येथील महीला तर सर्वांत जास्त भरडून निघत होत्या. परंतु इतर घटकांनी याकडे दुर्लक्ष केलेले असते तरी येथील नवोदीत लेखक, नवोदीत कवी मात्र डोळसपणे या सर्व बदलांच्या नोंदी लक्षात ठेवून आपल्या भावभावना, आपले विचार, आपल्या साहित्यात, आपल्या कवितेत आविष्कृत करू लागले. उदा. अक्षय घोरपडे, लोकनाथ यशवंत, अरूण काळे, सुनिल अवचार, अविनाश गायकवाड, महेंद्र भवरे, विरभद्र मिरेवाड, माधव हैबतकर, डॉ. बाळू दुगडूमवार यासारखे अनेक कवी आपल्या भावभावना कवितेच्या माध्यमातून आविस्कृत करू लागले.

यापैकी अलिकडील काळातील एक संवेदनशिल कवी म्हणून कवी माधव हैबतकर यांचा या ठिकाणी मला उल्लेख करावा लागेल. परभणी येथील बी. रघुनाथ महाविद्यालयात कार्यरत असणारे कवी माधव हैबतकर यांचे अनेक काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यापैकी ०२ ऑक्टोंबर २०१८ रोजी प्रकाशीत झालेला "जीवनालेख" हा काव्यसंग्रह मला अतिशय भावला. कारण "जीवनालेख" या काव्यसंग्रहामधून कवी माधव हैबतकर यांनी स्त्री जीवनातील विविध विषयांवर मंथन केले आहे. या काव्यसंग्रहाला शुभकामना देतांना डॉ. सुरेश सावंत म्हणतात की, "कवी माधव हैबतकर यांची कविता म्हणजे भगिनी भावाचा 'जीवनालेख' आहे या कवितेत ती जननी, मानिनी, कामिनी,

शालिनी, सुहासिनी, तेजस्विनी, कुलराणी आणि सहचारिणी अशा विविध मनोहारी रूपात भेटते."

भारतीय समाजव्यवस्थेत 'स्त्री' ला नगण्य स्थान आहे. चूल आणि मूल यापलीकडे स्त्रीचे अस्तित्व नाही. अशा प्रकारची पारंपारीक कृती भारतीय समाजामध्ये दिसून येते. भारतीय समाज हा स्त्रीकडे एक 'गरजवंत' म्हणूनच पाहतो. म्हणूनच कवी म्हणतात,

**"गरजेप्रमाणे ती**
**बदलत गेली**
**कधी माय**
**तर कधी**
**आई ... बनत गेली"।**

आयुष्यभर स्त्री ही पिचत गेली. समाजव्यवस्थेत ती पिळत गेली.

**"रोजच चरख्यात**
**पिळत गेली**
**पुरूषी जात्यात**
**भरडत गेली**
**अन् आयुष्याच्या**
**पुरूषी हिशोबात**
**ती सदा**
**शून्य शून्य**
**होत गेली ....!**

'स्त्री' च्याही काही भावभावना असतात. कारण तिही एक माणूस आहे. तिलाही स्वातंत्र्य हवे आहे. अलिकडील काळात सर्वच क्षेत्रात बदल झाला आहे. गाडी, बंगला, नौकरी, पद, प्रतिष्ठा, पैसा आला पण माणसाच्या वर्तनात बदल झाला. माणुसकी संपली, पैशाच्या मोहात माणसाने सर्वकाही विसरू पाहतो आहे. अशा मोहमही दुनियेत वावरणाी ही स्त्री आपली व्यथा व वेदना 'एक इच्छा' या कवितेत मांडते. या कवितेतील स्त्री म्हणते,"

**"अरे .........**
**मलाही हवय**

**मुक्त आभाळ**
**घारी सारखी .....**
**भरारी घेण्यासाठी .......**
**मला ......**
**समता, बंधुता**
**न्याय .... नि मानवता.. हवी आहे"|**

अशा या मोहमय दुनिते कवी माधव हैबतकर स्त्रीला सावध होण्यास सांगतात. आपल्या आसपास असणारे अनेकजण तुला फसवण्याचा प्रयत्न करतात. म्हणून कवी म्हणतात –

**"भूलभुलैय्याच्या जगात**
**पोरी ......**
**स्वत: कधी**
**फसू नको ......!**
**दुसऱ्यालाही कधी**
**फसवू नको ..... "|**

कवी माधव हैबतकर यांच्या 'जीवनालेख' मधील कविता ही स्त्री वेदनेची वाहिनी बनून आली आहे असे वाटते.

**"कुठे एखादी**
**स्त्री .............**
**जरी ...............**
**थोड्याशा उजेडात**
**दिसत असली**
**तरी ती**
**कुठे ना कुठे**
**अंधारात आहे ............**
**वेदनेच्या महापुरातून**
**वहात आहे .........."|**

सर्व जग झपाट्याने बदलत आहे. पण स्त्रीच्या 'आयुष्यात' मात्र तिळमात्र बदल झाला नाही. किंबहुना ती बदलूच नये अशी ही व्यवस्था आहे –

**"समाज बदलला**
**दुनिया बदलली**
**ती मात्र**
**तिथल्या तिथंच .......".**

ही खंत कवीच्या मनात आहे. नव्या युगासोबत स्त्रीनेही आपल्यात बदल घडवून आणावा अशी अपेक्षा कवीमनाला आहे.

**"आता सोड**
**ती ....**
**मृगजळी कमान**
**राख तू .... नव्या युगाचे**
**इमान..".**

कवी माधव हैबतकर यांनी आपल्या कवितेमधून मातृत्वाची महती गायली आहे. 'माय' या कवितेत कवी म्हणतात की, पाठीवर मायेने फिरविलेल्या मायेच्या हाताची किमया ही मोठी आहे. कारण ही किमयाच आपल्या साऱ्या आयुष्याचं सोन करणारी आहे.

**"माय, खरंच,**
**तुझ्यामुळेच .....**
**आकार लाभला .....**
**जीवनाला .........".**

हा कृतज्ञभाव कवीच्या मनात आहे. स्त्रीशिवाय घराला घरपण नाही हे सांगताना 'तू नसतांना' या कवितेत कवी म्हणतात –

**"एक दिवस**
**तू नसते स**
**घरी तेंव्हा .....**
**घर ....**
**घर...**
**राहात नाही.......**
**तुझ्याविना घराला**
**घरपण.....**

**लाभत नाही ......!"**

युगायुगांपासून रेखांकित केलेल्या तुझ्या प्रतिमेला एकदाचे लाथाडून टाकण्याचे आवाहन कवी नारीशक्तीला करतात. कवी माधव हैबतकर आपल्या 'जीवनालेख' या कवितासंग्रहातील कवितांमधून सगळ्या विकारी संदर्भाचा विनाश करण्याचे आवाहन करून मानवमुक्तीची विशेषत: स्त्रीमुक्तीची व स्त्रीच्या माणुसकीची पहाट फुलविण्याची स्वप्ने पाहतो आहे.

एकंदरीत कवी माधव हैबतकर यांची ही कविता समाजाचा विवेक व सदबुध्दी उन्नत करणारी कविता आहे. म्हणूनच अलिकडील काळातील ही कविता माझ्या मनाला जास्त भावली आहे.

**संदर्भ –**


१. जीवनालेख (कवितासंग्रह) – माधव हैबतकर, इसाप प्रकाशन, नांदेड, २०१८.

२. विसाव्या शतकातील मराठी समिक्षा, विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.

३. आधुनिक मराठी कविता- काही रूपे-काही रंग, गो.म.कुलकर्णी, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९९१.

४. कविता आणि प्रतिमा- सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई, २००२.


***

# वसंत बहाराची अपेक्षा असलेला काव्यसंग्रह : बिकॉज वसंत इज कमिंग सून

**डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड**

कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय , परळी वै .

२१ व्या शतकातील साहित्य हे वैविध्यपूर्ण समकालीन जाणिवा घेऊन आविष्कृत होत आहे. २००० नंतरच्या साहित्याचा विचार करत असताना समकालीन जीवनातील प्रश्न कथा, कादंबरी व कविता आदी वाङ्मय प्रकारातून लेखक कवींनी मुखरित केल्याचा प्रत्यय येतो. शेती, स्त्री, दलित, भटक्या जाती जमातीचे प्रश्न हे अलिकडच्या साहित्यातून अभिव्यक्त होताना दिसतात. परंतु त्याचबरोबर माणसामधील विसंगतीचा शोध घेत ती विसंगती कमी करण्यासाठीच्या जाणिवाही अलिकडच्या साहित्यातून अभिव्यक्त होताना दिसतात. यादृष्टिकोनातून 'चैत्रपालवी', 'तुर्तास एवढेच', 'शहर आत्महत्या करायचं महणतंय', 'बीकॉज वसंत इज कमिंग सून' अशा कितीतरी कलाकृतीचा यादृष्टीने विचार करता येईल.

मराठी कवितेत अगदी अलिकडच्या काळात नवीन पिढीतील काही कवी दमदार लेखन करत आहेत. त्यांच्या प्रातिभाविष्कारातून अभिव्यक्त झालेला शाब्दाविष्कार मराठी रसिकावर अधिराज्य गाजवत आहे . त्यात नारायण पुरी, विनायक पवार, शेख आबेद, रमजान मुल्ला, अरुण पवार, केशव खटिंग, शंकर राठोड, हरीष हातवटे अशा कितीतरी कवींच्या गेय सादरीकरणाने मराठी मनावर मोहिनी घातलेली आहे. या नवीन पिढीतील आणखी एक दमदार नाव म्हणजे नितीन देशमुख हे होय.

**"उगाच घेते नाव सखे**
**तू का प्रेमाने**
**डाळिंबाच्या ओठावरती**
**कडुलिंबाचे गाणे"**

या गझलेने मराठी रसिकांना वेड लावणाऱ्या नितीन देशमुख यांचा "बीकॉज वसंत इज कमिंग सून" हा अक्षरवाङ्मय, पुणे यांनी मार्च २०१८ मध्ये प्रकाशित केलेला महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह. ४८ कविता असलेला व वैविध्यपूर्ण जाणिवेचा आविष्कार असलेला हा काव्यसंग्रह रसिक वाचकाच्या मनात कायमचे घर करून जातो. समाजजीवनाचं वास्तव रूप या काव्यसंग्रहात प्रतिबिंबित झालेलं पाहावयाला मिळतं. हे कलात्म वास्तव श्रेष्ठ आहेच; पण त्यापेक्षाही त्यातून गायलेली माणुसकीची भैरवी नितांतसुंदर आहे. माणुसकीचा वसंत बहार यावा ही जाणीव उच्च पातळीवरची आहे.

मानवता हा माणसाचा मूलधर्म असला पाहिजे. त्याची पूजा हाच त्याच्या मनाचा स्थायीभाव असायला हवा; पण या व्यवस्थेत सोवळं - ओवळ, कर्मकांड, अस्पृश्यता, वांझोटे नियम, जीर्ण परंपरा यामुळे मानवता जर्जर झाली आहे. म्हणूनच -

**"माणुसकीचा शुक्राणू नंपुसक झालाय."**

असं भाष्य नितीन देशमुख 'नग्न पिढ्यांचे वारसदार' या कवितेतून करतात. माणसातलं माणुसपण का हरवलं ? येथील मूल्यव्यवस्था लयाला का गेली ? माणसाला कोणी नागवलं ? या सर्व प्रश्नांची उत्तरे अंतिमतः माणसांनीच मारलेल्या डंखात मिळतात... त्या डंखाचं विष सर्वत्र पसरलंय... माणूस जाती -जातीत, धर्मा- धर्मात विभागला गेला. प्रत्येक धर्माने रंगाचीही विभागणी केली. रंगाची विभागणी करुन कितीतरी टोळया या समाजव्यवस्थेत वावरत असतात हे विदारक सत्य आहे. प्रत्येक टोळी दुसऱ्या टोळीवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करते. आपला धर्म दुसऱ्या धर्मावर लादण्याचा प्रयत्न करते. याचं वास्तव चित्रं कवी नितीन देशमुख यांच्या स्वप्नाची पार्श्वभूमी असलेल्या 'रंगीत पेशी' या कवितेत पाहावयाला मिळतं -

**"काही दिवसापूर्वी मला पडायचे एक ... भयाण स्वप्नं**
**काही टोळया धरायच्या करकचून आणि म्हणायच्या**
**आम्हाला टोचायच्या आहेत तुझ्या रक्तात रंगीत पेशी**

**एक टोळी म्हणायची निळ्या पेशी**

**दुसरी म्हणायची हिरव्या**

**तिसरी म्हणायची**

**नाही नाही असंभव ह्याच्या रक्तात भगव्याच हव्यात पेशी**

**मी म्हणायचो अहो पण लाल रंगाचं काय ... ?**

**दात खात ते म्हणायचे**

**आम्हाला तेच हवे आहे**

**पुसून टाकायचा आहे**

**तुझ्या रक्ताचा खरा रंग."**

समाजव्यवस्थेत हे विरूप चित्रं आजही पाहावयाला मिळतं. संविधानामुळे मूल्यव्यवस्था टिकून आहे. संविधानाचे महत्त्व आपल्याला अधोरेखित करावेच लागेल. असे असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समता, स्वातंत्र्य, बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे आम्ही स्वीकारलेली असली त्याचबरोबर 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' अशी प्रतिज्ञाही म्हणत असलो तरीही जातीचं आणि धर्माचं खूळ काही आमच्या डोक्यातून पूर्णपणे गेलेलं नाही. 'प्रतिज्ञा ' या कवितेमध्ये याचं प्रत्यंतर येतं -

**"चित्रं काढताना**

**एक काळजी घ्या गुरूजी**

**हेडमास्तर म्हणाले**

**कुठली काळजी... मी म्हणालो**

**हे बघा निळा रंग भगव्यात मिसळायला नको ...**

**अन् हिरवा फक्त बॉर्डरसाठीच वापरा हं ... ?**

**आलं का लक्षात ... ?**

**हेडमास्तर म्हणाले "**

अर्थातच जातियता, धर्मांधता ही आमच्या मनाच्या अंतरकप्प्यात आजही टिकून आहे. याची अनुभूती येथे येते. मानवता आता स्वप्नातला गाव झाला की काय ? याची प्रचिती येते.

रंगविभागणी केली तशी आम्ही महामानवांचीही विभागणी केली . खरं तर समाजमन निकोप, निरोगी राहील. यादृष्टीने महामानवाचे काम अतुलनीय स्वरूपाचे....! स्वतःला त्यांचे अनुयायी म्हणणारे मात्र या महामानवाचे विचार प्रत्यक्ष कृतीतून न आणता फक्त उक्तीपुरते सीमित ठेवतात . ह्या वृत्तीवर प्रहार करताना

**"शिका काहीतरी त्यांच्या,**
**जगायाच्या विचारातून**
**शिवाजी अन् भीमाला**
**या नका बांधूच रंगातून**
**उरी कारुण्य ठेवा अन्**
**खरा माणूस ओवाळा**
**उगा ही फक्त मेणबत्ती**
**नका जाळू विहारातून"**

असा भाव कवी व्यक्त करतात. विकृतीतून प्रकृती घडविण्यासाठी उपयोजनात्मक हा महत्त्वपूर्ण संदेश आहे. छ. शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे राष्ट्राच्या आणि समाजाच्या जडणघडणीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या विचारांची महती व त्यांच्याबद्दलची कृतज्ञताही कवी नितीन देशमुख यांनी प्रस्तुत काव्यसंग्रहातून व्यक्त केली आहे .

छ. शिवाजी महाराजांची नीती ही सर्वधर्म समभावाची, माणुसकीची, न्यायाची व स्वराज्य निष्ठेची होती .म्हणूनच त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना _

**"तू दीपस्तंभ क्रांतीचा**
**तू वाघ खरा मातीचा ...**
**समशेर तळपली गगनी**
**ही स्वतंत्र केली धरणी ...**
**शब्दाना शक्ती नाही**

**दिव्यत्व तुझे गाया**

**जय जय शिवराय"**

असा भाव कवी व्यक्त करतात. आपल्या कृती व उक्तीने सामान्यांच्या डोळयातील आसू पुसणारे व सामान्यांचेच गाणे गाणारे लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना -

**"आकाशाहून उंच लेखणी**

**किती थोरवी गाऊ ...**

**तू सत्याच्या शाहिरीचे**

**नाव अण्णाभाऊ"**

असा भाव तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी –

**"तू दुःखाचा खडक फोडुनी**

**वाट दिली पाया ...**

**राजमार्ग हा महामानवा ,**

**दिलास चालाया**

**जय जय जय भीमराया"**

असा कृतज्ञता भाव व्यक्त केला आहे.

अर्थातच माणसाच्या मानवतेसाठी या महामानवांचे विचार महत्त्वपूर्ण होते. त्यांच्या विचारांमुळे व कृतीमुळे समाजाची व राष्ट्राची जडणघडण झाली. म्हणून हे महामानव अनेक प्रतिभावंताच्या लेखणीचे विषय ठरलेले आहेत. नितीन देशमुख यांच्या कवितेतही याची प्रचिती येते.

अशा महामानवाच्या विचारांची परंपरा असलेल्या देशातील आपण ... पण इथे हल्ली माणसे विक्षिप्त वागत आहेत. समाजव्यवस्थेत विकृती वाढीस लागली आहे. जातियता, अंधश्रद्धा, द्वेष, मत्सर ह्या विकृत जाणिवा समाजव्यवस्थेला रसातळाला घेऊन जात आहेत. त्या दोषांना दूर सारून माणूसपणाला आकार देऊ हा संदेश 'डोळसविज्ञान' या कवितेत कवी देऊन जातात .

**"कुठल्या जातीचा**

**करू नका द्वेष**

**माणसाचा क्लेष**
**माणसाला ...**
**जरी जातीधर्म**
**निर्मिले आपण**
**तरी माणूसपण**
**सोडू नका ..."**

ही जाणीव निश्चितच मानवतेसाठी महत्त्वपूर्ण आहे. अंधश्रद्धा ही सुद्धा 'छोटी मुक्ती' मिळविण्याच्या मोहापायी मानवता दूर सारते. आजही या देशात कितीतरी लोक अंगावर ऊन, वारा, पाऊस झेलत रस्त्याच्या कडेला भुकेल्यापोटी जीवन जगतात. त्यांचा विचार न करता अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन आम्ही मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो. अगदी हीच जाणीव 'छोटी मुक्ती' या कवितेतून-

**"अरे कालच्या पूजेचा**
**सर्व सिधा आटा**
**नेऊन दे ... महाराजांकडे ...**
**खूप प्रशस्त मुक्तीचा**
**मार्ग आहे तो ...**
**जिओच्या रिचार्जसारखा...**
**आई म्हणाली ...**
**....................................**
**हो छोटाच रिचार्ज मारला ...**
**मुक्तीचा ..."**

अशा पद्धतीने व्यक्त केली आहे .

पर्याप्त परिस्थिती शुष्क पानगळीची असली तरी संघर्षाने परिवर्तन होणारच !आपल्या जीवनात वसंत येणारच ... ही आशावादी जाणीव व्यक्त करताना -

**"पानगळीच्या शुष्क कालावधीतही**
**वाळून चूर झालेल्या पानातील**
**जराशा हिरव्या भागानं ... भांडावं**
**बेंबीच्या देठापासून ... अख्ख्या ऋतुसोबत ...**
**तसा असतो**

**जनसामान्यांचा संघर्ष**
**परंतु शिशिरानेही माजून जाऊ नये**
**कारण कधी ना कधी**
**संघर्षाला येतोच ना गुण**
**बिकॉज... वसंत इज कमिंग सून"**

कवी नितीन देशमुख यांच्या कवितेला असा घाट प्राप्त होतो. माणसामाणसात सलोखा असणं आवश्यक असतं; पण माणसाच्या सलोख्याचे नट लुझ झालेले आहेत. ऑईलमध्ये म्हणजेच रक्तात द्वेष, मत्सराचा कचरा झाला आहे. राजकारण, जात, गट, पुरोगामी, प्रतिगामी, सनातनी या खड्डयांनी आयुष्याच्या रस्त्यावर मेंदूच्या इंजिनाची वाट लावली. म्हणून पवित्र भावनेनं गाडीची वॉशिंग केली पाहिजे, मनाचं अलायमेंट बिघडू नये म्हणून वरायलिंग करायलाच हवी. ही जाणीव म्हणजेच 'माणूस' कंपनीचं झकास मॉडेल तयार करण्याचा मूलमंत्रच आहे. हिंस्रतेचा क्याकटस उगवण्या अगोदर इथे सुंदर निशिगंधाची बाग फुलावी अशी अपेक्षा करणारा कवी -

**"दांभिक हृदयांना गवसू दे ...**
**वसंत बहार,**
**यमन कल्याणाचे तेजोमय सूर**
**घरा -घरातून गायली जाईल जेव्हा**
**माणुसकीची भैरवी ... "**

असा मानवतावादी सूर आळवायला लागतो. 'मानवतावाद 'केंद्रबिंदू असलेल्या या काव्यसंग्राहात राजकारणी लोकांची प्रवृत्ती व त्यांचा उपहास, आयुष्यात आई इतकेच बापाचे असलेले महत्त्व, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीचे शोकपूर्ण मनोगत, कृषी जीवनातील संकट, कृषी जीवनात असलेले बैलाचे महत्त्व, मातीचं गाणं असे विविध विषय हाताळलेले आहेत. चिंतनात्मकता, वैचारिकता, प्रासादिकता आदी कवी नितीन देशमुख यांच्या लेखनाचे विशेष या काव्यसंग्रहात जाणवतात. अभंग, गझल, मुक्तछंद इ. काव्यप्रकारांच्या माध्यमातून आपल्या जाणिवांना मुक्तपणे वाट करून दिली आहे. त्यांच्या कवितेतून संगीत, चित्र या कलेतील प्रतिमा व प्रतिके सहजतेने डोकावताना दिसतात.

बॉर्डर, व्हायरस, सर्व्हिसिंग, इंजिन ऑईल, कार्बोरेटर, वॉशिंग, वरायलिंग, अलायमेंट, मॉडेल, कंपनी, हेडमास्तर, रेडलाईट, बीकॉज, इज, कमिंग, सून, कॉलबॅक, ब्लॅकहोल, टेलिकास्ट, ट्रॅक्टरचार्ज, पथ्थर, आदमी, अच्छे अशा हिंदी व इंग्रजी शब्दांचा वापर करून कवितेचा आशय समृद्ध केला आहे. काही कवितेत वैदर्भी भाषेची बोलीरुपं आढळतात; पण ती ती जाणीव अभिव्यक्त करताना आशयाला पुरक अशीच ही अभिव्यक्ती आहे.

या संपूर्ण कवितासंग्रहातील कविता रसिक मनाला भावणाऱ्या आहेत. कारण त्यातून प्रामुख्याने संगीतातील कोमल स्वर असलेला व ज्या रागाला सदा सुहागन मानले जाते अशा भैरवीचा स्वर असलेली माणुसकीची भैरवी गायलेली आहे. प्रतिकूल परिस्थिती दूर सारून अनुकूल वसंत आगमनाची आशावादी जाणीव व्यक्त केली आहे. त्यामुळे हा कवितासंग्रह वाचनीय व सरस आहे.

**संदर्भग्रंथ:**


१. बिकॉज वसंत इज कमिंग सून, कवी : नितीन देशमुख प्रकाशक : अक्षरवाङ्मय, प्रकाशन , पुणे

२. नव्वोदोत्तरी मराठी कविता नवी रूपे - प्राचार्य , डॉ. किसन पाटील

३. मराठी सामाजिक कविता शोध आणि बोध - डॉ. अविनाश सांगोलेकर

४. दै. लोकसत्ता


***

# २००० नंतरच्या काव्यातील मिथक संकल्पना

**आश्लेषा सचिन कुंभार**

**संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.**

**मिथक संकल्पना-**

'मिथ' म्हणजे खोटे नव्हे ,'मिथ' म्हणजे कल्पनाही नव्हे ,'मिथ 'म्हणजे वस्तुनिष्ठ सत्य ही नव्हे ,परंतु त्या मिथ्य।च। उदय हाच मुळी एका सत्याच्या शोधासाठी असतो जोपर्यंत ते शोधयुक्त सत्य सापडत नाही तोपर्यंत त्याच 'मिथ' ला एक लौकिक प्रतिष्ठा असते व त्यातून अलौकीक अर्थाची अपेक्षा ठेवली जाते मिथ हे काळानुरूप बदललेले दिसते थोड्याफार प्रमाणात मिथचा चेहरा काळानुरूप बदलत जातो .पुराणातील इतिहासातील ऋषींची जागा साधुसंतांनी व आज बुद्धिवंतांनी ,विचारवंतांनी घेतलेली दिसते .इतिहासातील ऋषीमुनी हे आजच्या आधुनिक काळातील विचारवंत म्हटले पाहिजेत .पुराणातील जलप्रलयाची कथा ही आधुनिक काळात महापुराचे थैमान म्हणावे लागेल. मिथका मधून हजारो वर्षापूर्वीच्या इतिहासाची पाळेमुळे आपल्याला दर्शन देतात व त्याचाच वटवृक्ष होऊन फांद्या फुले आपले अस्तित्व लोकांच्यात समाजात विखुरतात मिथकांच्या या व्यापक रूपला मूर्तरूप देण्यासाठी वाङमय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अध्ययन व महत्व दिले गेलेले आहे हे साहित्य आपल्यासमोर सांगत असते इतिहासाचे मिथकामुळे पुराणांमध्ये रूपांतर होते व नवे वळण प्राप्त होते. मिथक का मध्ये तर्क मार्ग सोप्या पद्धतीने सुचविलेले असतात .समाजाची रहस्ये गूढतेकडे असलेली ओढ वेगवेगळ्या गोष्टी प्राप्त करण्याची तंत्रे पाहायला मिळतात. जागतिक साहित्यात मिथकिय कथांना अनन्यसाधारण महत्त्व आहे कथांमधील मिथके ही कवी कवयित्रीना भुरळ पाडताना स्वतःकडे आकृष्ट करताना दिसतात मिथक प्रतिमा आणि काव्यात्म प्रतिमा यांचे साहित्य।त अनन्यसाधारण असे वेगळेपण आहे. प्रत्येक कवी कवयित्री यांचा प्रयत्न हाच असतो की परंपरागत मिथके तोडफोड न करता जशीच्या तशी पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविता कशी येतील त्यासाठी पद्यातील प्रतिमासृष्टी वेगवेगळ्या रूपकांच्य। अदलाबदलीने शृंगारली देखील जाते .'मिथ'म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानासाठी किंवा दोन तत्त्वांच्या परस्पर संयोगासाठी. मिथक निर्मितीच्या प्रेरणा विचारात घेता मिथक निर्मितीमध्ये बाह्य जगत आणि आंतरिक जगत य।दोन्ही गोष्टी सक्रीय आहेत . "१"

- बाह्य घटक-नैसर्गिक घटना, अनुष्ठान, ऐतिहासिक घटना, नैतिक चेतना, यांचा समावेश होतो.
- आंतरिक घटक- यामध्ये मानवी भावना, जिज्ञासा वृत्ती, सृजनशीलता, कल्पना इत्यादींचा समावेश होतो.

**मिथकांचे स्वरूप**

मिथकांचे स्वरूप अतिशय सखोल आहे .मिथके आपल्याला विविध भाषांमधून अभ्यासता येतील विविध देशांमध्ये मिथकविषयावर सखोल अभ्यास झालेला आहे "डम ईव्ह "ची कथा याचे उदाहरण आहे इसापनीतीच्या कथा ,येशू ख्रिस्ताच्याकथा ,त्याचप्रमाणे बौद्ध धर्माच्या जातक कथा ,विविध धर्माच्या नीतिकथा ,धार्मिक कथा ग्रामीण परिसराशी संबंधित कथालोककथा ,ग्रामीण दैवत कथा ,दैत्य कथा इत्यादी विविध प्रकारात कथा काव्य।च्या स्वरुपात मिथक अभ्यासता येणारआहेत. मिथक स्वरूप लोक कथेच्या रूपातच नसून कविता ,लोकगीते, उखाणे ,विविध खेळ, पारंपारिक नृत्य ,रूढी,परंपरा, यातून ही पहायला मिळते विविध धार्मिक गीतातून धर्माचा, राज्यांचा, देवी-देवतांचा महिमा आपल्यास ऐकिवात आहेविविध लोकसाहित्य हेसुद्धा मिथकांची वाहक आहेत . अनेक भाषा अभ्यासकांनी मिथकांचे विविध प्रकारात वर्गीकरणकेलेले आहे.

दिनेश कुमार शर्मा यांनी मिथकांचे वर्गीकरण पंधरा प्रकारात मांडून मिथकांचे स्वरूप किती विशाल आहे हे स्पष्ट केले आहे

- धार्मिक मिथक
- पारंपारिक मिथक
- स्वप्निल मिथक
- वस्तू पर मिथक
- भावपरक मिथक
- दृष्टी परक मिथक
- वैज्ञानिक मिथक इत्यादी
- आदिम मिथक
- वैदिक मिथक
- पौराणिक मिथक
- ऐतिहासिक मिथक
- लौकिक मिथक
- प्राकृतिक मिथक
- मनोवैज्ञानिक मिथक
- जातीय मिथक

**मिथ विषयक पाश्चात्त्यांच्या संकल्पना**

"१"- मॅक्स मुलर या भाषा शास्त्रज्ञाच्या मते" दैवत कथा म्हणजे भाषेला जडलेला रोग होय" भाषा शास्त्राच्या दृष्टीने विचार करता मॅक्समुलर मिथकांचा संसार हा भ्रम।चा संसार आहे असे मानतो .जंग यांच्या मते" मानवी जीवनाच्या आदीं कल्पनेतून मिथची निर्मिती झालेली नसून ते अनुभव त्यांनी घेतले त्यातूनच मिथ अस्तित्वात आल्या ,मानवी जीवनाच्या भौतिक विकासाचे संदर्भ त्यातून अनुभवता येतात ,आदिम संस्कृतीच्या सामूहिक मनाचे प्रतिबिंब मिथमधून पहावयास मिळते त्यातून दैवत कथांचा अंश मानण्याकडे अधिक प्रमाणात मानसिकता दिसून येते" .एम इलियड यांच्या मते "मिथक कथा या केवळ सत्य अंश सांगतात जे सत्य प्रामुख्याने घडले "आय ए रिचर्ड्स यांच्यामध्ये "मानवी संवेदनांचे साकार रूप म्हणजे मिथक होय "जॉर्ज कैले यांच्या मते "धार्मिक लोक विश्वास हाच मिथक।च। निर्माता असतो.

हिंदी लेखकांच्या मिथ विषयक संकल्पना आचार्य हजारी प्रसाद द्विवेदी यांनी प्रथम मिथक या शब्दाचा उपयोग केलेला दिसून येतो डॉ उषा पुरी के मतानुसार मीच लौकिक तथा अलौकिक तत्व का मिश्रण है। नागेंद्र यांच्यामते "मिथक बिंब का ही एक विशिष्ट प्रकार है।वे मानते है कि जब अन्योक्ती रूप जातीय जीवन के विश्वास का आधार प्राप्त कर लेता है तब वह मिथक का स्वरूप धारण कर लेता है।" सत्येंद्र के मतानुसार" मीत मे किसी देवता अथवा पराप्राकृतिक सत्ता का विवरण होता है ।"बच्चन सिंह के मतानुसार "चेतन मन के द्वारा प्रकृति के चमत्कारिक प्रभाव की अनुभूती का कल्पनात्मक सृजन ही मिथ है।"

मराठी लेखकांच्या मिथ विषयक संकल्पना- पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या मते "आदिम काळातील दैवत सृष्टी विस्तारत जाऊन  कथांची निर्मिती झाली यांनाच इंग्रजीत म्हणतात प्रत्येक कथेत देवतांचे काही न काही वैशिष्ट्य सांगितलेले असते आणि मानव सृष्टीशी त्याचा संबंध जोडलेला असतो या कथा दैववादी झाल्या आहेत."

दुर्गाबाई भागवतांच्या मते मानवी स्वरूपातील अमानवी किंवा दैवी कृतींचे आदिमानवाला झालेले जे दर्शन त्या दर्शनाचे प्रतीक म्हणजे दैवत कथा होत.

विश्वनाथ खैरे ,यांच्या मते वास्तविक मिथ हा ही एक सत्याचा शोध असतो विज्ञानाच्या आद्य अवस्थेतला मिथ म्हणजे मानवी मनाने उस्फूर्तपणे कल्पिलेले सत्याचे स्वरूप विज्ञान हे त्यांच तथ्यांच्या पद्धतशीर शोधाचे फलित. प्रभाकर मांडे, यांच्या दैवत कथेत निसर्गातील नक्षत्रे पशुपक्षी यांचे

मानवीकरण केले जाते त्यांना मानवी स्वभाव प्रधान केलेले असतात कधी कधी या कथांना तत्व विचारांचा आधारही असतो. दि .के .बेडेकर दैवत कथेसाठी दिव्य कथा ही संज्ञा वापरतात. दिव्यत्वाची प्रचिती करून देणाऱ्या कथा, काव्य, पुराणे, गीते, रचना म्हणजे मिथके. दैवत कथा, परी कथा, दिव्यशक्ती च्या कथा यामधून दिव्यशक्ती यांची भेट होते.

**२००० नंतर मराठी कवयित्रींच्या कवितेतील मिथक स्वरूप -**

मराठी कवितेत मिथक या विषयाच्या अनुषंगाने ज्या काही कवयित्रींनी मोलाची भर काव्य संस्कृतीमध्ये घातलेली आहे त्यातील काही निवडक कवयित्रींच्या काव्याचा मागोवा घेतलेला आहे कवयित्री अरुणा ढेरे, तस्लिमा नसरीन, शांता शेळके, इंदिरा संत, नीरजा, असावरी काकडे, अनुराधा पाटील इत्यादी अनेक कवयित्रींनी काव्य दालन सजवलेले आहे पैकी काही निवडक कलाकृती पाहिल्यास मिथक व कविता यांचा सहसंबंध लक्षात येतो . शब्द मर्यादेच्या दृष्टिकोनातून या ठिकाणी संपूर्ण कविता न घेता अर्थाच्या दृष्टिकोनातून त्यातील निवडक ओळी, कडवे घेत आहे. मिथकाच्या अनुषंगाने कवितांचे स्वरूप पुढीलप्रमाणे

**"मंत्राक्षर "**

कवयित्री, अरुणा ढेरे या काव्यसंग्रहात "नीलकंठ" या काव्यात नीलकंठ म्हणजे **'महादेव'** समुद्रमंथनाच्या वेळी विष उत्पन्न झाले प्राणिमात्रांना सृष्टीला वाचविण्यासाठी महादेवाने ते विष घशात धारण केले म्हणून त्यास नीलकंठ म्हटले जाते अशी दंतकथा प्रचलित आहे नीलकंठ हे एक पौराणिक मिथक आहे

**"मग उरेल तो नीलकंठ असा संपूर्ण क्षण**
**आपल्यासाठी आणि त्यात आपले एकमेकांचे असणे**
**अपार हवेसे तरीही केवढे जीवघेणे"३"**

कवयित्री या पदया।त शाश्वत व अशाश्वत अशा गोष्टींवर भाष्य करतात. इथे जीवनाचे सत्य, असत्य पचविल्याने झालेली घालमेल स्पष्ट केली आहे.

**सुभद्रा -**

**तोडून घ्यायला हवे छिलून घ्यायला हवे**
**रक्त मांस अस्थीस।ठीही वृति राहायला हवे,**
**बाह्य रूप असे तसे त्याची आसक्ती गळते**
**तेव्हा कुठे आत्मबलाने परब्रम्ह पेलवते**
**एवढे सारे होत जाईल तर एक दिवस**
**असा येईल आपला ठाव न सोडताही सुभद्रा होता येईल."३"**

'सुभद्रा' हे एक पौराणिक मिथक आहे सुभद्रा ला जसे अग्निदिव्या ला सामोरे जावे लागले तसेच आजच्या आधुनिक स्त्रीला देखील सिद्ध होण्यासाठी खूप यातना सहन कराव्या लागत आहेत अनेक गोष्टींचा त्याग करावा लागत आहे.

**जावे जन्माकडे- अरुणा ढेरे**

**"अहो तुम्ही गोकुळीचे श्रीहरी"**
**हिंस्र माणसे हवा विषारी कोलाहल गर्दी अविचारी**
**कुठे हरवली ती तेव्हाची तुमची हो बासरी**
**अहो तुम्ही गोकुळचे श्रीहरी."४"**

पुराणात श्रीहरीचे दाखले दिले जातात म्हणून पौराणिक मिथका मध्ये श्रीहरी चा समावेश होतो. द्वापार युगातील महाभारतातील श्रीकृष्ण म्हणजे आनंदी आनंद, सर्वत्र स्त्रिया, अबालवृद्ध सुरक्षित. सध्याच्या काळात सर्वत्र अनाचार, दुराचार, भ्रष्टाचार, स्त्रियांवर अत्याचार आणि या सगळयांचे प्रमाण सतत वाढत असून समाज दुःखात डुंबत आहे. तेव्हा कवयित्री समाजाला प्रश्न विचारत आहेत की तो द्वापार युगात स्त्रियांचे रक्षण करणारा श्रीकृष्ण कुठे हरवला आहे म्हणजेच माणसामाणसातील प्रेम जिव्हाळा संयम कुठे हरवला आहे?

**'निर्वाचित कविता'- कवयित्री तसलिमा नसरीन**

'नियती' - नियती हे आदिम मिथक आहे आदिम काळातील घडलेल्या घटनांना देव देवता समजून त्या रूढी होत. पाप पुण्य नियती जगणे-मरणे यासारख्या घटना मिथकात मोडतात नियती म्हणजे ठराविक वेळ प्रत्येक गोष्टीसाठी एक ठराविक वेळ ठरलेली असते अशी कथा सांगितली जाते.

**'पौषाची पौर्णिमा'**

**रात्रभर जागत बसते उशाशी चाचपत त्या दुबळया शरीराला**
**रडत एका पाण्याच्या थेंबासाठी ."५"**

प्रत्येक गोष्टीसाठी एक वेळ नियतीने ठरवून दिलेली असून फक्त स्त्रियांसाठी नियती अन्यायकारक अशाच गोष्टी ठरविते, परखडपणे आपले मत व्यक्त करताना कवयित्री या ठिकाणी पारंपरिक मिथकांचा उपयोग करतात. कवयित्रीला अन्यायकारक वाटणारी घटना या मिथकातून स्पष्टपणे मांडलेली आहे.

**"कळयांचे दिवस फुलांच्या राती "**
**कवयित्री -शांता शेळके**
**'मी तुमची पार्वती '-**

**मिळूनी आपण संसाराचा सारीपाट मांडला**
**हसला रुसला कधी कधी तुम्ही मजसंगे भांडला जन्मभराच्या या खेळाची**
**अवीट गोडी अति**
**भोले शंकर पती तुम्ही माझे**
**मी तुमची पार्वती."६"**

'पार्वती' हे पौराणिक मिथक आहे पार्वती म्हणजे शक्ती, पतिव्रता, माया होय आधुनिक कवयित्रींच्या काव्या मधून डोकावणारी पार्वती म्हणजे आधुनिक स्त्री स्त्रीने संसार कसा करावा याविषयी आधुनिक पद्धतीने मोकळेपणाने विचार पटवून देण्यासाठी पुराणातील पार्वती चे उदाहरण दिले आहे. पार्वती सारखे विश्व माता व अर्धांगिनी होण्यासाठी करावे लागणारे दिव्य आजच्या स्त्रीने देखील केले पाहिजे यासाठी पार्वती या मिथकाचा काव्यामध्ये उपयोग केलेला आहे.

**'निळया पारदर्शक अंधारात'**
**कवयित्री अरुणा ढेरे**
**'शापाची सावली'**
**जीवाची ज्योत पाजळली तरी नाहीशी होत नाही काजळी**
**उरते तशीच भोर काळी लांबवर पडत गेलेली शापाची सावली"७"**

'शाप' म्हणजे एखाद्या वाईट गोष्टीसाठी वाईट चिंतन किंवा चांगल्या गोष्टी साठी चांगले चिंतन पर आशीर्वाद, शाप हे मिथक असून विविध अर्थाने ते वलयांकित आहे विविध कवयित्रींनी शापाची प्रतिमा आपल्या काव्यातून स्पष्ट केलेली आहे जीवनभर स्त्रियांना विविध दुःखं सहन करावी लागतात त्याचे कारण त्यांचा स्त्रीत्वाचा जन्म. श।प दिल्याप्रमाणे स्त्री जन्माला गर्भ अवस्थेपासून ते मरेपर्यंत विविध यातना सहन कराव्या लागतात त्या मुक्या जीवाच्य। जगण्याला तो जणू शापच असतो असे वर्णन कवयित्रीने काव्यात केले आहे. आणि हा शाप खूप खूप पिढ्यांपासून चालत आलेला असून तो असाच पुढे पिढ्यानपिढ्या चालणार आहे असे काव्यातून जाणवते. 'शाप' हे एक पौराणिक मिथक म्हणून गणले जाते.

**"राधे"**

**ऐकलीस जेव्हा कळ लावणारी कलंदर बासरी आणि सरळ उतरली पुराच्या पाण्यात**
**गरगरलीस भोवंडलीस**
**वाहात ही गेलीस दूरपर्यंत नाकातोंडात पाणी जाऊन घाबरी झालीस**
**तरी तरून गेलीस बाई शर्थ तुझी!"७"**

'राधा 'द्वापार युगातील श्रीकृष्णाची परम भक्त प्रेयसी राधेला भक्तीमुळे जे स्थान मिळाले त्यामुळे तिला आपण ओळखतो राधा हे एक धार्मिक मिथक आहे. कवितेमध्ये कवयित्री राधे च्या अनुषंगाने एका स्त्रीच्या मनाचे चित्र उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न करत आहेत त्यांना अनेकदा गूढ प्रसंगांना सामोरे जाताना शर्थ करावी लागते, तरीही त्या पुरून उरतात तरुन जातात यशस्वी होतात. राधेच्या या जीवघेण्या प्रसंगातून राधेचे प्रसंगावधान, जिद्द, कष्ट, धैर्य यांचे दर्शन घडते आधुनिक काळात स्त्रियांना प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देणारे राधा हे मिथक योग्यपणे साकारण्याचा प्रयत्न आहे.

**"प्रारंभ "**

**कवयित्री अरुणा ढेरे**
**'मृगाचे दिवस'**
**असे मृगाचे दिवस**
**धुंद कोसळे पाऊस**
**गर्द पोपटी रानात सखे हरवून गेले.**
**झिरमिळती पालवी**
**वेली ऊसासली नवी**
**मैनेसवे राघू बाई काही भलतेच बोले."८"**

एकूण नक्षत्रे 27 आहेत निसर्गचक्रातील विविध बदलानुसार मनुष्याच्या जीवन क्रिया बदलतात नक्षत्रे याविषयी दंतकथा ही प्रचलित आहेत मृगनक्षत्र ह्याचे एक ठराविक वैशिष्ट्य आहे व त्यानुसार अनेक दंतकथाही सांगितल्या जातात मृग नक्षत्र हे एक प्राकृतिक मिथक आहे प्राण्यांचे मनुष्य करण नक्षत्रात झाल्याचे आढळून येते येथे मृगनक्षत्र मध्ये निसर्गात बरेच बदल होतात वेगळ्या हालचाली घडून येतात मोठा पाऊस, वृक्षवेलींचा थाट, पाण्याचे ओहोळ यामुळे मानवी संवेदना जाग्या होतात आणि त्या सुंदर निसर्गामुळे मनात उठणारे तरल भाव टिपण्याचा पद्यात प्रयत्न केलेला आहे. निसर्गाच्या या ऋतु बदलाचा मानवी स्वभावावर त्याच्या प्रत्येक हालचालीवर परिणाम होतो मानवी गुणवैशिष्ट्ये निसर्गातील वेगवेगळया घटनातून दाखविण्याचा शब्दांनी जो प्रयत्न केला गेला तो टिपण्या सारखा आहे. उदाहरणार्थ. लाजणे, लपणे, कुजबुजणे, हरवणे इत्यादी घटनातून काव्य जणू मानवीच आहे असे जाणवते.

**गर्भरेशीम**
**कवयित्री इंदिरा संत 'भाग्यवंता'-**
**भरात उभी केळ**
**गर्भरेशीम हिरवीगार**

**गर्द पोपटी पाना आड**
**बाळ गोजिरे कडेवर"९"**

'भाग्यवंत' हे स्वप्निल मिथकामध्ये वर्गीकृत होते बाळाला जन्म दिल्यानंतर स्त्रीत्वाची पुर्णता होते. ती स्त्री भाग्यवंत असते असा दंडक आहे. काव्यात केळीची तुलना स्त्रीत्वाशी करून असे वर्णन केलेले आहे. प्रतिमा नैसर्गिक असली तरी विचार पारंपारिक पद्धतीने व्यक्त केला आहे.

**'सप्तपदी'**

**तिचा हात त्याने मोठ्या आत्मविश्वासाने हातात घेतला तिची आंतरिक इच्छा आवड-निवड आशा-आकांक्षा हे सगळे."९"**

'सप्तपदी' हे एक पारंपारिक मिथक आहे सप्तपदी याचा अर्थ पती पत्नी यांनी एकत्र राहण्यासाठी अग्नी, जल, वायू व निसर्ग यांच्या सानिध्यात पार पडलेला विधी .हा विधी अतिशय पारंपारिक व पवित्र मानला जातो आजच्या काळामध्ये जरी परंपरांना फाटा दिला गेला असला तरीही आवश्यक गोष्टींना खूप महत्त्व दिले गेलेले आहे आधुनिक काळामध्ये स्त्री-पुरुषांना एकत्र राहण्यासाठी पुरुष प्रधान परंपरा बाजूला ठेवून स्त्रीत्वाचा सन्मान, तिच्या अपेक्षा, आकांक्षा याची जाणीव ह्या गोष्टी एकत्र राहण्या साठी महत्वपूर्ण आहे यांची जाणीव घेऊन सप्तपदी पूर्ण केल्यास संसार सुखाचा होऊ शकतो असे कवयित्रीला काव्यातून सांगावयाचे आहे.

**'बाहुल्या '**
**कवयित्री इंदिरा संत**
**'प्रारब्ध'**

**जिद्द माझीही तशीच**
**नाही लवलेली मान**
**जरी फाटला पदर**
**तुझे झेलते मी दान."१०"**

'प्रारब्ध' एक स्वप्निल मिथक आहे स्त्री ही प्रारब्धाधीन आहे. काहीही घडले जीवनात तर बारबादा मुळेच घडले असा समज होऊन आयुष्यभर सहनशील प्राण्याप्रमाणे जीवन जगते परंपरा रूढी हे फक्त स्त्रियांसाठी आहे असेच तिला आजपर्यंत शिकविलेले आहे. पुढे कितीही स्त्रियांवर रूढी परंपरा लादल्या गेल्या तरी त्या कणखरपणे त्या पेलतात व आहे ह्या परिस्थितीमध्ये न डगमगता उभ्या राहतात असे या काव्यातून सुचविलेले आहे.

**"व्यक्त अव्यक्ताच्या मध्यसीमेवर "**
**आसावरी काकडे**

**'कस्तुरी '**
**आपल्या मधली कस्तुरी**
**शोधत हिंडे रानभरी**
**व्यर्थच उसाभर सारी करीतसे."११"**

कस्तुरी हे एक प्राकृतिक मिथक आहे कस्तुरी हे सहज साध्य नाही कस्तुरी शी संबंधित अनेक दंतकथा ऐकिवात आहेत स्वतःमधील चांगल्या कर्तुत्वाचा स्वतः स शोध लागला तर व्यक्ती समाज उपयोगी विधायक असे कार्य करू शकते. स्वतःचा विकास करून घेऊ शकते व जीवन आनंदी होऊ शकते. मात्र स्त्रीला स्वतःच्या कर्तुत्वाचा अजूनही शोध लागलेला नाही. आजही ती परावलंबी जीवन जगते. तेव्हा तिच्यातील 'स्व' च्या जाणिवेला कस्तुरी म्हटलेले आहे.'

**दारातल्या रांगोळीचे रंग' सिसिलिया कार्व्हालो 'स्वातंत्र्य '**
**इथल्या सगळया बागा जळून गेल्याहेत आगीच्या झळिने**
**इथे कसलेही स्वातंत्र्य नाही फुलण्याचे कळीने."१२"**

'स्वातंत्र्य' हे दृष्टी परक मिथक या प्रकारात येते. दृष्टी परक मिथक म्हणजे दृष्टीच्या माध्यमातून वस्तूचा उत्कर्ष आणि अपकर्ष होणे .स्वातंत्र्य नसल्यामुळे किंवा विघातक अशा रूढी-परंपरा यामुळे स्त्रियांचे जीवन पारतंत्र्यात असल्याप्रमाणेच आहे .त्यामुळे समाजाचा उत्कर्ष विकास खुंटलेला आहे. वरील काव्याच्या ओळी मुलींना कळयांची उपमा देत आहेत. पावलापावलावर मुलींसाठी धोके आहेतच त्यांना पुढे जाण्यासाठी अनेक अडचणी आहेत. त्या दूर होण्यासाठी कवयित्रीने परखडपणे आपले मत इथे मांडलेले दिसते.

मिथक हा विषय अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अतिशय सखोल आहे विविध मिथकांचा उपयोग करून कवयित्रींनी आधुनिक काळामध्ये आपले विचार व्यक्त करण्याचा काव्याच्या अनुषंगाने प्रयत्न केलेला आहे या ठिकाणी मी विविध मर्यादा लक्षात घेऊन तो मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) **शोधनिबंध, प्रकरण २**, लोक वाङमयातील नागप्रतिमा.पृ.क्र.२३५,२४५
२) **लोकसाहित्याचे स्वरूप,** डॉ.प्रभाकर मांडे ,३री आवृती,१९९५.
३) **मंत्राक्षर,** अरुणा ढेरे ऑगस्ट २०१३
४) **जावे जन्माकडे**, अरुणा ढेरे, डिसेंबर २०१८
५) **निर्वाचित कविता**, तसलिमा नसरीन, २०२०.
६) **कळयांचे दिवस फुलांच्या राती**, शांता शेळके , २००२
७) **निळया पारदर्शक अंधारात,** अरुणा ढेरे,२०१८.
८) **प्रारंभ**, अरुणा ढेरे,२०१९.
९) **गर्भरेशीम**, इंदिरा संत,२००२
१०) **बाहुल्या**, इंदिरा संत २०११
११) **व्यक्त अव्यक्तच्यामध्यसीमेवर,** आसावरी काकडे २०१६
१२) **दारातल्या रांगोळीचे रंग सिसिलिया,** कार्व्हालो२००७.

# दोन हजार नंतरच्या सामाजिक कवितेचे स्वरूप


## संतोष मारोती चमकुरे

रा. धावरी पो. रायवाडी ता. लोहा जी. नांदेड


मराठी साहित्याची परंपरा दीर्घ आहे. मराठी साहित्याची सुरवात ही पद्य स्वरूपात आहे.महानुभाव पंथापासून ते संत साहित्य, पंडित साहित्य, शिवकालीन , पेशवेकालीन, स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्यानंतर चा कालखंडाचा धावता आढावा घेतला तर एक गोष्ट निश्चित स्पष्ट होते साहित्य निर्मिती ही समाजाच्या हितासाठी झाली असल्याचे दिसून येते. कथा, कविता, कादंबरी, पोवाडा, आदी साहित्य प्रकारातून समाजाल्या विविध घटकांवर प्रकाश टाकून त्या त्या समकालीन परिस्थितिवर आधारित सामाजिक जाणिवेतून निर्माण झाल्याचे दिसून येते.ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यासारख्या महाण विभूतींनी लोकभाषेतून अभंग, ओवी, गाथा, कीर्तन, यासारख्या मधून समाजहित जोपासले आहे, पोवाडा या कीर्तीकाव्याचे ही महत्त्वपूर्ण योगदान आहे, पद्यस्वरुपी रचनेचे वाचकांना आकर्षण वाटते आणि त्यातूनच सामाजिकतेचे महत्त्व अधिक विशद केले.एकंदरीत पाहता साहित्य निर्मिती ही सामाजिक हिताच्या अग्रस्थानी असल्याचे दिसते. दुसरी बाजू असी की, लयबद्धतेमुळे सौंदर्यात भर पडते, मनोरंजनासाठी अधिक वाव मिळतो वाचकांच्या मनाचा ठाव घेत दीर्घ काळ स्मरण राहते. साहित्यिक दृष्टीने तो ही भाग महत्त्वाचा आहे. "समाजहित" हा मुख्य हेतू अनेक साहित्यिकांनी एक क्रमांकावर ठेवला असल्याचे दिसते. त्यातून वेगवेगळे संदर्भ पाहायला मिळतात ग्रामीण, दलित, प्रादेशिक, महानगरीय, स्त्रीवादी, आदिवासी, वंचित भटक्यांचे, अशी यादी वाढत जाणारी दिसते.लघु, दीर्घ, खंडात्मक, अशा वेगवेगळ्या प्रकारे वेगवेगळ्या बोलीच्या अंगाने पद्यमय रचना उदयाला आल्याचे दिसते, वेगवेगळ्या साहित्यिकांनी आपापल्या बोली भाषेचा वापरामुळे साहित्याला उजाळा मिळाल्याचे ही पुरावे मिळतात.

एकोणीसशे साठ नंतर मराठी ग्रामीण साहित्य अधिक गडद झाल्याचे दिसत असले तरी, त्याआधी ग्रामीण साहित्याची निर्मिती होत होती ! शहरापेक्षा गावांची संख्या जास्त असल्याने लोकसंख्या आणि बोली भाषाचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण साहित्यातलाच वेगळा हुंकार "दलित साहित्य" हा प्रकार पहायला मिळतो. गावकुसाबाहेरचे हिन अस्पृश्य माणूस म्हणून वागणूक मिळत नसल्याची जाणीव दलित साहित्याने करून दिली, गाव,वाडी तांड्यातील, वस्ती करून राहणारे, शेतकरी शेतमजूर, स्त्री जाणीव, आदिवासी, भटक्या विमुक्तांच्या विविध प्रश्नांची उकल करताना दिसते. वेगवेगळया साहित्य प्रकारातून, मुख्यत्वेकरून कवितेसह अन्य साहित्य प्रकारातून समाजहित, देशहित, राष्ट्र अभिमान, पिछडा समाज, कामगार, अन्याय, अत्याचार, मालक मजूर, वर्ग संघर्ष, जाती भेद, अशा विषयावर लेखन करुन साहित्यिकांनी मराठी साहित्य बळकट केले. दीर्घ वाचण्यापैक्षा लघु, वाचण्याकडे वाचकांचा कल अधिक असल्याची पुष्टी मिळते. अस्मानी सूलतानी संकटाने उदभवलेले विविध प्रकारचे प्रश्न कवितेच्या माध्यमातून सामाजिक कवितेचा प्रवाह वाहता दिसून येतो.

पहिली सामाजिक कविता केशवसुतांच्या लेखनाद्वारे प्रकटली असे अधोरेखित झाले असले तरीही त्याआधी सामाजिक कविता निर्माण झाल्या नाहीत असे म्हणने योग्य होणार नाही. त्यांच्या लेखनीने रंग अधिक गडद करुन सामाजिक कवितेत अंतबाह्य क्रांति घडवून आणली असेही जाणकार सांगतात. "अत्यंजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, मजुरावर उपासमारीची पाळी, एका भारतीयाचे उदगार," या सारख्या विषयतून अस्पृश्यता, आर्थीक विषमता, राजकीय पारतंत्र्यावर जुन्या पिढीचा धिक्कार करत समाजसुधारक तत्वांचा पुरस्कार केला. केशवसुतांची काव्यभाषा बंडखोर आणि व्यक्तित्वाला शोभेषी अशीच होती. एकोणीसशे साठनंतरच्या प्रवाहात दुष्काळाचे वास्तव्य अनेक कवींनी अधोरेखित केले, शेतकरी आत्महत्या, हुंडाबंदी, जगण्यासाठी करावा लागलेला संघर्ष, गरीबी आणि सरकारी तुटपुंजी धोरण, यातूनही ताशेरे ओढलेली दिसतात. नवकाव्याच्या पिढीतील अनेक कवींनी सामाजिक

कवितेचा पुरस्कार केला, कवींची व त्यांच्या कवितेची यादी लांबती असल्याने नाव उल्लेख करणे शक्य नसले तरीही, इंद्रजित भालेराव कवितेतून सामाजिक वास्तव्य मांडतात.....

**झाडाझाडाला विचारा, या पहाडाला विचारा**

**माझ्या शेतकरी बापाच्या विराण्या...**

फ. म. शहाजिंदे यांची शेतकरी ही दीर्घ कविता वाचकाच्या ठाव घेते. ना धों महानोर यांच्या कविता शेतीनिष्ठ असल्याची प्रचिती येते. इथे काव्याची भाषा हळव्या स्वरुपात, मुक्तछंदात पाहायला मिळते यातुन सामाजिक जाणीव कमी झाले असे होत नाही, ती वाचकांना जास्त अस्वस्थ करते, याच बरोबर सरकारी धोरण, बेरोजगारीचे विषय हाताळले आहे. दोन हजार नंतरच्या प्रवाहात सामाजिक कवितेचा प्रवाह त्याच वाटेने जात असला तरीही कवींच्या अनुभूती वेगळया आहेत विषयही वेगळे आले आहेत. उसाच्या कविता कैलास दौंड यांची मराठी काव्यातील वेगळा अविष्कार आहे अंधारात राहिला गाव, जगदीश कदम, यांचा रास आणि गोंडर, नामदेव शेतकरी, देवीदास फुलारी यांचा कविता क्रांतीच्या दासू वैद्य, यांनी आपल्या आजूबाजूच्या परिसरातील विविध विषयांवर कविता तूर्तास, तत्पूर्वी, या संग्रहात आहेत पी. विठ्ठल यांचा माझ्या वर्तमानाची नोंद, महेश मोरे, यांचा पाऊसकाळ, संतोष चमकुरे यांच्या नोंद, काव्यातून व गाव पुन्हा बांधताना, ...या काव्यसंग्रहातून सरकारी उदासिनता दाखवली.एकिकडे महासत्ता होऊ पाहत असलेल्या देश प्राथमिक प्रश्न सोडविण्यासाठी यशस्वी झाला नाही असे काव्यातून समोर येते.समाजमनावर होणाऱ्या बदलावर प्रकाश टाकला, कवी विलास सिंदगीकर रूपाली वैद्य, शैलजा कारंडे, प्रिया जामकर कवयित्रींचा उल्लेख करणे आवश्यक आहे,कोरोना सारख्या महामारीने जगभरात थैमान घातल्याने जनसामान्यांना पोहचलेली झळ, विस्कटलेली संसार, वाढलेली बेरोजगारी, उदभवलेली स्थिती अशा संकटाला जगाला प्रथमच सामना करावा लागला तरीही जवळील नातेवाईक, कोरोना ने गेल्यामुळे एक अस्वस्थता समाज मनावर बसली, साहित्यक्षेत्रात त्याचे तीव्र

पडसाद उमटले. कवितेतून कोरोनाचे विषयावर काव्यलेखन झाले असल्याची प्रचिती येते, कसे जगावे गावाकडे परतलेले लोक यांचे विषयही कवितेचा भाग बनला. कवितेची भाषा हळवी आणि  अस्वस्थ करणारी आहे, प्रश्न अधिक गडद झालेले दिसतात, कवितेचा प्रवाहातून सामाजिक विषय दूर नसल्याचे जाणवते थोडेफार स्वरूप काळाप्रमाने बदलत असले तरी मराठी कवितेतून सामाजिक विषय बाजूला  करता येणार नाही. जर काळाच्या ओघात बदल झाला तर साहित्य निरस आणि अल्पजीवी ठरेल. सामाजिकता  हा काव्याचा नेहमीच आत्मकेंद्र बिंदू आहे.

***

# २००० नंतरच्या कष्टप्रद शेतकरी समूह जीवनाचा वेध घेणारी कविता: हिसाळा

**बाळासाहेब** निवृत्ती कराड
रा. पार पो. ढाळेगाव ता. अहमदपूर जि. लातूर

ग्रामीण मराठी कविता साहित्यात तशी जुनीच असली तरी मुळात ग्रामीण साहित्याची सुरूवातच सर्वसाधारण पणे इ.स. १९२०च्यानंतर ग्रामीण कवितेने झाली असे मानले जाते. पुढे मात्र कवितेपेक्षा कथा अधिक लिहिल्या जाऊ लागल्या त्यात फारसाबदल झाला असे म्हणता येणार नाही. इ.स. १९७५ पर्यंत तरी हीच अवस्था दिसून येते. परंतु तद्नंतर म्हणजेचइ.स. १९८० नंतर विठ्ठल वाघ, इंद्रजीत भालेराव, सोपान हाळमकर, राजन गवस, ललित अधाने, श्रीकांत देशमुख, केशव सखाराम देशमुख, अमृत तेलंग, ऐश्वर्य पाटेकर हे कवी लिहू लागले.

मुरहारी कराडयांची कविता इ.स. २००८ साली 'हिसाळा' या काव्यसंग्रहाने प्रकाशित झाली; आणि नव्या पिढीतील असलेला हा कवी अस्सल ग्रामीण मराठवाडी बोलीसह तीच परंपरा आणि तोच वारसा घेऊन उठलेला दिसतो. शेणामातीचा गंध असलेल्या त्यांच्या कवितेतून त्यांनी शेतीमातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जगण्यातील व्यथा-वेदना, शिकून सुशिक्षित झालेल्या पोरांच्या जीवनातील भकासपणा, उदासी, नैराश्य यांचे जोरकस चित्रण आपल्या 'हिसाळा'या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहात मांडले आहे. त्यांच्या या काव्यसंग्रह बद्दल ग्रामीण साहित्यातला अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा कोपरगावचा सन २००९ सालचा उत्कृष्ट ग्रामीण काव्यसंग्रहाबद्दल दिला जाणारा भी. ग. रोहमारे पुरस्कारा सह इतर अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

मुरहारी कराड यांचा जन्मच मराठवाड्यातील मातीत असल्याने खेड्यापाड्यातील वास्तव चित्रण त्यांच्या कवितेतून दिसते. दुष्काळाच्या खाईत होरपळणाऱ्या मराठवाड्याला कोरड्या दिवसात कोणी वाली नाहीकी, कोणी कैवारी नाही. अशावेळी हवालदिल झालेला शेतकरी जगणं सोडून

गळफास जवळ करतो. ही वेदना कवीला असाह्य होते; आणि कवी आपल्या पहिल्याच कवितेत जगद्नियंत्याकडे त्यांची व्यथा मांडताना लिहितो –

पांडुरंगा, भक्ततुझे ढसाढसा रडत आहेत
रडणंच नाही देवा, फासावरही चढत आहेत

कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटांच्या दुष्टचक्रात कायम भरडलेला शेतकरी हवालदिल होऊन नागवला जातो; आणि नाईलाजास्तव आपली जीवनयात्रा संपवतो. आयुष्याला गळफासाचा पूर्णविराम दिला म्हणून दुःख संपत नाहीत; आणि प्रश्नही मिटत नाहीत. तेच दुःख आणि तेच प्रश्न नव्या समस्या घेऊन शाळा शिकून कामन मिळालेल्या बिनबापाच्या पोरासमोर खदखदत उभे राहतात. त्या संकटाशी लढलो म्हणून आज आपण जिवंत आहोत हा जीवघेणा अनुभव कवी आपल्या माईला सांगताना लिहितो –

शिणकरी सारे माझे, गाव सोडून गेले माय
घुटमळत वेशी मधे, खूप रडून गेले माय
पिकत नाही पीक पाणी, करतील तरी काय ?
नापीक झाले रान शेतं, वाडे झडून गेले माय

दुष्काळात रानात पीक नाही, घरात धान्य नाही, खायला अन्न नाही, हाताला काम नाही. अशावेळी जगण्यासाठी गावशीव सोडून जाताना, गावाशी निरोप घेताना, कवीचे समदुःखी, शिकलेली पोरं वेशी जवळ घुटमळतात. कारण या गावाशी त्यांची नाळ जुळलेली आहे. ज्या मातीत खेळलो, मळलो, अंगाखांद्यावर घेऊन जी माती रानभर हुंदडलोती भोयमाती सोडताना पाय वेशीत का म्हणून घुटमळणार नाहीत? पण गाव सोडलं नसतं तर जीवन जगता आलं नसतंहा अनुभव डोळ्यातून गावचा दुरावा सांडून कवी आपल्या माईसमोर मांडतो.

पूर्वीच्याकाळी धो धो पाऊस पडायचा. गावात दया होती, माया होती. संकटात सापडलेल्या माणसाच्या मदतीला गाव धावून यायचा. मात्र काळ बदलला तसेऋतूही बदलले. श्रावण संपत आला तरी पाऊस काही पडत नाही. भर श्रावणातच रानाचा वैशाख होतो. तेव्हा जगण्यासाठी गाव सोडताना माणसाच्या जत्रेत माणुसकी, माणूसपण हरवल्याचं कवीला जाणवत

राहतं.माणसं निष्ठुर आणि क्रूर बनत आहेत. ज्यांच्यावर विश्वास ठेवावा तेच आता विश्वासघात करत आहेत. हे चित्र मांडताना कवी लिहितो –

हातातील हात सारे
चटकता हेत जाग जागी
कळप सोडून माणसं
भटकता हेत जाग जागी

किंवा

शोषीत चाला किती ही माणसाला माणूस
पेरी त चाला काटेवाटेवरती माणूस
झाली दुषित बुध्दी विकारी अन्वासना
माय बहिणीशी जाळीत चाला हसत माणूस
जगावं कसंरे या युध्दांच्या दिवसात
आपला शत्रू आता झाला आपला माणूस

गावाचं गावपण हरवून गाव आता धगधगते अग्निकुंड बनले आहे. कोणी कैवारी नाही, वाली नाही. गावातलं कोणी मेलं - गेलं तर साधं कुत्रंही रडत नाही. याची खंत कवीला जागोजागी ठणकत राहते. सुशिक्षित बेकारांचं अंधारमय आयुष्य कोण प्रकाशमय करील? याची शाश्वती नाही. त्यांचं भविष्य उजाड आणि उद्ध्वस्त झालं आहे. हे विदारक वास्तव पानोपानी जाणवतं. शिकल्या पोरांची अवस्था मांडताना कवी लिहितो –

आता शाळा शिकल्या पोरांची
लय कंडीशन बेकार झाल्याय
ऋतू कोणताही आला तरी
वांझोट्या झाडावणी -
धड फुल बी नाही, फळ बी नाही

असा हा सुशिक्षितांचा कळप आपलं दुःख मदिरेच्या ग्लासात रिचवत जातो. कोण्या दादाच्या, भाऊच्या, नेत्यांच्या मित्र मंडळाची शाखा उघडतो; आणि आयुष्य महामुर्खांच्या जयजयकारात संपवतो. असंहे खेड्यापाड्यातलं वास्तव डोळयात अंजन घालण्यासारखं आहे. कुठे दारिद्र्याच्या असहाय्यतेचा आधार घेत माळावर गवऱ्या धुंडाळणाऱ्या नेणत्या पोरींना वयात आणणारे तांडे, कुंकू जळालेल्या बायांच्या शिकारीसाठी लावलेले फास, काजव्यांच्या चमचम रात्रीत कुठेतरी जात्यावरच्या ओवीसह घुबडांचे घुमणेआणि थोड्याशा

आमिषाने अशा काळरात्री रंगीन करणारे वासनांध नाराधम. वावरात हाडाची काडं करून हडकुळं झालेलं शरीर सडवूनहाडं पेरणारी माणसं हे सारं भयान जगकवीने अगदी जवळून पाहिलं, अनुभवलं आणि मांडलंही.

राबणे आणिराबत राहणे हाच इथल्या माणसांचा धर्म. राबता राबता मातीमध्ये माती होऊन जाणे एवढंच काय ते यांनाठावूक. ही माणसं भोळी आहेत. दारिद्र्यानंनागवली आहेत. सालभर रक्ताचं पाणी करून सुद्धापदरात सुख नाही, पैसा-अडका नाही. इतकंच काय विष पिऊन मरावं म्हटलं तरी विष घ्यायला सुद्धा पैसा नाही. ही माणसं तशी मेलेलीच. फक्त मरता येत नाही म्हणूनच काय ती जगणारी; आणि कायम तंगीत रुतलेली.ही त्यांची दयनियता मांडताना कवी लिहितो –

फाटून गेला जोडा तरी
नवा नाही बांधला
तंगी लयी हाताशी
जोडाना ही सांधला

नवाच काय पण जुनासुद्धा जोडा सांधण्यासाठी पैसा नाही; म्हणून स्वतःच्याच जीवाची पर्वा न करता आपल्या भोंगळया पायांना पळस पानं बांधतो. हे इथलं दुःख आहे. हे दुःख ठिकठिकाणी प्रकट होत राहतं.कवीने इथे आपल्या बापाची करुण अवस्था रेखाटली आहे. ही एकट्या कवींच्या बापाची अवस्था नसून; प्रत्येक कुणबी जणांची अवस्था आहे. म्हणजे कवींचा बाप एकूण शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करताना दिसतो. सालगड्यासारखं राबत राहणं हेच इथल्या माणसांचं सूत्र आहे. दुष्काळात केकतीचा ठेचा खाऊन दिवस काढणारी ही माणसे आहेत. उन्हाचेवळ अंगावर उठले, झडी पाण्यानं झोडपलं, तरी जीवाची तगमग ते मुकाट सहन करतील; पण आपली व्यथा कुणा समोर मांडणार नाहीत. पायातल्या खुरपाच्या डागण्या सोसीत – सोसीत मरेपर्यंत तसेच झिजत राहतील. असंजगणंच अंगवळणी पडलेली ही माणसं कवींनी टिपलेली आहेत. त्यांच्या कितीतरी कविता बाप आणि शिवार यांचं नातं सांगून जातात.

वैशाखाचं ऊन सरतं, ज्येष्ठ अवतरतो, आभाळ मातीत उतरतं; तेव्हा मात्र कुणबी सुखावून जातो. पुन्हा ऐनवेळी पाऊस दडी मारतो; आणि शिवाराकडे

फिरकतच नाही. पेरलेलं जागीच करपून जातं. तेव्हा मात्र डोळाभरून डोलणाऱ्या कणसाचं स्वप्न पाहणाऱ्या कुणबी आशा आसवात मरून जातातहे चित्र मांडताना कवी लिहितो –

पेर झाली वावराची, माती वलहाड कली
वली किचकाळी माय, उलाघेत तडक ली
मेला कोंभ माती मधी, आलाना ही मातीवर
संकटांचा डोंगर उभा, कुणब्याच्या जातीवर
पेरा उगवत्या सऱ्या, चेटकर पूनी गेल्या
शिणलेल्या डोळया मंधी, आशा आसवात मेल्या

दिशाहीन पावसामुळे शेतकऱ्यांची उडालेली तारांबळ, ओढाताण; आणि त्यामुळे धायकुतीला आलेला कुणबीयांचे प्रत्ययकारी चित्रणत्यांची कविता साकारताना दिसते.

गझलेमुळे काव्यसंग्रहाची कळा थोडीशी बदललेली जाणवते. तरीही हा काव्यप्रकार कवीने चांगला हाताळलेला दिसतो. पूर्वीसारखे दिवस आता राहिले नाहीत. माणूस माणसांपासून दुरावत चालला आहे.भाऊ बहिणीला अंतरतो आहे.याचीही खंत मांडताना कवी लिहितो –

दप्तर टाकून फिरायचे गेले ते दिवस
पाकोळीला धरायचे गेले ते दिवस
मुळ नाही बहिणीशी भाऊ सारे दुरावले
राखीसाठी झुरायचे गेले ते दिवस
भावआला खोट्याला माणसं धुर्त झाली
खऱ्यासाठी मरायचे गेले ते दिवस

खेड्याची ही अवकळा कळाहीन खेड्याचे चित्र उभे करते.शिकलेली पोरंहाताला काम नाही म्हणून गाव सोडून जात आहेत. या पोरांना मातीतला रानवारा नाकात भरविण्याचा सल्ला देणारा बापदुबार पेरणी करून सुद्धा वावर वापलं नाही; म्हणून स्वतःच्या पोटात इंडरेल पेरूनमरतो. अशा कितीतरी बापांच्या वेगवेगळया कथात्यांची कविता सांगत जाते.

मोडून पडलेल्या माणसांना कधी उभारीयेईल कुणास ठाऊक? पण आपण कधीतरी उभा राहू असा भरवसा त्यांना आहे.म्हणजेच कवी आशावादी आहे.

आजपर्यंत ग्रामीण साहित्यात कुठे शेतकऱ्यांच्या तोंडून फारशी संघर्षाची, विद्रोहाची भाषा आली नाही. ती भाषा 'हिसाळा' बोलतो हे त्याचे वेगळेपण सांगता येईल.

गरजला सभेत तो बेडर पणे
लढू आपण
बंदुक गोळया छातीवर जुलम्यांच्या
झाडू आपण

किंवा

हत्तीचे बळ अंगी, मुठी बांधल्या आहेत
डोळी मूर्ती मोर्च्याच्या, काही गोंदल्या आहेत

किंवा

शिकदिदी रावणांशी, फटके तुही ओढायला
डोळे फोडीत पाप्यांची, हात पाये तोडायला

किंवा

ताकत त्यांना आमची ही, दावायची आहे
जुलमी त्यांच्या घरांना, आग लावायची आहे

आज प्रत्येक खेड्यांची पडझड चालू आहे. गावात काम नाही, पाणी नाही, दया, माया नाही. उरात जिव्हाळा नाही.माणसांत माणूस नाही. गाव राजकारणाच्या प्रवेशामुळेजाती-धर्मात वाटला गेला आहे.नेते, पुढारी शोषण करत आहेत; म्हणून काय नुसत्या आत्महत्याच करायच्या काय? नाही, तर याजुलमी व्यवस्थेला बदलण्यासाठीसगळा भकासपणा, उदासपणा झिडकारूनप्रचंड संघर्ष करावा लागेल. यातूनच परिवर्तन होईल. हा आशावाद शेवटी कवी शेतकऱ्यांच्या मनात ठसविण्यात यशस्वी झाला आहे.

अस्मानी सुल्तानी संकटाच्या धाडीत
सगळाच झटकून भकास पणा
पुन्हा टोकरावी लागेल माती
जुलम्यांच्या होळ्या पेटवून
कोलती अन्काडीनं –
वाढावं लागणार आहे
पुन्हा आस्मानाच्या ओढीनं

एकूण काय तर मुरहारी कराड यांच्या कविताशेतीमातीतल्या आहेत. सरळ सोपी भाषा,अस्सल ग्रामीण मराठवाडी शब्दबोलींचा वापरहीहिसाळाची वैशिष्ट्ये सांगता येतील. ग्रामीण प्रतिमेमुळे त्यांच्या कवितेला गावरान गोडवा लाभला आहे. गाव, पाऊसपाणी, रानपाखरं, सुगी, दुष्काळ, शेतकरी,पीकं, नातीगोती, शिवार, बैल, झाडझुडपे, माती इत्यादी घटक त्यांच्या कवितेत येतात ते स्वभाविक आहे.

मातीच्यापोटी आपला जन्म होतो. भोईची लेकर पोटाशी धरून तीच आपला सांभाळ करते.अंगाखांद्यावर घेऊन कधी रानभर खेळविते. तर कधी पाण्यापायी वणवणपळविते. पण तिच्या पोटातली कळ काय आहे? माहीत नाही.तिच्या अंतःकरणातील हाच टाहो, हुंदका मुरहारी कराड यांनी 'हिसाळा'या आपल्या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहातून फोडलेला दिसतो.

संदर्भ-


१. कराड मुरहारी सोपान, 'हिसाळा', मुक्तरंग प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती, ५ सप्टेंबर २००९ .
२. डॉ. कृष्णा इंगोले (संपा.), ' ग्रामीण साहित्य आणि वास्तव' (डॉ. द. ता. भोसले गौरव ग्रंथ), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २०११.
३. डॉ. द. ता. भोसले, ' ग्रामीण साहित्य : एक चिंतन', मनोविकास प्रकाशन, पुणे,२००९.


***

# २००० नंतरची मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेच्या संदर्भात

**डॉ. गजानन अनंता देवकर**
मराठी विभाग प्रमुख, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी जि. नांदेड

**प्रस्तावना :**

मराठी काव्य परंपरेत बालकवितेची परंपरा ही सर्व परंपरेपेक्षा वेगळी भूमिका मांडणारी आहे. कारण बालकथा, बालकादंबरी, बालनाटक यापेक्षा 'बालकविता' हा बालवाङ्मयामधील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. बालकवितेत बालकांच्या विशाल मनाचा शोध असतो. बालकांवर संस्कार करण्याचे सामर्थ्य त्या कवितांमध्ये व्यक्त झालेले असते. बालकवितेत बालमनाचा शोध घेऊन बालमनाचे विविधांगी दर्शन घडविले जाते.बालकांची जडणघडण करण्याचे काम बालकवितेने केलेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात २००० नंतरच्या मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेच्या संदर्भात विवेचन केलेले आहे.

बालकविता म्हणजे मुलांनी लिहिलेल्या कवितेला बालकविता असे म्हटले परंतु फक्त मुलांनीच लिहिलेल्या कवितेला बालकविता म्हणता येत नाही, तर प्रोढांनी लिहिलेल्या कवितेलाही बालकविता म्हणता येते. म्हणजेच ती कविता एकतर मुलांसाठी असली पाहिजे, मुलांवर लिहिलेली असली पाहिजे किंवा मुलांना उद्देशून लिहलेली असते.

**२००० नंतरच्या मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेच्या संदर्भात विवेचन :**

मराठवाडा हा प्रादेशिक भाग विविधतेने नटलेला आहे.साहित्याच्या निमिर्तीच्या प्रांतात मराठवाड्याचे भरीव योगदान आहे.मराठवाड्याला बालसाहित्याच्या क्षेत्रात भरीव असे योगदान देणारे साहित्यिक लाभलेले आहेत ज्यांनी बालकवितेचे दालन समृद्ध केलेले आहे. त्र्यंबक वसेकर, सुभाष वसेकर, सुरेश सावंत, महावीर जोंधळे, श्री. के. एस. देशमुख, सौ. सरिता वैद्य, श. ल. नाईक, बाबुराव शिंदे, विनय अपसिंगकर, केशव बा.वसेकर, माधव चुकेवाड, दासू वैद्य, शेषराव जाधव, गणपत व्यास, इंद्रजित भालेराव, दत्ता बेदरकर, सय्यद अल्लाउद्दीन, सुहासिनी इर्लेकर, अतुल कुलकर्णी, भगवान अंजनीकर, हंसराज वैद्य, अरूण वि. देशपांडे, श्रीराम गुंदेकर, उद्धव भयवाळ, धोंडीरामसिंह राजपूत, प्रभाकर महाजन, प्रकाश अंभोरे, लीला शिंदे, शंकर बोईनवाड, प्रभाकर साळेगावकर, स्मृती देशपांडे, रविचंद्र हडसनकर, अशोक कुरूडे, देवीदास फुलारी, बबन शिंदे, सुरेश धनगर, रमेश चिल्ले, निवृती लिंबराज शिंदे सुगावकर, सौ. सुधा नरवाडकर, रामचंद्र पंढरीनाथ पांचाळ, तुकाराम तेलंग, माया तळणकर, ज्ञानदेव भंडे, वीरभद्र मिरेवाड, संजय बोधणे, पु. ना. बारडकर, मीना जयंत कुलकर्णी, सुमित्रा जोशी, वसंत कुंभोजकर, प्र. द. जोशी, ललिता शिंदे, वा.ल. श्रीमंगले, मीना खोंड, विवेक जोशी, श्री. दि. इनामदार, सुवर्णा ढोबळे, धुंडिराज जोशी, प्रकाश कामतीकर आदि कवींनी बालकवितेच्या प्रांतात मौलिक कामगीरी बजावलेली आहे.

**सुभाष वसेकर -**

सुभाष वसेकर यांचे 'पऱ्यांची शाळा', 'मोगऱ्याची फुले', 'गाण्यांचे गांव', हे कवितासंग्रह प्रकाशित झालेली आहेत. त्यांच्या 'मोगऱ्याची फुले ' या काव्यसंग्रहाला मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचा पहिला साहित्य पुरस्कार प्राप्त आहे. त्यांनी दीर्घकाळ काव्यलेखन केलेले आहे. बालमनातील विविधभाव त्यांच्या बालकवितेतून व्यक्त झालेले आहेत.

**" पेडगावचे दीड शहाणे**
**जगावेगळे त्यांचे वागणे,**
**उन्हाळयात घालून गरम कोट**
**घामाने होतात मात्र हेच चिंब!"[१]**

कवी सुभाष वसेकर यांनी आपल्या कवितांतून बालमनांतील वैचित्र्यापणाचा आढावा घेतलेला आहे.बालकांना अफलातून जगाविषयी खूप आकर्षण असते ते कवितेच्या माध्यमाने साकारलेले आहे.

**देवीदास फुलारी -**

देवीदास फुलारी हे प्रसिद्ध कवी आहेत. 'फुलपाखरांचा गाव' हा त्यांचा बालकवितासंग्रह प्रसिद्ध आहे. या संग्रहात बालकांचे मनोविश्व समर्पकपणे रेखाटले आहे.

**"गावात फुलपाखराच्या**
**शाळा अभिनव भरते,**
**गंधाची उधळण आणि**
**रंगाचे रांजन सरते....."[२]**

**रमेश चिल्ले -**

रमेश चिल्ले यांचे ' एक तळं- नामा निराळं,' 'फुगा गेला फुटून' ही बालकवितासंग्रह प्रकाशित असून, बालसाहित्य मराठवाड्याचे : नवे स्वरूप - नव्या वाटा हा समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांच्या कविता बालकांना निर्भेळ आनंद देतात.

**"फुगा फुगला वाऱ्याच्या वेगात,**
**उडत गेला निळया निळया ढगात,**
**ढगात होती लाल परी,**
**तिने धरली फुग्याची दोरी,**
**फुग्याची झाली ढगाशी टक्कर,**
**पाहून खाली आली चक्कर,**
**ढासळली ढगांची ... उतरंडी,**
**जिथे झाली घसरगुंडी,**
**ढग गेले आडून फुगा गेला फुटून"[३]**

**सुरेश सावंत -**

कवी सुरेश सावंत हे आघाडीचे काव्यलेखन करणारे कवी होत. बालकांच्या जीवनात आजी - आजोबाचे विश्व अमूल्य स्वरूपाचे असते. आजीआजोबा आपल्या नातवांना

खेळविण्यासाठी खूप भावूक असतात. पण बालके आजीआजोबाकडे जात नाहीत. तेव्हा आजीआजोबा त्यांना बळेच खेळावयास घेऊन जातात. याचे दर्शन वरील कवितेतून घडले आहे.

**" पोपट भाऊ पोपट भाऊ**
**दोघे मिळून पेरू खाऊ**
**माझ्या अंगणात पेरूचे झाड**
**पिकले पिकले पेरू काढ "[४]**

बालकांच्या जीवनात पशू- पक्ष्यांनाही खूप खूप महत्त्व असते हे कवी सुरेश सावंत यांच्या कवितेतून दिसून येते. पोपट हा बालकांचा खूप जिव्हाळ्याचा मित्र असतो. पोपटाला भाऊ समजून बालके त्यांच्याशी संवाद साधतात याचे सुंदर नाते वरील कवितेते रेखाटले आहे.

**"स्वप्नात पाहिला मी**
**असा एक गांव**
**आठवत नाही आता**
**त्या गावचे नांव"[५]**

**माधव चुकेवाड -**

कवी माधव चुकेवाड यांनी शिशूचे मनोदर्शन शिशुगीतांतून घडविले असते. या गीतात निरर्थक शब्द योजना असते, गेयता आणि तालाला व प्रगटीकरणाला खूप महत्त्व असते. शिशुच्या मानसिकतेचे भावनांचे दर्शन पुढील गीतातून आढळते.

**" गोड गोड खाऊ**
**आणतो कोण ?**
**माझेच पप्पा**
**आणखी कोण ?**
**रोज रोज खोड्या**
**करतो कोण ?**
**ताई अन दादा**
**आणखी कोण ?[६]**

बालकाच्या मनाचा वेध घेणारी कविता कवी माधव चुकेवाड यांनी लिहिल्या आहेत. सूर,ताल आणि लय याची सांगड या गीतात घातलेली आढळते. त्याचप्रमाणे आणखी एक कवितेत बालकाचे बालपण रेखाटलेले आहे.

**डॉ. विनय अपसिंगकर -**

बालकवितेत बालमन समजून लेखन करणारे कवी म्हणून डॉ.विनय अपसिंगकर यांचे नाव घेतले जाते. त्यांच्या कवितेत बालभावनेला प्राधान्य देण्यात आलेले आहे. शब्दांच्या माध्यमातून बालकाचे मने जिंकून घेतलेली आहेत.

**"मोरा मोरा**
**थांब जरा**
**डोक्यावरचा**

**डोलव तुरा"**[७]

**तुकाराम तेलंगे -**

बालभावनांना पकडलेले आढळते. मांजर तर बालकांच्या विश्वातील आवडता प्राणी, मांजरासोबत खेळणे बालकांना आवडतेच मांजर कशी दूध पिते याचे वर्णन कवींनी पुढीलप्रमाणे केलेले आहे.

**" एक होती**
**मनी माऊ**
**रोज लागली**
**दूध पिऊ "**[८]

कवी तुकाराम तेलंगे यांनी आपल्या गीतात सहज सोपी शब्द वापरलेली आहे. हे स्पष्ट होते.

**बबन शिंदे -**

कवी बबन शिंदे यांची उत्तम अभिनय गीते आहेत. त्यांनी आपल्या अभिनयगीतात प्राणी विश्वाला खूप महत्त्व दिले आहे. प्राणिविश्व हे बालविश्व कसे एकरूप होऊन जाते याचे चित्रण केलेले आहे.

**"वाघोबा वाघोबा**
**थांबलात का**
**जंगलात धावून**
**दमलात र्क्ङि "**[९]

**सुरेश धनगर -**

कवी सुरेश धनगर यांनी आपल्या कवितेतून जत्रे चित्रण केलेले बघावयास मिळते. बालकांना जत्राही खूप आवडते. जत्रेतल्या कांही वस्तू हव्याहव्याशा वाटतात, आपल्या आईवडिलांनी त्या विकत घेऊन दिल्या पाहिजेत असे वाटते.

**"चला चला जाऊ**
**जत्रा पाहू**
**आईला मागू**
**बाहूली आणि खाऊ"**[१०]

**विलास सिंदगीकर -**

कवी विलास सिंदगीकर यांच्या बालकवितेत बालमनाचे सुक्ष्म निरीक्षण आलेले आहे. शाळा हा बालकाचा जिव्हाळ्याचा विषय. शाळा म्हणजे बालकाचे आवडीचे स्थळ होय. शाळेतल्या बागेत व मैदानावर मुलांना खेळणे आवडते. त्याचे सुंदर चित्र कवी विलास सिंदगीकर रेखाटले आहे.

**"शाळेत बाग**
**बागेत फुले**
**वारा खेळे**
**झाड डोले**
**शाळेत मुले**

**खेळती झुले "[११]**

**केशव बा.वसेकर -**

कवी केशव बा.वसेकर यांच्या कवितेत बालकांना आवडणाऱ्या ऋतूचे दर्शन घडविले आहे.' हिरवा ऋतू', या संग्रहात बालकांना आवडणारा पाऊस शब्दबद्ध केलेला आहे. बालसुलभ भावनांचे निर्मळ दर्शन त्यांनी या गीतातून केलेले बघावयास मिळते.

**" पावसाळा म्हणजे हिरवा ऋतू**
**हिरवा रंग जातो उतू**
**जिकडे तिकडे हिरवे ओघळ**
**चला करू या त्याने आंघोळ"[१२]**

**अशोक कुरुडे -**

कवी अशोक कुरुडे यांच्या कवितेत आजोळा विषयीचे बालकाचे असणारे आकर्षण रेखाटलेले आहे. मामाचे गांव बालकाचे आवडते स्थळ. मामाच्या गावाला जाताना वेगळाच अनुभव बालकाच्या भावनेतून प्रकट केलेला आहे. मामाच्या गावाला गेल्यानंतर मज्जाच मज्जा व आनंद मिळतो ही बालकाची धारणा असते. आजी - आजोबांचे लाडही खूप महत्त्वाचे असतात. मामाच्या शेती शिवारातही बालमन स्पर्श करून जाते.

**" मामाच्या मळयात फुलेच फुले**
**सुगंध सुटता, कळी माझे खुले**
**मामाच्या मळयात फळेच फळे**
**मेवा चाखता आनंद मिळे "[१३]**

बालकाला मामाच्या शेती शिवाराचा खूप लळा असतो. शेती शिवारातील रानमेवा खाताना बालके अतिशय आनंदी समाधान होऊन जातात. असे स्पष्ट होते.

**भगवान अंजनीकर -**

कवी भगवान अंजनीकर यांचे १०० पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशीत आहेत ही त्यांची साहित्य निर्मिती मधील मोलाचे योगदान त्यांनी आपल्या कवितेतून आई- बालकाचे प्रेमस्वरूप रेखाटले आहे. आईला आपले मूल आपल्या जवळच राहावेसे वाटते. इतरत्र ते जावू नये असे आईला वाटते. आपलं मुल डोळ्या आड गेले की, आई सैरभैर होऊन जाते. याचे चित्रण करण्यात आलेले आहे. बालकाला सुद्धा आपली आई बाजूला जाऊ नये असे वाटत असते. आई बाजूला गेली किंवा कामानिमित्त सोडून केली की बाळही रडायला लागते. याचे मार्मिक चित्रण पुढील प्रमाणे,

**"अशी आई माझी**
**फुलासम जपते**
**डोळया आड होताचं**
**सैरभैर होते "[१४]**

बालकांच्या आयुष्यात आईचे महत्त्वपूर्ण स्थान असते. परंतु आईचे अकाली जाण्याने बालकाला घरंच सुनेसुने वाटते. बालकाच्या आयुष्यात उतरती कळा लागते. आईच्या विरहाचे चित्रण कवी हंसराज वैद्य यांनी केलेली आहे. आई या विश्वातून निघून गेल्यामुळे बालमन कोमेजून जाते. बालकाच्या दु:खाला पारावार राहत नाही. बालकाचे मन लागत

नाही. बालकाला आपल्या आईची उणीव भासते. आई शोधूनही सापडत नाही. म्हणून बालकाचा जीव टांगणीला ठेवल्यासारखा होऊन जातो.

**संजय बोधने -**

घरात हसरे वातावरण असावे असा संदेश कवी संजय बोधने बालकवितेतून मिळतो. घरात आनंदाचे वातावरण असावे या करिता कवी आपल्या लेखनातून सुचवत असतो. बालकवितेत या तत्त्वाला प्रधान देण्यात आलेले असते. वडील रागीट आणि आई प्रेमळ अशा दोन्ही गोष्टी बाल कवितेतून साकारलेल्या आढळतात. कवी संजय बोधने या संदर्भात चित्रण केलेले आहे.

**"अशी आमची दीदी**
**हसत राहते किती किती**
**असा आमचा दादा**
**खेळत असतो सदा.**
**असे आमचे बाबा**
**चुकलं की भरतात रागा**
**अशी आमची आई "[१५]**

प्रेमाची प्रेमळाई प्रस्तुत कवितेतून असे स्पष्ट होते की, मुलगी सदाही हसत असते तर मुलगा सदाही खेळच खेळत असतो. चुकले तर वडील रागावतात आणि आई प्रेमाचा वर्षाव करत असते असे प्रतिपादन केलेले आढळते.

**दासू वैद्य -**

बालकवितेत समर्पक शब्दकळा फुलवून बालकविता कवी दासू वैद्य यांनी लिहिलेली आहेत. आकाशात टपोरं चांदण पडावं आणि अचानक आभाळ काळभोर होऊन पाऊसधारा कोसळतात, ही निसर्गाची किमया होय. निळे आभाळ काळे होऊन पाऊसधारा कोसळू लागतात असे वर्णन कवी दासू वैद्य यांनी केलेले आहे." चंद्र चांदण्या आणि देखण्या

**आभाळी या लुकलुकती**
**नभ निळे होई काळे**
**पाऊस धारा कोसळती "[१६]**

**लीला शिंदे -**

पाऊस पडतांना पावसाचा आनंद लुटला पाहिजे. पाऊस पडतांना डोंगरावर जाऊन पावसाची मज्जा लुटावी व डोंगरासारखे ओलेचिंब भिजून आनंदी गाणे गावे असे पावसाचे रूप कवयित्री लीला शिंदे यांनी प्रकट केलेले आहे.

**"पाऊस पडू लागला की**
**दूर डोंगरावर जायचं असत**
**डोंगरासारखं चिंब भिजून**
**हिरवं गाण गायच असतं "[१७]**

असे बालकवितेत पावसाचे अनोखे रूप बघावयास मिळते.

**सय्यद अल्लाउद्दीन -**

कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी असे प्रतिपादन केले आहे की, पाऊस म्हणजे दुसरे तिसरे काही नसून जणू काय आभाळाला पाय फुटल्यासारखे, पावसामुळे ओले रान होऊन जणू काय रानभर हिरवी साय पसरल्याचे जानवते.त्यांनी निसर्गाचे अप्रतिम रुप रेखाटेले बघावयास मिळते.

**"पाऊस म्हणजे दुसरं काय ?**
**आभाळाला फुटले पाय**
**पाऊस म्हणजे दुसरं काय**
**ओले रान अन हिरवी साय "[१८]**

**प्रभाकर साळेगावकर -**

कवी प्रभाकर साळेगावकर यांनी आपल्या कवितेत राष्ट्रभावना प्रकट केलेली आढळते. प्रभाकर साळेगावकर यांच्या कवितेत राष्ट्रभावना ओतप्रोत भरून वाहातांना आढळते. त्यांच्या कवितेत राष्ट्रभावनेला खूप महत्त्व देण्यात आले आहे. जसे -

**"तूच आमची शान आणि तूच आमुचा मान रे**
**तूच अस्मिताही आणि तूच आमचा प्राण रे**
**आठवण ठेवून इतिहासाची**
**तुला सलामी नव्या युगाची**
**जोवर आहे चंद्र सूर्य तोवर गाऊ गान रे "[१९]**

प्रस्तुत कवितेतून असे प्रतिपादन केले आहे की, राष्ट्रध्वज आपला भारतवासीयांचा शान आणि मान आहे आणि राष्ट्रध्वज आपला प्राण असल्याचे प्रकट केलेले आहे. राष्ट्रध्वज आपली अस्मिता असल्याचे सांगितले आहे.

**स्मृती देशपांडे -**

कवयित्री स्मृती देशपांडे यांनी आपल्या कवितेतून बालकाच्या मनात असणारी राष्ट्रभावना अधोरेखित केलेली आहे. बालकाला असे वाटते की, आपला हा खूप देश महत्त्वपूर्ण आहे. आपल्या देशाची वेगळीच शान आहे. आपल्या देशामध्ये शेती व वैज्ञानिक क्रांती करून देशाला अग्रेसर करण्याची भूमिका प्रकट झालेली आहे. " देश माझा खास, त्याची वेगळीच शान

**विचार त्याचा करताच, होते ताठ मान**
**शेतीच्या बरोबरीने, विज्ञानातही पुढे**
**जगाच्या शर्यतीत, आम्ही आता खडे "[२०]**

**समारोप :**

मराठवाड्यातील बालकविता आशयाच्या दृष्टिने खूप महत्वपूर्ण आहे. मराठवाड्यातील बालकवितेत बालकवितेचे सर्व प्रकार साकारलेले आहेत. बालपणाचे सर्वपैलू, निसर्ग, पर्यावरण, बंधुभाव, प्रेम, समानता प्रकट झालेले बघावयास मिळते. बालकविता समृद्ध करण्यात मराठवाड्यातील कवींचे कार्य मौलिक स्वरुपाचे आहे. म्हणून

२००० नंतरच्या मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेने वेगळेपण प्रकट केलेले दिसून येते.

**संदर्भसूची :**


१. वसेकर सुभाष - गाण्यांचे गाव , साकेत प्रकाशन प्रा.लि.औरंगाबाद, पहिली आवृती - २००६ , पृष्ठ. १२
२. फुलारी देवीदास - फुलपाखराचा गाव, शिव पब्लिकेशन, पुणे, पहिली आवृती - २१ ऑक्टोबर २००६, पृष्ठ .०५
३. चिल्ले रमेश - फुगा गेला फुटून, शब्दवेल प्रकाशन, लातूर,प्रथम आवृती - ७ जुलै २००७,पृष्ठ.५
४. सावंत सुरेश - काठीचा घोडा, निर्मल प्रकाशन ,नांदेड, प्रथमावृत्ती - १ जानेवारी २००१, पृष्ठ.३०
५. उपरोक्त, पृष्ठ. १६
६. चुकेवाड माधव - आवतीभोवती , शिव पब्लिकेशन ,पुणे , प्रथमावृत्ती - १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ .०५
७. अपसिंगकर विनय - ढगांची शाळा, रजत प्रकाशन, औरंगबाद,प्रथमावृत्ती - ११ जानेवारी २०१० पृष्ठ.०७
८. तेलंगे तुकाराम - गंमडगाणी , मन्याड प्रकाशन, मानखेड ता.अहमदपूर, जि.लातूर ,प्रथमावृत्ती - १६ मार्च २०१०, पृष्ठ. ०६
९. शिंदे बबन - एकोपा , इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती मार्च - २००६ , पृष्ठ .१३
१०. धनगर सुरेश - घुंगरवाडी , साकेत प्रकाशन प्रा.लि.औरंगाबाद, पहिली आवृत्ती -२००१, पृष्ठ .२३
११. सिंदगीकर विलास - ढगा ढगा धाव रे, इसाप प्रकाशन, नांदेड , प्रथमावृत्ती - मार्च २००९,पृष्ठ .२८
१२. वसेकर केशव बा.- हिरवा ऋतू, प्रतिभास प्रकाशन ,परभणी , प्रथमावृत्ती - फेब्रुवारी २०१०,पृष्ठ .३५
१३. कुरुडे अशोक - आपण सारे एक, ओंकार प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती - जानेवारी २०१३, पृष्ठ .०५
१४. डॉ.अंजनीकर भगवान - बाहूलीचा वाढदिवस , निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती - नोव्हेंबर २००८,पृष्ठ.१८
१५. बोधणे संजय - गंमत अशी व्हावी, इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती - ३० मार्च २००६, पृष्ठ .११
१६. वैद्य दासू - क कवितेचा - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती - २००९
१७. शिंदे लीला - आनंदाचे गाव, प्रतिभास प्रकाशन, परभणी , प्रथम आवृत्ती - फेब्रुवारी २००६,पृष्ठ .२६
१८. स.अल्लाऊद्दीन - बबलू - छबलू ,इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती - फेब्रुवारी २००६, पृष्ठ.०६
१९. साळेगावकर प्रभाकर - तूच आमुची शान, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती - १७ सप्टेंबर २००८,पृष्ठ .०९
२०. देशपांडे स्मृती - चिवचिव, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती - जानेवारी २०१०,पृष्ठ .२८


***

# मेलं नाही अजून आभाळ : शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देणारी प्रेरक कविता


## डॉ. विजयकुमार शिवदास ढोले

**मराठी विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय चापोली, ता, चाकूर जिल्हा,लातूर**


कवी बालाजी मदन इंगळे हे मराठवाड्यातील २००० नंतरचे लोकप्रिय ग्रामीण कवी व कादंबरीकार आहेत. त्यांचा जन्म इ. स. १९७५ साली उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा या गावी झाला आहे. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारी त्यांची कविता जीवनाचा समृद्ध प्रेरणादायी आलेख स्पष्ट करणारी आहे कवी बालाजी मदन इंगळे यांनी 'मातरं', 'मेलं नाही अजून आभाळ', 'या परावलंबी दिवसात' इत्यादी तीन महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह लिहिले आहेत. 'स्पंदन' हा संपादित ग्रंथ प्रसिद्ध आहे. तसेच 'झिम पोरी झिम' ही खूप लोकप्रिय व गाजलेली कादंबरी त्यांची प्रसिद्ध आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी व ग्रामीण स्त्रियांचे सर्वकश असे वास्तव व संवेदनशीलपणे चित्रण करणारे एकविसाव्या शतकातील मराठवाड्यातील लोकप्रिय कवी म्हणून कवी बालाजी मदन इंगळे प्रसिद्ध आहेत.

आपल्या देशात शेती, शेतकरी, निसर्ग व ग्रामीण जीवन याला खूप महत्त्व आहे. भारत हा खेड्यांचा व कृषिप्रधान देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था खूप प्रमाणामध्ये कृषीमालावर अवलंबून आहे. आज देशाची लोकसंख्या वाढली तशी शेती कमी झाली आहे.त्यात शेतकरी राबराब राबून त्याला निसर्ग साथ देत नाही. सावकार कर्जाचा तगादा लावून शेतकऱ्यांना स्वस्थ बसू देत नाही. सरकार मालाला योग्य भाव देत नाही. जगाचा पोशिंदा माझा शेतकरी कष्ट करून अनवाणी पायाने शेतात उन्हातानात अहोरात्र राबताना दिसतो.आजही व्यापारी, दलाल, सावकार व सरकारांकडून शेतकऱ्यांचे शोषण होताना दिसते. मुलीच्या लग्नाचा विचार करून त्याचा जीव चेंदामेंदा होतो. तसेच मुलाच्या शिक्षणाचा विचार करून त्याच्या हृदयाची कालवाकालव होते. कुटुंबाचा आर्थिक गाडा चालविणे त्याला अशक्य होते तेव्हा तो आत्महत्येचा मार्ग नाइलाजानं स्विकारतो. शेतकऱ्याची आत्महत्या म्हणजे आपल्या देशातील खूप मोठी कृषी सांस्कृतीची हानी आहे. याची खंत मला वाटत आहे. एकविसाव्या शतकातील विज्ञान तंत्रज्ञानाच्या या जगात आपला देश महासत्ता व महागुरुच्या स्वप्नाला साकार करण्याच्या वाटचालीला

लागलेला आहे. पण या देशातील शेतकरी मात्र खूप आर्थिक अडचणीत अडकलेला व परेशान आसलेला पाहायला मिळतो. त्याला या अडचणीतून सोडवण्याचं काम सरकार,सामाजिक सुधारकांनी, कवी व साहित्यिकांनी केलं पाहिजे. याठिकाणी कवी बालाजी मदन इंगळे यांची "मेलं नाही अजून आभाळ" ही शेतकऱ्यांना जगण्याची प्रेरणा देणारी कविता आपण पाहणार आहोत. 'मेलं नाही अजून आभाळ' हा कवितासंग्रह बालाजी मदन इंगळे यांचा २०१० साली प्रकाशित झाला. त्यातील 'मेलं नाही अजून आभाळ' ही ग्रामीण कविता शेतकऱ्यांना जगण्याचं बळ देत असता देताना दिसते. जागतिकीकरणाच्या व अस्मानी-सुलतानीच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देते. त्यांना आत्महत्यापासून दूर करून जगण्याचा नवा मार्ग दाखवण्याचे काम बालाजी मदन इंगळे यांची 'मेलं नाही अजून आभाळ' ही कविता करते.

ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आजचा ग्रामीण कवी खूप संवेदनशील रुपाने करत आहे. त्यामुळे त्यांची कविता ग्रामीण माणसाच्या जीवनानुभवाचा अविभाज्य भाग बनलेली आहे. आज इंद्रजित भालेराव, जगदीश कदम, शंकर वाडेवाले, देविदास फुलारी, संजय जमदाडे, रमेश चिल्ले, महेश खरात, श्रीकांत देशमुख, विलास वैद्य, पी.विठ्ठल, केशव देशमुख, पृथ्वीराज तौर, मुकुंद राजपंखे, श्रीराम गव्हाणे व बालाजी मदन इंगळे इत्यादी अनेक कवी मराठवाड्यातून खूप दर्जेदार काव्यलेखन करताना दिसत आहेत. त्यांच्या कवितेतून ग्रामीण जीवनाचे सखोल व व्यापक आयाम खूप वास्तव पणे मांडलेले आहेत. आपणाला आज कवी बालाजी मदन इंगळे यांची 'मेलं नाही अजून आभाळ' ही कविता शेतकऱ्यांना जगण्याची ऊर्जा देण्याचे काम कशी करते ते पाहायचे आहे.

कवी बालाजी मदन इंगळे शेतीशी अतूट नाते असलेले मराठवाड्यातील महत्त्वपूर्ण ग्रामीण ग्रामीण कवी आहेत. त्यांची कविता मातीतून मानव घडताना दिसते. अशा या ग्राम संस्कृतीचे नाते असणारा कवी म्हणून बालाजी इंगळे यांची महाराष्ट्रात लोकप्रियता आहे. ग्रामीण कवितेला अर्थपूर्णता देणारी कविता या लेखात सदानंद देशमुख असे म्हणतात की, "कृषीजन संस्कृतीतून पुढे आलेली लेखक- कवींची पिढी आपल्या अनुभव विश्वाशी प्रामाणिक राहून लेखन करीत आहे. त्यामुळे आजचे ग्रामीण साहित्य एकूणच मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आले आहे"[1] सदानंद देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणेच अनुभव विश्वाशी प्रामाणिक राहून कृषिजन संस्कृतीचे वास्तव चित्रण कवी बालाजी मदन इंगळे यांनी आपल्या 'मेलं नाही अजून आभाळ' या कवितेत केलेलं

आपणास पाहावयास मिळते. ग्रामीण जीवनाचा महत्वपूर्ण कणा म्हणजे शेतकरी आहे. तो आज अस्मानी-सुलतानीच्या संकटात सापडलेला आहे. आपला देश कृषीप्रधान व खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. या देशाची अर्थव्यवस्थाही कृषी जीवनावर खूप आवलंबून आहे, तरीसुद्धा जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याकडे सरकारचे व निसर्गाचे लक्ष नाही. देशातील शेतकरी आज देशभर आपल्या हक्कासाठी लढताना, संघर्ष करताना पाहायला मिळतो. शेतकरी कायदा दुरुस्ती साठी आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत शेतकऱ्यांचे आंदोलन चालू आहे. त्याला न्याय मिळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या बाजूने सरकारने उभे राहणे गरजेचे आहे. आज आपल्या देशात व राज्यात शेतकऱ्यांच्या खूप आत्महत्या झालेल्या आहेत. शेतकऱ्यांचे दुःख, त्यांच्या वेदना कवी बालाजी मदन इंगळे आपल्या कवितेत संवेदनशील मनाने चित्रित करतात. शेतकऱ्यांना जगण्याची नवी ऊर्जा आपल्या कवितेतून देतात. कवी आपल्या कवितेत म्हणतात,

**"मेलं नाही अजून आभाळ बाप्पा**
**आत्ताच आशा सोडू नको**
**वांझ झाली नाही अजून माती बाप्पा**
**आत्ताच गाशा गुंडाळून नको"[2]**

आपल्या देशातील शेतकऱ्याच्या दारिद्र्याचे. दुःखाचे आणि कष्टाचे वास्तव चित्रण कवी आपल्या मराठवाडी बोलीतून वास्तव पणे करतो. आजचा शेतकरी सावकार, दलाल व निसर्गाच्या जाळयात अडकलेला आहे. निसर्ग साथ देत नाही वेळेवर पाऊस पडत नाही. शेतीत उत्पन्न होत नाही. मुलीच्या लग्नासाठी व लेकराच्या शिक्षणासाठी सावकाराकडून काढलेलं कर्ज फिटत नाही. तेव्हा या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी शेतकरी आपला आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो.प्राणप्रिय असणारी शेती कर्जाच्या बदलात सावकार हडप करण्याचा प्रयत्न करतो. कुटुंबाच्या आर्थिक गरजा जगाचा पोशिंदा भागू शकत नाही. जगाचे पोट भरणारा माझा शेतकरी स्वतः उपाशी राहतो. सरकारचे याकडे लक्ष नाही अशा वेळी जीवनाची आशा सोडून आत्महत्या म्हणजे गाशा गुंडाळण्याचा विचार हा शेतकरी करतो. त्यावेळी बालाजी मदन इंगळे संबंध देशातील शेतकऱ्यांना आपल्या कवितेच्या माध्यमातून माध्यमातून जगण्याची नवी ऊर्जा देतात. जगण्याचा आशावादी दृष्टिकोन देतात. अजून आभाळ मेलं नाही, माती वांझ झाली नाही. त्यामुळे माझ्या शेतकऱ्यांनी आशा सोडू नये. मरण्याचा मार्ग पत्करू नये .आभाळाकडे डोळे असलेल्या शेतकऱ्यांना बालाजी इंगळे

हा कवी आत्महत्या पासून दूर करण्याचा प्रयत्न करतो व जगण्याची नवी दृष्टी देतो.

शेतकऱ्याच्या संपन्नतेवर देशाची प्रगती अवलंबून आहे. शेतकरी ज्या संकटाचा अडकला आहे, त्यातून त्याला बाहेर काढले तर हा देश संपन्न होईल याचे वास्तव भान कवीला आहे. दारिद्र्यामध्ये जगणाऱ्या व कष्ट करूनही आपले आयुष्य संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना कवी या कवितेमध्ये मार्मिक संदेश देतात. कवी म्हणतात,

**"आज नाहीतर उद्या तुझ्या शिवारात उधाणेलही पिक**
**एक ना एक दिवस तू घालशील कुबेरालाही भीक**
**संपलं नाही अजून खेड्यातलं मातरं**
**आत्ताच मरणाची भाषा बोलू नको"[3]**

आत्महत्या किंवा मृत्यू हे जीवनातील सर्व समस्याच समाधानकारक उत्तर नाही. आर्थिक अडचण असेल या कोणतेही अस्मानी-सुलतानी संकट असेल यातून मार्गच काढला पाहिजे. आभाळ मेलं नाही म्हणजे कधी ना कधीतरी पाऊस पडणारच आहे. माती वांझ झाली नाही म्हणजे नक्कीच माती आज ना उद्या धान्याचा वर्षाव करणार आहे. मातीच्या खाली दडलेल्या गुप्त धनाचा साठा शेतकऱ्यांना आज ना उद्या नक्की सापडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी निराश होऊ नये. आहे त्या जीवन आनंद शोधून जगण्याची आशा धरावी.जीवन खूप अनमोल आहे. आज ना उद्या शिवारामध्ये पीक उधाणेल त्यावेळी श्रीमंत असणाऱ्या कुबेराला तुझ्याकडे भीक मागण्याची वेळ येईल. म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्याची या मरणाचीभाषा बोलू नये. जोपर्यंत खेळयातलं मातर शिल्लक आहे तोपर्यंत शेतकऱ्यांना चिंता करण्याची गरज नाही. जगणं खूप महत्वाचं आहे. साठवलेलं धनं जास्त काळ टिकत नाही पण मातीखाली असणार गुप्तधन आज ना उद्या नक्कीच शेतकऱ्याला दारिद्र्यातून वर काढेल याची आशा या कवीला आहे. कारण कवीचा या शेतकऱ्यांच्या कष्ट व प्रामाणिकपणावर खूप विश्वास आहे. डॉ. नानासाहेब सूर्यवंशी ग्रामीण जीवन व शेतकऱ्याबद्दल असे म्हणतात की, "संबंध ग्रामीण जीवन दरिद्री आहे. पावसाच्या खेळासारखे पिकावर अवलंबून असते. हातची पिके गेली, शेतमालाला योग्य भाव मिळाला नाही की, वेळेवर पाऊस नाही पडला की, कर्ज काढून विहीर खोदावी पण पाणी नाही लागले की, हुंडयाअभावी मुलीचे जमलेले लग्न मोडले की, ग्रामीण माणूस उद्ध्वस्त होत असतो. या उद्ध्वस्त जीवनाचे अनेक पैलू ग्रामीण साहित्यात चित्रित होत आहेत."[4] वरील म्हटल्याप्रमाणे आयुष्यभर राब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये

किती संकटे येतात? किती दुःख येतात? त्याच वेदनादायी चित्र व त्याच्या उध्वस्ततेचे चित्रण आपणाला अनेक साहित्यातून पाहायला मिळते. पण कवी बालाजी मदन इंगळे आपल्या 'मेलं नाही अजून आभाळ' या कवितेमध्ये शेतकऱ्यांना जगण्याचा धीर देतात.नवा आशावादी दृष्टिकोन देतात. पुढे कवी बालाजी मदन इंगळे असे म्हणतात की,

**"तुझ्या कोरड्या विहीरीला उद्या फुटतील धुमारे**
**तुझ्या हिरव्या नैवेद्यासाठी उपाशी बसतील देवही सारे**
**वाळली नाही अजून माळावरची बाभळ**
**आत्ताच काशा जमवू नको"[5]**

या ठिकाणी कवी शेतकऱ्यांचे जगणं महत्त्वाचं आहे, असा संदेश देतो. कारण आज ना उद्या परिस्थिती नक्कीच सुधारेल आणि कोरड्या विहीरीलाही धुमारे म्हणजे झरे फुटतील त्यावेळी शेतामध्ये पाणी पाणी होईल आणि सगळं शेत हिरव्यागार निसर्गसौंदर्याने बहरेलं,काळीमाता हिरव्यागार निसर्गसौंदर्याने व चैतन्याने नटलेली असेल. अजून माळावरची बाभळ वाळलीनाही म्हणजेच नक्कीच जमिनीमध्ये पाण्याचा अंश आहे. हे सर्व चक्र तुझ्या जीवनात चमत्काराने नाही तर निसर्गाच्या कृपेने व कष्टाने घडेल. कष्टावर व प्रामाणिकपणावर या देशाची नव्हे जगाचीच जीवन संपन्नता व प्रगल्भता अवलंबून आहे. त्यामुळे हे बाप्पा आत्ताच तू जग सोडून जाण्याची किंवा काशा गोळया करण्याची गडबड घाई करू नको हा मार्मिक संदेश कवी बालाजी मदन इंगळे या कवितेतून आपणाला देताना दिसतात. या कवितेमध्ये कवीच्या अनुभवाची व्यापकता वाढलेली आपणास दिसते. उमरगा सारख्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या पोटी जन्मलेला हा शेतकरी कवी मातीतून शेतकऱ्याचे जीवन घडवताना दिसतो.नक्कीच त्यांच्या कवितेतून देशीयतेचे व कृषीसंस्कृतीचे रूपवैभव पाहायला मिळते. या संदर्भामध्ये डॉ. वामन जाधव यांचे विचार या ठिकाणी पाहणे गरजेचे वाटते ते म्हणतात की, "१९७५ नंतरची मराठी ग्रामीण कविता शेतकऱ्यांच्या अनुभवातून, त्यांच्या अस्सल बोलीतून अवतरताना दिसते. ती कोणाचे अनुकरण करताना दिसत नाही. तिच्यामध्ये प्रखर देशीयता दिसते."[6] म्हणजे कवी बालाजी मदन इंगळे यांची कविता शेतकऱ्यांच्या अनुभवातून अस्सल उस्मानाबादी मराठवाडी बोलीतून आपली वेगळी छाप निर्माण करताना दिसते. तिच्यामध्ये ही प्रखर देशीयता आपल्याला पाहायला मिळते.

आज देशात व राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या खूप वाढलेल्या आहेत. हा आत्मचिंतनाचा विषय आहे. याबद्दल 'आत्महत्याग्रस्त

शेतकऱ्यांच्या टाहो' या लेखात श्रीनिवास कुलकर्णी असे म्हणतात की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही इथल्या संस्कृतीची आत्महत्या आहे. कुठल्याही साहित्यिकाला किंवा कवीला समकालीन वास्तवाचे भान ठेवावेच लागते"[7] हे भान कवी बालाजी मदन इंगळे यांनी ठेवलेले आहे असे या कवितेतून आपणाला पाहायला मिळते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही खरंच आपल्या देशाच्या संस्कृतीची आत्महत्या आहे. संस्कृतीची सर्व वैभवता ही शेतकरी व ग्रामीण जीवनावर आहधारलेली आहे. हा शेतकरी उद्ध्वस्त झाला तर देशातील संस्कृती संपेल. म्हणून जगाच्या पोशिंद्याला तआज सर्वांनी आधार देणे गरजेचे आहे. सरकारने त्यांना आर्थिक अडचणीतून वर काढणे गरजेचे आहे. त्यांना जगवणं व जगण्याची महत्वपूर्ण प्रेरणा कवी बालाजी मदन इंगळे आपल्या कवितेतून संपूर्ण शेतकऱ्यांना देत असताना आपल्याला पाहायला मिळते.पुढे कवी असे म्हणतात की,

**"हर मोसमात खंडीखंडीनं तुझ्या घरी रास येऊन पडेल**
**लांब उभारून बघत तुझ्यावर दुनिया सारी जळेल**
**शाबूत आहे कोपऱ्यात अजून चिमणीचं घरटं**
**आत्ताच सरण रचू नको"[8]**

असे कवी बालाजी मदन इंगळे कवितेच्या शेवटच्या चरणात म्हणतात कारण परिस्थिती बदलली व निसर्ग चक्रांमध्ये बदल झाला की शेतकऱ्याची परिस्थिती नक्की सुधारते. निसर्गाची कृपा झाली की रानं हिरवगार होतं आणि शेतामध्ये राशीचे ढिगारे पडतात. त्यावेळी सारी दुनिया, व्यापारी आणि दलाल मात्र लांब उभे राहून जळताना दिसतील.त्यावेळी तुझ्यासारखा श्रीमंत कोणीच नसेल. असा उपदेश शेतकऱ्यांना या कवितेमध्ये बालाजी मदन इंगळे देतात. कोपऱ्यामध्ये अजून चिमणीचं घरटं शाबूत असताना तू सरणाची भाषा का करत आहेस? हा मार्मीक संदेशही आदर्शवादी रूपाने कवी बालाजी मदन इंगळे या कवितेमध्ये देतात. शेतकऱ्याने मरणाची व सरणाची भाषा बोलू नये. आत्महत्येचा विचार करू नये.जगण्याची आशा बाळगून,कष्टावर व प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून जीवन जगावे म्हणजे परिस्थिती नक्कीच बदलेल. हा आशावादी दृष्टिकोन कवीने या ठिकाणी शेतकऱ्यांना दिलेला आहे. शेतकऱ्याला आत्महत्येपासून दूर करून जगण्याचा नवा मार्ग देण्याचं काम मराठवाड्यातील दोन महत्त्वपूर्ण कवीने आपल्या काव्यलेखनाच्या माध्यमातून केले आहे. परभणी जिल्ह्यातील कवी इंद्रजित भालेराव हे आहेत त्यांनी आपल्या 'शिक बाबा शिक लढायला शिक' या कवितेत जहाल

संघर्षाचा मार्ग दाखवत शेतकऱ्यांना व कुणब्याच्या पोराला लढण्याचा व संघर्षाचा मार्ग सांगतात. आत्महत्या करू नको हत्या करायला शीक घेतलेले कर्ज बुडवायला शीक आणि सरकार जर लक्ष देत नसेल तर त्याची सत्ता पाडायला शीक. आपल्या हक्कासाठी सावकार, व्यापारी व सरकारच्या विरोधात लढायला शीक असा उपदेश करतात. पण बालाजी मदन इंगळे हे आपल्या 'मेलं नाही अजून आभाळ' या कवितेमध्ये मात्र मायाळू पणे आशावादी पणे जगण्याचा जीवनमंत्र शेतकऱ्यांना सांगतात.हे दोन्ही कवीतील कवितेच्या आशयाचे वेगळेपण आहे. अशाप्रकारे कवी बालाजी मदन इंगळे हे इ.स. २००० नंतरचे मराठवाड्यातील महत्वपूर्ण ग्रामीण कवी आहेत. त्यांची कविता वाचक रसिकाला शेतकऱ्यांच्या जीवनाचा वास्तव गर्भितार्थ पटवून देते. त्यांच्या काव्यात्मक भाषेत गेयता, अस्सल शब्दसौंदर्याचा व तत्त्वज्ञानाचा खजिना आहे. त्यामुळे ती कविता अक्षर कलाकृती होते.

**संदर्भ ग्रंथ**


१. इंद्रजित भालेराव यांची कविता आकलन, आस्वाद आणि आक्षेप- संपादक भगवान काळे -गारखेडा प्रकाशन,गारखेडा औरंगाबाद -प्रथमावृत्ती ७ ऑगस्ट २०१३ -पृष्ठ-२२४

२. 'मेलं नाही अजून आभाळ' कवितासंग्रह -कवी बालाजी मदन इंगळे- लोकवांङ्मय गृह, प्रभादेवी मुंबई- प्रथमावृत्ती -जुलै-२०१०-पृष्ठ-१११

३. तत्रैव-पृष्ठ-१११

४. ग्रामीण साहित्य मूल्य आणि अभिरुची -डॉ. नानासाहेब सूर्यवंशी- पद्मगंधा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे- प्रथमावृत्ती १२ नोव्हेंबर २०१५ -पृष्ठ- २७

५. 'मेलं नाही अजून आभाळ' कवितासंग्रह -कवी बालाजी मदन इंगळे- लोकवांङ्मय गृह, प्रभादेवी मुंबई- प्रथमावृत्ती -जुलै-२०१०-पृष्ठ-१११

६. ग्रामीण साहित्य:प्रवाह आणि परिस्थिती -डॉ.वामन जाधव -स्नेहवर्धन प्रकाशन पुणे -प्रथमावृत्ती जानेवारी २०१३ -पृष्ठ- २१

७. इंद्रजित भालेराव यांची कविता आकलन, आस्वाद आणि आक्षेप- संपादक भगवान काळे -गारखेडा प्रकाशन,गारखेडा औरंगाबाद -प्रथमावृत्ती ७ ऑगस्ट २०१३ -पृष्ठ-५९९

८. 'मेलं नाही अजून आभाळ' कवितासंग्रह -कवी बालाजी मदन इंगळे- लोकवांङ्मय गृह, प्रभादेवी मुंबई- प्रथमावृत्ती -जुलै-२०१०-पृष्ठ-१११


***

# इंद्रजित भालेरावांच्या ‘टाहो’ काव्य संग्रहातील शेतकऱ्यांचे आक्रंदन


## डॉ. दादाराव गुंडरे

**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब, जिल्हा उस्मानाबाद पिन** ४१३ ५०७


इंद्रजित भालेराव हे मराठी वाङ्मयातील एक सुप्रसिद्ध असे नाव. त्यांनी कवितेसोबत कादंबरी, चरित्र, वैचारिक, ललित लेखन साहित्य प्रकारात तसेच समीक्षक व काही महत्त्वाचे संपादनपर लेखनही केले आहे. १९९० च्या आसपास मराठी कवितेत काही नव्या दमाचे कवी आले. त्यामध्ये इंद्रजित भालेराव मराठी काव्यप्रांत समृद्ध करणारे वैशिष्ट्यपूर्ण व लक्षणीय कवी आहेत. विशेषत: मराठवाड्याच्या ओल्या मातीत दीर्घ श्वास त्यांच्या कवितेत कोंडलेला आहे. मराठी ग्रामीण बोलीत कविता करणारे एक समर्थ कवी म्हणून अवघा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. ग्रामीण कवितेच्या प्रांतात कवयित्री बहिणाबाई चौधरी. ग. ह. पाटील, गिरीश, यशवंत, ना. धो. महानोर व विठ्ठल वाघ यांची परंपरा समर्थपणे पुढे नेण्याचे काम केले. अस्सल ग्रामीण जीवनानुभव व जीवन जाणिवांचे प्रकटीकरण केले. शेतकऱ्यास सृष्टीचे सहावे तत्त्व मानणाऱ्या या कवीने पीकपाणी, समरत, आम्ही काबाडाचे धनी, पेरा, दूर राहिला गाव, कुळंबिनीची कहाणी, वेचलेल्या कविता, मुलुख माझा, भूमीचे मार्दव तसेच २००४ साली ‘टाहो’ या संग्रहाची निर्मिती करून मराठी ग्रामीण कवितेचा प्रांत समृद्ध केला. त्यांनी पीकपाणी, पाऊसपाणी, कष्टकऱ्यांचे दुःख, भूमीवरील श्रद्धा, आई-वडील, खेडूत माणसे, शेतकरी, श्रद्धा, दुष्काळ, लोकव्यवहार यासारख्या विषयांचे चिंतन कवितेतून मांडले. कवी व त्यांची कविता एकूणच लोकसमूह मनाशी एकरूप होते.

इंद्रजित भालेरावांची कविता शेतकऱ्यांच्या घामात, अश्रूत व रक्तात भिजलेल्या आहेत. अस्सल ग्रामजीवन व शेतकरी जीवनदर्शन खास बोलीभाषेतून घडविणाऱ्या इंद्रजित भालेराव यांच्या कवितेविषयी प्रसिद्ध समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, “गेल्या पाव शतकातील सशक्त कवींपैकी इंद्रजीत भालेराव एक महत्त्वाचे नाव आहे. ग्रामीण जीवनातील वेदनेसह सर्व प्रकारच्या जाणिवांचे रंग-गंध अतिशय उत्कटतेने इंद्रजित भालेराव यांच्या कवितांमधून प्रकट होतात.” असा यथोचित गौरव केला. तसेच संजय बोरुडे यांनी, “तमाम कास्तकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडणाऱ्या कविता भालेरावांच्या लेखणीतून उतरल्याने मराठी ग्रामीण कविता

लखलखीत बनली आहे" असे म्हटलेले दिसून येते. कृषी जीवनातील धगधगते वास्तव आपल्या कवितेतून मांडले. त्यास 'टाहो' काव्यसंग्रहातील कविताही अपवाद नाही. अभावग्रस्त ग्रामीण जीवन, उपाशीपोटी कष्ट करून जगामुखी घास भरवणारा बाप, माय तरीही वाट्यास दयनीय स्थिती, कोंडमारा, शोषण, वाढता कर्जाचा डोंगर, खचलेपण व शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा आशयसूत्रातून त्यांची कविता ग्रामीण जीवनाच्या वास्तववादी व विदारक स्थितीचे दर्शन घडवते. या शोधनिबंधातून प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांचे दीर्घ आक्रंदन ऐकवण्याच्या ते दाखविण्याचा हेतू आहे.

'टाहो' या संग्रहात सात दीर्घ कवितांची शीर्षके, भाग असून त्यात समाविष्ट कवितांची संख्या ७८ इतकी आहे. ज्यामध्ये 'टाहो' (२८ कविता) उपाय (सहा), शीळ (आठ), जागतिकीकरण (पाच), माती-पाणी (नऊ), माये (सोळा) व परिशिष्ट (सहा) यांचा समावेश होतो. या सर्व कवितांचे मुख्य केंद्र ग्रामजीवन आणि शेतकरी हेच आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाने अलीकडच्या काळात ज्वलंत रूप धारण केले आहे. विकासाची, प्रगतीची भाषा बोलणाऱ्या, महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्या समाजाची एक मोठी शोकांतिका आहे. या कवितेतून जागतिकीकरणापासून ते कौटुंबिक वेदने पर्यंतचे अर्थात काळया मातीचे तिच्या लेकरांचे भावविश्व उलगडून दाखविले. आसमानी व सुलतानी संकटाची मालिका, शेतीव्यवस्थेची झालेली परवड, त्यातून आलेले कर्जबाजारीपण, कर्ज फेडता येत नाही म्हणून आत्महत्या. अशा समकालीन वास्तवास मुखरर करण्याचे काम 'टाहो' मधून भालेराव यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा सर्वांच्याच चिंतेचा व चिंतनाचा विषय झाला आहे. 'टाहो' संग्रहातील काही कवितेतून शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे थेट संदर्भ देत हा प्रश्न टाहोच्या रुपाने ऐरणीवर आणला. 'टाहो' मध्ये शेतकऱ्यांच्या दीर्घ आक्रंदना बरोबर ही कविता टाहो फोडण्याची कारणे शोधत 'उपाय' ही वैचारिक पातळीवर सुचवू पाहते. या उपायात सरळपणासोबत उपहास, उपरोध व चीडही आहे. माणसाच्या सहनशीलतेची मर्यादा संपल्यानंतर तो त्रस्त होऊन परिणामाची पर्वा न करता व समोरच्या माणसाच्या सामर्थ्याचा विचार न करता सर्व शक्तीनिशी त्यावर तुटून तरी पडतो किंवा असह्यातेमुळे आत्महत्येचा मार्ग पत्करतो. नैसर्गिक संकटासोबत मानवनिर्मित पाश जेव्हा आवळले जातात तेव्हा स्वतःस संपविण्याचा मार्ग स्वीकारतो. त्यात भरीस भर म्हणजे जागतिकीकरण. याने तर शेती व शेतकरी, त्यावर आधारित असणाऱ्या ग्रामसंस्कृतीलाच सुरुंग लावला आहे. त्याचेही चित्रण ते दृष्टेपणाने करतात. त्यामुळे ही कविता अधिक विचारगर्भ बनत जाते.

'टाहो' संग्रहातील पहिलीच कविता. जी कुणब्याची करूणार्थ कहाणी विलक्षण प्रत्ययकारी शब्दात मांडते.

“टाहो फोडला बापानं
याच दरीत विरला
आत्महत्येचा पहाड
त्याच्या पोटात शिरला”

या सारख्या ओळी अगतिकतेत आकंठ बुडालेल्या शेतकरी बापाच्या आत्महत्येचा प्रसंग अवतीर्ण करतात. या शब्दात शेतकऱ्याचे विराट दुःख मांडले असून दुःखाची सनातन अशी गाथाच कवितेत पहावयास मिळते. पावसाअभावी शेतीची झालेली परवड, ‘पिकला काऊस व सुकला पाऊस’ या वर्णनानंतर बापाने फोडलेला टाहो दरीत विरून जातो. अर्थात शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेकडे कोणीच लक्ष देत नाही. त्यामुळे अनेकांच्या पोटात घास घालणाऱ्या शेतकऱ्याच्या पोटात आत्महत्येचा पहाड शिरला हे उफराटे वास्तव कळी शब्दात पकडतात. १९८९ साली आंध्रप्रदेशातील वरंगल जिल्ह्यात शेतकऱ्यांची पहिली आत्महत्या झाली. तेव्हापासून आतापर्यंत संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत. खरे तर शेतकऱ्याची आत्महत्या होणे म्हणजे येथील संस्कृतीची आत्महत्या आहे. १९८९ नंतर वाढत गेलेल्या आत्महत्या अर्थात समकालीन वास्तवाचे भान राखत त्या काळात घडणारे कृषीजीवन सूक्ष्मपणे शब्दबद्ध करण्याचे काम ‘टाहो’ तून केले. हा टाहो शेतकऱ्याचा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाचा आहे. ‘टाहो’त आकांतभाव आहे. कमी-अधिक प्रमाणात देशाच्या विविध भागात हीच परिस्थिती प्रकर्षाने नजरेस पडते आहे. विशेषतः १९९० नंतर आलेल्या ‘खाऊजा’ धोरणाने तर शेतकऱ्यांच्या जीवनात बिकट परिस्थिती आली. आत्महत्येचे आकडे फुगू लागले. लोककल्याणकारी राज्य ही संकल्पना मागे पडून केवळ नफेखोरीस महत्त्व आले. त्यामध्ये अन्नब्रह्माची पूजा करणाऱ्या शेतकऱ्यांचे कृषीमूल्य कसे ठरते याचे भानही उरलेले नाही. सामाजिक संवेदनशीलताही दांभिक बनली आहे.

इंद्रजित भालेरावांच्या ‘टाहो’त आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा टाहो आहे. चहूबाजूंच्या क्षितिजांना छेदून तो आकाशभर, शिवारभर पसरतो. आपली असह्य वेदना, कर्जाचे ओझे दूर करण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला, हातातील विळयाने शेतातील कणसे खुडावीत तसे शेतकऱ्यानी स्वतःचे प्राण खुडले. संपूर्ण देशभर शेतकरी आत्महत्या हा विषय चर्चिला गेला. त्याच्या नावावर राजकारण चालले परंतु मुळापर्यंत जाऊन या आत्महत्येची कारणमीमांसा कुणी करत नाही. शेतकऱ्यांच्या सुखदुःखाशी नाते असणाऱ्या कवीने आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा टाहो शब्दबद्ध केला. त्याचे शब्द असह्य वेदनेने हळहळले. ते म्हणतात,

“झाडाझाडाला विचारा

आत्महत्येच्या कहाण्या
पहाडाला विचारा
माझ्या बापाच्या विराण्या”

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात आपल्या भारत देशाने खाऊजाचा स्वीकार केला. त्यामुळे देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव झाला. देशाची समृद्धी करण्यासाठी जणू याचे आगमन झाल्याचे चित्र रंगवले. शेतकरी त्यास भुलला. कर्जबाजारी झाला. कर्जाचा डोंगर पेलवेना तेव्हा आत्महत्या कडे वळला. दुष्काळ, कर्ज, दारिद्र्य, सावकारी पाशात पुरता अडकलेला बळीराजा आत्महत्येस प्रवृत्त झाला. आपल्या पश्चात काय होईल याचाही विचार केलेला दिसत नाही. तो तर जिवानिशी जातोच पण त्याच्या पश्चात बायको-मुले, गणगोत, गुरेढोरे, शेत-शिवार यांची भयावह स्थिती होते. ज्या झाडाखाली त्यांचा मनभावी प्रणय झालेला असतो. त्याच झाडाच्या फांदीला तो प्रेत होऊन लोंबकळत असतो. त्याच झाडाखाली त्याची पत्नी आज विकल अवस्थेत उभी असते. तिच्या पोटात भीती, असुरक्षिततेचा गोळा असतो. वरील ओळीतून असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे संदर्भ लक्षात येतात. शेतात लावलेला ऊस पाण्याअभावी वाळला आणि त्याऐवजी कसेबसे गवत जगले, साळ पोटऱ्यापर्यंत येताच पाऊस गेला. त्याचा अपरिहार्य परिणाम डोंगरदऱ्यात घुमणारा टाहो फोडून शेतकरी आत्महत्या करतो. शेतकरी हा शेवटी पराधीन राहतो. सर्व मार्ग बंद झाल्यास दीर्घ आक्रंदनात स्वतःस संपवतो. हे आजच्या शेतकरी जीवनाचे दाहक वास्तव आहे.

टाहो चे मुख्य सूत्र शेतकऱ्याचे शोषण, हाल हेच आहे. आत्महत्या उद्भवल्या व साथीसारख्या पसरल्या. हालअपेष्टाची परंपरा तशी जुनीच आहे. वामन बळीराजा ही पुराणकथा चिरतरुण असल्याची साक्ष आहे. ‘कालच्या वामनाने’ कवितेतून पाहावयास मिळते. आत्महत्या केलेल्या किंवा तशी वेळ आलेल्या शोषित व परिस्थितीने गांजलेल्या शेतकाऱ्याशी संवाद साधणाऱ्या २८ कविता या संग्रहात समविष्ठ आहेत. कर्जबाजारी शेतकरी कर्जास कंटाळून आत्महत्या करतो. कर्ज काढले, वाढले म्हणजे ते फेडले पाहिजे. कर्जफेड झाली नाही तर पाप केले असे शेतकरी मानतो.

“आपल्या डोक्यावरच्या कर्जाला
पाप समजणारा पुण्यवंत आत्मा
फक्त तुझाच शरीरात का राहतो?”

असा राजकारण्याविषयी संताप व्यक्त करतात. उपस्थित केलेला प्रश्न शेतकऱ्याचा इमानस उदात्त बनवतो. कर्जबाजारी सगळेच असतात. कर्जही बुडवणाऱ्यांची संख्या मोठी आहे. कर्जबाजारीपणातून राज्य चालवणाऱ्या सरकारची सुद्धा सुटका नाही. मग डोक्यावरच्या कर्जास कंटाळून कर्जाला पाप

समजणारा पुण्यवंत आत्मा फक्त शेतकऱ्याच्या शरीरात राहतो का? असा सवाल करतात, सगळयांनीच कमरेची सोडून डोक्याला गुंडाळली पण तुलाच डोक्यावरचे कर्ज पाप का वाटते? तूच स्वतःला का संपवतो? अशी विचारणा करतात. तो आपल्या इमानास सोडत नाही तरीही त्याच्या वाट्यास भीषणता का? याच जबाबदार नेते, राज्यकर्ते, सरकारी यंत्रणा की आणखी कोणी हा विचार करायला लावतात. सगळीकडे पाप-पुण्य, नैतिक-अनैतिकतेचे सोयरसुतक न राहिलेली माणसे स्वतःचे उखळ पांढरे करण्याच्या पाठीमागे लागलेली असताना डोक्यावरच्या कर्जाचे ओझे पाप वाटून तो स्वतःला संपवतो. आत्महत्येमागे काही सामाजिक व सांस्कृतिक मूल्यभाव असल्याचे ते सांगतात. युगानुयुगे धरतीस सुफळीत करीत आलास तरी माणसाला कोंभ फुटत नाहीत असेही बोलून दाखवतात.

ज्या बळीराजास धूर्त वामनाने कपटणीती वापरुन पाताळात घातले तोच वामन बळीराजाच्या आत्महत्येस कारणीभूत आहे. आज मात्र वामनाचे स्वरूप बदलले आहे. आज तो आपल्या पावलाने बळीराजास पाताळात गाडत नाही तर बळीराजा स्वतः गाढून घेईल, फासावर जाईल अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. सगळीकडे जागतिकीकरणाचा उदोउदो सुरू असताना आर्थिक डबघाईला आलेला शेतकरी, पुण्यवंत आत्मा स्वतःस संपवतो आहे. आत्महत्या करू पाहणाऱ्या पुढे एक भयंकर भविष्याचे चित्र, दृश्य पुढे उभे करतात.

आत्महत्येची वेळ आनणाऱ्यांचा निषेध करताना इंद्रजित भालेराव म्हणतात,

“दुःख दळून खाणाऱ्याला
आत्महत्येच्या कड्यावर
आणून पोहोचवणारानो
देवाचं जातं दमाण फिरतं
पण फार बारीक दळतं
असं कबीर सांगून गेलाय”

मोठमोठ्या उद्योगपतींनी बँकांची कर्जे बुडवली. त्यालाच कर्जमुक्त केले. परंतु शेतकऱ्याकडून मोठी रक्कम वसूल करूनही कर्जमुक्त केले नाही. ही वस्तुस्थिती सांगताना कवी संतापतो. हे वैश्विक सत्य कबीराच्या दोहयातून सूचित करतात. शेतकऱ्याच्या घामावर आणि त्याच्या दुःखातून सुखी जीवन जगणाऱ्या ऐतखाऊ खुशाल चेंडूना कवी इशारा देतात. यामधून कवीची सामाजिक विषमते बद्दलची सखोल जाणीव व्यक्त होते. बापाच्या हत्येची माळ गुंफताना राजकीय व्यवस्थेचे नाव घेतात. दु:ख दळता दळता आत्महत्या करणारे शेतकरी यावर नक्कीच मात करतील असा विश्वास व आशावाद ही प्रकट करतात.

शेतकरी आत्महत्या करतो इथेच ही शोकांतिका संपत नाही. त्याची बायका-मुले बेवारशी होतात. देशोधडीस लागून यातनाचक्रात सापडतात. बाप एंडरीलचा डबा पोटात रिचवून स्वतःस संपवतो. अशा या शेतकऱ्याचे दुःख शिवारभर पसरते. त्याच्या मुलासही यातून बाहेर निघान्याचा मार्ग सापडत नाही. त्याच्या मानसिकतेवर परिणाम होतो तोही शेवटी मृत्यूस जवळ करतो. याचे वर्णन करताना लिहितात,

"अखा एनडरींचा डब्बा पिऊन
बाप या प्रश्नातून मुक्त झाला
मला तर एक ढकणही पुरेल"

अकरा वर्षाच्या मुलास त्याच्या बापाच्या आत्महत्या नंतर घरातील प्रतिकूल परिस्थिती विषयी विचारणा केल्यास वरील उद्गार काढतो. बापाच्या वाटेने जाण्याशिवाय पर्यायच राहत नाही. म्हणजे आत्महत्याचे सत्र थांबणार नाही याची विदारक जाणीव करून देतात, 'जागतिकीकरणाचा एंडरीलचा डब्बा कुणी धुतला तुझ्या निर्मळ गंगेत' असाही प्रश्न विचारतात.

केंद्र सरकारने उपाययोजना म्हणून शेतकऱ्यांसाठी मोठे पॅकेज जाहीर केले. पण त्याचे बारकाईने निरीक्षण केल्यास ऊस कोल्हयाने पळविल्यागत स्थिती दिसते. शेतकऱ्यांच्या पदरी फक्त वरचा पाचोळा शेतकरी आत्महत्येचे सत्र काही थांबत नाही. जागतिकीकरण, शेतकरी आत्महत्या याविषयी जे राज्यकर्ते बोलले त्याचा समाचार व धांडोळा घेताना कवी लिहितात,

"पंतप्रधान म्हणाले,
घेतलेल्या कर्जाचे आणि कुटुंबाचे
नियोजन करता येत नाही
म्हणून शेतकरी आत्महत्या करतात
त्यावर शेतकऱ्यांनी विचारलं
देशाचे नियोजन जमलं नाही
म्हणून किती पंतप्रधानांनी
आतापर्यंत आत्महत्या केल्या"

यावर कोणतेच उत्तर राज्यकर्ते, पंतप्रधानांकडे नाही. संपूर्ण भारतात शेतकरी आत्महत्या करत असताना दिली जाणारी प्रतिक्रिया, बोचरी खंत कवीस अस्वस्थ करते. कोणत्याही परिणामाची पर्वा न करता सरकारविरुद्ध बोलायचे धाडस, जाब विचारण्याचे काम केले. घेतलेले कर्ज बुडवण्यासाठी शेतकरी आत्महत्या करतात असा एक जाणीवपूर्वक गैरसमज प्रस्थापित व बुद्धिजीवी करतात. वास्तव मात्र विरुद्ध असते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जे कुत्सित नजरेने पाहतात. त्यांना कवी उत्तर देतात. जो शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी समाजाची दिशाभूल करतात त्यातील सत्य

कवी सांगतात. कुणबी बापाच्या आत्महत्येबद्दल पंतप्रधान नकारात्मक दृष्टीने बोलतात तेंव्हा कवी शेतकऱ्यांचे अनुभव प्रकट करताना जे म्हणतात ते लक्षणीय स्वरूपाचे आहे. यामधून शोषणाविरुद्धची जाणीव प्रकट करतात. यासंदर्भात मारुती घुगे लिहितात, "बदलत्या ग्रामीण जीवनाचे महत्त्व, जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त होणारा शेतकरी, त्यामागची कारणमीमांसा, संशयितांच्या विरोधात राग, चीड, शिव्या, शाप तीव्रपणे भालेरावांची कविता अभिव्यक्त करते. हे मत वास्तव सूचित करते.

आत्महत्येचा पहाड पचवणं खूप जड असते. हे केवळ भूमिपुत्रालाच ठाऊक असते. खुद्द भूमिपुत्र कवी म्हणून, 'आत्महत्येचा इतिहास पंढरपूरच्या यात्रे इतकाच जुना आहे' असे म्हणतात. आजच्या व्यवस्थेने उपेक्षित मानल्या गेलेल्या शेतकऱ्याच्या शोषणाची गाथा मांडताना वरील ओळी येतात. हा प्रश्न अव्याहत सुरू आहे जी काल दृश्य स्वरूपात होती ती आज अदृश्य रुपात वावरत आहे. सांस्कृतिक संदर्भ देत काव्यात्म परिणाम साधला. शेतकऱ्याच्या दारूण इतिहासास अधोरेखित करतात.

'टाहो' संग्रहात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे जसे वर्णन येते तसे उपायही सुचवलेले दिसतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे भांडवल आपल्या स्वार्थासाठी करणारे राजकीय पुढारी, व्यापारी, शहरातील सुखवस्तू लोक अशा सर्वांना ते धारेवर धरतात. यांना बारीक चाळणीत चाळून त्यांच्यातील उरलासुरला कोंडा काढून टाकावा. बुजगावण्यास घाबरणारे हे लोक नाहीत म्हणून गोफणगुंडा वापरावा लागेल. शेवटी भूमीपुत्रांना जगलेला, भोगलेला कुणबही उपायच उतारा ठरणार असल्याचे ते सांगतात. शोषकांचा बंदोबस्त करण्यासाठी गोफणगुंड्यापासून ते नांगराच्या फाळापर्यंत ची आयुधे ही खास मातीशी नाते सांगतात. आपण नरम पडलो की लोक हानतात व दुबळे पडलो खणतात. त्यामुळे परीनामाकडे दुर्लक्ष न करता, छळून मारणाऱ्यास वरील शिक्षा दिली तर टाहो कमी होईल ही आशा कवी व्यक्त करतात.

जगण्या मरण्याच्या खेळात मरण नेहमीच जिंकत आले. मरणातच गुंफलेला हा आयुष्याचा मरण सोहळा साजरा करतात. हा फार मोठा भोगवाटा आहे. त्याच्या कविता वाचकास घायाळ करतात. संवेदनशील मनाच्या ठिकऱ्या उडवतात. शेतकरी स्वतःस शेतीत गाडून घेतो व स्वतःच विरून जातो. इतर यंत्रणानं कोंभ फुटताना, मनास पाझर फुटताना दिसत नाही. शेतकऱ्यांच्या शेतात दुःखाच्या राशी व घरातल्या कणगीत दुःखाचे धान्य. यामध्ये शेतकरी मायबापांना किती वडावं, खपावं यांच्या दुःखास सीमाच नाही. एकूणच जागतिकीकरणाच्या, निसर्गनिर्मित संकटाच्या दुष्टचक्रात अडकून जीवन यात्रा संपवणाऱ्या बळीराजाचा आर्त 'टाहो' कवितेतून ऐकावयास मिळतो.

**निष्कर्ष :**

मराठी ग्रामीण कवितेच्या परंपरेचा वारसा जोमाने चालवणारे, मराठी काव्यप्रांत समृद्ध करणारे इंद्रजित भालेराव एक महत्त्वाचे कवी असून कुणब्याचे सर्व भावविश्व कवितेतून साकारले आहे. कबीरांनी जनसामान्यांच्या सुखदुःखाचे जसे शेले विणले तसे भालेरावांनी शेतीमातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांची वस्त्रे विणली आहे. यामध्ये 'टाहो' या काव्यासंग्रहतून येणारे शेतकरी जीवनाचे दाहक व वास्तवदर्शी चित्रण पाहावयास मिळते. शेतकऱ्यांच्या जीवनातील अपार कष्ट, त्यांचे अभावग्रस्त जगणे याचे चित्रण करताना अधिक तीक्ष्ण कविता बनते. टाहो मधून या परिस्थितीचा, शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचा प्रखर शब्दात निषेध करतात. शेतकऱ्यांना विपरीत परिस्थितीत लोटून त्यांना आत्महत्येच्या कठड्यावर आणणाऱ्या संबंधी उपरोधाची, तर्ककठोराची, विसंगती दर्शनाची भाषा टाहोत आहे. टाहो हा शेतकऱ्यांच्या आत्मकलेशचा आहे. शेतकऱ्यांच्या दैन्य, दुःख बाबतचा कळवळा टाहो तून प्रकटला आहे. शेतकरी जीवनाचे अनुभव सहअनुभव होत व्यक्त होतात. ज्यातून कणव, राग व करुणा प्रकट होते. त्याची कविता न्याहाळताना पोटास पीळ पडतो. कंठ दाटून येतो, डोळयात अश्रू गर्दी करतात. घरोघरचे कर्ते पुरुष हताश होऊन आपल्या हाताने आपले आयुष्य संपवत असताना सगळे रखरखीत होत जाते.

दुष्काळ, कर्जबाजारीपणा, आत्महत्या हे विषय नवीन राहिलेले नाहीत. संत तुकारामांचे अभंग, महात्मा फुले च्या शेतकऱ्यांचा आसूड मधून शेतकऱ्यांच्या दुःखास वाचा फोडली आहे. या दुःखास प्राचीन काळापासून अनेक वैरी होते व आहेत. ज्या बळीराजास वामनाने पाताळात गाडले. आजही असे वामन आहेतच. दुःखाचे ओझे खांद्यावर घेऊन शेतकरी पिढ्यानपिढ्या जगत आहे. त्याची वाटचाल सुरू आहे. स्वबळावर, हिमतीवर आतापर्यंत तो तगला. त्याचे दुःख काळाच्या ओघात अधिक तीव्र झाले. त्यामुळे शेतकरी झाडाच्या फांदीचा आधार घेताना, एंडरील चा डब्बा पिऊन शेतकरी बाप स्वतःस संपवताना तसेच त्याची मुलेही हाच पाढा गिरवताना दिसतात. कारण तशी परिस्थितीच सभोवती निर्माण झालेली दिसते. दारिद्र्य व कर्जबाजारीपणाने बेजार झालेला शेतकरी अखेरपर्यंत इमानाशी नाते ठेवतो. शेवटी असह्य झाल्यावर, सर्व मार्ग बंद झाल्यावर स्वतःस संपवतो. इथेच दुःख संपत नाही तर मागे सारे कुटुंब दुःखाच्या खाईत लोटतो जाते. उलट राजकीय पुढारी, शहरातील सुखवस्तू लोक शेतकऱ्याच्या आत्महत्येचा राजकीय भांडवल म्हणून स्वार्थी वापर करतात. एवढेच नव्हे तर या आत्महत्येची कारण मीमांसा चुकीच्या पद्धतीने करताना दिसतात. तेव्हा कवी योग्य अशी मीमांसाही करतात व उलट यांना जाब विचारतात.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यानी आपला कृषी इतिहास रंगू लागला होता व शेतकऱ्याच्या बाबत भयावह परिस्थिती निर्माण झालेली दिसते. त्यात जागतिकीकरणाने अनेक प्रश्न निर्माण केले. शेतकऱ्याच्या आत्महत्येचा विक्रम झाला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात हेच चित्र कमी अधिक प्रमाणात दिसते. खाऊजा तील फसव्या, खोट्या जगास सामोरे जा. त्या ओळखण्यात गाफील राहू नका. कारण असेच सुरू राहिले तर माणसाच्या सावल्याही गायब होतील. हे कवी सूचित करतात. जागतिकीकरणातील गंभीर परिणाम समजून घेत त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सुचवितात. जागतिकीकरणाचे गंभीर परिणाम त्यांची कविता नेमकेपणाने पकडते. अनुभवाचा दीर्घ पल्ला आणि तपशिलासह बरकाव्याना कवितेत टिपण्याची कवीची धडपड दिसून येते. टाहो या संग्रहात सात दीर्घ कवितांमध्ये ७८ कवितांचा समावेश असून शेती करणारा आपला बाप आत्महत्या करू लागल्याचे दुःख कवीला होणे स्वाभाविक आहे. त्याच्या अंतःकरणातील टाहो जसा त्यांना जाणवला तसाच तो संबंध सांस्कृतिक विश्वालाही जाणवावा या हेतूने कवी आपल्याशी संवाद साधतात. भूमीपित्यास आपला बाप मानून त्याच्या जीवन मृत्युशी संघर्षरत असलेल्या आयुष्याशी समरस होऊन भूमीपित्याचे तीव्र-कोमल दुःख अनुभूतीच्या कसातून मांडतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच बोचरेपण त्यांच्या मनात खोलवर मुरल्यामुळे उपायापेक्षा उपरोध आणि तिरस्काराच्या छताच अधिक प्रमाणात उगवल्या. भालेरावांच्या कवितेतून शेतकऱ्यांचे भावविश्व, त्यांच्या आशा-आकांक्षा, अनेकविध प्रश्न, ताणतणाव, वेदना व मूल्यभाव इत्यादीचा अविष्कार प्रकट केला. शेतकऱ्याचे जीवन हेच कवितेचे केंद्र असून त्यांच्या जीवनाशी एकरूप झाल्याचा प्रत्यय येतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आजच्या ग्रामीण साहित्यिकांच्या आस्थेचा विषय प्रश्न राहिलेला आहे. 'कविता' या प्रकारातून उत्कटपणे आपल्या हवालदिल शेतकऱ्यांच्या कौटुंबिक, आर्थिक व विफल भयग्रस्त मानसिकतेचे चित्रण प्रत्ययकारीपणे होताना दिसते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या शिवारात फिरताना कवी उद्विग्न होतो. प्रत्येक वळणावर नव्या रूपात येणाऱ्या शोषकांचा चेहरा दाखवतात. आजचे वामन वेगळे आहेत याची जाणीव करून देतात. नवे चेहरे घेऊन येणारे शोषक व त्याची नीती सांगतात. शेतकऱ्याच्या दुर्दैवाचे दशावतार त्यांनी जवळून अनुभवले. 'टाहो' संग्रह त्याची प्रचीती देतो. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा हा आर्त टाहो काळीज हेलावणारा व गाढ गहन घोरणाऱ्यानाही जाग आणणारा आहे. बहुतांशी कविता आत्महत्येच्या सूत्राने बांधलेल्या आहेत. आरंभीच्या २८ कविता आत्महत्याचे नानाविध संदर्भ घेऊन येतात. भूत, भविष्य व वर्तमानातील अनेक संदर्भांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्याची कर्मकहाणी उलगडली. आत्महत्येस जबाबदार असणाऱ्याची

मानगुट पकडणारी व सवाल करणारी कविता आहे. शेतकऱ्यांच्या दुःखाचा एक अनाहत नाद ऐकू येतो. अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नबरोबर काही उपायही सुचविले. त्यात शोषकविरुद्ध राग व्यक्त होतो. शोषकाबद्दलचा रोषही व्यक्त करताना त्याबद्दलची चीडही व्यक्त करतात. शोषणाविरुद्ध नवी मांडणी करताना आशावादही प्रकट होतो. शेतकऱ्यांच्या मनातील हुंकार कवितेद्वारे प्रकट केले. जागतिकीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या एकूणच ग्रामजीवनाचे नेमके व भावव्याकूळ दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. जशी कुणब्याच्या पोरास लढायला शिकवणारी कविता तशी ती कुणब्याच्या आत्महत्येवर मूलगामी चिंतनही करते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे चिंतन करणारा हा काव्यसंग्रह आहे. व्यवस्थेच्या चाकाखाली भरडल्या जाणाऱ्या कृषिवलांचा हा आर्त टाहो आहे. तो वाचून आपण अंतर्बाह्य हलतो, भयचकित होतो. त्यामुळे अस्सल ग्रामीण जीवन दर्शन, कष्टकरी, शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनानं पुरेपूर सजग करण्याचे सामर्थ्य टाहो च्या आक्रंदणात आहे यात शंकाच नाही.

संदर्भ :


१. भालेराव इंद्रजित, 'टाहो', प्रतिभास प्रकाशन, परभणी, तिसरी आवृत्ती २००८.
२. भगवान काळे (संपादक), 'इंद्रजित भालेराव यांची कविता : आकलन, आस्वाद आणि आक्षेप', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, ७ ऑगस्ट २०१३.
३. घुगे मारुती, 'इंद्रजित भालेराव यांची कविता', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००९.


***

# २००० नंतरची आदिवासी कविता

**संशोधक विद्यार्थी**

**शोभा विठ्ठल सरकुंडे**

**स्वा.रा.ती.म. विद्यापीठ. नांदेड**

आपला भारत देश स्वतंत्र होऊन आज बरीच वर्ष झाली. देश महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतो आहे. जगाचे सुत्रे हाती घेण्याचे भाषा या देशात बोलली जात आहे. देशाने जगाची सूत्रे जरूर हाती घ्यावी, परंतु त्याआधी या देशातील बेकारी व दारीद्र्या संपविण्याची सूत्रे जरूर हाती घ्यावीत आणि मगच देशाचा विकास करावा. या देशातील आदिवासी (आदिम) समाज अजूनही दारिद्य्रवस्थेत आहे आणि भूक बळीचा शिकार होत आहे. कुपोषणामुळे दरवर्षी हजारो बालके फडक्यातच दम कोंडून मरतात. जंगल पहाडात दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी स्त्रीच्या लुगड्याच्या गाठी आद्याप कमी झालेल्या नाहीत. सतरा ठीकाणी ठीगळाचे लुगडे परिधान करण्याची परंपरा तिच्या वाट्याला आजूनही कायमच आहे. अर्ध्या कपड्यावर रानोमाळ भटकंती करणारा पूर्वीचा आदिम आजही त्याच अवस्थेत दिसतो.

भारतातील आदिम जमाती नागर संकृतींपासून कित्येक वर्ष दूर राहिल्यामुळे त्यांचा विकास झाला नाही. स्वतंत्र्य प्राप्तीनंतर मात्र यांच आदिवासी समाजाला आपल्या अधिकार, कर्तव्य व हक्कची थोडीफार जाणीव झाली. कासव गतीने का होईना समाजात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. थोड्याफार सुज्ञ लोकांमध्ये समाजाचे चिंतन सुरु झाले. साहित्यिक परंपरा नसतांना आदिवासी समाजातील अल्पशिक्षित मंडळी साहित्य प्रवाहांकडे वळू लागली. त्यामध्ये त्यांनी कथा, कविता कांदबरी, नाटक, आत्मचरित्र आदी वाङःमयप्रकार आपापल्या परीने हाताळले. परंतु काव्याचा प्रांत मात्र त्याने आधिक प्रमाणात विकसित केल्याचा दिसून येते.

प्रस्थापित व्यवस्थेने येथील आदिवासी समाजाला माणूस म्हणून कधी संबोधलेच नाही. त्यांची गणना चोर, लुटारू, दरोडेखोर, राक्षस, धर्तीवरचे पापीं प्राणी, कावळ्यपेक्षा काळे अंशामध्ये केली. मुळात ती माणसेच आहेत. परंतु त्याच्याकडे माणूसकीच्या नजरेने या व्यवस्थेने कधी पाहिलेच नाही, उलट त्यांची अवहेलनाच केली. समाजात त्यांची प्रतिमा जेवढी मलीन करता येईल तेवढी केली. आदिमांनी माणूस म्हणून जगूच नये अशी

व्यवस्था करून ठेवली. परंतु या सर्वाच्या भांड्याला सुरुग लावण्याचे काम आदिवासी कवींनी केले आहे .

तसे पहिले तर नगरांचा विकास फार झपाटयाने होत गेला ग्रामीण भागही विकासाच्या दिशेने  कासाव गतीने विकासाची वाटचाल करत आहे. परंतु डोंगरदऱ्यां आणि कडेकपारीतला आदिवासी मात्र अजूनही आहे त्याच अवस्थेत जीवन जगताना दिसतो. संपती, सत्ता, साहित्य, संस्कृती या बाबतीत तो इतर समाजाच्या खूप मागे आहे. जी प्रतिकूल परिस्थिती आहे तीची जाणीव आदिम कवींना  झाली आणि म्हणूनच त्यांनी आपल्या काव्यातून या परिस्थितीला वाचा फोडण्याचे काम व परिवर्तनवादी विचार व "स्व" ची जाणीव  समाजाला  करून देण्याचा चंग बांधला. समाजातील दुःख, दारिद्र्य, दैन्य, कुपोषण, उपासमार, उपेक्षा, व्यथा-वेदना, भूक व भाकर यासारखे  काही महत्त्वपूर्ण विषय आदिम कवी तेवढ्यात पोटतिडकीने आपल्या काव्यातून मांडताना दिसतात.

"ज्या देशातल्या मंदिर मज्जितून
चपला जोडे चोरले जात असतील
त्या देशातील लोकांची गरज  काय असेल?
राम-रहीम की भूक !"        ॥ १ ॥

जेव्हा एखाद्या मंदिर किंवा मशीदीतून  चप्पल-जोडे  चोरीला जातात. तेव्हा तेथील लोकांची खरी गरज राम किंवा रहीम नसून "भूक" आहे. भूकेने पोट जेव्हा पाठीला जाते. तेव्हाच असले कृत्य घडते हे आम्ही प्रथम लक्षात घ्यायला पाहिजे. विचारात न घेताच आम्ही मात्र एकीकडे  हजारो लोकांना उपाशी ठेवून तिकडे मंदिराचा जिंर्णोद्दार  करायला निघालो.

कवी पी. डी आत्राम यांचा 'पहाडी हुंकार' हा काव्यसंग्रह ९ वे अ.भा.आ.साहित्य संमेलन नागपूर येथे २०११  मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहातील बहुतांश कविता परिवर्तनवादी असून त्या फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार प्रमाण मानणाऱ्या  आहेत. तसेच आदिवासी  चे दुःख, दारिद्र्य, कष्ट, उपासमार, भूक, अज्ञान आदी प्रश्नही कवीने  तेवढ्याच ताकदीने व पोटतिडकीने मांडले आहे. कवी आत्राम आपल्या "मायची ममता" या कवितेत असाच  दुःख दारिद्र्य आणि भूकेचा पाढा वाचताना दिसतो. तो असा-

"निज निज रे
माझ्या तान्हा
नाही येत रे पान्हा

तुझ्यामुळे मी  दुःखही हरले
आनंद्चे अश्रू नयनी आले,
ममता ही मायची सांगू कशी मी
जीवन माझे तूच रे कान्हा ………"  ॥ २ ॥

आई आपल्या मुलाला म्हणते की, बाळ दिवसभराच्या उपवासामुळे व वणवण फिरण्यामुळे मला पान्हा फुटणार नाही. कारण माझ्या पोटात भाकरीचा साधा कणदेखील नाही. त्यामुळे मला दूध कुठून येणार व तुझी दुधाची तहान कशी भागणार त्यापेक्षा आता तू झोपी जा.

आदिवासी समाजाला छळणारा भूकेचा प्रश्न अलीकडे अतिशय गंभीर व रौद्ररूप धारण करताना दिसतो

"माझे पाय
चालले धगधगत्या आगीतून
वीतभर पोटाची आग विझवायला
स्वतःच्या आगीला मूठमाती देऊ "?  ॥ ३ ॥

डोंगर-दऱ्या, घनदाट वनांचा प्रदेश,कडेकपारी आदींमध्ये वास्तव करणारा आदिवासी आज मृत्यूच्या दारात उभा आहे. भूकेचे चटके समाजाबरोबरच कवीला देखील बसले आहेत. वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी आदिमांना उन्हाची तीव्रता जाणवत नाही आणि जाणवत असली तरी सांगवत नाही. कारण त्यांच्या डोळ्यासमोर असतो तो भुकेचा डोंब. तो शांत करण्यासाठी या लोकांना रखरखत्या उन्हात आपला उघडा देह ठेवून अन्नाच्या शोधासाठी पायपीट करावी लागते.

कुपोषण आणि भूकबळी सारख्या मृत्यूच्या खाईत नेणाऱ्या समस्येला आदिम लोकांना दरवर्षीच तोंड द्यावे लागते. शासन दरबारी कुपोषणावर सखोल चर्चा होते. पण ती शेवटी वांझोटी ठरते. समाजाला त्या चर्चेचा किंचितही फायदा होत नाही. जंगलातून लाकडाची मोळी आणून विकणारी व त्यावरच आपला उदरनिर्वाह करणारी व त्यावरच आपला उदरनिर्वाह भागविणाऱ्या आदिवासी स्त्रीचे दुःख 'मही दूनिया बुडाली' या कवितेतून प्रत्ययाला येते.

आदिवासी समाजाला मुळातच सक्षम राजकीय नेतृत्व मिळाले नाही. जे मिळाले तेही स्वार्थी  व मतलबी निघाले आणि म्हणून चांदेकरांची 'लिडर' नावाची कविता अशाच आदिवासींचे नेतृत्व करणाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते.

"ज्यांनी हिसकावली भाकर
भीक त्यांनाच मागतात

रक्त आमचेच जाते
नावही त्यांचे घेतात"? ॥ ४ ॥

समाजाच नेतृत्व स्वीकारण्याला याचे सजग भान असणे आवश्यक आहे. ज्या आर्थ लोकांनी येथील मूळ रहिवाशांना जंगलाचा रस्ता दाखवून दिला. त्याच आर्थाची चापलूशी करताना आदिम नेतृत्व दिसून येते. हे नेते तत्त्वांशी बांधील नसतात आणि समाजाला ते धोकादायक ठरत असतात. आदिवासी वीरांनी समाजासाठी रक्त सांडले, त्यांचे नाव यांच्या मुखी नसते,तर समाजाला भिकेला लावणारांचेच नाव त्यांच्या जिभेवर तरळत असते. अशा या विरोधाभासाचा प्रत्येय कवी आपल्या कवितेतून आणून देतात.

कविता अत्राम यांचा 'काजवा' हा काव्यसंग्रह अ.भा. आदिवासी साहित्य संमेलन, नागपूर येथे मे २०११ साली प्रकाशित झाला. कवयित्री सध्या धुळे येथील आकाशवाणी केंद्रावर उद्घोषिका म्हणून कार्यरत आहेत. आदिवासी समाज, संस्कृती, दारिद्र्य, शोषण, उपासमार, पिळवणूक, दुःख, भूक भाकर आदींसारखे काही विषय त्यांचे काव्य-विषय झाले आहेत. आदिमांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, त्यातून निर्माण झालेला भुकेचा प्रश्न, त्यांच्या 'भूक आणि भाकर' या कवितेत डोकावतो.

'व्यथा आदिवासींच्या' हा पांडुरंग वागतकर यांचा पहिलाच काव्यसंग्रह या संग्रहातील बहुतांश कविता या आदिम समाजाच्या वाटायला आलेल्या व्यथा व वेदनांचे पहाडच उभे करताना दिसतात.त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी स्त्रीच्या कष्टमय जीवनाची व्यथा 'भूक' नावाच्या कवितेत मांडली आहे. दिवसभर शेतात काबाडकष्ट करणाऱ्या आदिम स्त्रीचा 'भूक आणि आतड्या' चा सहसंबंध जुळवताना कवी म्हणतो-

"भूक लागली पोटाला
पीळ पडला आतड्याला
बाळ बांधलं पाठीवरील झोळीला
कष्ट पडतात आतड्याला
पडलेली गाठ सोडवायला. ॥ ५ ॥

बाळ पाठीवर बांधून दिवसभर शेतात राबणाऱ्या आदिवासी स्त्रीचे चित्रच इथे वाचकाला अस्वस्थ करते, भुकेमुळे पोटातील आतड्याला पीळ पडलेला असो अथवा गाठी पडलेल्या असोत. त्या सोडविण्याची धमक तिच्या ठिकाणी आहे आणि म्हणूनच ती सतत कष्टच उपसत राहते.

कष्टाशिवाय आतड्याची गाठ सुटणार नाही, हेही तिला माहीत आहे./ असते.

आदिवासी साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य नाव म्हणजे प्रा. वामन शेळमाके  होय. शेळमाके यांच्या कवितेतील दुःख, दारिद्र्य, व्यथा, वेदना, भूक व भाकर यांची जातकुळीच निराळी आहे.

"वनपुत्रा
पोटाची भूक भागवण्यासाठी
दारोदार भटकत आहेस
शोषकांकडून ठार होत आहेस
भांडवलदारांनी तुला दडपले आहे."        ॥ ६ ॥

जंगलाचा राजा स्वतःच्याच जंगलात आज भूकेने व्याकूळ झाला आहे. भुकेचे प्रश्न सोडवण्यासाठी त्याची दारोदार भटकंती सुरू आहे. भूक व भाकरीबरोबरच त्याच्या व्यथा, वेदना व शोषण अजूनही कमी झालेले नाही. शोषकवर्ग व भांडवलदार वर्गाकडून होणारी त्यांची लयलूट अद्याप थांबलेली नाही. जल, जंगल व जमीन यावर भांडवलदाराचे आक्रमण सुरू आहे. त्यामुळे हा वनपुत्र चहुबाजूने नागवला व लुबाडला जात आहे. विकासाच्या नावाखाली प्रस्थापितांकडून हिंदू धर्म व संस्कृतीचे बीजारोपण केले जात आहे. त्यामुळे आदिमाची नैसर्गिक संस्कृती व त्यांचा आदिम धर्म धोक्यात येत आहे. असे हे सगळे धोके आदिवासी समाजाने आता तरी समजून घेतले पाहिजेत.

"नाही हलला झुलला
जीव कवासा उडाला
भूक बाई तान्हा माझा
जीव घेऊन निघाला"     ॥ ७ ॥

कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी आदिवासी स्त्रीला मोळी विकणे गरजेचे ठरते. ती मोळीही विकते. मोळीच्या पैशातून मुलाला आंबील पाजण्याचा प्रयत्न करते. परंतु तिच्या पदरी मात्र निराशाच येते.तिचे प्रयत्न निष्फळ ठरतात. कारण तिचा मुलगा तोपर्यंत भूकेचा बळी ठरला जातो आणि म्हणूनच आदिमांच्या जीवनात भूकबळीचा प्रश्न अनेकदा अतिशय गंभीर रूप धारण करताना दिसतो. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी स्त्रीचे सर्वस्व असलेली तान्हे मूलदेखील या ठिकाणी परिस्थितीमुळे भूकबळीच ठरले आहे.

ज्यांना माणूस म्हणून ओळखल्या जात नव्हतं अशा 'वारली' जमातीच्या पाड्यांवर प्रत्यक्ष डॉ.गोविंद गारे सारख्या अभ्यासकाला जावे

लागले आणि जगाला ओरडून सांगावे लागले की 'ती माणसंच होती' आणि आहेत. या प्रत्यक्ष पाहणीतूनच त्यांच्या 'ती माणसंच होती' या कवितेचा जन्म झाला. तो असा-

"कळपाकळपाने चाललेली
काड्याकुड्या शरीराची
तेलकट कळया रंगाची
नागडी,उघडी,बोडकी
करपलेल्या मुक्या चेहऱ्याची
पोट खपाटीला गेलेली......

कवटीत डोक अडकलेली
डोक्यावर मडकी गाडगी
अंगाखांद्यावर चिल्लीपिल्ली
धडपडत जगायला निघालेली
ती माणसं होती"..... ? ॥ ८ ॥

जंगल व दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिम समूहाच्या अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण झालेल्या नाहीत. भूक आणि भाकरीचा प्रश्न तर त्यांचा अजूनही अनुत्तरीतच राहतो. कारण भूकेमुळे त्यांची पोट खपाटीला जातात आणि मग ती हडकुळी बनवतात. असा हा स्वत:ची व मुलाबाळाची पोट भरण्यासाठी या आदिमांचा ताफा जंगलाच्या दिशेने भाकरीचा शोध घेण्याकरिता निघाला आहे.

**संदर्भ:-**


१) डॉ. रोंगटे 'आदिवासी कवितेच्या उप:काल आणि सद्यस्थिती',संस्कृती प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे, प्रथम आवृत्ती-२००७ पु.७१
२) पी. डी. अत्राम 'पहाडी हुंकार' देवयानी प्रकाशन ,एकविरा हाऊसिंग सोसायटी , ऐरोली नवी मुंबई प्रथम आवृत्ती २०११
३) डॉ.वाल्हेकर ज्ञानेश्वर, 'आदिवासी सहित्य: एक अभ्यास' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती-२००९ पु. २४६.
४) तत्रेव ,पु २६४
५) आत्राम कविता 'कादवा',कविता प्रकाशन, देवपूरकर फुले कॉलोनी, धुळे,प्रथम आवृत्ती-२०११ पु ८ व ९
६) वागतकर पांडुरंग 'व्यथा आदिवासीच्या',मुक्तरंग प्रकाशन,लातूर, प्रथम आवृत्ती-२०१३ पु ४७
७) प्रा.शेळमाके वामन, 'जगवा मने पेटवा मशाली'; वरून प्रकाशन, आमरावती,प्रथम आवृत्ती-१९९९ पु ३१
८) तत्रैव, पृ २५४
९) डॉ. रोंगटे 'आदिवासी कवितेच्या उप:काल आणि सद्यस्थिती',संस्कृती प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे, प्रथम आवृत्ती-२००७ पु.७१


***

# शिवारातलं पाणी काव्यसंग्रहातील शेतक-यांचे जीवन चित्रण करणा-या

## कविता–एक अभ्यास

**अशोक हणमंतराव पाटील आडलूरकर**

**एम.ए.बी.एड.एम.फिल मराठी (पीएच.डी.संशोधक मराठी) मु. आडलूर पो. एकलारा ता. मुखेड जि. नांदेड**

आपल्या सभोवताली **घडणाऱ्या घटनेकडे**, समाजाकडे अतिशय सूक्ष्मपणे पाहतो. समाजतील चांगल्या-वाईट घटना या कवी मनाला शांत बसू देत नाहीत. यातूनच कविता जन्माला येते. कविता ही अस्वस्थ मनाचा हुंकार असते. कवीच्या भावनेचा सहज उद्रेक असतो. कवितेत त्या त्या काळाचे पडसाद उमटत असतात. समाजातील सत्य आणि असत्य, जगणं आणि मरणं ,समता आणि विषमता यातील वाट म्हणजे कविता असते. अशा या वाटा दाखविण्याचा प्रामाणिक प्रयत्न कवी पांडुरंग पवार यांनी आपल्या 'शिवारातलं पाणी' या कविता संग्रहातून केले आहेत. हा कविता संग्रह फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रकाशित झालेला आहे. **कवी** पांडुरंग पवार हे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील जामगाव हे त्यांचे मूळगाव ते भारतीय जैन संघटना माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाघोली, पुणे येथे पर्यवेक्षक पदावर कार्यरत आहेत. ते मराठी विषयाचे उत्कृष्ट अध्यापन करतात. आपल्या मनातील भावना कवितेच्या माध्यमातून मांडून त्यांनी मराठी भाषा समृद्ध करण्याचे कार्य करत आहेत.

कवी पांडुरंग पवार यांच्या 'शिवारातलं पाणी' या काव्यसंग्रहात शेती व शेतकरी, आजचे राजकारण, समाजातील आदर्श, बेकारी, भ्रष्टाचार अशा अनेक विषयाच्या कविता समाविष्ट आहेत. वाचकांना विचार करायला लावणाऱ्या व मार्गदर्शन करणाऱ्या कविता या कवितासंग्रहामध्ये आहेत. मी हा शोधनिबंध लिहिण्यासाठी कवी पांडुरंग पवार यांच्या 'शिवारातलं पाणी' या काव्यसंग्रहातील शेती व शेतकरी या विषयीच्या कविता निवडून

शोधनिबंध लिहिलेला आहे. शेतीत राबणाऱ्या **शेतकऱ्याची** जेंव्हा शेती पिकते तेंव्हा त्याला आनंद होतो व जेंव्हा शेतीना पीक होते तेंव्हा त्यांची दयनीय अवस्था होते व शेवटी त्याला त्याचं जीवन संपवावं लागतं. या शोधनिबंधात मी पुढीलप्रमाणे ' शिवारातलं पाणी ' या काव्यसंग्रहातील कवितेच्या आधारे **मांडणी केलो** आहे.

१) शेतकऱ्याच्या जीवनातील आनंदाचे दिवस– दिवस-रात्र शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याला जेंव्हा शेतात पीक डोलताना दिसतं तेंव्हा त्या शेतकऱ्याला त्यापेक्षा दुसरा आनंद नाही तो आनंदाने काय म्हणतो 'शिवारातलं पाणी' या कवितेत कवी लिहितात...

**'शिवारातलं पाणी**
**शिवारातचं जिरलं**
**वर कणीस हिरवं**
**वाऱ्यावर डोललं ||**
**मोत्यासारखं पिक**
**शेतात आलंय**
**श्रमाचं मोल सारं**
**सार्थकी लागलं||'**

शेतात केलेल्या कष्टाला फळ मिळालं की, शेतकरी आनंदित होतो. ज्या काळया आईने त्याला भरभरून दिले तिचे उपकार तो कधीच विसरत नाही. जेंव्हा त्याच्या शेतातील रास धनधान्याने डोळयासमोर भरभरून दिसते तेंव्हा त्याच्या आनंदाला पारावार राहत नाही. शेतकऱ्यांच्या जीवनात असे आनंदाचे दिवस दरसाल राहतील असं नाही.

२) शेतकऱ्याच्या जीवनातील दुःख निसर्गाने साथ दिली नाही तर शेतकरी खूप कोलमडून पडतो. निसर्गाचा लहरीपणा व सरकारचे धोरण यामुळे शेतकरी दिवसेंदिवस रसातळा ला जात आहे. याविषयी कवी **'दुष्काळाच्या झळा' या कवितेत** लिहितात......

**"जगण्यासाठी सोनं सार गहाण टाकलं**
**शेत सारं माझं तर मी कव्हाच इकलं**

**सावकारने फास कर्जाचा आवळला.**

**मला ही गळी फास लावावा लागला."**

अशी जर शेतकऱ्याची अवस्था झाली तर शेतकरी जगेल कसा. सोनं गेलं, शेती गेली आणि सावकाराचे कर्ज डोक्यावर. शेतकरी हे सहन न होत असल्यामुळे शेवटी फाशी घेतो व आपली जीवनयात्रा संपवतो. त्याच्या पुढे दुसरा मार्ग दिसत नाही अशा काळामध्ये नातेवाईक सुद्धा जवळ येऊ देत नाहीत. कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या भावना कवी लिहितात....

**"नातेवाइकांनी मला तर फार दूर लोटलं**

**मरणानंच मला फक्त जवळ केलं"**

**वरिल कवितेच्या** ओळीतील 'फक्त' हा शब्द कवींनी खूप जाणीवपूर्वक लिहिलेला दिसतो. कारण कर्जबाजारी झालेल्या **शेतकऱ्याला** कोणीच जवळ घेत नाही त्यांना फक्त मरण जवळ घेतं. ही वस्तुस्थिती आहे. 'दुष्काळाच्या झळा' कविता वाचकांच्या मनापर्यंत पोहोचते व वाचकाचे मन पिळवटून टाकते. या कवितेतील एक ना एक शब्द माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या मुलाच्या अंतःकरणाला भिडतो आणि हाच या कवितेचा जिवंतपणा आहे. सगे-सोयरे, नाती-गोती **कर्जबाजारी झालेल्या व्यक्तीच्या** जिवंत असताना जवळ येत नाहीत व येऊ ही देत नाहीत मात्र मेल्यावर हळहळ व्यक्त करतात. तो मेल्यानंतर प्रत्येक नातेवाईक म्हणतो माणूस खूप सज्जन होता. तो असं करायला नको होतं पण तो काय आनंदाने फासी घेतो का? अनेकांच्या दारोदार मदतीसाठी फीरतो पण कोणी ही मदतीचा हात देत नाहीत. म्हणून त्याला मरण जवळ करावं लागतं. ही कविता वाचणारा अशा संकटात **अडक**लेल्या शेतकऱ्याला आधार दिल्या शिवाय राहणार नाही हे या कवितेचं वेगळेपण आहे. ज्याला आपण शेतकरी राजा म्हणतो. जगाचा पोशिंदा म्हणतो. त्याची काय अवस्था आहे याचं वास्तव चित्रण ही कविता करते.

३) शेतकऱ्याला कर्जाचा फास- दिवसेंदिवस कर्जाच्या फासात अडकत चाललेल्या शेतकऱ्याला जर बाहेर काढायचे असेल, शेतकरी जीवन सुखा-

समाधानानं जगावं वाटत असेल तर सरकारणे कायकरावे 'एवढंतरीकरा' याकवितेतकवीलिहितात.......

'शेतकरी आमचा आज संकटात सापडलाय जगण्यासाठी तुम्ही थोडी कर्ज माफी तरी करा.'

सरकार येतात- जातात कर्ज माफी होत नाही. शेतकरी जिवंत असताना सरकार कर्जमाफी देत नाही आणि तो मेल्यावर मात्र मदत करते. ही वस्तुस्थिती आहे. कवींनी रेखाटल्याप्रमाने शेतकरी संकटात सापडला असेल तर त्याची कर्जमाफी करणे आवश्यक आहे, तरच शेतकरी कसा तरी जगेल. शेतकरी हा कसल्या ना कसल्या संकटात सापडतो. पिके चांगली पिकली पिकाला भाव मिळत नाही, भाव चांगला असेल तर पीक येत नाही. ज्यावर्षी पीक चांगले आले त्यावर्षी तरी त्या शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळाला पाहिजे पण तो ही भाव मिळत नाही हे सांगता ना कवी कर्जाचा फास या कवितेत लिहितात.

**'आमच्या कष्टाचे मोल**
**कोणालाच नाही**
**शेतमालाला तर बाजारात**
**कधी भावच नाही.'**

असंच चालू राहिलं तर पिढ्यान पिढ्याकधीच शेतकऱ्यांची सुधारणा होणार नाही. तो कर्जाच्या फासातून कधीच बाहेर निघणार नाही.

**४)** जंगल तोडीचे **शेतकऱ्याच्या** जीवनावर दुष्परिणाम -

आज जर पाहिलं तर वने खूप कमी झालेली आहेत. डोंगरामध्ये इमारती उभारलेले आहेत झाडांची तोड मोठ्या प्रमाणात झालेली आहे. निसर्गाचं चक्र बदलल्या मुळे त्याचे परिणाम थेट शेतकऱ्यांच्या जीवनावर झालेले दिसून येतात. या विषयी कवी शेतकर्यांच्या भावना व्यक्त करताना 'कर्जाचा फास' या लिहितात....

**'डोंगर खणून, वने तोडून**
**छान बंगला तुम्ही थाटलाय**

**आन्पेरणीच्या वेळी पाऊस**

**आमच्यावर चरुसलाय**

**उंचउंच इमारतीची**

**तुम्हाला आस आहे**

**कर्जाच्या विळख्याचा**

**आम्हाला फास आहे.'**

वरिल कवितेच्या ओळी वाचकांना खूप विचार करायला **लावतात. आज एकिकडे बंगले बांधून ऐसआरामात जगणारा श्रीमंत वर्ग आणि दुसरीकडे जंगल तोड झाल्यामुळे निसर्गाच्या चक्रात अडलेला शेतकरी वर्ग आपणाला या कवितेत अभ्यासायला मिळतो. शेतकऱ्यांची व्यथा व वेदना मांडणारी कविता असल्यामुळे ही वाचक ही कविता वाचतो व यातून धडा घेतो की वृक्षतोड थांबणे ही काळाची गरज आहे. खरच हा शेतकरी किती तळमळीने आपल्या भावना व्यक्त करतो. आज आम्हाला फासी घेण्याची वेळ आली आहे. असा शेतकरी आपल्या भावना वरिल कवितेच्या ओळीतून व्यक्त करतो.** निसर्गचक्र बिघडल्यामुळे **शेतकरी** अडचणी **कसा सापडलेला आहे** याचं चित्रण करणारी व झाडे लावा झाडे जगवा असा वाचकांना हळूवार सल्ला देणारी ही कविता आहे. आज एकिकडे उंच-उंच उभा राहणारे इमारती व दुसरीकडे दिवसेंदिवस रसातळाला जाणारा शेतकरी या कवितेचा आशय **वाचकांना लावतो**.

5) शेतकऱ्याची **त्याच्या** मुलीवर माया एखाद्या दिवशी आपल्या कुटुंबाला वेळ द्यावा म्हटलं तरी **शेतकऱ्याला** वेळ मिळत नाही. कितीही लाडाची लेक असली **तरी** दिवसभर तिला खेळवत घरी त्याला बसता येत नाही. आपल्या शेतकरी बापाविषयी ही लाडाची लेक काय म्हणत आहे हे कवींनी 'लेकीचा बाप' या कवितेत लिहितात..........

**'लाडाची लेक म्हणून**

**अंगा खांद्यावर खेळायचा**

**रानात जाताना**

**मनी दगड ठेवायचा ||**

**चिमटा घेऊन पोटाला**

**लाड माझे पुरवायचा**
**शिकून शान मोठी हो**
**नेहमी मला सांगायचा.||'**

वरील ओळीतून ही लाडाची लेक आपल्या बापाविषयी म्हणत आहे की, माझा बाप शेतात जाताना मला घरी सोडून आनंदाने जात नव्हता. मनावर दगड ठेवून तो शेतात जात होता. माझ्यासाठी तो उपाशी राहत होता. माझे सर्व लाड पूर्ण करत होता. मला शिकून मोठी हो म्हणून सतत सांगत होता. माझ्या बापाचं सारं जीवन कष्ट करण्यात गेलं. माझ्या नशिबी तसे येऊन ये त्याला सतत वाटायचं. तो शेतात खूप **राबायचा** व घरी आल्यानंतर माझा चेहरा पाहिला की तो समाधानाने झोप घेत होता पण मी दिवसेंदिवस मोठी होत होते. माझ्या लग्नाची चिंता त्याला लागली होती व मी आता जाणार म्हणून त्याला दुःख होत होतं. माझ्या लग्नासाठी माझ्या बापाने काय-काय केलं या बापाविषयी लाडाची लेक म्हणते हे कवी 'लेकीचा बाप' या कवितेत लिहितात..

**'लग्नासाठी माझ्या**
**धाव धाव धवायचा**
**एकटाच कोपऱ्यात**
**हुंदके देऊन रडायचा'**

असा हा माझा हळवा बाप होता. वर्षानुवर्ष सावकाराकडून कर्ज घेतल्या शिवाय त्याची पेरणी होत **नव्हती या** विषयी लेक सांगते......

**'पेरणीच्या पैशासाठी**
**सावकाराला विनवायचा**
**आभाळाकडे डोळे लावून**
**नशिबाला कोसायचा'**

माझ्या शेतकरी बापाचे जीवन अतिशय खडतर होतं. कष्ट करण्याची तयारी असूनही पाऊस वेळेवर नाही झाला तर नशिबाला दोष देत माझा बाप बसत होता. असे अनेक शेतकरी आज आपल्या सभोवताली आहेत. मुलीच्या

लग्नाची चिंता, पेरणीची चिंता, कर्जाची चिंताया चिंतेत त्याच्या आयुष्याचा शेवट होतो. **शेतकऱ्याच्या जीवनाची** वास्तवता ही कविता आपल्यासमोर मांडते. या मुलीच्या तोंडून येणारे शब्द कवींनी या कवितेत अतिशय चपखलपणे मांडलेले आहेत. म्हणूनच ही कविता वाचकांच्या मनापर्यंत पोहोचते. प्रत्येक वाचकांच्या समोर लेकीचा बाप उभा राहतो हे या कवितेचा जिवंतपणा आहे.

समारोप-

कवी पांडुरंग पवार यांच्या 'शिवारातलं पाणी' कविता संग्रहाच्या अभ्यासाअंती मला हे आकलन झालं की, कवींनी शेती व शेतकरी यांच्या जीवनाचे चित्रण वास्तवपणे मांडले आहेत. शेतकऱ्यांचे जीवन मांडत असताना निसर्गाने साथ दिली तर आनंदाने जीवन जगणारा शेतकरी व निसर्गाने साथ सोडली तर **मरणाला जवळ करणारा** शेतकरी या **कविता संग्रहातील शेतकऱ्याविषयी लिहिलेल्या कवितेतून** आपणाला अभ्यासायला **मिळते**.

शेतकऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस कमी व दुःखाचे दिवस जास्त असतात हे मला या कविता संग्रहातील जीवनाविषयीच्या कविता अभ्यासल्यानंतर आकलन झालं. कवींनी अनेक कवितेतून सरकारच्या व नातेवाईकांच्या डोळयात अंजन घालण्याचे काम केलेले मला दिसून आले. शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी याकडे कवी सरकारचे लक्ष वेधून घेतात तर नातेवाईकांनी अडचणीत असलेल्या आपल्या जवळच्या व्यक्तीला आधार द्यावा असा ही हळुवार सल्ला देतात. आज जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत आहे व त्याचा वाईट परिणाम निसर्गावर होतआहे. निसर्गचित्र बिघडल्याने शेतकरी त्रस्त होत आहे. वेळेवर जर पाऊस झाला शेती पिकली व शेतमालाला भाव मिळाला तर शेतकरी कोणाच्या ही मदतीची अपेक्षा करत नाही. जंगलतोड थांबली पाहिजे हा विचार कवी आपल्या कवितेतून वाचकांना देतात. शेतकरी हा साक्षर असो वा निरक्षर पण आपली मुलगी शिकली पाहिजे या विषयीचं मार्गदर्शन करणारा बाप आपणाला दिसून येतो. आपल्या लेकीसाठी जिवाचं रान करणारा बाप वाचकांच्या डोळयात पाणी आणतो.

कविता संग्रहातील कवितेची भाषासाधी ,सरळ, सोपी वाटत असली तरी अनेक कवितेत अलंकारिक भाषा असलेली दिसून आली. यामुळे वाचकांना ती वाचावी वाटते व त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचते. कवितेतील आशय व विषय सभोवतालच्या समाजातील असल्यामुळे कविता चटकन कळते. शेतकऱ्यांचे जीवन सुखा-समाधानाने आपणाला **पाहायचे** असेल तर त्याला संकटकाळी आधार द्या असे मार्गदर्शन करणारे कविता या कविता संग्रहातआहेत व त्या कविता वाचताना वाचकाला मार्गदर्शक ठरतात हेच या कवितासंग्रहाचे यशआहे. किमान एक वेळ तरी वाचावा असा हा कविता संग्रह आहे.

**संदर्भ** :


1. **पांडुरंग पवार– शिवारातलं पाणी कविता संग्रह, शब्दश्री प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती फेब्रुवारी२०१६**
2. **चंद्रकुमार नलगे- ग्रामीण वाङ्.मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स ,कोल्हापूर आवृत्ती आवृत्ती २९ऑगस्ट २०१३**
3. **चंद्रकुमार नलगे ग्रामीण वांङ्.मयाचा इतिहास प्रतिभास प्रकाशन परभणी आवृत्ती दुसरी**
4. **डॉ. वासुदेव मुलाटे ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे जानेवारी १९९१**


***

# शेतक-यांच्या जीवनात प्रकाश पेरणारा : कुळवाडी अभंग


## प्रा. प्रमोद भ. इंगोले

कै.डॉ.शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय कळमनुरी.


माणूस हा अनुभवातून खरे शिक्षण घेत असतो. हाच त्याच्या जीवनातील अनुकूल व प्रतिकूल अनुभव जीवनाला नवी दिशा देऊन जीवन वाहकाचे कार्य करतो. अगदी बालपणापासून चालणारी ही प्रक्रिया अंत्यक्षणालाच थांबते. हा सर्व जीवनाचा भाग. पण संवेदनशील व भावनिक माणूस या अनुभवातून बैचेन होत असतो. चांगले जरी घडले तरी या चांगल्यात कोणाचे काही वाईट तर झाले नाही ना? हा प्रश्न त्या आनंदात ही मनाला चाटुन जातो.सततच्या या नीत्य जीवनातील या अनुभव विश्वाचा तो साकल्याने विचार करतो. आपल्या सारखे दु:ख कोणाच्या वाट्याला येऊ नये वा आपल्या सारखे सुख सर्वांना लाभावे ही त्याची अंतरीक भावना असते. ही धडपड तो अव्याहत चालू ठेवतो आणि ही मानसिक अवस्था ज्याची होते तोच खरा माणुस. माणूसकी असलेला तोच माणूस नसता तो फक्त एक मानव प्राणी. हा माणूपणा असणारी माणसें सध्याच्या संगणक व मोबाईल युगात अल्पप्रमाणात वा दुर्मिळ आहेत असे म्हटले तरी  वावगे ठरणार नाही. हीच माणुसपणाची प्रचिती भावनेच्या कल्लोळातून जाणुन घेऊन प्रकट चिंतन करणारा तो खरा कवी. बुलेट ट्रेन च्या युगातला माणूस वेगवान झाला खरा परंतु थांबायचे कुठे हेच नेमके त्याला कळत नाही.आणि कळाले तरी त्याला थांबता येत नाही. ही आजची मोठी मानवी समस्या.

या सर्वांतुन ही समाजमनाच्या अंतरंगाचा अभ्यास करून त्यावर उपाय योजना शोधनारा कवी माधव जाधव  कुळवाडी अभंग या रचनेतून

अनुभवायास मिळाला. या रचनेच्या अनुषंगाने  तीन बाबी महत्त्वाच्या वाटतात

पहिली अशी की, या देशाचा पोशिंदा तो बळीराजा याचे दु:ख तो अगदी उत्कटपणे मांडतो. दुसरी, तो काव्य प्रकाराची निवड करताना संतानी सर्व जगाला उपदेश केला तो अभंग प्रकार घेतो. तीसरी बाब कवी अनुभवाची जंत्री मांडतो व त्यातील समस्यांचे चिंतन करतो आणि त्यावर उपाय योजना ही हळुवार पणे सांगतो हे महत्त्वाचे वाटते.

कुळवाडी अभंग या शिर्षकातूनच कुनब्याची चित्तरकथा तो मांडीत आहे.पुर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी ही जीवन यशस्वीतेसाठी योगदान देणारी त्रिसूत्री होती.यावरुन सामाजिक दर्जा ही प्राप्त होत असे. पण आज ही परिस्थिती उलट होऊन शेती कनिष्ठ झाली. ही खंत त्यांच्या मनात आहे. नव्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ही शेतीच उत्तम आहे हे तो परोपरीने सहृदय सांगु पाहतो. हीच त्यांची निर्मळ प्रामाणिक भावना या कवितासंग्रहाचा मुख्य गाभा आहे आणि यात तो यशस्वी ही झाला आहे.

बदलत्या काळानुसार प्रत्येकाने बदलले पाहिजेत.चांगल्या जुण्या परंपरा, प्रथा बरोबर नवे ही आत्मसात केले पाहिजे. मग क्षेत्र कुठलेही असो हा मुख्य धागा यातुन बघावयास मिळतो.

खरे तर जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणुन आम्ही शेतकऱ्यांचा गौरव करतो. आजची त्याची परवड पाहता मन दु:खी कष्टी होते.मनाला बोचणारी ही सल या अभंगातून बघावयास मिळते.

विष्णुनी दशावतार घेतले अर्थात दुष्टांचा संहार करण्यासाठी पण यातला सुष्ट असलेल्या बळीराजाला पाताळात नेऊन ठेवणारा वामन अवतार का झाला.हाच प्रश्न मनाला भेडसावतो, थोडक्यात काय तर शेतकऱ्यांचा राजा बळी काय किंवा शेतकरी काय तर या देवादिकांपासुन

ते आजपर्यंतच्या शासन व्यवस्थेचा तो शत्रु वा दुष्ट ठरला आहे.त्या बळीराजाची व्यथा मांडताना कवी म्हणतो,

**तीन पावले ही ! आली डोईवर**

**कुणबी बेजार ! होत गेला**

म्हणजे तेव्हा पासुनची ही शेतकऱ्यांची ही समसम चालु आहे. अनेक राजे, संत, महंत महाराष्ट्रात होऊन गेले. छत्रपती शिवरायांसारखा जाणता राजा यांचे मुर्तीमंत उदाहरण, शिवरायांनी शेतीचे नवे तंत्र दिले, तसेच संत तुकाराम, सावता माळी, तुकडोजी महाराज या संतांनी शेतकऱ्यांना जगण्याच्या मंत्र दिला. नव्हेतर म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही प्रेरणा दिली याचा उत्तम दाखला देऊन ते म्हणतात,

**महानांची नीती ! अभ्यासावी जरा**

**शेतीचा पसारा ! सुधारण्या**

थोडक्यात या महा मानवांचे विचार आजही दीपस्तंभा सारखे आहेत हे विसरू नये ही त्यांची तळमळ दिसते.

आज देशात नवेनवे तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात आले आहे.लोकांनी ते स्वीकारलेही आहे पण शेतीमध्ये हे तंत्रज्ञान आज जेवढ्या प्रमाणात यायला पाहिजेत तेवढे आलेले नाही किंवा ते स्वीकारण्याची शेतकऱ्यांची मानसिकता ही नाही. जुने ते सोने यामध्ये न अडकता नवे ते हवे याचा अंगिकार आम्ही केला पाहिजेत. ही कवीची तळमळ आहे.

**पारंपरिक शेती ! सोडुन ती द्यावी**

**काळाशी असावी ! सुसंगती**

या अभंगातून बघावयास मिळते. एवढेच नाही तर शेती विषयक ज्ञानाचा समावेश अगदी प्राथमिक शिक्षणातुन व प्रशिक्षणातून व्हावयास हवा. ही त्यांची दुरदृष्टी महत्वाची वाटते. तो म्हणतो,

**बालशिक्षणात ! करा समावेश**

**शेतीचा अभ्यास ! शासन हो**

तसेच

**बदल करण्या ! पुस्तकी ताकद**
**विचारांची साद ! त्यात आहे.**

त्याच बरोबर शेती विषयक संशोधन होणे गरजेचे आहे व यातुन हवामान निहाय पीकांची लावणी शेतीच्या स्तरा नुसार खतांचा वापर, नवेनवे संकरीत बी -बीयाने, औषधं यांची माहिती शेतकऱ्यांना देण्या साठी शेती प्रदर्शने, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक शेती करणारे उपक्रमशील शेतकरी यांच्या शेतीची पाहणी वा मुलाखती घेऊन नवे तंत्र आत्मसात करणे काळाची गरज आहे. या विषयी कवी म्हणतो

**नवीन बीयाने ! शेती तंत्रज्ञान**
**उत्साही मनानं ! शेती करा**

पाणी म्हणजे जीवन. पण आज पाण्याची समस्या भिषण होत चाललेली आहे. शेतीसाठी सिंचन व्यवस्था असेल तरच शेती काही तरी देते. ही आजची परिस्थिती आहे. जेव्हा आपणाकडे कोणतीही गोष्ट सहज, मुबलक व विणादाम मिळत असेल तर तीचे मूल्य शुन्य बनते. पाण्याचेही तसेच आहे. ज्यावेळी असते त्यावेळी त्याची किंमत कळत नाही. नसल्यास थेंबा-थेंबास तरसावे लागते.ही भावना बदलुन पाण्याचे नियोजन शेतीसाठी करणे अगत्याचे आहे.

**विहीर बोअर ! पुनर्भरण त्यांचे**
**पाणी टंचाईचे ! संकट टळे**

किंवा

**तुषार ठिबकी ! पाणी पिका द्यावे**
**तयाचे राखावे ! आरोग्यची**

हे जल महत्व तो पोटतिडकीने मांडतो. मोबाइल च्या युगात कर लो दुनिया मुठ्ठी में या उक्तीप्रमाणे एका बोटाच्या माध्यमातून जगाचा अभ्यास किंवा स्थीती आम्ही जाणुन घेतो. खरे तर मोबाईल ची ही क्रांती

माणसाची भ्रांती हरवुन बसत आहे. या तंत्रज्ञानाने जग जवळ येऊ पाहतेय पण आपल्या जवळचीच माणसं दुर जात आहेत. यामुळे ग्रामविकास हा कोसो दुर आहे. खेड्याकडे तरुणांईचा बघण्याचा दृष्टीकोन हा सुखावह नक्कीच नाही.

**संगणक मित्र ! मोबाईल हवा**

**तोची वापरावा ! शेतीसाठी**

म्हणुन तरुणांनी या मोबाईलचा उपयोग गावाबरोबर शेती व्यवसायाच्या विकासासाठी व सर्वांच्या सुखासाठी करावा अशी तरुणांना साद देतो. प्रतिष्ठा ही मानवी जीवनाचा मुलाधार आहे. परंतु प्रतिष्ठेची व्याख्या वा खरा अर्थ मात्र अजुनही माणसाला कळालेला नाही. आमचे कर्तृत्व, जीवनातील चंगळवाद आणि जे काही आमच्या कडे आहे त्यापेक्षा जास्त दाखविण्याचा हव्यास यामध्ये ही प्रतिष्ठा खोटी होऊन जाते.

**पत प्रतिष्ठेला ! करून बाजुला**

**व्यर्थ गलबला ! थांबवावा**

या खोट्या प्रतिष्ठेसाठी माणुस आपल्या खऱ्या व वास्तव परिस्थिती कडे कानाडोळा करून आपल्या नसलेल्या कुवतीचा डोलारा समाजापुढे ऊभा करतो आहे .

लग्नातील दर्शनी झगमगाट आज प्रतिष्ठेचा मानदंड ठरत आहे.ऐपत नसताना ही माणुस याला बळी पडत आहे.कवी या बद्दल चिंतन करतो. या खोट्या बेगडी प्रतिष्ठेच्या आहरी न जाता सामुहिक विवाह सोहळयांचे आयोजन करून विवाह संस्कारच्या आनंदा बरोबर पावित्र्य राखावे असे तो आवाहन करतो.

**एकाच खर्चात ! अनेकांचे लग्न**

**दारिद्रयाचे विघ्न ! थांबे त्याने**

एवढेच नाही तर

**पैसा आणि वेळ ! थांबे अपव्यय**

ही त्याची भावना मनस्वी आहे.

स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे महात्मा जोतिराव फुले यांची विचारधारा महनिय आहे. पण आज मुलगी मात्र नकोशी होत आहे. तिच्या शिक्षणाकडे घरातला कर्ता पुरुष दुर्लक्ष करतो हे वास्तव ग्रामीण भागात आज ही पावलोपावली बघावयास मिळते. मुलगी शिकली तरच समाज प्रगतिच्या दिशेने जातो अन्यथा अधोगती निश्चित आहे. हा विचार कवी रूढ करतोय.

मुलीच्या शिक्षणाचा तो आग्रह धरतो.

**एका सावित्रीने ! स्त्री शिक्षित केली**
**कशी बघा गेली ! उच्चपदा**

हे सांगुन प्रत्येक क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान अनेक महत्त्वाच्या खात्याच्या मंत्री पदावरून तीने आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.याची जाणीव करून देतो.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी सततच्या नापीकीमुळे स्वत:ला संपवित आहे.ही बाब अतिशय चिंताजनक आहे. शेतकऱ्याची चहुबाजूंनी होणारी फरफट थांबली पाहिजे. जीवन जगण्याचा आशावाद त्याच्या मनात निर्माण झाला पाहिजे. यातुन कवी मनोभावना मांडताना म्हणतोय,

**आत्महत्या काही ! पर्यायची नव्हे**
**जीवनच आहे ! सोन्यासम**

या ओळी जीवनाचे महत्त्व पटवुन देतात.

एकंदरीत काय तर माणुस हा झपाट्याने बदलु पाहत आहे. विज्ञानातील तंत्रज्ञानाने तो संवेदना हरवुन एक मानवी पुतळा बनत आहे. जेथे संवेदना संपते तेथुनच वेदनांचे कधी न संपणारे अस्थित्व निर्माण होते. या वेदना कालांतराने नासुर बनुन क्लेशदायी ठरतात. माणसां माणसांच्या विचारातील वाढते अंतर हे माणसाच्या विनाशाची कधी ही न ऐकु येणारी

सुचक अशी घंटा आहे. माणुस शिकला पण पकला नाही. पकल्याशीवाय परिपुर्णता नाही याचे भान तो विसरला आहे. रात्रंदिन काबाडकष्ट करून काळ्याआईची सेवा करणारा शेतकरी आज उद्धवस्त होत आहे. जगाचा पोशिंदा असलेला हा कुळवाडी भुषण आज जगाच्या लेखी नाही. ही मोठी शोकांतिका आहे. त्याच्या या हरवु पाहणाऱ्या अस्तित्वाला टेकु देण्याचा कवी माधव जाधवांचा प्रयत्न एक नवा आशेचा किरण निर्माण करणारा आहे. नव्हे तर शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश पेरणारा आहे. या अभंगातुन समाजाप्रती असलेली कवीची उदात्त भावना पदोपदी जाणवते.

संदर्भ:

कुळवाडी अभंग, माधव जाधव, इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती.२०१७

***

# २००० नंतरच्या विद्रोही कवितेतील सामाजिक जाणिवा

(विशेष संदर्भ : मारोती कसाब यांची कविता)

**भरत शिवाजीराव गायकवाड**

संशोधक विद्यार्थी,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

प्रास्ताविक :

मराठी साहित्यात नव्या संवेदनशीलतेचे दर्शन घडत आहे. प्रत्येक कालखंडाची एक विशिष्ट अशी संवेदनशीलता असते. त्या-त्या काळात घडत असलेल्या विविध प्रसंगानुसार संवेदनशीलता ही बदलत असते. सद्यस्थितीत असंख्य प्रश्न समाजासमोर तोंड आ वासून उभे आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळूनही पारतंत्र्याच्या झळा नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. दिवसेंदिवस जाती-धर्माच्या भिंती मजबूत होत आहेत. सामाजिक मूल्यांना पायदळी तुडवली जात आहे. समाजाचे हे वास्तव साहित्याद्वारे चित्रित केले जाते. साहित्याद्वारे सूचित होणाऱ्या सामाजिक जाणिवा वाचकांना समजाव्यात व समाज सुसंस्कारित व्हावा यासाठीच साहित्यनिर्मितीची आवश्यकता असते.

"मराठी साहित्याचे क्षेत्र हे भव्य आणि दिव्य आहे. या साहित्याला इसवी सनाच्या बाराव्या शतकापासून, म्हणजे सुमारे साडेआठशे वर्षांची परंपरा आहे. तीत संत साहित्य, संत साहित्य, संत साहित्य, इंग्रजी आमदानातील मराठी साहित्य, स्वातंत्र्यपूर्व साहित्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य, आधुनिक साहित्य, साठोत्तरी साहित्य, १९९० नंतरचे साहित्य असे परिणामकारक टप्पे आहेत. काव्य, कादंबरी, कथा, नाटक इत्यादी अनेकानेक साहित्य प्रकार (Form) हे मराठी साहित्यात संपन्नतेने हाताळले गेलेले आहेत."[1] सदरील शोध निबंधाचा विषय हा '२००० नंतरच्या विद्रोही कवितेतील सामाजिक जाणिवा' (विशेष संदर्भ : मारोती कसाब यांची कविता ) हा असल्यामुळे या शोधनिबंधात फक्त मारोती कसाब यांच्या विद्रोही कवितेचा अभ्यास केलेला आहे.

### विद्रोही कवितेचे स्वरूप :

प्रवाहाच्या विरुद्ध लिहिल्या जाणाऱ्या कविता तसेच प्रचलित व्यवस्थेवर आसूड ओढणाऱ्या कविता विद्रोही कविता म्हणून ओळखल्या जातात. विद्रोह म्हणजे समाजद्रोह नाही. विद्रोह म्हणजे निव्वळ विरोधाला विरोध करणारे, आक्रमकांनी ज्वालामुखीचे रूप धारण करणारे असा गैरसमज पसरला आहे. पण व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणे म्हणजे विद्रोह. "जेव्हा जेव्हा अन्याय, जुलूम, छळ यांचा अतिरेक होतो, आता सहन करणे शक्य नाही नव्हे सहन करणे सोडले पाहिजे. हे फार काळ चालले आहे, यापुढे चालणार नाही, असे जेव्हा माणसाला वाटते तेव्हा विद्रोहाचा जन्म होतो."[2]

काव्य लेखनासाठी पारंपारिक रंजनवादी शैलीचा वापर न करता तसेच कल्पनेलाही नकार देत थेट वास्तवाची निर्भीडपणे मांडणी करणारी कविता हेच विद्रोही कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मराठी साहित्यामध्ये कवितेद्वारे मोठ्या प्रमाणात विद्रोही सामाजिक जाणिवा अनेक कवींनी मांडलेल्या आहेत. "मराठीतील पहिला विद्रोही कवी म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करावा लागेल. समाजातील वाईट रूढी परंपरा, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा कडक शब्दात समाचार घेऊन तुकारामांनी समाजप्रबोधन केले. स्वातंत्र्योत्तर काळातील बहुतांश दलित कवींचे काव्य लेखन हे विद्रोही काव्य या प्रकारातील आहे. दया पवार, ज. वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जून डांगळे, केशव मेश्राम, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, मल्लिका अमर शेख, प्रज्ञा दया पवार अशा साहित्यिकांचा उल्लेख विद्रोही साहित्यिक म्हणून करण्यात येतो."[3] सध्या महाराष्ट्रातील विद्रोही लेखन चळवळीतील एक सशक्त नाव म्हणजे प्रा. मारोती कसाब.

मारोती कसाब यांचा 'पोरगं शेकत बसलंय' हा पहिला कवितासंग्रह १ ऑगस्ट २००५ साली प्रकाशित झाला. या संग्रहात पंचेचाळीस कवितांचा समावेश असून शिक्षणामुळे तरूणांची झालेली दुर्दशा, दीन-दलितांच्या व्यथा, वर्णव्यवस्था व धर्म व्यवस्थेमुळे माणसांची झालेली अवहेलना हे त्यांच्या कवितेचे मुख्य विषय आहेत. त्यानंतर २६ जानेवारी २०२१ रोजी 'रातंदिस असे' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या संग्रहात

५० कविता असून अलीकडील दहा-पंधरा वर्षातले झणझणीत वास्तव त्यांच्या कवितेद्वारे चित्रित झाले आहे. मारोती कसाब हे एक हाडाचे कार्यकर्ते आहेत. अन्याय, अत्याचाराच्या विरोधात त्यांची लेखणी झिजतेच पण अशा वेळी ते स्वतः उपस्थित राहून पीडितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. दूरदर्शनवर ऐकलेल्या किंवा वर्तमानपत्रांतून वाचलेल्या घटनेवर आपला विद्रोह व्यक्त करणारे असंख्य कवी भेटतील पण कृतिशील सहभागाद्वारे समाजवास्तव मांडणारे मारोती कसाब यांच्यासारखे कवी दुर्मिळच...!

**मारोती कसाब यांची विद्रोही कविता :**

विद्रोही कवी म्हणून मारोती कसाब यांची महाराष्ट्रभर ओळख आहे. डिग्रस जि. परभणी येथील ते मूळ रहिवासी आहेत. गरिबीने पीचलेल्या कुटुंबात जन्माला आल्यामुळे लहानपणापासूनच आई-वडिलांचे काबाड कष्ट त्यांना पाहता आले. गरिबीचे चटके सहन करताना त्यांना हाल-अपेष्टा, पिळवणूक, दडपशाही अशा अनेक संकटांचा सामना करावा लागला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते सेलू येथे गेले. शासकीय वसतिगृहात राहून त्यांनी पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांचे पदव्युत्तर शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे झाले. या कालावधीत समाज वास्तव मांडणाऱ्या अनेक कविता, वृत्तपत्रे, साप्ताहिके व दर्जेदार मासिकांचे ते वाचन करू लागले. त्यांनी स्वतः जगलेल्या, भोगलेल्या यातना शब्दरूपाने बाहेर येऊ लागल्या. गरिबांचे वास्तव मांडणारी त्यांची लेखणी आज ताठ मानेने जगासमोर विद्रोह करायला कधीही घाबरत नाही. विद्रोहाद्वारे क्रांती करू पाहणारी, प्रस्थापितांना वास्तवाची चपराक देणारी व मानवतेचे गुणगाण गाणारी त्यांची लेखणी आहे.

मारोती कसाब यांची कविता त्यांच्या जगण्यातून जन्मलेली कविता आहे. इथल्या विषमतावादी व्यवस्थेच्या चिंतनातून जन्म घेतलेली त्यांची कविता आहे. खरेतर कोणत्या जातीत जन्म घ्यावा, कोणत्या धर्मात जन्म घ्यावा हे माणसाच्या हातात नसतेच. पण तरीही दलित समाजात जन्म घेतलेल्या माणसांचा आजही मोठ्या प्रमाणात छळ केला जातोय. छत्रपती

शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा बसवेश्वर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक महापुरुषांचा विचार अंगीकारणाऱ्या प्रस्थापितांनी शोषणाची परंपरा सोडली पाहिजे. माणसाला माणसाप्रमाणे वागणूक न देता मुक्या प्राण्यांची पर्वा करणारी इथली व्यवस्था आहे. हे वास्तव मांडताना 'माझ्या बापा' या कवितेतून कवी लिहितात,

**"गाढवालाही पाणी पाजले**
**म्हणे नाथाने**
**अन् रेड्यामुखी वदविले**
**म्हणे वेद ज्ञानियाने.**
**आम्हाला मात्र माणसं असूनही**
**ज्ञानबंदी माझ्या बापा"**

मनुस्मृतीच्या नियमांनी चालत आलेली वर्णव्यवस्था अतिशय अन्यायकारक होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मनुस्मृती' या ग्रंथाचे दहन केले होते. भूत ही संकल्पना अस्तित्वात नसते. पण मनू नावाचं भूत आजही दलितांना भेडसावताना दिसतंय. बाबासाहेबांनी मनुस्मृती हा ग्रंथ जाळला ;पण प्रस्थापितांनी त्यांच्या डोक्यात पोसलेल्या मनुस्मृतीचे काय? आजही घराला मनुस्मृतीचे नाव दिले जाते. पूर्वी शोषणाची परंपरा ही घरा-दारापर्यंत मर्यादित होती. आज ती शाळा-महाविद्यालयात, विविध शासकीय कार्यालयात, खाजगी कंपनीतही आलेली दिसते. समाजमनाला गढूळ करणारा हा अंतर्विरोध आणि मनूभक्तांची दांभिकता कवीने अचूक शब्दात रेखाटली आहे. 'मनुचे भूत' या कवितेतून कवी म्हणतो,

**"मनुस्मृती जाळली भिमाने**
**पण मनू जिवंत राहिला**
**काल धडधडीत मी**
**वस्तीत माझ्या**
**अंधार येताना पाहिला"**

आपल्या विद्रोही कवितेच्या माध्यमातून कवी अनेकदा आक्रमक बनतात. कारण मनाला निराश करून टाकणारी सभोवतालची परिस्थिती

निर्माण झाली आहे. ढोंगी, मतलबी व्यवस्थेवर प्रहार केले पाहिजे. समाजमनाच्या शुद्धीकरणासाठी विद्रोहाची पेरणी केली पाहिजे. असे कवीला वाटते. हत्यारांना पाजळून ठेवण्याचा संदेश देताना कवी लिहितात,

**"तेव्हा दोस्तहो,**
**उसळत्या लेखणीबरोबर**
**आता गंजलेली**
**ढोर फाडण्याची जुनी हत्यारही**
**पाजळून ठेवायला विसरू नका"**

विषमतावादी व्यवस्था ही अलीकडेच सुरू झालेली आहे असे नाही तर ती अगदी प्राचीन काळापासून समाजात दरी निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. या विषमतावादी व्यवस्थेवर अनेक संतांनी त्यांच्या अभंगाद्वारे प्रहार केलेले आहेत. दगडात देव नाही माणसातच देव आहे म्हणून रंजल्या गांजल्यांची मदत करा असा संदेश संतांनी दिलेला आहे. पण सध्या समाजात दैववाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. देवाच्या समोरच अनेक ठिकाणी अन्याय अत्याचार होतात. तरी देव बाप्पा गप्पगार का? या गोष्टीचे चिंतन कवी करतात. 'बाटला तो देव' या कवितेतून देव कसे फेल आहेत, सगळं कसं ढोंग आहे याची जाणीव करून देताना कवी लिहितात,

**"देवळात देव नाहीच उरला**
**कुठे तो खपला सांगा मला**
**देवाच्या देखत होतो अत्याचार**
**तरी गप्पगार देवबाप्पा"**

स्त्रियांना माणूस म्हणून समाजाने आजही स्वीकारलेले नाही. एका बाजूला स्त्रिया स्वतंत्र झाल्या अशा ढीगभर चर्चा करायच्या, स्त्री सन्मानाच्या गोष्टी सांगायच्या अन् वास्तवात मात्र सोईनुसार तिला मर्यादित ठेवायचे. पुरुषप्रधान संस्कृतीची डोळे स्त्रियांकडे कशा पद्धतीने पाहतात याची स्पष्टता 'स्तनयोनी' या कवितेतून कवीने निर्भीडपणे उलगडून दाखवली आहे. स्त्रियांचा आदर करणारी आपली संस्कृती आहे. स्त्रीला शक्ति, देवता मानणारी आपली संस्कृती आहे. पण वास्तवाचा विचार केला तर स्त्री म्हणजे फक्त स्तनयोनी... हे लाजिरवाणे वास्तव कवितेच्या माध्यमातून कवीने जगाच्या वेशीवर टांगले आहे. लेखणी आणि

वाणी स्तनयोनीवरच का घुटमळते? असा प्रश्न उपस्थित करत समाजातील अशा दूषित मनोवृत्तीच्या माणसांचा कवीने चांगल्याच भाषेत समाचार घेतला आहे. समाजातल्या अशा दूषित प्रवृत्तीवर हल्ला करताना कवी म्हणतात,

**"नसता घेतला आकार**
**तिच्या स्तनांनी घाटदार**
**मूत पिऊन जगला असता**
**जन्मल्याबरोबर?"**

असंख्य कुविचारांनी बरबटलेल्या या व्यवस्थेत आपल्या तत्त्वांशी निष्ठावान राहण्याचा संदेश कवी देतात. समाज आणि संस्कृतीचे अवमूल्यन करणाऱ्या अपप्रवृत्तींवर कवीने हल्ला केलेला आहे. अशा वेळी परिवर्तनाची समाजाला अत्यंत आवश्यकता असते. समाज परिवर्तनाच्या कार्यात अनेक कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून दिले आहे. समाजाला एखादा चांगला विचार पटवून देणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजकंटकांकडून त्रास दिला जातोय. परिवर्तनवाद्यांच्या हत्या केल्या जात आहेत. समाजातली अशी सैतानी प्रवृत्ती थांबली पाहिजे यासाठी 'सनातनी सैतानाला मिळेल का मूठमाती?'या कवितेतून कवी लिहितात,

**"दाभोळकर पानसरे रोज मारणार?**
**माणसांच्या मुंड्या सांगा किती खुडणार?**
**विचार मारण्याच्या किती शोधणार रिती**
**सनातनी सैतानाला मिळेल का मुठमाती"**

मारोती कसाब यांच्या कवितेतील विद्रोह हा साधा नाही. तो परिवर्तनाच्या दिशेने झेपावणारा आहे. त्यांच्या कवितेतील विद्रोह हा माणसांची झोप उडवणारा आहे. मारोती कसाब यांच्या कवितेतून समाजातील अनेक ज्वलंत प्रश्न मांडले जातात. त्या प्रश्नावर उपाययोजना शोधण्याची प्रेरणा ते वाचकांना देतात. म्हणून कसाबांची कविता ही मला विद्रोही कवितेच्या कक्षा रुंदावणारी वाटते. सभोवतालच्या भ्रष्ट जगण्यावर, ढोंगावर, स्वार्थावर आसूड ओढणारी वाटते. वरील दोन्ही कविता संग्रहातून त्यांनी अनेक सामाजिक विषय हाताळले आहेत. प्रामुख्याने वर्तमानातील विविध संदर्भ त्यांनी सहजतेने कवितेतून टिपलेले आहेत. 'पोरगं शेकत बसलंय' या पहिल्या कवितासंग्रहातील कविता

आत्मटीका, आत्मक्लेश करणाऱ्या आहेत. या पहिल्या कविता संग्रहानंतर जवळपास पंधरा वर्षानंतर त्यांचा 'रातंदिस असे' हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहातील कवितेतून त्यांनी व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारला आहे. दिवसेंदिवस समाजात परिवर्तन घडून आले पाहिजे. समाजाचा विकास झाला पाहिजे. पण विविध कारणांमुळे समाज विकासात अडथळे निर्माण होत आहेत. समाज विकासातील अडथळयांची यथायोग्य चर्चा कवीने केलेली आहे. 'पोरगं शेकत बसलंय' व ' रातंदिन असे' हे दोन्ही कवितासंग्रह केवळ कवितासंग्रह नाहीत; तर सामाजिक बदलांचे  दस्ताऐवज आहेत असे म्हणावे लागेल. मारोती कसाब यांच्या रुपात मराठी साहित्याला एक सशक्त विद्रोही कवी लाभला आहे, असे मला या दोन्ही काव्यसंग्रहांच्या अभ्यासातून जाणवते.

निष्कर्ष :

१) विविध सामाजिक प्रश्नांसाठी अनेक आंदोलनात, मोर्चात पुढाकार घेणारा हा रस्त्यावरचा कवी आहे.

२) कार्यकर्ता हा फक्त रिकामटेकडाच असतो हा गैरसमज आहे. एखाद्या नोकरीवर असतानाही त्या व्यक्तीमध्ये असलेला कार्यकर्ता त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

३) मारोती कसाब यांची कविता फक्त सुधारणेसाठी नाही ; तर सामाजिक क्रांती घडवून आणणारी कविता आहे.

४) मारोती कसाब यांची कविता व्यवस्थेला प्रत्यक्ष भिडणारी कविता आहे.

५) कवीच्या लेखनातील विद्रोह हा संत तुकारामांच्या विद्रोही लेखनाची परंपरा चालवणारा आहे.

संदर्भ :

१. https://maharashtratimes.com/editorial/samwad/marathi/articleshow/29017197.cms
२. https://maharashtratimes.com/editorial/column/revolt/articleshow/65057650.cms
३. https://mr.m.wikipedia.org/wiki/
४. कसाब मारोती - पोरगं शेकत बसलंय, 'मुक्तरंग' ११८, यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल, मेन रोड, लातूर.
५. कसाब मारोती - रातंदिन असे, गणगोत प्रकाशन, ईरा निवास, देशपांडे गल्ली, देगलूर जि. नांदेड - ४३१७१७

***

# समकालीन अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेणारी कविता: 'माझ्या वर्तमानाची नोंद'


**प्रा. बालाजी गणपतराव भंडारे**

मराठी विभागप्रमुख, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती. ता. अहमदपूर जि.लातूर


मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे जसजसा समाज बदलतो, जसे त्यात परिवर्तन होते तसे माणसाचे जीवनही बदलत जाते. समाजासोबतच माणसाचा सबंध वर्तमानाकडे बदलण्याचा दृष्टिकोनही बदलत जातो. हे परिवर्तन वेगवेगळया स्वरूपाचे असते. या बदलामुळे त्याच्या जीवनाकडे पाहण्याचा धारणाही बदलतात हा बदल सौम्य स्वरूपात असला तरी, वरवर तो दिसत नसला तरी आतून मात्र तो सबंध वर्तमानच कवेत घेतो तर कधी कधी त्या वर्तमानाला तो अस्वस्थ करतो. अशा या अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी कवितेने केलेला दिसून येतो.परंतु काही मोजक्या कवींनी भूत-वर्तमान-भविष्य याच्या लपंडावाचा व अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेतला, तटस्थपणे त्याचा अंतरपट मांडला त्यात अग्रक्रमाने नाव घ्यावे लागते ते अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेणारे अतिशय सक्षम कवी म्हणून पी. विठ्ठल यांचे. कवी पी. विठ्ठल यांचा 'माझ्या वर्तमानाची नोंद' हा कवितासंग्रह या सर्व बदलाला अचूकपणे आपल्या कवितेत शब्दबद्ध करतो. तो अगदी तटस्थपणे वर्तमानकालीन परिस्थितीकडे त्यातल्या प्रत्येक घटकांकडे बदलत गेलेल्या जीवनधारणेकडे व काळानुरूप बदललेल्या नीतिमूल्यांकडे, तत्त्वांकडे, नातेसंबंधाकडे व पराकोटीच्या आत्मकेंद्रीवृत्तीकडे तटस्थपणे पाहतो आणि तो तेवढ्याच ताकदीने शब्दबद्धही करतो. यात माणसाची होत चाललेली आत्मकेंद्रीवृत्ती,

इतरांच्या दुःखा. बद्दलची बोथट होत जाणारी जाणीव, अनेक अस्वस्थ करणारे विविध घटना व प्रसंग, जागतिकीकरणाच्या रेट्यात स्वत्वाला हरवून बसलेला माणूस व दिखाऊपणाचा होणारा बडेजाव अशा अनेक घटकांना संवेदनशीलतेने, चिंतनशीलतेने 'माझ्या वर्तमानाची नोंद'या कवी कवितासंग्रहात कवी पी. विठ्ठल यांनी शब्दबद्ध केले आहे. तसा हा एकूण सदतीस दीर्घ कवितांचा हा. काव्यसंग्रह परंतु यामध्ये माझ्या पासून सुरू होणारी ही कविता संपूर्ण वर्तमानाची होऊन जाते या प्रवासात ती विविध नोंदी व्यक्त करते. आत्मशोधाकडून समूहशोधाकडे जाते व या दुभंगलेपणाचा शोध घेत ती एकसंघतेचा पर्यायही देते. भूत भविष्याचे वर्तमानही आपल्या समोर ठेवते व स्व पासून सुरू होताना ती समष्टीचा वेध घेते म्हणून मला ती कविता वर्तमानाच्या अस्वस्थ व्यक्तीची न राहता अस्वस्थ समष्टीची होऊन जाते.

'माझ्या वर्तमानाची नोंद' मधील सर्व कविता तेवढ्याच ताकदीच्या आहेत. समाजाच्या एकसंघतेतील दुभंगलेपण ती चित्रीत करते व वाचकाला आत्मशोध घ्यायला भाग पाडते. 'दुःखाचे महावस्त्र' ही कविता स्वतःचा शोध घेत कधीच न संपणारा प्रवास करते...

'दुःखाचं महावस्त्र विणून स्वतःच्या आत्मशोधाचा केविलवाणा प्रयत्न जाळयात अडकलेल्या कोळयासारखा.... कुठवर कुठवर म्हणून क्षितिजाकडचा प्रवास तोच तो पुन्हा पुन्हा संपत नाही कधीच माणूसपणाचा गुन्हा(पृ.५२)

या कवितेतून कवीची स्वतःला शोधण्याची केविलवाणी धडपड दिसून येते की आपण आपल्या स्वतः भोवती स्वतःच्या महत्त्वाकांक्षेपोटी एक कोश निर्माण करतो आणि रेशीम किड्यासारखा त्याच कोशात अडकतो ही बाब कवीला अस्वस्थ करते.हे जगणे समग्र माणसांचे होऊन जाते. तर कधी कधी ही कविता संस्कृतीचे गोडवे गाणा-यांना, साहित्याचे संशोधन करणाऱ्यांनाही व विविध बाबींचा शोध घेणार्यांना प्रश्नांकित करते..

"सगळेच गुंतलेत संस्कृतीच्या अवशेषात बलुतेदारांच्या औजारात आदिवासी आणि भटक्या विमुक्तांच्या रूढी,परंपरांचा शोध घेण्यात' (पृ.११०)

असे हे वर्तमानकालीन संशोधन इन्क्रिमेंट शोधार्थी वरचे आहे, उदरनिर्वाहाशी संबंधित आहे व नाविन्याचा शोध जणू या संशोधनाच्या चौकटीत येतच नाही असे कवीला वाटते. मानवी जीवनातून हळूहळू नितीमूल्य हरवत चालल्यामुळे स्वार्थीवृत्ती वाढल्याने सबंध जीवन व्यवहारच समाजाच भ्रष्ट अशा एका अनाकलनीय व्यवस्थेचा बळी ठरतो आहे आणि त्याला माणूसच कसा जबाबदार आहे याची जाणीव व कवीला होते. म्हणून समग्र वर्तमान कसे उद्ध्वस्त होत चालले आहे याची जाणीव 'उध्वस्त वर्तमानाची कविता' यातून अशा महानगरीय मानसिकतेला कवी चित्रित करतो. माणसाचा कल महानगराकडे वाढला आहे आणि महानगरांमध्ये अतिशय गंभीर प्रश्नांना देखील उथळपणाने, चवीने चाखण्याची-जगण्याची सवय झालेली आहे. संवेदनशील मन किंवा संवेदनशील माणूस आता हरवत चाललाय, यांत्रिक माणूस किंवा कृत्रिम माणूस उदयाला आलेला आहे, जो भावनाशून्यतेला प्राधान्य देतो आहे, याचे प्रतिबिंब म्हणजे ही कविता-

'रिमोट हातात घेऊन हॉलीवूड वाल्यांना शिव्या देत आम्ही डिस्कव्हरीवर स्थिरावतो आफ्रिकन निग्रो बायकांना डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळतो त्यांचे विवस्त्र देह पाहून आपणच किती सुधारणावादी असल्याचा आम्हाला कळतं आमच्या मेळघाटातल्या आदिवासी उगीच कुपोषणाच्या नावाने ओरडतात याही गोष्टीचा आम्हाला साक्षात्कार होतो'(पृ.६१)

म्हणजे आमच्या चंगळवादी वृत्तीला आणि महानगरीय मानसिकतेला निग्रोंच्या तुलनेत आदिवासी स्त्री सुधारलेली वाटते आणि या सुधारणेचे मेरुमणी आपणच आहोत, आपल्यामुळेच हे शक्य झाले असे त्याला वाटते

आणि वर्तमानाचा गुलाम होऊन कुठल्याही प्रश्नाच्या मुळाशी न जाता उथळ पांगी आपले मत व्यक्त करून आपण सतत चैनल बदलत जातो. हा महारनगरीय वर्तमानकालीन संदर्भ घराघरात पाहायला मिळतो ज्याचे आपणनकळत गुलाम झालेलो आहोत जे आपल्याला कळतही नाही, पण हे सत्य आहे. या बाबीला ही कविता अधोरेखित करते.

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणामुळे तर एक नवीन संकल्पना अस्तित्वात आली. ती म्हणजे 'युज अँड थ्रो'ची संकल्पना. म्हणजे कुठल्याही वस्तूचा मनाला वाटेल तसा उपभोग घेतल्यानंतर ती वस्तू फेकून देणे अशी उपभोगीवृत्ती सर्व स्तरात दिसते. याचे चित्रण कवी 'शहर:काही संदर्भ' या कवितेत करताना दिसून येतात.

'इथल्या झरोक्यांनाही नजरा असतात मदमस्त गजरे असतात उन्माद असतो शृंगार असतो 'फॉरेन कल्चरचा' प्रणय असतो 'युज अँड थ्रो'चे सूत्र इथे असते कचराकुंडीत सकाळी अर्भक किंकाळते'.

युज अँड थ्रो संस्कृतीमुळे आपण किती संवेदनाशून्य होत आहोत याचे हे प्रतिबिंब जागतिकीकरणाच्या परिणामातून आलेल्या चंगळवादी वृत्तीमुळे फोरेन कल्चरचे अंधानुकरण करणे व स्वच्छंदीवृर्ती जपण्यासाठी वस्तूचा उपभोग घेत घेत व्यक्तीलाच वस्तू समजून उपभोग घेणे आणि त्यातून निर्माण झालेल्या परिणीतीला कचराकुंडीचा रस्ता दाखवणे ही चंगळवादी अस्वस्थ करणारी मनोवृत्ती वर्तमान काळात वाढलेली आहे तिचा समाचार कवी या कवितेतून घेतो.म्हणजे भारतीय संस्कृतीमध्ये काळजाचा तुकडा मानली गेलेली संकल्पना जन्मदात्रीला व जन्मदात्याला ही प्रश्नांकित करताना दिसून येते. एवढे आपण संवेदना शून्य, बोथट मनोवृत्तीचे झालेलो आहोत या बाबीचे विदारक चित्रण कवी पी.विठ्ठल यांनी केलेले आहे,जे अस्वस्थ वर्तमानाला उजागर करते.

'बाप'हा अनेक कवींच्या जिव्हाळयाचा विषय. कभी पी.विठ्ठल यांनी 'बाप:काही संदर्भ'या कवितेतून रेखाटलेला बाप इतर सर्व बापासारखा

तत्वनिष्ठ, सत्यवचनी, वर्तमान भाषेत ज्याला अडाणी म्हणावं असा विनाभ्रष्टाचारी, सत्य वचनाला, निष्ठेला समृद्धी समजणारा, समाजहीत म्हणजेच समृद्धी असे मानणारा.पीविठ्ठल यांनी मानलेला बाप जुन्या धाटणीचा, इमानेइतबारे जगणारा असा आहे, त्याच्या आयुष्याची

गोळाबेरीज काय तर.....'नोकरीशिवाय बापानं वरकमाई केली नाही सरकारी खोली सोडून बाप रानात आला चार मोडक्या पत्र्याचं छप्पर उभा केलं आयुष्याच्या उत्तरार्धात एकच एक घर एवढंच समाधान त्याला बळ देऊन गेलं'(पृ.७२)

सत्य निष्ठेने एकाच पत्र्याच्या घरात जगणं आणि वरकमाई न करणे हे वर्तमान काळात अडाणीपणाचा लक्षण. कारण लूटमार करून भ्रष्टाचार करून आपलं ऐश्वर्य उभा करणे हा संकेतच जणू वर्तमान काळात मोठेपणाचं लक्षण ठरलेला आहे परंतु या अडाणी बापाला मोडक्या पत्र्याचं घर ही त्याची आयुष्याची कमाई वाटते. इतराचा हिस्सा लुबाडणं हे त्याच्या स्वप्नाला हे त्याच्या सावलीलाही माहित नाही. परंतु वर्तमान काळात लुबाडणे हेच मोठेपणाचं लक्षण झालेला आहे याबद्दल कवी खंत व्यक्त करतो वडिलांच्या चेहऱ्यावरचे समाधान कवीला बळ देऊन जातं.

'माझ्या वंशावळीचे अभद्र चरित्र'या कवितेतून कवीने आत्मशोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा धागा अनेक पिढ्यांना जोडलेला दिसून येतो. जसा भूतकाळाचा अंधार व्यक्त होतो तसाच भविष्याच्या अंधाराचाही कवी अचूक वेध घेताना दिसतो. या कवितेत कवी म्हणतो-

माझ्या वंशावळीच्या अभद्र चारित्र्याचा आता मला राग येतो...... दोनशे वर्षानं माझा चेहरा पुढच्या पिढीला कसा वाटेल? आता ठरवलं.....माझ्या वास्तव्य काळाचेही पुरावे मी मागे सोडणार नाही'(पृ.७२)

या कवितेतून कवी आत्मशोध घेण्याचा प्रयत्न करतो.म्हणजे पिढ्यानुपिढ्या मोठेपणाचा डोलारा आपण मिरवत बसतो. दोन पिढीच्या

मागचे काहीच आठवत नाही आणि भविष्यातल्या पिढीबद्दल तर अंधारच असतो. माझ्या वर्तमानाचा डोलारा माझ्या पिढ्यांनी पुढे वाहू नये यासाठी स्वतःचे कुठलेही पुरावे मी ठेवणार नाही अशी एक जाणीव कवी व्यक्त करताना दिसून येतो.

खरंतर कविता हा प्रत्येक कवीच्या आत्मीयतेचा व जिव्हाळ्याचा विषय. पण पी. विठ्ठल यांची मुळामध्ये कवितेकडे पाहण्याची भूमिकाच वेगळी आहे. ही कविता अनेक विषयांना कवेत घेते संत-महंत यांना,त्यांच्या आविष्काराला जिवंत ठेवते,काळाच्याही पुढे जाऊन आपले अस्तित्व सिद्ध करते अशा कवितेबद्दल कवी कृतज्ञता व्यक्त करतांना म्हणतात..

'कविते- तुझी जातकुळीच सांगता येत नाही कोणत्या योनीतून तू प्रसूत झालीस कविते - तू मृत्यूपेक्षा थोर आहेस अश्रूंची किंमत तुलाच कळते केवळ'(पृ.७४)

केवळ एवढेच मांडून कविता थांबत नाही तर ऊन सावल्यांचा खेळ, अंधारी पाऊस या साऱ्या बाबी तिच्या कक्षेत आल्या आहेत. वासनेच्या धगीने ती कधी दुःखी होते, सूर्याच्या प्रखरतेने कधी होरपळते, तरीही पुन्हा ती सूर्याकडे धावते, ज्ञानेश्वरांच्या ओवीला, समर्थाचे श्लोकाला, तुकारामाच्या गाथेला ती जिवंत ठेवते. कुठल्याही कोशात अडकत नाही अशा या कवितेने तिचे हे कार्य अव्याहतपणे चालू ठेवावे असा आशावादही कवी व्यक्त करतो आणि तिला विनंती करतो....

'कविते- आता स्वतःच्या कोशातून थोडी बाहेर पड तरुणांच्या वैफल्याला थोडा शब्द दे अश्वत्थामा होऊन जगणाऱ्यांना नवी उमेद दे आणि जमलं तर थोडं माझ्यासारख्या कवीला शब्दांचं अजून दान दे'(पृ.७५)

अशी समकालीन वास्तवदर्शी कविता लिहून आपणही अपूर्णच आहोत म्हणून आणखी मला शब्दाचं दान दे अशी अपेक्षाही ते कवितेकडे व्यक्त करतात.

कवी पी.विठ्ठल यांची 'पुतळे:काही संदर्भ'ही अतिशय लक्षवेधी कविता. महामानवांच्या विचारांचा जागर गावागावात होण्याऐवजी गावागावात व शहरात पुतळयांची आगमन झाले. या पुतळयांचे अशा वर्तमानात उभे करण्यामागचे कवीला वेगळे संदर्भ जाणवतात व ते संदर्भ कवी अचूकपणे टिपतो...

'अलीकडे पुतळयांची प्रकृती बरी नसते बापूंच्या चष्म्याचा नंबर वाढलाय बाबासाहेबांचा हात खांद्यापासून दुखू लागलाय उभे राहून राहून सावरकर थकले घोड्यावर बसून उन्हानंच छत्रपती रापले'.(पृ.७६)

एका अर्थाने आपण पाहिलं तर आधुनिक काळामध्ये उभ्या केलेल्या पुतळयांचे हे आत्मकथनच आहे. म्हणजे स्वार्थासाठी व महत्त्वाकांक्षेसाठी आपण पुतळयांना ही सोडलेलं नाही. नीतिमत्ता, चारित्र्य ,समाजहित याच बाबी ज्यांचा श्वास होता त्या महामानवांना आपण वर्तमानात संशयाचे शिकार केले. संध्या विनय अमृते म्हणतात त्याप्रमाणे'नीतिमत्ताच ज्यांचा श्वास होती त्यांचा वर्तमानात माणसाने स्वार्थासाठी व राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी बळी दिला हा वर्तमानकालीन माणसाचा अवगुन जॉकी आज गुण तथा स्वभाव बनला त्याला कवी अचूकपणे हेरतो व समर्पक शब्दात मांडतो हे वर्तमान वास्तवाचे भेसूर रूप हा आजचा युगधर्म जसा प्रतिमेत होतो उध्वस्त वर्तमानाची नोंद करीत नाही तर त्याची प्रचिती ही देतो.'२ संध्या विनय अमृते यांचे हे विधान अतिशय मार्मिक वाटते ते यामुळेच.

'माझ्या वर्तमानाची नोंद' या कवितासंग्रहात वरील कवितांशिवाय 'महासत्ता वगैरे', 'महानगरातला मी','पृथ्वी तू आमचा बोन्साय केलास', 'आमल्या अस्तित्वाचा शोध', 'अल्बम', 'तेंडुलकर', 'कवि आणि कविता',

'अस्तित्वाच्या कोरड्या रेघा' या आणि अशा इतर अनेक कवितांमधून सबंध वर्तमानकालीन अस्वस्थ करणारे संदर्भ येतात. म्हणून या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ.प्रभाकर बागले म्हणतात,' 'माझ्या वर्तमानाची नोंद'हा पी विठ्ठल यांचा काव्यसंग्रह भूत, वर्तमान, भविष्य यांना सामावून आपले चिंतन मांडतो म्हणून ही कविता वैयक्तिक न राहता ती सामूहिक बनते व्यक्तीची तर आहेच पण ती समस्त तिची प्रतिनिधी बनून समका लावर भाष्य करते म्हणून 'माझ्या वर्तमानाची नोंद' हे काव्यसंग्रहाचे शीर्षक खूप बोलके असा आहे 'माझ्या' या शब्दांमुळे व्यक्तिनिष्ठ ते वाटते आणि 'वर्तमानाची नोंद' हे शब्द परिवर्तनशील व्यापकतेला सूचित करणारे वाटतात'हे डॉक्टर प्रभाकर बागले यांचे विधान काव्यसंग्रहाला अधिक उंचीवर नेणारे ठरते.

सारांश-

कवी पी. विठ्ठल यांचे नाव नव्वदोत्तरी कवितेच्या क्षेत्रात 'माझ्या वर्तमानाची नोंद' मुळे अतिशय दर्जेदार,ताकदीचा कवी म्हणून, समकालीन वर्तमानावर भाष्य करणारे लक्षवेधी कवी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. मराठी कवितेत तीन पर्व मानले जातात पहिले पर्व केशवसुतांचे. दुसरे बा. सी. मर्ढेकर यांचे. तिसरे पर्व कोल्हटकर- दिलीप चित्रे यांचे आणि मला वाटते की समकालीन वर्तमानाच्या चौथ्या पर्वाची सुरुवात कवी पी.विठ्ठल यांच्या 'माझ्या वर्तमानाच्या नोंद' पासून सुरू होते.असे म्हणायला हरकत नाही असे माझे वैयक्तिक मत् आहे. सर्व अभ्यासक माझ्या या मताशी सहमत असतीलच असे नाही परंतु मला वाटते की समकालीन आव्हानांना अतिशय ताकदीने पेलणारी, तेवढ्याच धिटाईने शब्दबद्ध करणारी आणि समकालीन अस्वस्थ वर्तमानाला परखडपणे मांडणारी ही कविता वैयक्तिक व सामूहिक पातळीवर आपणा सर्वांना चिंतन-मनन करायला लावणारी अशी नक्कीच आहे, यात शंका नाही.

**संदर्भ**:


१. पी. विठ्ठल - 'माझ्या वर्तमानाचे नोंद' (काव्यसंग्रह) दुसरी आवृत्ती, मे २०१८, लोकवाङमयगृह प्रकाशन, मुंबई.
२. तत्रैव-पृ.५२
३. तत्रैव-पृ.११०
४. तत्रैव-पृ.६१
५. तत्रैव-पृ.७४
६. तत्रैव-पृ.७२
७. तत्रैव-पृ.७४
८. तत्रैव-पृ.७५
९. तत्रैव-पृ.७६
१०. आशुतोष पाटील(संपा)-माझ्या वर्तमानाचे नोंद-आकलन व अन्वयार्थ', अक्षरवाङमय प्रकाशन, पुणे.
११. प्रभाकर बागले,प्रस्तावना, 'माझ्या वर्तमानाची नोंद' दुसरी आवृत्ती मे२०१८,लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई.(पृ.२१)


***

# माणसाला अंतर्मुख करणारी कविता : कोरा कागद निळी शाई

**प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड**

मराठी विभाग, श्री शिवाजी कॅालेज, कंधार जि.नांदेड-४३१७१४

मराठी कविता आजकाल फार मोठ्या प्रमाणात लिहिली जाऊ लागली आहे.अगदी खेड्यापाड्यातून आलेली मुलं,मुली लिहू लागली आहेत.ग्रामीण भागातही कवी संमेलने, साहित्य संमेलने भरु लागली आहेत.ही बाब मराठी भाषेसाठी निश्चितच आनंददायी अशीच आहे.मराठी कविता बहरत असली तरी बियासाठी जसे टपोरे,दाणेदार कणसं लागतात त्याप्रमाणे कसदार कविता लिहिणाऱ्यांची संख्या अगदी अल्प आहे म्हणून सशक्त आणि कसदार लेखन करणा-यांपैकी मनोज बोरगावकर हे एक आघाडीचे कवी आहेत.

कवी मनोज बोरगावकर हे पुस्तक येण्यापूर्वीच आपल्या कवितांनी महाराष्ट्रभर पोहचले आहेत.आता 'कोरा कागद निळी शाई' या कवितासंग्रहाद्वारे ते पहिल्यांदाच वाचकांच्या भेटीला येत आहेत.हे त्यांचं पहिलंच पुस्तक असलं तरी त्यात नवखेपणाच्या कुठल्याच खुणा जाणवताना दिसत नाहीत.यातील कविता माणसाला अंतर्मुख करणा-या,अस्वस्थ करणा-या आहेत.माणसांचं जगणं हाच या कवितेचा विषय असल्याने ही कविता जगण्याचा शोध घेताना दिसते.म्हणूनच ही कविता जीवन जाणीवेच्या शोधाची कविता आहे असे म्हणावे लागते.या कवितेत वेदना असल्या तरी विद्रोह मात्र कुठेच दिसत नाही.आक्रोश,आक्रस्ताळेपणा हाही या

कवितेतून जाणवत नाही.या संग्रहातील 'चिमण्या त्यांच्या घरात घरटं बांधतात' ही पहिलीच कविता पहा_

**"आजही सालाबादाप्रमाणे चिमण्या**
**घरटं विणायला लागल्या की**
**ती दोघंही आपापल्या परीनं**
**तिला मदत करीत राहतातच**
**पण संध्याकाळी विस्कटलेल्या रांगोळीत**
**सकाळच्या सुबक रांगोळीचे**
**अवशेष शोधत राहावेत**
**बरेचसे त्यागतच...."**

काडी काडी चोचीत आणून घरटं विणणारी चिमणी वाचकांसमोर उभी करुन कवीने अपत्य नसलेली आई साकारलेली आहे.सकाळी काढलेली सुबक अशी रांगोळी संध्याकाळी पार पुसून जावी,तिची राखरांगोळी व्हावी आणि आपण तिला शोधत राहावेत अशी ही अस्वस्थ करणारी घटना आहे.

आत्महत्या करण्यासाठी ठोस असे काही कारण लागत नाही.जगण्याच्या, आयुष्याच्या धामधुमीत अनेक छोट्या-छोट्या घटनाही माणसाला आत्महत्या करायला भाग पाडतात.आत्महत्येचा विचार करताना समोरच्या बंगल्याच्या गॅलरीत एक सुंदर तरुणी येते आणि आत्महत्येचा विचार मनातून निघून जातो.कित्येकांची आयुष्ये तरुणींमुळे बदलली आहेत.अनेकांना जगण्याच्या अनिश्चतेतून जगण्याच्या इच्छेकडे नेले आहे.स्त्रियांच्या सौंदर्यात,त्यांच्या बोलण्यात तशी ताकद असते.'आत्महत्यापूर्वीचे स्वगत' या कवितेत ते लिहितात,

**"असेलच जन्म पुढचा तर**
**माझा देहच कविता व्हावा**

**अन् अजरामर कविता म्हणून**
**आपण सा-यांच्या ओठी राहावं...."**

स्वत्वाची जी एक निष्ठा असते ती निष्ठा याठिकाणी बोरगावकर मांडताना दिसतात.कवितेवरील ही निष्ठा आहे.अशी निष्ठा असणेही जीवन जगण्यासाठी महत्वाची असते.

माहिती तंत्रज्ञानाच्या नावाखाली आपण आपली संस्कृती विसरत चाललो आहोत.तंत्रज्ञानाने आपण जवळ आलो असलो तरी मनाने आणि नात्याने आपण दूर चाललो आहोत.याविषयीची 'तुला पांढरा कावळा शिवला' ही कविता पहा--

**"ती शाणी झाल्याचं गुपित**
**आईला कळण्याआधी कोप-यावरच्या**
**मेडिकलवाल्या दुकानदाराला कळायला लागलं**
**'इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी' अशी**
**घराघरातून ओसंडून वाहू लागली."**

अशी ही आजकालची 'इंन्फर्मेशन टेक्नॉलॉजी'.आपल्या खाजगी बाबीसुध्दा आईला न कळता आज त्या दुस-यांच कळायला लागल्या आहेत.लिंबोणीचे झाड आजच्या मुलांना माहित नाही.'चांदोमामा चांदोमामा भागलास का?' हे गाणे मुखोद्गत असूनही 'लिंबोणीच्या झाडाऐवजी 'बिल्डींग' हा शब्द टाकला पाहिजे असे ते उपरोधाने म्हणतात.शाळांना सुट्टी कोणत्या वारी? या प्रश्नाचे उत्तर 'माझ्या मुलीचं प्रगतीपुस्तकःइयत्ता पहिली या कवितेतील मुलगी 'दंगलवारी' अशी देते.जंगलात एवढी झाडं दाटीवाटीने राहूनही त्यांच्यात दंगली का होत नाहीत? हा प्रश्न विचारणारी चिमुरडी मुर्ख ठरते.खरा तर तिचा हा प्रश्न संपूर्ण मानव जातीला विचार करायला भाग पाडणारा प्रश्न आहे.

वर्णन करणं हा कवितेचा गुणधर्म नाही.अत्यंत कमी अशा शब्दात मांडणी केलेली ती एक रचना असते.बोरगावकरांनी पाहिलेला एखादा प्रसंग कथनात्मक न वाटता तो काव्यात्म वाटतो.त्यांची 'थोडंसं रुपा हत्तिणीविषयी' ही कविता पहा-

या कवितेत धर्मा नावाचा एक माहुत आहे.तो हत्तिणीच्या वागण्याने चिंतीत झाला आहे.त्याला कारणही तसंच आहे.गेल्या कितीतरी वर्षापासून हत्तिणीला हत्तीचा म्हणजे नराचा सहवास नाही. कामजीवनासाठी ती आतुर झाली आहे. कामक्षूधा घालविण्यासाठी मग ती झाडाला धडका देते. बोरगावकरांच्या शब्दात पहा--

**"सायबा गेल्या कित्येक वर्सात**
**रुपाला नर न्हाईच लावला बघा**
**तरीबी मुकाट वागते बक्कळ येळा**
**अन् सोसंना झालं म्हंजी**
**आकाशी झाडालाच धडका देते**
**तिलाबी जिरायला बहाना**
**लागलच की सायबा....!"**

हत्तिणीबरोबर आपलाही फोटो काढून कवी आम्ही दोघं समदुःखी आहोत असं सांगतो. जीवनातील गरज, अपेक्षा याठिकाणी व्यक्त होते. म्हणून ती साहजिकच जीवनाचं तत्त्वज्ञान सांगून जाते.

जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणा-या आणखी काही कविता या संग्रहात आहेत. 'आॅपरेशन थिएटर', 'जलम सोपा होईल', 'मी जात राहीन प्रेतयात्रेला', 'अंगावर पाजायला सांगतो', 'एक म्हातारी' या त्या कविता आहेत. या कवितांमधून आलेल्या व्यक्ती, प्रसंग जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगतानाच माणसाला अंतर्मुख करुन चिंतन करायला लावतात. म्हणूच ही कविता चिंतनशील कविता

आहे असे म्हणावे लागेल. एकूणच चिंतनशील अभिव्यक्ती हे मनोज बोरगावकरांच्या कवितेचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल.

महिलांच्या भावविश्वात रमणा-या ब-याच कविता या पुस्तकात पहायला मिळतात. माणूस असो की पक्षी असो अथवा प्राणी असो मादीपणाचे भोग त्यांना कधीच चुकले नाहीत. पक्ष्यांमधले मादीपण ओळखणे फारसे अवघड नाही कारण मादी हालअपेष्टा सहन करुन, खस्ता खाऊन, कुपोषित होते. उलट नर हा सुरेख, डौलदार असतो.हा आशय बोरगावकरांच्याच शब्दात पहा--

**"पाखरांमध्येही नर-मादी ओळखणं**
**असतं सोपं फारच**
**नर असतो सुरेख, डौलदार खूपच**
**खाऊन खस्ता मादी मात्र**
**कंपॅरिटिव्हली कुरुप फारच**
**भोग मादीपणाचे पक्षी झालं**
**म्हणून थोडीच टळतात!"**

गावाकडे जन्मभर राब राब राबून आलेली बायजाबाई बाळंत होणा-या बाईला म्हणते,

**"पोरी लेकराला विताना**
**आडवी नकोच होऊस**
**बसल्या बसल्याच विता येतं का बघ**
**जमीनबी आपल्यावानीच बाईमाणूस हाय...."**

निब्बर झालेल्या पानानं पिवळा पडताना नुकतंच फांदीवर फुटत चाललेल्या कोवळया पानांना जीवनाचं तत्त्वज्ञान सांगावं तसं ही म्हातारी या ठिकाणी जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगते.

**"मोप मोठ्या झालेल्या**
**पोटाला घाबरु नकोस**

**चौकटीला कधी दादाचं ओझं होतं नसतं पोरी...."**

मोठ्या झालेल्या पोटाला पाहून नुतन बाळंत होणारी महिला घाबरुन जाऊ नये म्हणून जीवनविषयक शहाणपण सांगणारे हे शब्द आहेत. आईजवळ मायेची कसलीही कमतरता असते नाही. आईपणाची ही जाणीव येते कुठून? हा प्रश्न विचार करायला लावतो.

**"सा-यांची आई करते**
**सारखीच माया**
**कर्णाच्याच पाठी का असावी**
**पोरकेपणाची छाया...."**

सा-यांची आई ही सारखेच प्रेम करणारी असते. पण कर्णाच्याच वाट्याला हे भोग का बरे यावेत? कर्णाच्या आयुष्याबद्दल, त्यांच्या पोरकेपणाबद्दल शल्य व्यक्त करणारी ही अत्यंत चिंतनशिल कविता आहे. पुरुष कुठलेही अनैतिक कर्म करुन तो व्यभिचारी ठरत नाही. स्त्रियांनी अनैतिकता केली तर ती व्यभिचारी ठरते. यातून ती आई झालीच तर एक शापीत आई, व्यभिचारी आई ठरते. एक व्यभिचारी बाई म्हणून तिच्या माथी हा व्यभिचारपणा लादला जातो. आईच्या अश्रूंना थारा नसतो. स्वतःच्या मुलाने काळीज कापून नेताना त्याला झालेली जखम पाहून आईचं काळीजसुध्दा बोलू लागतं.हा लोककथेतील आशय मांडताना शब्दसुद्धा थरथरु लागतात. बोरगावकर लिहितात,

"आईच्या अश्रूंना
नसतोच का थारा
'काळीज' देऊनही म्हणते
जपून जा पोरा...."

स्त्रीविषयक वेदना सांगणारी 'मी पोटातच गेलेल्या बाळासाठी कळा देतेय' ही कविता पहा--

**"तुमचं बेबी पोटातच गेलंय' म्हणून**
**बेटा आता तुला कळा द्याव्या लागतील**
**पोटात गेलेल्या बाळासाठी**
**कळा अशा आणि कुठून आणू?"**

पोटात मेलेल्या बाळासाठी कळा कुठून आणू? हा निरुत्तर करणारा प्रश्न आहे. मृत झालेलं बाळ बाहेर पडल्यावर आईच्या जीवाची होणारी तगमग, तिची कालवाकालव ही जीवघेणी ठरणारी आहे. म्हणूनच हे शब्द वाचकांचे श्वास रोखणारे आहेत.

'मी जातच राहीन प्रेतयात्रेला' या कवितेत कवी म्हणतो,

**"बाईमाणसाला जाळायला फारशी**
**वाकडं लागत नाहीत**
**आयुष्यभर छळत राहिल्यामुळे"**

माणसाच्या देहावरुन जाळण्यासाठी लागणा-या लाकडाचा हिशोब सांगता येतो. बायकांना जाळण्यासाठी फार वाकडं लागत नाहीत. कारण ती आधीच आयुष्यभर झालेलीच असते.

आपली मुलं चांगली निपजतील की नाही याबद्दलही कवी साशंक आहे. 'मी माझ्या आईचा मुलगा' या कवितेत ते म्हणतात, शाळेतून आल्यावर मी शुभंकरोती म्हणायचो.आज माझा मुलगा मात्र दप्तर फेकून देवून म्हणतो

**"कंडोम कब कब**
**यौनसंबंध जब जब...."**

असं मुलगा जर म्हणत असेल तर कवीने काय करावे? कवी म्हणतो, त्याची बाराखडी परफेक्ट झालीय म्हणून खुश व्हावं की तो भावी आयुष्यात एड्सने सुरक्षित राहील? म्हणून खुश व्हावं. कवीबरोबरच हा प्रश्न वाचकांचे ही डोके सुन्न करणारा आहे.

'अंगावर पाजायला सांगतो' या कवितेतील लहान मुलगा मुंग्या मारताना पाहून कवीची तडफड होते आहे.

**"तुझ्यातली टोकदार हिंसा**
**आटोक्यात आणण्यासाठी मी**
**अनेक पर्याय शोधून बघतो**
**शेवटी तुझ्या आईला तुला**
**अंगावर पाजायला सांगतो"**

मुलाच्या या कृत्यातून जन्मजात पुरुषाचा क्रूरपणा व्यक्त होताना दिसतो. त्याच्या आईला मुलाला पाजायला सांगून मुलाची क्रूरता कमी करण्याचा प्रयत्न कवी करतो आहे. स्तनपान हे वात्सल्याचे जागतिक दर्जाचे एक प्रतिक आहे.

परंपरेच्या सामाजिक विकृतीतून बाईला भोगावे लागणारे दुःख बोरगावकरांनी अधोरेखित केली आहे. नैसर्गिक उत्सर्जनासाठीसुध्दा तिला पुरुषापेक्षा अधिक सहन करावे लागते. निसर्गाने तिच्यावर अन्यायच केलाय.बोरगावकर लिहितात,

**"उघडली चैन की**
**मोकळे तुम्ही**
**आम्हाला मात्र उत्सर्जनासाठीही**
**सारंच करावं लागतं वरवर"**

ही स्त्रीजातीची शोकांतिकाच आहे. काही कवितांमधून अश्लिलता आली असली तरी ही कविता अश्लील नाही.केवळ अपरिहार्यता म्हणून ह्या कविता आलेल्या आहेत.

कवी मनोज बोरगावकर सरांच्या कविता ह्या माणसाच्या जगण्याच्या कविता आहेत.दुःखाला जात नसते हेचं खरं.आई असेपर्यंत माणूसपणाची बाराखडीसुध्दा शिकून घेतली पाहिजे माणसानं हा संदेशही कवी याठिकाणी देतात.माणसातलं खुडूकपण

कधी जाईल? हाही प्रश्न आहेच. कोंबडीचं खुडूक चोचीत काडी घालून घालवता येतं पण... माणसाला आलेल्या खडूकपणाचं काय? हा न सुटणारा प्रश्न आहे.

सामाजिक बांधिलकी जपणा-या काही कविताही या संग्रहात आहेत.'ती कधी कधी माणसासारखीच वागते-एवढंच!', 'मी जातच राहीन प्रेतयात्रेला', 'पुनरागमनाय चं', ' एवढंच', 'मामा तोंड उघडं ठेवून झोपतो' या कवितेतून सामाजिक वेदना ओसंडून वाहताना दिसते.एकूणच कवी मनोज बोरगावकर यांची कविता माणसाला अंतर्मुख करणारी कविता आहे.मनोज बोरगावकर हे महिला महाविद्यालयात प्राध्यापक असल्या कारणाने आपसुकच त्यांची लेखणी महिलांच्या प्रश्नांकडे सरसावताना दिसते.

***

# २००० नंतरच्या आंबेडकरवादी कवितेची वाटचाल

संशोधक विद्यार्थी
**धनंजय पांडुरंग सोनकांबळे**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावना :**

"आंबेडकरवाद" हे २० व्या शतकात उदयास आलेले समग्र मानव जातीच्या मूलभूत आणि सर्व क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून व जीवन लढ्यातून साकार झालेले आहे. भारतीय मानवी जीवनात किंवा इतर कोणत्याही देशातील मानवी जीवनात दलित,शोषित, पिळला गेलेला मानवाचा बहुसंख्य समाज आहे त्याचा समग्र पातळीवर जीवनाच्या सर्व क्षेत्रात मूलभूत बदल व्हावा व त्यांना माणूस म्हणून सन्मानाने जीवन प्राप्त व्हावे या एकाच ध्येयवादाने झपाटलेला आंबेडकरवाद हा विचार आहे.

आधुनिक भारतात आजही वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, दारिद्रता, स्त्रीदास्य मागासलेपणाचे थैमान लोकांच्या जीवनात सक्रिय कार्यरत आहे. या सगळ्या गुलामगिरीला वर्तमानातील पारंपारिक शोषण करणाऱ्या जमीनदार, राजसत्तेची व धर्म पुरोहितांची मान्यता राहिली आहे. तसेच शासक, शोषक यांची कायम स्वरूपात उत्पादन साधनांवर मालकी राहिली आहे.त्या शोषणाच्या विरोधात डॉ. आंबेडकरांनी सर्वंकष संघर्ष उभारला. अशा सर्व दलित शोषितांचे लढे उभे केले. अजूनही समाधानकारक या व्यवस्थेत बदल झालेला नाही. आजही दलित, शोषित, स्त्रिया यांच्यावर क्रूर, अमानुष असे जातीय अत्याचार होताना दिसतात.हे दूर करण्यासाठी आणि समानतेने जीवन जगण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी तात्त्विक आणि व्यावहारिक ज्ञानाच्या पातळीवर शस्त्रास्त्रे परजून दिली. समाज विकासाचा एक नवा अध्याय मांडला ज्याला आपण आंबेडकर वाद म्हणू शकतो.आंबेडकर वाद एक स्वतंत्र क्रांतिकारक तत्वज्ञान आहे.

१९६० नंतर दलित किंवा आंबेडकरवादी साहित्य चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून उदयाला आली. कथा, कादंबरी, निबंध, नाटक, कविता, आत्मचरित्र/ स्वकथन हे वाङ्मय प्रकार विपुल लिहिले जाऊ लागले.या सगळया साठोत्तरी साहित्याच्या मुळाशी डॉ. आंबेडकरांचेच तत्त्वज्ञान आहे. आंबेडकरवादाची विचारधाराच अनेक कलाकृतींमध्ये ओतप्रोत भरलेली आहे. आंबेडकरवाद ही डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानातून व जीवन लढ्यातून उदयास आलेली एक जीवन पद्धती व विचार प्रणाली आहे. भारतामध्ये आज बहुसंख्य भाषांमध्ये आंबेडकरवादी प्रेरणेतून दलित साहित्याचे प्रचंड लेखन होत आहे. प्रामुख्याने दलित साहित्याच्या अर्थातच दलित कवितेच्या उदय विकासाचे मुख्य केंद्र महाराष्ट्र राज्य राहिले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दलित साहित्याचे आणि कवितेचे क्रांतिकारक सूर निनादताना दिसतात. आंबेडकरवाद हे मानवमुक्तीच्या चळवळीचे क्रांतिकारक तत्वज्ञान आहे.

२० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या आरंभापासूनच भारत वर्षात काही राजकीय व सामाजिक स्थित्यंतरे घडून आली. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रख्यात तत्ववेत्ता विचारवंत कार्ल मार्क्स यांच्या विचाराचा समाज मनावर प्रभाव पडू लागला. डॉ. आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आणि त्यांनी लिहिलेल्या भारतीय राज्यघटने मुळे समतावादी विचारधारा मनामनात प्रज्वलित होऊ लागली. डॉ. आंबेडकर यांच्या मानव मुक्ती संग्रामा बरोबर 'आंबेडकरवादी कवितेचा' उगम झाला. ज्यामध्ये प्रारंभी किसन फागुजी बनसोड, अण्णा भाऊ साठे, नामदेव ढसाळ, वामनदादा कर्डक, दया पवार, अर्जुन डांगळे, त्र्यंबक सपकाळे, हिरा बनसोडे, यशवंत मनोहर, केशव मेश्राम इत्यादी अनेक कवींनी दलित, शोषित, पीडितांची दुःखे लेखणीच्या द्वारा वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. पुढे हळूहळू आंबेडकरवादी कविता' बाळसे धरू लागली व आंबेडकरवादी कवितेला सूर सापडत गेला ती आत्मशोध घेऊ लागली. कारण 'आंबेडकरवादी कविता हे आत्मशोध घेणारी आहे' म्हणून ती इतिहास जाणून घेते. वर्तमान काळाचे भान राखते आणि भविष्याचा वेध घेते. मानवतावादी संविधान मूल्यांशी इमान राखते.

आंबेडकरवादाने साहित्य आणि समाज जीवन प्रभावित केले. लाखो-लाखो जणांचे जीवन उजळून टाकणारी प्रभाग आणि प्रतिभाही आंबेडकर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील प्रबोधनाचे रसायन आहे. शोषितांच्या मुक्तीची प्रेरणा आहे. आजचे हे व्यक्तींनाम एक "विचार प्रणाली" होऊन साकार झाले आहे. ज्याचे नाव "आंबेडकरवाद" आहे. साहित्याच्या क्षेत्रामध्ये विशेषता काव्य क्षेत्र हे आंबेडकर वादाने काठोकाठ भरले असून ज्यांचा विषय कधी कवितेचा झालाच नाही तेच आता समग्र मानवतेचे क्रांतीगान गात आहे. आंबेडकरवादी कविता ही गेल्या काही वर्षातील एक नवीन वाङ्मयीन चळवळ आहे. परंतु ही चळवळ केवळ निखळ वांग्मयीन चळवळ नसून तिचा आपल्या सामाजिक परिवर्तनाशी फार घनिष्ठ असा संबंध आहे.मराठी साहित्यामध्ये जे विविध वाङ्मय प्रकार/ वाङ्मय प्रवाह निर्माण झाले आहेत. त्यात आंबेडकरवादी कवितेचा प्रवाह अनेक वाचक, समीक्षक व अभ्यासक यांचे लक्ष वेधून घ्यायला समर्थ ठरला आहे. मराठी साहित्याच्या क्षितिजावर कवितेच्या रूपाने /आंबेडकरवादी कवितेच्या रूपाने 'निळी पहाट' उदयाला आली आहे.याचा मुख्य केंद्रबिंदू 'आंबेडकरवाद' असून आंबेडकरवादी विचारधारेची सकस असे साहित्यिक पेरणी करण्याचे काम अनेक कवी, लेखक, साहित्यकार यांनी केले आहे. आंबेडकर वादी कवितेचे नाते परिवर्तनवादी तत्त्वज्ञानाशी आहे. हे तत्त्वज्ञान फुले-शाहू -आंबेडकर यांच्या विचारातून आणि मुक्ती लढ्यातून सिद्ध झाले आहे. दलित, शोषित, बहुजन समाजाने जागृत होऊन आणि संघटीत होऊन आपल्या न्याय अस्तित्वासाठी संघर्ष चालू ठेवला पाहिजे याची जाणीव डॉ. आंबेडकर यांच्या विचार आणि कृतीने दिली. आंबेडकरांचा सर्वंकष मूलभूत परिवर्तनाचा विचार शिरोधार्य मानून आंबेडकरवादी कवींनी शोषितांचे दुःखे आपल्या कवितेच्या माध्यमातून वेशीवर टांगलेली दिसतात. पिढ्यान पिढ्या ज्यांना दारुण अशा हाल-अपेष्टाच्या खडतर अग्निदिव्यातून जावे लागले त्यांची भूमिका ही एका व्यक्तीची नसून ती समष्टीची आहे. काल्पनिकता, स्वप्नाळूपणा आणि रंजकतेमध्ये आंबेडकरवादी कविता स्थिरावलेली दिसत नाही. आंबेडकरवादी कविता ही आत्मशोध घेत

जाते.सामाजिक बांधिलकी कडे डोळसपणे पाहते.

**संदर्भसूची :**


१) आंबेडकर वाद चळवळ आणि साहित्य -यशवंत मनोहर

२) आंबेडकरवादी मराठी साहित्य- यशवंत मनोहर

३) आंबेडकर वाद -डॉ. नीळकंठ शेरे

४) बाबासाहेबांचे लोकशाही क्रांती तत्वज्ञान -डॉ. आदिनाथ इंगोले

५) आंबेडकरवादी साहित्य दृष्टिकोन- खंडेराव हरीश


***

# २००० नंतरच्या मराठी कवितेतील दलित जाणिवा

**प्रा. डॉ. अनिल मुंढे**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात अनेक धर्म, पंथ, जाती राहतात. भारत देशाला फार प्राचीन काळापासूनची परंपरा आहे. भारतीय संस्कृती विविधतेने नटलेली आहे. या विविधतेत एकता असल्याचे आपण देशाभिमान म्हणून म्हणत असलो तरी ही परंपरा म्हणावी तशी उज्ज्वल राहिलेली नाही, हे आपल्याला येथील धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेच्या अभ्यासावरून सहज लक्षात येते. अनेक अनिष्ठ चालीरीती, रूढी, परंपरा पचवलेला आपला देश आहे. ईश्वराच्या लेखी सर्व मानवी समाज ईश्वराचीच लेकरे असे मानत असलो तरी इथल्या जातिव्यवस्थेने माणसाला माणसांपासून कोसोदूर ठेवल्याची पशूपेक्षाही हीन, दीन लेखण्याची मंगल परंपरा देखील या देशाची राहिलेली आहे.

अमंगलाला मंगल करण्यासाठी याच भूमीवर संतांना, महंतांना, समाजसुधारकांना जन्माला यावे लागले, त्यांना झिजावे लागले. त्यांच्या कार्यातून विचारांतून अनेक स्थित्यंतरे झालेली आपणास ज्ञात आहेत. इंग्रजांच्या आगमनाने देशाची राजकीय आणि आर्थिक हानी पुष्कळ प्रमाणात झालेली आहे हे खरे आहे; परंतु सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने इंग्रजांनी केलेले अनेक कायदे अनुकूल राहिले आहेत, हे सत्य देखील आपणास नाकारता येणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक विषमतेमुळे सर्वदूर शिक्षणाच्या अभावामुळे आणि येथील समाजाची वर्णवर्चस्ववादी मानसिकता ओळखल्यामुळे इंग्रजांना या भूमीत अनेक वर्ष तग धरता आली. देशाला स्वातंत्र्य मिळून देण्याच्या चळवळीत अनेक जण कार्य करत असतानाच इथला काही समूह घटक मात्र माणूस म्हणून जगण्यासाठी धडपड करत होता. जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा

भारतीय मनाला एक नवी उभारी लाभल्याचे प्रामुख्याने दिसून येईल. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आणि भारतीय राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय जनतेने नवी मूल्ये स्वीकारली. आता आपला विकास करून घेण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये घटनेच्या अधिकारातून माणसाला प्राप्त झाली होती. म्हणूनच भारतीय जनतेने स्वातंत्र्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत केले एकूणच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक या क्षेत्रात स्थित्यंतरे झाली याचा परिणाम साहित्य क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणात होऊन साहित्याला एक नवा आयाम प्राप्त झाला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात साहित्य क्षेत्रात नव्या जाणिवा आणि प्रवृत्ती रोवू लागल्या. यामध्ये दलित साहित्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. वेदना, नकार आणि विद्रोह या तत्त्वत्रयीमुळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे दलित साहित्याने अनेक जाणिवा स्वीकारून मराठी साहित्याला एक नवे क्रांतिकारी तत्त्वज्ञान दिले. एका विचारधारेतून व चळवळीच्या मुशीतून हे साहित्य तयार होऊ लागले. महाराष्ट्रातील दलित चळवळीतून जे दलित साहित्य निपजले त्यात कविता हा वाङ्.मय प्रकार मोठ्या प्रमाणावर बहरास आला. अनेक जुन्या दलित शाहीर कवींनी पोवाडे, कवने रचून आंबेडकरी जलसे निर्माण करून महाराष्ट्रात परिवर्तनवादी चळवळीचा प्रचार आणि प्रसार केला. यामध्ये शाहीर घोंगडे, पठ्ठे बापूराव, नारायण मोरे, दीनबंधु शेगावकर यांच्या रचना सुप्रसिद्ध आहेत. शाहीरांच्या या चळवळीतून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेतून निर्माण झालेल्या जाणिवा नव साहित्यिकांना प्रेरणादायी ठरलेल्या आहेत.

१९६० नंतर दलित साहित्यात प्रचंड भर पडली आहे. अनेक मान्यवर लेखकांच्या साहित्य लेखनाने पुढच्या पिढीतील नवशिक्षित दलित तरुणांना योग्य दिशा दाखवली. नवीन पिढीतील तरुण लेखक-कवी असणाऱ्या तरुणांनी दलित साहित्याची लोकप्रियता वाढवत नेऊन आपले वेगळेपण सिद्ध केले. पारंपरिक विषमतावादी हिंदू संस्कृतीने, रूढीग्रस्त, धर्माने व धर्मशास्त्राने लागलेली मूल्ये स्वीकारून बंधमुक्त मानवतेचे तत्त्वज्ञान

रुजवणाऱ्या जीवन जाणिवा या दलित साहित्याने विशेषत: दलित कवितेने रंगवलेल्या दिसून येतात.

२००० नंतरच्या मराठी दलित कवितेने दलित जीवनाच्या दुःखाच्या, व्यथा वेदनेच्या पुढे जाऊन दलित जीवनदृष्टीचे त्यांच्या आशा-आकांक्षा यांचे स्वप्न आविष्कृत केले आहे. खरेतर मध्ययुगीन काळातच संत चोखोबा त्यांचा मुलगा कर्ममेळा यांनी दलित वेदनेचा पहिला हुंकार आपल्या अभंग रचनेद्वारा दिलेला होता. डॉ. बाबासाहेबांनी घटनेच्या अधिकारातून या वेदनेला वाचा दिली. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा दिलेला मूलमंत्र त्यांच्या अनुयायांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून आपल्या आयुष्यात रुजवला. दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीतून तो योग्य मशागत करून पेरला. अण्णाभाऊ साठे यांनी 'जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भीमराव' ही हाक दिली तर वामनदादा कर्डक यांनी

**'सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठं हाय वो**
**सांगा धनाचा साठा अन् आमचा वाटा कुठं हाय वो'**

अशा रोखठोक भाषेत स्व अस्तित्वाची जाणीव करून दिली. ही जाणीव ठेवून २००० नंतरच्या कवींनी आपला न्याय्य हक्क पदरी पाडून घेत स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवली.

सन २००० नंतरचा काळ अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण असा आहे. या काळात आपण एका नव्या शतकात प्रवेश करते झालोत. जागतिकीकरणामुळे समाजजीवनाच्या एकूणच पद्धतीत अमुलाग्र बदल झालेले आहेत. विज्ञान- तंत्रज्ञानाने आपल्या क्षेत्रात प्रचंड गतिमानता आणलेली दिसून येते. औद्योगीकरण सर्वदूर क्षेत्रात झालेले आहे. जातीपातीच्या अथवा श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या भिंती मोडलेल्या दिसून येतात. तरीदेखील ओठावर जात नसली तरी पोटात आहे. त्यामुळे आजच्या काळातही दलित अत्याचाराच्या असंख्य घटना घडताना दिसून येतात. मात्र २००० नंतरच्या काळातील दलित कवी तेच तेच विषय न मांडता बदलत्या काळानुसार नवा आशावाद, नवी उमेद, नवी आकांक्षा घेऊन आपले काव्यविषय बनवताना दिसून येतात. ही कविता रोख-ठोक बंडाची भाषा बोलू लागते. एवढेच नव्हे तर या विषमतावादी व्यवस्थेला उलथून

टाकण्याचे सामर्थ्य या नवकवींच्या कवितेत व्यक्त झालेले दिसून येते. अशा कवींमध्ये प्रा. गौतम गायकवाड, रुपेशकुमार जावळे, प्रज्ञा लोखंडे, विजया इंगोले, सुषमा अंधारे, मारोती कसाब ,कैलास भाले, रानबा गायकवाड, पी.विठ्ठल, रोहिदास पोटे, विष्णू कावळे, विरा राठोड, संजय बालाघाटे, जावेद अब्दुल कुरेशी पाशा, महेंद्र भवरे, बाळ हाटे, बळवंत कांबळे, अशोक पाटील, विजय जामसंडेकर या आणि अशा इतर अनेक कवींच्या कविता वाचकांना विचार प्रवर्तित करून त्यांच्यात आशावादी दृष्टिकोन निर्माण करतात. त्यामुळे या व इतर कवींच्या कविता वाचकांना अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत.

दलित कविता आजही जात, धर्म, पंथ, देव या कल्पनांना आजही थारा देत नाही आजही ही कविता मानवता हीच जात मानते. कारण माणूस जातीवरून श्रेष्ठ ठरत नसून तो कर्मावरून श्रेष्ठ बनत असतो. आपण कोणत्या जातीत जन्माला यावं हे कुणाच्याच हाती नसतं. मुळात जात ही संकल्पना मानवानेच निर्माण केलेली आहे. त्यामुळे प्रत्येकाने कर्मावर निष्ठा ठेवून प्रयत्नवादी राहिल्यासच मानव जातीचे कल्याण आहे, हे वास्तव ही कविता मांडते. दलित समाजाच्या कित्येक पिढ्या गुलामगिरीत खचल्या गेल्या; पण आता सर्वांना शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. त्यामुळे उच्च शिक्षण घेऊन मोठ्या हुद्द्यावर पदावर विराजमान होण्याचे सुतोवाच ही कविता करते. 'अस्तित्व शोधताना' या काव्यसंग्रहातून कवी रुपेशकुमार जावळे आपल्या 'माय' या कवितेतून जी जाणीव व्यक्त करतात ती आजच्या बदलाची नांदी आहे असे म्हणता येईल. कवी रुपेशकुमार जावळे म्हणतात,

**'माय**
**माझ्या हाती खुरप्या ऐवजी**
**पाटी-पेन्सिल दे**
**त्याच्यावर माझं नशीब लिहिन**
**तुझ्या कपाळावर व्यवस्थेनं**
**मारलेला शिक्का पुसून टाकीन.'**

यावरून आपल्या लक्षात येते की, आजच्या दलित पिढीला शिक्षणाचे महत्त्व पुरते समजलेले आहे. शिक्षण ही काळाची गरज असल्याची जाणीव

ही कविता करून देताना दिसते. आज शहरापासून गावपातळीपर्यंत व्यवस्था बदलल्याचे चित्र अनेक कवितांतून व्यक्त झालेली आहे. 'असं माझं गाव आहे' या कवितेतून कवयित्री विजया इंगोले यांनी जे विचार नोंदवले आहेत ते ध्यानात घेता आज गावामध्ये समंजसपणा, एकी, प्रेम, जिव्हाळा, एकात्मता सर्वधर्म समभाव आपलेपणा बंधुभाव जातविरहित भावना जोपासणारे आत्मीयता पहावयास मिळतील असे सांगताना कवयित्री म्हणते,

**'सुविचारांचे पीक इथे**
**देशभक्तीचे सूत्र आहे**
**बंधुता नाळ इथे**
**मानव सारा एक आहे**
**असं माझं गाव आहे.'**

गावपातळीपर्यंत आलेले परिवर्तनवादी विचार आणि बदलती समाज मूल्ये कवयित्री सांगते आहे. ही कविता जाती-धर्माच्याच विचारात न घुटमळता आज समाजामध्ये समतेचे, बंधुभावाचे राज्य निर्माण होऊन इथे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजली तरच चांगला, निकोप समाज निर्माण होईल, हा आशावाद आजची दलित कविता मांडताना दिसते. आजच्या पिढीला शिक्षणाचे महत्त्व समजले आहे. बाबासाहेबांनी 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही ' ही दिलेली शिकवण सर्वांनी आत्मसात करून शिक्षण ही काळाची गरज असल्याचे समजून घेऊन शिक्षण घेतले. शिक्षणामुळे सगळीकडे परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहे. आज समाज मूल्ये बदलली आहेत. त्यामुळे सर्वांनी एकोप्याने राहावे अशी ही कविता व्यक्त होताना दिसते. कवयित्री विजया इंगोले 'असे वाटे एका जीवा' या आपल्या कवितेतून जो विचार सूचित करतात तो बंधुभाव जोपासणारा आहे. कवयित्री म्हणते,

**'पोसावी देशात लोकशाही**
**व्हावीत सर्वजण भाई भाई**
**सार्थ जीवनाची हीच उतराई**

**कळो अर्थ हा आम्हा नवा**
**असे वाटे एका जिवा'**

अशाप्रकारे कवयित्री आपल्या देशामध्ये बंधुभावाचे समतेचे राज्य निर्माण व्हावे असा विचार मांडताना दिसून येतात.

आजही समाजात सण, वार, विधी, उत्सव, प्रथा, परंपरा, चालीरीती चालत असल्या तरी त्यात अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. दलित समाज पूर्वीच्या प्रथा, परंपरेप्रमाणे आज गाव गाड्याची कामे करताना दिसत नाही. त्याबाबत त्याला कुणी जबरदस्ती ही करत नाही. राज्यघटनेच्या माध्यमातून त्याला कायद्याचे पूर्ण संरक्षण मिळालेले आहे. अनेक समाज परिवर्तनवादी चळवळी उदयाला आलेल्या आहेत. त्यामुळे पूर्वीच्या दलित कवितेतून आणि २००० नंतरच्या कवितेतून आलेल्या जीवन जाणीवा यामध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे. जगाच्या पाठीवर आपला भारत देश अनेक जाती, धर्म, भाषा बोलणारा म्हणून विविधतेने नटलेला आहे. या विविधतेतही एकात्मता असल्याची भावना अनेक कवींनी व्यक्त केली आहे. म्हणून आता धर्मभेद, जातिभेद, वंशभेद नष्ट व्हावे अशी भावना व्यक्त करताना कवी रविदास पोटे नावाचा कवी आपल्या 'मन आभाळून आलं' या काव्यसंग्रहातील 'प्रलय' या कवितेत म्हणतो,

**'असा प्रलय व्हावा**
**सारे धर्म पुसले जावेत**
**सारे वंश नष्ट व्हावेत**
**साऱ्या जाती गाढल्या जाव्यात**
**धर्म उरावा फक्त माणसाचा**
**माणूस'**

अशाप्रकारे माणसा माणसातील दुरावा नष्ट करून अखंड माणसाची गाथा लिहू पाहणाऱ्या कवींच्या जाणिवा शब्दबद्ध होताना दिसतात. एकूणच २००० नंतरची कविता परिवर्तनाची चळवळ उभी करून जात, धर्म, वंश संपुष्टात आणण्याची भाषा बोलते. नवसमाज निर्माण करणाऱ्या जीवन जाणिवा निर्माण करण्याचा निर्धार या काळातील कविता करताना दिसून येतात.

**निष्कर्ष:**

१. २००० नंतरच्या दलित कवितेतून बंधुभावाची व सर्वधर्म समभावाची शिकवण कवी मांडताना दिसून येतात.

२. परिवर्तनवादी विचार आणि बदलती समाज मूल्ये दलित कविता मांडते.

३. जातभेद, धर्मभेद, वंशभेद या पारंपरिक गोष्टीवर आजचे नवकवी विश्वास ठेवत नाहीत.

४. स्वातंत्र्य समता बंधुता अधिक जोमाने वाढीस लागावी म्हणून देशात सर्वधर्मसमभावाचे राज्य येण्याची गरज २००० नंतरच्या कवितेतून व्यक्त होताना दिसून येते.

५. २००० नंतरच्या पिढीतील कवी उच्चशिक्षित असून शिक्षणाला प्राधान्य देणारे आहेत.

६. जातीयता, विषमता, पारंपरिक रूढी, प्रथा, परंपरेच्या जाचातून मुक्त होऊ पाहणारी नवी समाजव्यवस्था २००० नंतरच्या कवितेतून दिसून येते.

७. दलित समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला प्रवाहात येण्यासाठी शिक्षणाचा मूलमंत्र दिला.

८. हिंदू धर्माने माणसांना माणसासारखे वागवावे ही प्रामाणिक भूमिका २००० नंतरच्या कवितेतून मांडलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. दलित साहित्य वेदना व विद्रोह- भालचंद्र फडके

२. मराठी दलित कविता- बी. रंगनाथ

३. दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान- बाबुराव बागुल

४. अस्तित्व शोधताना- रुपेशकुमार जावळे

५. मन आभाळून आलं- रोहिदास पोटे


***